पीएच्. डी. प्रबंध

विषय
संस्कृत – प्राकृत

शीर्षक
जैन दर्शनातील भावना संकल्पना – आशय आणि अभिव्यक्ती

भाग २

संशोधक विद्यार्थिनी
साध्वी पुण्यशीला

मार्गदर्शक
ज. र. जोशी

संशोधन स्थल
संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र,
पुणे विद्यापीठ, पुणे
२००४

पीएच्. डी. प्रबंध

❖ विषय ❖

संस्कृत – प्राकृत

❖ शीर्षक ❖

जैन दर्शनातील भावना संकल्पना– आशय आणि अभिव्यक्ती

भाग – 2

❖संशोधक विद्यार्थिनी ❖

साध्वी पुण्यशीला

❖ मार्गदर्शक ❖

ज. र. जोशी

❖संशोधन स्थल ❖

संस्कृत प्रगत अध्ययन केंद्र,
पुणे विद्यापीठ, पुणे

२००४

अखंड कंगत सिंधू प्रकाशन
"आनंद मंगल" नवा दत्त नगर रोड, इगतपुरी,
नाशिक. ०२५५३)-२४४०९२/२४३९५३

भाग २

''अन्यत्वभावना से निकले ममता का काटा काला,
आर्त रौद्र कुध्यान मिटे झट पी समता रस प्याला ॥[१९३]

ज्याला शरीराची आसक्ती नाही, ममत्व नाही. परंतु अन्यत्वभाव आहे त्याच्यावर बाह्यवस्तूचा सुद्धा प्रभाव पडत नाही. विषाने मृत्यू होतो परंतु मीराला विष मारू शकले नाही. ज्याच्या एका फुत्काराने मनुष्य राखेचा ढीग बनतो अशा चंडकौशिक सर्पाने तीन-तीन वेळा महावीरांना डंख केला परंतु महावीरांवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही.

शरीराची पकड जितकी मजबूत असेल तितका बाह्यवस्तूचा प्रभाव पडतो. चैतन्याप्रती जागृती वाढल्याने शरीर असताना सुद्धा त्याला काही झाले असता चैतन्यावर त्याचा प्रभाव पडत नाही. अन्यत्व भावनेच्या चिंतनाने सूक्ष्म भेद विकल्पानेही वेगळ्या आत्म्याचा अनुभव होतो आणि संयोगरहित सिद्ध पद प्राप्त होते म्हणून चैतन्याप्रती जागृत होऊन अन्यत्व भावनेचे सतत चिंतन केले पाहिजे.

ज्ञान दर्शनमय 'स्व' स्वभावाशिवाय ज्ञानावरणिय इत्यादी द्रव्यकर्म, राग-द्वेष इत्यादी भावकर्म आणि शरीर परिग्रह इत्यादी नोकर्म हे सर्व आत्म्याहून भिन्न आहेत. आत्मस्वभाव पुण्य-पाप यांहून वेगळे आहे. अशाप्रकारे अन्यत्वाचे चिंतन केल्याने बस्तूचे ममत्व नष्ट होऊन कर्माचा बंध होणार नाही. आत्मज्योति प्रकट होईल आणि अनिर्वचनीय परमानंदाची प्राप्ती होईल.

अशुची भावना

ह्यापूर्वी शरीर आणि आत्मा वेगळा आहे ह्याविषयावर विस्तृत विवेचन केले आहे. परंतु तरी सुद्धा ममत्वामुळे संपूर्णतः आसक्ती सुटत नाही. मोक्षमार्गाच्या आराधकाचे लक्ष्य विशुद्ध आत्मस्वरूपाला प्राप्त करण्याचे असते. त्यात स्वजनमोह, परिजनमोह, धनासक्ती आणि देहासक्ती हे अवरोधक तत्त्व असल्याने 'स्व' स्वरूपाचा बोध होत नाही. म्हणून ह्याच्या पूर्व भावनेद्वारे स्वजन, परिजन, धन आणि देहाची अनित्यता अशरणता दाखवून संसाराच्या विचित्रतेचे दिग्दर्शन केले आहे आणि एकत्व व अन्यत्व भावनेद्वारे ह्याची आसक्ती तोडण्याचे उपाय दर्शविले. परंतु प्रत्येक प्राण्याला सर्वात जास्त आसक्ती शरीराची असते.

मनुष्य जेव्हा संसारातून विरक्त होतो तेव्हा स्वजन, परिजन यांचा तो त्याग करतो. धन, वैभवाचा त्याग करतो. परंतु शरीर तर त्याच्या बरोबरच राहते. साधू, महात्मा, ऋषी, महर्षी यांचे जीवनसुद्धा शरीराबरोबरच असते. ते सुद्धा शरीराचा त्याग करू शकत

नाही. शरीराच्या बरोबर राहायचे आणि शरीराची आसक्ती ठेवायची नाही हे काम फार कठीण आहे. म्हणून विशेषतः अशुची भावनेचे चिंतन करण्यास सांगितलेले आहे. ह्या अशुची भावनेने देहसक्ती शरीराचा मोह सोडायचा आहे.

'अशुची' शब्द 'घाण' या अर्थी घेतलेला आहे. शुची म्हणजे विमल, विशुद्ध, स्वच्छ इत्यादी. अशुची शुचीच्या उलट मलीन, अशुद्ध अस्वच्छ इत्यादी अर्थाने घेतला जातो. इथे शरीराच्या अशुचीतेचे वर्णन करण्याचे कारण हे आहे की मनुष्य नेहमी मलीन, घाण, अस्वच्छतेचा तिरस्कार करतो. घाणेरड्या पदार्थाप्रती त्याला प्रेम राहत नाही, राग निर्माण होत नाही. ह्या शरीराबद्दल मनुष्याला सर्वाधिक प्रेम आहे. तो राग किंवा प्रेम नष्ट करण्यासाठी ज्ञानी पुरुषांनी शरीराच्या आंतरीक विभत्सतेला घाणीला, अशुचिला दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. ज्याला पाहून मनुष्याला शरीराबद्दल घृणा निर्माण होते आणि देहासक्ती नष्ट होते.

मनुष्याला सौंदर्य अतिप्रिय आहे. मग ते सौंदर्य स्वतःचे असो किंवा दुसऱ्याचे. कविजनांनी सौंदर्याचे काव्य लिहिले आहे. लेखकांनी शरीराचे शृंगारीक वर्णक केले आहे. शिल्पकारांनी दगडांमध्ये काष्ठामध्ये सुंदर सौंदर्याला मूर्तिमंत उतरवले आहे.

संसारात सर्व अज्ञानी जीवांना जितका मोह आपल्या शरीराचा होतो तितक्या दुसऱ्या कशाचाही होत नाही. आपल्या शरीराला सांभाळण्यासाठी प्रत्येक व्यक्ती आपल्या प्रिय वस्तूची सुद्धा उपेक्षा करून टाकतो. अज्ञानी व्यक्तीला ज्या शरीराचा एवढा मोह असतो ज्ञानी त्याचीच असारता प्रकट करून मोही जीवांचा अनुराग कमी करण्यासाठी सांगतात की - 'अंतो अंतो पूति देहातराणि, पासति पुढो वि सवंताइं पडिते पडिलेहाए'[१९४]

ह्या शरीराच्या आत अशुची भरलेली आहे. साधकाने त्याला पाहावे. देहाने झरणाऱ्या अनेक अशुची स्रोताला सुद्धा पाहावे. अशाप्रकारे पंडिताने शरीराच्या अशुचितेचे चांगल्याप्रकारे निरीक्षण केले पाहिजे.

जसे डॉक्टर अनाथ, मृतक शरीराला गवतामध्ये गुंडाळून सात दिवस पाण्यात ठेवतात आणि जेव्हा त्याचे चामडे हळूहळू सडते, गळते तेव्हा त्या चामड्याला त्याच्यावरून दूर करतो. दूर करून त्याच्या अस्थि पिंजराला दाखवून सांगतो की, पहा ! हे शरीर जसे आत आहे तसे बाहेर आहे. अति अशुचिमय, दुर्गंधयुक्त बिभत्स पदार्थाचा पिंड आहे म्हणून ह्याचा मोह करणे अज्ञान आहे.

ज्ञानी पुरुषांनी शरीराच्या बाह्य सौंदर्याची क्षणिकता, रोग इत्यादी दाखवून शरीर

सौंदर्याला अनर्थाचे मूळ सांगितले आहे. त्यातल्या त्यातही स्त्रीच्या सौंदर्याकडे आकर्षित न होण्यासाठी हजारो ग्रंथ लिहिले आहेत. ज्याच्या मायाजालामध्ये फसून मनुष्य अनेक अनर्थ, भांडण, युद्ध, परस्पर ईर्षा, शंका इत्यादींना जन्म देतो अशा सौंदर्याची अज्ञानी आणि मोहांध लोकांनी प्रशंसा केली आहे तर ज्ञानी, विरागी लोकांनी अशुची आणि घाणेचा आवास सांगून घोर निंदा केली आहे.

ह्या शरीराच्या अपवित्रतेचे वर्णन करताना आचार्य कुंदकुंद यांनी लिहिले आहे - 'हे शरीर हाडांनी बनलेले आहे, मांसाने वेष्टित आहे, चामड्याने झाकलेले आहे, क्रृमिकिटकांनी भरलेले आहे. म्हणून नेहमी मळकट आहे, दुर्गंधयुक्त, घृणास्पद, घाणेरड्या पदार्थांनी भरलेला, अचेतन मूर्तिक आहे आणि सडणारे, गळणारे अशा स्वभावाचे आहे. रस, रुधिर, मांस, मेद, हाडे, मज्जा इत्यादी धातूंनी व्याप्त आहे. मूत्र, श्लेष्म इत्यादी दुर्गंधित अपवित्र पदार्थाचे घर आहे. १९५

ज्या शरीराला मनुष्य सजवतो, सुसंवृत्त ठेवतो, त्याच्या सुंदरतेवर मोहित होतो वास्तविक ते काय आहे ह्याविषयी या भावनेमध्ये निरूपण केलेले आहे. त्वचेच्याखाली किती घृणित पदार्थ भरलेले आहेत याची मानवाला सुद्धा कल्पना नाही आणि म्हणूनच तो शरीराला सर्वस्व मानून त्याच्या परिचर्येमध्ये जीवन व्यर्थ घालवितो.

''ह्या शरीरामध्ये पवित्र पदार्थाला सुद्धा अपवित्र करण्याची शक्ती आहे. म्हणून प्रत्येक ठिकाणी त्याच्या अपवित्रतेचा विचार केला पाहिजे.१९६

आचार्य उमास्वातीने उपरोक्त गाथेमध्ये थोडक्यात शरीराच्या अशुचितेचे रहस्य प्रकट केले आहे.

ह्या शरीरावर लोक कापूर, चंदन, अगर, केशर इत्यादी सुगंधित द्रव्ये लावतात. परंतु शरीराच्या संपर्काने ते दुर्गंधित होतात. शरीराच्या पुष्टीसाठी अनेक प्रकारचे पौष्टिक पदार्थ, मिष्टान्न, मेवे, फरसाण इत्यादींचे सेवन केले जाते. परंतु त्याचे रूपांतर विष्टेमध्ये होऊन जाते. जे वस्त्र कपाटामध्ये वर्षानुवर्षे घाण होत नाही त्यांना शरीरावर धारण केल्याने काही तासात अथवा दिवसात त्यातून घामाचा दुर्गंध येऊ लागतो. सर्व पवित्र आणि मूल्यवान वस्तूंचे मूल्य कमी करण्याचे काम हे शरीर करतो.

शरीराचे आदी कारण रज आणि वीर्य आहे कारण प्रारंभी त्याच्याच मिलनाने शरीराची रचना सुरू होते. नंतर माता जो आहार ग्रहण करते त्या आहाराच्या रसाने शरीराची निर्मिती होते. म्हणून शरीराचे आरंभिक कारण सुद्धा घृणास्पद आहे. उत्तरकारण

सुद्धा घृणास्पद आहे. ह्या कारणाने डोक्यापासून पायापर्यंत प्रत्येक अंगात अशुची आहे. ह्या शरीराला दिवसातून दोन-दोन वेळा स्नान घातले तरी ते शुद्ध राहू शकत नाही. पवित्र आणि निर्मळ राहू शकत नाही.

भट्ट अकलंकदेवाने अशुची भावनेचे विवेचन वेगळ्याप्रकारे केले आहे. त्यांनी प्रथम शुचीचे दोन भेद सांगून स्पष्ट केले आहे की ह्याने सुद्धा शरीराची अशुची नष्ट होऊ शकत नाही. त्यांनी लिहिले आहे की, ''लौकिक आणि लोकोत्तर यांच्या भेदाने शुचित्व दोन प्रकारचे आहे. कर्मकलंकाला धुवून आत्म्याचे आत्म्यामध्ये अवस्थान लोकोत्तर शुचित्व आहे. ह्याचे साधन सम्यग्दर्शन, सम्यक् ज्ञान आणि सम्यक् चारित्र्यरूपी रत्नत्रय आहे. रत्नत्रयधारी साधू आणि त्याद्वारे अधिष्ठित निर्वाणभूमी इत्यादी मोक्ष प्राप्तीचे उपाय असल्याने शुची आहे.

काळ, अग्नी, भस्म, मृत्तिका, शेण, पाणी, ज्ञान आणि निर्विचिकित्सा अशाप्रकारे आठ प्रकारचे लौकिक शुचित्व जगप्रसिद्ध आहे. ह्या दोन्ही प्रकारच्या शुचित्वामधून कोणतेच उपाय ह्या शरीराला पवित्र करू शकत नाही कारण हे अत्यंत अशुचिमय आहे. ह्यांनी आदी आणि उत्तर दोन्ही कारणांच्या अशुचीचे वर्णन करताना लिहिले आहे की शरीराचे आदी कारण वीर्य, रज हे आहे. ते अत्यंत अशुची आहे हे तर पूर्ववतच आहे. परंतु उत्तर कारणाचे विस्तृत वर्णन केलेले आहे. ते लिहितात की, उत्तर कारण आहाराचा परिणाम इत्यादी आहे. कवल आहार-कवल म्हणजे घास घेऊन खाल्लेले भोजन श्लेष्माशयामध्ये पोहचून श्लेष्मासारखा पातळ आणि अशुची होतो. नंतर पित्ताशयात जाऊन आम्ल होतो. नंतर वाताशयामध्ये जाऊन तेथे वायूपासून विभक्त होऊन खल आणि रसरूपात विभक्त होतो. खल-भाग मूत्र, मळ, घाम इत्यादी मळविकाररूपात आणि काही भाग शोणित, मांस, भेद, हाडे, मज्जा आणि शुक्ररूपात परिणत होतो.

ह्या सर्व अवस्था अत्यंत अपवित्र आहेत. ह्या सर्वांचे निवासस्थान जे शरीर ते मैलाघर कचरापेटीसारखे आहे. हे शरीर विस्तवाप्रमाणे आपल्या संसर्गात आलेल्या पदार्थाला आपल्यासारखेच करतो. ह्याच्या अशुचीला दूर करण्यासाठी काहीच उपाय नाही. सम्यग्दर्शन इत्यादीने पुन्हा पुन्हा भावित झाले असता ह्या जीवाची आत्यंतिक शुद्धी प्रकट होते. अशाप्रकारे स्मरण, अनुचिंतन केल्याने शरीराबद्दल वैराग्य निर्माण होते. आणि निर्विण्ण होऊन भवसागर पार करण्यासाठी चित्त तयार होते.[१९७]

ह्यामध्ये लोकोत्तर शुचीचे वर्णन करताना रत्नत्रयधारी साधुजन आणि त्याद्वारे

अधिष्ठित निर्वाणभूमी इत्यादींना शुची म्हणून सांगितले आहे. कारण परंपरेने मोक्षप्राप्तीचे ते साधन आहे. साधूच्या सत्संगतीने भावधारा बदलल्याने आणि जेथून तीर्थंकर, अरिहंत इत्यादींना निर्वाण प्राप्त झाले अशा निर्वाणभूमीत तीर्थंकरांच्या गुणांचे स्मरण करून ते गुण स्वतःमध्ये आणण्याचे भाव येणे अथवा सम्यग्दर्शन इत्यादींच्या भावनेने आत्म्याच्या पवित्रतेत वृद्धी होऊ शकते.

ह्याच भावनेमध्ये शरीराची अशुचिता आणि आत्म्याच्या शुद्धतेचे ज्ञान करवून घेऊन शरीराच्या ममत्वाचा व रागाचा त्याग करण्यासाठी आणि आत्म्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी निरंतर चिंतन करायचे आहे.

आचार्य वट्टकेर यांनी बारा अनुप्रेक्षेमध्ये अशुची याऐवजी 'अशुभ' असे नाव दिलेले आहे. ह्यात अशुची भावनेप्रमाणे शरीर इत्यादींच्या अपवित्रतेविषयी तर लिहिलेच आहे. परंतु त्याचबरोबर सर्व अशुभ दुःखदायक वस्तूच्या अशुभतेचा सुद्धा विचार केलेला आहे.

अशुभ अनुप्रेक्षेचे वर्णन करताना लिहिलेले आहे की नरकामध्ये एकांततः नेहमीसाठी अशुभच आहे. तिर्यंचमध्ये बंधन, रोधन इत्यादी. मनुष्यामध्ये रोग, शोक इत्यादी आणि मनासंबंधी अशुभ आहे.[१९८]

नारकीय जीवांना परमाधामी देव दंडीत करतात, मारतात तेव्हा ते रडतात, ओरडतात. हे सर्व अशुभगर्भित उपद्रव आहेत. तिर्यंचेमध्ये बंधन, रोधन, ताडन, दमन आणि मनुष्यामध्ये अनेक प्रकारचे संकट रोग, शोक इत्यादी अशुभ दुःखे असतात. स्वर्गामध्ये दुसऱ्या देवांद्वारे प्रेरित होऊन भृत्यकर्मे करावी लागतात, दुसऱ्यांचे वाहन व्हावे लागते. देवतांचे शरीर असल्यामुळे उच्चकोटींच्या देवांच्या आज्ञेने लहान देवांनी हत्ती, घोडे, अशी रूपे घ्यावी लागतात. अन्य देवांची महान ऋद्धी, सिद्धी पाहून लहान देवांचे मन खिन्न होते. अशाप्रकारे देवांना सुद्धा मानसिक दुःख होते. ते अशुभ आहे. हे चार गतींच्या जीवांचे दुःख सांगितले.

ग्रंथकाराने धनाला सर्व अनर्थांचे मूळ कारण सांगितले आहे. त्यात श्रम, दुःख, वैर, भय, शोक, कलह, राग, द्वेष, मोह हे सर्व अशुभ धनामुळे होतात.[१९९] अर्थार्जन करण्यासाठी मनुष्याला घोर परिश्रम करावे लागतात, दुःख सहन करावी लागतात. मरणात द्वेषाला वैर म्हणतात. ह्या अर्थामुळे परस्पर वैराचा, शत्रुत्वाचा बंध होतो. हा बंध दुसऱ्या जन्मी सुद्धा भोगावा लागतोच. कर्माच्या उदयाने जो त्रास होतो ते भय आहे. ज्याच्याजवळ

जास्त धन असते. त्याला त्याच्या रक्षणाचे भय असते. इष्ट वियोगाने उत्पन्न झालेला संताप शोक आहे. जेव्हा चोर धन चोरतात तेव्हा त्याच्या वियोगाने सुद्धा मनुष्य शोक करतो.

वचन-प्रतिवचनरूप द्वंद्व कलह हे आहे. अर्थात परस्पर भांडणे कलह आहे. धनासाठी भावाभावांमध्ये, पिता-पुत्रांमध्येही कलह होतो. रतिकर्मामुळे उत्पन्न होणारी प्रीती राग आहे. अरतिकर्माने उत्पन्न होणारी अप्रीती द्वेष आहे. मिथ्यात्व, असंयम इत्यादीचा परिणाम मोह आहे. ह्या सर्वांना अशुभ म्हणतात. धनामुळेच हे अशुभ परिणाम होतात. धन, स्त्री इत्यादी पदार्थांमुळे जे काही सुख प्राप्त झालेले दिसते ते सुख नाही. परंतु सुखाभास आहे.

संसारी भोगमय सुख अशुभ आहे कारण सर्वप्रथम ह्यांना प्राप्त करण्यासाठीच फार संकटे सहन करावे लागतात. अनेक धोक्यातून पार पडावे लागते. जरी भोगसुख मिळाले तरी ते दीर्घकाळापर्यंत टिकत नाही. ते तुच्छ आणि परिणाम विरस आहे. ते सुद्धा अशुभ आहे.[२००]

इंद्रिय विषयाचे सेवन पापजनक आहे. म्हणून ते सर्व अशुभ आहे. हा अशुभाचा परिणाम आहे. अशुचीने व्याप्त अशा मातृगर्भात जीव राहतो. जरायु पटलाने वेष्टित राहतो. मातेच्या कफ, लाळ आणि अशुभ पदार्थांचे सेवन करतो, जे अशुचित्वाने परिपूर्ण आहे. मांस, अस्थी, कफ, वसा, रुधिर, चर्म, पित्त, आतडे, मूत्र इत्यादी अपवित्र अशुची पदार्थांचे निवास आहे. अनेक दुःखाचे पात्र आहे. वास्तविक सर्व अशुभ आहे.[२०१]

हे समजून त्याचे चिंतन केले पाहिजे. इतके वर्णन झाल्यानंतर आचार्य पुढे सांगतात - धन, कामभोग, शरीर इत्यादी सर्वकाही अशुभ आहे. असे चिंतन करता करता मनुष्याने निर्वेदाला-वैराग्य भावनेला आपल्यात जागवून अशी भावना केली पाहिजे की, 'मला अशा अवस्थेला प्राप्त करायचे आहे की ज्यामुळे ह्या अशुचिमय शरीराचा संबंध सुटेल. जन्म मरणाच्या चक्रात यावे लागणार नाही.' ह्या अनुप्रेक्षेचे विवेचन करून शेवटी ते लिहितात की सुर-असुर, नरक-तिर्यंच आणि मनुष्याने संयुक्त अशा ह्या संसारामध्ये वीतराग प्रभूंद्वारे प्रतिपादित धर्माशिवाय अन्य काहीच शुभ नाही.[२०२]

वट्टेकराचार्यांनी अशुभ अनुप्रेक्षेमध्ये ज्या स्थितीचे वर्णन केले आहे. त्यात अशुचित्वाचा सुद्धा सहजतेने समावेश होऊन जातो. कारण ते अशुभजनितच आहे. म्हणून त्यांनी अशुची अनुप्रेक्षेला अशुभ अनुप्रेक्षेच्या रूपात ग्रहण केले आहे. त्यांनी अत्यंत

खोलात जाऊन अशुचितेचाही संकेत केला आहे.

आचार्य शिवार्य यांनी सुद्धा 'अशुची' याऐवजी अशुभत्वाचा प्रयोग केला आहे. जवळजवळ सर्व श्वेतांबर आचार्य आणि दिगंबर आचार्य कुंदकुंद द्वारा रचित द्वादशानुप्रेक्षेमध्येही अशुची भावनेचा संबंध देह इत्यादींची अशुचिता, अपवित्रता आणि देहगत रुधिर, मांस, मल, मूत्र विषयक मलिनतेबरोबर जोडलेला आहे. भगवती आराधना आणि मूलाचारामध्ये ह्या भावनेचे एका नव्या रूपात वर्णन केले आहे. त्यांनी अर्थ, धन, काम-विषयवासना आणि समस्त मनुष्यदेहाला अशुभ सांगितले आहे. 'दुःखाची खाण' म्हणून सांगितले आहे. एक धर्मच त्यांच्या मतानुसार शुभ आहे अन्य सर्व सांसारीक पदार्थ अशुभ आहेत.[२०३]

भगवती आराधना आणि मूलाचार यांच्या लेखकाचे हे मौलिक चिंतन आहे. दोन्ही ठिकाणी वर्णन क्रमामध्ये काही भिन्नता दृष्टीगोचर होते. परंतु तेथे तात्पर्य भेद नाही.

भगवती आराधनेमध्ये धनाला इहलोक व परलोकसंबंधी दोषांना आणणारा असे सांगितले आहे व ते मनुष्याला नेहमी निंदेस पात्र बनविते. अर्थ अनर्थाचे मूळ आहे. ते मनुष्याकरिता भयरूप असून मोक्षमार्गासाठी अर्गला-साखळीरूप आहे.

येथे शरीराला कुटी अर्थात लहानशा घराची उपमा दिली आहे. ती हाडेरूपी पर्णांनी बनलेली आहे, शीरारूपी वल्कलांनी (सालपटांनी) बांधलेली आहे, मांसरूपी मातीने लिपलेली आहे आणि अनेक अपवित्र वस्तूंनी भरलेली आहे. अशाप्रकारे हे शरीररूपी घर घृणास्पद आहे.

ज्याप्रमाणे कोळशाला पाण्याने धुतले तरीसुद्धा तो सफेद होत नाही त्याचप्रमाणे जल इत्यादीने धुतले तरीही शरीरशुद्धी होत नाही. परंतु ते पाण्याला सुद्धा अपवित्र करून टाकते.

एक धर्मच पवित्र आहे कारण रत्नत्रयात्मक धर्मामध्ये स्थित जीवाला देवता सुद्धा नमस्कार करतात. पवित्र धर्माच्या संबंधाने आत्मा सुद्धा पवित्र आहे. रत्नत्रयरूप धर्माची साधना केल्याने साधुच्या शरीराचा मळ इत्यादी अशुचिसुद्धा औषधी रूप होते.[२०४]

अवसर्पिणीकाळाचे चौथे चक्रवर्ती सनत्कुमार ज्यांनी अन्य चक्रवर्तीप्रमाणे सहा खंडांवर दिग्विजय प्राप्त करून पूर्ण साम्राज्य प्राप्त केले होते. त्यांचे रूप, लावण्य तारुण्यामुळे अधिकच चमकत होते. एकदा देवसभेत इंद्राने त्यांच्या सौंदर्याची खूप प्रशंसा

केली. अशुचीने उत्पन्न झालेले. त्यांचे इतके सुंदर सौंदर्य असू शकते का ? अशी शंका दोन देवांच्या मनात उत्पन्न झाली त्यामुळे शंकेचे निवारण करण्यासाठी त्या दोन्ही देवांनी ब्राह्मणाचे रूप घेतले आणि प्रातःकाळी राजदरबारात पोहचले. त्यावेळी राजाच्या स्नानाची वेळ होती म्हणून राजाच्या शरीराला उटणे इत्यादींचे मर्दन केले होते. दोन्ही ब्राह्मण सनत्कुमारांजवळ गेले आणि म्हणाले, 'आम्ही तुमच्या सौंदर्याची खूप प्रशंसा ऐकली होती म्हणून दर्शन करण्यासाठी आलो आहोत. खरोखरच तुम्ही त्या प्रशंसेच्या योग्यच आहात.

स्वाभिमानाने सनत्कुमार म्हणाले - तेव्हा तर तुम्ही चूक केली. जर तुम्हाला माझे रूपच पाहायचे होते तर जेव्हा मी स्नानादी उरकून आपल्या राजकीय पोषाखात सिंहासनावर बसतो आणि वर छत्र, बाजूला चावऱ्या इत्यादी असतात तेव्हा पाहायला पाहिजे होते.

दोन्ही ब्राह्मणांनी सांगितले की जर आपली कृपा असेल तर ती संधी आताही आम्हाला मिळू शकेल.

सनत्कुमार चक्रवर्तींनी मधुर हास्यासह सांगितले, ''होय, तुम्ही थांबा आणि मी आताच तास-दोन तासात राजसभेत येतो.

सनत्कुमार चक्रवर्ती त्यानंतर स्नानादी उरकून त्वरितच बहुमूल्य वस्त्राभूषण धारण करून राजसभेत आले. गर्वाने दोन्ही ब्राह्मणांना म्हणाले, ''काय, आता पाहिले माझे सौंदर्य ? पहिल्या आणि आताच्या सौंदर्यात वास्तविक किती अंतर आहे ?

दोन्ही ब्राह्मण नकारार्थी मान हलवून म्हणाले, ''सम्राट ! ते सौंदर्य आता राहीले नाही. सर्व स्थितीच बदलली आहे.

चक्रवर्तींनी साश्चर्य आणि खेदाने विचारले, 'ते कसे बरे ?' ब्राह्मणांनी सांगितले, महाराज! त्यावेळी आपण पूर्ण निरोगी होता. परंतु आता तुमच्या शरीरात एक नव्हे, दोन नव्हे तर सोळा-सोळा रोगांचे अंकुर फुटलेले आहेत. ते थोड्याच वेळात आपला प्रभाव दाखवतील. जर तुम्हाला शंका असेल तर तुम्ही तुमच्या पानाच्या पिचकारीमध्ये पहा, त्यात किती किटाणू उत्पन्न झालेले आहेत.

चक्रवर्तींनी तसेच केले. सर्व वस्तूस्थिती ब्राह्मणांनी सांगितल्याप्रमाणे समोर आली. सम्राटचे हृदयपरिर्वतन झाले. ते आपल्या सौंदर्याची विकृती पाहून विचार करू लागले. क्षणात सोन्यासारखी अमृतमय काया विषमय झाली ? शरीराचे असे अशुचिमय स्वरूप समजून चक्रवर्ती विरक्त झाले. सहा खंडांचे राज्य सोडून अयोध्यानगरीतून निघून गेले.

सोळा रोगांची चिकित्सा न करता संयमाचा अंगिकार केला. आपल्या जीवनाला त्यांनी तप, ध्यान आणि साधनेमध्ये लावले. एकीकडे सोळा रोगांनी घेरले आहे आणि दुसरीकडे संयमाचा कठोर मार्ग आहे. सनत्कुमार मुनींच्या मनात रोगाबद्दल अरती, तिरस्कार नव्हता किंवा शरीराबद्दल रती-आसक्ती नव्हती. त्यांना अशी अनुभूती होत होती की, जणूकाही शरीर नाहीच.

इंद्राने पुन्हा एकदा आपल्या सभेत सनत्कुमार मुनींच्या कष्ट सहिष्णुतेची प्रशंसा केली. इंद्राने सांगितले की भयंकर रोगाने त्रस्त असूनही ते औषधोपचार करीत नाहीत. हा त्यांचा अटल निश्चय आहे. त्यांच्या दृढतेची कसोटी पाहण्यासाठी एक देव वैद्याचा वेष घेऊन सनत्कुमाराजवळ आले आणि सांगू लागले, "मी एक कुशल वैद्य आहे, आपले शरीर रोगग्रस्त दिसत आहे. जर आपण आज्ञा दिली तर मी तुम्हाला रोगमुक्त करीन."

मुनीराज म्हणाले - हे वैद्यराजा कर्मरूपी भवरोग नष्ट करण्याची शक्ती जर तुमच्यात असेल तर आनंदाने माझे भवरोग नष्ट करा. जर भवरोगच नष्ट झाले तर शारीरिक, रोग नष्ट करण्याची काय आवश्यकता? असाता वेदनीय कर्माचा क्षय होताच ते रोग आपोआप नष्ट होतील.

वैद्याचे रूप घेऊन आलेल्या देवाने भवरोग नष्ट करण्याची स्वतःची असमर्थता दाखविली. तेव्हा मुनिराजांनी आपली थुंक बोटावर लावली तितका भाग रोगमुक्त झाला. त्यांच्याजवळ इतकी तपोलब्धी असतानाही रोगाची आणि वेदनेची त्यांनी उपेक्षा केली. त्यांनी देवाला सांगितले की हे रोग शरीराचे आहेत, आत्म्याचे नव्हते.

शरीर अशुचिमय आहे, रोगाचे घर आहे, व्याधीचे स्थान आहे. हे ज्ञानी पुरुष जाणतात म्हणून त्याचा करीत त्याची साजसज्जा नाहीत. आचार्य शिवार्यांनी १८१४ व्या गाथेत लिहिले आहे की रत्नत्रयरूपी धर्माची साधना करणाऱ्या साधूच्या शरीराचा मळसुद्धा औषधिरूपी असतो. सनत्कुमार चक्रवर्तीच्या उदाहरणावरून हे स्पष्ट होते की त्यांच्या थुंकीत संपूर्ण रोग नष्ट करण्याची शक्ती होती. परंतु त्यांचे लक्ष्य शरीर नव्हते तर आत्मा होता. आत्मा हे ज्याचे लक्ष्य असते त्याला ह्या अशुचिमय शरीराचा मोह राहत नाही. जर त्यांची इच्छा असती तर ते मोठे मोठे वैद्य हकीम इत्यादींकडून चिकित्सा करवून स्वस्थ झाले असते. आणि राज्यभोग घेत राहीले असते. परंतु शरीरात रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे असे समजताच शरीराची नश्वरता, अशुचिता पाहून त्यांचे मन बदलले आणि ते प्रव्रजित झाले. रोग नष्ट करण्याची लब्धी असताना सुद्धा त्यांनी शरीर स्वास्थ्यासाठी

उपाय न करता आत्मशांती, आत्मशुद्धी आणि आत्मशुचिता यावर लक्ष केंद्रित करून आत्मसिद्धी प्राप्त केली. त्यांचे जीवन सर्वांसाठी प्रेरणास्रोत आहे. वैराग्याचा उत्तमबोध देणारे आहे. श्रीमद् राजचंद्रजी यांनी अशुची भावनेमध्ये चतुर्थ चक्रवर्तीचा उल्लेख केला आहे.[२०५] यात सनत्कुमार चक्रवर्तीच्या जीवनाचे विवेचन केलेले आहे.

स्वामीकुमार विरचित कार्तिकेयानुप्रेक्षेमध्ये अशुची भावनेचे वर्णन करताना लिहिले आहे की संसारात सुंदरता आणि कुरूपता, आकर्षण आणि अनाकर्षणाचे केंद्र असणारे जे शरीर आहे त्याचा मोह जीवाला अधोगतीच्या मार्गावर नेतो.

आचार्य शुभचंद्रांनी कार्तिकेयानुप्रेक्षेच्या टिकेमध्ये अशुची भावनेचे अत्यंत विस्तृत विवेचन केले आहे. त्यात शरीराच्या आंतरिक विभत्सतेचे दिग्दर्शन केले आहे. त्यात लिहिले आहे की शरीराचे अवयव अशा प्रकारे आहेत. ह्या शरीरात तीनशे हाडे आहेत. ते सर्व मज्जाधातूंनी भरलेले आहेत, सांधेसुद्धा तीनशे आहेत, नऊशे स्नायू आहेत, सातशे शीरा आहेत. पाचशे मांसपेशी आहेत, शरिरचे चार समूह आहेत, रक्ताने भरलेल्या सोळा महाशीरा आहेत, शरिरचे सहा मूळ आहेत, पाठ आणि पोटाजवळ दोन मांसरज्जू आहेत, चमडीचे सात पट म्हणजे पटल आहेत. सात कालेयक अर्थात मांसखंड आहेत, लाखो-करोडो रोम आहेत, आमाशयामध्ये सोळा आतडी आहेत, सात दुर्गंधाची आश्रये आहेत, तीन स्थूणा आहेत, अर्थात वात, पित्त, आणि कफाच्या स्थूणा, एकशे सात मर्मस्थाने आहेत, नऊ मळद्वारे आहेत, यातून नेहमी मळ वाहत राहते. एक ओंजळीप्रमाण मस्तिष्क आहे, एक ओंजळी प्रमाण मेद आहे, एक ओंजळी प्रमाण ओज आहे. एक ओंजळी प्रमाण वीर्य आहे, तीन ओंजळी प्रमाण वसा आहे, तीन ओंजळी प्रमाण पित्त आहे. आठ शेर रुधिर आहे, सोळा शेर मूत्र आहे, चोवीस शेर विष्ठा आहे, वीस नखं आहेत, बत्तीस दात आहेत, हे शरीर कृमी जीवाने भरलेले आहे. रस, रुधिर, मांस, मेद हाडे, मज्जा आणि वीर्य ह्या सात धातूंपासून बनलेला आहे म्हणून शरीर अत्यंत अशुचितेचे घर आहे.[२०६]

ह्यात सुंदरतेच्या आवरणाखाली झाकलेली कुरूपता, मलीनता, दूषितता, घृणास्पदता इत्यादींचे विवेचन केले आहे. बाह्यरूपाने इंद्रियांना जे आकर्षक वाटते ते आंतरीक रूपाने किती भयानक, कलुषित आहे हे समजण्यासाठी जीवाला जागृत केले आहे. त्यामुळे तो भौतिक, दैहिक अवस्थे बरोबर जुळलेल्या ममतेने विमुक्त होईल. त्याची दृष्टी देहापासून दूर होऊन आत्म्यावर लागेल. ''अशुची भावनेच्या चिंतनाची सार्थकता

तेव्हाच होईल जेव्हा प्राणी स्व किंवा पर शरीरामध्ये अनुरक्त न होता आत्मभावनेत लीन होईल.[२०७]

आचार्य हेमचंद्रांनी लिहिले आहे की अशुचीने परिपूर्ण अशा या देहात शौच्य अर्थात पवित्रतेची संकल्पना करणे महामोहमय प्रवंचनाशिवाय दुसरे काय आहे ?[२०८]

मोहामुळेच मानव अशा अशुचिमय शरीरात आसक्त होतो. जीवनाचा अमूल्य वेळ केवळ ह्या शरीराला सजविण्यात, पालनपोषण करण्यात आणि पुष्ट करण्यातच व्यर्थ नष्ट करतो.

श्री सोमदेवसूरी म्हणतात - हे जीवा ! जर एखाद्याच्या शरीराचा आंतरीक भाग संयोगवश शरीराबाहेर आला तर त्यावेळी त्या शरीराला पाहून हाच विचार येतो की, हा दूर राहिला तर चांगले होईल. त्यावेळी त्याच्या अशुचितेमुळे त्याला पाहण्याची इच्छा करीत नाही. शरीराची ही वास्तविकता आहे म्हणून ज्ञानीजन ह्या शरीराच्या माध्यमाने अनंत सुखरूपी धान्य उत्पन्न करायला सांगतात.[२०९] परंतु इतके प्रत्यक्ष पाहत असतानाही मनुष्य जागृत होत नाही. तो अशुचिमय शरीराला सर्व तीर्थांच्या सुगंधी पाण्याने धुवून असे मानतो की, आता हे शुद्ध झाले आहे. असे कधीच होऊ शकत नाही. ह्या गोष्टीला समजण्यासाठी उपाध्याय विनयविजय यांनी खूपच थोडक्या शब्दात एक उदा. देताना लिहिले आहे-

एका दारूच्या घड्याला एक छिद्र आहे आणि त्यातून गळणाऱ्या मदिरेच्या थेंबाने त्याचा बाह्यभाग अपवित्र झाला आहे. त्याच्या बाह्यभागाला मातीने चांगल्याप्रकारे मर्दन केले आणि गंगेच्या पाण्याने अनेकवेळा धुतले तरी तो घडा जसा पवित्र होत नाही. त्याचप्रमाणे घाणेरडी हाडे, मांस, मलमूत्र, चमडी आणि रक्ताने भरलेले हे मनुष्याचे शरीरसुद्धा पवित्र होऊ शकत नाही.

मनुष्य पुन्हा पुन्हा स्नान करून शरीराला शुद्ध मानतो, चंदनाचा लेप करून स्वतःला स्वच्छ मानतो. परंतु हा त्यांचा भ्रम आहे. उकिरड्याला शुद्ध करू शकत नाही.[२१०]

जर शुद्ध झाला तर त्याला उकीरडा कसे म्हणू शकणार ? त्याचप्रमाणे शरीराला कितीही स्वच्छ ठेवण्याचा प्रयत्न केला तरी तो कधीही शुद्ध होणार नाही. चंदन इत्यादींच्या लेपाविषयी ह्या गाथेत सांगितले आहे. परंतु आज अनेक प्रकारचे सेंट/अत्तर लोक आपल्या कपड्यावर टाकातत, त्याने ते आपल्या शरीराच्या दुर्गंधतेला दाबण्याचा प्रयत्न करतात.

परंतु ज्याप्रमाणे फुटबॉलला जितक्या जोरात दाबले जाते, तितक्याच जोरात तो उंच उडतो, त्याचप्रमाणे शरीराला जितके स्वच्छ केले जाते. तितकेच ते पुन्हा पुन्हा घाण होते.

अशुची भावनेच्या चिंतनाने सुज्ञ मनुष्य ज्या बाह्यशुद्धीसाठी जीवनाच्या अमूल्य वेळेला आणि धनाला नष्ट करीत आहे. त्याच्या अनर्थतेचे त्याला ज्ञान होईल आणि आंतरीक शुद्धीमुळे वेळेचे मूल्य, सार्थकता समजून आत्मशुद्धीच्या दिशेने अग्रेसर होईल.

पुढे विनयविजयजींनी गितीकेत ह्या भावनेला स्पष्ट करताना स्वतःला संबोधित करताना म्हटले आहे की, 'हे विनय ! हे शरीर घाण आहे, मलीन आहे, ह्या गोष्टीला तू चांगल्याप्रकारे समजून आपल्या कमळरूपी मनाला विकसित कर आणि जे आत्मतत्त्वरूपी परमात्मा आहे, जो बिभू आहे, कल्याणकारी आहे, प्रकाशमय परमविवेकयुक्त आहे त्याचे चिंतन कर.

तोंडाचा चांगला सुगंध येण्यासाठी पानामध्ये सुगंधी पदार्थ टाकून खातात परंतु तोंड स्वतःच दुर्गंधीयुक्त लाळेने भरलेले आहे. त्यात कृत्रिम सुगंध किती वेळ राहणार ? ह्या शरीराची दशा अत्यंत तिरस्करणीय आहे. ते पवित्र होणार नाही. महापवित्र आगमरूपी जलाशयाला प्राप्त करून तू शांतसुधारसाचे पान कर. त्याने मन पवित्र होईल.[२११]

ह्यात विनयविजयजींनी अत्यंत सुंदर सांगितले आहे की, ह्या अपवित्र शरीरात एक महापवित्र, सर्वज्ञ, सर्वदर्शी, सर्वव्यापी, प्रकाशमान तेजस्वी, विवेकी विभू बसला आहे. त्याचे चिंतन कर. ज्याच्या संसर्गाने पवित्र पदार्थ पण महान अशुचिमय होतात, ते शरीर नेहेमी उपद्रव युक्त असते. अर्थात अशा शरीराला चांगले ठेवण्यासाठी भोगोपभोगाच्या वस्तूंची इच्छा करणे निरर्थक आहे.[२१२]

श्री जयसोममुनीच्या सांगण्याचा भावार्थ हा आहे की जीव ह्या शरीराची अशुचिता प्रत्यक्ष पाहतो, अनुभवतो तरीसुद्धा मोहवश शरीराच्या अशुचितेचेही त्या मदोन्मत्त मानवाला भान राहत नाही. जसे मदिरेच्या नशेत व्यक्तीला सत्यासत्य, अर्थानर्थ, सार्थकता-निरर्थकता याचे भान राहत नाही. तसेच जीवात्म्याला सुद्धा मोहरूपी मदिरेच्या नशेत शुचित्व-अशुचित्व यांचे भान राहत नाही. मोहाची नशा उतरविण्यासाठी ज्ञानी पुरुष भावनेचे चिंतन करतात आणि शरीराची अशुद्धता आणि आत्म्याची शुद्धता समजून आत्म्यात स्थित होतात. आत्मा कर्मामुळे बद्ध होतो.[२१३] परंतु खाणीतील मातीत राहिलेले सुवर्ण जसे प्रक्रियेने शुद्ध केले जाऊ शकते तसेच आत्म्याला सुद्धा शुद्ध, पवित्र करण्यासाठी साधना, आराधना करून शुद्ध करता येते. परंतु शरीराला लाखो प्रयत्नांनी सुद्धा शुद्ध करता

येत नाही. पूज्य तिलोकऋषी महाराज लिहितात-

सागर जल करी जो नित धोवे तो पण शुचि नहीं थावे ॥
हाड करंडिया भंड महीकी, इणे पर क्यों तु भरमावे रे प्राणी ॥६॥
सहस्र दिनार को एक कवो लेवो, जीमे एम सदाही ।
तो पण दे दगो एक पल में काढे जीव ने साही रे... प्राणी ॥७॥[२१४]

समुद्राएवढ्या पाण्याने रोज ह्या शरीराला धुतले तरीही ते शुचित्वाला प्राप्त होत नाही. हा हाडांचा पिंजरा आहे. ह्या मातीने लिप्त झालेल्या पात्रामध्ये जीव का भ्रमित होतो ?

ह्या शरीराची शेतीसुद्धा वेगळ्या प्रकारची आहे. ह्यात पेरतो एक आणि उगवते दुसरेच. जसे ह्याचे रोज पंचामृतरसाने पोषण केले जाते आणि त्याचे रक्त आणि मांसात रूपांतर होते. अन्य शेतात तर जसे बी पेरावे तशी फळे प्राप्त होतात. परंतु ह्या शरीराची गोष्टच वेगळी आहे. हे शरीर अन्नापासून विष्ठा बनविण्याचा कारखानाच आहे.

परंतु ज्याप्रमाणे ज्ञानी खाऱ्या समुद्रातून रत्ने प्राप्त करतात, तसेच मिळालेल्या देहाचा मोक्षफलदायी धर्माराधना करण्यासाठी उपयोग करणे हीच खरी बुद्धिमत्ता आहे. ह्या देहाच्या दोन पक्षांचे वर्णन करताना श्री गणेशमुनी शास्त्री लिहितात - जर हा देह नसता तर संसाराची खटपट नसती, कुटुंब नसते, कोणी व्यापार करू शकले नसते, भंडार भरले नसते, हे शरीर नसते तर कोणी खोटे बोलले नसते, कोणाला लुटले गेले नसते, संग्राम झाला नसता, कामक्रोधाने आपल्याला सतावले नसते, प्रतिशोध घेण्याची भावना झाली नसती, मायाजाळ पसरले गेले नसते, कोणी वाकडी चाल चालले नसते, कोणी कोणाचा अपमान करू शकले नसते, कोणाला अभिमान झाला नसता, शरीर नसते तर काहीच पाप नसते आणि तुम्ही व आम्हीसुद्धा राहिलो नसतो. ह्या शरीरामुळेच ही सर्व ओढाताण आहे. परंतु हे देहाचे एक निषेधात्मक स्वरूप झाले. प्रत्येक नाणाच्या दोन बाजू असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक वस्तूमध्ये दोन गुण असतात. देहमात्र हेय अर्थात उपेक्षेचे पात्रच नाही परंतु उपादेय सुद्धा आहे. ह्या संसारात जर हा मनुष्यदेह नसता तर जगात धर्म-सत्कर्म कसे केले असते ? उपवास आणि शास्त्राभ्यास नसता, ज्ञान व ज्ञानी यांचा सन्मान नसता, परोपकार आणि सत्याचा प्रचार झाला नसता, दान आणि कल्याणाची कार्येसुद्धा झाली नसती, व्याख्यान झाले नसते, गुणवान दिसले नसते. अरिहंत नसते, आचार्य महन्त नसते, गुरू, ईश्वर नसते, साधुसंत नसते, संघ आणि समाज नसता, तर

आज आपण हे सर्व कसे काय लिहू शकतलो असतो ?[२१५]

अशाप्रकारे दुर्लभ मनुष्यदेहाद्वारे धर्माराधना केली जाऊ शकते. जरी हे शरीर अशुचिमय असले तरी शुचिपूर्ण आत्मा ह्या शरीराच्या आत आहे. त्याला प्राप्त करण्यासाठी देहाची माया सोडून ह्या देहाच्या मदतीने किती सार्थक कार्ये केली जाऊ शकतात ह्याचे सतत चिंतन केले पाहिजे.

कवी उमेशमुनी यांनी आपल्या रचनेत लिहिले आहे की हा देह -

"घृणित वस्तु से ही उपजा है, घृणित वस्तु उपजाये ।
भरे पदार्थ भी ऐसे ही देख उन्हे घबराये ।
इसे कहे दुर्लभ जिन बोल कि बात जरा हिरदे से तोल ॥[२१६]

ह्या अशुचिमय शरीरालाही दुर्लभ सांगण्याचे कारण हे आहे की ह्याद्वारे मुक्ती प्राप्त होते.

अशुची भावनेच्या चिंतनाने ह्या देहाचा राग नष्ट होतो, वैराग्य भावना उत्पन्न होते, प्रशम भावनेने अनासक्ती येते आणि आत्मा परमात्मदशेला प्राप्त करण्याच्या दिशेने पुढे जातो. जर ह्या जन्मात परमात्मदशा प्राप्त करण्याचे लक्ष्य ठेवले नाही तर पुन्हा पुन्हा ह्यापेक्षा सुद्धा घृणास्पद अशुचिमय कृमी-किटक इत्यादींनी भरलेल्या अनेक भवांमध्ये जावे लागेल.

मल्लिनाथ भगवानांनी आपल्या शरीरासारखाच पुतळा करून सहा मोहांध राजांना अशुची भावनेद्वारा वैरागी बनवून संयम मार्गावर पुढे जाण्याची प्रेरणा दिली. हे शरीर ज्याप्रमाणे मोहांधाला संसारामध्ये भटकवतो त्याचप्रमाणे वैराग्याला अनंत सुख देण्यात ही सहायक होते.

उपरोक्त सर्व लेखकांच्या सांगण्याचा सारांश हाच आहे की स्वभावाने अशुचिमय देहाच्या ममत्वात दुर्लभ मनुष्य जन्म व्यर्थ घालविणे योग्य नाही.

अनित्य भावनेपासून अशुची भावनेपर्यंतचे संपूर्ण चिंतन संयोगी पदार्थांच्या चहूकडे फिरत आहे. उपरोक्त सर्व चिंतनाचे ध्येय संयोगी पदार्थापासून दृष्टी दूर करून स्वभावोन्मुख होणे हे आहे. सर्व आत्मार्थी शरीर इत्यादी संयोगी पदार्थांची अशुचिता आणि स्व स्वभावाची शुचिता चांगल्या प्रकारे समजून आणि संयोगापासून विरक्त होऊन 'स्व' स्वभावात रममाण झाले तर अनंत सुख प्राप्त होते.

जर कधी वासनामय विचाराने मन विकृत झाले तर अशा अवस्थेत प्रथम अशुची भावनेने मनाला भावयुक्त केले पाहिजे. ह्या चिंतनाने संसाररूपी कारागाराच्या बंधनातून मुक्ती मिळेल. ह्यासाठीच वर्तमान तीर्थंकर मल्लीनाथ स्वामी यांच्या कुमार अवस्थेतील शरीरांच्या सौंदर्याची वास्तविक स्थिती दाखविणारे एक मार्मिक उदाहरण आहे.

भगवान मल्लीनाथ यांना पूर्वजन्मात केलेल्या कपटामुळे स्त्रीगतीचा बंध पडला आणि कुंभराजाच्या घरी पुत्रीरूपात जन्म घेतला. त्या त्याच भवात तीर्थंकर होणार होत्या. स्त्रीचे शरीर स्वभावतः कोमल आणि सुंदर असते, त्यात तीर्थंकर देव तर अनंतपुण्याचे पुंज असल्याने त्यांची सुंदरता तर अद्वितीय असते. मल्लीकुमारीची सुकुमारता भरतक्षेत्राच्या चहूदिशेत आकर्षणाचे केंद्र बनली. अनेक राजा आणि राजकुमार मल्लीकुमारींबरोबर लग्न करण्यासाठी उत्सुक झाले. त्यात सहा देशांच्या राजांनी मल्लीकुमारीबरोबर लग्नाचा प्रस्ताव घेऊन दूत पाठविले. ते एकाच वेळी, एकाच दिवशी मिथिला नगरीच्या कुंभराजाच्या राजसभेत येऊन पोहचले. एक कन्या आणि सहा पती ? कसे संभव होईल ? सर्वांना हे माहीत होते की मल्लीकुमारी वैराग्य घेणारी, संसारातून विरक्त असणारी ह्याच भवात तीर्थंकर होणार आहे. कुंभराजाने सहा दूतांनाही रिकाम्या हातीच पाठविले. त्यामुळे ते सहाही राजे, हा आपला अपमान आहे असे समजून क्रुद्ध झाले आणि कुंभराजाच्या राज्यावर त्यांनी आक्रमण केले. एकाचवेळी त्या सर्व राजांनी वेगवेगळ्या दिशेने आक्रमण करून मिथिलेला घेरून टाकले. कुंभराजा क्षत्रियत्वाच्या नात्याने सेना घेऊन युद्ध करण्यासाठी तयार झाले. मल्लीकुमारी म्हणाली, ''पिताश्री ! माझ्यासाठी नरसंहार होणे मला योग्य वाटत नाही. मी दुसऱ्या उपायाने ह्या राजांना समजावून सांगेन. तुम्ही युद्धात क्षत्रियांच्या रक्ताची आहुती देऊ नका.

मल्लीकुमारीला जन्मापासून अवधिज्ञान होते. हे सर्वकाही घडणार आहे ह्याचे त्यांना ज्ञान होते. म्हणून त्यांनी आधीपासूनच अशी एक योजना केली की अशोकवाटिकेमध्ये एक अत्यंत रमणीय भवन बनविले. त्याला 'मोहनगृह' असे म्हणत होते. त्याच्या मध्यभागी सहा रत्नजडीत गर्भगृह होते आणि त्याच्या मधोमध चारीबाजूंना जाळी असलेले जाळीगृह होते. त्यामुळे आतील व्यक्ती बाहेरचे पाहू शकत होती. त्या जाळीगृहाच्या मध्यभागी एक मणिमय पिठिका तयार केली होती. त्या पिठिकेवर स्वतःच्या चामड्याप्रमाणे चामडे असणारी, स्वतःच्या वयाची दिसणारी, स्वतःसारखे रूप लावण्य, यौवन आणि गुणांनी युक्त एक सुवर्णाची प्रतिमा तयार केली होती. त्या प्रतिमेच्या

डोक्यावर छिद्र होते आणि त्यावर कमळाचे झाकण होते. अशाप्रकारची प्रतिमा करून ते विपुल अशन-अन्न, पान-पेय पदार्थ, खाद्य-मेवा मिष्टान्न, स्वाद्य-मुखवास लवंग, विलायची, सुपारी इ. मनोज्ञ पदार्थ जे ती स्वतः रोज खात होती. त्यातला एक-एक घास त्या स्वर्णमय मस्तकात छिद्र असणाऱ्या प्रतिमेत टाकत होती आणि झाकण बंद करून ठेवत होती.

मल्लीकुमारीने वडिलांना समजावून त्या सहाही राजांना आमंत्रित केले. मल्लीकुमारीला भेटण्यासाठी सहाही राजे उत्सुक होते. सर्वजण वेगवेगळ्या रस्त्याने अशोकवाटीकेत आले. ते सर्वजण रत्नजडीत गर्भगृहात वेगवेगळ्या द्वाराने येऊन बसले. सगळ्यांची दृष्टी मध्यभागी स्थित मल्लीकुमारींच्या प्रतिमेवर लागली होती. सर्वांना असे वाटले की मल्लीकुमारी साक्षात उभी आहे. तिचे अनुपम सौंदर्य पाहून सर्वजण मुग्ध झाले होते आणि विचार करीत होते की अशी स्त्री प्राप्त झाली तर आपले जीवन सफल होईल. आणि त्याचवेळी मल्लीकुमारीने आपल्या पुतळ्याच्या डोक्याचे झाकण उघडले. झाकण उघडताच सडलेल्या अन्नाचा दुर्गंध येऊ लागला. सर्व राजांनी नाकावर रूमाल धरला तरी दुर्गंधतेमुळे त्यांचे डोके फिरत होते. जीव घाबरू लागला आणि ते व्याकूळ झाले. त्याचवेळी मल्लीकुमारी त्यांच्यासमोर आली आणि म्हणाली, हे राजांनो, तुम्ही ज्या रूपावर मोहीत झाला होता, ज्या सौंदर्याचा अमृताप्रमाणे आस्वाद घेत होता, त्या शरीराच्या दुर्गंधाला का घाबरता ? त्याची घृणा का करता ?

सर्व राजे म्हणाले, ह्या शरीरातून भयंकर दुर्गंध येत आहे. ही दुर्गंध आम्हाला सहन होत नाही.

मल्लीकुमारी म्हणाली - माझ्या ह्या शरीराची सुद्धा हीच स्थिती आहे. ज्या बाह्यसौंदर्यावर तुम्ही वेडे झाले आहात त्याच्या मागे दुर्गंधमय पिंड आहे. प्रत्येक शरीरात मळमूत्राचा असाच दुर्गंध आहे. हा तर प्रत्येक शरीराचा स्वभाव आहे. तुम्ही बाह्यस्वरूपावर मुग्ध झालात परतुं थोडे आंतरिक स्वरूप सुद्धा पहा. ह्या पुतळ्यामध्ये मी एक-एक घास अन्नाचा टाकीत होते त्याने जर इतकी दुर्गंधी पसरली असेल तर मग ह्या शरीरात दररोज बत्तीस घास टाकले जातात त्यात किती दुर्गंधी असेल ?

श्लेष्म, पित्त, मल, मूत्र इत्यादी सडणाऱ्या पदार्थांचे भांडार असणारे हे शरीर किती अशुची, दुर्गंधिने भरलेले असेल ? तुम्ही अशा दुर्गंधयुक्त शरीरावर आसक्त होऊ नका. मुग्ध बनू नका.

मल्लीकुमारीच्या प्रतिबोधाने सहाही राजांना जातिस्मरण ज्ञान झाले. पूर्वभवामध्ये

सहाही जण मल्लीकुमारीचे मित्र होते. एकावरोबर दिक्षा घेऊन साधना केली होती. ती स्मृती जागृत झाली आणि जितशत्रू इत्यादी सहाही राजे प्रबुद्ध झाले.[२१७]

ह्या मनुष्य शरीरात एकाबोटाइतक्या जागेत ९६ रोग आहेत. तर त्या प्रमाणात संपूर्ण शरीरात किती रोग असतील ? त्याचा विचार करा. आणि विचार करून शरीराबद्दल जो मोह, ममत्व आहे त्याचा त्याग करून जन्म, जरा, रोग इत्यादीपासून मुक्त असणाऱ्या, शुद्ध, सहजात्मस्वरूपी चैतन्यरूपी, आनंदधाम असणाऱ्या अशा आपल्या आत्म्याची निरंतर भावना करा.[२१८]

'शरीरं व्याधि मंदिरम्' अर्थात शरीर व्याधींचे मंदिर आहे, घर आहे. वर्तमानात सुंदर आणि स्वस्थ दिसते परंतु दुसऱ्याच क्षणी किती व्याधी जडतील याची आपण कल्पना करू शकत नाही.

ह्या अशुचिमय शरीराचे चिंतन केल्याने शरीराचे ममत्व कमी होईल. दैहिक सुंदरतेचे आकर्षण कमी होईल आणि मानवामध्ये आपल्या आत्मिक सौंदर्याचे दर्शन करण्याची भावना जागृत होईल. शरीराचे सम्यग्दर्शन केल्याने जो आत्म्याचा शरीरावरोबर एकात्मभाव झाला आहे तो दूर होईल. शरीराची ममता सुटल्याशिवाय साधनेत प्रगती होऊ शकणार नाही. अशुची भावना त्या शरीराच्या बंधनाला तोडते. शारीरिक बंधन तोडून आपल्या स्वरूपात रमण करायचे आहे. मात्र शरीराच्या अशुचीचे दर्शन करून, शरीराप्रती घृणा ठेऊन, प्रयोजन सिद्ध होत नाही. पण हे शरीर परमात्म्याचे मंदिर आहे, त्यात परमशुद्ध सनातनशिव आत्म्याचे पण दर्शन करायला पाहिजे. हाच अशुची भावनेचा आशय आहे.

आस्रव भावना

वारा भावनांच्या चिंतनाचा मूळ प्रयोजन आणि विकाराने भिन्न अशा स्वआत्म स्वरूपामध्ये रमणतेची तीव्र रुची उत्पन्न करणे आहे, त्याच्यात विशेष पुरुषार्थ जागृत करणे आहे. ह्याच प्रयोजनाच्या सिद्धीसाठी आस्रव भावनेमध्ये विभावाच्या विपरितेचे चिंतन मुख्य आहे.

परच्या लक्ष्याने उत्पन्न होणारे मोह, राग, द्वेषरूपी आस्रवभाव विभाव आहे, आत्म स्वभावाने विपरीत आहे. ह्याला समजण्यासाठी आस्रवभावनेच्या पूर्वी सहा, भावनेमध्ये आत्मा आणि अन्य संयोगी पदार्थाची नश्वरता, अशरणता, संसारात अनेक जन्म मरण केले तरी पण कोणत्याही देहाच्या संयोगात सुखाची अप्राप्यता, जन्म-मरण रोग इत्यादी दुःखांना एकटेच भोगण्याची विवशता, आत्म्याने पृथक पदार्थांची भिन्नता आणि स्व-पर

शरीराची अशुचिता इत्यादी विषयाचे विस्तृत विवेचन केले आहे. ह्या सर्व चिंतन प्रक्रियेचे प्रयोजन दृष्टीला देहादी संयोगाने दूर करणे आहे. अनादिकाळापासून ज्या आत्म्याने अज्ञानामुळे देहादी पदार्थात एकत्व आणि ममत्व स्थापित केले आहे, ते सर्व अनित्य आहे, अशरण आहे. असार आहे. सुख दुःखात सहारा देणारे नाहीत माझ्याने अत्यंत भिन्न आहे, अशुची आहे मी ह्या संयोग भावनेने भिन्न आहे, मी अनन्त गुणाचा धाम, अनन्त अनन्त शक्तीचा संग्रहालय आहे, ज्ञानाचा पुंज आणि आनन्दाचा कन्द आहे.

असे चिंतन केल्याने देहादी संयोगाचा अनुराग कमी होतो आणि एक वेळ अशी येते की जेव्हा आत्मा ह्या चिंतनधारेलापण पार करून आत्मानुभव करू लागतो. तेव्हा मिथ्यात्व ग्रंथीला भेदून सम्यग्दर्शन आणि सम्यग्ज्ञानाने संपन्न होतो. परंतु सम्यग्दर्शन आणि सम्यग्ज्ञान, झाले तरी पण अनादिकाळाच्या अभ्यासामुळे संकल्प विकल्पाच्या तरंग पुन्हा उठू लागतात. त्याला चिंतनधारेच्या प्रबळतेने उपशमित केले जाऊ शकते, तरी पुन्हा समाधी भंग होते. हाच क्रम चालू राहातो. आत्म्यामध्ये ज्या राग द्वेष रूपी विकल्प तरंग उत्पन्न होतात हेच भाव आस्रव आहे, आणि ह्याच भावास्रवाच्या निमित्ताने कार्मण वर्गणेचे कर्मरूपात परिणमित होणे द्रव्यास्रव आहे.

आत्म्यामध्ये कर्माला आकृष्ट करण्याची शक्ती आहे. ज्याच्या परिणामस्वरूपी आत्मा आस्रवद्वारा कर्म प्रवाहाला खेचून आत्मप्रदेशा बरोबर एकरूप करून टाकतो असे चिंतन करणे आस्रवभावना आहे. जसे लोहचुंबक आपल्याजवळ असलेल्या लोखंडाला आकर्षित करतो आणि आपल्या बरोबर जोडतो तसेच आत्म्यामध्ये राग द्वेष मोह इत्यादी उठणाऱ्या वृत्त्या द्वारा चौदा राजुलोकामध्ये सर्वत्र असलेल्या कार्मण वर्गणेच्या पुद्गल परमाणुच्या आगमनाचे नाव आस्रव आहे.

भावास्रव आणि द्रव्य आस्रवाची आणखी एक व्याख्या जैन सिद्धांत कोशामध्ये दिली आहे-

जीवाद्वारा मन वचन कायेनेजी काही पण शुभ अथवा अशुभ प्रवृत्ती होते त्याला जीवाचा भावास्रव म्हणतात. त्याच्या निमित्ताने काही विशेष प्रकारचे जड पुद्गल वर्गणा आकर्षित होऊन त्याच्या प्रदेशात प्रवेश करतात ते द्रव्यास्रव आहे.

आस्रवामुळे पापकर्माचे आगमन होते. मिथ्यात्व इत्यादी बंधचे हेतू आहे त्याला आस्रव म्हणतात. इथे प्रश्न होणे स्वाभाविक आहे की आस्रव आणि बंधमध्ये काय फरक आहे. त्याचे समाधान हे आहे की प्रथमक्षणात कर्माचा जो आगमन होतो तो आस्रव

आहे आणि कर्म स्कंधाच्या आगमनानंतर दुसऱ्या क्षणात त्या कर्मस्कन्धाचे जीव प्रदेशामध्ये स्थित होणे बंध आहे. हा आस्रव आणि बंधमध्ये फरक आहे.[२१९]

आस्रव शब्दाची व्युत्पत्ती करताना पूज्य आचार्य घासीलालजी महाराज लिहितात - आ - समन्तात् स्रवति - प्रविश्यत्यार्थादात्मनि ज्ञानावरणीयादष्टविधं कर्म येन सः आस्रवः[२२०] अर्थात ज्याच्या द्वाराज्ञानावरण इत्यादी आठ प्रकारचे कर्म आत्म्यामध्ये सगळीकडून येतात त्याला आस्रव म्हणतात. अर्थात ज्याच्या द्वारा कर्माचे उपार्जन होते त्याला आस्रव म्हणतात.

आस्रवचे सामान्यतः दोन भेद आहे - १) साम्परायिक आस्रव, २) इर्यापथ आस्रव कषाय सहित जीवाला साम्परायिक आस्रव होतो आणि कषायरहित वीरागी जीवाला इर्यापथ आस्रव होतो.[२२१]

जो संसार वाढवतो तो सांपरायिक आस्रव आहे - सांपरायः संसारः सम्पराय संसाराचा पर्यायवाची आहे, तत्प्रयोजन कर्म साम्परायिकम् जो कर्म संसाराचा प्रयोजक आहे तो साम्परायिक आहे.[२२२]

इर्यापथ आस्रवामध्ये कर्माचा आस्रव अर्थात आगमन होतो आणि येऊन काहीच फळ न देता कर्माचा क्षय होतो. इर्याची व्युत्पत्ती ''ईरणं'' होते, ह्याचा अर्थ गती असा होतो. हे कर्म कषायाच्या अभावाने मात्र इर्या अर्थात गमनागमन इत्यादी क्रियेच्या द्वारा बद्ध होतो. परंतु कषाय नसल्याने उपार्जित कर्मात स्थिती अथवा रसचा बंध होत नाही. मोहाचा सर्वथा उपशम अथवा क्षय झाला तरच अशी स्थिती होते. जोपर्यंत कषायाचा किंचित पण सद्भाव आहे तो पर्यंत ईर्यापथ आस्रव होऊ शकत नाही. मिथ्यादृष्टी पासून सूक्ष्म साम्पराय अर्थात दहाव्या गुणस्थानापर्यंत कषायाचा उदय असल्याने योगद्वारा आलेले कर्म ओल्या चमड्यावर धुळीप्रमाणे चिटकून जाते. त्यात स्थिती बंध होतो ते साम्परायिक कर्मास्रव आहे.

इर्यापथ आस्रव, उपशांत कषाय, क्षीण कषाय आणि सयोग केवळीच्या योगाने आलेले कर्म, कषायाच्या अभावाने सुक्या भिंतीवर पडलेल्या दगडाप्रमाणे दुसऱ्या क्षणातच झडून जातात बद्ध होत नाही. ह्याला इर्यापथ आस्रव म्हणतात.[२२३]

आचार्य कुन्दकुन्द समयसारच्या १६८व्या गाथेमध्ये उदाहरणाद्वारा समजवतात की जसे पिकलेले फळ झाडावरून आपोआप खाली पडते आणि पुन्हा कधीच ते झाडाला चिटकत नाही, तसेच कषायमुक्त झाल्यानंतर जीव कर्म मुक्त होतो. त्याचे कर्म कधी उदयात येत नाही.

आस्रवचे प्रकार

आगमामध्ये आस्रवचे पाच प्रकार आहे - १) मिथ्यात्व २) अविरति ३) प्रमाद ४) कषाय ५) योग[२२४]

तत्त्वार्थसूत्रामध्ये बंधचे हेच पाच हेतू मानले गेले आहे.[२२५] प्रशमरति प्रकरणमध्ये पण ह्याच पाच भेदाने कर्माचा आस्रव होतो असा उल्लेख केला आहे.[२२६]

आचार्य कुंदकुंदाच्या मतानुसार आस्रव चार आहेत, त्यांनी उपरोक्त भेदामधून प्रमाद घेतले नाही ज्याचे पुढे विवेचन केले जाईल.

प्रमाद एक प्रकारचा असंयम आहे, म्हणून त्याचा अविरती अथवा कषायाच्या अंतर्गतच समावेश होऊ शकतो. म्हणून कुन्दकुन्दाचार्यांनी पाचच्या ठिकाणी चार आस्रव घेतले असतील असे प्रतीत होते.

आज ज्या भावनेने कर्माचा आस्रव होतो ते भाव पूर्वी बांधलेल्या कर्माच्या उदयाने होतो. म्हणून आजचे आस्रव पूर्व बंधचे कार्य आहे आणि तसेच पुढे होणारे कर्म बंधाचे कारण आहे, अशा प्रकारे बंधचे पूर्व आस्रव कार्य कारण भाव युक्त आहे.

जसे जे बी आज आपण पेरतो ते प्रथम वृक्षाचे काम करतात आणि पुढे फुटणाऱ्या अंकुरच्या कारण रूप आहे. तसेच आस्रवमध्ये बी आणि अंकुराप्रमाणे कार्य कारण भाव आहे, अनादी काळापासून पूर्व बंधामुळे आस्रव आणि त्याच्याने उत्तर बंध होतो.

ज्याप्रमाणे आजचे बी पूर्ववृक्षाचे आणि तो वृक्ष त्या बीयांच्या अशी परंपरा अनादिकाळापासून चालत आहे त्याचप्रमाणे आजचा आस्रव पूर्व बंधाने आणि तो बंध पूर्वीच्या आस्रवाने आणि तो आस्रव त्याच्या पूर्वीच्या बंधाने, अशा प्रकारे आस्रव आणि बंधाचा संबंध अनादि काळापासून अखण्ड रूपाने आहे.[२२७] नऊ तत्त्वांमध्ये बंधतत्त्व पण आहे. आस्रव द्वाराने आलेले कर्म जे आत्म प्रदेशाला आवृत्त करतात त्याला आपण कर्माचा बंध होतो असे म्हणतो.

थोडक्यात आस्रवची व्याख्या देताना पंडित विजयमुनिशास्त्री लिहितात - ज्या क्रियेने, ज्या विचाराने आणि ज्या भावनेने कर्मवर्गणेचे (कर्म समूहाचे) पुद्गल येतात ते आस्रव आहे.[२२८]

आस्रव तत्त्वाला आस्रवद्वारपण म्हणतात. आत्मप्रदेशात कर्म प्रवेशाच्या द्वाराला आस्रवद्वार म्हणतात.

ज्याप्रमाणे विहिरीत पाणी येण्याचा मार्ग त्याचे अनन्त स्रोत आहे, नावेत पाणी भरण्याचे कारण त्याचे छिद्र आहेत, घरात प्रवेश करण्याचे साधन त्याचे दार आहे. त्याचप्रमाणे जीवप्रदेशात कर्माच्या आगमनाच्या मार्ग आस्रव आहे. कर्माच्या प्रवेशाचा हेतू साधन, निमित्त आस्रव आहे म्हणून ह्याला आस्रवद्वार पण म्हणतात.[२२९]

आस्रव आणि कर्म वेगवेगळे आहे - ज्याप्रमाणे दरवाजा आणि त्यात प्रवेश करणारे प्राणी एक नसतात, घराचे दार हे प्रवेशद्वार आहे त्याचप्रमाणे आस्रव आणि कर्म वेगळे आहे. आणि जो कर्म पुद्गलाला ग्रहण करण्याचा हेतू आहे तो आस्रव आहे आणि ज्याला ग्रहण केले जाते ते ज्ञानावरणीय इत्यादी आठ कर्म आहे.[२३०]

आस्रवचे वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळे भेद दिसून येतात. जे संक्षिप्त रूचि आणि विस्ताररुची असणाऱ्यांच्या दृष्टीने आहे. ह्यात जघन्य (कमीत कमी) आस्रवाचे दोन भेद आहे- द्रव्यास्रव, भावास्रव नंतर पाच आणि नंतर वीस भेद प्राप्त होतात. ज्याच्यात आधी पाहिले ते मिथ्यात्व इत्यादी पाच भेद, तसेच प्राणातिपात पासून परिग्रहपर्यंतचे पाच आस्रव, पाच इन्द्रियाचे पाच आस्रव, मन, वचन, कायेच्या योगाचे तीन, आणि भण्डोपकरण आस्रव व शुची कुशाग्राचा आस्रव अशा प्रकारे वीस होतात.[२३१]

उमास्वातीने तत्त्वार्थ सूत्राच्या सहाव्या अध्यायाच्या सहाव्या सूत्रात आस्रवच्या ४२ भेदाचा उल्लेख केला आहे. ज्याच्यात पाच इन्द्रिय, चार कषाय, पाच अव्रत, तीन योग आणि पंचवीस क्रिया घेतल्या आहेत.

जैनाचार्य अमोलकऋषिजी महाराजांनी पंचवीस कषाय पंधरा योग बारा अव्रत, पाच मिथ्यात्व असे कर्मबंधाचे सत्तावन हेतू सांगितले आहे.[२३२]

शतावधानी पंडितमुनी श्री रत्नचन्द्रजी महाराजांनी आस्रवचे ८२ भेद सांगितले आहे. ह्याच्यात भेदांची अल्पाधिकता असताना पण प्रतिपादित विषयात विशेष फरक नाही. तसे तर आस्रवचे असंख्य भेद पण होऊ शकतात, जितके पण कर्म येण्याचे मार्ग आहेत सगळे आस्रवच्या भेदात समाविष्ट होऊ शकतात. पण सुव्यवस्थितरूपाने प्रतिपादन करण्यासाठी आचार्यांनी, ग्रंथकारांनी आपल्या आपल्या दृष्टीने भेदांची संख्या निर्धारित केली आहे.

ह्या सर्व भेदानमध्ये सर्वाधिक भेद पं. रत्नचंद्रजी महाराजद्वारा प्ररूपित ८२ भेद आहेत. अन्य स्थानावर जे भेद आहेत त्यात ८२ भेदातले जे भेद नाहीत ते मिळवले गेले तर भेदांची संख्या आजून जास्त होते.

जसे पं. रत्नचंद्रजी महाराजांनी २५ मिथ्यात्व, १२ अव्रत, पाच प्रमाद, पंचवीस कषाय आणि १५ योग अशा प्रकारे एकूण ८२ भेद घेतले आहेत. आचार्य उमास्वातीच्या ४२ भेदात ह्या ८२ भेदांशिवाय २५ क्रियेला घेतले आहे, तत्त्वार्थ भाष्यामध्ये आणि तत्त्वार्थवार्तिक मध्ये पाच इंद्रियांना आस्रवद्वार म्हटले आहे. आचार्य वट्टकेर यांनी राग, द्वेष, मोह, चार संज्ञा, गौरव हे भेद पण ८२ भेदाने वेगळेच आहे. जर ह्या सर्वांना मिळवले तर १२२ भेद होतात.

ह्या सर्व द्वाराने आस्रवचा आगमन आत्म्यामधे होतो ज्याच्या भारामुळे आत्मा जड बनून संसार सागरात बुडू लागतो. ह्याच्याने वाचण्यासाठी ह्या आस्रव द्वाराला समजून ह्याला रोकण्याचा जो पुरुषार्थ करतो तो संसार सागराने पार होऊ शकतो. प्रत्येक मुमुक्षू जीवात्म्याचा हाच लक्ष्य असायला पाहिजे की आस्रव द्वार बंद करावे, आणि म्हणूनच आस्रव भावनेचे विवेचन करताना अनेक आचार्य, कवी, लेखकांनी ह्या भेद प्रभेदाचे वेगवेगळ्या दृष्टीने विवेचन केले आहे. ज्याचा विस्तार पुढे केला जाईल.

आचार्य कुन्दकुन्दांच्या मतानुसार मिथ्यात्व पाच, अविरत पाच, कषाय चार, आणि योग तीन असे आस्रवचे भेद मानले गेले आहे. ज्याच्यात मिथ्यात्वाच्या नावामध्ये थोडा शब्दभेद आहे, अर्थाच्या दृष्टीने विशेष काही फरक नाही, त्याची नावे आणि अर्थखालील प्रमाणे आहे.

१) एकान्त - ''हे असेच आहे'' अशा आग्रह बुद्धीने धर्माविषयी एकान्त अभिप्राय ठेवणे मिथ्यात्व आहे.

२) विपरीत - सपरिग्रह पण निर्ग्रन्थ असू शकतात. इत्यादी विपरीत अभिप्राय ठेवणे विपरीत मिथ्यात्व आहे.

३) संशय - ''सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र मोक्ष मार्ग होऊ शकतो की नाही'' अशी डोलायमान चित्तवृत्ती होणे संशयिक मिथ्यात्व आहे.

४) विनय - सर्व देवात, सर्व शास्त्रात आणि गुरुजनामध्ये विनयरहित समभाव ठेवणे वैयनिक मिथ्यात्व आहे.

५) अज्ञान - हित आणि अहिताच्या परीक्षेत असमर्थ होणे अज्ञान मिथ्यात्व आहे. हे सर्व आस्रवचे कारण आहे.

अविरत - अहिंसा इत्यादी पाच व्रतांचे पालन न करणे अविरत आहे.

प्रश्नव्याकरण सूत्रामध्ये हिंसा, असत्य, अदत्तादान, अब्रह्म आणि परिग्रहाला अनादी आस्रव म्हटले आहे.[२३३] आस्रव आणि संवर असे दोन द्वार प्रश्नव्याकरण सूत्रात आहे. प्रश्नव्याकरण सूत्राच्या उपंसहारामध्ये लिहिले आहे की उपरोक्त पाच आस्रवाने जीव प्रतिक्षण कर्म रूपी रजकणांचा संचय करून चार गतिरूप संसारात परिभ्रमण करत राहतो. क्रोध, मान, माया, लोभ हे चार कषाय आहेत.

मन, वचन, काया हे तीन योग आहेत.

कषायचे मूळ दोन भेद आहेत - राग आणि द्वेष. द्रव्याने रंजित भावाला राग म्हणतात आणि अरंजित भावाला द्वेष म्हणतात. राग कषायचे दोन भेद आहेत माया आणि लोभ. द्वेष कषायचे दोन भेद आहेत- क्रोध, मान. राग द्वेषामुळे कर्माचा बंध होतो.

मिथ्यात्व, अविरत, आणि कषायच्या नंतर योगचे वर्णन करताना लिहिले आहे ह्या जीवाची सगळी प्रवृत्ती मन, वचन, कायाच्या योगाने होते असे म्हणतात. प्रत्येक योग शुभ आणि अशुभच्या भेदाने दोन प्रकारचे आहेत. आहार संज्ञा, भयसंज्ञा, मैथुनसंज्ञा, परिग्रहसंज्ञा अशुभ मनाचाच परिणाम आहे. आणि कृष्ण, नील कापोत ह्या तीन लेश्या आणि इंद्रियाने प्राप्त सुखात तृष्णा, इर्ष्या आणि विषाद इत्यादी भाव पण अशुभ मनाचा परिणाम आहे असे जिनेंद्रदेव म्हणतात. सर्व प्रकारचे स्थूल आणि सूक्ष्म राग, द्वेष, मोह, हास्य इत्यादी नऊ कषाय रूप परिणाम पण अशुभ मनच आहे.

भोजन-कथा, स्त्री-कथा, राज-कथा आणि देश कथा ह्या चारची कथा करणे अशुभ वचन आहे.

बांधणे, छेदन करणे, मारणे इत्यादी क्रिया करणे अशुभ काया समजले पाहिजे.

ह्या अशुभ भावाने जीव कलुषित, आत्मविपरीत भावाने जुळलेला राहातो.

पुढे ह्या अशुभ भावाने विपरीत शुभ मन, वचन, कायाची चर्चा केली आहे.

व्रत, समीति, शील आणि संयमरूप परिणाम होणे शुभ मन आहे.

जे वचन संसाररूपी बंधनाला कापण्यात कारणरूप आहे त्या वचनाला जिनदेवाने शुभ वचन म्हटले आहे. जिनदेव, जिनवाणी आणि शुभ कार्यासाठी जी चेष्टा केली जाते तो शुभ काया आहे.[२३४]

५७ व्या गाथेमध्ये आचार्य कुन्दकुन्दानी कर्माश्रवाची चर्चा केली आहे. त्यात सांगितले आहे की त्याच्याने जीव घोर संसारसमुद्रात निमज्जीत होतो - बुडून जातो.

ज्ञानपूर्वक जी क्रिया केली जाते ती परम्परेने (Indirectly) मोक्षाची हेतू रूप बनते. परम्परेने मोक्षाचा तात्पर्य हा आहे की क्रिया-प्रवृत्ती असल्याने मोक्षाचा सरळ कारण तर होऊ शकत नाही, पण त्याच्याने कर्माचा निरोध आणि निर्जरणाची प्रेरणा मिळते, जो मोक्षाचा सरळ (Directly) हेतू आहे.

क्रियेच्या संबंधी स्पष्टीकरण करताना आचार्य म्हणतात की जीव कर्मास्रवा मुळेच जन्ममरणाच्या सागरोपम प्रवाहात भटकतात. क्रिया तर आस्रव आहे म्हणून ती मोक्षाची हेतू रूप होऊ शकत नाही, कारण आस्रव तर भवभ्रमणाचा हेतु आहे म्हणून त्याज्य आहे.

ग्रंथकाराच्या सांगण्याचा भावार्थ हा आहे की निश्चय नयाने कोणतीच क्रिया मोक्षाचा कोणत्याही प्रकारे कारण होऊ शकत नाही, अशा स्थितीत प्रश्न होतो की ग्रंथकाराचे ते कथन जेथे ज्ञानपूर्वक क्रियेला परंपरेने मोक्षाचे कारण म्हटले आहे, ते कसे फलित होईल ?

ग्रंथकाराचा सांगण्याचा मतितार्थ हाच आहे की जिथे ज्ञानमय भाव असतो तेथे व्यवहार नव्याने क्रिया निरास्रव म्हटली जाऊ शकते, ज्याचा प्रतिफळ विरतीमध्ये होतो. म्हणून व्यवहार भाषेत त्याला परंपरेने मोक्षाचे कारण म्हटले गेले तर अयोग्य होणार नाही.

शेवटी साठ ६० व्या गाथेमध्ये म्हटले आहे की पूर्वी जे आस्रवचे भेद सांगितले गेले आहे ते निश्चय दृष्टीने जीवाचे नाहीत. आत्मा आपल्या शुद्ध स्वरूपाच्या दृष्टीने शुभ आणि अशुभ कर्माच्या आस्रवाने, द्रव्यास्रव आणि भावास्रवाने मुक्त आहे असे चिंतन केले पाहिजे.

या कथनाचा तात्पर्य हा आहे की ज्ञानी समग्र रागाला हेच मानतो. तो राग भावाने सुटण्यासाठी उद्यम करतो तसे करण्यात त्याला आस्रव भाव नाही म्हणून त्याची ती अवस्था निरास्रव म्हटली जाते.

आचार्य कुन्दकुन्दांनी समयसारमध्ये सांगितले आहे की सम्यग्दृष्टीला आस्रव - जो बंधचा हेतुरूप आहे असा बंध होत नाही.[२३५] राग दोष मोह - हे भावास्रव म्हटले जातात. जेव्हा भावस्रव होत नाही तर द्रव्यास्रव पण होत नाही. राग द्वेष मोह इत्यादी भावकर्मामुळे उद्भूत होतात म्हणून वस्तुतः हे जीवाने सम्बद्ध नाहीत. जीव चेतन आहे, कर्म अचेतन आहे. अचेतनने प्रकट होणारे भाव चेतन कसे होतीत ? चेतन नेहमी चेतन राहातात म्हणून द्रव्यार्थिक नयाच्या अपेक्षेने सगळे जीव शुद्ध आहेत. आचार्य कुन्दकुन्दांचा

हा दृष्टिकोण निश्चय नयाने जुडलेला आहे.

भावस्रवाभावमयं प्रपन्नो, द्रव्यास्रवेभ्यः स्वतः एव भिन्नः।

ज्ञानी सदा ज्ञानमयैक भावो निरास्रवो ज्ञायक एक एव ॥[२३६]

भावास्रवाच्या सर्वथा अभावाला प्राप्त झालेले आणि द्रव्यास्रवाने तर स्वभावानेच भिन्न, असे ज्ञानी जे नेहेमी एक ज्ञानमय भावाने युक्त आहे, ते निरास्रव आहे, एक मात्र ज्ञायक आहे.

ज्ञानीमध्ये भावास्रवाचा अभाव आणि द्रव्यास्रवाची पण भिन्नता, अस्पष्टता असते. कारण द्रव्यास्रव पुद्गल परिणाम स्वरूप आहे आणि ज्ञानी चैतन्य स्वरूप आहे. अशा प्रकारे ज्ञानीला भावास्रव आणि द्रव्यास्रवाचा अभाव असल्याने निरास्रव आहे.

म्हणून ज्ञानमय क्रियेला मोक्षाचे पारंपरिक कारण म्हटले आहे. त्याला त्याच दृष्टिकोणात समजणे आवश्यक आहे. कारण तो तत्त्वतः कर्मगत आस्रव भाव नाही.

आस्रव शब्दाचा अर्थ वाहात्या पदार्थाचे येणे असा होतो, ज्याप्रमाणे झरोख्यातून वायू आणि नाल्याने वाहाते जल येते त्याचप्रमाणे कर्मवर्गणेचे येणे आस्रव आहे, जसे पाण्यात शेवाळे पाण्याच्या मळाच्या रूपात उपलब्ध होते तसेच आस्रवभाव पण आत्म्यात मळाच्या रूपात उपलब्ध होतो.

आस्रवाला इंग्लिशमध्ये Infolw of karmic matter म्हटले जाऊ शकते.

तत्त्वार्थ सूत्रात आस्रवाचे दोन प्रकार सांगितले आहे -

१) पुण्यास्रव २) पापास्रव. शुभ योगाला पुण्याचा आस्रव आणि अशुभ योगाला पापाचा आस्रव म्हटले आहे.[२३७]

नवतत्त्वामध्ये आस्रव तत्त्व एक आहे. त्याचे अनेक भेद प्रभेद आहे. आस्रव म्हणजे कर्म येण्याचे कारण त्याचे चिंतन करून त्याला त्यागण्यायोग्य समजून त्याचे त्याग करणे आवश्यक आहे.

पुण्य आणि पाप या दोन तत्त्वांचा नवतत्त्वांमध्ये वर्णन आहे. इथे आस्रवच्या रूपात ह्यांचे वर्णन आहे. ज्यांचा राग प्रशस्त आहे. अंतःकरणात अनुकंपेची वृत्ती आहे आणि मनात कालुष्य नाही. त्या जीवाला पुण्याचा आस्रव होतो.[२३८] प्रमाद बहुल चर्या, मनाची कलुषितता, विषयांच्या प्रती लोलुपता, पर-परिती अर्थात दुसऱ्यांना त्रास देणे, आणि परनिंदा ह्याच्याने पापास्रवाचे आगमन होते.[२३९]

तत्त्वार्थवार्तिकमध्ये अकलंकदेव लिहितात की आस्रवाच्या दोषांचा विचार करणे आस्रवानुप्रेक्षा आहे. आस्रव इहलोकात आणि परलोकात अपाययुक्त आहे. इन्द्रिय इत्यादीचा उन्माद महानदीच्या प्रवाहाप्रमाणे तीक्ष्ण आहे.[२४०]

ज्याप्रमाणे महानदीच्या प्रवाहाचा वेग अती तीक्ष्ण असतो आणि अकुशलच्या आगमनाचा आणि कुशलच्या निर्गमनाचा हेतुरूप असतो त्याचप्रमाणे ह्या इंद्रियइत्यादी आस्रव पण जीवाला अकल्याणाने युक्त करण्यासाठी आणि कल्याणाने वंचित ठेवण्यासाठी मार्गरूप आहे.

इंद्रिये पाच आहेत. त्यातल्या प्रत्येकचा विचार करण्यायोग्य आहे, त्याचे स्वरूप तत्त्वार्थ वार्तिक आणि तत्त्वार्थ भाष्यात जवळ जवळ सारखेच दिले आहे. दोघांच्या सांगण्याचा तात्पर्य सारखाच आहे.

स्पर्शेन्द्रिय - वनविहारी मदान्ध हत्ती कृत्रिम हत्तीणीला पाहून स्पर्शेन्द्रियाच्या ज्वाराने मत्त होऊन खड्ड्यात पडून मनुष्याच्या आधीन होतो आणि वध, बंधन, वाहन, अंकुश, ताडन, महावत आघात इत्यादीच्या तीव्र दुःखांना भोगतो. आणि पूर्वी आपल्या समूहावरोबर स्वच्छदतेने फिरण्याच्या सुखाचे स्मरण करून क्षणोक्षणी भयंकर दुःखी होतो.

रसेन्द्रिय - जिव्हेच्या वशीभूत झालेले प्राणी दोन्ही भवांमध्ये क्लेशालाच प्राप्त होतो, ज्याप्रमाणे मेलेल्या हत्तीच्या शरीरावर बसलेला, पण नदीच्या वेगात पडलेला कावळा अती क्लेश अथवा मरणाला प्राप्त होतो, मांसखण्डाच्या भक्षणाची अतिशय लुब्धता ठेवणाऱ्या मच्छची जी दशा होते, तीच दशा रसेन्द्रियच्या वशीभूत झालेल्या सर्व प्राण्यांची होते.

घ्राणेन्द्रिय - सर्पाला पकडणारे अशी औषधी सर्पाच्या निवास स्थानाजवळ ठेवतात की त्याचा वास त्यांना अतिशय प्रिय वाटतो, त्याच्या लोभाने सर्प तिथे येतात आणि पकडले जातात. तशीच अवस्था नासिका इन्द्रियाच्या वशीभूत झालेल्या प्राण्याची होते.

चक्षुरिन्द्रिय - दिव्याच्या प्रकाशाला पाहून चंचळ होणाऱ्या फुलपाखराची जशी पतित दशा होते, चक्षुरिन्द्रियाच्या विषयात आसक्त प्राण्याचीपण तीच दशा होते.

श्रोतेन्द्रिय - श्रोतेन्द्रियच्या वशीभूत झालेल्या प्राण्याची स्थिती गायनाचा ध्वनी ऐकून शिकाऱ्याच्या जाळ्यात फसणाऱ्या हरणासारखी होते.

अशा प्रकारे आस्रवाच्या दोषांचा विचार केल्याने उत्तम क्षमा इत्यादी धर्मात बुद्धी टिकून राहते.[२४१]

आचार्य उमास्वाती आणि अकंलकदेव यांनी आस्रवभावनेमध्ये इन्द्रिय विषयाच्या चिंतनाचे जे विवेचन केले आहे ते अत्यंत मार्मिक आहे. एकच इन्द्रियाचा भोग भोगणाऱ्याचा अकाली मृत्यू होतो तर जो रोज पाच इंद्रियांच्या विषयाला भोगतो त्याची काय दशा होईल हे विचार करण्यासारखे आहे.

आस्रव भावनेत हेच चिंतन करायचे आहे की आज किती इंद्रिय विषयांचा भोग केला ? माझी काय स्थिती होईल ? जो अशा प्रकारे चिंतन करतो तो अपाय अर्थात नाशचे कारणीभूत

ह्या आस्रवाचा निरोध करण्याचा पुरुषार्थ करतो.

सभाष्यतत्त्वार्थाधिगम सूत्रामध्ये उमास्वातींनी कर्म येण्याच्या मार्गाला आस्रव सांगून इंद्रिय इत्यादीचे स्वरूप दाखवून इंद्रियांना आस्रवद्वार म्हटलेले आहे आणि त्या इंद्रियांच्या निकृष्टतेचा विचार, चिंतन निरंतर करण्याचे सांगितले आहे. ज्याच्याने आस्रवचा निरोध होऊ शकेल उमास्वातीप्रमाणे अकलंकदेवाने पण इंद्रियांनाच आस्रवद्वार सांगितले आहे.

आचार्य वट्टकेरांनी राग, द्वेष, मोह, इंद्रियां, संज्ञा, गौरव, कषाय, आणि मन, वचन काया द्वारा कर्माचे आस्रव होते असे सांगितले आहे. [२४२]

राग - जो अशुभ - कुत्सित अथवा दोषमय कार्यात अनुरक्त करतो.

द्वेष - जो अप्रीतिजनक आहे, प्रशस्त सम्यग्दर्शन इत्यादींमध्ये अप्रीती करतो.

मोह - हा तर महाशत्रु आहे जो निश्चित जीवाला विमूढ बनवतो. ज्याच्यामुळे सत्पदार्थात आणि सत्कार्यात गती होत नाही, परमार्थ दूर रहातो, तो मोह धिक्कारण्या योग्य आहे. जो हृदयात स्थित होऊन जीवाला मोक्षमार्गाने दूर नेतो ज्याला जिनेन्द्र प्रभूने व्याख्यात केले आहे.

राग-द्वेष निंदनीय आहे, परित्याज्य आहे असे दर्शवतांना लिहिले आहे की "जिन वचनामध्ये श्रद्धा ठेवणारा जीव पण तीव्र अशुभ गतीचे हेतू रूप अशा राग द्वेषाने ग्रस्त राहातो, अशा राग द्वेषाला धिक्कार आहे.

इंद्रिय निग्रहाची कठीनता आशीविष जातीच्या सर्पाला वश करण्यासारखी कठीण

आहे. इंद्रियाने होणाऱ्या पापामुळे चतुर्गतितभ्रमणाचे दुःख प्राप्त होते. २४३

आहार, भय, मैथुन आणि परिग्रह मूलक संज्ञा, तीन गौरव (ऋद्धी, रस, साता) क्रोध, मान, माया आणि लोभरूपी कषाय इत्यादी आस्रव द्वाराने पापाचा आगमन होतो तो विनाशकारक आहे.

ज्याप्रमाणे नावेत जर छिद्र झाले तर ती पाण्याने भरून समुद्रात बुडून जाते, त्याचप्रमाणे आस्रव भव सागरात बुडवणारा आहे. आस्रवाच्या स्वरूपाचे, दुःखमय परिणाम इत्यादीचे पुन्हा पुन्हा चिंतन करता करता त्याच्या परित्यागाची प्रेरणा जागृत होते.

भगवती आराधनामध्ये आचार्य शिवार्यांनी आस्रव भावनेचे वर्णन करताना कुन्दकुन्दाचार्याप्रमाणेच मिथ्यात्व, असंयम, कषाय आणि योगाला आस्रव म्हटले आहे.

तेलाने माखलेल्या शरीराला लागलेली धुळ मळरूप होते त्याचप्रमाणे जीवाच्या मिथ्यात्व इत्यादी परिणामाने लोक मध्ये सर्वत्र प्रसरलेले कर्म पुद्गल आकृष्ट होऊन आत्म्यावर लिप्त होतात.

पुढे आचार्य शिवार्यांनी इंद्रिय भोगाची तुच्छता आणि मनुष्य भवाची श्रेष्ठता दाखवताना लिहिले आहे की जसे कुणी मनुष्य राख इत्यादीसाठी बहुमूल्य चंदनाचे लाकूड जाळून टाकतो तसेच मनुष्य अती तुच्छ विषयाच्या लोभात भव नष्ट करतो. वास्तविक ह्या मनुष्य देहाद्वारा तर अतिन्द्रिय अनन्तसुख पण प्राप्त होऊ शकते. ह्याच्यात आस्रवाला पू (पस, पीब)ची उपमा दिली आहे. असे अपथ्य सेवन केल्याने जखमेमध्ये पू येतो तसेच मन, वचन, कायेच्या प्रवृत्तीने कर्माचा आस्रव होतो.

अनुकम्पा आणि शुद्ध प्रयोगाने विपरीत परिणाम अशुभ कर्माच्या आस्रवाचे द्वार आहे.२४४

स्वामी समन्तभद्र यांनी परोपकार, दया इत्यादीला पुण्यास्रव आणि परिग्रह, अन्याय प्रवृत्ती, सप्त व्यसन, इत्यादीला पापास्रव म्हटले आहे.२४५

कार्तिकेयानुप्रेक्षेमध्ये ८८ ते ९४ गाथापर्यंत आस्रवानुप्रेक्षेचे विवेचन केले गेले आहे. जीवाच्या प्रदेशाच्या हलन-चलनाला योग म्हणतात. हे योग मोहनीय कर्माच्या उदयाने युक्तपण असतात आणि अयुक्तपण असतात. अर्थात मोहनीय कर्माच्या उदयावस्थेतपण त्यांची प्रवृत्ती होते व त्याच्याशिवायही त्यांची प्रवृत्ती होते. योग तेराव्या गुणस्थानापर्यंत राहातात आणि मोहनीय कर्माचा उदय दहाव्या गुणस्थानापर्यंत होतो. म्हणजे

दहव्या गुणस्थानापर्यंत योग मोहनीय कर्माने युक्त असतो पण पुढे अकराव्या बाराव्या व तेराव्या गुणस्थानात जो योग असतो तो मोहनीय कर्माने असंयुक्त असतो.

मोहनीय कर्मामुळे जीवाला जे मिथ्यात्व इत्यादी अनेक प्रकारचे परिणाम होतात ते आस्रव आहेत. पुढे टीकेमध्ये शुभचन्द्रजी लिहितात की बंध आस्रवपूर्वकच होतो. मिथ्यात्व, अविरति, प्रमोद, कषाय, योग ही बंधचे पाच कारणे आहेत. योग सोडून चारांचा मोहनीय कर्माच्या उदयाबरोबर संबध आहे, जो दहाव्या गुणस्थानापर्यंत राहतो, म्हणून दहाव्यानंतर अकराव्याच्या पुढे सातावेदनीयचाच बंध होतो. जरी आस्रवचा हेतू योग आहे पण योगाबरोबर राहाणारे मोहनीय कर्मजनीत मिथ्यात्व इत्यादी भाव असले तरच आस्रव होतो.

पुण्यकर्माचे कारण शुभआस्रव आणि पापकर्माचे कारण अशुभआस्रव व चार कषाय आहे. अनंतानुबंधी आणि अप्रत्याख्यानावरणला तीव्र कषाय आणि प्रत्याख्यानावरण आणि संज्वलनला मंद कषाय म्हणतात. कषायसहित योगद्वारा आस्रव होतो. तो अशुभ आणि शुभ दोन प्रकारे होतो. मंद कषायी जीव प्रियभाषी, क्षमाशील आणि तीव्र कषायी दोष दृष्टीयुक्त दीर्घकाळापर्यंत वैरभावना ठेवणारा असतो.

ग्रंथकार म्हणतात की आस्रवाच्या स्वरूपाला समजून पण सोडण्यायोग्य मिथ्यात्व कषाय इत्यादीला जो सोडत नाही त्याची आस्रव अनुप्रेक्षा निरर्थक आहे आणि जो मुनी साम्य भावनेत लीन होऊन मोह कर्माच्या उदयाने होणाऱ्या मिथ्यात्व इत्यादी भावाला सोडतो त्यांची आस्रवानुप्रेक्षा सार्थक आहे.[२४६]

इथे ग्रंथकाराने भर देऊन सांगितले आहे की भावानेचा अभ्यास करणाऱ्या साधकाने आत्मबलपूर्वक त्या दोषाचा अवश्य परिहार केला पाहिजे. ज्याच्या परिहेयतेचे साधक पुन्हा पुन्हा चिंतन करतो जर अंतःकरणपूर्वक खऱ्या हृदयाने चिंतन अनुभाव केले तर दोष अपहत होतातच.

वृहदद्रव्य संग्रहाच्या टीकेमध्ये श्री ब्रह्मदेव, यांनी मूलाचारप्रमाणेच छिद्रयुक्त नौकेचे उदाहरण दिले आहे. पण ब्रह्मदेवांनी विशिष्ट विश्लेषण करताना लिहिले आहे की जसे समुद्रात अनेक रत्नांच्या पात्राने भरलेल्या छिद्रसहित जहाजाचे, पाण्यात प्रवेश झाल्यावर पतन होते आणि ते जहाज समुद्र किनारी जे नगर आहे त्याला पोहचु शकत नाही, त्याचप्रमाणे सम्यग्दर्शन ज्ञान आणि चारित्ररूपी अमूल्य रत्नाच्या पात्राने युक्त ह्या जीवरूपी जहाजामध्ये पूर्वी सांगितलेल्या इंद्रिय, कषाय, इत्यादी आस्रवांद्वारा जेव्हा कर्मरूपी

जळाचा प्रवेश होतो तेव्हा संसाररूपी समुद्रात पतन होते आणि केवलज्ञान, अव्याबाध सुख इत्यादी अनन्तगुण रत्नाने पूर्ण जो मुक्ती स्वरूप वेला पत्तन (मुक्ती नगर) आहे त्याला हा जीव प्राप्त करू शकत नाही.[२४७]

अन्यत्र आस्रवाचे मिथ्यात्व इत्यादी कारण सांगितले आहे, पण योगशास्त्रामध्ये मन, वचन आणि शरीरद्वारा गृहीत पुद्गलाच्या निमित्ताने आत्मा चांगले वाईट मनन, भाषण आणि वीर्य परिणमन करतो. ह्या तीन योगाला शुभाशुभ कर्माचे जनक सांगितले आहे.[२४८]

योग प्रवृत्तीचा सूचक आहे, त्याच्याने शुभाशुभ कर्माचा बंध कसा होतो हे दाखवताना आचार्य लिहितात की -

मैत्री, प्रमोद इत्यादी शुभभावनेने भावित मनोयोग शुभकर्माचा अर्थात सातवेदनीय सम्यक्त्य, शुभ आयुष्य, नाम, गोत्राचा जनक असतो आणि तेच मन जेव्हा क्रोध इत्यादी कषाय आणि इंद्रिय विषयात आक्रांत असते तेव्हा अशुभ कर्माचा जनक होते.

शुभकर्माच्या उपार्जनासाठी मिथ्या विवर्जित श्रुतज्ञानाश्रित वचन असतात आणि त्याच्या उलट मिथ्या व शास्त्रविपरीत वचन अशुभकर्माचे कारणरूप होतात. हीच गोष्ट शरीराबरोवर जोडलेली आहे. जेव्हा शरीर सुगुप्त म्हणजे सम्यक् प्रकारे गोपन केलेला अर्थात कुचेष्टेने रहित असतो तेव्हा तो शुभकर्माचे उपार्जन करतो. व सतत आरंभ समारंभ युक्त प्राणी घातक हिंसा इत्यादी प्रवृत्ती करण्यात प्रवृत्त होतो तेव्हा तो अशुभकर्माचा बंध करतो.

इथे एक गोष्ट विशेषतः विवेचनीय आहे - योगचे शुभ-अशुभ दोन्ही भेद जे क्रमशः भौतिक सुख आणि दुःखप्रद आहे, तत्त्वतः अनुपादेय आहेत. कारण दोन्हीमध्ये बंधात्मकता आहे. ज्याप्रमाणे लोहबंधाने बद्ध व्यक्ती दुःखी होते त्याचप्रमाणे सोन्याच्या बंधनाने बद्ध व्यक्ती पण दुःखी होतेच. पाहाण्यासाठी सुवर्ण जरी सुंदर असले तरी दुःखोत्पत्तित तर लोखंडाप्रमाणेच असतो. म्हणून शुभपण शेवटी बंधनच आहे.

परंतु इतके आवश्य आहे की साधना काळात पुढे वाढण्यात शुभ पुण्यात्मक वृत्तीला बाधक मानले जात नाही, यद्यपि त्या प्रवृत्तीला अप्रवृत्तीत परिणत करावे लागते, पण साधकाच्या साधनेत तसा तात्कालिक बदल होत नाही. हे श्रम साध्य आहे पण एक मुमुक्षू त्या स्थितीपर्यंत भावनेच्या बळाने पोहचू शकतो.

शुभास्रव जनित पुण्याच्या संबंधी आणखी विशेष जाणण्यासारखे आहे. गव्हाची शेती करतात तेव्हा गव्हाच्या दाव्याबरोबर भुसा अथवा घासपण उत्पन्न होतो. मुख्य प्राप्तव्य

तर गहू आहे पण भुसा देखील पशूच्या खाद्यासाठी उपयुक्त आहे, म्हणून उपादेय आहे. आत्म्याच्या स्वन्मुखी अध्यवसायाने जी आंतरीक निर्मलता, उज्ज्वलता उत्पन्न होते ती कर्म निर्जरेची हेतू रूप बनते. ते तपश्चरणाचे रूप आहे पण तेथे जी अनुगत बंधाची प्रक्रिया होते ती शुभात्मकता घेऊन चालते.

दिगम्बर परम्परेत अशुभ, शुभ आणि शुद्ध - ह्या तीन प्रक्रियांचा उल्लेख झाला आहे. अशुभ पापास्रव मूलक, शुभ पुण्यास्रव मूलक आहे, पण शुद्ध अनास्रव अवस्था आहे ती बंध रूप नाही. कारण तेथे आत्म्याचा स्वरूपोन्मुख उद्यम अथवा पुरुषार्थ आहे. जसे एखादी व्यक्ती बाहेरून येऊन घरात प्रवेश करते तर ती घरात पोहोचतो. गल्ली रस्ता आपोआप सुटतात पण घरापर्यंत पोहोचण्यात तर त्यांचे सहाय्य आहेच. धर्माचा संबंधपण पुण्यास्रवा बरोबर तसाच आहे, जो मोक्षापर्यंत पोहचवण्यासाठी नौकेप्रमाणे आहे. ह्या तात्त्विक महानतेचा सतत भावना प्रणव होऊन अनुभव केला जाऊ शकतो.

श्री सोमदेवसूरींनी अशुभ योगाने कर्मबंध करणाऱ्या स्थितीचे वर्णन करताना लिहिले आहे की हा जीव आंतरीक कषायाने कलुषित होऊन अशुभ योगाने कर्मबंध करतो, त्याची दशा त्या हत्तीसारखी आहे. जो हत्तीणीमध्ये लंपट अथवा आसक्त होऊन दोरीच्या बंधनात बांधला जातो. म्हणून ह्या खराब कार्याला सोडा. ग्रंथकाराने काव्यात्मक शैलीत आस्रवाचा फार सुंदर परिचर करून दिला आहे. संकल्परूपी कल्पवृक्षाचा आश्रय घेऊन साधकाचे चित्त मनोरथाच्या सागरात बुडत आहे. वास्तविक ते काहीच तथ्यात्मक नाही. त्याच्यामुळे तर पापाचा संचयच होतो.

ज्याचे मन निर्धनतेने घायळ आहे, त्यांचे चित्त जसे खाण्याच्या मात्र कल्पनेने उल्लसित होऊ लागते तसेच तुम्ही मोठ्या मोठ्या मनोरथाच्या उत्कट मनोकामना करून हर्षित होत आहात.

जर तुम्ही परमात्म स्वरूपाचे चिंतन करून हर्षित झाले असता तर जन्म व्यर्थ का गेला असता ?[२५०] इथे साधकाला जागृत करण्याचा प्रयत्न केला आहे आणि सांगितले आहे की तुम्ही कर्मप्रवाहात वहात जात आहात. तो प्रवाह अथवा आस्रव तेव्हाच थांबेल जेव्हा स्वतःला परमात्म भावनेबरोबर जोडाल.

आपल्या आत्म्याजवळ नैसर्गिक आध्यात्मलक्ष्मी, आहे, पण ती कर्माच्या सघन सघनतर आवरणात हरवली आहे. आस्रव जीवाला किती अपकारक आहे हे समजणे आणि अनुभवित करणे एक साधकासाठी परम आवश्यक आहे.

आचार्य शुभचन्द्रांनी शुभ आस्रव आणि अशुभ आस्रवाचे विवेचन करताना लिहिले आहे. यम अर्थात अणुव्रत, महाव्रत इत्यादी, प्रशम-कषायाची मंदता, निर्वेद-संसाराने वैराग्य आणि तत्त्वाचे चिंतन इत्यादीचे आलंबन असले पाहिजे आणि मैत्री, प्रमोद, कारुण्य आणि माध्यस्थ ह्या चार भावनांची ज्याच्या मनात भावना असते तोच शुभास्रवाला उत्पन्न करतो आणि कषायरूपी अग्नीने प्रज्वलित व इंद्रियांच्या विषयाने व्याकुळ मन संसारबंधनाचे सूचक अशुभ कर्माचा संचय करतो.[२५१]

श्री जयसोमुनींनी आगमाच्या आधारावर आस्रव भावनेचे वर्णन केले आहे. त्यात लिहिले आहे की आचारांग सूत्राच्या दुसऱ्या अध्ययनामधे संसाराचे मूळ कषाय आहे, असा उल्लेख केला आहे आणि जीवाला संबोधन करून म्हटले आहे की हे जीव संसार महावृक्षाचे सर्जन करणाऱ्या कषायाचे सेवन का करतो ? जिनेश्वर भगवान आपल्याला ज्ञानरूपी दिव्याने कषायाच्या भयंकर नरक इत्यादीचे दुःख समजावून सांगतात. म्हणून हे प्राणी ! आस्रवाचा त्याग कर. ह्या आस्रवाच्या दुष्ट विपाकाचे विस्तृत वर्णन प्रश्नव्याकरण सूत्रात आहे ज्याचा पूर्वी उल्लेख केला गेला आहे.

कषाय हिंसा इत्यादी पाप आस्रव आहे, हिंसा अत्यंत कटुकर्मफळ देणारी आहे असे विपाक सूत्रात वर्णन आहे. हिंसेप्रमाणे असत्य, चोरी इत्यादी आस्रवांचेपण भयंकर परिणाम भोगावे लागतात, त्याचे उदाहरण देऊन त्यांनी लिहिले आहे की वसुराजा सत्याला चांगल्याप्रकारे जाणत होते, गुरूंनी "अजचा होम करावा" असे सांगितले. वास्तविक अजचा अर्थ जुने जव असा आहे हे जाणत असताना पण अज म्हणजे बकरा असे खोटे अर्थ त्यांनी सांगितले. ते असत्य वचन त्यांना असे दुःखरूप निवडले की त्याच भवात देवांच्या लाथांनी तो खाली आपटला गेला आणि मरून नरकात गेला. तसेच मंडीक चोर परक्याचे धन चोरत होता आणि एकदा राजाच्या जाळ्यात तो पकडला गेला आणि अत्यंत दुःखी झाला. अब्रह्मच्या सेवनाने तर कित्येक मनुष्य आणि देवांची हालत बिघडली. महाआरंभ महापरिग्रहाने ब्रह्मदत्त चक्रवर्ती सातव्या नरकात गेले. म्हणून ज्ञानी म्हणतात की जो आस्रवाचा सेवन करतो तो शत्रूचे काम करतो. अशा प्रकारे जीवाला दुर्गतीमध्ये घेऊन जाणारे आस्रव दुर्गतीचे दूत आहे. एकेन्द्रिय जीव जे प्रत्यक्षरूपात एका पण पापस्थानाचे आचरण करत नाही तरी व्रत न घेतल्यामुळे अठरा पापस्थानांच्या अविरतीचे पाप आणि कायिकी इत्यादी पाच क्रियेचे पाप तर लागतातच. असे भगवती सूत्रामध्ये लिहिले आहे.

सुयगडांग सूत्रात वर्णन आहे की पंचवीस क्रियास्थानांच्या सेवनाने जीवाला कटू

फळ भोगावे लागतो ज्याच्याने अशी भयंकर वेदना जीवाला भोगावी लागते की त्याचे वर्णन करताना हृदय कंपित होते.

नंतर एक एक इंद्रिय विषयाच्या आस्रव विपाकाचे वर्णन आहे ज्याचे वर्णन पूर्वी झाले आहे.

हास्य, मश्करी, निंदा, दुसऱ्याचा वाईटपणा, विकथा इत्यादी मोठे दुःखरूप आहे. ह्याच्या वश झालेले जीव नरक आणि निगोदपर्यंत जातात, ह्या आस्रवाच्या फंद्यात फसून पूर्वधर सारखे महाविद्वान मुनीदेखील आपले शिकलेले आगम ज्ञान विसरले तर दुसऱ्यांची काय कथा ?

अल्पज्ञ जीव हास्य इत्यादीच्या वश होऊन धर्म विसरले तर त्यात काय मोठी गोष्ट ? परिणाम स्वरूपी नरक निगोद सारख्या एकदम अधम दुर्गतीच्या कैदेमध्ये दीर्घकाळापर्यंत राहावे लागते. आस्रवाच्या अशा भयानक स्थितीला समजून आस्रवसेवन कसे केले जाऊ शकेल.[२५२]

कविवर बुधजनजी लिहितात - कुणी चांगले अथवा वाईट नाही. वस्तूचा वेगवेगळा स्वभाव आहे. मनुष्य व्यर्थ आपल्या मनात संकल्प-विकल्प करून राग द्वेषाने भावास्रव आणि द्रव्यास्रवाचा बंध करतो ज्याच्याने कर्मामुळे जीव व्यथित होतो. दुसरे कुणी कुणाला व्यथित अथवा दुःखी करत नाही.[२५३]

ह्याच्यात कवी बुधजनजी यांनी फारच महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे की मनुष्य आपल्या संकल्प-विकल्पाने अनर्थच्या पाप आस्रवाचे सेवन करत जातो आणि कर्म बांधत जातो, जितके कर्म अनर्थच्या कामाने बांधले जातात तितके एखाद्या अर्थपूर्ण कार्यानिपण बांधले जात नाही. मनात दुसऱ्यांच्या प्रती जो अनुमान लावला जातो, ती व्यक्ती अथवा वस्तू काही चांगली वाईट नसते जी वस्तू अथवा व्यक्ती एकाला चांगली वाटते तीच दुसऱ्याला चांगली वाटत नाही. हा दृष्टीचा दोष आहे. ज्याच्याने राग-द्वेष वाढत जातात आणि मनुष्य कर्माने भारी होत जातो. ज्याची काहीच आवश्यकता नाही. अशा कार्याने जीव अज्ञानामुळे फसत जातो त्याला समजून त्याच्यापासून सुटण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जे काम करणे अनिवार्य आहे त्याच्याने सुटण्यात त्रास होतो पण अनावश्यक पापाने सुटणे कठीण नाही. फक्त त्या दिशेने ध्यान ठेवणे आवश्यक आहे. शरीरात वाढणारी नखे आणि केसांना कापून टाकले जाते. तसेच ह्या अनर्थच्या आस्रवाला सोडण्याचा सतत पुरुषार्थ केला पाहिजे आणि अनर्थच्या पापस्रवाचा संबंध तोडून टाकला पाहिजे.

समुद्रपालमुनी संसार अवस्थेत असताना राजमहलाच्या झरोख्यातून नगरचर्या पहात होते- तेव्हा त्यांनी पाहिले की एका चोराला बेड्याने बांधून नेत आहे. हे दृश्य पाहून ते विचार करू लागले - अरे ! ह्याला कोण पकडून नेत आहे का ? नाही ! त्याचे स्वत:चे केलेले अशुभ कर्म उदयात आले आहे त्याचे हे फळ आहे.

''अहो असुभाण कम्माणं निज्जाणं पावगं इमं ॥''

अरे ! जीवा, तू सुद्धा असे कर्म करशील तर तुझीपण हीच अवस्था होईल. संसारात भ्रमण करून दु:खी व्हावे लागेल. अशाप्रकारे कर्मास्रवाचे चिंतन करता-करता समुद्रपालांना जातिस्मरण ज्ञान प्राप्त झाले. मग संसाराच्या सुखांना तिलांजली देऊन समुद्रपालमुनी झाले. आस्रवाचा निरोध करून संवराचे स्वामी बनले.[२५४]

अशाप्रकारे आस्रवमार्गाचे उत्तम ज्ञान प्राप्त करून, त्याच्या मूळरूपाला समजून घेरून, चिंतन मनन करून आस्रव भावनाने अंत:करण भावित करून आस्रव भावापासून दूर राहण्याचा प्रयत्न करायला पाहिजे. आणि आस्रव निरोधरूप संवरभावनेचे आचरण केले पाहिजे.

आस्रव चतुर्गतीमध्ये भरकटायला लावतो. मोहाच्या निद्रेतून जागृत झाल्याशिवाय, कर्मास्रवाला अडविल्याविना आत्मशांती प्राप्त होऊ शकणार नाही. आत्मशांती प्राप्त करण्यासाठी मोहाचे बंधन तोडावे लागतील आणि आस्रवद्वार अवरुद्ध करावे लागतील.

आस्रव भावना असे मुख्य व मूळ द्वार आहे की त्या चिंतनाने आत्मा परमोच्च स्थितीपर्यंत पोहोचू शकतो. ह्याचे चिंतन केल्याने आत्मा मलिन न होता परम शुद्ध सिद्ध स्थान प्राप्त करू शकतो. संपूर्ण आस्रवांचा निरोध संवर होऊन जातो. आणि तोच परिनिर्वाण किंवा मोक्षाचे कारण बनतो. म्हणूनच आस्रव भावनेचे चिंतन अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

आस्रवभावनेचे वर्णन करताना भावना शतकमध्ये मिथ्यात्व, अव्रत, प्रमाद, कषाय, आणि योग या पाच आस्रवांचे ८२ भेद आहेत. याचा उल्लेख केलेला आहे.[२५५] याचा पूर्वी उल्लेख झाला आहे. मिथ्यात्वाचे विवेचन करताना पूज्य रत्नचन्द्रजी महाराजांनी फार सुंदर उदाहरण दिले आहे. ज्याप्रमाणे पट-वस्त्र निर्मितीमध्ये तंतूंचे समूह असणे मुख्य कारण आहे, घट बनविण्यासाठी माती मुख्य कारण आहे. जमिनीत असंख्य तृण उगवतात त्याचे मूळ कारण बी आहे, त्याचप्रमाणे ज्ञानावरणीय इत्यादी आठ कर्मांची उत्पत्ती आणि त्याचा विस्तार याचे मुख्य कारण 'मिथ्यात्व' म्हटले आहे. ते आस्रव पाच आहेत. त्याद्वारे

आत्मप्रदेशात कर्माचे आगमन होते. त्यात प्रथम क्रमांक आहे मिथ्यात्वाचा.[२५६]

मिथ्यात्वाचे स्थान प्रमुख आहे. जिथे मिथ्यात्व असेल तिथे अविरती इत्यादी पुढील चार कारण असणारच. परंतु अविरती, प्रमाद वगैरे पुढील आस्रवात मागचे आस्रव असूही शकतात किंवा नसूही शकतात. पण पुढील अवश्य असतातच. अन्य ग्रंथकारांनी मिथ्यात्वाचे पाच भेद फक्त घेतले आहेत. पं. रत्नचन्द्रजी महाराजांनी आगम अनुसार पंचवीस भेद घेतले आहेत. ते खालील प्रमाणे आहेत.

१) **अभिग्रहिक मिथ्यात्व** - खोट्या पक्षाला समजून किंवा न समजून हट्टाने धारण करणे, कुदेव, कुगुरू आणि कुधर्मा प्रती कदाग्रह ठेवणे, आणि म्हणायचे की हे तर आम्ही कधीच सोडणार नाही आमचा हा पिढीजात धर्म आहे. असा हठाग्रह करणे म्हणजे अभिग्रहिक मिथ्यात्व होय.

२) **अनभिग्रह मिथ्यात्व** - गुण-अवगुण जाणल्याशिवाय असत्याला सत्य समान मानणे, सत्य काय असत्य काय याचा निर्णय करायचा नाही. असे हे अनभिग्रह मिथ्यात्व होय.

३) **अभिनिवेशिक मिथ्यात्व** - स्वतःची गोष्ट सत्य सिद्ध करण्यासाठी सूत्राचे अर्थ उलटसुलट लावून कुयुक्तिचा उपयोग करणे.

४) **संशयिक मिथ्यात्व** - जिन वचनात शंका झाली तर शंकानिरसन करण्यात कमीपणा वाटणे. आपली इज्जत जाईल या भीतीने संशय तसाच मनात ठेवणे. त्याचे समाधान मिळविण्याचा प्रयत्न न करणे हे संशयिक मिथ्यात्व होय. अशा संशयात राहिल्याने मानव सम्यक्त्वापासून विमुख होतो.

५) **अनाभोग मिथ्यात्व** - एकान्त जड आणि मूढ अवस्था. नशेमध्ये बेभान झालेल्या माणसासारखी अवस्था, कुठलाही सारासार विचार नाही जीवाजीव, पुण्य-पाप याचे कोणतेही ज्ञान नाही.

६) **लौकिक मिथ्यात्व** - लौकिक पर्व, लौकिक तीर्थ, लौकिक देवी-देवता यात विश्वास ठेवणे.

७) **लोकोत्तर मिथ्यात्व** - लोकोत्तर 'मोक्ष मार्गाचे दाता' देव, गुरू धर्म यांचे नवस बोलणे, भौतिक सुखाच्या लालसेने तप जप इत्यादी करणे.

८) **कुप्रावचन मिथ्यात्व** - पाखंडी शास्त्रांना मानणे.

९) जिनमार्गाहून न्यून सांगणे मिथ्यात्व - वीतराग भगवतांनी जो मार्ग दाखवला त्याला न्यून (तुच्छ) मानणे.

१०) जिनमार्गापेक्षा अधिक सांगणे (प्ररुपणा करणे) मिथ्यात्व - अर्थात जिनेश्वर भगवनांनी जितके व जसे सांगितले आहे ह्यात अधिक मनाचे जोडून सांगणे म्हणजे मिथ्यात्व.

११) जिनमार्गाच्या विपरीत प्ररूपणा केली तर मिथ्यात्व.

१२) धर्माला अधर्म मानले तर मिथ्यात्व.

१३) अधर्माला धर्म मानणे मिथ्यात्व.

१४) जीवाला अजीव मानणे मिथ्यात्व.

१५) अजीवाला जीव मानले तर मिथ्यात्व.

१६) जिनमार्गाशिवाय अन्य मार्ग स्वीकारणे मिथ्यात्व.

१७) अन्यमार्गाला जिनमार्ग मानणे मिथ्यात्व.

१८) साधूला कुसाधू मानणे - मिथ्यात्व.

१९) कुसाधूला साधू मानणे - मिथ्यात्व.

२०) मुक्तजीवांना अमुक्त मानणे - मिथ्यात्व.

२१) अमुक्तजीवांना मुक्त मानणे - मिथ्यात्व.

२२) अविनय मिथ्यात्व - विनय करण्यास योग्य असलेल्यांचा विनय न करणे.

२३) अक्रिया मिथ्यात्व - करण्यायोग्य क्रिया न करणे आणि न करण्यायोग्य क्रिया करणे. दुष्ट क्रिया करणे.

२४) अज्ञान मिथ्यात्व - ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्नच करायचा नाही. अज्ञानातच सुख मानायचे.

२५) अशातना मिथ्यात्व - गुरू इत्यादींचा अपमान (आशातना) करणे. आध्यात्मिक दृष्टीने पाहिल्यास मिथ्यात्व सर्वाधिक निम्नस्तराची दशा आहे. कारण की मिथ्यात्व अवस्थेत जीवाला स्वस्वरूपाचे ज्ञानच नसते.

अविरती अव्रत

अव्रत आस्रवाचा दुसरा भेद आहे. ज्याप्रमाणे आजोबा, पणजोबांनी कमवलेली

संपत्ती त्यांच्या मुलांना त्यांच्या नातवंडांना मिळते. ज्यांनी आपल्या आजोबा पणजोबांना पाहिलेली नाही तरी बारसाहक्काने ती संपत्ती त्यांना मिळते. अगदी त्याचप्रमाणे प्रारंभी अनंत जन्मात या जीवाने पापकर्मे करण्याची साधने तयार करून आला, त्या कर्माशी अजून प्रत्यक्ष संबंध आला नाही तरी पण जोपर्यंत अशा पाप-स्थानांचा मन, वचन, काया या तीन योगाने त्याग केला नाही आणि अव्रताला अवरुद्ध करून व्रतधारण केले नाही तर तोपर्यंत पूर्वी अनंत काळात केलेल्या पापकर्माचा सूक्ष्म प्रवाह अविरतीद्वारे जीवाला वारसा रूपाने मिळत राहतो.

उदाहरणार्थ कोण्या एका जीवाने, जीवांची हत्या करण्याची साधने पूर्वजन्मात जमविली. त्याच्या मृत्यूनंतरही त्याच साधनांचा उपयोग जीवहत्या करण्यात केला जात राहिला जसे तलवार वगैरे तयार करणारा कुठल्या दुसऱ्या योनीत जन्मला त्याला त्या हत्यारासंबंधी ह्या जन्मात काहीही माहित नाही. आठवण नाही. कारण गत जन्माची या जन्मात कोणतीच स्मृती नसतेच. तरीही ती शस्त्रे त्याने मागच्या कुठल्यातरी जन्मात निर्माण केली होती. त्या हत्यारांचा उपयोग पुढे कोणी तरी करीतच राहिले. त्या हत्यारांचा उपयोग करून जेवढी जीव हिंसा होत राहिली त्या सर्वांच्या पापाचा भागीदार तो निर्माण कर्ता जीव जिथे कुठे असेल तिथे त्याला ते पाप लागते. कारण त्याच्या मनातून त्या हत्यारांचा संबंध तुटला नाही. जोपर्यंत शस्त्रे वापरली जातील तोपर्यंत हिंसा होत राहील, तोपर्यंत पापाचा भागीदार मुख्य बनवणाऱ्याला व्हावे लागेल. याप्रमाणे अनंत जन्माचा नियोजित पापाचा सूक्ष्म प्रवाह आत्म्यात प्रवेश करीत असतो म्हणूनच अविरतीला अवरुद्ध करणारे जी व्रते आहेत त्यांचा स्वीकार करायला हवा.

अविरती (अव्रत) चे बारा प्रकार आहेत.

१) श्रोत्रेन्द्रिय अविरति - कानाचे अशुभ विषयापासून निवृत्त न होणे. (२) चक्षुन्द्रिय - डोळे (३) घ्राणेन्द्रिय - नाक, (४) रसनेन्द्रिय जीभ (५) स्पर्शेन्द्रिय - स्पर्श या पांचांच्या अशुभ विषयापासून निवृत्त न होणे. (६) मन अविरति - विषयात भटकणाऱ्या मनाला न रोकणे. (७) पृथ्वीकाय - पृथ्वीचे जीव, (८) अपकाय - पाण्याचे जीव, (९) तेऊकाय - अग्नीचे जीव, (१०) वाऊकाय - हवेचे जीव (११) वनस्पतिकाय - वनस्पतिचे जीव (१२) त्रसकाय- बेइन्द्रिय तेइन्द्रिय, चउरिन्द्रिय आणि पंचेन्द्रिय जीवांचे रक्षण न करणे.

मनुष्य पाच इन्द्रिय, आणि सहावे मन यांच्या पोषणासाठी, व्रत, मर्यादा

प्रत्याख्यान (व्रत) करीत नाही, व पृथ्वी इ. षष्टकाय संबंधी आरम्भ समारम्भ करतो ही अव्रतीची अवस्था आहे. व्रत नियम, प्रतिबंध जो पर्यंत केले जात नाहीत तो पर्यंत निरन्तर कर्मबंध होत राहतात.

चिंतनातून असे स्पष्ट प्रतीत होते की भोजन, आभूषण, वस्त्र, घर इत्यादी सामग्री मिळविण्यासाठी किती पापांचे पूंज गोळा करावे लागतात. ह्या पापांच्या पुंजाचा विचार करताना हृदय रोमांचित होते. विचारांच्या प्रवाहाने मस्तक चक्रावून जाते की हा संसार किती भयंकर पापांनी भरलेला आहे. सांसारिक प्रत्येक कार्यात जुलूम निर्दयता दिसून येते. सांसारिक कित्येक पाप ज्ञात अवस्थेत आहेत तर कित्येक महाघोर पाप आपल्या अज्ञात अवस्थेत उत्पन्न होत आहेत. आपण मर्यादित म्हणजे व्रत प्रत्याख्यानात नसल्यामुळे त्या सर्व पापक्रिया आत्म्यात येत राहतात. ज्याप्रमाणे घराचे दार जर बंद केले नसेल तर उघड्या दारातून धूळ, कचरा येतच राहिल मग आपली इच्छा असो वा नसो, दार उघडे आहे मग धूळ कचरा येण्यास आपण प्रतिबंध कसे करणार ? त्याचप्रमाणे आत्म्याचा दरवाजा व्रत, नियम, प्रत्याख्यान याने बंद केला नाही तर कर्मरूपी कचरा आत प्रवेश करीतच राहणार. पापसमूह आत्म्याकडे आकर्षित होतच राहणार. म्हणून मुमुक्षुजीवांनी चिंतनशील बनावे व अव्रतापासून दूर रहावे.

पाच प्रमाद

मैद - विसय - कसाय - निद्रा, विकहा या पंचमा भणिया ।
एए पंच पमाया, जीवा पाडंति संसारे ॥

मद, विषय, कषाय, निद्रा, विकथा हे पाच प्रकारचे प्रमाद आहेत. हेच जीवाला संसारात बुडवत राहतात. ज्याप्रमाणे खिडकीतून हवा घरात येते. नाल्याचे पाणी तलावात येते, घशाच्या द्वारे अन्न पाणी जठरात जाते, त्याचप्रमाणे मद, विषय, कषाय, निद्रा आणि विकथा रूपी प्रमादांच्या द्वारे कर्माचा प्रवाह निरंतर आत्म्यात येत राहतो. कर्मांना आत्म्यात प्रवेश करू द्यायचा नसेल तर मुमुक्षुजीवांनी प्रमादाचे द्वार बंद करायला पाहिजे.

१) मद - जाती, कुळ, बळ, रूप, शास्त्र (ज्ञान) लाभ तप आणि ऐश्वर्य या आठांचे स्वामित्व प्राप्त होताच अहंकार, मद यात वृद्धी होते. वरील आठ गुणांचा उपयोग संयम, व्रत, परोपकार इ. शुभ कार्यात न केल्यामुळे अहंकार पोसला जातो, परिणामस्वरूप दुर्गतीची प्राप्ती होते. अभिमान बाळगणाऱ्या व्यक्तीस आपल्यातील अगदी सामान्य गुण सुद्धा मेरूपर्वताएवढा भासतो. व दुसऱ्यांच्या महान गुणांना तसेच आपल्यातील दुर्गुणांना

मोहरीच्या दाण्याइतके कमी समजतो. अशा विचारप्रवृत्तीमुळे त्याचा उद्धार होत नाही. मद, अहंकार, अभिमान, सर्व दुर्गुणांची खाण आहे. म्हणूनच मद आणि मदिरा एका जातीचे मानले जातात.

२) **विषय** - शब्द, रूप, गंध, रस व स्पर्श या पाच इन्द्रियांच्या विषयात मशगूल होणे.

यांचा उपयोग जर गुणी लोकांचे गुणगाण करण्यात, संतदर्शन, तप, इत्यादी सत्कार्यात न लावता वीभत्स शब्दोच्चारण, रूप अवलोकन गंध, ग्रहण, अभक्ष्य भक्षण आणि भोग-विलासासाठी केला तर त्याचा जन्मच वाया गेला. लोक-परलोक दोन्हीमध्ये भयंकर दुःखाशिवाय काही मिळणार नाही. म्हणूनच तर विषयाला विष म्हटले आहे.

३) **कषाय** - प्रमादातच कषायाचा अन्तर्भाव केला आहे. आस्रवाचे मुख्य पाच द्वार, त्यात सुद्धा कषाय आहेच. म्हणून इथे संक्षिप्त मध्य इतकेच सांगते की रागद्वेषाच्या उन्मादात उन्मत्त होणे म्हणजे कषाय आहे. कषायचे विस्तृत वर्णन अशुभ भावनेच्या प्रकरणातच झाले आहे.

४) **निंदा किंवा निद्रा** - प्राकृत शब्द ''निद्दा''चा निंद्रा आणि निंदा दोन्ही अर्थ घेऊन विवेचन केले जाते. पं. रत्नचंद्रजी महाराजांनी निद्रेचा अर्थ आळस, सुस्त पडून राहणे केला आहे. हा सुद्धा प्रमाद आहे.

शास्त्रोद्धारक पूज्य अमोलकऋषीजी महाराजांनी निद्रा आणि निंदा दोन्ही प्रमादाचे कारण म्हटले आहे. म्हणून दोन्ही अर्थ घेऊ शकतो.

दशवैकालिक सूत्रात ''पिट्ठिमंसं न खाइज्जा ।'' अर्थात कोणाची ही त्याच्या अनुपस्थित निंदा करू नये. अशा प्रकारची निंदा करणे म्हणजे मांस भक्षण करण्यासारखे आहे. निंदा करणारा त्या व्यक्तीमध्ये असलेल्या अन्य गुणांना झाकण्याचा प्रयत्न करतो. दोष नसताना त्याच्यात दोषारोपण करतो. भोळ-भाबड्या लोकांची कोणाबद्दल भक्ती असेल तर आपल्या कुतर्कने खोटी सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो. पूज्य अमोलकऋषीजी म. नी. निंदा वर सवैया केली त्यात स्पष्ट शब्दात लिहितात -

नरक निगोद भमे निंदा का करणहार,
चंडाल समान जिसकी संगति नहीं काम की ।
आप की बडाई, पर हानि में मगन मूढ ।

ताकता पराये छिद्र नीति है हरामकी ॥
पर की निंदा सुन कान खुशी नहीं होना कभी ।
पीछे से करेगा जर, बदी तेरे नाम की ।
तिलोक कहत निंदक । तेरे माहे दोष है,
यहाँ से पर जाय आगे, गति यम धाम की ।[२५७]

दुसऱ्यांचे दोष पाहून त्यांना अपराधी घोषित करतात. अशाप्रकारच्या व्यवहाराने स्वतःचे मन मलिन करतात व अशा भावनेमुळे असे संस्कार निंदकाच्या मनावर होतात की काही काळातच तो स्वतः त्या दोषांनी ग्रासला जातो. परिणामस्वरूप या पापपंकात रुतला जातो. दुसऱ्यांना सुधारण्याच्या भ्रमात स्वतःच निंदनीय आणि धिक्काराला पात्र बनतो.

निंदा करण्याचा स्वभाव असलेली व्यक्ती हळूहळू फार वाईट बनत जातो. एक लौकिक दृष्टांत आहे - एका राजाने एक रत्नजडित सुन्दर, मनोहर महल बांधला. तो महाल पाहण्यासाठी अनेक लोक आले. सर्वांनी त्याची खूप प्रशंसा केली. परंतु एक चांडालाने त्या महालाच्या चारी बाजूने पाहिल्यानंतर म्हणाला, की या महालात संडास तर बांधलेच नाही. अशाच प्रकारची निंदकाची नेहमी नीच बुद्धी असते. दोषदृष्टी असणाऱ्याला चांगले कधी दिसतच नाही. सद्गुण पाहण्याऐवजी फक्त दुर्गुणच पाहतो.

निंदा करणाऱ्याने विचार करायला पाहिजे की माझ्यात कोणताच दोष नाही का ? एक ही अवगुण नाही का ? मी सर्वगुणसंपन्न आहे काय ? महत्त्वाची गोष्ट अशी की निंदकाच्या मनात निंदा करणे हा दुर्गुण घर करून बसलेला असतो, यावरून सहज स्पष्ट होते की निंदक स्वतः निंदेचे पात्र आहे.

४) निद्रा - निंदेप्रमाणे निद्रासुद्धा सत्कार्यात विघ्न निर्माण करणारा महान शत्रू आहे. धर्मकार्यातसुद्धा या निद्रारूपी प्रमादामुळे इहलोक व परलोक दोन्ही भव दुःखमय बनतात.

५) विकथा - निरर्थक आणि पापकारी गोष्टीत व्यर्थ वेळ घालविणे म्हणजे विकथा होय. विकथा चार प्रकारच्या आहेत - देशकथा (२) राजकथा (३) स्त्रीकथा (४) भोजनकथा - अशा कथा-वार्ता मध्ये मनुष्य आपला अमूल्य वेळ, आपले किंमती जीवन पूर्ण करतो. हा आपल्या जीवनावर अन्यायच नाही का ?

हे पाच प्रमाद फारच दुर्गतिदायक आहेत. श्री भगवतीसूत्राच्या आठव्या शतकात वर्णन आहे की चार ज्ञान ज्यांना प्राप्त झालेले आहेत जे चौदापूर्वधारी आहेत, आहारकलब्धी ज्यांना प्राप्त झालली आहे, असे मुनिराज जर या पाच प्रमादांच्या फेऱ्यात अडकले तर आयुष्य पूर्ण झाल्यानंतर अधोगतीलाच पोहोचतात. असे हे प्रमाद जे जीवन नष्ट करण्यास कारणीभूत आहेत. अशा दुष्ट प्रमादाच्या स्थितीला जाणूनच परमपिता प्रभू महावीरांनी स्पष्ट आदेश दिला आहे की एक समयमात्राचा प्रमाद करू नका. प्रमादपूर्णचर्या मनाची कलुषता, विषयांच्या प्रति लोलुपता. पर परिताप (परपीडा) आणि निंदा यांच्यामुळे पाप आस्रवांचे आगमन होते.[२५८] कर्मबंध होण्याचे मूळ कारण प्रमाद आहे.[२५९] म्हणून सतत अप्रमत भावनेने साधनेत प्रयत्नशील रहावे.[२६०] जीवनाचा धागा तुटला तर पुन्हा जोडला जात नाही. ते असंस्कृत आहे म्हणून प्रमाद करू नये.[२६१]

प्रमादी माणूस धनानेसुद्धा आपली रक्षा करू शकत नाही.[२६२] साधकाने नेहमी भारण्ड पक्ष्याप्रमाणे अप्रमत्त राहून विचरण करायला पाहिजे. प्रबुद्ध साधक झोपलेल्यांच्यामध्ये सुद्धा नेहमी जागृत, अप्रमत्त असतात.[२६३]

श्रमण भगवान महावीरांनी ठिकठिकाणी साधकाला अप्रमत्त राहण्याचा संदेश दिला आहे. उत्तराध्ययन सूत्रात अनेक ठिकाणी सूत्र रूपात वर्णन आले आहे. त्याचबरोबर दहाव्या अध्यायात गणधर गौतमस्वामींना उद्देश्यून छत्तीसवेळा म्हटले आहे. ''समयं गोयम् मा पमायए'' कारण प्रमादच मृत्यूच्या मार्ग आहे. जो माणूस आळशी व प्रमादी आहे, त्याची प्रज्ञा (बुद्धी) ही वाढत नाही आणि त्याचे श्रुत (शास्त्रज्ञान) ही वाढत नाही.

जी व्यक्ती प्रमादी आहे, कोणत्याही प्रकाराने त्याच्या हातून प्राण्याची हत्या झाली तर निश्चित तो त्यांचा हिंसक ठरतो. परंतु जे प्राणी मेले नाहीत तरी ही प्रमादी त्यांचा ही हिंसक ठरतो. कारण त्याच्या अंतःकरणात सर्वतोभावन हिंसक वृत्ती आहे. तो पापात्मा आहे. (ओधनिर्युक्ती गाथा ७५२-७५३)

जर माणसाने विचार केला की आज दिवसभर माझ्या हातून कोणकोणत्या चुका घडल्या, त्या चुकांना पुनश्च न करण्याचा प्रयत्न केला तर प्रमाद दूर होऊ शकतो.

धर्म न करणे हे योग्य नाही आणि धर्म करून अभिमान करणे तर मुळीच योग्य नाही. संसारात केल्या जाणाऱ्या कामातसुद्धा पात्रता लागते. स्त्रिया घरातील कामे करतात त्यात ही योग्यता लागते. एखादी स्त्री पोळ्या करते तेव्हा तळ्यावरती पोळी जळूही देत नाही अन कच्चीही ठेवत नाही. त्याप्रमाणे अप्रमत्त राहून तप करणे चांगले आहे. तप

करून अभिमान करणे कदापि योग्य नाही.

आळस माणसाचा सर्वात मोठा शत्रू आहे. आळशी माणूस जिवंत असूनही मेल्यासारखा आहे. आळस नरकाचे द्वार आहे.

पंचवीस कषाय - चोरी करणारे चोर रात्रीच्या वेळी जेव्हा सगळीकडे सामसूम झालेली असते, तेव्हा चोरी करतात आणि श्रीमंतांच्या घरी डाका घालतात. जिथेही कमीत कमी माणसे असतील. परंतु कषायरूपी चोर तर रात्र असो की दिवस, जंगलात असो की शहरात निर्भयपूर्वक तीव्र रस असणारे अशुभकर्मरूपी शस्त्र फेकून आत्म्याची संपत्ती ज्ञान, दर्शन, चारित्ररूपी संपत्ती लुटतात. म्हणून कषायरूपी चोरापासून सावध राहिले पाहिजे. कषायाच्या प्रकारांचे वर्णन चौथ्या प्रकरणात अशुभभावनेत झाले आहे. म्हणून इथे विस्तार न करता मात्र कषायाचा उल्लेख केला आहे.

पंचवीस कषायांच्या संयोगाने कर्मात अनुभाग शक्ती आणि स्थिती शक्ती निर्माण होत असते. म्हणून कषायरूपी आस्रवद्वार बंद ठेवण्यासाठी क्षमा, मृदुता, सरलता आणि संतोष यांचा किल्ला मजबूत बांधला पाहिजे. ज्या योगे कषायांना पराजित करू शकू.

पंधरा योग

मन, वचन कायाच्या प्रवृत्तींना योग म्हणतात. नदीच्या उगमाशी मुसळधार पाऊस पडत असेल अशावेळी नदीच्या प्रवाहाला थांबवणे शक्य नाही. त्याचप्रमाणे आपली व्यावहारिक प्रवृत्ती जेव्हा चालते त्यावेळी चित्तवृत्तींना थांबवणे फार कठीण होते. त्याचप्रमाणे जोपर्यंत मन, वचन, काया यांच्या दुष्ट योगांच्या प्रवृत्ती चालतात तोपर्यंत कर्माची निवृत्ती होऊ शकत नाही.

आत्म्याशी कर्माचा संयोग होणे म्हणजे आत्मा कर्माशी ज्यामुळे जोडतो त्याला योग म्हणतात. ती प्रवृत्ती मन, वचन, काया यांच्याद्वारे घडते. या तिघांचा प्रवाह प्रचंड प्रमाणात चालत असतो, तेव्हा ते दंड रूपात मानले जातात. दंड तीन प्रकारचे आहेत. मनदंड, वचनदंड, कायादंड, गुन्हेगार गुन्ह्यामुळे दंडित होतो. तसेच आत्मासुद्धा मन, वचन, काया यांच्या दुष्ट प्रवृत्तीमुळे दंडित होतो. म्हणून दुष्ट योगांना दंडरूप म्हटलेले आहे. जेव्हा मन, वचन कायेचा प्रवाह ज्येष्ठ महिन्यात संथ वाहणाऱ्या नदीप्रमाणे मंद होतो, तेव्हा योगाच्या स्थानी गुप्तीची निष्पत्ती होते. गुप्ती तीन प्रकारच्या आहेत- मनगुप्ती, वचनगुप्ती, कायगुप्ती.

सामान्य जीव योगाला सर्वथा अवरुद्ध करू शकत नाही. कारण केवलज्ञानाच्या

प्राप्तीनंतरसुद्धा तेराव्या गुणस्थानात योग असतातच. चौदाव्या गुणस्थानात अयोग अवस्था प्राप्त होते. तेव्हाच सर्वथा कर्मबंध अवरुद्ध होतात.

वचन आणि काययोगापेक्षा मनोयोगाचे बल फार अधिक आहे. मनाने अगदी थोड्या क्षणात खूप जास्त प्रमाणात कर्म बांधली जातात, त्याचप्रमाणे ते सुटूही शकतात.

तुंदुलियामत्स मगरीमत्सच्या डोळ्यांच्या पापणीवर जन्मतो. तंदुल म्हणजे तांदुळ, तांदुळाच्या दाण्याइतके लहान त्याचे शरीर असते. केवळ एक अंतमुहुर्त त्याचे आयुष्य असते, तो वचन आणि कायाची प्रवृत्ती तर करीत नाही. फक्त मनात हिंसेचा विचार करतो, की मगरीच्या इतका जर मी मोठा असतो तर मगरीच्या पोटात जाणाऱ्या जीवांपैकी एकालाही परत बाहेर जाऊ दिले नसते. खाऊन फस्त करून टाकले असते. परंतु ही मगर किती मूर्ख आहे. तोंडात जाणाऱ्या कित्येक माशांना, जलजंतूंना पाण्याबरोबर परत बाहेर टाकते. तंदुलिया मत्सने फक्त मनाने असे वाईट हिंसात्मक विचार केला. दुष्ट मानसिकताच्या चिंतनाने आपल्या एक मुहुर्ताचे आयुष्य पूर्ण करून तो सातव्या नरकात तेहतीस सागरोपमचे आयुष्य प्राप्त करतो.

प्रसन्नचंद्र राजाचे उदाहरण आपण अगोदर पाहिले आहे. त्यांच्यात एका तासात किती परिवर्तन झाले. हे सर्व मनातील वैचारिक परिवर्तनामुळेच. मनानेच खरे जास्त कर्मबंध होतात म्हणून मनाच्या दूषणांना प्रथम दूर करण्याचा पुरुषार्थ करायला पाहिजे. हे काम अतिशय कठीण आहे, तरी अशक्य नाही. ''अभ्यास वैराग्याभ्यां तन्निरोधः'' योगशास्त्रात महर्षी पंतजली म्हणतात, अभ्यास आणि वैराग्याने चित्तवृत्तीचा निरोध होऊ शकतो.

आस्रवांवर विजय मिळवायचा असेल तर दृढ प्रयत्नाने मन निग्रह करण्याचा पुरुषार्थ करून वचन व कायाची प्रवृत्ती सुधारून क्रमशः आस्रवांचा निरोध केला पाहिजे.

तसे मन, वचन, कायाचे तीन योग आहेत. परंतु विस्तृतरूपाने योग पंधरा आहेत. हे विवेचन समजून घेतले तर सूक्ष्मातिसूक्ष्म आस्रवांचा निरोध करण्यात मदत मिळेल. म्हणून येथे पंधरा योगांचा उल्लेख करणे योग्य होईल. त्यांचे विवेचन शतावधानी श्री रत्नचन्द्रजी महाराजांनी केले आहे.

१) सत्य मनयोग - सत्य विषयी मानसिक प्रवृत्ती.

२) असत्य मनयोग - असत्याविषयी मानसिक प्रवृत्ती.

३) मिश्र मनयोग - थोडी सत्य, थोडी असत्य मानसिक प्रवृत्ती.

४) व्यवहार मनयोग - व्यवहारिक मानसिक प्रवृत्ती सत्यही नाही. असत्य ही नाही, दोन्ही पासून रहित असे व्यवहार मनयोग आहे. उदा. आपण कोण्या गावाला जायला निघालो. गाव दिसू लागले तर आपण विचार करतो 'गाव आले' ही व्यवहारीकता आहे. तेल व दिवा तेवत असतो आणि म्हणतो दिवा जळत आहे. हे व्यावहारीक रूप झाले.

५) सत्य वचनयोग - सत्य बोलणे.

६) असत्य वचनयोग - असत्य वचन बोलणे.

७) मिश्र वचनयोग - थोडे सत्य, थोडे असत्य. 'नरो वा कुंजरो वा' प्रमाणे मिश्र वचन बोलणे.

८) व्यवहार वचनयोग - व्यावहारीक भाषा बोलणे. उदा. गाव आले, गाव येत नसते. परंतु व्यवहारात असे बोलले जाते.

९) औदारिक काययोग - सात धातूंनी बनलेले असते त्यास औदारिक काय म्हणतात. असे शरीर मनुष्य, तिर्यंच गतीतील जीवांचे असते.

१०) औदारिक मिश्र काययोग - औदारीक शरीराच्या उत्पत्तीच्या वेळी आणि उत्तर वैक्रियच्या वेळी जी मिश्र स्थिती होते ते औदारिक मिश्र काय योग होय.

११) वैक्रिय काययोग - वैक्रिय शरीर देव व नारकीय जीवांचे असते. शुभाशुभ पुद्गलांनी निर्मित शरीर प्रवृत्ती.

१२) वैक्रिय मिश्र काययोग - वैक्रिय शरीर उत्पत्ती समय अथवा उत्तर वैक्रिय करतो त्यावेळची विशेष शारीरिक प्रवृत्ती.

१३) आहारक काययोग - पूर्वधारी मुनींना जर कोणती शंका निर्माण झाली तर आत्मप्रदेशांच्या द्वारे केली जाणारी विशेष प्रक्रिया.

१४) आहारक मिश्र काययोग - आत्म प्रदेशासंबंधी प्रक्रियांना एकत्रित करून पुन्हा आत्मस्थ करतानाची विशेष शारीरिक प्रक्रिया.

१५) कार्मण काययोग - आत्म प्रदेशाबरोबर संबंधित कर्म प्रदेशांची विशेष स्थिती.

हे पंधरा प्रकारचे योग कर्मांना आकर्षित करतात.[२६५] आस्रव भावनांचे ८२ प्रकारांचे वर्णन दुसऱ्या कित्येक आचार्यांनी केले. त्यात पुष्कळशा प्रकारांचे वर्णन येते. परंतु आस्रवांच्या ४२ भेदांमध्ये ज्या २५ क्रियांचे वर्णन आले आहे, त्यांचे संक्षेपात

विवेचन करू या. क्रियांचे दोन प्रकार आहेत.

१) ईर्यापथिक क्रिया - जी एकाच प्रकारची आहे.

२) सांपरायिक क्रिया - याचे २५ प्रकार आहेत.[२६६]

पंचवीस क्रिया

१) कायिक क्रिया - दुष्ट भावनेने अयतनापूर्वक कायेची प्रवृत्ती करणे.

२) अधिकरणी की क्रिया - हिंसाकारी साधनांचा उपयोग करणे. असे करण्याने ही क्रिया लागते.

३) प्राद्वेषिक क्रिया - क्रोधाच्या आवेशात होणारी क्रिया. ईर्षा, द्वेष करण्याने, मत्सरभाव केल्याने, दुसऱ्यांचे वाईट व्हावे अशी भावना केल्याने, दुसऱ्यांचे दुःख पाहून खुश होण्याने ही क्रिया लागते.

४) पारितापनिकी क्रिया - प्राण्यांना पीडा देणे, सतावणे, मारणे, त्रास देणे.

५) प्राणतिपातिकी क्रिया - प्राण्यांच्या असलेल्या दहा पैकी कोणत्याही एकाही प्राणाचे हनन केल्याने क्रिया लागते. दहा प्राण - पाच इन्द्रिये, तीन योग, श्वासोश्वास व आयुष्य.

६) आरंभिक क्रिया - कापणे मारणे व घात करण्याच्या क्रियेत स्वतः मशगुल राहणे. सहाकाय जीवांचा आरंभ करणे. आणि इतर लोकात अशी प्रवृत्ती पाहून प्रसन्न होणे.

७) परिग्रहीकी क्रिया - परिग्रह, संग्रह करण्यात व त्याची रक्षा करण्यासाठी केली जाणारी क्रिया.

८) माया क्रिया (माया प्रत्यया क्रिया) कपट केल्यामुळे लागणारी क्रिया. ज्ञान, दर्शन इ. विषयात दुसऱ्यांना ठगणे.

९) मिथ्यादर्शन क्रिया - कुदेव, कुगुरू, कुधर्मात श्रद्धा ठेवणे. आणि तशी श्रद्धा ठेवणाऱ्यांची प्रशंसा करण्याने ही क्रिया लागते.

१०) अप्रत्याख्यान क्रिया - संयमाचा घात करणारे कर्माच्या प्रभावामुळे पापयुक्त व्यापारापासून निवृत्त न होणे.

११) दृष्टी क्रिया - कोणत्याही वस्तूकडे पाहिल्यामुळे राग-द्वेषयुक्त परिणाममुळे लागणारी क्रिया.

१२) स्पष्टी क्रिया - राग द्वेषाने कोणत्याही वस्तूला स्पर्श करण्यामुळे लागणारी क्रिया.

१३) पाडुचिया (प्रतीत्यिकी) क्रिया - जीव व अजीव या बाह्य वस्तूच्या निमित्ताने जे राग द्वेष निर्माण होतात. त्यामुळे लागणारी क्रिया.

१४) सामन्तोपनिपातिकी क्रिया - जीव व अजीव वस्तूचे जे संग्रह केले आहे. त्या संग्रहाला पाहून लोकांनी प्रशंसा करावी. प्रशंसा ऐकून आनंदित व्हावे असे केल्याने ही क्रिया लागते.

सामन्तोपनिपातिकी क्रियेचे बरेच अर्थ केले गेले आहेत. रस्त्यावर कुठेही मलमूत्र विसर्जन करणे. थुंकणे अशाप्रकारे येणाऱ्या जाण्याच्या रस्त्यावर घाण करणे किंवा तेला-तुपाची भांडी उघडी ठेवणे. झाकण न ठेवण्याने त्यात जीवजंतू पडतात त्याचा दोष लागतो.

१५) स्वहस्तिकी क्रिया - एक-दुसऱ्यात भांडण लावून देण्यामुळे लागणारी क्रिया. आपण स्वतः कोणत्याही जीवाला मारणे किंवा कुणाकडून मार देणे.

१६) नैसृष्टिकी क्रिया - कोणत्याही वस्तूला अव्यवस्थितपणे ठेवणे किंवा फेकणे यामुळे लागणारी क्रिया. उदा. ढेकूण, उवा यांना मारणे किंवा उंचावरून फेकणे. बाण, लाकूड, लाकडी इ. वस्तूंना फेकण्यामुळे लागणारी क्रिया.

१७) आज्ञापनिका - इतर कुणाला आज्ञा देऊन क्रिया करवून घेणे. किंवा तीर्थंकराच्या आज्ञेविरुद्ध उपदेश, कथन करण्याने ही क्रिया लागते.

१८) वैदारणिका क्रिया - जीव किंवा अजीव वस्तूंची तोड-फोड चिरफाड करण्याने लागणारी क्रिया.

१९) अनाभोग प्रत्यया क्रिया - असावधनतेने, उपयोग शून्यतामुळे होणारी क्रिया. वस्त्र-पात्र इ. घेणे, ठेवणे किंवा प्रतिलेखन असावधानतेने केल्यामुळे लागणारी क्रिया.

२०) अनवकांक्षप्रत्यया क्रिया - हिताहिताची उपेक्षा केल्यामुळे लागणारी क्रिया अथवा धूर्तताच्या आश्रयाने इहलोक परलोकाची पर्वा न केल्यामुळे दोन्ही लोक बिगडणे. धर्माच्या विरुद्ध काम करण्याने ही क्रिया लागते.

२१) प्रेमप्रत्यया क्रिया - प्रेमभावनेमुळे लागणारी क्रिया. ही क्रिया मायाचार आणि लोभ केल्यामुळे लागते.

२२) द्वेष प्रत्यया क्रिया - द्वेषभावनेमुळे लागणारी क्रिया. ही क्रिया क्रोध केल्याने

आणि मान (अहं) केल्यामुळे लागते.

२३) प्रयोग क्रिया अथवा प्रायोगिक क्रिया - मन, वचन, काया यांच्या दुष्प्रयोगाने अशुभ प्रयोग करण्याने लागणारी क्रिया.

२४) सामुदानिकी क्रिया - पुष्कळसे लोक एकत्रित होऊन एकाच प्रकारची क्रिया करण्याने चांगले-वाईट दृश्य एकत्रितपणे पाहण्याने. आरंभ समारंभाचे कार्य एकत्र मिळून केल्याने सामुदानिकी क्रिया लागते.

२५) ईर्यावहिया क्रिया (ईर्यापथिकी क्रिया) जाण्यायेण्याची (गमनागमन) क्रिया म्हणजे ईर्यावहिया होय. ह्या क्रियेला ईर्यापथ क्रिया पण म्हणतात. ही छद्मस्थ अकषायी साधूंना तथा सयोगी केवली अरिहंताना लागणारी क्रिया. इर्यापथिकी क्रिया वीतरागी अकराव्या, बाराव्या, तेराव्या गुणस्थानवाल्या माणसालाच असते.

वरील पंचवीस क्रिया या कर्मबंधाच्या कारण आहेत. म्हणून सम्यकदृष्टी जीवांनी यांच्यापासून दूर राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.[२६७]

जिथे-जिथे आस्रव आहे तिथे तिथे बंध आहे. आणि त्यामुळेच संसाराचा प्रवाहसुद्धा गतिशील राहतो. कारण जोपर्यंत आस्रव कर्म आगमनाचे दार बंद होत नाही तोपर्यंत कर्माचे बंधन होतच राहते. आणि कर्माचे बंधन चालू राहणे म्हणजेच संसार होय.

आस्रव भावनेत साधकाने असे चिंतन करावे की संसारात उत्थान व पतन जे काही होत आहे ते व्यक्तीने स्वतःच बांधलेल्या कर्मानुसार होते. राग-द्वेषाच्या परिणतीमुळे आत्मा आस्रवद्वारा संग्रहित कर्मांना बांधतो. संसारात मुख्यतः दोन तत्त्वे आहेत - चेतन आणि जड (अजीव). या जगात जितके प्राणी आहेत ते एकांतरूपाने चेतन नाही आणि एकांततः जड (अजीव) नाहीत. परंतु जीव व पुद्गलाच्या संयोगाने बनलेले आहेत. जर या जड शरीरात चेतन तत्त्वाचे अस्तित्व नसते तर कोणतीच क्रिया कधीच झाली नसती. आपण पाहतो की या शरीरातून आत्मा निघून गेल्यानंतर जे कलेवर राहते ते कोणतीच क्रिया करू शकत नाही. स्पंदनरहित ते मात्र शव असते. जीवाचा जडाशी संबंध नसेल तर सृष्टीचे अस्तित्व राहणार नाही. जेव्हा आत्मा साधना करून कर्म बंधानापासून पूर्णतः मुक्त होतो मग तो या संसारात पुन्हा येत नाही. कारण संसार तोपर्यंतच आहे जोपर्यंत जीवाचा जडाशी संयोग आहे.

यावरून स्पष्ट होते की, वस्तू व पदार्थ व्यक्तीला बद्ध करीत नाही. राग-द्वेष

बंधाचे कारण आहेत. जोपर्यंत वर उल्लेखलेले आस्रवाचे भेद-प्रभेद जाणून घेऊन त्यापासून मुक्त होण्यासाठी त्यांचा त्याग केला नाही तर मुक्त होणे शक्य नाही.

आस्रव त्याग करण्यायोग्य आहेत हे, जाणल्याशिवाय त्याचा त्याग होऊ शकणार नाही. त्यासाठी आस्रवांचे यथार्थ स्वरूप यथार्थपणे समजून घेऊन त्याचे परिणाम समजून घेऊन सोडण्यायोग्य आस्रवांचा साप जशी आपली कात सहजपणे टाकतो त्याप्रमाणे सोडायला पाहिजे. आणि सतत चिंतन करायला पाहिजे की या कर्माच्या आगमनाला थांबवून कर्मरूपी कर्जापासून कसा बचाव करू ? ज्याक्षणी त्या कर्जापासून मुक्त होऊ तो क्षण खरोखर धन्य होईल.

दशवैकालिक सूत्रात अयतनापूर्वक गमन करणे, उभे राहणे, बसणे, झोपणे, भोजन करणे व बोलणे हे पापकर्माचे बंधन करणारे आहेत, असे सांगितले आहे. कटू फल देणारे आहेत. त्याचप्रमाणे पुढे असेही वर्णन आहे की, यतनापूर्वक खाणे, बोलणे, चालणे इ. क्रिया केल्यास कर्मबंध होत नाहीत.

यात यतना व अयतना हे शब्द शास्त्रीय पारिभाषिक आहेत. अयतनाचा अर्थ आहे उपयोगशून्यता, असावधानी, अविवेक, अजागृती, प्रमाद.

जो सर्व जीवांना आपल्या आत्म्याप्रमाणे मानतो, जो सर्व जीवांना सम्यक् दृष्टीने पाहतो व ज्याने आस्रवाचा निरोध केला आहे, जो दांत आहे - त्याचे पापकर्म बांधले जात नाहीत.[२६८]

६३ व्या गाथामध्ये शय्यंभव स्वामींनी स्पष्ट केले आहे की, आस्रवद्वार बंद केले तर पापकर्माचे बंध होत नाहीत.

अशाप्रकारे आगमग्रंथामध्ये तथा आगमोत्तर ग्रंथात आस्रवांचे भेद, त्यामुळे लागणारे दोष हानी-लाभ इ. जाणले. जाणण्याचे फल त्याग आहे. ''णाभरवतव फलं विरइ'' आणि तो त्याग पण दृढ असला पाहिजे ज्याच्याने आत्म विकास करण्याची परिपूर्णता येते व ती साधना उपलब्ध करून जन्ममरण रूप संसारापासून मुक्त होऊन निर्वाण प्राप्त होऊ शकते. जीवाचे परमलक्ष्य आहे निर्वाण प्राप्त करणे. निर्वाण प्राप्तीसाठी निरास्रव होणे आवश्यक आहे. निरास्रव होण्याची पद्धती-गणधर गौतमस्वामींनी श्रमण भगवान महावीर स्वामींना विचारले - ''भगवन् ! जीव निरास्रव कसा होऊ शकतो ?'' भगवान महावीर स्वामींनी उत्तर दिले - हे गौतम ! प्राणातिपात, मृषावाद, अदत्तादान, मैथुन, परिग्रह, रात्रिभोजन यांचा त्याग करणे इ. मुळे जीव निरास्रव होतो. जो पाच समितीनी

युक्त, तीन गुप्तींनीं गुप्त; कषाय रहित जितेन्द्रिय गर्व रहित व निःशल्य (शल्य रहित) असतो तो जीव निरास्रव होतो.''[२६९]

गौतमस्वामी पुनः भगवनांना प्रश्न विचारतात - भगवन् ! प्रत्याख्यान करण्याने जीवाला कोणता लाभ होतो ? भगवतांनी उत्तर दिले हे गौतम प्रत्याख्यान (सांसारिक विषय वासनांचा त्याग) करण्याने जीव आस्रव द्वार बंद करू शकतो, इच्छा निरोध करण्याने जीव सर्व परद्रव्याच्या तृष्णाने रहित होऊ शकतो. आणि परिणामस्वरूप शांत बनतो.[२७०]

तात्पर्य - अप्रत्याख्यान आस्रव आहे. ज्यामुळे कर्माचे आगमन होते. जो प्रत्याख्यान (नियमबद्ध) करतो त्याच्या आत्म्यात नवीन कर्म प्रवेश करू शकत नाहीत. नवीन कर्माचे आगमन होत नाही. नवीन कर्माच्या आगमनाचा निरोध करणे अथवा आस्रवाला अडविणे हे कर्मापासून मुक्त होण्याचे प्रथम चरण आहे. म्हणून आस्रव भावनेचे यथार्थ ज्ञान असणे आवश्यक आहे. आत्म्यात कर्म कसे प्रवेश करतात, कर्माचे बंध कसे होतात, आस्रवामुळे संसारात कसे परिभ्रमण करावे लागते. याचे ज्ञान असेल तरच आस्रवांपासून परावृत्त होऊन निरास्रव राहण्याचा प्रयत्न केला जाईल.

फक्त आस्रवांच्या कारणांचा, भेद-प्रभेदांचा विचार करीत राहणे म्हणजे आस्रव भावना नव्हे. यात आस्रवांच्या स्वरूपाबरोबर ज्या आत्म्याच्या पर्यायात मोह-क्रोध, राग-द्वेष रूप आस्रव भाव उत्पन्न होतात तरीही आत्मा या मोह, राग द्वेष इ. भावनेहून भिन्न आहे, पवित्र आहे, ध्रुव आहे, अशाप्रकारे त्या आत्म्याचाही विचार करायला पाहिजे. त्याचप्रमाणे आस्रवभावनेचे चिंतन अशाप्रकारे पण करावे की, ज्यामुळे आस्रवभावांपासून विरक्ती व आत्मस्वभावात अनुरक्ती उत्पन्न व्हावी. आस्रव भावनांच्या चिंतनाचा उद्देश्य आहे, आस्रवांचा निरोध करणे. आस्रव भावाचा अभाव करणे आणि त्याला जडमूळापासून नष्ट करणे.

आरंभी मिथ्यात्वादी आस्रव-भेदांचे वर्णन केले आहे. त्यापासून माझा आत्मा सर्वथा भिन्न आहे. असे चिंतन करणे म्हणजे आस्रवभावना होय.

बारा भावनेत नऊ तत्त्व - बारा भावनापैकी प्रथम सहा अनित्यादि भावना वैराग्यमय आहेत. नंतरच्या सहा भावना तात्त्विक आहेत. आस्रव भावनेत आस्रव तत्त्व बंध तत्त्व, पुण्यतत्त्व व पापतत्त्वाची चर्चा सहज होऊन जाते. पहिल्या सहा भावनांत जीवाची अनित्यता आणि जीव अजीवाच्या भिन्नतेबद्दलचे वर्णन केले गेले आहे. जीव आणि अजीवाला जाणणे म्हणजेच शरीर व आत्मा भिन्न आहे हे जाणणे. हीच अन्यत्व

भावना होय. यालाच भेदज्ञान म्हणतात. संवर व निर्जरा भावना स्वतंत्र आहेत. संवर व निर्जरा भावना मोक्षमार्गदर्शक आहेत. त्याचे वर्णन यथास्थान येईलच.

तात्पर्य हेच की, जैन दर्शनात नऊ तत्त्व किंवा नऊ पदार्थ याचे अनन्यअसाधारण महत्त्व आहे. त्याचा ह्या बारा भावनांमध्ये समावेश होतो.

नऊ तत्त्वात पुण्य व पाप या दोन तत्त्वांचा समावेश आस्रव तत्त्वात होतो. आचार्य उमास्वातींनी सात तत्वांचाच उल्लेख केला आहे.[२७१] आस्रव भावनेतच पुण्यास्रव व पापास्रव यांचा समावेश केला आहे.

जैनदर्शनात पुण्य हे सुखप्राप्त करून देणारे तत्त्व व पाप हे दुःख प्राप्त करून देणारे आहे. सुख देणारे असो किंवा दुःख देणारे शेवटी दोन्ही कर्मच आहेत. आस्रव द्वारानेच ते आत्म्यात प्रवेश करतात. म्हणून दोन्ही तत्त्वांचा आस्रवात समावेश केला गेला आहे. प्रश्न असा येतो की सुख तर सर्वांना प्रिय आहे मग त्याला आस्रव तत्त्वात का समाविष्ट केले ? त्याचे समाधान असे आहे की, पुण्यामुळे स्वर्ग प्राप्त होतो तर पापामुळे नर्क, तिर्यंच गतीचे बंध होते आणि जेव्हा पुण्याचा खजिना रिकामा होतो, मग पुन्हा चतुर्गती संसारात भ्रमण सुरू होते. स्वर्गप्राप्ती म्हणजे काही शाश्वत स्थान नाही. जैन दर्शनात मुमुक्षूचे ध्येय शाश्वत धाम प्राप्त करणे आहे. त्याच्यासाठीच सर्व साधना, आराधना व उपासना करायची आहे. मोक्ष ध्येय प्राप्त करण्यात पुण्यसुद्धा बंधन कारक आहे. पुण्य आणि पाप दोन्ही आस्रव आहेत. इथे एक बाब चिंतनीय आहे -

पाप हे आस्रव आहे व पुण्यसुद्धा आस्रव आहे तरी सुद्धा जोपर्यंत पापास्रवाचा पूर्णपणे त्याग केला जात नाही, तोपर्यंत पुण्याचा त्याग करून चालणार नाही. आज आपण पाहतो की- माणूस पाप तर सतत करीत असतो आणि पुण्य कार्याचे नाव घेताच म्हणतात, पुण्य हे एक प्रकारचे बंधनच आहे तर मग अधिकच नुकसान होईल. कारण शाश्वत सुख प्राप्त करण्यासाठी पाप तर चालणारच नाही. पुण्याचा मोक्षाबरोबर सरळ संबधन नाही. पण पुण्याच्या माध्यमानेच तिथपर्यंत पोहोचता येईल. पुण्यकर्मामुळेच मनुष्य जन्म, आर्यक्षेत्र, योग्य समज प्राप्त होऊ शकते. म्हणून पुण्यतत्त्वाला हेय आणि उपादेय दोन्ही रूपात स्वीकार केले गेले आहे. ज्याप्रमाणे समुद्राच्या एका किनाऱ्यापासून दुसऱ्या किनाऱ्यापर्यंत जाण्यासाठी जहाजाचा उपयोग करावा लागतो, आणि किनाऱ्यावर पोहोचताच जहाज सोडून देणे आवश्यक असते. दोन्ही गोष्टी केल्याशिवाय आपल्या गंतव्य स्थानापर्यंत जाणे संभव नाही. त्याचप्रमाणे प्रथमावस्थेत पुण्यतत्त्व अत्यावश्यक आहे. नंतर

आत्मविकासाच्या सीमापर्यंत पोहोचल्यावर त्याचा त्याग करणे ही आवश्यक आहे. पण जो प्रारंभापासून पुण्याला त्याज्य मानून त्याग करतात, त्यांची स्थिती किनाऱ्यापर्यंत जहाज पोहोचण्यापूर्वी मध्येच ती सोडून देणाऱ्या सारखी होते. मध्येच नाव सोडून देणारा समुद्रात बुडून मरणारच. मध्येच पुण्य त्याग करणारा संसार सागरात बुडणारच.[२७२]

अशाप्रकारे पुण्य हेय आणि उपोदय दोन्ही आहे.

आस्रव भावनेत ज्ञानियांनी पुण्यतत्त्वाला आस्रव अशासाठी म्हटले आहे की, जेव्हा साधक जग अनित्य आहे, अशरण रूप आहे हे जाणतो तेव्हा त्याचा दर्जा इतका उच्च प्रकारचा होतो की मोक्ष प्राप्तीच्या चिंतनाप्रत पोहोचतो. त्यावेळी पुण्याची काहीच आवश्यकता उरत नाही. त्यावेळी ते बंधनरूपच आहे. पुण्य ही शेवटी सोडावेच लागते. म्हणून पाप-आस्रवाप्रमाणे पुण्याला ही आस्रव म्हटले आहे. परंतु जी व्यक्ती अजून धर्माचा क, ख, ग, सुद्धा जाणत नाही, पापापासून किंचित मात्र सुद्धा दूर रहात नाही, तो पुण्याला आस्रव मानून पुण्य प्रवृत्ती करीत नाही. पापप्रवृत्ती सोडीत नाही अशाने त्यांची काय दशा होणार ?

जैन परंपरेत एक प्रसिद्ध श्लोक आहे.

आस्रवो बंध हेतुश्च संवर मोक्ष कारणम् ।
इतीयमार्हति दृष्टिरण्यद सर्व प्रपंचणम् ॥[२७३]

अर्थात आस्रव बंधाचे कारण आहे व संवर मोक्षाचे कारण आहे. सर्वज्ञाच्या दृष्टीत इतकीच गोष्ट महत्त्वाची आले त्याच्याशिवाय जी काही चर्चा विचारणा आहे, ती प्रपंच मात्र आहे. आस्रवाचे विस्तारपूर्वक विवेचन केले आहे. आता संवर भावनेचे विश्लेषण करू या. आस्रव तत्त्वाला व्यवस्थित जाणून त्याचा प्रतिपक्ष संवर या तत्त्वाला चांगल्या प्रकारे समजून घेऊन आस्रव द्वार बंद केले जाऊ शकतात.

संवर भावना

जैन दर्शनात दोन तत्त्वे अत्यंत महत्त्वाची आहेत - आस्रव व संवर. या दोन तत्त्वावर संसार व मुक्तीचा समग्र विस्तार अवलंबिला आहे. समस्त जागतिक प्रपंच आस्रवाच्या श्रृंखलेत जोडलेले आहेत. सर्व साधना, आराधनाचे जे उपक्रम व्रत, संयम, संवराशी जुडलेले आहेत. या दोन तत्त्वांना व त्यातील वास्तविक सत्याला जो समजतो त्याला जैन तत्त्व व धर्माचे सार समजले. मिथ्यात्व, अविरती, प्रमाद, कषाय आणि मन,

वचन, काया या योगांमुळे आत्मप्रदेशात जी चंचलता निर्माण होते. त्यामुळेच कर्माचे आगमन होते. ही चंचलता आस्रव आहे. संवराची व्याख्या अशी आहे - ''निरुद्धास्रवे संवरो''[२७४] आस्रवाला अडविणे म्हणजे संवर. तत्त्वार्थ सूत्रात म्हटले आहे - आस्रव निरोधः संवरः[२७५] अर्थात आस्रवाचा निरोध म्हणजे संवर.

आस्रवाचा निरोध करणे म्हणजे आस्रवाला प्रतिबंध घालणे. आपण अगोदर आस्रवाच्या ज्या भेद-प्रभेदांचे वर्णन केले आहे; त्यांचा जितक्या-जितक्या प्रमाणात निरोध होईल, तेवढ्या तेवढ्या प्रमाणात तो संवर झाला. आध्यात्मिक विकासाचा क्रम आस्रव निरोधाच्या विकासावर आधारित आहे. जस-जसा आस्रवाचा निरोध विकसित होईल तसतशी गुणस्थानाची पण वृद्धी होईल.

आस्रवभावनेत आत्म्याचे पतन कोणत्या कारणामुळे होते त्याचा विचार केला. आता संवर भावनेत आत्मउत्थान कोणत्या कारणामुळे होतो, येणाऱ्या कर्माचा कसा प्रतिबंध करायचा याचे मार्गदर्शन प्राप्त करूया.

संवर शब्द सम्+वृ या धातुने बनला आहे. 'सम्' उपसर्ग आहे. 'वृ' धातू आहे. 'वृ' म्हणजे अडविणे, (थांबवणे) अवरुद्ध करणे. आस्रव प्रवाहाचे दार आहे त्याला बंद करणे संवर होय. ज्याने आपल्या आत्म्याला संयमित केले, वश केले आहे त्याला संवर प्राप्त झाले.

आस्रव हे कर्मरूपी पाण्याचा प्रवाहासारखा आहे. त्या प्रवाहाला अडवून कर्मरूपी पाणी आत येण्याचा रस्ता बंद करणे म्हणजे संवर. अर्थात कर्माच्या आगमनाचे दार बंद करणे म्हणजे संवर.[२७६]

संवर म्हणजे काय ? कर्माच्या आगमनाला थांबविण्यासाठी काय करायचे ? तर तीन गुप्ती, पाच समिती, दश धर्म, बारा भावना, बावीस परिसह आणि पाच प्रकारचे चारित्र्य यांच्या आचरणाने संवर होतो.[२७७]

संवर भावना व संवर तत्त्व यात कार्यकारण संबंध आहे. कारण वर उल्लेखलेल्या बारा भावनेत संवर कसे करावे याचे वर्णन केले आहे आणि संवर भावनाही पण बारा भावनांपैकी एक आहे. बारा भावनांचे विस्ताराने स्वतंत्रपणे ज्यांनी विवेचन केले आहे. त्यांच्या शिवाय ज्या कोणी महंतांनी भावनेचा विचार केला आहे त्यांनी संवर तत्त्वाच्या अंतर्गतच बारा भावनांचे विवेचन केले आहे. म्हणून संवर भावना फार महत्त्वपूर्ण आहे.

अगोदर सांगितल्याप्रमाणे जस-जसे आस्रवाचा निरोध वाढत जाईल तस-तसे

गुणस्थानाची वृद्धी होते.

गुणस्थान हा जैन धर्माचा पारिभाषिक शब्द आहे. आत्म्याच्या गुणांचा क्रमशः विकास जिथे होतो त्या स्थानाला जैनधर्मात 'गुणस्थान' म्हणतात. आणि आत्मगुणांचा विकास भावनेवर आधारित आहे. आत्मा ज्या-ज्या वेळी चांगल्या विचारांनी भावित असेल त्या-त्या वेळी त्यात सद्गुणांची वृद्धी होते आणि जितके मनात विचार वाईट येतील तसतसे दुर्गुणांचीच वृद्धी होत जाते. मनात चांगल्या वाईट विचारांची जी श्रृंखला चालते त्या विचारांच्या श्रृंखलेला स्थितीला गुणस्थान म्हणतात. या गुणस्थानामुळे आत्म्यामध्ये कोणता स्थायी भाव आहे हे समजते आणि आत्म्याची योग्यता काय आहे हे ही समजू शकते. असे गुणस्थान १४ आहेत. चौद गुणस्थान हे मोक्ष प्राप्तीच्या चौदा पायऱ्या आहेत.

आस्रव भावनेत मिथ्यात्व, अविरती, प्रमाद, कषाय आणि योग यांना आस्रव म्हटले आहे. गुणस्थानात जसजसे वर चढत जातो तसतसे एकएक आस्रवाचा निरोध होऊन संवर होत जातो. उदा. चवथ्या गुणस्थानात सम्यक्त्वाची प्राप्ती झाल्यावर मिथ्यात्व आस्रवाचा निरोध होऊन जातो. पाचव्या गुणस्थानात पाच अणुव्रत, तीन गुणव्रत आणि चार शिक्षाव्रत असे बारा व्रतरूप देश (काही प्रमाणात) संयम होतो व अविरतिचा एक देश (काही अंशाने) अभाव होतो. सहाव्या गुणस्थानामध्ये अहिंसा इ. पाच महाव्रतांचा अंगिकार केला जातो म्हणून अविरति गुणस्थानाचा पूर्णपणे अभाव होतो.

सातवा गुणस्थान अप्रमादी गुणस्थान त्या अवस्थेत प्रमाद रहातच नाही.

अकराव्या गुणस्थानात २५ प्रकारच्या कषायांचा उदय होत नाही. आपोआप कषायांवर संवर होऊन जातो. आणि चवदाव्या गुणस्थानात योग (मन, वचन, काया) यांचा निरोध झाल्यामुळे योगाचा अभाव होतो. म्हणून मिथ्यात्व, अविरती, प्रमाद, कषाय आणि योग यांच्या निरोधामुळे सम्यक्त्व, देशव्रत, महाव्रत, कषायावर जय व योगाभाव हे संवराचे कारण आहे. म्हणून त्यांना संवर म्हटले आहे.[२७८]

आचार्य कुंदकुंदांनी समयसार ग्रंथात संवर कशामुळे होतो हे सांगताना म्हटले आहे- जो जीव प्रथम राग, द्वेष मोह याने युक्त असतो, पण मन, वचन, काया यांच्या शुभाशुभ योगाने आपल्या आत्म्याला भेदज्ञानाच्या शक्तीने चंचल होऊ देत नाही, नंतर आत्म्याला शुद्ध दर्शन ज्ञानमय आत्मस्वरूपात स्थिर करून अन्य सर्व बाह्य अभ्यंतर परिग्रहाने रहित होऊन कर्म नोकर्मापासून वेगळे आपल्या स्वरूपात एकाग्र होऊन त्याचाच

अनुभव करतो अर्थात त्याच्यातच रममाण राहतो, तो जीव आत्मध्यानाने दर्शन, ज्ञानमय होऊन परद्रव्यमय बुद्धीला ओलांडून अगदी अल्पकाळात सर्व कर्मापासून मुक्त होतो ही संवराची रीत आहे.[२७९]

''वारसाणुवेक्खा'' मध्ये ६१ ते ६५ गाथांपर्यंत संवर अनुप्रेक्षाचे वर्णन केले आहे. त्यात सुंदर प्रकारे विवेचन केले आहे- संवर अवस्थेमध्ये चंचल मलिन, चल, मल, अगाढ दोषांने रहित सम्यक्त्वरूपी दृढ कपाटाद्वारे मिथ्यात्व रूपी आस्रव-द्वारांचा निरोध होतो, असे जिनेंद्र भगवानांनी निर्देशित केले आहे.

मिथ्यात्व एक प्रवाह आहे. त्याद्वारे येणारे कर्म आत्म्यात संश्लिष्ट होतात. मग असा प्रवाह अनवरत चालू राहतो. त्या प्रवाहाला अडविण्याचे कार्य सम्यक्त्व रूपी दरवाजा करू शकतो. दार बंद करण्याने आस्रवाचे आत येणे थांबते. यालाच आस्रव निरोध म्हणतात. क्रमानुसार आस्रवाचा निरोध करण्याचे विश्लेषण करताना पुढे कुन्दकुन्दाचार्य म्हणतात - मनाने पाच महाव्रतांचे पालन करण्याने, अविरति (हिंसादि पाच पाप रूप) मुळे येणारे कर्म निश्चितपणे थांबतातच. क्रोध इ. कषायरूप आस्रवाचे दार, कषायरहित कपाटाने बंद होतात. जीव शुभ योगात प्रवृत्त होतो. आणि अशुभ योगामुळे येणारे कर्म अवरुद्ध होतात. आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करण्याच्या दिशेने वाटचाल करणारा जीव शुद्धोपयोगात प्रवृत्त होतो. जीव शुद्ध योगात प्रवृत्त झाल्यामुळे येणारे कर्म समूह आपोआप थांबतात.[२८०] प्रवचनसार या ग्रंथात याचे खूपच स्पष्ट रूपात विवेचन केलेले आहे. शुभ परिणाम पुण्य, अशुभ परिणाम पापाचे व शुद्धपरिणाम ज्ञानगत, ज्ञानाश्रित ज्ञायक रूप राग वर्जित असल्यामुळे मोक्षाचे कारण आहे.[२८१]

शुद्धोपयोगामुळे जीवात धर्मध्यान शुक्लध्यान यांचा प्रादुर्भाव होतो. अशाप्रकारे संवर ध्यानाचा हेतू आहे. याचा विशेष प्रकारे चिंतन, विमर्श करायला पाहिजे.[२८२]

निश्चय नयाच्या दृष्टीने विवेचन करताना आचार्य कुंदकुंद म्हणतात- शुद्धनिश्चयाने जीव संवर करू शकत नाही. कारण की, तो सदैव शुद्धभाव युक्तच आहे. आत्म्याच्या शुद्धभावात्मक दृष्टिकोनाने असे चिंतन करायला हवे की, आत्मा संवरात्मक विकल्प रहित आहे. कारण संवर कशाचे करायचे ? शुद्धभावात्मक आत्म्यात आस्रव होतच नाहीत तर निरोध कशाचा ? आस्रव प्रवाहरूप आहे. कर्म चैतन्य रहित आहेत. आणि जीव तर चैतन्यमय आहे. चैतन्य व अचैतन्याचा मेळ कसा होणार ? ही कुंदकुंदाचार्याची दृष्टी आहे.

समयसार कलश यात म्हटले आहे- जीवाला जेव्हा भेद-ज्ञान प्राप्त होते. अर्थात जीव जेव्हा आत्मा आणि कर्म यांना यथार्थ रूपाने भिन्न समजतो तेव्हा तो शुद्ध आत्म्याचा अनुभव करतो. शुद्ध आत्म्याच्या अनुभवाने आस्रवभाव येण्याचे थांबतात. अनुक्रमाने सर्वत-हेने संवर होऊनच जातो. संवर होण्याच्या क्रमात सर्वात महत्त्वाचे कारण आहे- भेद-विज्ञान. एकदा भेद-विज्ञान पक्के झाले की कर्मास्रव थांबलेच म्हणून समजावे. म्हणूनच या भावनेला अतिशय महत्त्वपूर्ण म्हटले आहे. व त्याचा उपदेश दिला आहे.

या भेद विज्ञानाला अखंडितपणे भावित करीत रहावे. जोपर्यंत परभावापासून अलिप्त होऊन आत्मा आपल्या ज्ञानमय स्वभावात पूर्णपणे स्थिरावत नाही तोपर्यंत या भावनेचा सतत अभ्यास करायला पाहिजे.

भेदज्ञान दृढ करण्याच्या अभ्यासाने शुद्ध तत्त्वाची उपलब्धि होते. शुद्ध तत्त्वाच्या उपलब्धिमुळे रागाचे समूह विलय पावतात व कर्माचे संवर होते. आणि कर्माच्या संवरामुळे ज्ञानातच स्थिर झालेले ज्ञान उदित होते. जे ज्ञान परम संतोष प्रदान करणारे आहे त्याचा प्रकाश निर्मल आहे. अर्थात रागादिमुळे जी मलीनता आलेली असते ती दूर होते. अम्लान होते. सर्व लोकालोकांचे स्पष्ट ज्ञान होते. एकमात्र शुद्ध ज्ञानमय आत्मा बनतो. आता क्षयोपक्षममुळे जे भेद होतात ते होत नाहीत. त्याचा प्रकाश अविनश्वर आहे.[२८३]

संवराची व्याख्या प्रशमरति प्रकरणात अशा प्रकारे दिली आहे- मन, वचन, काया यांच्या व्यापाराने पुण्यकर्माचा आस्रव होत नाही व पाप कर्माचा ही आस्रव होत नाही. आत्म्यात चांगल्याप्रकारे धारण केले गेलेल्या व्यापाराला तीर्थंकर भगवानांनी हितकारक संवर म्हटले आहे.[२८४]

संवर सर्वप्रकारे पूर्णतया कल्याणकारक आहे. म्हणून संवराची गुणवत्ता महत्ता जाणून घेऊन त्याचे चिंतन, मनन व आचरण केले पाहिजे. विचार करीत रहावे की, आस्रवाचे जे दोष आहेत ते संवरयुक्त जीवात कधीच येऊ शकत नाहीत. जो संवराच्या गुणवत्तेला समजतो, त्याचा विचार करतो, संवरात राहण्याचा सतत प्रयत्न करीत राहतो त्या जीवाची बुद्धी संवर, सिद्ध करण्यासाठी व अनुभवण्यासाठी सतत प्रयत्नशील राहते.[८५]

संवराची सार्थकता सांगताना इष्टोपदेशमध्ये फार सुंदर वर्णन केले आहे-

वरं व्रतैः पदं दैवं नाव्रतैर्वत नारकं ।

छायातपस्थयोभेदः प्रतिपालयतोर्महान् ॥[२८६]

व्रत द्वार देव पद प्राप्त करणे चांगले पण अव्रत द्वारा नरक पद प्राप्त करणे

चांगले नाही. ज्याप्रमाणे सावली आणि उन्हात बसून मित्राची वाट बघणाऱ्यांमध्ये फरक आहे, त्याचप्रमाणे व्रत व अव्रताचे आचरण करणाऱ्या दोन्ही पुरुषात मोठे फरक आहे.

इथे आचार्यांचा सांगण्याचा अभिप्राय हा आहे की ज्याप्रमाणे सावलीत बसून स्वतःच्या मित्राची वाट बघणारा यात्री सुखी होतो आणि उन्हात बसून वाट बघणारा दुसरा यात्री दुःखी होतो, त्याचप्रमाणे सम्यग् दृष्टी जीव जेव्हा निर्विकल्पभावात राहू शकत नाही तेव्हा त्याला व्रत इत्यादी पालन करण्याचे शुभ भाव उत्पन्न होतात, आणि त्या शुभ भावनेने तो स्वर्ग इत्यादीचे सुख भोगतो. मिथ्यादृष्टी जीव हिंसा अव्रत इ.च्या अशुभ भावाने नरकादी स्थानात दुःख भोगवतो म्हणून नरकाच्या दुःखापेक्षा व्रत इत्यादीच्या आचरणाने स्वर्गाचे सुख चांगले. म्हणून जोपर्यंत निर्विकल्पदशा येत नाही तोपर्यंत व्रत इत्यादीची उपादेयता आहे.

संवर भावनेत व्रत प्रत्याख्यान आदिने आपल्या आत्माला पाप क्रियेतून संवृत करण्याचे चिंतन केले जाते. शेवटी लक्ष तर मोक्ष प्राप्तीचा असतो. परंतु जोपर्यंत आस्रवाचा निरोध रूप संवर दशेत जीव येत नाही तोपर्यंत पूर्ण निर्णय पण होऊ शकत नाही. आंतरीक स्वच्छतेसाठी प्रथम बाह्य कर्म येण्याचे थांबलेच पाहिजे. म्हणून संवर भावनेत समिती, गुप्ती, व्रत, इत्यादीचे चिंतन व चिंतनानु रूप आचरणाचे भाव व्यक्त केले आहे.

संवराचे सत्तावन भेद

गुप्ती - तत्त्वार्थवार्तिकात गुप्ती, समिती इ. सत्तावन्न भेदांचा अर्थ स्पष्ट करताना म्हटले आहे की, ज्या कारणांमुळे आत्मा संसारात भ्रमण करतो त्या कारणाने आत्म्याचे गोपन अर्थात रक्षण करणे म्हणजे गुप्ति.[२८७]

आचार्य उमास्वातींनी तत्त्वार्थ सूत्रात गुप्तीची व्याख्या अशाप्रकारे केली आहे की, तीन योगांचा योग्यप्रकारे निग्रह करणे म्हणजे गुप्ती.[२८८]

गुप्ती तीन - १) मन गुप्ती २) वचन गुप्ती ३) कायगुप्ती.

१) मन गुप्ती - सर्व प्रकारच्या कल्पना विलासापासून दूर, समभावात सतत स्थित आत्मस्वरूपाच्या चिंतनात मग्न असलेल्या मनाला ज्ञानी 'मनगुप्ती' म्हणतात.

२) वचन गुप्ती - संकेत वगैरे न करता, मौन धारण करणे, अथवा वचन वृत्तीला वश करणे, काबूत ठेवणे म्हणजे वचनगुप्ती.

३) कायगुप्ती - कायोत्सर्ग ध्यानात स्थिर असलेले मुनी कितीही उपसर्ग आले

तरी किंचित मात्रही न डळमळता अगदी स्थिर, समभावात राहतात, यालाच कायगुप्ती म्हणतात. शारीरिक क्रियेत नियमितता ठेवणे, स्वच्छदतेचा त्याग करणे म्हणजे कायगुप्ती होय.[२८९]

समिती

अन्य प्राण्यांची रक्षा करण्याची भावना असणे अशा सम्यक् प्रवृत्तीला समिती म्हणतात.[२९०]

कोणत्याही प्राण्याची पीडा दूर करण्यासाठी सम्यक्प्रकारे क्रिया करणे म्हणजे समिती.[२९१]

निश्चय नयाच्या दृष्टीने अनन्त ज्ञानादी स्वभावाचा धारक जो निज आत्मा आहे त्यात 'सम' अर्थात चांगल्याप्रकारे समस्त रोग इ. विभावांचा त्याग करून आत्म्यात लीन होणे, आत्मध्यानात रममाण होऊन जाणे म्हणजे समिती.[२९२]

गमन इ. क्रियेत आगमात जशी प्रवृत्ती सांगितली आहे त्याप्रमाणे प्रवृत्ती करणे समिती.[२९३]

समिती पाच प्रकारची आहे. १. इर्या, २. भाषा, ३. एषणा, ४. अदान निक्षेपना, ५. उच्चार[२९४] या पाच समिती आहेत.

१) इर्यासमिती - जीवस्थान आणि विधी जाणणारे धर्मात प्रयत्नशील साधू सूर्योदय झाल्यावर चक्षुरिन्द्रियाने दिसणारे आणि मनुष्य वगैरेंच्या आवागमनामुळे क्षुद्र जंतू इ. ने रहित मार्गात सावधान चित्ताने, शरीराच्या अवयवांना संकोचून सावकाश चार हात जमीन पुढे पाहून गमन करणे इर्यासमिती होय.

यात जीवस्थान म्हणजे सूक्ष्म एकेन्द्रिय, बादर एकेन्द्रिय, द्विन्द्रिय, त्रिन्द्रिय, चतुरिन्द्रिय आणि सन्निपंचन्द्रिय व असन्निपंचेन्द्रिय यासातांचे पर्याप्त अपर्याप्त अशी चौदा जीवस्थाने आहेत.

२) भाषा समिति - स्व आणि पर यांना मोक्षाच्या मार्गावर नेणारे स्वपर हितकारक निरर्थक वटवट रहित, मितभाषी, स्पष्ट अर्थयुक्त असंदिग्ध वचन बोलणे म्हणजे भाषासमिती.

३) एषणा समिति - शरीररूपी गाडी त्यातील आत्मा गुणरत्नांची खाण, या शरीराच्या माध्यमाने समाधीमार्गाकडे जाण्याची इच्छा असलेले साधू आपल्या जठराग्नीचा

दाह शमन करण्यासाठी ज्याप्रमाणे गाडी व्यवस्थित चालावी म्हणून चाकाला वंगण लावतात, अगदी त्याचप्रमाणे शरीरधर्म टिकवण्यासाठी स्वादरहित होऊन अन्न ग्रहण करणे याला एषणा समिति म्हणतात.

४) आदाननिक्षेपण समिती - धर्म उपकरण यत्नापूर्वक घेणे व ठेवणे याला आदान निक्षेपण समिती म्हणतात.

५) उच्चार उत्सर्ग समिती - स्थावर किंवा जंगम जीवांची विराधना होणार नाही अशा निर्जन्तुक जागी मल-मूत्र इ. विसर्जन करणे उच्चार उत्सर्ग समिती होय.[२९५]

तीन गुप्ती, पाच समिती यांचा जो साधक सम्यक् प्रकाराने पालन करतो तो संसार परिभ्रमणातून लवकरात लवकर मुक्त होतो. पाच समिति व तीन गुप्ती यांना अष्टप्रवचन माता म्हणतात.[२९६]

तत्त्वार्थवार्तिकात जी पाच समिती व तीन गुप्ती यांची व्याख्या दिली आहे. त्यात व उत्तराध्ययन सूत्रात वर्णित पाच समिती, तीन गुप्तिंची व्याख्या यात फार फरक आहे. भावार्थ समान आहे. परंतु उत्तराध्ययन सूत्रात विस्तृत विवेचन आहे. उदा. इर्यासमितीचे आलंबन, काळ, मार्ग व यतना या चार कारणांनी परिशुद्ध इर्या अर्थात गती करणे, विचरण करणे नंतर आलम्बन वगैरे काय आहे त्याचे ही वर्णन आहे. याचे विस्तृत विश्लेषण इथे करणे संभव नाही.[२९७]

जैन दर्शनाच्या साधनेत समिती, गुप्ती यांचे फार महत्त्व आहे. कारण चारित्र्याच्या शुभप्रवृतीसाठी समिती आहे आणि अशुभप्रवृत्तीपासून निवृत्त होण्यासाठी तीन गुप्ती आहेत.[२९८]

संवराच्या सत्तावन्न भेदांत पुढे दहाप्रकारचे धर्म येतात.

उत्तमक्षमामार्दवार्जवशौचसत्य संयमतपमस्त्यागाकिंचन ब्रह्मचर्याणिधर्मः ।[२९९]

१) **क्षमा** - दुष्ट व्यक्तींकडून शिव्या, चेष्टेने हसणे, अवज्ञा, घृणा, शरीर, छेदन, वगैरे क्रोध व्यक्त करण्याचे असहय निमित्त समोर उपस्थित असूनसुद्धा मनात किंचितमात्र सुद्धा कलुषितता नसणे ही खरी उत्तम क्षमा होय.

२) **मार्दव** - उत्तम जाति, कुल, रूप, विज्ञान, ऐश्वर्य, श्रुतलाभ व शक्तीने मुक्त असून सुद्धा त्याचा अभिमान गर्व न करणे, मानहारी मार्दव आहे.

आवश्यक सूत्रात आठ मद सांगितले आहेत. त्यात वरील मदांशिवाय एक

आणखी मद सांगितला आहे आणि तो म्हणजे तप मद.[३००]

३) **आर्जव** - मन, वचन, काया यात कुटिलता नसणे म्हणजे आर्जव. आणि आर्जव म्हणजे सरळता.

जो ऋजुभूत (सरळ) असतो त्याची शुद्धी लवकर होते. आणि जो मन, वचन, कायाने शुद्ध, असतो अशांच्याच हृदयात धर्म टिकून राहतो. जो धर्मात स्थिर असतो, तो तुपाने युक्त (तुपाने निर्मित) अग्निप्रमाणे परम निर्वाण पदाला प्राप्त होतो.

४) **शौच** - अकलंकदेव यांनी शौच (पवित्र) याची व्याख्या करताना म्हटले आहे की, अत्यंतिक लोभ निवृत्तीला शौच म्हणतात. शौच शब्दाचा अर्थ शुचिभाव म्हणजे भावांची विशुद्धी. लोभ चार प्रकारचे १) स्व-व परविषयी जीवन लोभ, २) आरोग्य लोभ ३) इन्द्रिय लोभ ४) उपभोग लोभ या चारांपासून निवृत्त होणे शौच धर्म आहे. शौच म्हणजे पवित्रता.

५) **सत्य** - हित, मित आणि यथार्थ वचनांचा उपयोग करणे म्हणजे सत्यधर्म.

६) **संयम** - ईर्यासमिती इ.मध्ये प्रवृत्तिमान मुनींना त्यांच्या नियमांचे पालन करताना कोणत्याही प्राण्याला किंचितही पीडा होणार नाही आणि इंद्रियांचे संयम होईल अशा प्रकारचे चारित्र असणे म्हणजे संयम. ऐकन्द्रिय इ. जीवांची हिंसा होऊ न देणे म्हणजे प्राणी संयम. आणि शब्द इत्यादी विषयांची विरक्तीला इंद्रिय संयम म्हणतात.

७) **तप** - कर्म क्षय करण्यासाठी जे तप केले जाते ते तप आहे.

८) **त्याग** - सचेतन किंवा अचेतन परिग्रहापासून निवृत्त होण्यास त्याग म्हणतात. परिग्रह सोडणे म्हणजेच त्याग संयमास योग्य असे ज्ञान इ. दान देणे म्हणजे सुद्धा त्याग.

९) **अकिंचन्य** - शरीर इत्यादित संस्कार व राग इ.च्या निवृत्तीसाठी ''ममेमम्'' हे माझे आहे. किंवा कोणात्याही वस्तूत, पदार्थ, व्यक्तियांच्यात आसक्ती पासून परावृत्त होणे म्हणजे अकिंचन्य होय.

ब्रह्मचर्य - कलागुणांनी युक्त सुंदर स्त्रीला भोगले होते. अशाप्रकारे भूतकाळातल्या कामुक गोष्टींची आठवण करणे, स्त्रीकथा श्रवण करणे. वासना उद्रेलित करणारे सुगंधी द्रव पदार्थाचा उपयोग करणे, स्त्री संसक्त शय्या आसन स्थान या व अशाच ब्रह्मचर्य नष्ट करणाऱ्या गोष्टींपासून परावृत्त होणे म्हणजे ब्रह्मचर्य आहे. ब्रह्म म्हणजे गुरू. त्याच्या आधीन

आपल्या वृत्ती ठेवणे ब्रह्मचर्य आहे. आपल्या पाच ही इंद्रियांवर संयम ठेवणे ब्रह्मचर्य होय. गुरूच्या आज्ञेप्रमाणे वागणे म्हणजे सुद्धा ब्रह्मचर्य आहे.[३०२]

बारा अनुप्रेक्षा

प्रस्तुत विषय बारा भावना या अनुप्रेक्षाच आहेत. संवर भावनेत बारा भावनांचे चिंतन करावे असा उल्लेख आहे. म्हणून इथे बारा भावनांचे विवेचन आवश्यक नाही.

बावीस परिसह जय

दुःख झाले तरी दुःखी व्हायचे नाही हे परिसहजय आहे.[३०३] बाह्य व अभ्यन्तर द्रव्यांचे परिणमन रूप शारीरिक व मानसिक पीडा देणारी क्षुधा इ. जिंकणे, त्यावर संयम ठेवणे परिसहजय आहे.[३०४]

बावीस परिसहांचे विस्तृत वर्णन उत्तराध्ययन सूत्राच्या दुसऱ्या अध्ययनात दिले आहे. इथे फक्त बावीस परिसहांचा सामान्य अर्थ देत आहोत.

१) **क्षुधा** - भूक सहन करणे, भूक लागल्यावर धैर्य आणि शांतीने ती सहन करणे म्हणजे क्षुधा परिसहावर विजय.

२) **तृषा** - अतिशय तहान लागल्यावर सुद्धा व्याकुळ न होणे म्हणजे तृषा परिसहावर विजय.

३) **शीत** - भयंकर थंडीत सुद्धा प्रतिकार न करता शांतिने ती सहन करणे.

४) **उष्ण** - ग्रीष्मऋतू इ. कारणांमुळे उन्हाळ्याच्या दाहामुळे मनात चंचल उद्विग्न न होता शांततेने सहन करणे.

५) **दंशमशक** - डास, मच्छर, माश्या, पिसू इ. चावले तरी शांतीने सहन करावे.

६) **अचेल** - वस्त्ररहित राहण्याची वेळ आली तरी लज्जा वाटून घेऊ नये. लहान बालकाप्रमाणे निर्विकार भाव ठेवून इंद्रियांचे विकार उत्पन्न न होऊ देणे हे अचेल परिषह जय आहे.

७) **अरती** - किती ही कष्ट सहन करावे लागले तरी संयम सोडू नये. तसे पाहिले तर सर्व परिसह अरती उत्पन्न करणारे असतात. तरीही धैर्य सोडू नये.

८) **स्त्री** - स्त्रियांचे हावभाव पाहून मन विचलित होऊ देऊ नये.

९) **चर्या** - गावोगावी विचरण करण्याचे कष्ट सहन करणे. भयंकर जंगलात

सुद्धा सिंहाप्रमाणे निर्भय रहावे.

१०) **निषधा** - श्मशान, शून्यस्थानी, गिरिगुंफा अशा जागी ध्यान आदी करताना ज्या आसनात बसलेले असाल त्यावेळी कोणतेही उपसर्ग आले तर त्या आसनात स्थिर रहावे.

११) **शय्या** - शास्त्रानुसार एका कुशीवर, ओबडधोबड भूमीवर झोपावे लागले तरी विचलित होऊ नये. ते कष्टपण शांतीने सहन करावे.

१२) **आक्रोश** - अत्यंत कठोर शब्द ऐकून ही शांत राहणे, क्रोध करू नये हा आक्रोश परिसह जय आहे.

१३) **वध** - पूर्वीचे शत्रुत्व, द्वेषभावामुळे कोणी तिरस्कृत केले, बांधून टाकले, अथवा शस्त्राने मारले तरी वैरभाव न ठेवता उलट क्षमाअमृताने मारणाऱ्याच्या प्रति मैत्रीभाव ठेवणे वध परिसह जय आहे.

१४) **याचना** - आगम विधीप्रमाणे भिक्षा घेणारे साधू अती क्षीण झाले इतकेच नव्हे तर प्राण जाण्याची वेळ आली तरी कधीही दीनतेने अविधीने आहार इ.ची याचना न करणे.

१५) **अलाभ** - अनेक घरा-घरांत जाऊन भिक्षा मिळाली नाही तर मनात किंचितही क्लेश होऊ न देणे अलाभ विजय आहे.

१६) **रोग परिषह** - हे शरीर व्याधींचे घर आहे. समजा शरीरात कोणत्याही रोगाने प्रवेश केलाच तर यास पूर्वजन्मीच्या पापाचे फळ आहे असे समजून त्या परिस्थितीला शांतपणे भोगून घेणे हाच उऋण होण्याचा मार्ग आहे. अशाप्रकारे विचार करून मनस्वास्थ्य टिकवून ठेवणे अवघड कार्य आहे म्हणूनच याला रोग परिसह जय म्हटले आहे.

१७) **तृण स्पर्श** - घास (तृण) काष्ट व बारीक दगड यांचा अवरोध आला तरी दुःख न मानता निश्चल राहणे तृणस्पर्श परिषह जय आहे.

१८) **मल** - शरीर मलीन झाले तरी त्याची घृणा न करणे, परंतु कर्ममल दूर कसे होतील याचेच चिंतन करणे प्रयत्न करणे म्हणजे मल परिषह जय होय.

१९) **सत्कार पुरस्कार** - मान-अपमान यात समचित्तवृत्ती ठेवणे. सत्कार पुरस्काराची आकांक्षाच ठेवायची नाही. फक्त श्रेय मार्गाचा विचार करावा, यास सत्कार पुरस्कार परिषह जय म्हटले आहे.

२०) **प्रज्ञा परिषह** - आपल्या ज्ञानाचा, पांडित्याचा यत्किंचितही गर्व नसावा.

२१) **अज्ञान परिषह** - अध्ययन अभ्यास अप्रमत्त (आळस केला नाही) राहून सुद्धा मी ज्ञान प्राप्त करू शकत नाही. पशूसारखा मूर्ख आहे. कसलेच ज्ञान नाही. असले आक्षेप, वचनांना शांतिपूर्वक सहन करूनही अद्याप ज्ञानातिशय झाले नाही. अशाप्रकारे स्वतःला हीन लेखू नये. दुःखी न होता प्रयत्नशील रहावे असे अज्ञान परिषह सहन करणे म्हणजे त्यास अज्ञान परिषह जय म्हणावे.

२२) **अदर्शन** - संयमप्रधान दुष्कर तप करूनही मला अजूनपर्यंत ज्ञान प्राप्त होत नाही, म्हणून संयम, तप दीक्षा सगळे व्यर्थ आहे. अशा प्रकारचे चिंतन करून मनात अश्रद्धा उत्पन्न करू नये. उलट आपल्या सम्यग्दर्शनाला दृढ करावे. हे अदर्शन परिषह जय आहे.

अशाप्रकारे बावीस परिषह शांततापूर्वक सहन करण्याने संवर होतो. कोणत्याही प्रकारची वेदना उत्पन्न झाली तर आत्मस्वरूपाचे चिंतन करावे. व्याकुळ न होता सर्व परिषह सहजतेने सहन करणे यास परिषह जय म्हणतात.[३०५]

पाच चारित्र्य

संवराच्या सत्तावन्न भेदांमध्ये परिषहचे वर्णन केल्यानंतर चारित्र्याचे वर्णन येते. चारित्र्याचे पाच प्रकार आहेत.

१) सामायिक २) छेदोपस्थापना ३) परिहार विशुद्धी ४) सूक्ष्म संपराय ५) यथाख्यात[३०६]

१) **सामायिक चारित्र्य** - सर्व सावद्य योगांचा अभेद रूप सर्वकालिक अथवा निश्चित वेळेपर्यंत त्याग करणे सामायिक आहे.

२) **छेदोपस्थापना** - प्रमादामुळे स्वीकारलेल्या निरवद्य क्रियेत अर्थात दीक्षा घेतल्यानंतर कोणताही दोष लागला तर त्याचा सम्यक् प्रतिकार करावा. दंडरूपात अगोदर पालन केलेल्या दीक्षेचा छेद करणे, रद्द करणे आणि मग पुन्हा महाव्रत अंगिकार करणे यास छेदोपस्थापना चारित्र्य म्हणतात.

३) **परिहारविशुद्धि** - ज्यात प्राणिवधाचा पूर्ण परिहार व त्याचबरोबर विशेष प्रकारची विशुद्धी असणे यास परिहारविशुद्धी चारित्र्य म्हणतात. विशेष प्रकारच्या तपाने विशुद्धी होणे या चारित्र्याचे वैशिष्ट्य आहे. या चारित्र्याचे दुसरे वैशिष्ट्य हे की ३० वर्षाच्या

वयाचे, ज्याने तीन वर्षापासून नऊ वर्षापर्यंत तीर्थंकरांच्या चरणांची सेवा केली असेल प्रत्याख्यान नावाच्या पूर्वाचे पारंगत, अप्रमादी, उत्कृष्ट निर्जराशाली साधुला परिहारविशुद्धी चारित्र्य असते.

४) सूक्ष्मसम्पराय चारित्र्य - सूक्ष्म स्थूल प्राण्यांच्या वधापासून पूर्णपणे निवृत्त आहे. अप्रमत्त आहे. अत्यंत निर्बाध उत्साहशील, अखण्डित चारित्र, सम्यग्दर्शन आणि सम्यग्ज्ञान रूपी भयंकर गतिमान हवेच्या प्रवाहात प्रशस्त अध्यवसाय रूपी अग्नीज्वालामुळे कर्मरूपी ईंधनाला जाळून टाकले आहे. ध्यानाच्या विशेष क्रियेने कषायाचे विषांकुर नष्ट केले आहे. सूक्ष्म मोहनीय कर्माच्या बीजत्वपण ज्यांनी नाश केला आहे, त्या परम सूक्ष्म लोभ कषायवाले साधूंचे सूक्ष्मसंपराय चारित्र असते.

५) यथाख्यात चारित्र - जो मोहाच्या संपूर्ण उपशम किंवा क्षय झाल्यानंतर प्रकट होतो. त्यास यथाख्यात म्हणतात कारण की, जसा परिपूर्ण शुद्ध आत्मस्वरूप आहे. तसाच यात आख्यात प्राप्त होतो. किंवा भ. अरिहंतांनी शास्त्रात जसे सांगितले आहे तशा चारित्र्याला यथाख्यात म्हणतात. यामुळे सर्व कर्मांचा क्षय होतो.

हे चारित्र्य पूर्वास्रवाचा निरोध करतात म्हणून परम संवर रूप आहे. [३०७]

मूलाचारात आचार्य वट्टकेर यांचे ही हेच मत आहे. की, ज्या कारणांमुळे आस्रवद्वाराने कर्म येतात त्याचा निरोध करणे म्हणजे संवर होतो. इंद्रिय, कषाय इ. दोष तप, ज्ञान, विनय यांच्याद्वारे निगृहित होतात ज्याप्रमाणे बेफाम झालेले घोडे लगामाने ताब्यात ठेवले जातात.[३०८]

इंद्रियांचा तप केल्याने निग्रह होतो. कषाय, ज्ञान भावनाने वश केले जातात आणि विनय क्रियाद्वारे द्वेष नष्ट होऊन जातो. मन वचन काया द्वारा इंद्रियांना वश करून समितीच्या पालनात अप्रमादी झाले तर साधूंचे आस्रवद्वार बंद होतात व नवीन कर्म रज येत नाहीत, आस्रव होत नाही.

मूलाचारात दर्शन विरतिनिग्रह, निरोधाने मिथ्यात्व अविरती, कषाय आणि योगाच्या साह्याने कर्माचे येणे थांबते असे सांगून आस्रव व संवर दोन्हींचा एकाच पद्यात समावेश केला आहे.[३०९]

संवराचे फळ निर्वाण आहे म्हणून यात आचार्यांनी प्रेरणा दिली आहे की नेहमी उद्यमशील विशुद्ध आत्म्याने या संवर भावनेची भावना करावी.[३१०]

परमार्थ स्वरूपात जितके लीन होऊ तितका संवर होईल. भरत चक्रवर्ती जेव्हा युद्ध करीत होते तेव्हा पुंडरिक गणधरांनी भ. ऋषभ देवांना विचारले, भरत चक्रवर्तीचे यावेळी मनाचे परिणाम कसे आहेत ? भगवान म्हणाले तुझ्या सारखेच आहेत.

युद्ध करीत असताना सुद्धा भरत महाराज अकर्ता भावनेने युद्ध करीत होते. त्यांचे लक्ष सगळे ऋषभदेव भगवानांकडे लागलेले होते. युद्धात ते फक्त शरीराने होते मनाने नाही. जेव्हा ऋषभदेव भगवानांनी दीक्षा घेतली तेव्हा भरतचक्रवर्तीनासुद्धा दीक्षा घेण्याची भावना झाली होती. परंतु भ. ऋषभदेवांनी त्यांना सांगितले की या युगलियावर जर योग्य राजा नसेल तर आपआपसात भांडतील. म्हणून तू राज्य कर. तुझ्या प्रारब्धातच राजा होण्याचे लिहिले आहे. आणि माझ्या नशीबात दीक्षाच आहे. अशाप्रकारे भरत महाराजांनी पिताच्या आज्ञेला स्वीकारून सहा खंडाचे राज्य सांभाळले. परंतु आश्चर्य हे की सहा खंडाचा महान राजा असूनही त्यांचे चित्त मात्र परमात्म्यात रममाण असायचे. हे काम तर चांगल्या चांगल्या मुनींना सुद्धा अशक्य होते ते त्यांनी अगदी सहजपणे असे भाव ठेवले. म्हणूनच संसारात राहून सुद्धा त्यांनी कर्म क्षय केले. ऋषभदेव भगवान दीक्षा घेतल्यानंतर हजार वर्षांपर्यंत छदमस्थ अवस्थेत विचरण करीत होते. आणि भरत चक्रवर्ती गृहस्थाश्रमात असून सुद्धा केवल ज्ञानी झाले.[३११]

तात्पर्य हे की, मनुष्य बाह्यरूपाने कोणत्याही अवस्थेत असेना का, परंतु त्याचे आंतरिक (मनाचे) परिणाम जर शुद्ध असतील परमात्म भावात लीन असेल, कशातही राग (आसक्ती) नसेल तर जीव निश्चितपणे शुद्ध, दशेला प्राप्त करू शकतो.

भगवती आराधनामध्ये आचार्य शिवार्यांनी मूलाचार प्रमाणेच संवर भावनेचे वर्णन केले आहे. परंतु त्यांनी प्रमादाच्या संवराचे ही वर्णन केले आहे. इंद्रिय संवरासाठी सुंदर उदाहरण दिले आहे. उदा. ज्याच्याजवळ विद्या, मंत्र, औषध नाही तो सर्पाला वश करू शकत नाही. त्याचप्रमाणे ज्याचे मन चंचल आहे तो इंद्रियरूपी सर्पाला वश करू शकत नाही.

ज्याप्रमाणे लाकडाच्या छोट्याशा फळीने नावेत येणाऱ्या पाण्याला थांबवू शकतो, त्याचप्रमाणे अप्रमादरूपी फळीने अशुभ परिणामरूपी आस्रवद्वार रोकू शकतो.

याच गाथेच्या टीकेत लिहिले आहे की सत्य, स्वाध्याय, ध्यान, एकाग्रता हे विकथा नामक प्रमादाचे प्रतिपक्षी आहेत. क्षमा, मार्दव, आर्जव कषाय, प्रमादाचे विरोधी आहेत. ज्ञानाच्याद्वारे मनाला एकाग्र करून इंद्रियांच्या विषयात राग, द्वेषामुळे उत्पन्न होणारे

दोषांचे स्मरण केल्याने विषयाची उपलब्धी झाल्यावर आदर न करणे इंद्रिय प्रमादाचा विरोधी आहे.

ज्याप्रमाणे शत्रूचे सैन्य शहराच्या चारी बाजूला असलेल्या खाई अर्थात किल्याच्या चारीबाजू नाळे असले तर अशा सुरक्षित नगरीला नष्ट करू शकत नाही. त्याचप्रमाणे कर्मरूपी शत्रूची सेना गुप्ती आदी खाईने युक्त संयमरूपी नगरीला नष्ट करू शकत नाही. ही गुप्ती संवरामुळे शक्य होते.

समिती नावाच्या मजबूत नावेत आरूढ होऊन साधू षट्जीवनी कायेच्या जीवांची हिंसेच्या पापरूपी मगरीपासून दूर राहून संसार समुद्राला पार करतो.[३१३]

या प्रमाणे प्रमाद, कषाय, इंद्रिय इ. आस्रवांचा कशाने निरोध होतो असे चिंतन करून गुप्ती आणि समितीने संवृत्त होऊन सतत चिंतन करणे संवर भावना आहे.

कार्तिकेयानुप्रेक्षात पूर्व वर्णित संवराचे सत्तावन्न भेद यांचे संक्षिप्त उल्लेख आहे.[३१४] पुढे गुप्ती इ. चा काय उपयोग आहे याचे वर्णन करताना लिहिले आहे की, मन, वचन, काया याच्या योगाच्या प्रवृत्तीला आळा घालणे यास गुप्ती म्हणतात. प्रमादाचा त्याग करणे म्हणजे समिति आहे. ज्यात दया मुख्य आहे तो धर्म आहे. तत्त्वांच्या चिंतनाला अनुप्रेक्षा म्हणतात. भूक वगैरे सहन करणे यास परिषहजय म्हणतात. आणि रागादी अवगुणांचा त्याग करून धर्मध्यान किंवा शुक्लध्यानाने आत्म्याचे आत्म्यात लीन होऊन जाणे म्हणजे चारित्र्य. जी व्यक्ती या संवराच्या कारणांचा विचार करून ही जर आचरण करीत नाही ती दुःखाने संतप्त होऊन चिरकालपर्यंत संसारात भ्रमण करते. परंतु जी विषयापासून विरक्त होऊन मनाला आकर्षित करणाऱ्या इंद्रियांच्या विषयापासून स्वतःला नेहमी दूर ठेवते. त्यात प्रवृत्ती करीत नाही. त्याच मुनींचे निश्चयपणे संवर होते.[३१५]

इथे एक गोष्ट विशेष ज्ञातव्य आहे की संवर तर विरतीमूलक आहे. परंतु संवराचे जे कारण सांगितले आहेत त्यात काही प्रवृत्तीमूलक सुद्धा आहेत. प्रवृत्ती निवृत्तीचे कारण कसे होऊ शकेल ? परंतु इथे हे समजण्या योग्य आहे की ह्यात मुख्यतः निवृत्तीचीच आहे.

गुप्ती तर निवृत्तीचे मूल कारण आहेच. समितीमध्ये जी प्रवृत्ती आहे, ती सुद्धा आत्मजागरूकता मूलक आहे. म्हणून निवृत्ती मुख्य आहे त्या दृष्टीने हिला संवराचे कारण म्हटले आहे.

जो साधक प्रवृत्तीला वश करण्यात असमर्थ होतात, त्यांना प्रवृत्ती कशी करावी, त्याचे उपाय सांगण्याच्या उद्देशाने समितींचे महत्त्व आहे. शेवटी प्रवृत्ती तर थांबवल्याच

पाहिजे. प्रवृत्ती करताना प्रमाद होऊ नये, यासाठी धर्म आहे. अर्थात धर्माचरणाने असत् आचरण होत नाही.

धर्मात दृढता यावी त्यासाठी अनुप्रेक्षा आहेत. अत्यधिक भयानक वेदनांना सहन करणे परिषहजय आहे. रागादी दोषांपासून परावृत्त होऊन शुभध्यानात अनुरक्त आत्मस्वरूपाचा साक्षात्कार प्राप्त करण्यासाठी योग्य पुरुषार्थ करणे चारित्र्य आहे. अशा प्रकारच्या आराधनेने आत्मा संवरोन्मुख होतो. म्हणून जो साधक विषयांपासून विरक्त राहतो त्याचा निश्चित संवर होतो. म्हणून मोक्षाभिलाषी साधकाने या भावनेचे सतत चिंतन-मनन करावे.

आचार्य शुभचंद्र संवराचे विशेष महत्त्व सांगताना म्हणतात - ज्याप्रमाणे युद्धाच्या समरांगणात युद्ध करणारा चिलखताने शरीरावर कवच घालतो मग कोणताही बाण त्याला भेदू शकत नाही. त्याचप्रमाणे यमी म्हणजे अहिंसा इ. यमाने संवृत्त सुरक्षित योगी असंयममय बाणांनी विद्ध होत नाही. [३१६]

संवराला कवचाची उपमा देऊन आचार्यांनी स्पष्ट केले की, संवर प्राप्त केल्यानंतर आस्रवाद्वारा येणारे कर्मप्रवाह त्यास आक्रान्त करू शकत नाही. ज्याप्रमाणे बाण शरीरात घुसला तर भयंकर वेदना होतात. कष्ट उत्पन्न होतात. अशाचप्रकारे आस्रवामुळे आत्मप्रदेशाबरोबर संश्लिष्ट होणारे कर्म आत्म्यात पीडा उत्पन्न करतात.

एक चिंतक साधकाने आपल्या मनात अशाप्रकारचे भावचित्र निर्माण करावे की मी संवराचे कवच धातले आहे. आपल्यावर कषायरूपी शत्रूच्या बाणांचा वर्षाव होत आहे. परंतु एक ही बाण शरीरात घुसत नाही. अशा प्रकारच्या भावचिंतनाने खरोखर असे वाटू लागते की संवराचे कवच जरूर अंगीकार करावे जेणेकरून कर्मरूपी तीक्ष्ण बाण आत्म्यात प्रवेशच करू शकणार नाहीत.

आचार्य हेमचंद्रांनी द्रव्य व भाव रूपात संवराचे दोन भेद केले आहेत. यांनी म्हटले आहे की, कर्म पुद्गलांना ग्रहण करण्याचा उपक्रम द्रव्य संवर आहे. आणि भवभ्रमणापासून मुक्ती मिळावी यासाठी केलेल्या क्रिया भावसंवर आहेत. त्यांनी असे म्हटले आहे की, ज्या-ज्या आस्रवांना, ज्या-ज्या उपायांनी परास्त करता येईल त्यासाठी विवेकशाली साधकाने तो उपाय अवश्य अमलात आणावा. हिलाच संवर भावना म्हणतात.[३१७]

श्रीसोमदेवसूरी संवरभावनेचे विवेचन करताना लिहितात की, जीव नवीन येणाऱ्या

कर्माच्या राशींना आपल्या सत्तत्त्वरूपी संवरने आणि ध्यान रूपी हाताने थांबवतात. म्हणजे कर्मप्रवाहाला थांबविण्याची प्रक्रिया करतात. तत्त्वज्ञान युक्त ध्यानाने आस्रवांना थोपवू शकतो. स्वतःला पुण्यवान सिद्ध करण्यासाठी पापस्रवाला थांबव. जो आत्म्याचे चिंतन करतो, ध्यान करतो, तो इंद्रियजन्य क्रोधाचा परित्याग करतोच जो मनाला विषय कषांनी संकुचित करतो, तो तू आहेस.

अशाप्रकारच्या चिंतनाने आत्मा संवराशी जोडला जातो. ज्याप्रमाणे जे जहाज विघ्नरहित असते. भयंकर वादळानेरहित असते ते समुद्र पार करू शकते. तसेच जीव आपआपल्या संचित कर्मांना दूर करतो. नष्ट करतो. आणि आस्रवांना क्षीण करतो. नवीन कर्मास्रव रहित होतो. तो परमपद मोक्ष प्राप्त करतो.[३१८]

ज्याप्रमाणे नर्तकी नृत्याचे आयोजक नाट्याचार्यांच्या संचालकाप्रमाणे रंगभूमीवर नाना प्रकारच्या रस व भाव प्रदर्शित करते व नृत्य करते. परंतु जो विजिगीषुजीतचा इच्छुक विजयाची इच्छा ठेवणारे कामाच्यापुढे अर्थ पुरुषार्थाच्या प्राप्तीसाठी त्या नृत्य करणाऱ्या नटीला थांबवतात. त्यात विशिष्ट हिताहित विचार प्रकट होतो. त्याचप्रमाणे ज्ञानावरण इ. कर्माच्या विपाक वश होऊन आत्मारूपी रंगभूमीवर अनेक प्रकारचे रस व भाव व्यक्त करून चित्तशक्ती स्पंदन करते. मुख्य पुरुषार्थ मोक्ष अथवा धर्म प्राप्तीसाठी जे मुनी, त्यांना रोकतात, त्यांची अनिर्वचनीय उत्कृष्ट विवेक अर्थात शुद्धोपयोगामध्ये स्थिती प्रकट होते.[३१९]

शुद्धोपयोगात स्थित राहण्याने संवर होतो. कल्पनाविलासापासून दूर राहून जेव्हा मन आत्मस्वरूपात निश्चल होतो, तेव्हाच परम संवर होतो.

शुद्ध आत्मस्वरूपाचा घात करणारे मिथ्यात्व इ. शत्रूसैन्याची हिंमत वाढवतात त्यांना थांबवण्यासाठी विचारशील मुमुक्षु सम्यग्दर्शन इ. योद्धांना योग्य ठिकाणी नियुक्त करतात. ते नरक, तिर्यंच, कुमनुष्य, कुदेव, पर्यायात भ्रमण करायला लावणारी समस्त असातावेदनीय इ. पापकर्म प्रकृतीच्या बंधाला तर रोकतातच त्यावरोबर देवेंद्र, नरेंद्र इ. विभूतीची सम्पदा इच्छा नसताना सुद्धा त्या भाग्यशालींना मिळते.[३२०]

पंडित आशाधरांनी महाक्रोधीची लढाई महाधीराशी असे वर्णन केले आहे. आस्रवाच्या भेदांचा संवराच्या भेदांशी युद्ध असे चित्रण उपस्थित करून सत्चा विजय झाल्यावर जी सम्पदा प्राप्त होते त्याचे अत्यंत सुंदर शब्दात वर्णन केले आहे.

महाकवी रइध् यांनी 'पासणाहचरिउ' मध्ये संवरानुप्रेक्षाचे वर्णन करताना

मिथ्यात्वाच्या निरोधासाठी सम्यक्त्व इ.चा अन्य लेखकाप्रमाणेच वर्णन केले आहे. आणि पुढे लिहिले आहे अशुभ लेश्या, संज्ञा आणि अशुभ गौरवाच्या त्यागाने तथा शुद्ध भावना ठेवल्याने संवराची वृद्धी होते. ज्याप्रमाणे मजबूत बांधलेल्या घाटावर सरोवराचे पाणी येत नाही त्याचप्रमाणे संवराने युक्त झाल्यावर आत्म्यात कर्ममल प्रविष्ट होऊ शकत नाही. मोक्षमार्गासाठी संवर सहचर (मदतनीस) आहे. तो चतुर्गतीच्या तापाच्या भयापासून दूर ठेवणारा आहे.[३२१]

संवर भावनेसंबंधी उपाध्याय श्रीविनयविजयजींनी मुक्ती प्राप्त करण्याचे उपाय सांगितले आहेत. त्यात ज्ञान, दर्शन, चारित्र मूलक आराधनामय तीन उत्कृष्ट रत्नांना अवश्य शिव सुखाचे उत्तम उपाय सांगितले आहे. या उपायांचा स्वीकार करण्यासाठी विषय विकार व कषायरूपी शत्रूवर विजय मिळवून शीघ्र संयम गुणाची आराधना करण्याचा उपदेश दिला आहे. ते लिहितात- क्रोधरूपी अग्नी विझवण्यासाठी ढगासारखे उपशम भाव याचे सतत चिंतन करून, हृदयात जो परभाव भरलेला आहे तो दूर करून वैराग्य भावाचे चिंतन करा. आर्त आणि रौद्र ध्यानाचे मार्जन करा. मानसिक संकल्प-विकल्पाला जाळून टाका. जरा मानसिक संकल्प-विकल्पाचा मार्ग अवरुद्ध झाला तर तो तत्त्ववेत्ताला जो मार्ग मिळायला पाहिजे तो मिळू शकणार नाही. अंतरजागृती पूर्वक मानसिक शुद्धीने युक्त संयम योगद्वारा आपल्या देहाचे सार्थक करा. अर्थात आपल्या मनाच्या योगांना शुद्ध करा. संयत आचाराचे पालन करा. याने आपला मानव देह प्राप्त करणे सफल होईल. या संसारात विभिन्न मत-मतांतरांचे विषम जंगल पसरलेले आहे. जो भव अटवीत भटकवणारा आहे, त्यातून आपला शुद्ध मार्ग निश्चित करा. संयम व शास्त्ररूपी पुष्प-सौरभने तुम्ही आपल्या मनाच्या परिणामांना, अध्यवसायांना खूप सुरभित करा. ज्ञान, चारित्र्य गुणरूपी उत्तम लक्षण युक्त आत्मस्वरूपाचा अनुभव करा. जिनेश्वराच्या चारित्राचे सतत गुणगान करा. नामस्मरणाने आपली जिव्हा पवित्र करा. विनयपूर्वक शांत सुधारसाचे पान करा आणि दिर्घकालापर्यंत सुख प्राप्त करा, आनंद प्राप्त करा.[३२२]

यात ग्रंथकाराने संवराबद्दल साधकाचे मन आकर्षित करून खालील विषयांचे प्रतिपादन केले आहे.

ज्ञान-दर्शन, चारित्र - या रत्नत्रयींची परम आराधना करणे.

विषय - कषयांना दूर करणे.

उपशम रसाचे अनुशीलन करणे.

संसारापासून विरक्त राहणे.

कोणत्याही प्रकारचा संकल्प-विकल्प न करणे.

मानसिक भ्रमांचा निरोध करणे.

निरंतर संयममय प्रवृत्तीत राहणे.

शरीराचा सद्उपयोग करून त्याचा लाभ प्राप्त करून घेणे.

विविध पंथातील जे जे सत्य मार्ग आहेत, त्यांचा स्वीकार करणे.

संयम आणि आगमाच्या ज्ञानाने अध्यवसाय निर्मळ करणे.

चैतन्याचे गुण व पर्याय ओळखणे.

तीर्थंकरांच्या चरित्राची स्तुती करावी, गुणगान करावे.

संवरभावनेत त्यागाला महत्त्वाचे, मुख्य स्थान आहे. ज्याला आपण आपले मानतो त्याचा त्याग कसा करावा ह्याचे वेगवेगळे मार्ग दाखवले आहेत.

आत्मविकास साधण्यासाठी संवरभावना अतिशय महत्त्वपूर्ण आहे. आपला कोणत्या कर्माशी संबंध आहे, त्यासाठी कोणता उपाय योग्य आहे हे प्रत्येक व्यक्तीने शोधले पाहिजे. परंतु त्या सर्वात त्यागभाव संसारापासून विरक्ती, उपशम भावाचा आदर, अकषायी वृत्ती, आस्रव मार्गावर विजय आणि शुद्ध देव, गुरू, धर्मावर श्रद्धा अथवा सम्यक्त्व असणे अती आवश्यक आहे.

सम्यक्त्व प्राप्तीशिवाय केलेली कोणतीही साधना, क्रिया म्हणजे एक अंकामागे लावलेल्या शून्यासारखी आहे. इलेक्ट्रिक लाईट किंवा सूर्याचा प्रकाश चहुकडे फैलावला असेल परंतु ते पाहण्यासाठी डोळेच जर नसतील तर काय फायदा ? भूमी व बीज दोन्ही उत्तम प्रकारचे आहेत. परंतु पाऊसच पडला नाही तर काय उपयोग ? अगदी याचप्रमाणे समकित दृष्टी जर नसेल तर तप, जप, क्रिया सगळे व्यर्थ. समकितदृष्टीशिवाय इच्छित मोक्षसुख प्राप्त होऊच शकत नाही. ज्याच्या आत्मारूपी जमिनीत समकित रूपी बी पेरलेले असेल तर त्यालाच संयम म्हणतात.[३२३] प्रत्येक क्रियेत सम्यग्दृष्टी असेल तरच ती क्रिया फलदायक असू शकते. म्हणून मुनी रत्नचंद्रजींनी संवर भावनेच्या प्रथम गाथेमध्ये समकितचे महत्त्व सांगितले आहे की, आस्रवाचे प्रथम द्वार मिथ्यात्व आहे. त्याला बंद करण्याचा उपाय म्हणजे संवर होय. मुनी रत्नचंद्रजीच्या भावनाशतकानुसार संवराचा प्रथम भेद समकित आहे समकिताचे पाच भेद-

मिथ्यात्वद्वाराचा अवरोध उपशम, क्षयोपक्षम अथवा क्षयरूपाने होतो. त्याच्या भेदाबरोबर समकितचे ही भेद केले गेले आहेत.

१) **उपशम समकित** - मिथ्यात्व मोहनीयचा अवरोध उपशम, रूप असेल तर त्यामुळे प्रकट होणारे समकित असते त्यास उपशम समकित म्हणतात.

२) **क्षयोपशम समकित** - मिथ्यात्व मोहनीयचा थोडा क्षय आणि थोडाउपशम क्षयोपशम रूप असतो त्या समकितचे नाव क्षयोपक्षम समकित आहे.

३) **क्षायिक समकित** - मिथ्यात्व मोहनीय प्रकृतीचा सर्वथा क्षय झाल्यामुळे जे समकित प्राप्त होते त्यास क्षायिक समकित म्हणतात.

४) **सास्वादान समकित** - समकित गेले आणि मिथ्यात्वमध्ये जाणार त्यामधल्या काळात समकितचा थोडा आस्वाद राहतो. या पतित अवस्थेला सास्वादान समकित म्हणतात.

५) **वेदक समकित** - मिथ्यात्व मोहनीयचा सर्वथा क्षय करण्याच्या अंतिम स्थितीला वेदक समकित म्हणतात. एक समयानंतर लगेच क्षायिक समकित प्रकट होते.

वरील पाच समकितांपैकी प्रथम तीन समकित मुख्य आहेत. तीन पैकी कोणतेही एक समकिताचे आस्तित्व आत्मोत्थानसाठी अती आवश्यक आहे.

सम्यग्दृष्टी बाहेरून प्राप्त होत नाही. ही तर आन्तरिक भावनेतून प्रकट होते.

सम्यग्दृष्टी जीव गृहस्थावस्थेत राहतो. प्रत्येक सांसारिक व्यवहार व्यवस्थित करतो. परंतु सम्यग्दृष्टी असलेल्या जीवाची अंतरदशा अशी असते-

सम्यग्दृष्टी जीवडो करे कुटुम्ब प्रतिपाल ।
अंतर से न्यारो रहे, ज्यो धाय खिलावे बाल ॥

अशा अवस्थेत सांसारिक दुःख आत्म्याला स्पर्श करीत नाहीत. यामुळे अन्तःकरण प्रफुल्लित राहून धर्मात नेहमी मग्न राहतो.

संवराचा दुसरा भेद विरतीव्रत आहे. ज्याप्रमाणे औषध घेतल्याशिवाय रोग बरा होत नाही. जेवल्याशिवाय भूक भागत नाही. पाणी प्यायल्याशिवाय तहान शमत नाही. त्याचप्रमाणे विरतीव्रताशिवाय कर्मरूपी रोगजंतु येण्याचे बंद होत नाहीत.[३२४]

महाव्रत आणि अणुव्रत हे व्रतांचे दोन प्रकार आहेत. महाव्रतांपेक्षा लहान व्रतांना अणुव्रत म्हणतात. छोटे-छोटे अणुव्रतसुद्धा पाप प्रवाहाला अडवतात, असे जिनेश्वर

भगवानांनी म्हटले आहे. ती अणुव्रते बारा प्रकारची आहेत, जे श्रावक धारण करतात.

अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे पाच महाव्रते आहेत. महाव्रत सर्वथा पापक्रियांपासून परावृत्त करतात. अणुव्रतामध्ये एक देश (अंशतः) पापक्रिया पासून परावृत्त होऊ शकतात. आणि एक देश (अंशतः) ने पाप क्रिया चालू राहते. गृहस्थाश्रमात राहत असताना पूर्णपणे पापक्रिया पासून अलिप्त राहणे अशक्य आहे. म्हणून अणुव्रतांद्वारे त्यात थोडी सूट दिली आहे. कित्येक पापक्रिया अशा आहेत की आपण करीत नाही. परंतु जोपर्यंत प्रत्याख्यान-नियम करीत नाही तोपर्यंत सूक्ष्म रूपात पापकर्म आपल्याकडे येतच असतात. म्हणून नियमव्रताच्या बंधनात आपल्याला आपण बांधून घेतले तर पापक्रिया येण्याचे थांबतात. म्हणून ज्याच्याशिवाय आपले काम चालू शकते तशा प्रत्येक पापक्रियांचा निरोध करण्यासाठी व्रत धारण करायला पाहिजे.

जसे अहिंसा इ. पाच महाव्रते आहेत तशीच अणुव्रते १२ आहेत. अहिंसादी पाच व्रते, दिशाव्रत, भोगोपभोग व्रत, अनर्थ दण्ड विरमण, सामायिक व्रत, दिशावकाशिव्रत, पौषधव्रत, अतिथि संविभागव्रत.

आस्रव भावनेत जे अव्रत आहेत खरे म्हणजे त्यांनाच व्रतात घ्यायला हवे होते. परंतु श्रीरत्नचन्द्रजी महाराजांनी इथे ते व्रत न घेता १२ अणुव्रत घेतले आहेत. तसे पाहिले तर पाच इंद्रिय, सहावे मन आणि सहा काय असे हे बारा अव्रत त्यांनी सांगितले आहेत. ह्यांचा अहिंसाव्रतात समावेश होतो. म्हणून कदाचित श्रीरत्नचंद्रजी म. नी समग्ररूपाने व्रतांचे पालन करण्यासाठी बारा अणुव्रतांचे प्रतिपादन केले आहे.

संवराचा तिसरा भेद अप्रमाद - याचे वर्णन करताना ते लिहितात की वृद्धावस्थेत शरीर दुर्बल होते. रोग झालाच तर शरीर झिजायला लागते. लोभ केल्यामुळे ज्याप्रमाणे कीर्तीचा नाश होतो, तसेच प्रमाद केल्यामुळे मानसिक व आत्मिक गुणांचा नाश होतो. म्हणून गुण-संपत्ती आणि सुख-संपत्तीची अभिलाषा ठेवणाऱ्यांनी अप्रमादी राहून शुभ पुरुषार्थ करायला पाहिजे.[३२५]

अप्रमादचा क्रम व्रतांच्या नंतर येतो. व्रत घेऊन पापक्रिया थांबविण्याचे सामर्थ्य प्राप्त केले. परंतु त्यांचे पालन करताना किंचित मात्र शिथिलता केली तर कर्मास्रव थांबवणे कठीण होईल. ज्याप्रमाणे औषधाने रोग तर दूर झाला परंतु वैद्याने जे पथ्य सांगितले होते त्याचे पालन केले नाही तर रोग परत उद्भवण्याची शक्यता आहे. कारण पथ्य पाळण्यात प्रमाद केला. हीच गोष्ट कर्मरोगावर लागू होते. सम्यक्श्रद्धा व व्रतरूपी औषधीने कर्मरोग

दूर झाला खरा. परंतु त्यानंतर सम्यक्प्रकारे प्रवृत्ती केली नाही तर कर्मरोगाचे परमाणू नष्ट होऊ शकणार नाहीत. प्रमाद रोग अप्रमादाने दूर होऊ शकतो. अप्रमादाचे महत्त्व भावनाशतकामध्ये असे सांगितले आहे- एखाद्या माणसाला ताप आला आणि तो उतरला की त्याला काही खाण्याची इच्छा होते, पोटात चिकलेला मैला साफ झाला की पोटातील पीडा शांत होते. त्याचप्रमाणे जेव्हा प्रमाद दूर होतो तेव्हा मानसिक व आत्मिकगुण उत्पन्न होतात. आणि जसजसे गुण उत्पन्न होत जातात तसतसे दोषांचा विलय होत जातो. आणि त्याबरोबरच मन आणि आत्म्याची दुर्बलता दूर होते.[३२६]

संवराचा चतुर्थ भेद अकषाय - क्रोध, मान, माया लोभ यांचे अंनतानुबंधी इ. भेदांचे १६ भेद आणि ९ कषाय असे २५ कषायांचे वर्णन आस्रवभावनामध्ये केले गेले आहे. अकषायमध्ये असे चिंतन करायचे आहे की- या कषाय चांडाळापासून मी कधी मुक्त होईन. ज्या क्षणी या कषायांचा संग सुटेल तो क्षण खऱ्या सुखाचा क्षण होईल.[३२७]

संवराचा पाचवा भेद अशुभ योगाचा त्याग आहे - मनाने कोणाचे वाईट करू नये. दुष्ट इच्छा करू नये. कोणाचीही ईर्षा करू नये, किंवा वैर ठेवू नये. असे केले तर हे मानसिक अशुभ योग आहेत. वाचिक अशुभ योगात व्यक्ती कोणाचीही निंदा करते. शिव्या देते, खोटा आरोप ठेवते, किंवा असत्य भाषण करते. कायिक अशुभ योगात व्यक्ती कोणाच्या हक्काची वस्तु हिसकावून घेते. चोरी करते. व्यभिचार कर्माचे सेवन करते. विषयांची आसक्तीमध्ये इंद्रियांचा उपयोग करते. या सर्व अशुभ प्रवृत्ती धार्मिक व आत्मिक शक्तींचा विनाश करतात. म्हणून अशुभ प्रवृत्तींना रोकण्यासाठी आत्मिक शक्ती प्रकट करून शुभ धर्माचा आश्रय घेण्याने संवर होतो. व संवरामुळे मुक्तीचा मार्ग मिळतो.[३२८]

पंडित श्रीरत्नचंद्रजींनी आस्रव व संवराचे मुख्य पाच भेद मुख्य पायाच्या रूपात ठेवून विश्लेषण केले आहे. त्यामुळे साधक सहजतेने समजू शकतात. मिथ्यात्व, अव्रत, प्रमाद, कषाय आणि अशुभ योग द्वारा कर्मास्रवाचे आगमन आणि समकित, व्रत, अप्रमाद, अकषाय व शुभ योगाने कर्मास्रवचा निरोध सांगून जैन दर्शनाच्या गहन विषयाचे सोप्या भाषेत प्रतिपादन केले आहे ही त्यांची एक विशेष शैली आहे.

श्रीजयसोममुनी दोहा छंदाद्वारे संवर भावनामध्ये मन एकाग्र करण्याची प्रक्रिया सांगताना म्हणतात- आपल्या शुभ मनाला मानसरोवर मानून त्यात शुभ ध्यानरूपी अमृतरस

भरलेला आहे असा विचार करून मग हृदयसरोवरात नवकार मंत्राला स्थापित करून, नऊ पाकळ्या असलेल्या कमळफुलाची कल्पना करावी. एका एका पाकळीवर नवकार मंत्रातील एक-एक पद अंकित करावे.

नवकारचे पद अंकित केल्यानंतर त्या पदाचे ध्यान केल्याने पाप-पंक हटतील व मन सरोवराच्या चहुकडे संवराचा बांध घालून व जगातील सर्व जंजाळातून मुक्त होऊन परमहंस, परमात्मपदाचे ध्यान करावे. असे केल्याने हे भवी जीवा ! मनरूपी मानस सरोवरात रमण करणाऱ्यांनो, हंसातून परमहंस पदवी प्राप्त करा.[३२९]

पुढे काव्यात श्रीजयसोममुनी लिहितात की, हे भव्यात्मा, या आठव्या संवर भावनेचे एकाग्र होऊन चिंतन कर, समिति, गुप्ति धारण करून हे सुलक्षणी जीवा, तू शांति सुधारसाचा आस्वाद घे. हा मनरूपी भ्रमर तर विषयरूपी फळ-फुलांवर भटकत राहतोच अर्थात मन वारंवार इंद्रियांच्या विषयात भटकत आहे. त्याला आळा घालून शांतीउपशम प्रशममध्ये स्थिर कर. आत्म्यात सहजपणे असलेली तृप्ती, अनिच्छा, उदासीनतामध्ये स्थिर कर. याने मनोगुप्तीचा संवर साध्य होतो.

परिषह संवर साधण्यासाठी इष्ट वस्तुच्या प्राप्ती किंवा अप्राप्तीमध्ये मन आनंदित किंवा दुःखी करू नये, समभावात रहावे. जीवन-मृत्यूला समान समजावे. अर्थात् जगण्याचा लोभ नाही, मरणाचे भय नाही. शत्रू मित्रांच्या मान अपमानात समभाव ठेवावा.[३३०]

या श्लोकात कवीचा आशय असा आहे की, इष्ट लाभ किंवा अलाभ याने आत्म्याच्या ज्ञानादी संपत्तीमध्ये कोणताच फरक पडत नाही. आणि अरूपी ज्ञानमय शुद्ध आत्मस्वरूपाला जीवन मरणाने कोणतीही हानी किंवा लाभ होत नाही. शत्रू वा मित्र आत्म्याचे काहीच बिघडवू शकत नाहीत. आणि आत्म्याचे खरे शत्रू तर क्रोध वगैरे आहेत खरा मित्र धर्मात स्थित आत्मा आहे. मान-अपमानात नाराज किंवा राजी होण्यासारखे काहीच नाही. कारण त्याने पाप-पुण्याचे बंध होत नाहीत. व सद्गती, दुर्गतीही होत नाही. असे सतत चिंतन केल्याने परिषहावर सहजपणे विजय मिळू शकते.

यतिधर्म नावाच्या संवर भावनेत श्रावकाने असा विचार करावा की कधी मी बाह्य सुख-पैसे, कुटुंब इ. परिग्रहापासून अलिप्त होईन ? कधी मी संयमी जीवन स्वीकार करीन, आणि कधी ती संपूर्ण जीवनाचे सार करणाऱ्या अशा अंतिम अवस्थेत संथारा व्रत म्हणजे भक्त परिज्ञा, इंगित मरण तथा पादोपगमन अनशन ग्रहण करीन ?[३३१]

अन्य लेखकांनी परिषहजय यात २२ प्रकारच्या परिषहांचे वर्णन केले आहे. परंतु

श्रीजयसोम मुनींनी परिषह संवर साधण्यासाठी प्रत्येक क्षणी समभावात राहण्याचे प्रतिपादन केले आहे. तसे पाहिले तर बावीस परिषह जिंकण्यासाठी संक्षिप्त सारच सांगितले आहे. आंतरिक रोग नष्ट करण्याची एकमेव औषधी म्हणजे समभाव. हा रामबाण उपाय आहे.

यतिधर्माचे दहा प्रकार आहेत. किंतु त्याऐवजी श्रावकासाठी तीन मनोरथ करण्याची प्ररूपणा केली आहे. तसेच साधूसाठीसुद्धा तीन मनोरथ दिले आहेत. त्यात उल्लेख आहे - साधूने अशी अभिलाषा करावी की, गुरूकडून कधी मी शास्त्रांचा, सूत्रांचा अभ्यास करीन ? आणि कधी एकाकी प्रतिमा (अभिग्रह) मध्ये राहून त्यात विशिष्ट संलेखना, काय संलेखना आणि कषाय संलेखना करीन. अर्थात् काया आणि कषाय यांना कधी क्षीण करीन.[३३२]

बारा भावनांत अनुप्रेक्षाच्या चिंतनाऐवजी यांनी संवरात सर्व जीवांचे हित चिंतन करण्याचे सांगितले आहे. त्यात जगातील सर्व जीवांना मित्र मानून कोणाशी वैर भाव करू नये, दोष करू नये. नेहमी सत्य वचन बोलावे. परधनावर कुदृष्टी ठेवू नये. असे चिंतन करण्यास प्रेरित केले आहे.[३३३]

काम वासनेचे लष्कर जेव्हा आक्रमण करते तेव्हा त्यावर अंकुश लावण्यासाठी शील-संयमाचे कवच घातल्याने कामवासनेने हल्ला केला तरी या कवचामुळे बचाव होतो. आणि भय परिणामस्वरूप हळूहळू सर्वच प्रकारच्या वासना-तृष्णा क्षीण होत जातात. मुनिश्री म्हणूनच म्हणतात की संवर भावनेत असेच चिंतन करावे की कधी मी या वासनांपासून पूर्णपणे मुक्त होईन ? कधी बाह्य-अंतर परिग्रहापासून माझी मुक्तता होईल?

हे वीर प्रभू ! ज्याप्रमाणे २२ परिषहांवर आपण विजय मिळवला तसेच मी यावर कधी विजय मिळवीन ? आपण तर देव, मनुष्यापासून मिळालेले उपसर्गांना धैर्याने तोंड दिले. मेरुपर्वतासारखे निश्चल राहिलात, किंचितही उद्विग्नता आपल्या मनात निर्माण झाली नाही. मनाच्या चलविचल होणाऱ्या स्वभावावर संपूर्णपणे मालकी हक्कप्रस्थापित केली अन् त्याचमुळे आपण अक्षय मोक्षपदापर्यंत पोहोचलात. अशी धन्य वेळ माझी कधी येणार? अशाप्रकारे संवर भावनेत चिंतन केल्याने काय मिळते याचे विशद विश्लेषण केले आहे.[३३४]

श्रीजयसोम मुनींनी संवर भावनेचे अन्य लेखकांपेक्षा वेगळेच विवेचन केले आहे. कारण संवराचा अर्थच आहे की आवरण घालणे. कशाही प्रकारे येणाऱ्या कर्मांना आत्म्यापर्यंत येऊन द्यायचे नाही असा प्रयत्न करायाचा म्हणजे संवर. क्षुल्लक श्री मनोहरलाल वर्णी यांनी एका दोहामध्ये सांगितले आहे -

कर्मरुके कारज वन आय ताको भाई एक उपाय,
शुद्ध निजातम परिणति देख, यही कोटि शास्त्रनि को लेख[३३५]

जर कर्मास्रवाचे आगमन थांबले तर आपले सर्व कार्यच सिद्ध झाले. आणि त्यासाठी एक उपाय आहे की आपल्या आत्म्याची शुद्ध परिणती पाहत राहणे. हेच सर्व शास्त्रात सांगितले आहे. कारण "निज-स्वरूप मे लीनता ही निश्चयरूप संवर है"[३३६] व्यवहार दृष्टीने आस्रव निरोधाचे अनेक भेद-प्रभेद यांना संवर म्हटले आहे.

ज्ञान व वैराग्यमय चिंतन करून मन-वचन काया यांना संयमित करतात आणि आपल्या आत्म्यात स्थिर होतात. ती संवर भावना होय.[३३७]

पंडित दौलतरामजींनी संवर भावना पदात लिहिले आहे - "जिन पुण्य पाप नहीं कीना, आतम अनुभव चित्त दीना ।" "तिन ही विधि आवत रोके, संवर लहि सुख अवलोक[३३८] ॥१०॥

ज्यांनी पुण्य अर्थात शुभ भाव आणि पाप अर्थात अशुभ भाव आणले नाहीत, फक्त आत्म्याच्या अनुभवाचे चिंतन केले त्यातच चित्त लावले, त्यांनीच येणाऱ्या कर्मांना लगाम लावला आणि संवर प्राप्त करून सुखाचा साक्षात्कार केला.

इथे शुभ-अशुभ दोन्ही प्रकारच्या भावनेला बंधनाचे कारण मानले आहे. म्हणून सम्यग्दृष्टी जीव स्वद्रव्याच्या आलंबनाने जितकी शुद्धता करतात तेवढ्या प्रमाणात त्यांचे संवर होते. पुढे क्रमशः शुद्धता वाढवून पूर्ण शुद्धता प्राप्त करतात. हे संवर आहे असे विवेचन केले आहे.

आत्मानुभवाची भावना करणे म्हणजेच वास्तविक संवर भावना आहे. वरील श्लोकाचा असाच भावार्थ आहे. आत्मानुभव ज्ञानाने प्राप्त होईल. "समयसार कलश" यात १२९ व्या ओवीमध्ये आचार्य अमृतचंद्र यांनी सुद्धा याच भावनेला व्यक्त केले आहे. ते लिहितात, शुद्धात्म तत्त्वाच्या उपलब्धीमुळे साक्षात् संवर प्राप्त होतो. आणि शुद्धात्मतत्त्वाची उपलब्धी भेद-विज्ञानामुळेच होऊ शकते. म्हणून भेद-विज्ञानाची भावना करणे योग्य आहे. भेद-विज्ञान जाणल्यामुळे रागद्वेष मोह गळून जातात. आणि दुष्कर्माचे आगमन थांबते.

आधुनिक लेखकामध्ये डॉ. हुकुमचन्द भारिल्ल यांनी संवर भावनेच्या चार पदांमध्ये भेदविज्ञानाचे वर्णन केले आहे. तसे भेद-विज्ञानाचे वर्णन अन्यत्व भावनेत केले आहे.

संवर भावनेत तर आस्रवांचा पूर्णतः निरोध करणे मुख्य ध्येय आहे. ते कसे करावे, कसे अडवावे, असे चिंतन संवर भावनेत असल्यामुळे आस्रव आणि संवर भेदांचे चिंतन संवर भावनेसंबंधी अनेकांनी लिहिले आहे. शेवटी प्रत्येक धार्मिक अनुष्ठानाचे लक्ष्य तर भेद विज्ञान आहे. कारण भेद-विज्ञान झाल्याशिवाय शरीर व आत्मा भिन्न आहेत हे ज्ञान होणारच नाही. या भेदविज्ञानाला जाणल्याशिवाय धर्मक्रियामध्ये भावोद्रक येणार नाही. भेदविज्ञानसहित संवर तत्त्वाच्या भेद प्रभेदांचे चिंतन केले जाऊ शकते. संवर भावनेचे विवेचन करताना डॉ. हुकमचंद भारिल्ल लिहितात- ''धर्माचा आरंभ संवरानेच होतो. कारण की, मिथ्यात्व नामक महापापाचा निरोधक मिथ्या ज्ञानांधकाराचा नाशक व अनन्तानुबन्धी कषायाचा विनाश संवरानेच होऊ शकतो.''

मिथ्यात्व अज्ञान व असंयम आस्रव भाव आहे, रागभाव आहे. त्यांच्या अभावाने होणारा वीतरागभाव संवर आहे. संवरच युक्तिमार्गाचा आरंभिक प्रवेशद्वार आहे. संवराची प्राप्ती भेदविज्ञान जाणल्याने होते. आत्मानुभूतीच्या काळातच होते. म्हणून संवर भावनेत भेद-विज्ञान व आत्मानुभूतीची भावना मुख्य आहे.[३३९]

संवर भावनेत मिथ्यात्वाला आवृत्त करण्यासाठी सम्यक्त्व, अव्रताचा निरोध करण्यासाठी व्रत इ.चा अनेक लेखकांनी प्रतिपादन केले आहे. याचे भेद ज्ञानीनेआत्मानुभूतीपूर्वक चिंतन केल्याने मुक्तीचा अधिकारी बनतो. म्हणूनच पू. श्रीतिलोकऋषीजी महाराज म्हणतात -

संवर मारग तारक सांचो नवा कर्म सब टाले ।
हाट कपाट समान ए जाणो आगम साख देखाले रे ।[३४०]

संवर मार्गनिच संसारातून तरूण जाणे शक्य आहे. संवर असेल तर आस्रव कर्माचे आगमन आत्म्यात होणार नाही. ज्याप्रमाणे खिडकी उघडी असेल तर घरात धूळ-कचरा येईल. खिडकी बंद केली तर कर्मरूपी कचरा आत्म्यात येणार नाही. यात थोडीशी जरी गफलत झाली तर फार नुकसान होईल. हे अधिक स्पष्टपणे व्यक्त करण्यासाठी आवश्यक निर्युक्तीमधे एक गाथा आहे-

अणथोवं वणथोवं, अग्गीथोवं कसायथोवंच ।
णहु मे वीससियव्वं, थोवंपिहुतं बहुं होई ॥

अर्थात् थोडासा ऋण थोडासा व्रण (घाव) थोडा अग्नी आणि थोड्या कषाययांची कधी उपेक्षा करू नये. हे फार थोड्या कालावधीत विस्तृत होत जातात. संवर भावनेत

हे सतत चिंतन करावे की चुकूनही आस्रवद्वार थोडेसेही उघडे तर राहिले नाही ना ! या बिषयी थोडासुद्धा निष्काळजीपणा केला तर भवसागरात बुडवून टाकतात. जर तशी दक्षता ठेवली तर स्वतः संसारसागर तरून जातात व आपल्या सत्संगात येणाऱ्या भवी जीवांना भवपार करतात. याविषयी एक दृष्टांत आहे- श्रीवज्रस्वामी कंचन, कामिनीचे त्यागी पूर्ण वैरागी होते. एक श्रीमंत सेठ होता. त्याची मुलगी रुक्मिणी अत्यंत रूपवान होती. एकदा वज्रस्वामींचा सदुपदेश ऐकून ती त्यांच्यावर मोहित झाली. घरी आल्यावर आपल्या आई-वडिलांनी म्हणाली. मी लग्न करीन तर वज्रस्वामीशीच करीन, अन्य कुणाशीही लग्न करणार नाही. आई-वडिलांना तिला खूप समजावून सांगितले. मुनीराज कधी विवाह करीत नाहीत. परंतु ती ऐकायलाच तयार नव्हती. शेवटी तिचे वडील सेठ धनवाह खूप संपत्ती घेऊन व रूपवान कन्या रुक्मिणीला वज्रस्वामीकडे घेऊन गेले. आणि मुनींना सांगितले. माझ्या मुलीशी लग्न करा आणि या धनसंपत्तीचा खूप उपभोग घ्या. इतके सांगून ते घरी निघून आले.

यौवनात पदार्पण केलेल्या अतिरूपवान सुंदरी रुक्खिमीणीने अनेक प्रकाराने भोग उपभोगाच्या सुखाचे त्यांच्या समोर वर्णन केले. हावभावाने त्यांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. परंतु तिचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. वज्रस्वामी मेरुपर्वतासारखे अचल अटल राहिले. अशी अतिदृढता पाहून रुक्खिमीणीला स्वतःलाच बोध प्राप्त झाला. आणि तिने निश्चय केला की, या अती महापवित्र साधूला डिगवणे असंभव आहे. रुक्खिमणीला तिच्या वडलांकडून जी संपत्ती मिळाली होती ती सर्व शुभ क्षेत्रात दान करून चारित्र्य ग्रहण केले आणि आत्मसाधना करून जीवनसार्थक केले.[३४२]

यास ज्ञानी संवर म्हणतात. असाच संवराचा दृष्टांत उत्तराध्ययन सूत्राच्या बाराव्या अध्ययनात हरिकेशी मुनीसंबंधी आहे. ज्याप्रमाणे कासव आपल्या सर्व इंद्रियांना आत ओढून घेतो तेव्हा त्याला बाहेरून कोणताही धोका नसतो. त्याचप्रमाणे साधक जेव्हा साधनेत रमतो, त्यावेळेस आपल्या पाप क्रियांना पापास्रवांणा, कर्मास्रवांना रोकण्यासाठी संवर भावनेने संवृत्त व्हावयास पाहिजे. संवर भावना आत्मशुद्धीचा उत्तम मार्ग आहे. चालत्या रेल्वेला थांबवण्यासाठी लाल झेंडा दाखवला जातो त्याचप्रमाणे पापाला रोकण्यासाठी संवर भावना लाल झेंडा आहे. साऱ्या धर्मा आराधनाचे अनुष्ठान संवर भावनेत मानले जातात.

वरील संपूर्ण संवर भावनेचे विवेचन करताना कित्येक लेखक व कवींनी संवर भावनेचे चिंतन करण्याचे दोन प्रकार सांगितले आहेत. एका प्रकारात संवराचे भेद प्रभेदांना

समजावून घेऊन आस्रवद्वाराना अडवण्यासाठी चिंतन करण्याची प्रेरणा मिळते. तर काही लेखकांनी भेद-विज्ञानाचे विश्लेषण द्वारा षद्द्रव्यमय संपूर्ण लोकाचे स्व-पर या दोन विभागात विभक्त करून 'स्व'मध्ये स्थित राहण्याची प्रेरणा दिली आहे.

संपूर्ण जगाला स्व आणि पर याने विभाजित केल्याने 'पर' पासून विमुख होऊन स्वसन्मुख होणे हीच आत्मानुभूती आहे. संवर आहे. संवर भावना आहे. संवर भावनेचे फळ आहे.

आस्रवद्वार बंद झाल्यावर जीवात्म्यात स्थिरता येते. हृदय स्वच्छ होते. म्हणून सतत चिंतन करावे की, "आता मी मनात कोणत्याही प्रकारच्या पापयुक्त विचारांना प्रवेश देणार नाही. जितकी आस्रव द्वारे आहेत ती सर्व बंद करण्याचा प्रयत्न करीन. संवरयुक्त धर्माचा आश्रय होईन. राग-द्वेषाचा कोणताही विचार येणार नाही यासाठी प्रत्येक क्षण जागृत राहीन. अशा प्रकारचे चिंतन केल्याने मृत्यूच्या वेळेपर्यंत जागृती राहते. संवर भावनेचा अभ्यास चिंतन, मनन आणि प्रयोग जीवनात निरंतर चालू ठेवल्याने संवर भावना सतत करीत राहिल्यामुळे सहजपणे समिति-गुप्ती इ. पालन करण्याचे विचार येतील. विचार-आचारात परिवर्तित होईल. व ज्ञानक्रियेच्या योगाने मुक्ती नक्की मिळेल.

म्हणून सर्व मुमुक्षू जीवांनी संवर भावना रूपी ज्ञान-गंगेत आकंठ मग्न होऊन आत्मिक आनन्द प्राप्त करावा.

निर्जरा भावना

जैनदर्शनाची समस्त साधना पद्धती संक्षेपात सांगायची म्हटले तर फक्त दोन शब्दात अभिव्यक्त करू शकतो. ते दोन शब्द आहेत. संवर आणि निर्जरा हे दोन्ही उपादेय धर्म आहेत. अर्थात आचरण करण्यायोग्य आहे. हे दोन्ही बरोबर राहतात. अगोदर संवर नंतर निर्जरा. संवर म्हणजे येणाऱ्या कर्मास्रवांना येण्यास प्रतिबंध करणे, आणि निर्जरा म्हणजे पूर्वी संचित केलेल्या पापकर्माचा क्षय करण्याची क्रिया. संवर करणारा निर्जरा करेलच असे नाही. परंतु निर्जरा करणारा संवराचे आचरण निश्चित करणारच. कारण संवराने आत्म्यात नवीन कर्मांचे आगमन थांबते. परंतु संचित कर्म तर तसेच राहतात. जोपर्यंत पूर्वी अनंत जन्मात बरोबर घेऊन आलेले जे कर्म आहे ते संपत नाही तोपर्यंत मोक्ष नाही. याचे आगमात सुंदर उदा. दिले आहे.

मोठा तलाव पाण्याने गच्च भरलेला आहे त्यात नवीन पाणी आत येण्याचे सगळे मार्ग बंद करून टाकलेत पण तलाव पाण्याने तर भरलेला आहे. त्यातील पाणी सर्वच्या

सर्व उपसून काढले किंवा सूर्याच्या प्रखर उन्हाने ते सुकले तर तलाव रिकामा होईल. त्याचप्रमाणे संवराने ज्यांनी येणाऱ्या कर्मांना रोकले आहे असा संयमी करोडो भवांचे संचित कर्मांना तपाने नष्ट करतो.[३४३]

संवर चौकीदारा (watch man) सारखा आहे. तो बाहेरून येणाऱ्या कर्मास्रवांना आत्म्यात घुसू देत नाही. परंतु आत्म्याचे आस्तित्व भूतकाळात होते. वर्तमानात आहे आणि भविष्यातही असणार आहे. अनादीअनंत काळापासून आत्मा कर्मांनी व्याप्त आहे. खाणीमध्ये ज्याप्रमाणे सोने मातीत मिसळलेले असते मग तापवून तापवून माती जाते मग खरे सोने उरते. तसेच अनादि काळापासून आत्मा संसारात राग-द्वेषाच्या अधीन होऊन कर्मांना ग्रहण करतो. ते सोडविण्यासाठी निर्जरा हाच एकमात्र उपाय आहे.

कर्माच्या ओझ्याखाली दबलेला आत्मा त्याला शुद्ध व हलके कसे करावे ? असे चिंतन करून त्याप्रमाणे प्रयत्न करणे म्हणजे निर्जरा भावना आहे.

आचार्य कुंदकुंद यांनी ''वारसाणुवेक्खा''मध्ये ६६ आणि ६७ या दोन गाथामध्ये निर्जरा भावनेचे वर्णन केले आहे की, आत्म्यावर कर्मप्रदेशांनी जे आवरण आणले आहे किंवा आत्मप्रदेश हे कर्मप्रदेशांनी झाकून टाकले आहेत, त्या कर्मप्रदेशांना ओगळून टाकायचे, म्हणजेच निर्जरण करायचे. त्यालाच निर्जरा म्हणतात. असे जिनेश्वर देवानींच प्रतिपादित केले आहे. ज्या कारणामुळे संवर होतो त्याच कारणामुळे निर्जरा होते. हे आपल्याला समजले पाहिजे.[३४४]

कर्मप्रदेशांची आत्मप्रदेशांशी जी एकरूपता झालेली आहे त्यांना वेगळे करायचे म्हणजे कर्माचे निर्जरण करायचे आहे. ज्याप्रमाणे भिंतीवर मातीचा गोळा फेकला, तो सुकला तर काढताना सहज निघत नाही. त्याचप्रमाणे आत्मा आणि पुद्गलांचे प्रदेश चिकटले जातात. त्या आत्मप्रदेशांशी चिकटलेल्या कर्म प्रदेशांना हटविणे निर्जरा आहे.

संवर आस्रवाचा निरोध आहे. मानसिक, वाचिक, कायिक प्रवृत्तींना रोकणे संवर आहे. निर्जरा पूर्व संचित कर्मांचे आत्म्यापासून विलय होणे आहे. दोन्हींचे स्वरूप भिन्न-भिन्न आहे. आचार्य कुंदकुदांचार्यांनी ज्या कारणामुळे संवर होतो त्याच कारणामुळे निर्जरा होते असे प्रतिपादन केले आहे. संवराने आत्मोन्मुखी प्रवृत्ती होते. पर भावापासून स्वभावाकडे वळण्याचा आंतरिक पुरुषार्थ जागृत होतो. त्याच्याने कर्म निर्जरा होते. अशाप्रकारे संवर आणि निर्जरा यात ऐक्य, समन्वय सिद्ध होते. नवीन येणारे कर्म थांबते. संचित कर्म झडते म्हणजे निर्जरा होते. अवरोध आणि पृथक्करण अथवा निर्जरण दोन्हीचे

ह्याच्यात अस्तित्व राहते. श्री जिनभद्रगणि क्षमाक्षमण यांनी सुद्धा संवर आणि निर्जरा यांना मोक्षाचा मार्ग असे सांगितले आहे.[३४५]

निर्जरेचे दोन भेद आहेत. कर्म उदयावस्थेत येऊन परिपक्व होऊन आपले फळ देऊन जीर्ण होऊन जातात. ही प्रथम प्रकारची निर्जरा. ही सर्व जीवांची होते. उदा. झाडे, रोपटे इ. भयंकर सर्दी, गर्मी वगैरे सहन करतात. हे असे उदयास आलेले कर्म सहन केल्याने आपला प्रभाव दाखवून संपतात. ही सहज करण्याची क्रिया झाडांची सहज झाली. त्यासाठी त्यांनी कोणताही प्रयत्न केलेला नाही. आपोआप होत राहिली. याला आगमात अकाम निर्जरा असे म्हटले आहे.

दुसऱ्या प्रकारची निर्जरा ज्यात तप करून कर्मांना आत्मबलपूर्वक उदयास आणून जीर्ण करणे. व्रताने ही निर्जरा केली जाते. यास सकाम निर्जरा म्हणतात.

पहिल्या प्रकारची अकाम निर्जरा चारही गतीच्या जीवांची होते. दुसऱ्या प्रकारची निर्जरा त्यांचीच होते ज्यांचे जीवन सर्वविरतीमय अथवा देशविरतीमय असते. अर्थात महाव्रती किंवा अणुव्रती यांची होते.

आचार्य उमास्वाती यांनी निर्जरा आणि विपाक या तीनही शब्दांना एकार्थवाची म्हटले आहे. त्यांनी निर्जराचे अबुद्धिपूर्वक व कुशलमूल असे दोन भेद केले आहेत. नरक इ. गतीमध्ये कर्माचे फलविपाक बुद्धिप्रयोगशिवाय होत असतात त्यास अबुद्धिपूर्वक निर्जरा म्हणतात. या निर्जराबद्दल जीवाला कुशलानुबंध होत नाही. तप केल्याने तसेच परिषहांना जिंकल्यामुळे जी निर्जरा होते ती कुशलमूल निर्जरा असते. या निर्जराच्या गुणवत्तेसंबंधी पुन्हापुन्हा विचार करायला पाहिजे. अथवा ह्याच्या शुभानुबंधता किंवा निरानुबन्धतेचे पण चिंतन केले पाहिजे. असा विचार करणारा मुमुक्षू कर्मांची निर्जरा करण्याच्या प्रयत्नात असतो.[३४६]

वरील दोन्ही प्रकारात फक्त नावात फरक आहे. भावार्थ बारसाणुवेक्खामध्ये वर्णित निर्जराच्या भेदाप्रमाणेच आहे.

संचित कर्मांची निर्जरा करण्यासाठी आचार्य शिवार्य उदाहरणाद्वारे समजावताना म्हणतात. ज्याप्रमाणे सुरक्षित धनाचा उपयोग घेतला नाही तर ते कमी होत नाही. त्याचप्रमाणे तपाशिवाय फक्त संवराने कर्मक्षय होत नाही. कर्मांचा क्षय करण्यासाठी तप करायला पाहिजे. पूर्वी बद्ध केलेल्या कर्मांचा क्रमशः क्षय करण्याच्या प्रक्रियेला निर्जरा म्हणतात. इथे निर्जरेचे दोन भेद केले गेले आहेत- सविपाक व अविपाक हे समजण्यासाठी

दोन उदाहरणे दिली आहेत. ज्याप्रमाणे झाडाला येणारी फळे आपल्या वेळेवरच पिकतात. पण विशिष्ट प्रक्रियेने फळे लवकर पण पिकवली जाऊ शकतात. त्याचप्रमाणे पूर्वबद्ध कर्मसुद्धा आपली स्थिती पूर्ण झाल्यावर फळ देतात आणि काही कर्मांना तप करून स्थिती पूर्ण होण्यापूर्वीच फळ देऊन नष्ट केली जाऊ शकतात.

सविपाक निर्जरा तर सर्व जीवांची सतत होतच असते. तप करा किंवा नका करू. सम्यग्दृष्टी असो किंवा नसो. कर्म जेव्हा जीवाच्या उदयावलीत प्रवेश करतात तेव्हा फळ देणाऱ्या कर्मांची निर्जरा होते. कारण सर्व जीव सतत कर्म करीतच असतात. आणि त्यांची फळे भोगतच असतात. पण अशाप्रकारे तर सविपाक निर्जरा फार थोड्या कर्मांची होते. सर्व कर्मांची निर्जरा होत नाही. कारण सर्व कर्मांची स्थिती वेगवेगळी असते. शिवाय सर्वांचे सहकारी तत्त्व द्रव्य, क्षेत्र, काल, भाव सुद्धा एकाच वेळी जमून येत नाही. म्हणून सर्व एकदम उदयास येत नाहीत. ज्या कर्माचा उदयकाळ असेल तेच कर्म उदयास येतात. तेवढ्याचीच निर्जरा होते. बाकीच्यांची निर्जरा होत नाही. परंतु ते उदयास न आलेले जे कर्म आत्म्यात तसेच चिकटून आहेत. त्यांना उदयाच्या स्थितीत येण्याअगोदर तपश्चर्यांच्या अनेक प्रकाराने उदयास आणून सर्व कर्मांची निर्जरा करू शकतो.[३४७]

पुढे ग्रंथकार एका शंकेचे समाधान करतात की, आगमामध्ये जागजागी म्हटले आहे- कडाण कम्माण ण मुक्ख अत्थि[३४८] म्हणजे केलेले कर्म भोगल्याशिवाय सुटका होत नाही. आणि असे ही म्हटले आहे की, ''भवकोडि संचियं कम्मं तवसाणिज्जरिज्जइ''[३४९] अर्थात करोडो भवातील संचित कर्म तपाद्वारे निर्जरित होतात. या दोन्ही गोष्टीत विरोधाभास वाटतो. याचे समाधान करताना म्हटले आहे- तपाच्या अग्नीत जळून अशा कर्मांचा विनाश होतो, ज्यांनी अजून फळ दिले नाही. ज्याप्रमाणे आगीत घास-फूस जळून खाक होते. किंवा कापूसाला काडी लावताच क्षणार्धात जळून खाक होते. अगदी तसेच तपरूपी अग्नीने महान कर्म तृणाप्रमाणे जळून नष्ट होऊन जातात.

ज्ञान, दर्शन, चारित्र्यने युक्त असलेले तपकर्म पुद्गलातील स्नेह परिणामांना शुष्क करून टाकतात. म्हणून कर्मात असलेले स्नेह परिणामाचा विनाश झाल्यावर स्निग्धता राहते. धुळीप्रमाणे कर्म नष्ट होऊन जातात. एखाद्या वस्तूत चिकटपणा असला तर ते एकमेकांना चिकटलेले असतात. चिकटपणा गेला की ते दोन्ही वेगवेगळे होतात. त्याचप्रमाणे कषाय इ.च्या स्नेहामुळे जे कर्म पुद्गल जीवाशी एकरूप झाले होते, तप केल्याने कषायाची स्निग्धता दूर झाल्याने ते जीवापासून पृथक होतात. तरीही संवर करून प्रथम येणाऱ्या

कर्मांना थांबवणे आवश्यक आहे. कारण फक्त तप केल्यानेच सर्व कर्मांचा विनाश होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे तलावातील पाण्याचे येण्याचे रस्ते जरी बंद केले तरी अगोदर त्यात असलेले पाणी नष्ट झालेच पाहिजे. ते पाणी सुकले पाहिजे. तलाव कोरडा फडफडीत झालाच पाहिजे. म्हणून प्रथम संवररूपी कवच धारण करून सम्यक्त्व रूप रथावर सवार होऊन श्रुतज्ञानरूपी धनुष्य घेऊन, संयमरूपी रणभूमित तप रूपी बाणांनी समस्त कर्मरूपी शत्रूंना पराजित करून मोक्ष रूपी अनुपम राज्यश्री प्राप्त करावे.[३५०]

जी व्यक्ती कषायरूपी शत्रूंवर विजय प्राप्त करून दुष्ट लोकांचे दुर्वचन, उपद्रव, अनादर आदींनी मन मलिन, कलुषित होऊ देत नाहीत. परंतु सर्व सहन करतात. त्यांची झपाट्याने जास्त निर्जरा होते. अशावेळी असे चिंतन करावे की, माझ्याच पूर्व जन्मीच्या पापाचे हे फळ आहे. हे जर आता शांततेने, समताभावाने सहन केले नाही तर कर्मरूपी ऋणातून कधीच मुक्त होणार नाही. म्हणून दुःख शोकाने पीडित होऊन आर्तध्यान करण्यापेक्षा समभावाने ते भोगावे. नाहीतर परत दुःख करीत बसलो तर नवीन कर्मांची श्रृंखला चालूच राहील. अशाने अनेक भव वाढतच जातील.

स्वामी कार्तिकेयानुप्रेक्षामध्ये एकशे दोन गाथेपासून एकशे चौदा गाथेमध्ये निर्जरानुप्रेक्षाचे वर्णन करताना लिहिले आहे की आत्म्यामध्ये संश्लिष्ट कर्मांचे अंशतः जीर्ण होण्यासच निर्जरा म्हणतात. प्रत्येक जीवाची प्रतिक्षणी सामान्यतः कर्मांची निर्जरा होत असते. कारण ज्या कर्मांची परिवक्वता झालेली असते ती कर्मे आपले फळ दिले की निष्प्रभ होऊन आत्म्यापासून दूर जातात.

कर्मांची जास्तीत जास्त निर्जरा तपानेच होते. तपाच्या बारा प्रकारांचा उल्लेख करताना ग्रंथकार लिहितात की, या बारा प्रकारच्या तपाने कर्मांची निर्जरा होते. याबरोबरच अतिशय महत्त्वाची गोष्ट अशी की, ज्ञानी साधकाने केलेले तपच निर्जरा करू शकते. अज्ञानाने केलेले तप निर्जराचे कारण होत नाही. उलट कर्मबंधनाचे कारण होऊ शकते. जर तप करून याचा अहंकार केला, स्वतःला मोठा तपस्वी समजले, तर कर्मबंधच होणार. इहलोकात प्रसिद्धी, सन्मान, प्रशंसा, तसेच परलोकात स्वर्गीय सुख मिळण्याची कामना करून जर कोणी तप केले तर आध्यात्मिक दृष्टीने ते निरर्थक आहे. या कामनायुक्त तपाला 'निदान' म्हणतात. निदानाशिवाय केलेले तप खरे तप आहे. त्यानेच कर्मांची निर्जरा होते. कर्मांचा समूह कार्मण शरीर द्वारा उदयास आलेले किंवा मुद्दाम उदयास आणलेले ''उदीरणा'' अर्थात स्वतः संचित कर्मांना उदयास आणायचे ते कर्मयोग समभावाने भोगायचे व ते

भोगून नष्ट करायचे अशी 'निर्जरा' होते.[३५१]

तात्पर्य हे की, वैराग्यभावनाने आचरलेले तपच निर्जरानुप्रेक्षा आहे. निर्जराचे दोन प्रकार आहेत- सविपाक निर्जरा व अविपाक निर्जरा.

सविपाक निर्जरा स्वकाल प्राप्त निर्जरा होय. कारण परिबद्ध कर्म आपल्या अबाधाकाळापर्यंत सत्तेमध्ये राहतात. उदयकाळात उदित होतात आणि आपले फळ देऊन विकीर्ण होऊन जातात. आपल्या समयानुसार कर्म निर्जरा होत असल्यामुळे स्वकाल प्राप्त निर्जरा म्हटली जाते.

अविपाक निर्जरा तपाद्वारे घटित होते. जे कर्म उदित झाले नाहीत, त्या कर्मांना तप बलाने मुद्दाम उदयास आणून निर्जीर्ण केले जाते.

जस-जशी साधूच्या जीवनात उपशम भाव आणि तपश्चरणाची वृद्धी होत जाते- तस-तशी निर्जरा होत जाते. धर्मध्यान आणि शुक्ल ध्यान निर्जराचे विशेष कारण आहेत. खरं म्हणजे ध्यानामध्ये कर्म नष्ट करण्याची खूप मोठी शक्ती प्राप्त होते. व्यक्ती जस-जसे प्रमाद, कषाय आदींचे वर्णन करीत जातो, ध्यान साधनेत अग्रसर होत जातो तस-तसे कर्म निर्जराचे प्रमाण वाढत जाते. जो साधक कषायरूपी शत्रूवर विजय मिळवतो आणि इतर जनांकडून होणारे त्रास, दुर्वचन, तिरस्कार देवादीकडून होणारे उपसर्ग, कष्ट यांना सहिष्णुभावाने सहन करतो, त्याची अतिशय मोठ्याप्रमाणात निर्जरा होते.

जो साधक आपल्या आत्मस्वरूपात मग्न होतो, मन व इंद्रियांना वश करतो, आपली निंदा तथा गुणीजनांची सम्यक्त्वव्रती तथा ज्ञानीजनांची प्रशंसा करतो त्याची अत्यधिक निर्जरा होते. जितक्या प्रमाणात परम वीतरागताच्या दिशेने साधक वाटचाल करीत जातो त्या प्रमाणात त्याची परम निर्जरा होते.

निर्जरा होण्यासाठी तपाचरणाचा हेतू महत्त्वपूर्ण आहे. तपाचरण सम्यग्दर्शन व ज्ञानावर आधारित आहे. यांच्या शिवाय केलेले तप केवळ कायाक्लेश रूप आहे. सम्यग् तपाने निर्जरा होते.

ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला अजीर्ण झाले तर पोटात मळ साचून राहतो. मग तो माणूस जेवण करीत नाही पण असे औषध घेतो जेणेकरून अन्नपचन होईल. जठराग्नी तीव्र करतो. परिणामस्वरूप मळाचे निर्जरण होते. पोट हलके होते. तेव्हा कुठे त्याला हलके हलके वाटायला लागते.

अशाच प्रकारे मिथ्यात्व राग व अज्ञानामुळे कर्मरूपी मळाचा संचय होतो. ते शुद्ध ध्यानरूपी अग्नीने नष्ट होते. निर्जीर्ण, क्षीण होते.[३५३] अशाप्रकारे निर्जरा भावना समजून घेऊन भावित व्हायला पाहिजे. अशा चिंतनाने मनन केल्याने, अभ्यास केल्याने कर्माचा नायनाट होतो.

आचार्य हेमचन्द्रांनी निर्जराचे विवेचन करताना तपाच्या बारा प्रकारांचा नामोल्लेख केला आहे. त्यात सहा बाह्य तप व सहा अभ्यंतर तप आहेत. बाह्य तपाचे सहा भेद - १) अनशन २) उणोदरी ३) वृत्तीसंक्षेप ४) रसपरित्याग ५) कायक्लेश ६) लीनता (प्रतिसंलिनता) अभ्यंतर तपाचे सहा प्रकार - १) प्रायश्चित २) वैयावृत्य ३) स्वाध्याय ४) विनय ५) व्युत्सर्ग ६) ध्यान[३५४]

वरील बारा तपांचे विस्तृत रूपाने उत्तराध्ययन सूत्रात विवेचन केलेले आहे. वरीलप्रमाणेच बारा तपांची नावे आहेत. फक्त क्रमात फरक आहे. अभ्यंतर तपाच्या क्रमात थोडा बदल आहे. १) प्रायश्चित २) विनय ३) वैयावच्च (वैयावृत्य) ४) स्वाध्याय ५) ध्यान ६) व्युत्सर्ग अशाप्रकारे घेतले आहे.[३५५]

भगवती सूत्र व तत्त्वार्थ सूत्रात तपाचा असाच क्रम आहे.[३५६]

तपाच्या बारा भेदांचे इतके विस्तृत विवेचन जैनागमात तथा आगमोत्तर ग्रंथात प्राप्त होते की फक्त 'तप' विषय घेऊनही शोधार्थी आपला शोध ग्रंथ लिहू शकतो. मरुधर केसरी प्रवर्तक पू. श्रीमिश्रीमलजी म. नी ''जैनधर्म में तप स्वरूप और विश्लेषण'' या पुस्तकात तपाचे विवेचन केले आहे. अतिशय सुंदर सार्वदेशिक विवेचन केले आहे.

इथे निर्जरा भावनामध्ये तपाच्या बारा भेदांचे संक्षिप्त फक्त परिचय करून दिला जाणार आहे. कारण आपला मुख्य विषय 'भावना' आहे. भावनामध्ये अनशनादी तप कशाप्रकारचे असतात हे ही समजणे आवश्यक असते.

१) अनशन - उपवास (कवल आहार करायचा नाही)

संयमित जीवन जगण्यासाठी, कर्माची निर्जरा करण्याच्या हेतूने आहाराचा परित्याग केला जातो ते 'अनशन' तप होय.[३५७]

संयम प्रसिद्धी, रागोच्छेद, कर्मविनाश, ध्यान आणि आगमबोध इ. साठी अनशन आवश्यक आहे.[३५८]

अनशन दोन प्रकारचे - १. इत्वरिक २. मरणकाल. इत्वरिक - सावकांक्ष आहे.

अर्थात निश्चित काळापर्यंतच्या अनशनानंतर पुन्हा अन्न ग्रहण करण्याची इच्छा होते. मरणकालपर्यंत अन्नाची इच्छाच करायची नाही. याला निरवकांक्ष म्हणतात.[३५९]

सर्व तपात अनशन तपाला प्रथम स्थानी मानले आहे कारण हे तप आचरण्यास अन्य कोणत्याही तपापेक्षा फार कठीण आहे. अनशन तपात अशन म्हणजे आहाराचा त्याग असतो. जीभेवर विजय मिळवायचा असतो. भूक हीच संसारात दुर्जेय आहे. भूकेने व्याकुळ होऊन प्राणी वाटेल ते पाप करण्यास उक्तत होतो. म्हटले आहे - ''बुभुक्षितं किं न करोति पापं''

मनुस्मृतीमध्ये एके ठिकाणी सांगितले आहे- अजीगर्त नावाच्या ऋषींनी भूकेने व्याकुळ होऊन आपला प्रिय पुत्र शुनःशेष याला यज्ञात आहुती देण्यासाठी विकून टाकले.[३६०] आणि विश्वामित्रासारखे ऋषीसुद्धा क्षुधेने पीडित होऊन चाण्डाळाच्या हातातील कुत्र्याचे मांस खाण्यास उक्तत झाले.[३६१] जोपर्यंत शरीर आहे तो पर्यंत भूक असणारच. या भूकेला जिंकणे आणि त्याबरोबर मनाला निग्रहित करणे अशी अनशन तपाची साधना आहे. या तपाच्या साधनेने शरीर व मनाची शुद्धी होते. शरीर अन् प्राण यांचा मोह सुटून जातो.[३६२]

दोन घडी अर्थात ४८ मिनिटपर्यंत आहार त्यागापासून सहा महिन्यापर्यंतच्या उपवासाला इत्वरिक तप म्हणतात.[३६३] परंतु मूळ आगमात जिथे-जिथे अनशन तपाचे वर्णन येते तेथे कमीत कमी चतुर्थ भक्त उपवासाला अनशन तप मानले आहे. यावत्कथित तप मरणकालिक (मृत्युपर्यंत) असते.[३६४]

२) उणोदरी तप - तपाचा दुसरा भेद. ऊन-कमी, उदर-पोट, म्हणजे जेवणाच्या वेळी पोट थोडे रिकामे ठेवणे. भूकेपेक्षा कमी खाणे म्हणजे ऊणोदरी तप होय.

उत्तराध्ययन सूत्रात उणोदरी तपाचे पाच प्रकार सांगितले आहेत.

१) द्रव्य ऊनोदरी - आहाराचा मात्रा कमी करणे, भुकेपेक्षा कमी खाणे. मुद्दाम अगोदर निश्चय करून भूक असताना त्यापेक्षा कमी खायचे हे उणोदरीतप आहे. त्याचप्रमाणे आवश्यकतेपेक्षा कमी वस्त्र इ. ठेवणे.

२) क्षेत्र उणोदरी - भिक्षा मागण्यासाठी स्थान नक्की करून तेथूनच भिक्षा घेणे.

३) काल उणोदरी - भिक्षा आणण्यासाठी काल-समय निश्चित करून त्याच वेळेला भिक्षा मिळाली तरच घ्यायची, नाही मिळाली तर नाही.

४) भाव उणोदरी - भिक्षेच्या वेळी अभिग्रह इ. करणे.

५) पर्याय उणोदरी - वरील चार भेदांचे आचरण करीत राहणे.[३६५]

याप्रमाणे उणोदरी तपाच्या भेदांचे सतत चिंतन करणे, भावना करीत राहणे याने निर्जरा होते.

या तपाने संयमात जागरुकता राहते. दोष शमतात. संतोष, समाधान, स्वाध्याय सुख इ.ची प्राप्ती होते.

३) भिक्षाचरी तप (वृत्ति परिसंख्यान) आशा, तृष्णाच्या निवृत्तीसाठी भिक्षेच्या वेळी साधू एक, दोन किंवा तीन घरातून भिक्षा घेऊन असा नियम करणे यास वृत्तिपरिसंख्यान तप म्हटले आहे.[३६६] भिक्षा याचा शाब्दिक अर्थ याचना किंवा मागणे असा आहे. या तपात साधक आपल्या इच्छांचा निग्रह करतो. जे मिळेल त्यातच समाधान मानणे.

४) रसपरित्याग - जितेन्द्रियत्व, तेजोवृद्धी आणि संयम बाधा निवृत्तीसाठी तूप, दही, गुळ आणि तेल इ.चा त्याग करणे म्हणजे रसपरित्याग आहे.[३६७] यात स्वाद घेण्यावर विजय मिळवण्याची साधना आहे. ब्रह्मचर्याची साधना करण्यासाठी 'रसत्याग' तप अती आवश्यक आहे.

५) कायक्लेश - शरीराला कष्ट देणे. उत्तराध्ययन आणि योगशास्त्रात कायक्लेश तपाचा पाचवा नंबर आहे. तत्त्वार्थसूत्रात हे सहावा बाह्य तप आहे.

कायक्लेश तपामध्ये अनेक प्रकारचे प्रतिमायोग धारण करणे, मौन राहणे, आतापना घेणे, वृक्षाखाली निवास करणे, इ. प्रकाराने शरीरपरिवेद करणे, शरीराला कष्ट देणे कायक्लेश आहे. या प्रकाराने अचानक दुःख आले तर सहनशक्ती प्राप्त होते.[३६८]

६) प्रतिसंलीनता - याला तत्त्वार्थवार्तिकमध्ये विविक्तशयनासन म्हटले आहे.

बाधानिवारण, ब्रह्मचर्य, स्वाध्याय आणि ध्यान इ.साठी निर्जन्तुक, शून्यगार, गिरीगुफा इ. एकान्त स्थानात बसणे झोपणे इ. विवक्त शयनासन आहे.[३६९]

प्रतिसंलीनताचा अर्थ आहे आत्म्यामध्ये लीन होणे. परभावापासून आत्म्याला दूर करून स्वभावात लीन करणे, इंद्रिय, कषाय, मन, वचन आणि काययोग यांना बाह्यरूपाने दूर करून आत्म्यात लीन करणे. प्रतिसंलीनता तप आहे. या दृष्टीने प्रतिसंलीनता संयम सुद्धा म्हणू शकतो.[३७०]

भगवती सूत्रात प्रतिसंलीनताचे चार प्रकारे वर्णन केले आहे. त्यात इंद्रिय प्रतिसंलीनता, कषायप्रतिसंलीनता, योगप्रतिसंलीनता, विवक्तशयनासन सेवना[३७१] उत्तराध्ययन सूत्रात फक्त विवक्तशयनासनच घेतले आहे.[३७२]

वरील सहा प्रकारच्या बाह्य तपात प्रत्येक तपाचे फल संगत्याग, शरीरलाघव, इंद्रियविजय, संयमरक्षण आणि कर्म निर्जरा आहे. अर्थात या तपांचे आचरण करण्याने शरीरातील मूर्च्छाभाव दूर होतो. आणि अंतर्बाह्य सर्व परिग्रहापासून अलिप्तता भाव निर्माण होतो. निर्ममत्व निरहंकार रूप प्रकट होते. असे तप केल्याने लघुभाव निर्माण होते. प्रत्येक कार्यात मग निर्दोषता येते. कर्माची निर्जरा तर होतेच होते.

जैनधर्मातील तपविधी अशी आहे की त्याने बाह्य पासून अंतराकडे प्रगती होते. आपण आतापर्यंत बाह्य तपाविषयी विचार केला. आता अभ्यंतर तपाबद्दल माहिती प्राप्त करू या. अभ्यंतर तपाने मनाची शुद्धी होते. सरलता, एकाग्रताची विशेष साधना होते. हे तप बाह्य द्रव्याची अपेक्षा न ठेवता अंतःकरणाच्या व्यापाराने होतात. म्हणून त्यांना अभ्यंतर तप म्हटले आहे.

७) प्रायश्चित - व्रत घेतले पण प्रमादामुळे त्यात दोष लागले तर त्याची विशुद्धी करायला पाहिजे, ती विशुद्धी प्रायश्चित केल्याने होते.

व्रतामध्ये लागलेल्या दोषांची विशुद्धी योग्य प्रायश्चित घेऊन सम्यक् प्रकारे त्याचे निराकरण करणे म्हणजे प्रायश्चित.[३७३]

प्रायश्चित तपाने हे सिद्ध झाले की प्रत्येक आत्मा आपल्या दोषांचे प्रक्षालन करू शकतो. त्यासाठी कुठेही जाण्याची आवश्यकता नाही. फक्त हृदय शुद्ध ठेवण्याची आवश्यकता आहे. वैदिक ग्रंथात पापमुक्तीसाठी ईश्वराच्या शरणी जाऊन सर्व काही अर्पण करण्याचे विधान आहे. तर जैन धर्मात हृदय अत्यंत सरल ठेवून गुरुजनांच्यासमोर पाप प्रकट करून त्यासाठी तप साधना करण्याचे विधान आहे. कारण काही दोष फक्त पश्चाताप केल्यानेच नष्ट होऊ शकतात. काही दोष तप, सेवा इ. ने दूर होतात. या दृष्टीने प्रायश्चिताला तप मानले आहे. त्यास पापमुक्तीचा मार्ग म्हटले आहे.[३७४] आपण केलेल्या व्रतभंगाचा उल्लेख करणे कठीण आहे. कारण मनुष्याचा अहंभाव इतका जागृत असतो की आपण आपले दोष आपल्या मुखाने कोणा समोर व्यक्त करणे हे सामान्य माणसाचे काम नव्हे. त्यासाठी ज्याचे हृदय पापभीरू आहे आणि स्वच्छ हृदय आहे इतर कषायांचे स्थान ज्याच्या हृदयात नसेल तोच प्रायश्चित करू शकतो. म्हणूनच प्रायश्चित एक आंतरिक महान तप आहे.

४) **विनयतप** - जैन दर्शनात विनयाला व्यापक स्वरूपात अतिशय महत्त्व दिले आहे. जीवनात प्रत्येक क्षेत्रात विनयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विनयाचा संबंध हृदयाशी येतो. विनय हा आत्मिक गुण आहे. ज्याचे हृदय कोमल असेल तोच तपाचे आचरण करू शकेल. विनय शब्द तीन अर्थाने प्रयुक्त केला आहे.

१. **विनय** - अनुशासन[३७५] २. विनय - आत्मसंयम[३७६] (सदाचार) ३. विनय - नम्रता आणि सद्व्यवहार [३७७]

गुरू इत्यादी ज्येष्ठ मुनींचा, वयोवृद्धांचा, गुणवृद्धांचा यथोचित सत्कार सन्मान करणे विनय तप आहे. विनयाचे सात भेद आहेत. १) ज्ञान-विनय २) दर्शन-विनय ३) चारित्र-विनय ४) मन-विनय ५) वचन-विनय ६) काय-विनय ७) लोक व्यवहार-विनय.[३७८]

विनय मुख्यतः मनाचा अहंकार आणि दुर्भाव दूर करणे यास म्हटले आहे. कारण मोक्ष प्राप्तीच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा अहंकार हाच आहे.

उत्तराध्ययन सूत्राच्या प्रथम अध्ययनात विनयाचे सुंदर विवेचन केलेले आहे. ज्ञान लाभ, आचार विशुद्धी आणि सम्यग् आराधना इ.ची सिद्धि विनयानेच होते. आणि शेवटी मोक्षाचे सुखसुद्धा विनय-गुणामुळेच प्राप्त होते. विनयाला यासाठीच तपाच्या श्रेणीत महत्त्वाचे स्थान दिले आहे. आणि विनयाचा संबंध हृदयाशी असल्यामुळे ते विशिष्ट प्रकारचे आंतरिक तप आहे. म्हणून विनयभावनेची सतत जोपासना करायला हवी.[३७९]

२) **वैय्यावच्च तप** - (वैयावृत्य) - मनुष्य सामाजिक प्राणी आहे. तो समाजात राहतो. एक-दुसऱ्याच्या सहयोगाची अपेक्षा असते. सुख-दुःखात एकमेकांची मदत करतात. प्रसन्नता, संवेदना प्रकट करतात. तसे तर प्रत्येक प्राणीमात्रावद्दल परस्पर उपकाराची भावना असतेच. आचार्य उमास्वातींनी तर जीवाचे लक्षणच असे सांगितले आहे- ''परस्परोपग्रहो जीवानाम्''[३८०] जीवात परस्पर एक दुसऱ्याची मदत करण्याची, सहकार्य करायची वृत्ती असते.

वैयावृत्य म्हणजे सेवा, सुश्रुषा, पर्युपासना, साधार्मिक-वात्सल्य इ. नावे आहेत. वैयावृत्य केल्याने आत्मा तीर्थंकर नाम-गोत्र कर्माचे अर्जन करू शकतो.[३८१]

३) **स्वाध्याय तप** - शास्त्राचे अध्ययन करणे यास स्वाध्याय म्हणतात. तप म्हणजे फक्त शरीराला क्षीण करणे एवढेच नाही. परंतु तपाचा मूळ उद्देश्य आहे- आंतरिक विकारांना क्षीण करून मन निर्मळ व स्थिर करणे.

स्वाध्याय शब्दाची व्युत्पत्ती करताना काही विद्वानांनी असे ही सांगितले आहे की- "स्वस्य स्वस्मिन् अध्यायः - अध्ययनं स्वाध्यायः" आपण आपल्याच अंतःकरणात आत्मचिंतनात मननात निमग्न रहायचे म्हणजे स्वाध्याय.[३८२] भगवान महावीर स्वामींनी आपल्या अन्तिम उपदेशात म्हटले आहे- "सज्झाए वा निउत्तेण सव्वदुखविमोक्खणो"[३८३]

स्वाध्याय करीत राहिल्याने समस्त दुःखापासून मुक्ती मिळते. "सज्झाएणं नाण वरणिज्जं कम्मं खवेइ[३८४]

स्वाध्याय केल्याने ज्ञानावरणीय कर्माचा क्षय होतो. स्वाधाय पाच प्रकारचे आहेत. **वाचना**- सत्साहित्याचे वाचन. **पृच्छना** - मनात शंका निर्माण झाल्यास गुरुजन किंवा ज्ञानीकडून शंका समाधान करून पुढे ज्ञानवृद्धी करणे.

परिवर्तना - जे ज्ञान मिळविले आहे, तोंडपाठ केलेले श्लोक तत्त्व इ.नी स्मृती रहावी विसरून जाऊ नये म्हणून वारंवार पुनरावृत्ती करणे म्हणजे परिवर्तना.

अनुप्रेक्षा - तत्त्वांचे अर्थ आणि रहस्यांवर विस्ताराने गंभीरतेने चिंतन करणे.

धर्मकथा - जे ज्ञान मिळवले, त्याचे चिंतन मनन केलेले ज्ञान, लोक-कल्याणाच्या भावनेने दुसऱ्यांना समजावून सांगणे. अशाप्रकारे स्वाध्यायचे पाच प्रकार सांगितले आहेत. यांच्या आधाराने साधकाने आपले जीवन जास्तीत जास्त स्वाध्याय, तप करून दिव्यज्ञानाचा प्रकाश मिळवून निर्जरा करावी.

ध्यान-तप - उत्तराध्ययन सूत्रात आभ्यंतरतपाचे जे भेद सांगितले त्यात "ध्यान" हे पाचवे तप म्हणून सांगितले आहे. तत्त्वार्थ व योगशास्त्रात सहावा अंतिम भेद म्हटले आहे. तेथे पाचवा व्युत्सर्ग (कायोत्सर्ग) भेद घेतला आहे. आपण उत्तराध्ययन सूत्रानुसार ध्यानाला पाचवा भेद मानून विवेचन करणार आहोत.

उत्तम संहनन म्हणजे शारीरिक बांधा मजबूत असणाऱ्याच्या अन्तःकरणाच्या वृत्तीची स्थापना ध्यान आहे. त्याची समय मर्यादा ४८ मिनिटे असते. (मुहुर्त-४८ मिनिट) ध्यानाचे चार प्रकार आहेत- १) आर्तध्यान २) रौद्रध्यान ३) धर्मध्यान ४) शुक्लध्यान शेवटचे दोन ध्यान मोक्षाचे कारण आहेत.[३८५]

आर्तध्यान - १. अनिष्ट वस्तुंचा संयोग २. इष्ट वस्तूंचा वियोग ३. प्रतिकूल वेदना आणि ४. भोगाची लालसा या आधारावर आर्तध्यानाचे चार प्रकार आहेत.[३८६]

त्याची चार लक्षणे आहेत. १. क्रन्दनता, २. शोचनता, ३. तिप्पणता, ४. परिवेदना[३८७]

१. क्रन्दनता - रडणे, विलाप करणे, ओरडणे.

२. शोचनता - शोक करणे, चिंता करणे.

३. तिप्पणता - अश्रू ढाळणे.

४. परिवेदना - हृदयावर परिणाम होईल इतके दुःख करणे.

ही चार लक्षणे अत्यंत दुःखित व व्यथित अवस्थेचे सूचक आहेत.

सम्राट चक्रवर्तीची राणी श्रीदेवी चक्रवर्तीच्या मृत्यूनंतर सहा महिनेपर्यंत सतत रडते शोक करते. आर्तध्यानाचा असा परिणाम होतो की श्रीदेवी मृत्यूनंतर सहाव्या नरकात जाते.[३८८] असे ध्यान अशुभ मानले गेले आहे.

रौद्रध्यान - याचे चिंतन क्रूर आणि कठोर असते. हिंसा, खोटेपणा, चोरी, विषयांच्या रक्षणासाठी सतत चिंतित राहणे. रौद्रध्यान अविरत आणि देशविरतमध्ये संभव आहे.[३८९] संयमी व्यक्ती कधी रौद्रध्यान करीत नाही. कारण रौद्र भावनेत संयमी जीवन राहूच शकत नाही.

रौद्रध्यानाचे चार लक्षण आहेत -

१) ओसन्नदोसे - हिंसाचार, खोटे बोलणे, इ. पाप कर्मांचा अत्यंत आसक्तीपूर्वक विचार करणे.

२) बहुलदोसे - भिन्न-भिन्न प्रकारच्या पापी दुष्ट विचारात मग्न राहणे.

३) अण्णाणदोसे - अज्ञानतेमुळे, हिंसादी अधर्म कार्यात मग्न राहणे.

४) आमरणांतदोसे - स्वतः केलेल्या पापाचरणाचा पश्चाताप न करता, मृत्यूपर्यंत क्रूरता, द्वेष करीत राहणे.[३९०]

जैनशास्त्रात 'तन्दुलमत्स्य'चे वर्णन रौद्रध्यानासाठी उदा. म्हणून दिले आहे. तन्दुलमत्स्य रौद्रध्यान केल्यामुळे मरून सातव्या नरकात जातो. तिथे अनंत वेदना भोगतो. रौद्रध्यानाचा हा असा दुष्परिणाम आहे.

हे ध्यान जरी चार प्रकारचे आहेत. परंतु या दोन ध्यानाचा तपात समावेश होत नाही. त्याने निर्जरा तर शक्यच नाही. तपाच्या श्रेणीत फक्त दोन ध्यान येतात. धर्मध्यान आणि शुक्लध्यान-आर्तध्यान आणि रौद्रध्यान यांना केवळ 'ध्यान' म्हटले आहे की त्या अशुभ चिंतनात सुद्धा एकाग्रता असेलच. तरी ही एकाग्रता आहे अशुभच. याने आत्म्याचे पतन होते. म्हणूनच भ. महावीरांनी यांना अग्राह्य म्हटले आहे, अनाचरणीय म्हटले आहे.

अट्ट रुददाणि वज्जिता झाएज्जा सुसमाहिए
धम्म सुक्काइं झाणाइं झाणंतंतु बुहा वए ॥[३९१]

समाधी व शांतीची इच्छा असणाऱ्यंनी आर्त व रौद्र ध्यानाचा त्याग करायला पाहिजे व धर्मध्यान, शुक्लध्यानाचे चिंतन करायला पाहिजे.

धर्मध्यान - आज्ञाविचय, अपायविचय, विपायविचय, आणि संस्थानविचय हे चार धर्मध्यान आहेत. जो अप्रमत्त संयमीमध्ये संभव आहे. तसेच उपशांत मोह आणि क्षीण मोहगुणास्थानात सुद्धा संभव आहे.[३९२]

१) **आज्ञाविचय** - विचय म्हणजे विचार करणे, निर्णय घेणे. वीतराग तथा सर्वज्ञ पुरुषांची आज्ञा काय आहे, कशी आहे. हे जाणून घेऊन त्या आज्ञेचे पालन करण्यासाठी मनोयोग लावणे. आज्ञाविचय धर्मध्यान आहे.

२) **अपायविचय** - दोषांचे स्वरूप आणि त्यापासून सुटका मिळविण्यासाठी जो विचार करायचा त्यासाठी मनाचा योग लावायचा असा हा अपायविचय धर्मध्यान आहे.

३) **विपाकविचय** - ज्या विपाकांचा अनुभव आला तो कोण-कोणत्या विपाकाचा कोण-कोणत्या कर्माचा आभारी आहे, तसेच अमुक कर्माचा अमुक विपाक संभव आहे अशा विचारासाठी मनोयोग लावणे विपाकविचय धर्मध्यान आहे.

४) **संस्थानविचय** - लोकस्वरूपाचा विचार करण्यात मनोयोग लावणे संस्थानविचय धर्मध्यान आहे.[३९३]

धर्मध्यानाचे चार लक्षण आहेत. १) **आज्ञारुची** - अर्थात् जिनेश्वर देवाच्या आणि सदगुरुच्या आज्ञेवर विश्वास ठेवून आचरण करणे.

२) **निसर्गरूची** - धर्मावर, सर्वज्ञभाषित तत्त्वांवर आणि सत्यदर्शनावर जर आपल्या हृदयात सहज श्रद्धा जागृत झाली तर ती श्रद्धा, ती रूची निसर्गरुची आहे.

३) **सूत्ररुची** - सूत्र म्हणजे भगवत्वाणी अर्थात आगम अंग उपांगादिरूप सूत्र, ते ऐकून धर्माबद्दल जी रूची जागृत होते ती सूत्ररुची होय.

४) **अवगाढ रूची** - अवगाहन म्हणजे खोल-गहन चिंतन करणे, ज्यांची आगम वचनांवर गाढ चिंतन, मनन करण्याची, अवगाहन करण्याची रुची असते, ती उत्सुकता, अवगाढरूची होय.[३९४]

मनाला धर्मध्यानात एकाग्र करण्यासाठी धर्मध्यानाच्या चार भावना सांगितल्या आहेत - १) एकत्व, २) अनित्य, ३) अशरण, ४) संसार यांचे विस्तृत वर्णन केले गेले आहे. कारण आमचा विषयच 'भावनायोगे' आहे. याचे ध्यान केल्याने चिंतन केल्याने मनात वैराग्याची भावना जागते. सांसारिक वस्तूबद्दल आकर्षण कमी होते. आत्मा निराकुल, शांत आनंद-स्वरूपाकडे वाटचाल करू लागतो. आत्मशांतीसाठी, मनाला निर्मोही बनवण्यासाठी, भावनेचे अतिशय महत्त्व आहे.

शुक्लध्यान - ध्यानाची ही उत्कृष्ट, उज्ज्वल, निर्मल दशा आहे. मनाने सारे विषय कषाय संपुष्टात आले तर मनाची मलिनता आपोआप संपते. मन उज्ज्वल होता-होता जेव्हा पांढऱ्या शुभ्र वस्त्राप्रमाणे पूर्णपणे मळ रहित होते, तेव्हा मनाची निर्मलता, शुक्लता प्राप्त होते. अशा निर्मळ मनाची एकाग्रता व अत्यंत स्थिरता शुक्लध्यान आहे.[३९५]

शुक्लध्यान हे जीवाच्या सर्वोच्च आत्मानंदाचे शिखर आहे. इथे पोहोचल्यावर आत्मा आपल्या स्वरूपात मग्न होऊन ज्ञानात एकात्मकता प्राप्त करतो. शुक्लध्यान प्राप्त झाल्यावर ध्याता, ध्येय आणि ध्यान या तिन्हींचे तादात्म्य होते. या तिन्हीत एकरूपता होते तेव्हा विशुद्ध आत्म्याच्या सर्व दुःखाचा क्षय होतो.[३९६]

शुक्लध्यानाचे दोन भेद आहेत. १. शुक्ल, २. परम शुक्ल. चौदापूर्वधरापर्यंत शुक्ल ध्यान आहे. केवली भगवानाचे ध्यान परमशुक्ल ध्यान असते.[३९७] हे भेद ध्यानाची विशुद्धता व अधिकतम स्थिरतेच्या दृष्टीने केली आहे.

स्वरूपाच्या दृष्टीने शुक्लध्यानाचे चार भेद आहेत. १. पृथक्त्व वितर्क, सविचार- पृथकत्वाचा अर्थ आहे भेद. वितर्कचा अर्थ आहे तर्क प्रधान चिंतन या ध्यानावस्थेत वस्तूच्या विविध प्रकारांवर चिंतन केले जाते.

२. एकत्व वितर्क सविचार - जेव्हा भेदप्रधान चिंतनात मन स्थिरता प्राप्त करते, मग अभेद प्रधान चिंतनात स्वतः स्थिरता येते. या ध्यानात वस्तूच्या एकरूपाला ध्येय मानले जाते. जर कोणत्याही एक पर्यायरूप अर्थावर चिंतन चालते तेव्हा त्याच्यावरच चिंतन चालत राहील. हे ध्यान पूर्णपणे निर्विचार ध्यान नाही.

३) सूक्ष्मक्रिया प्रतिपाति - हे ध्यान अतिशय सूक्ष्म क्रियेवर चालते. जेव्हा सर्वज्ञ भगवान योग निरोधाच्या क्रमात शेवटी सूक्ष्म शरीरयोगाचा आश्रय घेऊन बाकी योगांवर रोक लावतो तेव्हा ती सूक्ष्म क्रिया प्रतिपाती ध्यान असते. कारण की, त्यात

श्वास-उच्छ्वासप्रमाणे सूक्ष्म क्रियाच बाकी राहते.

४) समुछिन्न क्रियानिवृत्ति - जेव्हा शरीराच्या सूक्ष्म क्रिया सुद्धा बन्द होऊन जातात आणि आत्मप्रदेश पूर्णपणे निष्प्रकंप होऊन जातात, त्यास समुच्छिन्न क्रिया निवृत्ती ध्यान म्हणतात. याने सर्व आस्रव आणि बंधाचा निरोध करून बाकी राहिलेले कर्म क्षीण झाल्यामुळे मोक्ष प्राप्त होतो. तिसऱ्या व चवथ्या शुक्लध्यानात कोणत्याही प्रकारचे आलंबन रहात नाही.[३९८]

शुक्लध्यानाच्या चार अनुप्रेक्षा आहेत.

१) अनन्तवर्तितानुप्रेक्षा - अनन्त भव-परंपराविषयी चिंतन करणे ही संसारानुप्रेक्षा आहे.

२) विपरिणामानुप्रेक्षा - वस्तू परिवर्तनशील आहे असा विचार करून त्याची आसक्ती आणि राग द्वेष कमी करणे.

३) अशुभानुप्रेक्षा - संसाराच्या अशुभ स्वरूपाचे चिंतन करणे.

४) अपायानुप्रेक्षा - क्रोध वगैरे दोष आणि त्याच्या कटुफलावद्दल चिंतन करणे.[३९९] ध्यानसाधनेचे मुख्य तत्त्व समता आहे. मन जितके समभावी बनेल तितके ते स्थिर बनेल. समभावाशिवाय ध्यान होऊच शकत नाही. वास्तविक मनाची स्थिरता, समाधी खऱ्या अर्थाने तप आहे.

व्युत्सर्ग तप - आभ्यंतर तपापैकी सहावे तप व्युत्सर्गतप आहे. योगशास्त्रात याचा पाचवा नंबर आहे. परंतु उत्तराध्ययन सूत्रात याचा अंतिम आभ्यंतर तपाच्या रूपात उल्लेख आहे.

व्युत्सर्ग हा सामाजिक शब्द आहे. यात 'वि' आणि 'उत्सर्ग' हे दोन शब्द आहेत. 'वि' म्हणजे विशिष्ट आणि उत्सर्ग म्हणजे त्याग, त्याग करण्याची विशिष्ट पद्धती म्हणजे व्युत्सर्ग.

बाह्य आणि आभ्यंतर उपाधीचा त्याग असे व्युत्सर्ग तपाचे दोन भेद आहेत.[४००]

१) धन, धान्य, घर, क्षेत्र इ. बाह्य पदार्थांची ममता ज्याचा त्याग करणे बाह्योपधी व्युत्सर्ग होय.

२) शरीराच्या ममतेचा त्याग करणे व कायिक विकारांच्या तन्मयतेचा त्याग करणे म्हणजे आभ्यन्तरोपधी व्युत्सर्ग होय.

या तपाच्या साधनेने जीवनात निर्ममत्वता, निस्पृहता आणि अनासक्ती व निर्भयतेची ज्योत प्रज्वलित होते.

अशाप्रकारे जैनधर्मात तप म्हणजे फक्त काया-दण्ड रूप नव्हे, तर मानसिक शुद्धी सुद्धा होते. तप अध्यात्मसाधनेचा प्राण आहे.

संयमी पुरुष बाह्य व आभ्यंतर तप रूपी प्रज्वलित अग्नीमध्ये अत्यंत कठिणतापूर्वक निर्जरित होणाऱ्या कर्मांना क्षणात क्षय करून टाकतात.[४०१]

तप फक्त शरीर निर्बल करण्यासाठी नाही, ऋद्धि-सिद्धी प्राप्त करण्यासाठी नाही, परंतु आत्म्याला कर्मबंधनातून मुक्त करण्यासाठी तप आहे.

तप साधकाच्या जीवनात फार महत्त्वपूर्ण अंग आहे. परंतु तपसाधना करणे इतके सहज सोपे नाही. कारण जोपर्यंत साधकाची एषणा (इच्छा) समूळ नष्ट होत नाहीत जोपर्यंत तपाबरोबर ऐहिक, पारलौकिक सुख, यशकीर्तिची भावना असते. त्याने तपाची पवित्रता नष्ट होऊन जाते. आगमात म्हटले आहे की -''इहलोकातील सुखाची कामना आणि अभिलाषा करून तप करू नका. परलोकाची कामना ठेवून तप करू नका. यश, कीर्ती आणि प्रतिष्ठा इ.साठी पण तप करू नका. तप करीत आहात तर फक्त कर्म निर्जरासाठी करा.[४०२]

मनुष्य फार दुर्बल आहे. अनेक लोक खूप तप करतात. परंतु तपाच्या निमित्ताने प्रचंड आयोजन, आडम्बर करतात. अमर्यादित आरंभ-समारंभ करतात. याचे ही महत्त्व समजावताना म्हणतात हा ज्याचा त्याचा उत्साह आहे. अन्य सांसारिक कार्यक्रम समारंभ सोहळे आणि धुमधडाक्याने साजरे करतोच की हे तर धार्मिक कार्य आहे. धर्माची प्रभावना आहे. त्यात थोडा खर्च, आडम्बर केले तर काय हरकत आहे ? परंतु या समारंभाच्या देखाव्यात तपस्वीचे मन आनंदात गुरफटले, भारदस्त कार्यक्रम केला जाईल हा हेतू असेल तर महान तपाची पवित्रता नष्ट होईल. मग तपाचे महत्त्व शून्य होईल.

निर्जराभावना अशा वैचारिक पृष्ठभूमीवर आधारित आहे. फक्त कर्म-निर्जरण कर्मोच्छेदासाठीच तप करावे असे आगमात प्रतिपादन केलेले आहे. बाकी सर्व साध्य झाले आणि निर्जरा साध्यशाली नाही तर मुक्तीचा मार्ग मिळणार नाही. कारण संचित कर्म विभाव उत्पन्न करीतच राहणार.

आचार्य शुभचन्द्र काव्यात्मक शैलीत वर्णन करताना म्हणतात - सुकृती-उत्तम आचारयुक्त पुण्यचरित पुरुष प्रथम अनशन इ. बाह्य तपाचे आचरण करतो. तत्पश्चात

तो ध्यान इ. आत्माधीन आभ्यंतर तपाचा अभ्यास करतो. या तपाद्वारे तो चिरकालापासून संचित कर्म ज्ञानावरणीय, दर्शनावरणीय, मोहनीय, आणि अंतराय या चार घाती कर्मांचा क्षय करतो. नंतर परमानंदनिलय, अर्थात परमआनंदाचे गृह किंवा आवासस्थान ज्ञानरूपी समुद्रात प्रवेश करतो.[४०३] तो ते दिव्य ज्ञान प्राप्त करतो. केवलज्ञान इ. अनंत चतुष्टय प्राप्त करतो.

ज्यांनी आस्रवाचा निरोध केला, जो तपाचरणाने युक्त आहे त्याचीच निर्जरा होऊ शकते. संचित कर्म निर्जीर्ण होऊ शकतात. निर्जराचे दोन रूप आहेत. १) देश निर्जरा आणि २) सकल निर्जरा. संसारात संसरणशील प्राण्यांची क्षयोपशम प्राप्त कर्मांची निर्जरा होतच राहते. ती देश (अंशमात्र) निर्जरा असते. कर्म काही अंशमात्र क्षीण होत राहतात. काही अंश उपशांत होतात. काही अंशात ते उदयास येतात, काही अंशात सत्तेमध्ये पडून राहतात. त्यांना क्षयोपशम म्हणतात.

सोन्याला अग्नीत जाळल्याने ते शुद्ध धातूरूपात निखरते. त्याचप्रमाणे तपाच्या आचरणाने कर्म जळून जातात. आत्मा निर्मल, शुद्ध होतो. तपरूपी अग्नी श्रेष्ठ ज्ञानरूप वायूने, शील, उत्तम समाधीच्या आधाराने प्रज्वलित होते आणि भव बीजाला भस्म करते. ज्याप्रमाणे अग्नी तृण, काष्ठ इ. ना जाळून टाकते.

तप असे प्रभावी शस्त्र आहे की ज्यामुळे अनादिकाळापासून संचित असलेले कर्म नष्ट होऊन जातात. अंतरंग व बहिरंग तपाचरणात आपण स्वतःला झोकून द्यायला पाहिजे. निर्जराचा परिणाम इतका उच्च प्रकारचा आहे की, जीव, जन्म, वृद्धावस्था, मृत्यूच्या बंधनातून सुटून भवचक्रातून मुक्त होऊन अनंत सुखाला प्राप्त करू शकतो.

शरीरात जेव्हा विजातीय द्रव्य संचित होतात तेव्हा शरीर अस्वस्थ होतो. ते निघून गेले तर शरीर स्वस्थ होतो. त्याचप्रमाणे आत्मा विभावदशेत जातो तेव्हा अस्वस्थ होतो त्याला कर्म रोग लागू पडतो. परंतु जेव्हा स्वभावदशेत येतो तेव्हा स्वस्थ होतो. बाह्य कर्म संचयाची निर्जरा झाल्यावर मानसिक चंचलता समाप्त होते.

परंतु थोडी स्वस्थता लाभली तर लोक औषध घेणे विसरतात. तसेच थोडी शांती मिळाली की लोक धर्मानुष्ठान करणे विसरतात आणि संसारात काळोख उत्पन्न करणाऱ्या विषय भोगाचे पालन पोषण करू लागतात. त्यांना सोमदेवसूरी म्हणतात - हे जीवात्मा तुम्ही विसरू नका. पुन्हा अत्यधिक कष्टाने पीडित होऊ शकाल, तुम्ही चिंतन करा की पापाचे आचरण अती अप्रिय आहे, दुःखमय आहे मी तसे करणार नाही असे चिंतन

केल्याने तुम्ही तपश्चर्येद्वारा कर्म निर्जरेच्या दिशेत उन्मुख व्हाल भावनेचे पुन्हा पुन्हा चिंतन अनुचिंतन मनात निश्चित परिवर्तन आणतात.[४०४]

अशा प्रकारे निर्जरा भावनेमध्ये निर्जरेचे स्वरूप, लक्षण आणि तिच्या साधनावर पुन्हा पुन्हा चिंतन मनन करीत राहिले पाहिजे. या चिंतनाने आत्म्यामध्ये तपाविषयी आकर्षण वाढते, हृदयामध्ये तप करण्याची भावना जागृत होते. तप करण्याची शक्ती देखील अन्तरामध्ये जागृत होते आणि आत्मा जेव्हा त्या दिशेत अग्रेसर होतो तेव्हा कर्मावरणाला क्षीण करून परमविशुद्धीकडे अग्रेसर होतो.

लोक भावना

निर्जराभावनेमध्ये कर्मक्षय होऊ लागले म्हणजे कर्मामुळे आत्मा चौदा राजुलोकामध्ये कुठे कुठे राहून आला आणि ह्या कर्म क्षेत्रातून आत्म्याला बाहेर काढून कर्मरहित आत्म्याचे राहण्याचे स्थान कोठे आहे त्याचे स्वरूप आपण लोकभावनेत पाहू. पूर्वी भावनामध्ये आत्म्याचा एकाकीपणा पर पदार्थाचा अन्यत्व भाव कर्मबंधांचे हेतू आणि कर्म निर्जरणाचे स्वरूप धर्माशिवाय आत्माचे अशरणत्व इ. विषयांचे विवेचन केले आहे. लोक स्वरूपाचे विशेष प्रकारे चित्रण केले जाईल. जीव, अजीव तत्त्व या लोकातच आहेत, जीवाचा, मानवाचा या विशाल लोकात कितीसे अस्तित्व आहे याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. या लोकांचे स्वरूप कसे आहे ? जीव-अजीवाच्या संदर्भात काय-काय घटित होते इ. विषयांचे ज्ञान मानवीय आत्मचेतनाला सत्यान्मुख होण्यास खूप सहायक सिद्ध होतात. आपल्या यथार्थ अस्तित्व बोधाने मानवाला यथार्थ पथावर अनुगमन करण्याची प्रेरणा प्राप्त होते. त्यामुळे हा आत्मा जड (निर्जीव) पदार्थापासून वेगळा आहे त्यावर कर्माची आवरणे आल्यामुळे आत्मा अविशुद्ध झाला आहे. आणि नेमके हेच काम करण्यास तो प्रेरित होतो. त्याला हे पक्के समजलेले असते की, आपले कल्याण, उत्थान, अभ्युदय आपल्याच पुरुषार्थावर अवलंबून आहे. अशी विचारशील व्यक्ती आपल्या आत्मपराक्रम आणि अध्यवसायद्वारे कर्मास्रवांना रोकण्यात समर्थ होतो. पुरातन संचित कर्मांचे निर्जरण किंवा क्षरण करण्यास उद्यत होतो. आत्मउपासनेचा मार्ग स्वीकार करण्याची प्रेरणा ह्याच्यात जागृत होते.

म्हणूनच लोकभावना एक स्वतंत्र भावना आहे. जैन आगमान तथा आगमोत्तर ग्रंथात द्वादश भावनेच्या अंतर्गत यांचे मार्मिक विश्लेषण केलेले आहे. इथे त्याविषयी संक्षेपात थोडा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

जैन आगमात व्याख्या प्रज्ञप्ति (भगवतीसूत्र) तथा सूत्रकृतांग सूत्र इ.मध्ये 'लोक'चे विवेचन केले आहे. सारांश असा आहे की, लोक द्रव्य अपेक्षेने सांत आहे. कारण संख्येच्या दृष्टीने एक आहे. परंतु भाव अपेक्षेने किंवा पर्याय अपेक्षेने ते अनंत आहे. काळाच्या दृष्टीनेसुद्धा लोक अनंत आहे. शाश्वत आहे. कारण असा कोणताही काळ नाही ज्यात लोकाचे अस्तित्व नाही.

भूत, वर्तमान, भविष्य तीनही काळात लोकाचे आस्तित्व आहे. परंतु क्षेत्र दृष्टीने लोक सांत आहे. कारण समस्त क्षेत्रापैकी काही क्षेत्रातच लोक आहे अन्य ठिकाणी नाही.[४०५]

इथे प्रयुक्त केलेले शब्द सांत आणि अनंत ह्याने अनेकान्तवाद सिद्धांताची स्थापना होते. 'लोक'ची शाश्वतता, अशाश्वतता विषयी भगवान बुद्धांनी लोक हे अव्याकृत आहे असे म्हटले आहे. भ. महावीरांनी अनेकांतवादाच्या आधाराने त्याचे विवेचन केले आहे. भगवती सूत्रात प्रसंग आहे - ''जमाली आपल्या स्वतःला अर्हत् समजत होता. गौतम गणधरांनी 'लोक'ची शाश्वतता, अशाश्वततावद्दल प्रश्न विचारला, जमाली उत्तर देऊ शकला नाही. तेव्हा भ. महावीरांनी त्याचे समाधान करताना सांगितले, ''जमाली ! हा लोक शाश्वत पण आहे आणि अशाश्वतही आहे. त्रिकाळात असा एक सुद्धा क्षण नाही की लोक कोणत्या ना कोणत्या रूपात नसेल. म्हणून लोक शाश्वत आहे. तरीपण ते अशाश्वत पण आहे. कारण की ते सतत एकारूपात रहात नाही. त्यात अवसर्पिणी आणि उत्सर्पिणीमुळे अवनती, उन्नती होत राहते. जे शाश्वत असते त्यात परिवर्तन नसते. म्हणून त्यास अशाश्वत पण मानले पाहिजे.[४०६]

लोक काय आहे ? भगवान महावीरांच्या शब्दात पाच अस्तिकाय म्हणजेच लोक आहे. धर्म-अधर्म, आकाश, पुद्गल आणि जीवास्तिकाय हे पाच अस्तिकाय आहेत.[४०७]

लोक स्वरूपाचे एक उपमा देऊन विश्लेषण केले आहे की- जमिनीवर अगोदर एक मातीचा वाडगा अर्थात एक पसरट भांडे उलटे ठेवून त्याच्यावर एक दुसरे तसेच भांडे सरळ ठेवायचे त्यावर एक उलटे असे भांडे ठेवले तर जी आकृती तयार होईल तशीच आकृती लोकाची आहे. आकृती समजण्यासाठी उपमा अनेक आहेत. अधोलोकाचा आकार उलट्या वाडग्यासारखा आहे. तिर्यग लोकाचा आकार झालर किंवा पौर्णिमेच्या चंद्रासारखा आहे. उर्ध्व लोकाचा आकार उर्ध्व मृदंगासारखा आहे.[४०८]

जैन दार्शनिकांनी लोक संबंधी आपले मत प्रस्तुत करण्यासाठी चार अपेक्षा प्रस्तुत केल्या आहेत. १) द्रव्य, २) क्षेत्र, ३) काल आणि ४) भाव.

द्रव्य अपेक्षेद्वारा त्यांनी ह्या लोकात कोणत्या वस्तू आहेत हे प्रकट केले आहे. क्षेत्र द्वारा त्यांनी या लोकाची लांबी-रुंदी-उंची सांगितली आहे. काल द्वारा लोकगत द्रव्यांचा स्वभाव काय आहे ? आणि त्यात परिवर्तन कसे होते ? हे सांगितले आहे.

जैन दार्शनिकांनी द्रव्य अपेक्षेने सांगितले आहे की- आकाश सगळ्यात मोठे द्रव्य आहे. ते असीम आहे. त्याच्या अगदी लहान क्षेत्रात धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय, पुद्गल आणि जीव हे चार अस्तिकाय विद्यमान आहेत. त्याला (त्या आकाश समेत) लोक म्हणतात.

जैन धर्माच्या प्रवर्तकांच्या अनुसार आकाश, धर्म, अधर्म, जीव व पुद्गल हे पाच अस्तिकाय आहेत. कारण हे सर्व अगदी सूक्ष्म आहेत. अविभाज्य प्रदेशांची राशी रूप आहेत. गणनानुसार धर्मास्तिकाय, अधर्मास्तिकाय आणि आकाशास्तिकाय एक-एक अखण्ड द्रव्य आहे. पुद्गल आणि जीव संख्येत अनन्त आहेत.

क्षेत्राच्या दृष्टीने हा लोक असंख्य योजन लांब-रुंद आणि उंच आहे. त्यात पृथ्वी, जल, अग्नी आणि वनस्पती अतिशय सीमित क्षेत्रात आहे. तसेच लोकाचा अधिकांश भाग मुख्यतः वायुपुरित आहे.

काळाच्या दृष्टीने ही पाचही द्रव्य अनादि म्हणजे कधी स्वतः उत्पन्न झाले नाही आणि नाही कोण्या ईश्वराने, कोणत्या तत्त्वाने उत्पन्न केले आहे. ज्याप्रमाणे हा लोक आदिरहित आहे. त्याचप्रमाणे अंतरहित आहे. अर्थात हे कधी स्वतः नष्ट होणार नाही. अथवा कोणीही त्याला नष्ट ही करू शकणार नाहीत.

लोकाची सर्वथा नवीन उत्पत्ती आणि सर्वथा विनाश दोन्ही ही असंभव यामुळे आहे की जर सर्वथा नवीन उत्पत्ती होते असे मानले तर प्रश्न होतो की लोकाचे उपादान द्रव्य काय असेल? उपादानाशिवाय उत्पत्ती संभवच नाही.

भावच्या दृष्टीने गुण आणि पदार्थ दोन्ही ग्राह्य आहेत. पाच द्रव्यांचे गुण क्रमशः असे आहेत- धर्मास्तिकायचा गुण आहे गती करण्यात सहायता करणे. अधर्मास्तिकायचा गुण आहे स्थिर राहणाऱ्या जीवांना आणि पुद्गलांना स्थितीमध्ये सहायता करणे. आकाशस्तिकाय स्थान (अवकाश) प्रदान करणे. जीवास्तिकायचा स्वभाव ज्ञान आणि

दर्शनमय अर्थात् द्रव्यात असलेली एकता आणि भिन्नता जाणणे, पाहणे. हाच त्याचा गुण होय. पुद्गलास्तिकायचा स्वभाव वर्ण, गंध, रस व स्पर्श आहे.[४०९]

'बारसाणुवेक्खा' मध्ये लोकाची परिभाषा करताना ग्रंथकाराने लिहिले आहे- जीवादी पदार्थांचा समवाय म्हणजे लोक. 'आदी' शब्दाने इथे पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल यांना ग्रहण केले आहे. म्हणूनच षड्द्रव्यात्मक लोक असे म्हटले जाते. प्रत्येक द्रव्य आपल्या मूळ स्वरूपाच्या दृष्टीने नित्य आहे. म्हणून हा लोक सुद्धा नित्य आहे. अधोलोक, उर्ध्वलोक, मध्यलोक असे याचे तीन विभाग आहेत.

पुढच्या श्लोकात या तीन्ही लोकांचे संक्षिप्त वर्णन आहे. अधोलोकात नारकीचे जीव राहतात. मध्यलोकाच्या विस्ताराचे वर्णन आहे त्यात असंख्यात द्वीप आणि असंख्यात समुद्र आहेत. उर्ध्वलोकात स्वर्गाचे ६३ पटल आहेत. आणि सर्वांच्या उच्चस्थानी मोक्ष आहे.[४१०] पुढे लोक संबंधित अन्य माहिती दिली आहे की -

अशुभोपयोगामुळे नर्क तथा तिर्यंच योनी, शुभोपयोगामुळे देव व मनुष्य योनी प्राप्त होते. शुद्धोपयोगामुळे मोक्ष प्राप्त होतो.[४११] अशुभ व शुभ योग आस्रवच्या अर्थाबद्दल आले आहेत. शुद्धोपयोग संवर व निर्जराशी संबंधित आहे. योग शब्दाच्या अगोदर जे उपसर्ग आले आहेत. ते सामिप्य बोधक आहेत. योगप्रवृत्तीच्या जवळ जाणे किंवा त्याच्याशी जुळणे, उपयोग आहे. शुद्धोपयोगात हे सामिप्य, जुळणे आत्म्याशी होते. संवर कर्म निरोधाचा पर्यायवाची आहे जो आत्मभाव आहे. निर्जरा, आत्म्यावरील कालुष्य निर्जरण करण्याच्या अर्थाने आहे. कर्म निर्जराने आवृत्त आत्मा भाव परावृत्त या उन्मुक्त होतो जी आत्म्याची शुद्धावस्था आहे.

कार्तिकेयानुप्रेक्षामध्ये एकशे पंधरा गाथापासून दोनशेत्र्याऐंशी गाथापर्यंत लोकाच्या स्वरूपाचे विस्तृत विवेचन आहे.[४१२]

संसारात जीवाचे भटकणे पुद्गल परावर्तन, द्रव्य, क्षेत्र, काल, भाव, भव इ.चे यथाप्रसंग विशद विवेचन केले आहे. बहिरात्मभाव, अंतरात्मभाव, परमात्मभाव यांचे ही विश्लेषण केले आहे. गणिताच्या दृष्टीने अनेक विषयांचे विस्ताराने विवेचन केले आहे. गुण, पर्याय, उत्पाद, व्यय, धौव्य, आस्तित्व, वस्तुत्व, द्रव्यत्व, प्रेमयत्व, अगुरुलघुत्य, चेतनत्व, अचेतनत्व, प्रदेशत्व, अप्रदेशत्व, मूर्तत्व, अमूर्तत्व इ.ची चर्चा केली आहे. गुण, गुणी पर्याय, स्वभाव इ. अनेक गुण विषयांचे विविध प्रसंगानुरूप प्रतिपादन केले आहे. 'लोक'चे वर्णन करताना शेवटी म्हटले आहे जो पुरुष उपशाममय परिणामांनी अनुप्रेरित

होऊन लोक-स्वरूपाचे ध्यान करतो, तो कर्माच्या समुदायांना ध्वस्त करून तीन लोकांचा शिरोमणी होऊन जातो. मग मुक्त सिद्ध बनून लोकाग्र भागात स्थित होऊन जातो.

लोकाची आकृती, प्रमाण इ.चे विवेचन करताना मूलाचारामध्ये आचार्य वट्टकेर म्हणतात- जीव आपल्या संचित शुभाशुभ कर्माच्या परिणामानुसार अनेक प्रकारचे कष्ट भोगतात. हा लोक धिक्कार योग्य आहे, जिथे परम ऋद्धीशाली देव, इन्द्र इ. अनुपम सुख भोगून पुन्हा घोर दुःखात पडतात. लोकाच्या ह्या स्वरूपाला समजून साधकाने असे चिंतन करावे की वास्तविक आपल्यासाठी तेच स्थान प्राप्त करण्यासारखे आहे. जे लोकाग्र भागात सिद्धशीला स्थित आहे. त्याचेच ध्यान करावे, लोक परित्याज्य आहे. हे आपले शाश्वत स्थान नाही. लोकाग्र शिखरवर्ती मोक्ष स्थान सर्वथा निरुपद्रव आहे, शाश्वत आहे.[४१३]

संसारभावनेनंतर भगवती आराधनामध्ये लोकानुप्रेक्षा किंवा लोक-भावनाचे वर्णन आहे. ज्याचे अगोदर वर्णन झाले आहे. आचार्य कुंदकुंद कृत द्वादशानुप्रेक्षा तथा आचार्य वट्टकेर रचित मूलाचारमध्ये असेच वर्णन आहे. ह्यात संसारगत संबंध व स्थान विजेप्रमाणे चंचल, केसाप्रमाणे दुर्बल, रोगग्रस्त आणि मृत्यूने पीडित अशा या जगाला पाहून ज्ञानी जन यात कधीच अनुरक्त होत नाहीत. या लोकदशेचे चिंतन केल्याने वैराग्य भाव उत्पन्न होतो. ज्यामुळे कित्येक पुण्यवान संसारदशेतून मुक्त होतात. लोकानुप्रेक्षाचा आधार लोकस्वरूपाचे चिंतन आहे. जो सर्वत्र वैचारिक दृष्टीने एकसारखा आहे. जैनागमामध्ये या लोकांचे विस्तृत वर्णन केले गेले आहे.

आचार्य शुभचंद्र लिहितात - हे अनादि आहे न याचा प्रारंभ आहे न ही अंत आहे. हे स्वयं सिद्ध आहेत. कोणाच्याही द्वारे रचित नाही. अनश्वर-नाश रहित आहे. हे अनिश्वर आहे, कोणी ही याचा स्वामी, ईश्वर, प्रभू किंवा सृष्टा नाही. हे जीवादी पदार्थांनी युक्त आहे.[४१४]

आचार्य शुभचन्द्र द्वारा वर्णित ''या लोकांचे स्वरूप'' जैन दर्शनातील एक अतिशय महत्त्वपूर्ण सिद्धान्त उद्घाटित करणारा आहे. जैन दर्शन ईश्वर कर्तृत्ववादी नाही. जैन दर्शनानुसार जगाचा निर्माता, कर्ता कोणी नाही. हा लोक अनादी अनंत काळापासून होता आणि पुढे अनंत काळापर्यंत असाच चालू राहील.

या विशाल लोकात मानवाचे कितीसे आस्तित्व याचा विचार केला तर त्याचे स्थान नगण्य असे आहे. तरी ही मनुष्य आपल्या स्वतःला किती-श्रेष्ठ, महान, विशेष मानतो. ही मानवाची मिथ्या धारणा आहे भ्रान्त धारणा आहे. ती या विराट लोकाचे

वर्णन पाहिले की हा गर्व ओसरून जातो. आपले आस्तित्व ओळखू शकतो. आणि मग अहंकार, दंभ इ. विकार त्याच्यात निर्माण होत नाहीत. आणि मग खऱ्या धर्माला ओळखण्याच्या दिशेने प्रयत्नशील होतो.

लोक भावनेच्या संदर्भात यशस्तिलकम्मध्ये सृष्टी कर्तृत्व संबंधी सोमदेव १३८ श्लोकापासून १४१ श्लोकापर्यंत लिहितात की, बुद्धी किंवा इच्छापूर्वक कोणी लोक निर्माण केले असावे असे सिद्ध होत नाही. जसे चटई बनवायची असेल तर चटईसाठी लागणारे गवत इत्यादी साहित्य पाहिजे. ते समोर असेल तर चटई बनवण्याऱ्याची ती बनविण्याची इच्छा होईल. तसे साधन लोकनिर्मितीसाठी लागलेच नाही. जर ईश्वर तीन लोकाची रचना करतात तर भवन इत्यादी बनवण्यासाठी कारीगराची काय आवश्कयता ? या लोकात इतके कोणतेही स्थान शिल्लक राहिले नाही, जिथे हा जीव गेला नाही. तुम्ही या लोकातील समस्त स्थान भोगलेले आहेत. फक्त एकच स्थान अजून आपणास अभुक्त राहिले आहे. जे स्थान तेव्हा प्राप्त होईल जेव्हा तुम्ही सर्व कर्मांना नष्ट करून टाकाल. तेव्हा ते अभुक्त स्थान, मोक्ष तुम्हाला प्राप्त होईल. अजून ते प्राप्त झाले नाही कारण आत्माकर्म मुक्त झालाच नाही.[४१५]

शांतसुधारसाचे स्वनाकार क्रमप्राप्त लोकभावना संबंधी आपले उदगार व्यक्त करताना लिहितात. "हे विजय ! तुम्ही आपल्या हृदयात शाश्वत लोकाकाशाचे चिंतन करा. यात लोकाकाश सर्व चल-अचल पदार्थांना धारण करून द्रव्यात्मक रूपाने त्यांना आश्रय देतो. हा अलोकाने परिवेष्टित आहे, असीम आहे; धर्मास्तिकाय इ. पाच द्रव्यांच्या आधाराने याची सीमा निश्चित आहे, लोकात सहा द्रव्य समाविष्ट आहेत. अलोकात फक्त आकाश आहे. धर्म-अधर्म इ. द्रव्य तिथे नसल्यामुळे तिथे गती आणि स्थिती नाही.

जिनेश्वर देव अथवा सामान्य केवली आपल्या कर्म परमाणुंचा समन्वय करण्यासाठी समुद्घात करतात. तथा त्यांच्या आत्मप्रदेशांनी आकाश परिव्याप्त होऊन जाते. हे लोक प्राणी, परमाणूंच्या क्रियासाठी ग्रह समान आहेत. जरी हे लोकाकाश एकरूप आहे. परंतु पुद्गलांमुळे याचे अनेक आकार भेद झाले आहेत. कुठे ते मेरुपर्वतापेक्षा ही उंच आहेत तर कुठे खड्याइतके सीमित होऊन जातो. कुठे ते मंदिरापेक्षाही सुंदर दिसतात. तर कुठे घोर अंधकाराने व्याप्त नरकादी सारखा बीभत्सपण दिसतो. जन्ममरणाच्या चक्रात भटकणारे प्राणी अनेक काळापर्यंत एकदुसऱ्याशी वेगवेगळी नाती जोडत राहतात. आणि या लोकात

परिभ्रमण करीत राहतात. या परिभ्रमणापासून मुमुक्षुला मुक्त व्हायचे आहे. मुक्ती मार्गाचा अवलंब करायचा आहे.

कार्तिकेयानुप्रेक्षामध्ये एकशे पंधरा श्लोकापासून दोनशे त्र्याऐंशी श्लोकापर्यंत लोकाचे विवेचन आहे. विद्वत् वरेण्य स्वामी कार्तिकेय यांनी लोकाचे विस्तृत वर्णन तर केले आहेच त्याबरोबर तद्गत् द्रव्य तत्त्वांची जी व्याख्या केली आहे. ती फारच अधिक ज्ञानवर्धक आहे. वैज्ञानिकांनी सुद्धा वैज्ञानिक दृष्टीने लोकाबद्दल गंभीर चिंतन केले आहे आणि बरेच तथ्य उद्घाटित केले आहे. त्यांचा शोध आज सुद्धा चालू आहे. ज्ञानाचा विषय अत्यंत विस्तीर्ण आहे. अनेक अनेक जन्म व्यतीत झाले तरी त्याचा पत्ता लागणे फार कठीण आहे. सर्वज्ञ प्रभूंनी निरूपित केलेले अनेक तथ्य आज विज्ञानाच्या कसोटीवर सत्य सिद्ध होत आहेत. उदा. धर्मास्तिकायचे उदा. पाहू या. गतीमध्ये असाधारण रूपात सहायता करणारा धर्मद्रव्य समस्त लोकात व्याप्त आहे. अलोकात ते नाही. म्हणून ते गतिशून्य आहे. अलोकात फक्त आकाश द्रव्यच आहे.

वैज्ञानिकांनी इथर नामक असा एक पदार्थ शोधला आहे जो साऱ्या जगात व्याप्त आहे. आपल्या हलन-चलनात त्याची अत्यंत आवश्यकता आहे. तो अभौतिक आहे. अपरमाणू आहे. इथरा (Eather)ची ही व्याख्या जवळजवळ धर्मास्तिकाय सारखीच आहे. जैन दर्शनानुसार वनस्पतीमध्ये जीवत्व आहे. त्याला वेदना आणि पीडा दोन्ही जाणवतात. जगातील महान वैज्ञानिक डॉ. जगदीशचंद्र वसू यांनी वनस्पतींचे सूक्ष्म अन्वेषण केले. आणि सिद्ध केले की वनस्पती सजीव आहेत इतकेच नव्हे तर त्यांना आनंद दुःख इ.ची अनुभूती सुद्धा होते.

जैनदर्शनात तर वनस्पती सजीव आहेत हे केव्हाच सिद्ध केलेले आहे. यावरून जैनदर्शनात असलेल्या अनेक सत्य गोष्टी पुढील काळात विज्ञान संशोधनाने सिद्ध करून दाखवतील.

स्वामी कार्तिकेयांनी लोकविषयी केलेले विश्लेषणाची इथे थोडक्यात चर्चा करणे उपयुक्त होईल. त्यांनी प्रतिपादित केले आहे की, लोक अकृत्रिम आहे. अनादी अनंत आहे, स्वभावाने निष्पन्न आहे. जीव-अजीव द्रव्याने परिव्याप्त आहे. आकाश एक अंग आहे आणि ते नित्य आहे. कार्तिकेयानुप्रेक्षाचे टीकाकार आचार्य श्रीशुभचंद्रांनी मूळग्रंथात निरूपित तत्त्वांचे विशेष विश्लेषण केले आहे. एक शंका उपस्थित केली आहे की, जर लोक सर्वथा नित्य आहे तर स्याद्वाद सिद्धान्ताचे खण्डन होते. कारण स्याद्वाद

अनेकांतावर आधारीत आहे. लोक सर्वथा नित्य आहे असे म्हणणे म्हणजे एकांतवादाची पुष्टी केल्यासारखे आहे. याचे समाधान करताना म्हटले आहे की, परिणमन करणे वस्तूचा स्वभाव आहे. त्यानुसार 'लोक' याचे ही परिणमन होते. परिणमनाची स्थितीला पर्याय म्हटले जाते. द्रव्याची परिभाषा करताना म्हटले आहे की जे पर्यायांच्या द्वारे प्राप्त केले जाते ते द्रव्य होय. जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश आणि काल हे सहा द्रव्य आहेत त्यात उत्पाद विनाश आणि ध्रौव्य रूपाने प्रतिक्षण परिणमन होत राहते. सहा द्रव्यांचा प्रती समय पूर्व पूर्व पर्याय नष्ट होत जातो. आणि उत्तर उत्तर पर्याय उत्पन्न होत राहते. यालाच उत्पाद तथा व्यय म्हणतात. द्रव्यात द्रव्यत्व ध्रुव आहे. ते त्यातून कधीच नष्ट होत नाही. भूत, भविष्य, वर्तमान काळात अनंत पर्याय रूपाने परिणमन करीत राहणे. द्रव्याचा स्वभाव आहे. म्हणून ते नित्य असूनही परिणमनशील आहे. म्हणून पर्यायाच्या दृष्टीने ते अनित्य सुद्धा आहे. या प्रमाणे स्याद्वादाचे खंडन होऊ शकत नाही. लोकातील द्रव्य आपल्या स्वभावाच्या दृष्टीने नित्य आहे. स्वभाव पर्याय व विभाव पर्यायाच्या रूपाने प्रतिसमय परिणमन होत राहण्यामुळे परिणामी किंवा अनित्य आहे. म्हणून जैन दर्शनात परिणामी नित्यत्वलास्वीकार केले आहे. एकांत दृष्टीने द्रव्याला केवळ नित्य म्हणणे अयोग्य होईल आणि केवळ अनित्य म्हणनेही योग्य होणार नाही.[४१६]

जैनदर्शनातील हा नित्यत्ववादाचा सिद्धान्त अतिशय महत्त्वपूर्ण आणि तत्त्वानुसंधानासाठी अतिशय उपयोगी आहे.

यावरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, वस्तू अनेक धर्मात्मक असते. त्याचे अनेक धर्म व गुण असतात. जर एखाद्या वस्तूत भेदाने अनेक धर्म स्वीकारले नाही तर त्या वस्तूचे आस्तित्वच सिद्ध होणार नाही. वेगवेगळ्या दृष्टीने पाहिल्यास विरोधी वाटणारे धर्म सुद्धा एका ठिकाणी निर्विरोध राहू शकतात. उदा. पिता, पुत्र, भाऊ, जावई वगैरे लौकिक संबंध परस्पर विरोधी वाटतात. परंतु वेगवेगळ्या पारस्परिक संबंधाच्या दृष्टीने हे सर्व संबंध एका मनुष्याच्या बाबतीत ही असू शकतात. त्याचप्रमाणे प्रत्येक द्रव्यात नित्यत्व आणि अनित्यत्व वगैरे सिद्ध होऊ शकतात.

तात्पर्य हे की, द्रव्यांच्या समूहाचे नावच 'लोक' आहे. ज्याप्रमाणे द्रव्य नित्य आहे त्याचप्रमाणे 'लोक' सुद्धा नित्य आहे. ज्याप्रमाणे द्रव्य परिणमनशील आहे. त्याचप्रमाणे परिणामी परिणमनशील आहे. परिणमनशीलता अनित्यत्व द्योतक आहे.

जैन दर्शन अनेकांत सिद्धांतावर आधारित आहे. स्यादवादाच्या भाषेत 'लोक' द्रव्यांचे

निरूपण करतो. त्यामुळे लोकाच्या स्वरूपाचा सम्यक् बोध प्राप्त होतो.

लोक स्वरूपाच्या विस्ताराचे वर्णन करताना लिहिले आहे की- अधोलोक, मध्यलोक तथा उर्ध्वलोक किंवा ब्रह्मलोक रूपात त्याचे तीन भाग आहेत. म्हणून यास तिलोक किंवा त्रैलोक्य असे म्हटले जाते.

अधोलोक पूर्व-पश्चिम दिशेच्या मूळात म्हणजे अधोलोकाच्या खाली सात रज्जू प्रमाण विस्तार आहे. अघोलोकाच्या वर क्रमशः कमी-कमी होत मध्यलोकाचा विस्तार एक रज्जू आहे, पुन्हा तो क्रमशः वाढत-वाढत ब्रह्मलोक या स्वर्गाच्या अंतापर्यंत पाच रज्जू विस्तार आहे. पुनश्च क्रमशः कमी होत होत लोकाच्या अंतापर्यंत एक रज्जू विस्तार आहे.

'रज्जू' जैन शास्त्रात एक विशेष मान-परिमाण सूचक आहे. ३८१२७९७० (तीन करोड ऐक्यांशी लाख सत्ताबीस हजार नऊशे सत्तर) मण वजनाचा 'भार' असतो. या मापाप्रमाणे १००० 'भारा'चा लोखंडाचा एक गोळा एक शक्तिशाली देव वरून, खाली फेकतो तो गोळा सहामहिने, सहा दिवस, सहा प्रहर सहा तास मध्ये जितक्या क्षेत्राला पार करून जातो तेवढ्या क्षेत्राला एक 'रज्जू' परिमाण म्हणतात.[४१७] वरील प्रमाण शास्त्रामध्ये 'रज्जू' माप म्हणजे किती ? हे समजण्यासाठी ढोबळ उदाहरणाने समजावले आहे.

ग्रंथकाराने आकृती द्वार लोक हे पुरुषाकृती आहे असे सांगितले आहे. एका पुरुषाने आपले दोन्ही पाय फाकले आणि दोन्ही हात कमरेवर ठेवले त्याचा जसा आकार दिसेल तसाच लोकाचा आकार मानला आहे. याचे ही स्पष्टीकरण केले आहे की - दोन्ही पायामधील अंतर ७ रज्जू आहे. कटिप्रदेशाचा विस्तार एक रज्जू, दोन्ही हाथांच्या एका कोपरापासून दुसऱ्या कोपरपर्यंतचा विस्तार पाच रज्जू आहे. वर डोक्याचा विस्तार एक रज्जू आहे. हे पूर्व पश्चिम विस्ताराचे वर्णन आहे.

दक्षिण उत्तर सर्वत्र लोकाचा विस्तार सात रज्जू आहे. लोकची खालून वरपर्यंतची उंची १४ रज्जू आहे. लोकाचे क्षेत्रफळ सातरज्जूचे घनफळ इतके आहे. तीन समान संख्यांचा गुणाकार केल्याने जी संख्या येते त्यास घन म्हणतात. याप्रमाणे सातरज्जूंचा घन ७ह्न७ह्न७ = ३४३ रज्जू होतो.

'लोक' शब्द लुक् धातूने बनलेला आहे. लुक् धातू 'पाहणे' या अर्थाने आहे. "धर्माधर्मादी निद्रव्याणि यत्र लोक्यन्ते स लोकः"[४१८] ज्या क्षेत्रात धर्म, अधर्म, जीव पुद्गल, आकाश आणि काल यांचे अवलोकन केले जाते ते आहे लोक. लोकाच्या

मस्तकावर तनुवात वलय सर्वथा कर्मरहित सम्यक्त्व इ. आठ गुणांनी युक्त सिद्ध स्थानात परमेष्ठी अवस्थित आहेत. ते अविनाशी आहेत, अनंत आहेत.

हा लोक पाच प्रकारच्या एकेन्द्रिय जीवांनी सर्वत्र परिपूर्ण भरलेला आहे. परंतु त्रसजीव त्रसनाडीमध्येच असतात. त्याच्या बाहेर नसतात. पृथ्वीकाय, अपकाय, तेऊकाय, वायुकाय, वनस्पतीकाय, हे पाच प्रकारचे एकेन्द्रिय जीव आहेत. जे ३४३ रज्जू प्रमाण लोकात भरलेले आहेत. लोकाच्या मध्यभागी चौकोनी त्रसनाडी आहे. त्यातच त्रस जीव राहतात. त्रसनीडीच्या बाहेर असलेल्या पैकी कोणी एकेन्द्रिय जीव जर त्रसनामकर्माचा बंध केलेला असल्यामुळे मृत्यूनंतर त्रसनाडीत जन्म घेऊ शकतो. कारण त्या जीवाचा त्रस नाम कर्माचा उदय झाल्यामुळे उपपातच्या दृष्टीने त्रस जीव त्रस नाडीच्या बाहेर असू शकतो.

जेव्हा एखादा त्रसजीव त्रसनाडीच्या बाहेर, एकेन्द्रिय अवस्थेमध्ये जन्म घेण्याअगोदर मरणांतिक समुद्घात करतो तेव्हा त्रस अवस्थेमध्ये (पर्याय) असून सुद्धा त्याच्या आत्म्याचे प्रदेश त्रसनाडीच्या बाहेर असू शकतात. म्हणजे स्थूल पृथ्वीकायादी एकेन्द्रिय जीव आणि त्रसजीव सर्वलोकात नसतात. वृक्षाच्या सालीप्रमाणे लोकामध्ये बरोबर मध्यभागी एक रज्जू लांब एक रज्जू रुंद १३ रज्जू उंचीत थोडी कमी त्रसनाडी आहे. सातव्या नरकाच्या खाली एक रज्जूमध्ये निगोदाचे जीव राहतात. निगोद जैनदर्शदाच्या विशिष्ट पारिभाषिक शब्दापैकी आहे. त्याच्या उत्पत्ती संबंधी लिहिले आहे की ''नीयतांगां भूमिं क्षेत्रं निवास अनन्तानन्त जीवानां ददाति इति निगोदम्'' म्हणजे जो अनन्त जीवांना राहण्यासाठी क्षेत्र (जागा) देतो त्यास निगोद असे म्हणतात. ''निगोद शरीरं येषां ते निगोद शरीरः'' निगोदच ज्यांचे शरीर आहे. तात्पर्य हे की, एकाच शरीरात अनन्त जीव राहतात. त्या एकाच शरीराच्या माध्यमाने ते स्पंदनशील होतात. ते निगोदी जीव आहेत.[४१९] याप्रमाणे १४ रज्जूमध्ये एक रज्जू कमी असल्यामुळे १३ रज्जू बाकी राहतात. त्यातही सातव्या पृथ्वीच्या मध्यभागी नारकीचे जीव राहतात. खाली ३९९९ (तीन हजार नऊशे नव्यानो) योजन प्रमाण पृथ्वीमध्ये कोणताच त्रस जीव रहात नाही. उर्ध्वलोकात सर्वार्धसिद्धी विमानापर्यंतच त्रसजीव आहेत. त्यावरील क्षेत्रात कोणताच त्रसजीव नाही.

स्वामी कार्तिकेय लोकस्थित जीवाच्या भेद प्रभेदाचे वर्णन करताना लिहितात की स्थूलता व सूक्ष्मताच्या दृष्टीने जीव बादर आणि सूक्ष्म असे दोन प्रकारचे आहेत. बादर नामकर्मामुळे बादर पर्याया (अवस्था)त उत्पन्न जीवांना बादर म्हटले जाते. सूक्ष्म नामकर्माच्या उदयामुळे सूक्ष्म पर्यायात उत्पन्न जीवांना सूक्ष्म जीव म्हणतात. बादर जीवांना

कशाचा तरी आधार लागतो पण सूक्ष्म जीव कोणत्याही प्रकारच्या आधाराशिवाय समस्त लोकात व्याप्त आहेत. पृथ्वीकायिक, जलकायिक, अग्निकायिक तथा वायुकायिक जीव बादर (स्थूल) सुद्धा असू शकतात व सूक्ष्म पण असू शकतात. पाचवी वनस्पतीकायिक जीव दोन प्रकारचे असतात- साधारण आणि प्रत्येक.

साधारण नाम कर्माच्या उदयामुळे साधारण वनस्पतीकायिक जीव राहतात ज्यांना निगोदिया पण म्हणतात. निगोदिया जीव बादर पण असतात आणि सूक्ष्म सुद्धा असतात. निगोदिया जीवांना साधारण म्हणण्याचे कारण हे आहे की त्या अनंत अनंत जीवांचा आहार श्वासोश्वास आयुष्य साधारण असते. म्हणून ते साधारणकायिक म्हटले जातात. ज्या अनंत अनंत निगोदिया जीवांचे साधारण नामकर्माचा उदय होतो त्यांचा आहार वगैरे सारखे असतात. तात्पर्य हे की अनंतानंत जीवांचा पिण्ड बनून एक जीवासारखा होऊन जातो. म्हणून त्या अनंतानंत जीवापैकी एक जीव जेव्हा आहार ग्रहण करतो त्याचवेळी त्याच्या बरोबरीचे अनंतानन्त जीव आहार ग्रहण करतात. त्याचप्रमाणे एकाच वेळी श्वास घेतात आणि शरीर धारण करतात. त्यांच्यापैकी एकजीव मृत होऊन नवीन शरीर धारण करतो त्याच वेळी त्याच्या बरोबर ते सर्वच्या सर्व जीव वर्तमान शरीर सोडतात व लगेच नवीन शरीर धारण करतात. याचा सारांश असा आहे की, त्यांचे सर्वांचे जीवन एकमेकावर आधारीत आहे. म्हणून त्या जीवांना साधारण जीव म्हटले आहे.

याचे विशेष स्पष्टीकरण याप्रमाणे आहे- साधारण वनस्पतीकायिक जीव एकेन्द्रिय असतात. त्यांना आहार पर्याप्ती, शरीर पर्याप्ती, इन्द्रियपर्याप्ती, आणि श्वासोश्वास पर्याप्ती असतात. जेव्हा एखादा जीव जन्म घेतो तो जन्म घेण्याच्या प्रथम समयात आहार पर्याप्ती घेतो. नंतर अन्य पर्याप्त्या क्रमशः घेतो. आहारपर्याप्तीचे कार्य आहार वर्गणा रूपाने ग्रहण केले गेलेले पुद्गल स्कंधाचा खलभाग आणि रसभाग रूपात परिणत होणे असा आहे. खलभाग आणि रसभागाचे शरीरच्या रूपात परिणमन होणे शरीर पर्याप्तीचे कार्य आहे. आहार वर्गणाच्या परमाणूचे इन्द्रियांच्या आकाररूपात परिणमन होणे इंद्रिय पर्याप्तीचे कार्य आहे. आहार वर्गणाच्या परमाणुंचा श्वासोश्वास रूपात परिणमन होणे श्वासोश्वास पर्याप्तीचे कार्य आहे. एका शरीरात राहणाऱ्या अनंतानंत साधारण कायिक जीवामध्ये या चारही पर्याप्त्या आणि त्यांचे कार्य समान आहे तसेच एका समयात (अवधी, काल) पूर्ण होते.

ज्या वनस्पतीरूप शरीराचा स्वामी एकच जीव आहे त्यास प्रत्येक जीव म्हणतात. अर्थात प्रत्येक वनस्पतीमध्ये एक जीवाचे एक शरीर असते पण साधारण वनस्पतीमध्ये

अनेक जीवांचे शरीर एकच असते. ज्यांच्या सर्व क्रिया एकसारख्या होत राहतात. ते निगोदिया जीव आहेत. त्यांचे दोन भेद आहेत- एक नित्य निगोदिया, दुसरा इतर-निगोदिया. इतर निगोदियाला चतुर्गती निगोदिया पण म्हटले जाते. जो जीव अनादी काळापासून निगोदामध्येच त्याच अवस्थेमध्ये अनेककाळापासून तेथेच वास्तव्य करून राहिला आहे. त्याने त्रस पर्याय प्राप्तच केली नाही. त्यास नित्य निगोदिया म्हणतात. जो जीव त्रसपर्याय धारण करून सुद्धा नंतर निगोदातपण जातात त्यांना इतर निगोदिया म्हटले आहे.

साधारण वनस्पतीप्रमाणे प्रत्येक वस्पतीचे दोन भेद आहेत- सप्रतिष्ठित प्रत्येक तथा अप्रतिष्ठित प्रत्येक. ज्या वनस्पतीच्या शरीरात बादर निगोदिया जीवांचा निवास होतो त्यास सप्रतिष्ठित प्रत्येक वनस्पती म्हणतात. प्रत्येक वनस्पतीच्या शरीरात बादर निगोदिया जीवांचा निवास नसतो. त्यास अप्रतिष्ठित प्रत्येक वनस्पती म्हणतात.

ज्या जीवांचा पृथ्वी, जल, अग्नी, वायूशी प्रतिघात होत नाही. ते सूक्ष्म कायिक जीव असतात. ज्यांचा यांच्याशी प्रतिघात होतो ते स्थूलकायिक जीव असतात.

पाच प्रकारच्या स्थावर काया असलेल्यामध्येच बादर आणि सूक्ष्म असे भेद होतात. त्रसकाय जीव तर बादरच असतात. सूक्ष्मकायिक जीव पृथ्वीमुळे अवरुद्ध होतात. ते पाण्यात वाहत नाहीत. अग्नीने जळत नाहीत. हवेने आपटत नाहीत. इतकेच नव्हेतर वज्रपटल सुद्धा त्यांना थांबवू शकत नाही. आणि जे जीव भिंतीमुळे थांबू शकतात. पाण्यात प्रवाहित होतात. अग्नीत जळून जाऊ शकतात. वायूने आपटले जातात. ते बादर कायिक जीव असतात.

ज्यांचा त्रस नामकर्माचा उदय होतो त्यांना त्रस जीव म्हणतात. यांचे दोन भेद विकलेन्द्रिय आणि सकलेन्द्रिय. द्विइन्द्रिय, तेइन्द्रिय, व चऊरिन्द्रिय जीवांना विकलेन्द्रिय म्हणतात. द्विइन्द्रिय जीवांना दोन इन्द्रिय स्पर्शन व रसन असतात. शंख इ. जीव यात येतात. तेइन्द्रिय जीवामध्ये स्पर्शन, रसण, घ्राण असे तीन इंद्रिय असतात. मुंगी, ढेकूण इ.या श्रेणीत येतात. चार इंद्रिय म्हणजे स्पर्शन, रसण, घ्राण आणि चक्षु असतात यात भौरे, माशी डास इ. जीव या श्रेणीत येतात. दोन इंद्रियांपासून चार इंद्रियांपर्यंतच्या जीवामध्ये सर्व इंद्रिये नसतात म्हणजे पाच इंद्रिये नसतात म्हणून त्यांना विकलेन्द्रिय म्हणतात.

मनुष्य, देव नारकी तथा पशू इ. जीवांना सकलेन्द्रिय जीव म्हणतात. कारण त्यांना पाचही इंद्रिये असतात. पंचेन्द्रिय तिर्यंच जीव तीन प्रकारचे आहेत. १) जलचर २) स्थलचर ३) नभचर. यांचेही दोन-दोन भेद आहेत. एक मन सहित, दुसरा मन रहित त्यांना क्रमशः सन्नी आणि असन्नी म्हटले जाते.

काही जलचर जीव मासे, कासव इ. काही स्थलचर हत्ती, घोडा, गाय, म्हैस इ. काही नभचर पोपट, कावळा, बगळा इ.

तिर्यंच जीव जन्माच्या दृष्टीने दोन प्रकारचे आहेत. गर्भज आणि समुच्छिर्म. जे जीव गर्भाद्वारे जन्म घेतात ते गर्भज जीव. ते मातेच्या उदरात शुक्र रज घेऊन शरीर धारण करतात ते गर्भज आणि पुदगल स्कन्ध ज्यांच्यामध्ये शरीर आकार रूपात परिणत होण्याची योग्यता असते असे एकत्रित होऊन शरीर रूपात बदलतात ते समुच्छिर्म. हे जीव गर्भज नसतात. इथे हे लक्षात ठेवले पाहिजे की, भोगभूमीत गर्भज तिर्यंच असतात. समुच्छिर्म नाही.

कर्मभूमीत गर्भज तिर्यंच, जलचर, स्थलचर, नभचर हे सन्नी आणि असन्नी अशा दोन प्रकारचे असतात.

भोगभूमीत स्थलचर, नभचर, तथा तिर्यंच सन्नीच असतात. जलचर तिर्यंच नसतात. अशाप्रकारे जीवांचे खूप विस्तृत वर्णन केले गेले आहे.[४२०] यामुळे साधकाला जीवांची, जी लोकभागात मुख्यतः आहे, त्यांचे विस्तृत ज्ञान प्राप्त होते. आणि अशा या विशाल जनसमुदायात आपले आस्तित्व कितीसे ? हा ही बोध प्राप्त होतो. जैन तात्त्विक ग्रंथात जीव द्रव्याचे खूप विस्ताराने वर्णन केले आहे. जे खरोखरच अनुपम आहे.

उत्कर्षाच्या दृष्टीने जीवाचे तीन भेद आहेत. बहिरात्मा, अंतरात्मा, परमात्मा. परमात्माचे वेगळे दोन भेद आहेत- अर्हत् आणि सिद्ध.

बाह्य द्रव्य-शरीर, पुत्र, पुत्री, पत्नी इत्यादींना जे आत्मा समजतात. सर्वस्व मानतात. त्यातच लिप्त राहतात. घर संसारच ज्यांच्यासाठी सर्वस्व आहे. ते आहेत बहिरात्मा जे आत्म्याला शरीरापासून भिन्न मानतात. शरीर वेगळे, आत्मा वेगळा हा भेद ज्ञान जे समजतात ते अंतरात्मा. ते परम समाधीमध्ये स्थित होऊन देहाहून भिन्न ज्ञानस्वरूप आत्मा जाणतात ते अंतरात्मा 'परा' अर्थात सर्वाहून उत्कृष्ट 'मा' अर्थात अनंत चतुष्टय रूप अंतरंग लक्ष्मी. तथा समोवसरण इत्यादी बाह्य लक्ष्मीपेक्षा विशिष्ट आहे. ते परमात्मा आहेत. ते ४६ गुणांनी युक्त परम देवाधिदेव अरिहंत आहेत आणि सम्यक्त्व इ. अष्टगुण

युक्त अथवा अनंत चतुष्टय रूप गुण सहित स्वात्मोपलब्धी रूप सिद्ध अवस्था प्राप्त आत्मा लोकाच्या अग्रभागात अवस्थित सिद्ध परमेष्टी आहेत.

मिथ्यात्व कर्माचा उदय, तीव्र कषायांचा आवेश यामुळे आत्मा आणि शरीर एकच आहे असा भ्रम असणे बहिरात्मा भाव सूचक आहे-तसे तर जीव अनंतानुबंधी क्रोध इ. प्रबल कषायांनी संग्रथित असतो त्यामुळे शरीरालाच आत्मा समजतो हा त्याचा मिथ्या अनुभव आहे.

गुणस्थानाच्या दृष्टीने बहिरात्माचे उत्कृष्ट इ. भेद आहेत. प्रथम गुणस्थानात असलेला जीव उत्कृष्ट बहिरात्मा आहे. अर्थात् आत्मा आहे तो शरीराहून भिन्न आहे. आत्म्यातच परमात्मा बनण्याची शक्ती आहे. सद्ज्ञान म्हणजे आत्मा ह्यावर त्याची श्रद्धा नसते म्हणजे मिथ्याभाव त्यात ओतप्रोत भरलेला असतो. मिथ्याभाव त्याचा सुटतच नाही.

द्वितीय गुणस्थानात असलेला जीव मध्यम बहिरात्मा असतो. त्यात पहिल्या गुणस्थानापेक्षा प्रतिकूल भावाची न्यूनता काही अंशी कमी असते.

तृतीय गुणस्थानात असलेला जीव जघन्य बहिरात्मा आहे. त्याच्यात बहिरात्मभाव अजून कमी प्रमाणात असतात. या भेदांचा आधार मिथ्यात्व आणि अनंतानुबंधी कषाय उदयाची तरतमाता आहे. मिथ्यात्वभाव असल्यामुळे शरीर इत्यादी परद्रव्यात जीव अहंकार करतो व ममत्व ठेवतो. तो शरीराच्या जन्माला आपला जन्म मानतो. आणि शरीराचा नाश म्हणजे आपला नाश मानतो.[४२१]

जो जीव जिनेंद्र वाणीला सम्यक् प्रकारे जाणतो, समजतो, आत्मा आणि शरीराची भिन्नतामध्ये अटूट विश्वास ठेवतो. जे ज्ञान, आदर, सन्मान, कुळ, जाती, बल, ऐश्वर्य, तप तथा शरीरमद यांच्या सुष्ठुता आणि उत्कृष्टतेला जिंकतो तो अंतरात्मा आहे. अंतरात्माचे पण तीन भेद आहेत- उत्कृष्ट, मध्यम आणि जघन्य.

जो जीव प्राणातिपात, मृणावाद, अदत्तादान, अब्रह्मचर्य आणि परिग्रह ह्या पाच पापांपासून निवृत्त करणारे पाच महाव्रते आहेत. आज्ञा विचय, अपाय विचय, विपाक विचय व संस्थान विचय इ. धर्मध्यान एवं पृथकत्व वितर्क विचार, एकत्व वितर्क विचार इ. शुक्ल ध्यानात नेहमी लीन राहतात. प्रमादावर विजय मिळवतात. अशा अप्रमत्त संयत गुणस्थानापासून क्षीण-कषाय गुणस्थानाचे साधक उत्कृष्ट अंतरात्मा असतात.

श्रमणोपासकाच्या व्रतांचे पालन करणारे गृहस्थ व प्रमत्त गुणस्थानधारी मुनी मध्यम अंतरात्मा आहेत. त्यांचा जिन वचनात अनुराग असतो. ते उपशम स्वभावाचे

असतात. आणि आत्मपराक्रमी असतात. त्यांचे मिथ्यात्व मोहनीय, सम्यक्त्व मोहनीय व अनंतानुबंधी क्रोध, मान, माया, लोभ, अप्रत्याख्यानावरण, क्रोध, मान, माया, लोभ आणि प्रत्याख्यानावरण रूप कषाय यथासंभव उपशांत असतात. उपसर्ग, परिषह इ. बाधक परिस्थिती आली तरी ते आपल्या व्रतांपासून विचलित होत नाहीत.

जो जीव अविरत सम्यग्दृष्टी - चौथ्या अविरत गुणस्थानवर्ती, उपशम सम्यक्दृष्टी, वेदक सम्यक्दृष्टी आणि क्षायिक सम्यक्दृष्टी असतात. ते जघन्य अंतरात्मा म्हटले जातात ते जिनेंद्र भगवानाच्या चरणकमलाचे भक्त असतात. अणुव्रत महाव्रत इ. गुणांना ग्रहण करण्यात फार रुची ठेवतात. गुणानुरागी हा गुण असल्यामुळे गुणीजनांचे प्रशंसक असतात. प्रेमळ असतात. गुणी लोकांना पाहून अत्यंत प्रमोदित होतात.

रस, रक्त, मांस, मेद, अस्ती, मज्जा तथा शुक्र या सात धातूंनी तसेच मलमूत्रादी सात उपधातूंनी रहित परम औदारिक रूप चवतीस अतिशयांनी युक्त, अष्टप्रतिहार्य व अनंतचतुष्टय युक्त अर्हत देव आहेत. हे त्रयोदश तथा चतुर्दश गुणस्थानवर्ती जिनेंद्र देव व मुक केवली इ. ज्यांनी केवलज्ञान, केवलदर्शन द्वारा भूत, वर्तमान व भावी जीव इ. समस्त परदार्थांच्या पर्यायांना एकदम जाणले आहे आणि पाहिले आहे ते आहेत-परमात्मा.

दुसरे परमात्मा सिद्ध परमेष्ठी आहेत. यांचे केवलज्ञान आणि केवलदर्शन हेच शरीर असते अर्थात जे अशरीरी आहेत. जे सर्वोकृष्ट सुख आणि अनंतवीर्यांनी युक्त आहेत. सम्यक्त्व इ. अनंतगुण सहित आहेत.

समस्त ज्ञानावरणादी कर्मांचा क्षय झाल्यावर तसेच कर्मजन्य, औदयिक, क्षायोपक्षमिक व औपशमिक राग, द्वेष, मोह इ. भावांचा संपूर्णतः नाश झाल्यावर आध्यात्मिक शोभा, सुंदरता, ज्यांना प्राप्त होते ते असतात-परमात्मा. ते घातीकर्मांना नष्ट करून अनंत चतुष्टय रूप आभ्यंतरीक लक्ष्मी तथा समवसरण रूप बाह्य लक्ष्मीला प्राप्त करणारे अरिहंत परमात्मा आहेत. ते पण समस्त कर्मांचा तथा कर्मामुळे उत्पन्न औदयिक इ. भावांना नष्ट करून आत्मस्थ भाव रूप लक्ष्मी प्राप्त करून सिद्ध परमात्मा होतात.

अनादी काळापासून द्रव्य, क्षेत्र, काळ आणि भाव या अनुसार किंवा चार गतींच्या दृष्टीने संसारात भटकणारे सर्व प्राणी ज्ञानावरणादी कर्माच्या श्रृंखलेने बद्ध असतात. ते प्रकृतीबंध, स्थितीबंध, अनुभागबंध, प्रदेशबंधच्या दृष्टीने सर्व प्रकारच्या, कर्मबंधनांना तोडून कर्ममल रूपी कलंक रहित होऊन जातात. तेव्हा ते शुद्ध, बद्ध, स्वरूपयुक्त जन्म, जरा

(वृद्धावस्था) मृत्यू रहित होतात. अनंतानंत काळापर्यंत सिद्धस्थानात विराजमान राहतात. पुन्हा कधीही परत संसार येतच नाहीत.

स्वामी कार्तिकेय यांनी निश्चयनय द्वारे लोकात आत्मावबोधाची प्रेरणा देण्याच्या दृष्टीने म्हटले आहे. आत्मा केवलज्ञान, केवलदर्शन, अनंतसुख, अनंतवीर्य इ. गुणांची अथवा सम्यक्त्व, दर्शन, ज्ञान, अगुरुलघु, अवगाहना, सूक्ष्मत्व, वीर्य अव्याबाध या आठ गुणांची अथवा चौऱ्याऐंशी लाख गुणांची अथवा अनंत गुणांची आधारशीला आहे. सर्व द्रव्यात आत्मा हाच उत्तम द्रव्य आहे. कारण की, धर्म, अधर्म, काल, आकाश, पुद्गल हे अजीव द्रव्य आहेत. जड आहेत; अचेतन आहेत. फक्त जीव द्रव्य चेतन आहे. तोच फक्त वस्तुरूपाचा प्रकाशक आहे, ज्ञाता आहे, त्याचे लक्षण उपयोग आहे. जीव हा परमतत्व. अंतःस्तत्व आहे. बाकीचे अजीव आश्रव, बंध तथा पुत्र, मित्र, स्त्री, परिवार, शरीर इ. चेतन व अचेतन द्रव्य बाह्य तत्त्व आहेत. फक्त जीवच ज्ञानवान आहे. अन्य सर्व द्रव्य अचेतन असल्यामुळे ज्ञानरहित आहेत. पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश व काल द्रव्य, हित, अहित, हेय, उपादेय, पुण्य, पाप, सुख, दुःख इ.चा अनुभव करू शकत नाहीत. जीवाचाच फक्त ज्ञान हा स्वभाव आहे. म्हणून तो सर्वोत्तम आहे.

३४३ रज्जू प्रमाण लोकाकाश संपूर्णतः शरीरादी अनेक कार्य करण्याच्या शक्तीने युक्त तेवीस प्रकारच्या वर्गणारूप पुद्गल द्रव्यांनी भरलेला आहे. जे सूक्ष्म व स्थूल सुद्धा आहेत. जिनेश्वर देवांनी पुद्गल द्रव्याचे सहा भेद सांगितले आहेत- १. पृथ्वी २. जल ३. छाया ४. चक्षु यांच्या अतिरिक्त बाकीचे चार इंद्रियांचे विषय ५. काल तथा ६. परमाणू.

यात पृथ्वी रूप पुद्गल द्रव्य बादर आहे. जो छिन्न-भिन्न केला जाऊ शकतो. तथा एका स्थानावरून दुसऱ्या स्थानी नेला जाऊ शकतो म्हणून बादर आहे.

जल बादर आहे. जो छिन्न-भिन्न तर नाही केले जाते. परंतु एका स्थानावरून दुसऱ्या स्थानी नेले जाऊ शकते. म्हणून त्यास बादर म्हणतात.

छाया (सावली) बादर सूक्ष्म आहे. जिला छिन्न-भिन्न तर नाही करू शकतो. आणि एका स्थानावरून दुसऱ्या जागी नेऊ पण शकत नाही. म्हणून तिला बादर सूक्ष्म म्हणतात.

चक्षुइंद्रियाशिवाय अन्य इंद्रियांचे विषय जे बाह्य द्रव्य आहेत. उदा. गंध, रस, स्पर्श व शब्द हे सूक्ष्म बादर आहेत. कर्म सूक्ष्म आहेत. जे द्रव्य देशावधी आणि परमावधीचा विषय असतात ते सूक्ष्म असतात.

परमाणू सूक्ष्म-सूक्ष्म आहेत. कारण की तो सर्वावधिज्ञानाचा विषय आहे. जो सर्व तऱ्हेने पूर्ण असतो त्या पुद्गलास ''स्कंध'' म्हणतात. स्कंधाच्या निम्म्याभागाला 'देश' म्हणतात. ह्या निम्म्याच्याही निम्या भागाला 'प्रदेश' म्हणतात. आणि ज्याचा दुसरा भाग होऊच शकत नाही त्यास परमाणू म्हणतात. परमाणूचा आदीही नाही आणि अंतही नाही. परमाणूंच्या साह्याने स्कंध बनतो. तो इंद्रियांनी दिसत नाही. तो अखंड आणि अविभागी असतो.४२२

शब्दाचे वर्णन करताना ग्रंथकारांनी लिहिले आहे- शब्दाचे दोन भेद आहेत. भाषात्मक व अभाषात्मक. भाषात्म शब्दाचेही अजून दोन भेद आहेत. अक्षरात्मक आणि अनाक्षरात्मक, संस्कृत, प्राकृत अपभ्रंश व पैशाचिक भाषा इ. भेदाप्रमाणे अक्षरात्मक शब्द अनेक प्रकारचे आहेत. ते आर्य आणि म्लेच्छ मानवांच्या व्यवहारात सहायक होतात.

द्विइंद्रिय इ. तिर्यंच जीवात तथा सर्वज्ञांच्या दिव्य ध्वनीत अनक्षरात्मक भाषेचा व्यवहार होतो.

अभाषात्मकाचे सुद्धा प्रायोगिक तथा वैस्रसिक असे दोन भेद आहेत. जो शब्द प्रयत्न केल्याने उत्पन्न होतो त्यास प्रायोगिक म्हणतात. त्याचे चार भेद आहेत- १) तत् २) वितत् ३) घन आणि ४) सुषिर. वीणा वगैराचा शब्दालातत् म्हणतात. ढोल वगैरेच्या शब्दाला वितत म्हणतात. कास्याच्या वाद्यातील शब्दाला घन म्हणतात. बासरी इ.च्या शब्दाला सुषिर म्हणतात.

जो शब्द स्वभावानेच शब्द असतो त्यास वैस्रासिक म्हणतात. स्निग्ध तथा रुक्ष गुणाच्या निमित्ताने वीज, ढग, इन्द्रधनुष्य इ. बनतात. त्यांच्या शब्दाला वैस्रसिक शब्द म्हणतात. ते अनेक प्रकारचे असतात.४२३

पुद्गल द्रव्य, जीवावर अनेक प्रकारे उपकार करतात. त्याला सुख देतो तसेच दुःखही देतो. जीवित ठेवतो किंवा मारून टाकतो. औदारिक इ. शरीराची रचना करतात. स्पर्शन, रसन, घ्राण, चक्षू व श्रोतोन्द्रियाची रचना करतो. तत्, वितत, घन, सुषिर रूप शब्दांना किंवा सात स्वर रूप शब्दांना अथवा बावन अक्षरात्मक व अनाक्षरात्मक वाणीची रचना करतात. श्वास-निश्वास प्राण, अप्राण, वायूची रचना करतात.

जो पर्यंत जीव संसारात राहतो, तोपर्यंत पुद्गल द्रव्य अशाप्रकारे अनेक उपकार करीत असतात. मोह व अज्ञानमय परिणाम पण करतात.

कर्म सुद्धा पौद्गलिक आहेत कारण की, त्याचा विपाक काठी, काटा इ. मूर्त

पदार्थांशी संबंधित आहे. ज्याप्रमाणे शेतातील पीक पाणी, हवा, उष्णता इ. पदार्थाच्या संबंधामुळे पिकतात म्हणून ते मूर्त आहेत. ज्याप्रमाणे पायात काटा टोचला तर असातावेदनीय विपाक झाला समजावे तसेच गोड पक्कान्नाचे भोजन मिळाले तर सातावेदनीयाचा कर्म विपाक समजावा. म्हणून कर्म सुद्धा पौद्गलिक आहेत.

जीव सुद्धा एक दुसऱ्यावर परस्परांशी उपकार करतात. उदा. मालक नोकराला धन देऊन उपकार करतो. सेवक मालकाची सेवा करतो हितकारक कार्य करून मालकावर उपकार करतो. गुरू आपल्या उपदेशाने शिष्याचे जन्मजन्मांतर सुधारून उपकार करतात. शिष्य गुरू-आज्ञा पालन करतो. गुरूची सेवा-सुश्रुषा करतो. अशाप्रकारे पिता-पुत्र, पति-पत्नी, मित्र-मित्र परस्पर एकमेकांवर उपकार करतात. त्याचप्रमाणे जीव जीवावर अनुपकारही करतानाही तथा उपकारही करत नाही.

उपकार-अपकार करण्यातही पुन्हा मुख्य कारण शुभ-अशुभ कर्म आहे. जर जीवाच्या शुभ कर्माचा उदय असेल तर दुसरे जीव उपकार करतात किंवा तो स्वतः अन्य जीवावर उपकार करतो. जर अशुभ कर्माचा उदय पापकर्माचा उदय असेल तर दुसरे जीव त्याच्यावर उपकार करणार नाही किंवा तो दुसऱ्यांवर उपकार करणार नाही.

पुद्गल द्रव्यात अर्थात स्वर्ण, रजत, मणी, मुक्ता, धन, धान्य, भवन, शरीर, स्त्री, पुत्र, मित्र इ. चेतन-अचेतन, अचेतन-चेतन पदार्थात अशी काही अपूर्व अदृश्य शक्ती आहे. ह्या पौद्गलिक शक्तीद्वारे जीवाचा केवलज्ञान रूप स्वभाव नष्ट होऊन जातो. अनादिकाळापासून हा जीव जन्ममरणाच्या चक्रात चक्रावलेला आहे. म्हणून जे प्रिय वाटते त्यावर राग (प्रेम) करतो आणि जी वस्तू अप्रिय वाटते त्यावर द्वेष करतो. या रागात्मक, द्वेषात्मक परिणामामुळे नवीन कर्मांचे बंध होतात. ते कर्म, पौद्गलिक असतात. या कर्मांच्या निमित्तामुळे जीवाला पुन्हा पुन्हा जन्म-मरण्याच्या चक्रव्यूहात अडकावे लागते. नवीन जन्म म्हणजे परत नवीन शरीर आलेच. शरीर म्हटले की इंद्रिये असणारच. त्या इंद्रियांच्या स्वभावाप्रमाणे ते आपले विषय ग्रहण करणारच म्हणजे राग-द्वेषाची श्रृंखला सतत चालूच राहणार. राग-द्वेष आले की कर्मबंध झालाच. कर्म बंध जसे असतील त्याप्रमाणे रागद्वेष आलेच. हे चक्र अविरत चालूच राहते. या कर्मबंधाखाली दबल्यामुळे जीव (आत्मा) आपल्या मूळ स्वाभाविक गुण व्यक्तच करू शकत नाही. म्हणजे स्वाभाविक दर्शन येतच नाही. कर्माचे आवरणच इतके बोझिल होतात की आत्मा (जीव) आपले डोके वर काढूच शकत नाही. ज्ञानगुण याचा झाकला जातो. परिणामस्वरूप समस्त द्रव्य पर्यायांना एका

इष्टीक्षेपात जाणण्याची शक्ती असूनही तो अल्पज्ञच राहतो. हे सर्व कर्मावरणामुळे पुद्गलाची शक्ती जीवाच्या शक्तीला कुंठित करून टाकते. ज्याप्रमाणे एखादा गुंड सतशील सदाचारी माणसाला दाबून टाकतो अगदी त्याचप्रमाणे या कर्माच्या व पुद्गलाच्या आवरणामुळे शक्ती असूनही शक्तीहीन बनून जातो.

अशाप्रकारे स्वामी कार्तिकेय यांनी लोकाचे खूप विशद वर्णन केले आहे. त्यात जीवासंबंधी अनेक तथ्य समोर येतात. विवेचन खूपच गंभीर आणि तात्त्विक आहे.

लोकभावनेचे समीक्षण व लोकभावनेचा परिणाम

भ. महावीरांच्या वेळेचा एक प्रसंग आहे. शिवराजर्षी नावाचे तापस होते. तपाच्या प्रभावाने त्यांना विभंग ज्ञान प्राप्त झाले होते. मिथ्यादृष्टीचे अवधिज्ञान म्हणजे विभंगज्ञान होय. शिवराजर्षी आपल्या विभंगज्ञानाद्वारे सात द्वीप समुद्राला पाहू शकत होते. त्यांनी आपली धारणा करून टाकली की जेवढे माझ्या ज्ञानाने मी पाहू शकलो तेवढाच हा पृथ्वीमंडल आहे. आणि आपल्या धारणेचा त्यांनी जन सामान्यात प्रचारही सुरू करून टाकला.

एकदा ते भिक्षा घेण्यासाठी नगरात गेले. त्यांनी लोकांकडून ऐकले की भ. महावीर तर असंख्य द्वीप आहेत, असंख्य समुद्र आहेत असे म्हणतात. शिवराजर्षी भ. महावीरांच्या समवसरणात गेले. भगवानांचे ते दिव्य-भव्य व्यक्तिमत्व पाहताच त्यांचा अहंकार गळून गेला. त्यांचे विचार शुद्ध परमशुद्ध होऊ लागले. त्यांचे मिथ्याज्ञान सम्यक्त्वज्ञानात परिवर्तित झाले. त्यांचे विभंग ज्ञान, अवधिज्ञानात बदलले. त्यांच्या विचारात परम विशुद्धी आली. त्यांना सात द्वीप समुद्रापलीकडे अनेक द्वीप समुद्र दिसू लागले. हळूहळू त्यांना असंख्यात द्वीप समुद्र आपल्या अवधीज्ञानामुळे पाहता आले. ते भ. महावीरांचे शिष्य बनले. आणि शेवटी केवळज्ञान प्राप्त केले व मुक्तीगामी (मोक्ष) झाले.

सारांश हे की, लोक समीक्षण अथवा लोकभावना द्वारा शिवराजर्षींनी आत्म्याची परमोलब्धी प्राप्त केली. लोकभावनेच्या अनुचिंतनाने लोकातील अणु-अणूचे अनंतभूत, भविष्याशी संबंधित ज्ञान जागृत होते.[४२५]

आगमामध्ये व विभिन्न ग्रंथामध्ये लोकाचे वर्णन आहे त्याने हे स्पष्ट होते की, ह्या लोकाचे, सर्जण कोणीही केलेले नाही. लोक केव्हापासून निर्मित आहे हे सांगणे, सिद्ध करणे अत्यंत कठीण आहे. कारण त्याचा कोणी निर्माता नाही. ते अनादी अनंत आहे. याचा अंत होईल ह्यात तथ्य नाही. या अनादी अनंत लोकात जीव कर्मावरणामुळे विभ्रांत

झाला आहे. विविध योनीमध्ये भ्रमण चालले आहे. जीव हा एक असा तत्त्व आहे. ज्याचा स्वभाव असीम ज्ञान, असीम आनंद आणि असीम शक्ती युक्त आहे. परंतु तो आपले सत्यस्वरूप विसरला आहे. म्हणून स्वतःला हीन समजतो आहे. या हीन भावनेचे निवारण ह्या भावनांचे अनुशीलन केल्यामुळे होऊ शकते. लोक भावनेच्या समीक्षणामुळे तो एकीकडे लोकातील पुद्गलमय विराटता, आकाशमय अनंतता जाणतो तर एकीकडे तो जीवाची वास्तविक स्थिती आणि शक्तीला ही जाणतो. लोकस्वरूपाचे गंभीरतेने चिंतन केल्याने, त्याचा अनुभव, अनुभूत केल्याने अंतःकरणात आपल्या वास्तविक स्थितीचा भाव जागृत होतो. भावविचार किंवा चिंतनच अध्यवसायचा मूळ हेतू आहे. सत्यतापूर्ण भावामुळे पुरुषार्थ आणि उद्यम केल्याने सत्यान्मुखी क्रियाशीलता उद्‌भासित होते. परिणामस्वरूप आत्मजागृती, आत्मानुभव, अंतःपरिष्कार प्राप्त होतो.

जीवात्मा स्वताःच्या कर्मामुळे फळ भोगत असतो, पण त्याचा आरोप दुसऱ्यांच्या डोक्यावर चढवतो. ह्या वृत्तीमुळे तो दुःखी होतो आणि चतुर्गतीमध्ये परिभ्रमण करतो. अशा लोकांना कवी मतंगराय म्हणतात. जर तुला स्वतःच्या उत्थानाची हिताची इच्छा असेल तर-

मोह कर्म को नाश मेटकर सब जग की आशा
निज पद में थिर होय लोक के शीश करो वासा ॥[४२६]

जगाची सर्व आशा सोडून, मोह कर्माचा नाश करून निजपद स्वात्म्यात स्थित हो. जर असे केले तर तुमचा निवास लोक शिखरावर होईल म्हणजे तुम्ही सिद्ध पदाला प्राप्त व्हाल. कारण सिद्ध भगवानच लोक शिखरावर सिद्धशिलेवर विराजित होतात.

लोकभावनेच्या चिंतनाचा परिणाम जगाचे ज्ञान प्राप्त करून मिथ्याभाव दूर करावा. षडद्रव्यमय लोकच्या स्वरूपाचे चांगल्याप्रकारे चिंतन करून स्वतःचे निरीक्षण करणे, आत्म्याचा अनुभव करणे कारण षडद्रव्य परद्रव्य आहे ते मात्र जाणण्या योग्यच आहे. पण आत्मा स्वद्रव्य असल्याने परम-उपादेय आहे, ध्येय आहे. मिथ्यादर्शन, मिथ्याज्ञान आणि मिथ्याचारित्ररूप मिथ्याभावाचे निवारण करण्यासाठी एकच उपाय आहे ते म्हणजे आत्म निरीक्षण. आत्मदर्शन करणेच सम्यग् दर्शन आहे. आत्म्याला जाणणे सम्यग्ज्ञान आहे आणि आत्म्याचे ध्यान करणे सम्यक्चारित्र आहे.[४२७]

जगाला जाणून त्याच्या पासून विरक्त होणे व स्वआत्म्यात स्थिर होणे हा लोकभावनेच्या चिंतनाचा परिणाम आहे.

तेरो जनम हुवो नहीं जहाँ, ऐसो खेतर नाही कहाँ ।
याही जनम-भूमी का रचो, चलो निकसी तो विधी तैं बचो ॥४२८

अर्थात संपूर्ण लोकमध्ये अशी एक पण जागा नाही जेथे तुझा जन्म झाला नाही. कवी बुधजन म्हणतात हे आत्मन् ! तु ह्या जन्म भूमीतच का गुरफटला आहे ? जर कर्मबन्धनाने वाचायचे असेल तर त्याचे ममत्व तोड राग सोड ह्याच्यातच तुझी उन्नती आहे.

कवी भगवतीदास लिहितात की -

लोक माँहि तेरो कछु नाही, लोक आन तुम आन लखाहि
वह षट्द्रव्यन को सब धाम, तु चिन्मुरति आतमराय ॥४२९

ह्या जगात तुझे काहीच नाही. जग वेगळे आहे आणि तू वेगळा आहे- हे स्पष्ट दिसून येते; कारण हे जग सहा द्रव्याचे निवास स्थान आहे आणि तू चैतन्यमूर्ती भगवान आत्मा आहे.

उपरोक्त छन्दात जग आणि आत्मच्या भेदविज्ञानावर आणि वैराग्यभावावर विशेष जोर दिला आहे. ह्याच्यावरून स्पष्ट होते की लोकभावनेच्या चिंतनात जगापासून विरक्ततेची मुख्यता आहे.

आतमरूप संवारी मोक्षपूर बसो सदाही ।
आधि-व्याधि-जर-मरण आदी दुःख हे न कदा ही ॥
श्री गुरू शिक्षा धारी टारी अभिमान कुशोका ।
मनधिर कारण यह विचारी निज रूप सुलोका ॥४३०

आत्मस्वरूपाचे चिंतन करणे आत्म स्वरूपात रममाण होणे हाच मोक्ष मार्ग आहे. ह्या मार्गावर चालणारेच मोक्षपुरीमध्ये निवास करतात. जेथे आधी-व्याधी जन्म-मरण इत्यादी दुःखपण नसतात. म्हणून अभिमान आणि शोक सोडून श्री गुरूची शिक्षा धारण करा. मनाच्या स्थिरतेसाठी स्वरूप सुलोकमध्ये विचरण करणे हाच एक मात्र उपाय आहे. म्हणजे आत्मज्ञान, आत्मानुभव आत्मश्रद्धान आणि ध्यान; आत्म्याची रमणता हाच एक उपाय आहे.

लोक स्वरूपाचे चिन्तन केल्याने तत्त्वज्ञान इत्यादीची शुद्धी होते. चित्तातून राग द्वेष दूर होतात.४३१

लोक भावनेमध्ये लोकच्या स्वरूपाचे आकार प्रकाराचे जीवाजीव इत्यादी पदार्थांचे जे विस्तृत विवेचन केले आहे ते व्यवहार रूप आहे. निश्चय लोक तर चैतन्यलोक आहे त्या चैतन्य लोकमध्ये रमण करण्याची भावना निश्चय लोक भावना आहे. कारण लोकभावनेच्या चिंतनाचा उद्देश्य तर आत्माराधनेची सफल प्रेरणाच आहे. म्हणून सर्व आत्मार्थीजन षटद्रव्यमय लोकाला जाणून स्वचैतन्य लोकमध्ये रममाण होऊन अनन्तसुख प्राप्त करावे.

साधकाने लोकची विविधता पाहून त्याच्या हेतूचा विचार करावा आणि शेवटी चैतन्याचे ध्यान करावे. ह्या लोकची विचित्रता अशी आहे की ती पाहून कधी घृणा येते तर कधी अभिमान पण त्याच्यावर विजय मिळवण्यासाठी व समत्व भावना प्राप्त करण्यासाठी लोकभावनेचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे.

पाप कर्मने वाचण्यासाठी, वासना, क्रोध इत्यादीच्या आक्रमणाने वाचण्यासाठी संपूर्ण लोक सोडून आत्मलोकमध्ये प्रवेश करावा. जसे कासव स्वतःवर संकट आले अथवा एखादी असुरक्षितता, भय उत्पन्न झाले असता लगेच आपल्या ढाली सारख्या चमड्यात प्रवेश करतो. त्याला नैसर्गिक अशी चमडी मिळाली आहे की जी त्याच्यासाठी ढालीचे काम करते. कासव जेव्हा चमड्यात प्रवेश करतो तर सर्व प्रकारे सुरक्षित होतो. तसेच आपण ह्या जगाची माया सोडून अध्यात्मात प्रवेश केला. चेतनेजवळ गेलो तर सुरक्षित बनू. जोपर्यंत बाहेर भटकू तोपर्यंत वासनेच्या आवेश, चिन्ता, भय, आणि दुःख उत्पन्न करणारी प्रत्येक परिस्थित उपस्थित होऊ शकते. परंतु आत्मलोकाजवळ राहिलो तर संपूर्ण सुरक्षित होऊ. तेथे कोणत्याही प्रकारचे भय नाही कारण ती एक ज्वलंत शक्ती आहे.

आपल्या बाह्य प्रवृत्तीने निवृत्त होऊन, रागद्वेषाच्या उठणाऱ्या तरंगाचे सम्यक् अवलोकने करून स्वतःला तटस्थ ठेवणे हाच लोक भावनेचा अभिप्राय आहे.

तत्त्वज्ञानाच्या विशुद्धीसाठी लोकाच्या वास्तविक स्वरूपाचे चिंतन करणे लोकभावना आहे. लोकस्वरूप भावनेत विश्वस्वरूपाचे दर्शन स्पष्ट आणि विस्तृतपणे केले गेले आहे. आता जन्म मरणाच्या आवागमनाचा अंत करून लोकाग्रस्थानी पोहोचणे हाच एक मात्र लक्ष्य आहे.

जगातले सर्व जीव लोकमध्ये राहतात. अशुद्ध अवस्थेत देखील लोकमध्ये रहातात आणि पूर्ण शुद्ध झाल्यानंतर देखील लोकमध्ये राहतात. यांच्या आवासाची आत्मविकासाची आधारभूमी लोक आहे. म्हणून लोकाचे स्वरूप, आकार, प्रकार, रचनेची मूळ तत्त्वे, शाश्वत

अशाश्वत इत्यादीचे चिंतन लोक भावनेत केले जाते.

लोक स्वरूपाच्या चिंतनाचा हा धर्म आहे की जीव समूल आणि त्याच्या राहण्याचे स्थान ज्यामध्ये आपण देखील एक आहोत. ज्याप्रमाणे एका घरामध्ये राहणारा सदस्य आपल्या घरासंबंधी विचार करतो, त्याचा आधार आणि उत्थानाचे चिंतन करतो त्याच प्रमाणे मनुष्य या लोक गृहाचा सदस्य आहे. अन्य जीव समूहांबरोबर त्याचेही येथे दायित्व आहे आणि तो स्वतः चिंतनाद्वारे पाहू शकतो की जे जीव धर्माचे आचरण करतात ते जगात कसे सुखी होतात, कशा प्रकारे उच्च जाती, कुल इत्यादीमध्ये जन्म घेतात आणि जे जीव अधर्माचे आचरण करतात ते नरक व निगोद इत्यादी दुर्गतींना प्राप्त करून कशा प्रकारे कष्ट प्राप्त करतात.

ज्याला इहलोक, परलोक, चतुर्गती वर विश्वास आहे तोच ह्या भावनेचे चिंतन करतो.

लोकभावना एक प्रकारे अनादिकाळाच्या लोकयात्रेचा अन्त शोधण्याची एक गुरुकिल्ली आहे. लोक स्वरूप समजून भव भ्रमणापासून मुक्तीसाठी प्रयत्न करण्याचा एक प्रेरणा स्पद ध्वनी आहे. शंख नाद आहे.

बोधिदुर्लभ भावना

मानवाच्या जीवनात जे, काही क्रियाकलाप होतात त्याच्यामागे त्याची आस्था, विश्वास प्रेरक असतात. ज्याच्या मनात हा विश्वास आहे की हा देह आणि त्याचे भोग हे साध्य आहेत ते प्राप्त करणे हे ध्येय आहे आणि ते प्राप्त करण्यासाठी सतत उद्यमशील राहतो. ते प्राप्त करण्यात ज्या काही आडकाठी येते ती दूर करण्यासाठी योग्य-अयोग्य मार्गाने ते दूर करण्यात किंवा प्राप्त करण्यातच सर्व शक्ती खर्च करतो. त्यावेळी तो हिंसा-अहिंसा यांचा किंचितमात्र विचारसुद्धा करीत नाही. निःसंकोचपणे हिंसक व असत्याचा आधार घेऊन आपल्या कार्यात मग्न होतो. न्याय-अन्याय नीती-अनीतीचा यत्किंचितही विचार करीत नाही.

ज्याचा विश्वास सत्यावर आधारीत आहे. सत् तत्त्वात ज्याची आस्था आहे. आत्म्याच्या पारमार्थिकतेला जो जाणतो, त्याच्या जीवनाची क्रियाप्रक्रिया कार्यविधा वरील मानवापेक्षा पूर्णपणे भिन्न असते. त्याचे जीवन भोगविरती, आत्मविरती, संयतचर्याकडे गतिमान असते. विश्वास व आस्थाच ज्याचा केंद्रबिंदू आहेत त्यावर त्याच्या जीवनाचा प्रासाद निर्भर असतो. येथूनच सम्यक्बोधीची यात्रा प्रारंभ होते. सम्यग्बोधी त्या ज्ञानाची

पत्रिकायिका आहे जे सत्श्रद्धेवर टिकलेले असते. याचेच नाव सम्यग्दर्शन आहे.

दर्शन शब्द संस्कृतच्या दृश् धातूने बनलेला आहे. दृश् धातू प्रेक्षन अर्थानेपण येतो. प्र+इक्षन्. प्र उपसर्ग प्रकर्ष किंवा उत्कर्ष या अर्थाचा आहे. ज्याच्या द्वारे प्रकृष्ट किंवा उत्कृष्ट रूपाने पाहता येते. विचार केला जातो त्यास दर्शन म्हणतात. जेव्हा ते दर्शन सम्यक्, सत्योन्मुख, तथ्ययुक्त, यथार्थ असते तेव्हा त्यास सम्यग्-दर्शन म्हटले जाते. सम्यग् दर्शन प्राप्त होणे ही मानवी जीवनाची सर्वश्रेष्ठ उपलब्धी आहे.

सैद्धांतिक रूपात सम्यग्दर्शनाचा अर्थ आहे- विशुद्ध दृष्टी. आर. विलियम्स यांच्या शब्दात जिन भ. नी दाखवलेल्या मोक्षमार्गावर श्रद्धा असणे म्हणजे सम्यक्त्व आहे. आचार्य वसनंदियांच्या मते आप्त आगम आणि तत्त्वपदार्थ या तीनावर श्रद्धा असणे म्हणजे सम्यक्त्व. उमास्वातीच्या शब्दात तत्त्वरूप पदार्थांवर श्रद्धा म्हणजे दृढ प्रतीती सम्यग्दर्शन होय. आचार्य हेमचन्द्रांच्या अनुभार सुदेव, सुगुरु आणि सुधर्मा वर श्रद्धा ठेवणे सम्यक्त्व आहे.

गंभीरतेने विचार केल्यास धर्माचे मूळच मुळी सम्यग्दर्शन आहे. कारण मोक्ष प्राप्तीसाठी प्रथमतः सम्यक्दर्शन अत्यावश्यक आहे. सम्यक्त्वच केवलज्ञानाच्या उत्पत्तीचे स्थान आहे. सम्यक्त्व केवलज्ञानाची माता आहे. याची प्राप्ती सर्वांना सहज सुलभ नाही. संसारात फार थोडे लोक याची प्राप्ती करू शकतात.

ज्यांनी अन्तर्मुहूर्त मात्र सुद्धा सम्यक्त्वाला स्पर्श केला असेल तो काही कमी अर्ध पुद्गल परावर्तनपेक्षा जास्त संसार परिभ्रमण करीत नाही. एवढ्या कालावधीत तो निश्चितच मोक्षप्रत पोहोचतोच म्हणजे त्याला नक्कीच मोक्ष मिळतो.

नाणेण जाणई भावे दंसणेण य सद्दहे ।

ज्ञानाने आत्मा जीवादी भाव जाणतो आणि दर्शनाने त्यावर श्रद्धा करतो. श्रद्धा शुद्ध असणे आणि तरी दृढ असणे यास दर्शनाराधना म्हणतात.[४३२] मोक्षप्राप्तीत अप्रमतत्ता यावी त्यासाठी असे चिंतन करावे की अनादी प्रपंचात, विविध दुःखाच्या प्रवाहात, मोह इ. कर्माच्या तीव्र आघात सहन करताना जीवाला शुद्ध दृष्टी आणि शुद्ध चारित्र प्राप्त होणे फारच दुर्लभ आहे. अशाप्रकारची चिंतनशीलता म्हणजे बोधिदुर्लभत्वानुप्रेक्षा आहे.[४३३]

ती सम्यग्बोधी सम्यग्दर्शन प्राप्त होणे मोठ्या सौभाग्याची बाब आहे. परंतु ती प्राप्त होणे फार-फार कठीण आहे. जन्म-जन्मांतराचे संस्कार सत्उद्यम सत्पुरुषांचा संग इ. अनेक कारणे जेव्हा घटित होतात, तेव्हा कुठे सम्यग्दर्शन प्राप्त होते. बोधिदुर्लभ भावनेत

याच भाववेचे अनुचिंतन केले जाते. संसारातही आपण अनुभव करतोच की उत्तम वस्तू सहजासहजी प्राप्त होत नाही त्यासाठी किती कष्ट प्रयत्न, ध्यास करावा लागतो. तसेच सम्यग्दर्शनाचे सत्श्रद्धांनाची दुर्लभता लक्षात घेऊन सतत चिंतन-मनन करण्याची ती प्राप्त करण्याची चेतना आपल्यात जागृत होते. बोधिदुर्लभ भावनाचे सतत चिंतन केल्याने व्यक्तीच्या मनात असे भाव उत्पन्न होऊ लागतात की किती चांगले होईल की मी या दुर्लभ श्रद्धा रूप रत्नाला प्राप्त करण्यास समर्थ बनू शकेन. कारण त्याच्या अंतःकरणात याची संभावना आंदोलीत होत रहाते की जर मी सम्यग्बोधीला प्राप्त करू शकलो तर माझे जीवन धन्य होईल. मनुष्यजन्म मिळाल्याचे सार्थक होईल. माझ्या कार्याची रूपरेषाच बदलून जाईल. भौतिक वासना-विकारात रममाण झालेले मन ह्यापासून सहजा सहाजी परावृत्त होईल. ज्यामुळे मी माझ्या आत्मस्वरूपाची अनुभूति प्राप्त करू शकेन. माझ्या शुद्धावस्थेचा मी स्वतः अनुभव घेऊ शकेन. अशी उत्कंठा वाढत राहील.

या भावनेने पुन्हा पुन्हा भावित होत राहिल्याने अभिनव उद्यम अध्यवसाय (मनाचे परिणाम) जागृत होतात. ज्याचे फल मिळते सम्यग्दृष्टी प्राप्त करण्याच्या रूपाने घटीत होते याचा परिणाम म्हणजे आत्मोत्थानाच्या दृष्टीने फार श्रेयस्कर आहे. सम्यग्बोधी प्राप्त झाल्याने जीव असा अनुभव करू लागतो की, मी शरीर नाही, मी शुद्ध आत्मा आहे. मी पूर्णपणे एकाकी आहे. मोहाने ग्रसित होऊन मी ज्यांना माझे मानतो त्यांच्याशी खरं म्हणजे खरे अपनत्व नाही स्वार्थाचे नाते आहे. अशाप्रकारे एकत्व भावना सहजच जीवनात फलित होते.

अशाप्रकारच्या चिंतनाने जेव्हा तो पुढे-पुढे जातो ती त्याची आत्मभाव यात्रा असते. आत्म्याशिवाय अन्य सर्व वस्तुपर आहेत याचे त्याला भान होऊ लागते. अशाप्रकारच्या अन्यत्व भावनेने अनुभवित झाल्यामुळे शुद्धात्म भाव असलेल्या मार्गावर प्रगतीशील होण्याचा अध्यवसाय उद्भासित होतो. नवीन कर्मांचे बंध थांबले जातात.

मूळापासून बंध करण्याची, प्रक्रिया थांबल्यामुळे अंतरवृत्ती जागृत होते आणि त्यामुळे निर्जरा भावना पर्यंत व्यक्ती पोहोचू शकते. कर्म निर्जरा होत राहिल्याने जीव कर्म क्षय करणारा तपाचरणाचा मार्ग अवलंबतो. अशा तऱ्हेने तो जीवनाचे परम श्रेष्ठ ध्येय मोक्ष मार्गाच्या दिशेने वाटचाल करू लागतो.

बोधिदुर्लभ भावनेची ही एक महानता आहे. श्रेष्ठता आहे, शास्त्रकारांनी विद्वान लेखकांनी याचे अनेक प्रकारे विवेचन केले आहे. जे कोण्याही मुमुक्षू जीवाला फारच लाभप्रद आहे.

याविषयी आचार्य कुंदकुंद म्हणतात - ज्या उपायामुळे सम्यग्ज्ञान प्राप्त होऊ शकते. त्या उपायाचे सतत चिंतन करणे म्हणजे बोधिदुर्लभ भावना होय. कर्माच्या उदयामुळे उत्पन्न शुद्ध निश्चयनयानुसार कर्मोदय जनित क्षयोपक्षम ज्ञान, पर द्रव्य किंवा पर पर्याय आहे, म्हणून हेय आहे. त्याग करण्यायोग्य आहे. सम्यग्ज्ञान आत्माचा निज स्वभाव आहे. म्हणून उपादेय म्हणजे ग्रहण करण्यायोग्य आहे.[४३४]

बोधीची दुर्लभूताचे वर्णन करताना ग्रंथकार आ. वट्टकेर म्हणतात की, जीवाने असे चिंतन करावे की जर सम्यग्दर्शनाशिवाय हे जीवन संपले तर पुन्हा मानव जीवन मिळणे महाकठीण आहे. म्हणून प्रमाद आळस इ.चा परित्याग करून या मार्गाचा त्वरित अवलंब करण्यात प्रयत्नशील व्हावे. बोधी प्राप्त करण्यासाठी जो असा प्रमादशील असतो तो कायर आहे; मग दुर्गती प्राप्त झाल्यावर शोक करण्याशिवाय पर्यायच नाही. म्हणून जो खरा मुमुक्षु आहे. भव्य प्राणी आहे, सम्यक्त्व प्राप्त करणे हाच त्याचा परम ध्येय विंदू असतो. ते प्राप्त करण्यात परमकल्याण मानतो. ग्रंथकाराने औपक्षमिक क्षायिक, क्षायोपक्षमिक सम्यक्त्वाची चर्चा केली आहे. आणि सांगितले आहे की अक्षय, अविनश्वर सौख्य आत्मकल्याणाचा हा मार्ग आहे.

शेवटी आचार्य आपले मंतव्य स्पष्ट करताना म्हणतात- मी सुद्धा आस्था, संवेग, भव-वैराग्य, शक्ती-आत्मपराक्रम, विनय-विनम्रता द्वारा माझा आत्म्याला ह्या अनुप्रेक्षांनी, भावनांनी भावित करीत राहीन. ज्यामुळे प्राप्त झालेली बोधी चिरकालापर्यंत टिकून राहू शकेल. बोधीचे फळ काय मिळते याबद्दल ते म्हणतात- त्यामुळे जीव पुद्गलादी षड्द्रव्य तथा नऊतत्त्वांचे ज्ञान होते. इतकेच नव्हे तर बोधीमध्ये हजारो-लाखो गुण भरलेले आहेत.[४३५]

बोधी सम्यक्ज्ञान खरोखर जीवनाचे सारतत्व आहे. सम्यक्त्वाशिवाय जीवन निस्सार, निरधर्म आहे. परंतु सम्यक्त्व प्राप्त करणे इतके सोपे नाही. फार कठीण आहे. फार दुर्लभ आहे. अशाप्रकारचे मनात चिंतन पर्यालोचन करणे बोधिदुर्लभानुप्रेक्षा आहे. अशाप्रकारचे चिंतन केल्याने चिंतन करणाऱ्याला सत्स्वरूपाकडे जाण्याची प्रेरणा मिळते. तो मिथ्यात्वाच्या अंधःकारातून बाहेर निघून सम्यक्त्वाच्या प्रकाशाकडे झेपावतो. हाच मानव जीवनातील सुवर्णकाळ आहे. जे त्याला अद्याप मिळाले नव्हते. ग्रंथकार याच संदर्भाला लक्षात ठेवून सांगतात की, जीव अनादिकाळापासून अंनतकाळापर्यंत निगोदात वास्तव्य करतो. तेथून बाहेर पडून पृथ्वीकाय इ.मध्ये उत्पन्न होतो.

निगोद जीवाची अविकसित अशी अंतिम अवस्था आहे. सर्वाधिक निम्न कोटीची स्थिती आहे. एका बोटाच्या असंख्यात भाग इतके क्षेत्र जिथे अनंत जीव राहण्याचे स्थान आहे. त्यालाच निगोद म्हणतात.

नित्यनिगोदात असलेले जीव अनंत काळापर्यंत तेथेच वास्तव्य करून असतात. चतुर्गति निगोद तेथून निघून पृथ्वीकायादीमध्ये जन्म घेतात. परंतु ते अज्ञान अवस्थेतच राहतात. त्यांचा विकास होतच नाही. पुढे ते असंख्यात काळापर्यंत बादर-सूक्ष्म, स्थूलकायामध्ये भटकत असतात. परंतु चिंतामणी रत्नत्रय पर्याय अत्यंत मुश्कीलीने प्राप्त करतात.

पुढे एकेन्द्रिय मधून द्विइंद्रिय दुर्लभ आहे. अगदी पंचेन्द्रिय प्राप्त केल्या तरी संज्ञी (मनसहित) होणे फारच कठीण आहे समजा समनस्क झाला तरी रौद्रस्वरूपी तिर्यंच प्राणी बनतो. सदैव पापरूपी परिणामातच रममाण राहतो. परिणामस्वरूप ता नरकगामी होतो. तीव्र अशुभ लेश्यामुळे प्राणांचा त्याग करून अत्यंत दुःखप्रद नरकात जातो. जिथे अत्यधिक शारीरिक तथा मानसिक कष्ट भोगतो.

नरकातून निघून परत तिर्यंच गतीमध्ये जातो. अशाप्रकारे भटकत भटकत तिर्यंच पर्यायातून निघून अत्यंत दुर्लभ अशा मनुष्य जन्माला प्राप्त करतो. परंतु मिथ्यादृष्टी म्लेच्छ अशा कुळात जाऊन पापांचे अर्जन करीत राहतो. अशा क्रमाक्रमाने जाताना कदाचित आर्यखण्डात जन्म घेतो. पण संस्कारशील कुळ मिळणे अत्यंत दुर्लभ असते. तसा उत्तम कुळ मिळाला समजा तरी निर्धन दरिद्री कुटुंबात जन्म मिळतो. आणि संयोगवशात् धन-संपन्नता पूर्ण कुंटुब मिळाले तरी इंद्रिया परिपूर्ण अवस्थेत स्वरूप शरीराची प्राप्ती अत्यंत दुर्लभ आहे. दीर्घायु मिळाली तरी उत्तम शील उत्तम स्वभाव मिळणे दुर्लभ आहे. ते ही सर्व मिळाले तर सम्यक् दर्शनादी रत्नत्रयाच्या आराधकाचे सान्निध्य मिळणे अतिशय दुर्लभ आहे. तसे सान्निध्यही मिळाले पण तत्त्व श्रद्धा सहतत्वांबद्दल आस्थायुक्त सम्यक्त्व मिळणे तर महा कठीण आहे. संयोगवश सम्यक्दृष्टी ही मिळाली तर चारित्र्य व्रतांचा स्वीकार करणे संभव नाही. व्रत ही स्वीकारले तरी व्रत पालन करण्यात सक्षम नाही. रत्नत्रय प्राप्त करूनही जर जीव अनन्तानुबंधी क्रोधादी तीव्र कषाय युक्त असेल तर त्या जीवाचा रत्नत्रय नष्ट होऊन तो तिर्यंच गतित जातो. किंवा मनुष्य गतीत ही जाऊ शकतो. भवनवासी, व्यंतर, ज्योतिषादी देवयोनीत उत्पन्न होऊ शकतो.[४३६]

समुद्रात अमूल्य तीन रत्न पडले तर त्यांना शोधणे अत्यंत कठीण आहे.

त्याचप्रमाणे संसाररूपी सागरात भ्रमण करताना मनुष्य जन्म प्राप्त होणे अती दुर्लभ आहे. उदा. - एकदा एक देवाने दगडाच्या भिंतीचे आपल्या शस्त्राने तुकडे-तुकडे करून टाकले आणि त्या भिंतीचे तुकडे नाही पण बारीक पीठ करून टाकले. त्या चूर्णाला एका पर्वत शिखरावर चढून त्या देवाने ते चूर्ण हवेत पसरून दिले. जर कोण्या व्यक्तीला त्या चुर्णाच्या अणू-अणूला एकत्र करण्यास सांगितले तर काय ते संभव आहे ? अगदी याचप्रमाणे एकदा मनुष्य जन्म मिळाल्यानंतर त्याला जर व्यर्थ गमावले तर परत मनुष्य जन्म मिळणे अत्यंत अत्यंत दुर्लभ आहे.[४३७]

या संसारात मानव-जीवन मिळणे दुर्लभ आहे. हा विचार जगातील प्रत्येक धर्मात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात निश्चितपणे मांडलेला आहे. संसारातील अनेक प्राण्यांशी तुलना केल्यास मानवजन्माची श्रेष्ठता स्वतः सिद्ध होते. अशा दुर्लभ जीवनाची उपयोगिता, लक्ष्य आणि जीवनयापनाची पद्धती संबंधी स्वतः मानव बुद्धी सतत चिंतनशील राहिली आहे. अशाप्रकारच्या चिंतनामुळे विविध धर्म आणि दार्शनिक विचारधारा प्रकाशात आल्या.

या सर्वांचा विचार केल्यानंतर आ. वट्टकेर मिथ्यात्व तथा कषाय त्याग करण्याची प्रेरणा देतात. ते म्हणतात - कदाचित मनुष्य जन्मात सराग संयम पालन करू शकतो अथवा अकाम निर्जरामय असत् तपाचे आचरण करून पुण्योपार्जन करून फारतर मनुष्य योनीतून देव योनीत पोहोचू शकतो. तेथे क्षायोपक्षमिकलब्धी, विशुद्धीलब्धी, देशलब्धी, प्रयोगलब्धी आणि कर्णलब्धी मिळून जाते. कर्णलब्धी मिळाल्यामुळे सम्यक्त्व प्राप्त करू शकतो. परंतु तप आणि चारित्र्याची प्राप्ती नाही करू शकत. श्रावक व्रत व आचार यांचेही तेथे पालन करू शकत नाही.[४३८]

मनुष्य गती ही अशी एक गती आहे तिथे आत्म साधना करण्यासाठी सर्वोत्तम असणारे जे तप आहे ते करू शकतो. ध्यान-साधना करू शकतो. उत्कृष्ट धर्मध्यान आणि शुक्लध्यान साध्य करू शकतो.

अशा दुर्लभ मनुष्य जन्माला प्राप्त करून जो ह्याचा दुरुपयोग करतो ते एका दिव्य महारत्नाला राख मिळवण्यासाठी जाळून टाकतात. ह्या भावनेचा पुन्हा पुन्हा चिंतन, मनन, स्मरण आणि अभ्यास केल्याने मानव त्या उच्चत्तम बोधिरत्नाला प्राप्त करण्यास सफलता मिळवतो. पण ते ही अती दुर्लभ मनुष्य जन्माची दुर्लभता ज्याला समजली असेल तोच क्षणाक्षणाचे महत्त्व जाणू शकतो. आचार्य उमास्वाती म्हणतात की मनुष्य जन्म, कर्मभूमी, आर्यदेश, आर्य कुळ निरोगी शरीर आणि दीर्घ आयुष्य प्राप्त झाले तसेच श्रद्धा,

सद्गुरु आणि शास्त्रश्रवण पण प्राप्त झाले तरी बोधी प्राप्त होणे अत्यंत दुर्लभ आहे.[४३९]

जैन शास्त्रात एक वस्तुला अतिशय दुर्लभ मानले आहे. धन, वैभव, स्वर्ग पद-प्रतिष्ठा प्राप्त होणे इतके दुर्लभ नाही. सम्यक्त्व बोधी सम्यक्त्वात खरी निष्ठा, ती प्राप्त केल्याशिवाय जीवन व्यर्थ आहे. प्रचूर पूर्व ज्ञानाचा धनी असला पण त्याला सत्यावर आधारित आस्था, श्रद्धा नसेल तर त्याचे ते ज्ञान, कल्याणकारी नाही. 'रुचिर्जिनोत्कतत्वेषु सम्यक् श्रद्धानमुच्यते' अर्थात तीर्थंकर अथवा अरिहंत द्वारा सांगितलेल्या तत्त्वावर आणि शास्त्रावर रुची, विश्वास व श्रद्धा ठेवणे ह्यालाच सम्यक्श्रद्धा म्हणतात. श्रद्धा अथवा सम्यक्त्व नसले तर जसे एका गाढवावर चंदनाच्या लाकडाचा भारा लादला तर तो फक्त ते ओझे वाहतो, चंदनाच्या सुगंधाचा त्याला पत्ताच नसतो. तसेच सम्यग्बोधी शिवाय घोरातिघोर तपाचरण केले तरी ते अज्ञान तपातच गणले जाते.

आचार्य हेमचंद्रांनी बोधीदुर्लभ भावनेचे चार श्लोक लिहिले आहेत त्यात फार सुंदर वर्णन केले आहे. एका पर्वतीय नदीच्या प्रवाहात वाहत येणारा पाषाण टक्करा खात खात आपल्या विशेष प्रयत्नाशिवाय गोल आकार घेतो. त्याचप्रमाणे संसाराच्या प्रवाहात जन्ममरण करीतकरीत हा जीव कधी कधी विशिष्ट अकाम निर्जरामुळे अर्थात अजाणतेपणी झालेल्या कर्माच्या निर्जरामुळे कर्माच्या ओझ्यातून थोडे हलकेपणा अनुभव करतो. परिणामतः तो जीव स्थावर पर्यायातून त्रसपर्याय, पंचेन्द्रिय, तिर्यंच इ. उत्तरोत्तर वाढत जातो. कर्माच्या हलुवारपणामुळे मानव जीवन आर्यदेशात जन्म, उत्तम जाती, परिपूर्ण इंद्रिया आणि दीर्घायुष्य प्राप्त करतो. या संयोगामुळे, पुण्योदयामुळे त्याच्या मनात धर्माची अभिलाषा जागृत होते. धर्मश्रवणाचा सुअवसर प्राप्त होतो. तरी ही सत्तत्व निश्चय रूप बोधिरत्न मिळणे अती कठीण आहे.[४४०] मला ते प्राप्त होओ आणि माझे जीवन ज्योर्तिमय बनो. हा दुर्लभ मानव भव सार्थक होवो अशा प्रकारे व्यक्ती जसजसा या भावनेने भावित होत जातो आणि पुन्हा पुन्हा ह्या भावनेचे चिंतन करीत जातो तसतशी त्याच्या मनात एक अन्तः स्फूर्ती उत्पन्न होते. त्याच्यात विशेष पुरुषार्थ जागतो. धर्माच्या मार्गावर आरूढ होण्यास आलंबन मिळते.

भगवती आराधनेत पण बोधिदुर्लभ भावनेचे वर्णन आहे. ते सामान्यतः सर्व लेखकाप्रमाणे ही भावना फार महत्त्वपूर्ण आहे. कारण आत्मकल्याणाच्या मार्गाची पहिली पायरी ही सम्यक्बोधीच आहे. सम्यक्बोधीच्या शिवाय बाकी सर्व व्यर्थ आहे. कोणी कितीही ज्ञानी झाला पण त्याला सम्यग्बोधी प्राप्त नसेल तर तो अज्ञानीच आहे.

माहितीच्या दृष्टीने त्याचे ज्ञान विपुल असले तरी आत्मश्रेयसच्या मार्गापासून ते दूरच आहे. म्हणजे बुद्धीच्या स्तरावर अतिशय ज्ञानवान व्यक्ती असेल पण त्याला जर सम्यक्बोधी प्राप्त नसेल तर ते ज्ञान, ज्ञान नव्हे अज्ञानच म्हणावे लागेल. मोक्षाप्रत नेणारे, ज्ञानच खरे ज्ञान असते. जैनदर्शनात अशा केवळ बुद्धिगम्य ज्ञानाला निष्प्रयोजन म्हटले आहे. म्हणून ते अज्ञान आहे. जैनदर्शनात मतिज्ञान, श्रुतज्ञान आणि अवधिज्ञानाबरोबर मतिअज्ञान, श्रुतअज्ञान, विभंग ज्ञानाचा जो उल्लेख आहे त्याचा आशय हाच आहे. माहितीच्या दृष्टीने सम्यक्त्वी, सम्यग्दर्शन द्वारा मतिज्ञानाच्या माध्यमाने जे जाणले जाते, त्याचप्रमाणे, मिथ्यात्वी द्वारा जाणले जाते. माहिती तर दोघांना आहे. परंतु सम्यग्दृष्टीचे ज्ञान मतिज्ञान युक्त आहे. आणि असम्यग्दृष्टी असलेल्याचे ज्ञान मतिअज्ञान आहे. याच कारणामुळे बोधिदुर्लभ भावनामध्ये साधकाला खूप प्रेरणा दिली जाते. कारण जीवनात सम्यक्बोधी प्राप्त करणे म्हणजे साधारण उपलब्धी नाही. अति अति महत्त्वपूर्ण आहे. सम्यग्बोधीमुळेच जीवन सार्थक होते. या बोधीशिवाय देवदुर्लभ असे हे मनुष्य जीवन व्यर्थ आहे.

जो जीव सुलभबोधी असतो त्याला ज्ञान, श्रद्धा, चारित्र आणि तपामध्ये सहज रुची असते. सुलभ बोधी असणे याचा अर्थ आहे. त्या सीमेपर्यंत पोहोचणे जेथून सरळ उड्डाण घेऊन मोक्षाप्रत जाऊ शकू. सुलभ बोधी व्यक्तीची गणना श्रावक, धार्मिक वर्गात केली जाते. याचा सरळ अर्थ आहे बोधी सम्यक्त्वाची सुलभता.

बोधी प्राप्त होण्यात बाधक आहे- अवर्णवाद जी व्यक्ती दुर्लभ बोधी असते त्याला समजावणे अती कठीण. त्याला उपदेश देणे व्यर्थ. तो प्रतिबुद्ध होऊच शकत नाही. स्थानांग सूत्रात याचे पाच कारण सांगितले आहेत. ज्यामुळे जीवाला बोधी प्राप्त होत नाही असे कर्म बांधलेले असतात. आपल्याला जर आपले कल्याण करायचे असेल तर भावना समजावून घेऊन त्याप्रमाणे भावित व्हायला पाहिजे. यासाठी सतत भगीरथ प्रयत्न, पुरुषार्थ करण्यासाठी कटिबद्ध झाले पाहिजे.

अवर्ण शब्दाचे दोन अर्थ आहेत - एक निंदा, दुसरा अर्थ आस्तित्वाचा अस्वीकार. अर्हत, अर्हत निरुपित धर्म, आचार्य, उपाध्याय, चतुर्विध धर्मसंघ. देव या पाचा बद्दल कोणतीही बोधिदुर्लभ भावनेचे सैद्धांतिक तात्त्विक आणि भावोत्प्रेरक दृष्टीने केलेले वरील विवेचन निश्चितच अध्येताच्या मनात बोधीची दुर्लभता, त्याची प्राप्ती त्याची

योग्यता, श्रेयस्कर्ता एक असे सजीव चित्र उपस्थित करतो, ज्यामुळे मनात सहजपणे योग्य भावनांचा उद्‌गम होऊ लागतो.

बोधी दुर्लभ भावनेचे चिंतन करता करता जीव निगोद पासून मोक्षापर्यंतचा संपूर्ण विकास क्रम पाहू शकतो. ह्या विकास क्रमाला डोळ्यासमोर ठेऊन स्वतःमध्ये जो काही कमीपणा आहे त्याला दूर करून पूर्णतेला प्राप्त करू शकतो. सम्यक्त्वादी रत्नांना प्राप्त करण्यासाठी भगिरथ पुरुषार्थ करू शकतो. आणि स्वतःच्या अवस्थेचे संपूर्ण ज्ञान झाले असता आध्यात्मिक विकास क्षेत्रात मी कुठे आहे ? आणि मी कसा आहे ? ते प्रत्यक्ष पाहू शकतो.

जैन आगमात आत्मविकासाची क्रमिक वृद्धी पाहण्यासाठी गुणस्थानाच्या चौदा पायऱ्याचे वर्णन प्राप्त होते त्यात जीवात्मा पाहू शकतो की मी कोणत्या अवस्थेपर्यंत पोहोचलो आहे. आणि मला कुठपर्यंत पोहोचायचे आहे. भावनेच्या आधारे जीवात्म्याचा क्रमिक विकास कसा होतो त्याचे वर्णन पुढे केले गेले आहे.

गुणस्थान क्रमाच्या विकासात भावनांची प्रेरकता जो पर्यंत जीवावरोबर कर्माचा संबंध आहे तो पर्यंत त्याला कार्यशील रहावेच लागते. कर्म हे असे आवरण आहे जे आत्म्याच्या सत्‌चित आनंदमय स्वरूपाला नेहमी आच्छादित ठेवतात. या दैहिक जीवनात जे काही घटित होते ते सर्व कर्माच्या औदयिक इ. भावनेच्या परिणामामुळे.

मानव एक पुरुषार्थशील प्राणी आहे. तो आत्म पराक्रमाद्वारे शुद्धात्म भाव दिशेने गतिशील राहतो. विकारांना नष्ट करतो. सदगुणांना स्वीकारतो. ज्यामुळे आत्म्यावरील कलुषता नष्ट होते. म्हणून जीवनात अध्यवसाय, पुरुषार्थ, प्रयास किंवा उद्यमाची महत्ता आहे.

आश्चर्य तर हे आहे की आंतरीक शक्तीचा धनी असूनही जीव उत्तम अध्यवसायद्वारा कर्म क्षय करण्यासाठी उद्यत होत नाही. जीवाने आत्मोकर्षाच्या मार्गावर आरूढ होण्याच्या हेतूने जैनाचार्यांनी भावनांचे विशेष प्रकारचे विवेचन केले आहे. आत्मिक गुणांच्या विकासासाठी या बारा भावनांचे किती महत्त्व आहे हे त्यांनी अनेक प्रकारांनी समजावण्याचा प्रयास केला आहे. जीवाची सर्वात निम्न कोटी अवस्था आहे मिथ्यात्व दशा. असत्याला सत्य मानणे या मिथ्याविश्वासामुळे त्याचे सर्व कार्य आत्म्याच्या विपरीत होतात. अकल्याणकारी होतात. हाच क्रम असाच चालत राहिला तर जीवात्मा कधीच श्रेयस्कर मार्ग प्राप्त करू शकणार नाही. तो केवळ भौतिक सुखाच्या मृगजळाच्या भ्रांतित

भ्रमण करीत राहील. जन्ममरणाच्या फेऱ्यात फेऱ्या मारीत राहील. कोणतेही कार्य अध्यवसाय किंवा उद्यम करण्याअगोदर मनात त्यानुसार भावात्मक तीव्रता निर्माण करावी लागते. कारण की, कर्माची संप्रवृत्ती होण्याअगोदर आत्म्यात भावनात्मक आंदोलन होते. त्या भावात्मक आंदोलनाला जर व्यक्तीने सत्यतेची तीव्रता सन्मुख केली तर ते कार्य सात्विक व निर्मळ होते. सत्शुभ, पवित्र भावनांचे चिंतन, अनुचिंतन अनुभावन मनात अशी प्रबल, सबल, उज्ज्वल परिणामांची धारा निष्पन्न करतात. त्यामुळे जीव सत्मार्गाने सशक्त भावनेने मार्गारूढ होतो.

जेव्हा व्यक्तीच्या मनात आपल्या बद्दल हीन निम्न दशेचे भान होते, तेव्हा त्याच्या चिंतनात एक जागृती येते. एक मोड येतो, तेव्हा प्रथम तो स्वतः आपल्याच विश्वासावर आघात अनुभव करतो की मी किती असत्याच्या मार्गावर चालत आहे ? सत् श्रद्धा प्राप्त करण्याचा भाव त्याच्या मनात जागृत होतो. तो सद्श्रद्धेचे मनात मूल्यांकन करतो. त्याशिवाय जीवनात काही साररूप नाही.

ही अशी एक अवस्था आहे. तिथे बोधीदुर्लभ भावना त्याला सद्श्रद्धा, सद्विश्वासच्या मार्गाने जाण्यास प्रेरित करते. पुढे त्यात स्थिर होण्याची प्रेरणा मिळते. तो बोधीदुर्लभ भावनेचे महत्त्व, उपयोगिताबद्दल वारंवार चिंतन करायला लागतो. जेव्हा त्याला ते पूर्णपणे पटते की सम्यग्बोधी शिवाय जीवन निरर्थक आहे. तेव्हा त्याचे आत्मपरिणाम शुद्ध होतात. त्याची उत्कंठता वाढत जाते. जस-जशी त्या उत्कंठेमध्ये तीव्रता येऊ लागते. मिथ्यात्वाचे बंध शिथिल व्हायला लागतात. आणि मग एक वेळ अशी येते की मिथ्यात्वाची जागा सम्यक्त्व धारण करतो. असत्याबद्दल जी आस्था होती ती संपुष्टात येते. परिणामतः अज्ञान अंधकार दूर होतो. ज्ञानाचा आलोक उदित होतो. सम्यक्त्वाची प्राप्ती होताच मिथ्यात्व नष्ट होऊन अज्ञान दूर होऊन जातो तेच खरे सम्यग्ज्ञान. बोधीदुर्लभ भावनेच्या परिणामस्वरूप साधक गुणस्थानावर आरूढ होतो.

भावना अधिक प्रखर झाल्यावर त्याची तीव्रता वाढली तर जीव मग आपल्या स्वरूपाचे चिंतन करू लागतो. तो समजू लागलो की, मी एकटा आहे. मी नितांत एकटा आहे. ज्यांना आतापर्यंत मी माझे समजत होतो ते माझे नाहीत. ते सोडून जातात. वधता वधता ते मृत्यू पावतात. आणि परिवारातील आत्मीय म्हणविणारे जे आप्त, मित्र आहेत. त्यांच्या स्वार्थावर घाला पडतो तेव्हा तेच शत्रू बनून जातात. मग ते माझे कसे ? या बोधीदुर्लभ भावनेची हीच विशेषता आहे की, व्यक्ती सद्वीर्य आणि सद्पराक्रम करण्यास

उद्यत होतो. जर पूर्णपणे पंचमहाव्रत धारी साधक जीवन स्वीकार करू शकला नाही तर अगार सहित श्रावक व्रत जीवन यापन करतो. गृहस्थ व्रत धारण करतो. अशाप्रकारे आत्मगुणांच्या विकासाबरोबर गुणस्थानात प्रगती करतो. तो अविरत सम्यक्त्वी पासून देशव्रती बनून जातो. आपल्या शक्तीनुसार तो व्रतांचा स्वीकार करतो. त्याचे भोगमय जीवन त्यागमय बनते.

जेव्हा जगाचे विचित्र स्वरूप पाहतो, लोकांची स्वार्थपरायणता पाहतो तेव्हा एकत्व भाव अधिक प्रबल होतो. तो विचार करू लागतो हे बाह्य जगत जेवढे आहे ते सर्व पर आहे त्यांच्याकडून मी कशाला अपेक्षा ठेवू ? हे कोणी ही मला शरण देण्यास समर्थ नाहीत. ही अन्यत्व भावना अशरणत्व इ. भावनांचा उन्मेश होऊन मनात अधिकच स्फूर्ती जागते. वैराग्यभाव वृद्धींगत होतो. आंतरीक दुर्बलता समाप्त होते. विरक्तीचा भाव प्रबल होतो. विकल्प, अपवादाचा त्याग करून सर्वथा विरतिमय, संयममय जीवन अंगिकारतो. श्रमणोपासक भूमिकेतून पुढे विकास करतो. श्रमण भूमिका स्वीकारतो. तो पाचव्या गुणस्थानातून सहाव्या गुणस्थानात पदार्पण करतो. ज्याला प्रमत्त संयत म्हणतात. जरी बाह्यदृष्टीने प्रमत्त किंवा प्रमादयुक्त नसतो. परंतु आत्मस्वरूपोन्मुखी उत्साहचे सातत्य नसते.

साधनेचा मार्ग जरी दुर्गम आहे. परंतु जस-जसे आत्मबल वाढत जाते त्याचे जीवन सुगम होत जाते. साधकाच्या मनात जसजसा भावनांचा उत्कर्ष होत जातो, त्याच्या आत्मगुणांचा ही विकास होतो. जेव्हा तो कर्मप्रवाह. लोकप्रवाह इ. वर चिंतन करतो, कर्माच्या निरोधावर विचार करतो. त्या कर्माच्या निर्जरण संबंधी व कर्माच्या विलया संबंधी विचार करतो, चिंतन करतो तसतसे त्याचे जीवन जास्तीत जास्त संयममय, तपाचरणाकडे उत्कर्षित होत जाते. गुणस्थान उर्ध्वमुखी बनतात. जर तो आपल्या साधनेच्या क्रमात क्षपक किंवा क्षययुक्त श्रेणींचा स्वीकार केला तर पुढे प्रगतीशील बनून वीतराग भाव प्राप्त करतो. जे त्रयोदश गुणस्थान धारक आहे. पुढे चौदाव्या गुणस्थानात शुक्लध्यानाच्या माध्यमाने जीवनाचा परमसाध्य मोक्ष प्राप्त करतो.

ह्या भावनांचे चिंतन, मनन, अनुभावन गुणस्थान मूलक साधनेत किती उपयोगी आहे हे या विवेचनावरून सिद्ध होते.

सम्यक् बोधीची पायरी चढल्याशिवाय परम साध्य मोक्षाप्रत पोहोचणे शक्य नाही. जीवात्मा जेव्हा प्रथम मिथ्यात्व गुणस्थाना पार करून सम्यक्त्वात येतो एकदा पण सम्यक्त्वाचा स्पर्श करतो. मग त्याचा उत्तरोत्तर विकास होतच जातो. सम्यक्त्व होण्याच्या

पूर्वी ज्ञान तर प्रत्येक जीवात्म्यात असतोच सम्यक्त्व प्राप्तीनंतर कुमती, कुश्रुत, कुअवधी हे तीन मिथ्याज्ञान निर्मळ होतात. जीव, अजीव, पुण्य, पाप, आस्रव संवर, निर्जरा, बंध आणि मोक्ष ह्या नऊ तत्वावर श्रद्धा होते. म्हणून सम्यक्त्वाचे महत्त्व सर्वाधिक आहे. 'मूलं धर्मस्य सम्यक्त्वम्' सम्यक्त्व हे धर्माचे मूळ आहे. 'सम्यक्त्वं परमं रत्नम्' शुद्ध श्रद्धा हे सर्वोत्तम रत्न आहे. 'तत्वनिश्चय रूपं तद् बोधि रत्नं सुदुर्लभम् वस्तू तत्वाच्या सम्यक् स्वरूपावर विश्वास होणे आणि तत्वनिश्चय रूप श्रद्धा रत्नाची प्राप्ती होणे फार कठीण आहे. आणि आत्मतत्वाचे निश्चित ज्ञान झाल्या शिवाय शेकडो युग गेले, सर्वस्वाचे दान केले तरी मोक्ष प्राप्त होऊ शकत नाही.[४४१]

इथे एक प्रश्न होतो की सम्यग्दर्शन प्राप्त करण्यासाठी ज्ञान आणि क्रियेचा काही योगदान आहे की नाही ? त्याचे समाधान हे आहे की ज्ञान आणि क्रिया सम्यक् नसले तरी पण सम्यग्दर्शन प्राप्त करण्यात सहयोगी बनतात. कारण जो पर्यंत मोहनीय कर्माची स्थिती अन्तःकोटाकोटी सागरोपमाची होत नाही तो पर्यंत सम्यग्दर्शन प्राप्त होत नाही. मोहनीय सहित सात कर्माची एक आयुष्यकर्म सोडून उत्कृष्ट बंध स्थिती सत्तर (७०) कोटाकोटी सागसोपमाची होते. ती अन्तःकोटाकोटी सागरोपमा पेक्षा पण कमी राहणे हे कोणत्याही क्रिया अथवा पुरुषार्थाशिवाय संभव नाही. ह्याच्यात ज्ञान आणि क्रिया याचे मुख्य योगदान आहे. जर विचार शुभ नसले तर आचार शुभ होणार नाही आणि विचार व आचार शुभ नसले तर सत्तर (७०) कोटाकोटी मोहकर्माची स्थिती अन्तः कोटाकोटी मात्र कशी राहील ? आणि मोह कर्माची स्थिती कमी झाली की आयुष्य कर्म सोडून बाकीच्या सर्व कर्माची स्थिती कमी होते. म्हणजे तप, संयम इत्यादीने होणारी निर्जरा पण कर्म क्षय करण्यास साधन रूप आहे. ती सम्यक् असो अथवा नसो.

श्रुतज्ञानाच्या आधारे चिंतन मनन करणे तसेच कर्म निर्जरेच्या भावनेने तप-संयम करणे ह्याला मात्र प्रदर्शन म्हणता येणार नाही हा तर मार्ग आहे. त्याच्याने सम्यग्दर्शनाची प्राप्ती सम्भव होते. जर मार्गाचाच निषेध केला तर सम्यग्दर्शनापर्यंत कधी पोहोचूच शकणार नाही. म्हणून तप संयम इत्यादी व्यवहार धर्माचा निषेध करून मात्र सम्यग्दर्शनाची प्ररुपणा करणे योग्य नाही.

नवनीत प्राप्त करण्यासाठी दही घुसळण्याचे साधन रवीची (बिलौनी) दोरीचे दोन्ही टोक क्रमाक्रमाने खेचले पाहिजे तर नवनीत मिळते तसेच निश्चय आणि व्यवहार दोन्ही दृष्टीचे महत्त्व आहे. एकान्त रूपाने व्यवहार अथवा निश्चयावर जोर देणे योग्य नाही.

दृष्टीभेदामुळे संसाराच्या वस्तू वेगवेगळ्या दिसतात. मिथ्यात्वी संसाराच्या वस्तूला भोग्य मानतो, सम्यक्त्वि त्या वस्तूंना स्वतःपेक्षा भिन्न समजतो. धन्नासेठ ज्या सुभद्राला पत्नी समजत होते दृष्टी बदलली तर तिला बहीण मानून तसा व्यवहार करू लागले.

प्रथम तीर्थंकर ऋषभदेव भगवानाचे ९८ पुत्र भरत चक्रवर्तीची अधिनता स्वीकारण्यासाठी तैयार नव्हते ते प्रभू ऋषभदेव जवळ गेले. ऋषदेव भगवान म्हणाले शाश्वत मोक्षलक्ष्मी प्राप्त करा, ही लक्ष्मी तर एक न एक दिवस सुटणारच आहे. वाणीचा प्रभाव मनावर झाला. दृष्टी बदलली आणि तिथेच सर्व संसाराच्या भोगापभोगांचा त्याग केला व दीक्षित झाले.

आवश्यकता दृष्टीच्या परिवर्तनाची आहे. मिथ्यात्व सोडून सम्यक्त्वात येण्याची आहे. सम्यग्दर्शन प्राप्त होताच मुक्ती निकट होईल. संसाराचे स्वरूप बदलून जाईल नंतर लहान बाळासारखे बोर प्राप्त करण्यासाठी किंमती हिरे फेकणार नाही. मिथ्यात्वी अमूल्य मानवभवाला भोगासाठी व्यर्थ घालवतो पण सम्यक्त्वि त्याचे मूल्य समजून सार्थक करता.

सम्यक्दर्शन प्राप्त करणे फार महत्त्वाचे आहे, त्याचा फशर मोठा लाभ आहे. जसे जन्मांध मनुष्याला अचानक डोळे मिळाले असता, अथवा भयंकर रोग नष्ट होता जो आनंद होतो त्याच्या पेक्षा अनेकपट आनंद जीवाला सम्यक्त्व प्राप्तीने मिळतो.

ज्याक्षणी सम्यक्त्व प्राप्त होतो त्या क्षणीच जीवाचे मोक्ष गमण नक्की होते.

निगोद पासून सम्यक्त्व प्राप्तीपर्यंतची प्रक्रिया पाहाता बोधी प्राप्त करणे किती दुर्लभ आहे हे समजून येते. अशाप्रकारे बोधी प्राप्त होणे किती दुर्लभ आहे ह्याचे चिंतन करणे व त्या प्रक्रियेच्या स्वरूपाचे ज्या भावनेत चिंतन केले जाते ती बोधीदुर्लभ भावना आहे.

बोधिरत्न सम्यक्त्वाचे स्वरूप

अरिहंतो मह देवो, जावज्जीवं सुसाहुणो गुरुणो ।
जिण पण्णतं तत्तं, इअ सम्मत्तं मए गहियं ॥

अरिहंत अर्थात राग द्वेषाचे त्यागी वीतरागी सर्वज्ञ अरिहंत परमात्मा हेच माझे देव आहेत. आणि अजीवन पाच महाव्रत धारी, त्यागी, तपस्वी सुसाधू माझे गुरू आहेत. श्री जिनेश्वर भगवंतांनी जे तत्वाचे स्वरूप सांगितले आहे. तोच माझा धर्म आहे. हे आहे सम्यक्त्वाचे स्वरूप अर्थात खऱ्या श्रद्धेचे स्वरूप.

सम्यग्दृष्टी विचार करतो की माझा ज्ञानमय आत्मा पुद्गला पासून सर्वथा भिन्न आहे. म्हणून मला कोणतीच व्याधी होऊ शकत नाही. मग मला भय कशाचा ? जितक्या व्याध्या आहेत त्या सगळ्या शरीरालाच होतात. अमूर्त आत्म्याला एक पण व्याधी होत नाही.[४४२]

ज्याप्रमाणे आकाश हे अमूर्त पदार्थ आहे तो कशाही प्रकारे जळू शकत नाही. त्याच प्रमाणे आत्मा पण अमूर्त पदार्थ आहे. त्याचा पण नाश होऊ शकत नाही.[४४३] अशा प्रकारच्या चिंतनाने सम्यग्दृष्टीचा आत्मा उत्तरोत्तर जास्त आत्मविशुद्धी करतो.

सम्यक्त्वाची लक्षणे

शम - क्रोधादी कषायाचा उपशम किंवा क्षय होणे.

संवेग - मोक्ष प्राप्तीची इच्छा असणे.

निर्वेद - जगापासून उदासिनता रूप वैराग्य असणे.

अनुकम्पा - प्राण्यावर दयाभाव ठेवणे.

आस्तिक्य - जिनेन्द्र भगवान द्वारा सांगितलेले पदार्थ, परलोक, आत्मा परमात्मा इत्यादी अतिन्द्रिय पदार्थावर पूर्ण आस्था श्रद्धा असणे.

ज्या व्यक्तीमध्ये हे पाच लक्षण दिसून येतात ते सम्यक्त्वि आहे. पं. जुगलकिशोर म्हणतात-

"जागे मम दुर्लभ बोधी प्रभो, दुर्नय तम सत्वर टल जावे ।
बस ज्ञाता दृष्टा रह जाऊँ, मद मत्सर मोह विनस जावे ॥"[४४२]

जर माझ्या अंतःकरणात जी प्राप्त करणे अत्यंत दुर्लभ आहे अशी बोधी जागृत झाली तर दुर्नयाचा अंधकार लगेच नष्ट होईल मगमी ज्ञाता दृष्टा बनून जाईल, मद मत्सर मोह विनष्ट होतील.

स्वतःला ओळखणे आणि आत्म्यात लीन होणे हीच बोधी आहे. दर्शन, ज्ञान, चारित्र आहे. हे दर्शन, ज्ञान, चारित्र प्राप्त करणेच अत्यंत दुर्लभ आहे आणि ह्या बोधीच्या दुर्लभतेचा विचार चिंतन, पुन्हा पुन्हा करणे बोधी दुर्लभ भावना आहे.[४४५]

एखादी व्यक्ती ह्या जीवाला बोधीलाभ होणे अत्यंत कठीण समजून अनुत्साहित होतो व पुरुषार्थ रहित होऊ लागतो पण त्याने हे पण चिंतन केले पाहिजे की बोधी सुलभ कशी होईल ? जो पर्यंत जीव संज्ञी पंचेन्द्रिय दशा प्राप्त करत नाही तो पर्यंत

बोधी प्राप्त होणे अती दुर्लभ आहे, जीवाला मनुष्यपर्याय प्राप्त झाल्यानंतर पण अभ्यास नसल्यामुळे बोधी प्राप्त होणे दुर्लभच आहे. तरीपण जो निश्चयच करतो त्याच्यासाठी काहीच दुर्लभ नाही. पुरुषार्थ करणाऱ्यासाठी काय सुलभ आणि काय दुर्लभ ? सर्व काही सुलभच आहे.

बोधीदुर्लभ भावनेचे वास्तविक स्वरूप हेच आहे की जोपर्यंत आपण जागृत होत नाही तोपर्यंत महादुर्लभ, आणि आत्मोन्मुखी पुरुषार्थासाठी जो कंबर करसून संलग्न होतो त्याच्यासाठी महासुलभ.

बोधीलाभ सुलभ करण्यासाठी रत्नप्रय धर्माची उत्पत्ती, वृद्धी आणि पूर्णता प्राप्त करणचे चिंतन व तशी प्रक्रिया आवश्यक आहे. ही भावना शुभाशुभभाव विध्वंसनी, आनन्दजननी आहे.

धर्माचा संयोग मिळणे फार कठीण आहे. आर्यक्षेत्र, इत्यादी मिळणे कठीण आहे. सुख पूर्वक आजीविका, सदगुरु दर्शन, शास्त्रश्रवण, मनन आणि चिंतन इत्यादी मिळणे फार कठीण सांगितले आहे. हे सर्व मिळाले तरी भव्यत्व, सम्यक्त्व, शीलता, सुलभ बोधकता, स्वल्प कर्मशीलता इत्यादी प्राप्त होणे कठीण आहे. असे सर्व संयोग मिळाले तरच धर्माची रुचि जागृत होते. नंतरच बोधी बीज रूप सम्यक्त्वाची प्राप्ती होते. म्हणून विचार केला पाहिजे की अत्यंत पुण्योदयानेच आपण अशा उच्च अवस्थेपर्यंत पोहोचू शकलो आहे. ह्या अवस्थेत आत्मरूपी क्षेत्रात सम्यक्त्व रूपी बी पेरून ज्ञान रूपी जल द्वारा त्याचे सतत पालन पोषण केले पाहिजे ज्याच्याने धर्म रूपी वृक्ष उत्पन्न होईल आणि मोक्षरूपी फळाची प्राप्ती सहजतेने होईल.

बोधी दुर्लभतेने प्राप्त होते हे सांगण्यामागे हेतू हा आहे की ती अत्यंत मूल्यवान आहे. कारण जे मूल्यवान जास्त तेच मिळणे दुर्लभ आहे आणि जे दुर्लभ आहे. मूल्यवान आहे ते मिळवण्यासाठी आपला मन लोलुप होतो आणि आशी दुर्लभ वस्तू मिळाल्यानंतर दुर्लभ आणि किंमती समजून त्याचे बरोबर रक्षण केले जाते. कारण ती वस्तू जर हातातून गेली तर पुन्हा लवकर मिळत नाही. तशी बोधीपण हातातून गेली तर अनंतकाळ गेल्यानंतर भाग्यानेच मिळू शकते म्हणून मिळाली नसेल तर मिळवण्यात आणि मिळाली असेल तर त्याला आजून शुद्ध करण्याची त्याचे रक्षण करण्याची काळजी घेतली पाहिजे. संसाराच्या सगळ्या पदव्या, ऋद्धी, संपत्ती सर्वकाही प्राप्त होऊ शकेल. पण बोधीरत्न मिळणे फार कठीण आहे आणि जर ते एकदा प्राप्त झाले तर संसार परिभ्रमण कमी झाले समजावे.

आणि मिळालेल्या बोधीरत्नाला नीट जोपासून ठेवता आले नाही तर कसा पश्चाताप करावा लागतो त्याच्यासाठी एक प्रसिद्ध उदाहरण आहे.

एका दारिद्र ब्राह्मणाला अतिशय कष्टाने देव आराधना करून चिंतामणी रत्न प्राप्त झाला. तो रत्न त्याने खिशात, पाकीटात न ठेवता हातातच धरून ठेवला व अथाग समुद्र पार करण्यासाठी तो जहाजेत बसला. लोकांनी त्याला फार समजवले परंतु तो रत्न दुसरीकडे कुठेच न ठेवता कुणी हातातून पण न घ्यावे ह्या भीतीने त्याने हात पण जहाजेच्या बाहेर ठेवला. एकदा त्याला बसल्या बसल्या झोपेची डुलकी आली त्याच्या हाताच्या रत्नाची पकड सैल झाली आणि रत्न समुद्रात पडला. रत्न पडताच त्याचे डोळे उघडले पण दुःखाची गोष्ट ! निराशा आणि विलापाशिवाय त्याच्याजवळ काहीच शिल्लक नव्हते. गेलेला रत्न पुन्हा कोणत्याही प्रकारे त्याला मिळेल तसे नव्हते म्हणून तो जोर जोराने रडू लागला. दारिद्र अवस्थेत घरातून जसा निघाला होता तसाच पुन्हा घरी पोहोचला. पण जीवनभर त्याला पश्चाताप करावा लागला. त्याचप्रमाणे मनुष्य भव आणि बोधीरत्न प्राप्त करण्याची संधी जर हातातून गेली तर त्या दरिद्र ब्राह्मणाप्रमाणे पश्चाताप करावा लागेल म्हणून बोधी रत्न प्राप्त करून त्याचे खूप चांगल्याप्रकारे रक्षण करायला पाहिजे. अप्रमत्त राहून स्वकल्याण केले पाहिजे.स्वतःला ओळखणे आणि आत्म्यात लीन होणे हीच बोधी आहे. दर्शन, ज्ञान, चारित्र आहे. हे दर्शन, ज्ञान, चारित्र प्राप्त करणेच अत्यंत दुर्लभ आहे आणि ह्या बोधीच्या दुर्लभतेचा विचार, चिंतन पुन्हा पुन्हा करणे बोधी दुर्लभ भावना आहे.[४४६]

एक बाजू जन्म व दुसरीकडे मरण ह्या दोघांच्यामध्ये शरीरात जिवंत राहणारा हा जीव दुःखी होत आहे जसे एरंडाची पोकळ लाकडी दोनी बाजूने जळते त्याच्या मध्यभागी असलेला कीडा मरणाच्या तयारीत असतो. म्हणून ह्या शरीराचा मोह सोडून निर्ममत्व भावनेचे चिंतन केले पाहिजे.[४४७]

जैन दर्शन आत्मदर्शन आहे. साधकाने स्वतःला ओळखून स्वात्म्यात लीन व्हायचे आहे. 'पर'ला सोडून स्व मध्ये राहाण्याचे ज्ञान होणे परिभ्रमणाने मुक्त होण्याचे ज्ञान प्राप्त करावे, आणि अज्ञानाने दूर राहावे, आत्म्याचा बोध करावा हेच ह्या भावनेचे मूळ उद्देश्य आहे.

मानव जीवनात प्राप्त करण्यासारखे काही उत्तम तत्त्व असेल तर ती बोधी आहे. जीवनात सर्व काही प्राप्त केले पण त्याने बोधी प्राप्त केली नाही तर काहीच महत्त्व नाही. कारण मृत्यूनंतर सर्व काही इथेच सुटून जाते. बोधी परलोकात आपल्या बरोबर येते.

सोमप्रभसूरींनी सिंदूर प्रकरणमध्ये म्हटले आहे -

बोधीचे इतके महत्त्व समजल्यानंतर पण जो मनुष्य ह्या दुर्लभ जन्माला भोग विलासामध्ये व्यर्थ घालवतो, तो सोन्याच्या थाळीमध्ये धूळ किंवा माती भरतो, चिखलाने पाय धुण्यासाठी अमृत वाहवतो, हत्तीच्या पाठीवर इंधन वाहून नेतो आणि कावळा उडविण्यासाठी दगडाच्या जागी चिंतामणी रत्न फेकतो.[४४८]

हे मनुष्य जन्म बोधी रत्न प्राप्त करण्यासाठी मिळाले आहे. पुण्य योगाने धन, स्वजन, सर्वकाही पुन्हा मिळू शकते पण बोधीरत्न जर एकदा हातातून निघून गेला तर पुन्हा मिळणे अत्यंत कठीण आहे. म्हणून सम्यक्त्वाचे दोष टाळून बोधीच्या नाशक तत्वाने दूर राहून आपल्या सम्यग्दर्शनाची रक्षा करा आणि पुन्हा पुन्ही चिंतन करा की बोधीरत्न मिळणे सुलभ नाही. हाच बोधीदुर्लभ भावनेचा सार आहे.

बोधीचे तीन प्रकार आहेत. ज्ञानबोधी, दर्शनबोधी आणि चारित्रबोधी सामान्यतः मनुष्यचे आकर्षण सुख सुविधा आणि धन संपत्तीच्या प्रती असते. पण ते दुःख रूप आहे असा अनुभव झाला असताना पण मनुष्य त्या परिस्थितीला विसरतो. बोधीदुर्लभ भावना हाच संदेश देते की ह्या जगात सुख सुविधेचे भौतिक पदार्थ मिळणे फार दुर्लभ नाही. दुर्लभ आहे मानसिक शांती. मानसिक शांती धन वैभवाने अथवा सुख सुविधेने मिळत नाही.

मनःशांती ज्ञान दर्शन चारित्र रूपी बोधी ने प्राप्त होते. बोधी प्राप्त झाल्यावर विपरीत श्रद्धा, ज्ञान व आचरण नष्ट होऊन सत्याची ज्योति प्रज्वलित होते. ती ज्योती कधी विझत नाही. असा मनुष्य अनुत्तर ज्ञानाने स्वतःला भावित करतो.

धर्म भावना

धर्म शब्द अतिशय महत्त्वपूर्ण आहे. यात उत्तम भाव, तत्त्व व सत्कर्माचा एके ठिकाणी सुंदर समन्वय झाला आहे. हा संस्कृतच्या 'धृ' म्हणजे धारण करणे. या धातूपासून धर्म शब्द बनला आहे. याचा अर्थ आहे- जी कार्ये जीवनात धारण करण्यासारखी आहेत, जे करण्यामुळे जीवनाची योग्य मार्गाने प्रगती व विकास होतो त्याचे आचरण करणे म्हणजे धर्म होय. जो सदाचारी, नीती, इ. वर टिकून आहे तो आहे धर्म.

जैन सैद्धांतिक दृष्टीने वस्तुच्या स्वभावाला धर्म म्हटले जाते. आत्म्याचा स्वभाव सत्-चित् आनंदरूप आहे. आणि हे धर्माने प्राप्त होते. तात्पर्य हे की, बहिर्भावापन्न जीव धर्माच्या अवलंबनाने स्वभावात येतो. तो विभावांचा त्याग करतो. हिंसा, असत्य, भोग,

संग्रह हे विभाव आहेत. यापासून दूर राहणे, अथवा परित्याग करण्याची प्रक्रिया व्रत आहे. त्या दिशेने भावना वाढविणे वैराग्य आहे. अध्यवसाय आचार आहे, सदाचरण आहे. अशाप्रकारे धर्माच्या व्याख्येचे अनेकरूप आहेत. धर्म भावनेच्या चिंतनात अनवरत संलग्न राहिल्याने परिणाम असा होतो की, जीवात्म्या वैभाविक दशा जाऊन स्वाभाविक दशेमध्ये येण्याकडे उन्मुख होतो. विरती, तितिक्षा, स्वाध्याय, तप, ध्यान इ. जे धर्माचे अंगोपांग आहेत त्याचेच क्रियात्मक रूप आहे.

धर्म भावनेने ओतप्रोत झालेला जीव असा अनुभव करतो की धर्मच एकमात्र माझा कल्याण करणारा आहे.

धर्माचा महिमा व उपयोगिता स्वयंसिद्ध करण्याच्या दृष्टीने धर्मभावनेचे चिंतन फार प्रेरणाप्रद आहे. शास्त्रात, विभिन्न ग्रंथामध्ये, विविध रूपाने हे तथ्य स्पष्ट केले आहे. ह्यामुळे पाठकांना, चिंतनशील व्यक्तींना योग्य जीवनमार्ग प्राप्त होऊ शकतो.

अध्यात्मजगतातील परम तेजस्वी महापुरुष आचार्य कुंदकुंदांनी तात्त्विक दृष्टीने याचे विश्लेषण करताना म्हटले आहे-

आत्मविजयामध्ये विश्वास ठेवणारी आचार प्रधान साधनाच मुख्यतः धर्म साधना आहे. जड आणि चेतन यांच्या मिश्रणाचा प्रवाह म्हणजेच संसार आहे. आत्मा अनंत शक्तिवान असूनही सांसारीक स्थितीमध्ये गुरफुटून गेल्यामुळे 'चेतन' आत्मा 'जड' अजीवाच्या आधीन झाला आहे. ह्या आधीनतामुळे सुख-दुःख त्याला जबाबदार आहे. जड चेतनाची ही रासायनिक प्रक्रिया अत्यंत सूक्ष्म आणि जटिल अशी आहे. विज्ञानाच्या आधुनिक विधींनी सुद्धा त्यांची व्याख्या शक्य नाही. जडापासून चेतनाची सुटका करून घेणे म्हणजेच मोक्ष होय. परंतु 'जडाचेबंधन' एकदम सुटणे सहजशक्य नाही. म्हणून जैनधर्मात साधना करण्याचे दोन अंग सांगितले आहेत. मुनिधर्म व गृहस्थ धर्म. ज्यांना क्रमशः अणगारधर्म, व आगार धर्म म्हटले आहे. दिक्षा घेतल्यानंतर मुनिधर्माचे पालन करताना, साधकाने सांसारिक इच्छा व आवश्यकता यापासून मुक्त रहायला पाहिजे. तरीही काही इच्छा अनिच्छापूर्वक लागलेल्याच असतात. ती पूर्ती करण्याचे दायित्व गृहस्थाकडे जाते. गृहस्थ नसेल तर धर्म आधारहीन होऊन जाईल. मुनी साधना जीवित ठेवतो. गृहस्थ त्याला सुरक्षित ठेवतो. म्हणजे गृहस्थाने आपला धर्म व्यवस्थितपणे पाळला तर साधू आपला धर्म व्यवस्थित पाळू शकतात. मुनींना त्यांच्या धर्म साधनेत गृहस्थ सहायक आहे, आधारस्तंभ आहे. म्हणूनच म्हणतात- ''न धर्मो धार्मिक बिना'', धर्म विश्वाला धारण

करतो, परंतु धर्माला धारण करतो धार्मिक, धर्माची बासुरी गृहस्थाच्या वेळूनेच वाजते.[४४९]

परंतु आज धर्माच्या नावाखाली धर्मान्धता वाढत आहे. धर्म तर अमृतासमान आहे. परंतु धर्मान्धता विष आहे. धर्मरूपी अमृताला ग्रहण करण्यासाठी धर्माच्या खऱ्या स्वरूपाला समजणे आवश्यक आहे. धर्मान्धता रूपी विषापासून वाचण्यासाठी त्यातील दुर्गुण व दुष्परिणामांना समजणे तितकेच आवश्यक आहे.

माणसाने जर धर्माच्या वास्तविक स्वरूपाला समजून घेतले आणि आपल्या हृदयात धारण केले तर निश्चितच कालांतराने शाश्वत सुख प्राप्त करू शकतो.[४५०]

धर्म केव्हापासून ?

"दुग्ध के साथ धवलता कब से चली आ रही है ?
अग्नि के साथ उष्णता का संबंध कब से है ?"

याचे उत्तर - जेव्हापासून दूध आहे तेव्हापासूनच त्याची धवलता आहे. जेव्हपासून अग्नी आहे तेव्हापासून त्याच्याबरोबर उष्णतेचा संबंध आहे. त्याचप्रमाणे जेव्हापासून भूमी, जल, अग्नी, वायू, प्राणी समूह व जड तत्वांचे आस्तित्व आहे तेव्हापासून धर्म आणि संस्कृती चालत आलेली आहे.

पृथ्वी इ. मूळ तत्त्व अनादी कालापासून आस्तित्वात आहेत अनंतकाळ आस्तित्वात राहतील. धर्म व संस्कृतीच्या स्वरूपाचे क्षेत्रकाळच्या दृष्टीने ऱ्हास उत्थान होत राहतो. परंतु संपूर्ण अभाव होणे शक्य नाही.[४५१]

'नमोत्थुणं'मध्ये धर्मभावना आहे.[४५२] धम्मदेसीयाणं पासून धम्मसारहीनं, हे अरिहंत प्रभू! आपणच सर्वोत्कृष्ट मंगलमय धर्माचे प्रर्वर्तक आहात. धर्माचा उपदेश देणारे आहात. धर्माचे नायक आहात. धर्माचे सारथी आहात. धर्माशिवाय कोणालाच कधीच सुख मिळणार नाही. खरा धर्मच आत्मधर्म आहे. आपण आमच्यावर कृपाकरून असा धर्म दाखवला आहे. शाश्वत सुखाचा मार्ग प्रशस्त करून दिला आहे. हे आमच्यावर आपले अनंत उपकार आहेत.

अरिहंत प्रभू संसारात राहून संसाराचे भीषण दुःख जन्म मरण आहे ते पूर्णपणे नष्ट करण्याची औषधी शोधून काढली. त्याचे सेवन करून, आराधना करून, अनंत अव्याबाध आत्मिक सुख प्राप्त केले. आणि नंतर त्या औषधीचा उपयोग सर्व जीवांच्या कल्याणासाठी उपदेश रूपाने वाटला. असे आस्रवरहित महायोगात्मक परम निर्जराचे कारण

रूप आणि अती कल्याणरूप धर्म प्रसार केला, उपदेश दिला. म्हणूनच तर आपणच धर्माचे खरे नायक आहात.

संसाररूपी प्रज्वलित अग्नीला शांत करून, निस्वार्थ करुणार्द्र होऊन धर्म रूपी मेघाच्या धारा प्रवाहीत केल्या. तो धर्म देशविरती आणि सर्वविरती. अशा दोन प्रकारचा आहे.

गृहस्थावस्थेमध्ये सुद्धा धर्मप्राप्तीचा लाभ चांगल्या तऱ्हेने प्राप्त होऊ शकतो. गृहस्थावस्थेमध्ये सुद्धा यथार्थ पुरुषार्थ केला तर याच काळात, याच क्षेत्रात एक भव अवतारी बनू शकतो. अशाप्रकारे संसारसागरातून तारणारे सद्धर्माचा उपदेश देणारे, ज्ञानी पुरुषांनी भव्य जीवांच्या हृदयांधकारात प्रकाश पसरविला आहे.

आत्मविकासाचे मर्म प्रकट करणारे, कर्माचा संहार करणारे धर्मरूपी चन्द्र सतत शीतलता पसरवितात.

कुंदकुंदाचार्य द्वारा लिखित वारसाणुवेक्खामध्ये ६८ व्या गाथापासून ८२ व्या गाथेपर्यंत धर्मानुप्रेक्षेचे वर्णन केले आहे. धर्माचे दोन प्रकार - १) सागार धर्म २) अणगार धर्म. सागारधर्म म्हणजे गृहस्थधर्म आणि अणगारधर्म म्हणजे मुनिधर्म. संस्कृतमध्ये अगार, आगार दोन्ही शब्द गृहवाचक आहेत.

गृह घरात अर्थात गृहस्थावस्थेत पालन केल्या जाणाऱ्या धर्मास सागारधर्म म्हटले जाते. मुनी तर गृहत्यागी असतात. म्हणून त्यांचा धर्म अणगार धर्म आहे. संस्कृतातील अनगार शब्दाचे प्राकृत रूप अणगार आहे. प्राकृतमध्ये 'न' चा 'ण' होतो.

१. दर्शन, २) व्रत, ३) सामायिक, ४) पौषध ५) सचितत्याग ६) रात्रीभोजन त्याग ७) ब्रह्मचर्य ८) आरंभत्याग ९) परिग्रह त्याग १०) अनुमति त्याग ११) उद्दिष्ट त्याग. हे सागार धर्माचे अकरा भेद आहेत. यांनाच श्रावकाच्या "अकरा प्रतिमा" म्हटले जाते.

जेव्हा सम्यक्दृष्टी व्यक्तीला ज्ञान आणि विरती वैराग्याची शक्ती, आत्मोत्साह प्राप्त होतो तेव्हा संमयाचा अंश मात्र तरी प्रकट झाल्याशिवाय रहात नाही. अर्थात ते यत् किंचित रूपात का असेना प्रकट होतेच. जेव्हा त्याला बाह्य रूपाने नियम अथवा प्रतिज्ञा द्वारा परिबद्ध केले जाते तेव्हा त्यास प्रतिमा म्हटले जाते. प्राकृतामध्ये पडिमा आणि संस्कृतात 'प्रतिमा' म्हणतात.

वरील अकरा प्रतिमा दिगंबर परंपरानुसार मान्य आहेत. श्वेतांबर परंपरेमध्ये खालील प्रतिमा आहेत -

१) दर्शन २) व्रत ३) सामायिक ४) पौषध ५) कायोत्सर्ग ६) ब्रह्मचर्य ७) सचित्ताहार वर्जन ८) स्वयं आरंभ वर्जन ९) भृतकप्रेष्य आरंभ वर्जन १०) उद्दिष्ट वर्जन ११) श्रमणभूत प्रतिमा.

श्वेताबर तथा दिगंबर परंपरातील प्रतिमांची तुलना

१) दर्शन प्रतिमा - प्रथम प्रतिमाचे नाव दोन्ही परंपरामध्ये एकच आहे. त्याचा संबंध सम्यक्दर्शनाशी आहे. वास्तविक एक जैन उपासक सम्यक्दृष्टी असतो. परंतु या प्रतिमामुळे तो सम्यक् दर्शन किंवा सम्यक्दृष्टीची विशिष्ट आराधना करतो. त्यात अत्यंत स्थिरता येण्यासाठी देव, गुरू, धर्मावर आपली आस्था अत्यंत दृढ करतो. आणि त्या दृष्टीनेच चिंतन, मनन करतो. सम्यक्त्वमध्ये अतिचार लागत नाही. तो शंका, संदेह, आकांक्षा, अनुचित अभिप्सा इ. ने बद्ध होत नाही. तो आपल्या धार्मिक विश्वासात इतका दृढ असतो की वेगवेगळ्या धर्मसंप्रदाय, मतमतांतराना जाणण्यापुरते जाणतो पण तिकडे आकृष्ट होत नाही. आपली निष्ठा खूपच निर्मळ, स्वच्छ, दृढ ठेवतो. दर्शन प्रतिमाच्या आराधनेचा काळ एकमहिना स्वीकृत आहे.

२) व्रतप्रतिमा - दर्शन प्रतिमाची आराधना केल्यानंतर उपासक व्रत प्रतिमाचा स्वीकार करतो. त्यात पाच अणुव्रत, तीन गुणव्रत, चार शिक्षाव्रत यांचा स्वीकार करतो.

या वारा व्रतामध्ये सामायिक आणि देशावकासचा यथाविधी पूर्णपणे पालन करू शकत नाही. तो करुणा, अनुकंपा इ. गुणांनी युक्त असतो.

या प्रतिमेचा कालावधी दोन महिने असतो.

३) सामायिक प्रतिमा - सम्यग्दर्शन व व्रतांच्या साधनेत अग्रसर श्रावक रोज सकाळी, दुपारी व संध्याकाळी तीन काल (त्रिकाल) सामायिक करतो. सामायिकाच्या बरोबर देशावकासिक व्रताचे सुद्धा चांगल्याप्रकारे पालन करतो. तो सामायिक व्रताच्या उपासनेत तन्मय एवं जागरुक राहण्याचा प्रयत्न करतो. सामायिक प्रतिमाचा कालावधी तीन महिने आहे.

४) पौषधोपवास प्रतिमा - प्रथम, द्वितीय, तृतीय प्रतिमा द्वारा उत्तरोत्तर प्रगती करता-करता उपासक पौषधोपवास प्रतिमेचा स्वीकार करतो. तो अष्टमी, चतुर्दशी, इ.

पर्व, तिथीला उपवास युक्त पौषधाचे पूर्णपणे पालन करतो. हे आत्मोन्मुखताच्या दृष्टीने खूप योग्य मार्ग आहे.

या आराधनेचा कालावधी चार महिन्याचा आहे. इथे हे जाणणे आवश्यक आहे की, ज्या प्रतिमेत साधक आराधनाशील असतो. तेव्हा दुसऱ्या (अन्य) प्रतिमेचे नियम सहजत पालन करण्या योग्य आहेत अर्थात चौथी प्रतिमेचा आराधक असेल तर तो दुसरी तिसरी प्रतिमांच्या नियमांचे सहजपणे पालन करील. परंतु चौथी प्रतिमेच्या नियमांची आराधना विशेष रूपाने करतो.

५) कायोत्सर्ग प्रतिमा - श्वेतांबर परंपरामध्ये पाचवी कायोत्सर्ग प्रतिमा आहे. कायोत्सर्ग शब्द काय+उत्सर्ग असा बनला आहे. काय म्हणजे शरीर, उत्सर्ग म्हणजे त्याग. जोपर्यंत आयुष्य आहे तो पर्यंत शरीर राहणारच. त्याचा त्याग शक्य नाही. इथे त्यागाचा अर्थ आहे. शरीरावर असलेल्या ममत्वभावाचा त्याग करणे. कायोत्सर्गात उपासक शरीर, वस्त्र इ. बाह्य पदार्थावरील लक्ष काढून आत्म्याकडे अभिमुख होतो. अष्टमी, चतुर्दशीच्या दिवशी कायोत्सर्ग, ध्यान करतो. या प्रतिमेत रात्री भोजन त्याज्य आहे. दिवसा ब्रह्मचर्य व्रताचे पालन केले जाते. रात्रीमध्ये अब्रह्मचर्यचा परिणाम केला जातो. कायोत्सर्ग प्रतिमाचा कालावधी एक दिवस, दोन दिवस अथवा तीन दिवसापासून पाच महिन्यापर्यंतचा आहे.

दिगंबर परंपरेत पाचवी सचित्त त्याग प्रतिमा आहे. त्यात सचित पाणी तसेच हिरवी वनस्पतीच्या विराधनेचे परिवर्जन करावे.

६) ब्रह्मचर्य प्रतिमा - श्वेताबंर परंपरेत सहावी प्रतिमा ब्रह्मचर्य आहे. यात ब्रह्मचर्याचे पूर्णपणे पालन केले जाते. स्त्रियांशी अनावश्यक संपर्क, वार्तालाप त्यांचे श्रृंगार, विलासादीचे अवलोकन करणे पूर्णतः वर्ज्य आहे. उपासकाने स्वतः सुद्धा शृंगार करणे, बाह्य प्रदर्शनयुक्त वेशभूषा इ. पासून दूर रहावे. या प्रतिमेत उपासक सचित आहाराचा प्रत्याख्यान करीत नाही. परंतु कारणवश सचित आहार सेवन करू शकतो. या प्रतिमेच्या आराधकाचा कालावधी कमीतकमी एक दिवस, दोन दिवस, तीन दिवस, जास्तीत जास्त सहा महिने पर्यंतची असते. यात आजीवन ब्रह्मचर्य पालनाचा पण संकेत आहे.

दिगंबर परंपरेत रात्री भोजन त्याग, सहावी प्रतिमा आहे. यात रात्रीचे भोजन करणे तसेच रात्री शिजवलेले अन्न सेवन करण्याचा निषेध आहे. तसेच कुशील सेवनाचा परित्याग सांगितला आहे.

७) सचित्ताहार वर्जन - श्वेतांबर परंपरेत सातवी सचित्ताहार वर्जन प्रतिमा

आहे. या प्रतिमेत उपासक ब्रह्मचर्याचे पूर्णतः पालन करतो तसेच सचित्ताहाराचा सर्वथा प्रव्याख्यान करतो. यात आरंभाचा प्रव्याख्यान नसतो. या प्रतिमेचा आराधना कालावधी उत्कृष्ट सात महिन्याचा आहे.

दिगंबर परंपरेत सातवी ब्रह्मचर्य प्रतिमा आहे. यात सर्वथाप्रकारे अतिउत्कृष्टपणे ब्रह्मचर्याचे पालन केले जाते. कामवासनेचा सर्वथा परित्याग करण्याचा प्रयास केला जातो.

८) **स्वयं आरंभ वर्जन प्रतिमा** - या प्रतिमेत साधक स्वतः आरंभ समारंभ किंवा हिंसा कार्य करीत नाही. यात एवढाच अपवाद आहे की आजीविका चालवण्याच्यासाठी इतरांकडून आरंभ करू शकतो. तसे करायला लावण्याचा त्याला त्याग नसतो. या प्रकारच्या आराधनेचा कालावधी कमीत कमी एक, दोन किंवा तीन दिवस अथवा जास्तीत जास्त आठ महिन्याचा आहे.

दिगंबर परंपरेत सुद्धा या प्रतिमेत आरंभ त्यागाचे विधान आहे. उपासक घर गृहस्थीचे सर्व कार्य सोडून देतो.

९) **भृतकप्रेष्यारंभ वर्जन प्रतिमा** - उपासक या प्रतिमेत स्वतः आरंभ करीत नाही. नोकर, सेवक इ. कडून आपल्यासाठी आरंभ समारंभ करवून घेत नाही. परंतु अन्य कोणाला आरंभ करण्याची अनुमती देण्याचे प्रत्याख्यान नसते. तो आराधनेचा कालावधी कमीतकमी एक-दोन-तीन दिवस त्या जास्तीत जास्त नऊ महिनेपर्यंतचा असतो.

दिगंबर परंपरेत या प्रतिमेत साधक आवास दृष्टीने स्वतःला अगदी संकुचित करून टाकतो. एकांतामध्ये राहण्याचाच प्रयत्न करतो. घरातल्या पुढच्या भागात सुद्धा येऊन बसत नाही. घरात एकांतात आपली साधना करीत राहतो.

१०) **उद्देश्य त्याग प्रतिमा** - उपासक यात आपल्या निमित्ताने बनवलेल्या भोजनाचा परित्याग करतो. तो आपल्या स्वतःला सांसारिक कार्यापासून दूर ठेवतो. तो कोणत्याही लौकिक कार्याची आज्ञा अथवा समंती पण देत नाही. कोणी विचारले तर अगदी मोजक्या शब्दात उत्तर देतो. या प्रतिमेत साधक वस्ताऱ्याने केस कापतो. कोणी शिखा (शेंडी) ठेवतात.

या आराधनेचा कालावधी एक-दोन-तीन दिवस किंवा जास्तीत जास्त १० महिने असतो.

दिगंबर परंपरेत ही प्रतिमा जवळजवळ वरील प्रमाणेच आहे.

११) **श्रमणभूत प्रतिमा** - सर्व प्रतिमामध्ये विधान आहे की वरील सर्व प्रतिमांचे पालन करणारा साधक आपले जीवन श्रमण किंवा साधूप्रमाणे व्यतीत करतो. तो साधुप्रमाणेच सर्व क्रिया यत्नापूर्वक करतो. डोक्याचे केस वस्ताऱ्याने किंवा सहनशीलता, क्षमता असेल तर केसांचे लोचन (हाताने केस उपटून) करतो.

साधुप्रमाणे तो भिक्षा मागून उदरनिर्वाह करतो. भिक्षा मागण्यात साधूमध्ये व साधकामध्ये फरक आहे. साधू कोणच्याही घरी भिक्षेसाठी जाऊ शकतात. परंतु श्रमणभूत प्रतिमाधारी उपासक आपल्या कुटुंबातील लोकांच्या घरीच भिक्षेसाठी जातो. कारण त्याचे रागमय संबंध पूर्णपणे नष्ट झालेले नाहीत. किंवा लज्जा परिषह त्याने पूर्णपणे जिंकलेले नसते.

या प्रतिमेचे नाव श्रमणभूत यासाठीच आहे. कारण उपासक त्यात पूर्णतः श्रमण नसतो. श्रमण-प्रवज्या स्वीकारलेली नसते. तो फक्त श्रमण-सदृश असतो.

दिगंबर परंपरामध्ये अकरावी अनुदिष्ट आहार प्रतिमा आहे. उपासक, मुद्दाम त्याच्यासाठी तयार केलेला आहार घेत नाही. याचे दोन भेद आहेत. १) शुल्लक २) ऐलक शुल्लक आणि ऐलक या भूमिकेतून गेल्यानंतरच मुनी दिक्षा दिली जाते.

भावना आणि प्रतिमा यात सामंजस्य - आपण जर बारकाईने विचार केला तर प्रतिमांच्या आराधनेचा क्रमयुक्त विकास, विशिष्ट प्रकारच्या अभ्यासाशी संबंधित आहे. या अभ्यासामागे भावना अथवा अनुप्रेक्षाचे अत्यंत महत्त्व आहे. आपण पहिली प्रतिमा, दर्शन-प्रतिमाचे उदा. पाहू या. आत्मोत्थानचे मूळ सम्यक्त्व आहे. हे प्राप्त करण्यासाठी भावनेचा अभ्यास करण्याची नितांत आवश्यकता आहे. म्हणूनच बोधीदुर्लभच्या दृष्टीने १२ भावनात याच्या चिंतनाला महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. बोधी प्राप्त होणे किती दुर्लभ व कठीण आहे त्याचे महत्त्व गौरव जेव्हा मानवाला समजते तेव्हा त्याच्या मनात एक आंदोलन सुरू होते. तो विचारमग्न होतो की आपले हे अमूल्य जीवन व्यर्थ व्यतीत होऊ नये. त्याची बहिर्मुखी दृष्टी अंतर्मुखी बनते. त्याची मिथ्यात्वाची ग्रंथी शिथिल सैल होते. आत्मज्योतीचा आभास होऊ लागतो. दृष्टीत परिवर्तन होऊ लागते. असत्याकडे झुकलेला अंतरभाव सत्याशी जोडला जातो. खऱ्या अर्थाने धर्माच्या स्वरूपावर गाढ श्रद्धा बसते. वीतराग महापुरुषाबद्दल श्रद्धा निर्माण होते. पूज्यत्व भाव जागृत होतो.

धर्माचा मार्ग दाखवणाऱ्या महापुरुषाबद्दल, वीतरागी महापुरुषाबद्दल, गुरुत्वभाव त्याच्या अंतःकरणात निर्माण होतो.

त्याला समजू लागले की, आत्मरूपाने मी एकटा आहे. हीच ती एकत्वभावना एकत्वभावनेने अनुप्रणित झाल्याने बाह्य भौतिक पदार्थांपासून दूर राहतो.

स्वजन, नातलग, पारिवारिक संबंध इ.शी जुडलेला मोह कमी होऊ लागतो. आत्मा आपला खरा सहयोगी आहे बाकी सर्व स्वार्थ, ममत्वाचे संबंध आहे ही खरी समज त्याच्यात जागृत होते. हा उज्ज्वल भाव पुढे अधिक प्रगतीशील होऊ लागतो. संसाराचा सूक्ष्मपणे विचार करताना त्याच्या लक्षात येते की या विशाल जगात त्याचे स्वतःचे स्थान कितीसे ? लोकभावनेच्या लहरी त्याच्या हृदयात तरंगित होतात. जेव्हा तो आपल्या (आत्म्याच्या) स्वभावात येण्याच्या दिशेने प्रयत्न करू लागतो तेव्हा कर्माच्या संबंधाना समजण्याची शक्ती जागृत होते. आत्म्याकडे येणाऱ्या कर्मप्रवाहाना जेव्हा जागृतपणे पाहतो तेव्हा या कर्माचे परिणाम किती दुःखदायी आहेत ही समज त्याला येते. संसारीक सुख नव्हे सुखाभास आहे याची त्याला जाणीव होते. अशा सुखाचा अतं दुःखरूपात होतो हे ही तो समजतो.

आत्मभावनाचे चिंतन त्याच्या अंतरंगात स्फुरित होतात. मग तो विचार करू लागतो या कर्मप्रवाहाला थांबवायला पाहिजे. अशा प्रकारच्या चिंतनाला संवर आराधना म्हणतात.

व्रत प्रतिमा तथा उत्तरवर्ती असत्वर्जन मूलक प्रतिमा अशा भावनेशी निगडित आहेत. जोपर्यंत अंतःकरण संवर भावनेने सिंचित होत नाही तो पर्यंत या प्रतिमा सिद्ध होऊ शकत नाहीत. जरा पुढे जाऊन पाहू. निर्जरा भावना काय आहे ? आत्म्यावर येणाऱ्या कर्माच्या काळीमेला संवराद्वारे संवरित करून आत्माचा परिष्कार परिमार्जन सम्मार्जन करण्याच्या दृष्टीने संचित कर्माचे निर्जरण करण्याची आवश्यकता असते. त्यासाठी मनात तसे भाव निर्माण होणे जरूरीचे असते. ज्यामुळे तपाचरण करण्याची प्रेरणा मिळू शकते. कारण तपाशिवाय आत्म्याला चिकटलेले, आत्म्यात एकरूप झालेले कर्म, कर्माचे थरचे थर दूर करण्यात समर्थ होत नाही.

निर्जराभावना, आत्मशक्ती ऊर्जा जागृत करते. ती आत्म्यातील सुप्त पराक्रम जागृत करते. त्यामुळे कठीण, दुस्तर, तपपूर्ण क्रिया प्रक्रिया साधण्याचे सामर्थ्य उत्पन्न होते. हे भावनात्मक तथा प्रतिमा मूलक उपक्रम ज्यात अभ्यास आणि चर्चा यांचा समन्वय आहे; जीवनाला धर्ममय करतात. धर्मभावनेला यामुळे मोठा आधार मिळतो. वास्तविक धर्मच जीवनातील खरे धन आहे. वैभव आहे. बाह्य वैभवाच्या भ्रांतीमध्ये अडकल्यामुळे

मानव आपले आध्यात्मिक वैभव व धन विसरत गेला तो खऱ्या सुखापासून वंचित होत गेला. याचे कारण अज्ञान व अश्रद्धा होय. यापासून जागृत होण्यासाठी भावना व अनुप्रेक्षाचे असाधारण महत्त्व आहे.

मुनी धर्म - अकरा प्रतिमांची आराधना करणारा साधक अंतःकरणात उत्तम क्षमा, उत्तम मार्दव, उत्तम, आर्जव, उत्तम सत्य, उत्तम शौच्या, उत्तम तप, उत्तम त्याग, उत्तम अकिंचन्य आणि उत्तम ब्रह्मचर्य या दहा धर्माने युक्त मुनी-धर्माचा स्वीकार करतो. ह्याला दशलक्षण मुनीधर्म म्हणतात.

दश लक्षण मुनीधर्म

१) क्षमा - उत्तम क्षमाचा अर्थ, क्षमेचे श्रेष्ठतम रूप, हा उत्तम शब्द केवळ चांगले किंवा श्रेष्ठ अर्थापर्यंत मर्यादित नाही. त्याचा उत्कृष्टतम असा अर्थ आहे. क्षमा उत्तम तेव्हा होते जेव्हा कठोराहून कठोर, दुःखदाहून दुःखद व्यवहार करणाऱ्याशी पण आपल्या मनात त्याच्याबद्दल किंचितमात्र सुद्धा रोष निर्माण होत नाही. विक्षोभ होत नाही. उत्तेजित होत नाही. असे वाटत सुद्धा नाही की आपल्याला दुसह्य बोल बोलले आहेत. हे क्षमेचे लक्षण आहे.

२) मार्दव - श्रेष्ठ कुल, सुंदर रूप, उच्च जाती, तीव्र बुद्धी, दुष्कर तप, उज्ज्वल ज्ञान व शील इत्यादींचा ज्याला यत्किंचित गर्व नाही. ते या उत्तम मार्दवाचे अधिकारी आहेत.

३) आर्जव - ज्यांचे हृदय पूर्णपणे निर्मल, निर्विकार असते, जरा पण कुटिलता ज्याच्यांत नसेत, त्यास आर्जव धर्म आहे असे म्हणावे.

४) सत्य - सत्याचे पालन करण्यासाठी कुठेही केव्हाही संताप निर्माण होईल असे वचन न बोलता मुनी स्व-पर हित याचे भान ठेवून संभाषण करतात.

५) शौच - शौच याचा अर्थ आहे सुचिता, पवित्रता. परंतु प्रत्यक्षात बाह्य स्वच्छता प्रक्षालनाने ही पवित्रता सिद्ध होत नाही. आकांक्षेपासून निवृत्ती आणि वैराग्य भाव याने जो संपन्न असतो त्यासच शौचता पवित्रता प्राप्त होऊ शकते.

इच्छेचा पूर्णपणे निरोध करून अंतरात्मा निराकांक्ष अथवा उज्ज्वल होऊन जाणे. चित्त वैराग्य भावनेने आप्लावित होऊन जाणे म्हणजेच सुचिता.

६) संयम - व्रत व समितींचे परिपालन, दण्ड, त्याग हिंसादी आत्म्याला विकृत

करणाऱ्या अवगुणांचा त्याग इंद्रिय-जय यात आत्मा परिणत व्हावा. याचेचे अनुकरण करणे. संयम धर्म आहे. तात्पर्य हे आहे की, बाह्य परिवेशात संयम नाही. आत्मभावाच्या परिणमनात व स्वभावानुगत होण्यात संयम आहे.

७) **तप** - भोग-उपभोग, वासना, कषाय-क्रोध, मान माया, लोभ यांचा निग्रह करून त्यापासून अलिप्त राहणे. स्वाध्यायात अनुरक्त राहणे, आत्मभावात अनुभावित राहणे याने तपधर्म सिद्ध होतो.

कुंदकुंदाचार्यांनी तपाचे विश्लेषण जे केले आहे ते फारच महत्त्वपूर्ण आहे. सामान्यतः आपण बाह्य तपालाच फार महत्त्व देतो. आत्म्याला चिकटलेले जे विकार आहेत त्यांना दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्नच करीत नाही, म्हणून तप म्हणजे बाह्यरूपाने दिसणारे. बाह्यक्रियातून व्यक्त होणाऱ्या तपाला तप म्हणून जाणतो. तपाचे हे स्वरूप फार सीमित आहे. जे क्रोध इ. कषायांना न जिंकता फक्त शरीराने तप करतो असा घोर तपस्वी वास्तविक तपस्वी नाही.

कुंदकुंदाचार्यांच्या कथनानुसार आत्मविकारकभावानावर अंकुश ठेवणे खरे तप आहे. आणि असे आंतरीक तप करण्यासाठी ध्यान व स्वाध्यायाची बैठक असणे अतिशय आवश्यक आहे. त्यात भावनेचे पण फार महत्त्व आहे.

''जो भावइ अप्पाणं'' त्यांचे हे शब्द फार महत्त्वपूर्ण आहेत. जे आत्म्याला भावित करतात- मी आत्मा आहे, अजीव (जड) नाही. या भावनेस दुसऱ्या स्वरूपात आपण एकत्वभावनाचे चिंतन म्हणू शकतो. यानेच तपाची भूमिका अलंकृत होते.

भर्तृहरींचा एक प्रसिद्ध श्लोक आहे -

भोगान भुक्ता वयमेव भुक्ता तपो न तप्तं वयमेव तप्ता ।
कालोन यातो वयमेव याताः तृष्णा न जीर्णा वयमेव जीर्णा''॥[४५४]

अर्थात आपण भोगांना भोगत नाही. भोगांनी आम्हाला भोगले आहे. आम्ही तपाने तापलो नाही. तपाने आम्हाला तापले. समय व्यतीत नाही झाला. आपणच व्यतीत झालो. तृष्णा भोगाची वासना जीर्ण वृद्ध नाही झाल्या. आपण जीर्ण, वृद्ध झालो.

या श्लोकाची दुसरी ओळ फार महत्त्वाची आहे. ही अशा लोकांना उद्देशून सांगितली आहे- जे लोक बाह्यदृष्टीने (शरीराने) घोर तप करतात. उपाशी राहतात. आतापणा घेतात. थंडी सहन करतात. परंतु त्यांच्या वृत्तीमध्ये वैराग्य, तितिक्षा, धैर्य, समत्व आणि निर्वेद नाही. त्यांना तपानेच परितप्त उत्पीडित केले.

लोकात ही गोष्ट प्रसिद्ध आहे की घोर तपस्वी महान क्रोधी असतात. धार्मिक दृष्टीने तपाचा आणि क्रोधाचा सुतराम संबंध नाही. खरं म्हणजे तपस्वीमध्ये प्रशांत भाव असायला हवा. म्हणून आचार्य कुंदकुंद म्हणतात. तपस्वीने प्रथम कषायावर तावा मिळवायला पाहिजे. ध्यानाचा अभ्यास आणि शास्त्रांचा स्वाध्याय करायला पाहिजे. याने मन निर्मल आणि पवित्र होते. वृत्तीमध्ये ऋजुता व मृदुताचा प्रार्दुभाव होतो.

८) **त्याग** - आचार्य कुंदकुंद त्यागा संबंधी लिहितात की, मोहाचा त्याग करून जो निर्वेद भावनेने अनुभावित होतो. त्याचा त्याग धर्म सिद्ध होतो. असे वीतराग प्रभूंनी सांगितले आहे.

याचा अर्थ हाच की कोणती ही वस्तू सोडून देणे म्हणजे त्याग नव्हे. त्या वस्तूबद्दल मनात जो ममत्व भाव, आसक्ती असते, वस्तू माझी आहे असे वाटणे त्याला सोडणे म्हणजे त्याग आहे. थोडक्यात कोणत्याही वस्तू पदार्थ व्यक्ती इ. बद्दल मनात जी आसक्ती घर करून राहते त्या भावाचे परिमार्जन म्हणजे त्याग होय. चेतन, अचेतन सर्व प्रकारच्या परिग्रहापासून निवृत्त होणे, अनासक्त होणे म्हणजे त्याग आहे जे आपलेच आहे त्याचा त्याग होत नाही. म्हणजे आत्मा चेतन्य आहे तोच आपला आहे त्याचा त्याग कसा ? चैतन्य आत्म्याचा गुण आहे. आत्मा अचेतन कधी होऊच शकत नाही. त्या आत्म्याचा त्याग कसा होणार ? जी पर वस्तू आहे आपली नाहीच त्याला काय सोडायचे ज्याच्याशी आपला संबंधच नाही. म्हणजे आपण वस्तूला सोडू शकत नाही. कारण ती आपल्यात संमिश्र झालेली नाही. त्यागवस्तुत नाही. भावनेत आहे. रागात्मक (मोह) बुद्धीने वस्तू ग्रहण करून ठेवली आहे. त्या बुद्धीचे परिवर्जन करणे त्याग आहे. कोणत्याही वस्तूशी जो तादात्म्य भाव जोडतो त्याचा त्याग करायचा. स्वला स्व समजणे, वस्तूला वस्तू समजणे, मी वस्तू नाही. वस्तू माझी नाही. मी आत्मा आहे. चेतन आहे. वस्तू पौदगलिक अचेतन आहे. जड आहे. त्या वस्तूंशी माझा रागात्मक भाव, (मोहात्मक भाव) कशासाठी ? अशा प्रकारच्या भावनेचा अभ्यास केल्याने खऱ्या अर्थाने त्याग होतो.

९) **अकिंचन्यम्** - या भावनेचा संबंध समस्त परिग्रहाच्या त्यागाशी आहे. ज्याच्याजवळ काही असते तो किंचन, अकिंचन त्याच्या उलट आहे. नास्ति किंचन यस्यस अकिंचनः ज्याच्याजवळ काहीच नसते तो अकिंचन असतो. अकिंचनस्य भावः अकिंचन्यम् अकिंचन्य म्हणजे सर्वथा परिग्रह शून्यता. मुनींना अकिंचन म्हणतात. कारण मुनीजवळ काहीच नसते. आचार्य कुंदकुंद अकिंचन्यचा फार सूक्ष्म अर्थ सांगतात ते

म्हणतात- जो मुनी निःसंग आसक्ती रहित होऊन सुखद-दुःखद कर्मजन्य परिणामांना निग्रहित-नियंत्रित करतो. निर्द्वन्द राहतो. त्याचा अकिंचन्य धर्म सिद्ध होतो. मात्र बाह्य पदार्थांना सोडून देण्यामुळे कोणी अकिंचन होऊ शकत नाही. जर पदार्थाशी त्याचे मन गुंतलेले असेल तर तो अकिंचन किंवा अपरिग्रही होऊ शकत नाही.

१०) ब्रह्मचर्य - शेवटी ब्रह्मचर्याचे वर्णन केले आहे. पुढे म्हटले आहे की जो श्रावक धर्माच्या पुढे जाऊन मुनीधर्मात यति धर्मात प्रवृत्त होतो त्यामुळे त्यास मोक्षाची अवश्य प्राप्ती होते. असेच सतत चिंतन करावे.

निश्चयनयाच्या दृष्टीने जीव-सागर धर्म-गृहस्थ धर्म व अणगार धर्म मुनी धर्माहून सर्वथा भिन्न अहे. दोन्ही धर्मात माध्यस्थ भाव ठेवून आत्म्याचे चिंतन करावे.

आचार्य कुंदकुंदांच्या मतानुसार शुद्ध आत्मभावाचे चिंतन करणे हाच खरा धर्म आहे. ते- 'वत्थु सहावो धम्मो' वस्तुच्या स्वभावाला धर्म म्हणतात. या सिद्धांतावर विश्वास ठेवला आहे म्हणून ते शुद्ध आत्म स्वरूपाबद्दल असे म्हणतात. गृहस्थधर्म आणि मुनीधर्म व्यावहारीक आहेत. हे सिद्ध होते. कारण या धर्माचा बाह्यजीवनाशी संबंध आहे. म्हणून आचार्य कुंदकुंद पुढे असेही म्हणतात की या दोन्ही धर्मावद्दल माध्यस्थ भाव ठेवला पाहिजे.

दोन्ही धर्मावद्दल माध्यस्थ भाव ठेवण्यामागे आचार्य कुंदकुंदाचा उद्देश्य आहे की 'मी श्रमणोपासक आहे', 'अमुक व्यक्ती महाव्रताराधक आहेत' इ. मध्ये थोडीशी सुद्धा आसक्ति ठेवू नये. मध्यस्थ किंवा उदासीन रहावे. यामुळे आत्म्याच्या शुद्ध स्वरूपात रमण करण्यास समर्थ बनू शकाल.

कार्तिकेयानुप्रेक्षामध्ये श्लोक ३०२ ते ४९१ पर्यंत धर्मानुप्रेक्षाचे वर्णन आहे. स्वामी कार्तिकेयांनी धर्म भावनेच्या सुरवातीला धर्माचे मूळ उपदेष्टा वीतरागदेवाचे स्वरूप वर्णन करताना म्हटले आहे की, जो त्रिकालवर्ती वर्तमान, भूत, भविष्य काळाशी संबद्ध, प्रयोजन मुक्त संपूर्ण लोकालोक प्रत्यक्ष पाहतात. ते सर्वज्ञ प्रभू होय. जर ते नसते तर अतिन्द्रिय अर्थात इंद्रिय द्वारा अज्ञ पदार्थांना कोणी जाणले असते ? कारण इंद्रियजन्य ज्ञान तर समस्त स्थूल पर्यायांना सुद्धा जाणू शकत नाही. मग सूक्ष्म पर्यायांना जाणणे अशक्यच !

या श्लोकात टीकाकार आचार्य शुभचंद्रांनी सर्वज्ञवादाची चर्चा केली आहे. त्यांनी लिहिले आहे, चार्वाक व मीमांसक सर्वज्ञांचे आस्तित्व स्वीकार करीत नाहीत. चार्वाकाच्या मतानुसार तर जे इंद्रियांना दिसते तेवढेच सत्य आहे प्रमाण आहे. ज्यांना आपण आपल्या इंद्रियांनी पाहू शकत नाही अशी कोणती वस्तूच नाही. चार्वाकचे म्हणणे आहे की सर्वज्ञ

इंद्रियांना ज्ञात होत नाही म्हणून त्याचे आस्तित्वच नाही. मीमांसक प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, शब्द, अर्थोत्पत्ति व अभाव हे सहा प्रमाण मानतात. यातील पहिले पाच प्रमाण वस्तुचा सद्भाव व आस्तित्वाला मानतात. जे ह्या पाच प्रमाणाने सिद्ध होत नाही. मग तो पदार्थच आस्तित्वात नाही. असे मानतात. त्यांच्या दृष्टीने सर्वज्ञ या पाच तत्वात बसत नाही. म्हणून सर्वज्ञ त्यांना मान्य नाही. याचे समाधान करताना टीकाकार लिहितात - संसारात असे अनेक पदार्थ आहेत जे माहित नाहीत. म्हणून काय त्यांचे आस्तित्वच नाही काय ? उदा. सूक्ष्मपरमाणू ज्यांना आपण डोळ्यांनी पाहू शकत नाही. अंतरीत पदार्थ, ज्या पदार्थांवर आवरण असेल तर तेही डोळ्यांनी दिसणार नाही. सुमेरु पर्वत जो अत्यंत दूरवर आहे. सामान्य व्यक्ती त्याला पाहू शकणार नाही. असे कित्येक पदार्थ इंद्रियगम्य नाहीत. जर सर्वज्ञ नसते तर आपल्या इंद्रियाने आपण पाहिले नसते- आणि त्याबद्दलची माहिती आपल्यापर्यंत पोहोचलीच नसती. सर्वज्ञांनी पाहिल्यामुळेच बुद्धिगम्य झाली. आणि सर्वज्ञता पण त्यामुळेच सिद्ध झाली. अशाप्रकारे टीकाकारांनी सर्वज्ञवादाचे दार्शनिक पद्धतीने टीका केली आहे. इतके वर्णन केल्यानंतर ग्रंथकारांनी श्रावकधर्म व मुनिधर्माची चर्चा केली आहे.

सम्यक्दर्शनाचे २५ दोष वर्णित केले आहेत. सम्यक्त्व, नरक, तिर्यंच. मनुष्य आणि देवगती या चारांना प्राप्त होऊ शकते. परंतु त्यासाठी नियम आहे की, तो भवी जीव असावा, अभविला सम्यक्त्व प्राप्त होऊ शकत नाही. दुसरी गोष्ट अशी की, तो सन्नि (मनसहित) पंचेंद्रिय असावा, कारण असन्नि (मनरहित) प्राण्याला सम्यक्त्व प्राप्त होऊ शकत नाही. तो प्रत्येकक्षणी अनंतगुणी विशुद्धी युक्त असायला हवा. पीतलेश्या, पद्मलेश्या किंवा शुक्ललेश्या यापैकी एक लेश्या त्याच्यात असायला हवी. जो जागृत आहे, निद्रा-निद्रा, प्रचला-प्रचला आणि स्त्यानगृद्धी निद्रा रहित असावा. त्याच्यात सर्व पर्याप्ती पूर्णपणे विकसित असाव्यात. तो ज्ञान व साकार उपयोगाने युक्त असावा, त्याचे जास्तीत जास्त अर्ध पुद्गल परावर्तन काळ बाकी असावे. अशा जीवाला सम्यक्त्व प्राप्त होऊ शकते. पुद्गल परावृत्त म्हणजे एखाद्या जीवाने संसारातील जितके पुद्गल आहेत त्या पुद्गलांना कोणत्या ना कोणत्या रूपात भोगलेले असतात. त्याला पुद्गल परावर्त म्हणतात. असे अनेक अनेक पुद्गल परावर्तामध्ये चक्कर मारून मारून जेव्हा त्यांचे अंतिम पुद्गल परावर्त्ताचा अर्धा भाग बाकी राहतो अशा जीवालाच सम्यक्त्व प्राप्त होऊ शकतो.

यानंतर ग्रंथकार उपशमसम्यक्त्व आणि क्षायिक सम्यक्त्वाचे वर्णन करतात. ते

लिहितात- सात प्रकृतींच्या उपशममुळे उपशम सम्यक्त्वाची प्राप्ती होती. १) मिथ्यात्व, २) सम्यक् मिथ्यात्व, ३) सम्यक्त्व, अनंतानुबंधी ४) क्रोध, ५) मान, ६) माया, ७) लोभ ह्या सात प्रकृती आहेत.

उपशम म्हणजे पूर्णपणे नष्ट होणे नाही. तर कोण्याएका प्रकृतीने आत्म्यात प्रवेश केला तर त्याला उपशांत करायचे (समजपूर्वक) ज्याप्रमाणे पाण्यात तुरटी फिरवली की त्यातील धूळ कण खाली तळाला जाऊन साचतात. त्याचप्रमाणे उपशम सम्यक्त्वामध्ये मिथ्यात्व उपशांत होतो. क्षायिक सम्यक्त्व म्हणजे प्रतिपक्षी कर्म नष्ट झाल्यामुळे आत्म्याचा सम्यक्त्व गुण प्रकट होतो. सम्यक्त्व आत्म्याचा स्वभाव आहे. आत्मा जोपर्यंत कर्माच्या आवरणाखाली दबलेला असतो तोपर्यंत त्याचे खरे स्वरूप सम्यक्त्व प्रकट होऊ शकत नाही. सम्यक्त्वाचा तिसरा भेद आहे- क्षायोपक्षमिक. क्षय आणि उपशमाचे सम्मिलित रूप म्हणजे क्षायोपक्षम आहे. कर्माच्या काही प्रकृतीचा क्षय आणि काहींचा उपशम झाल्यामुळे जे सम्यक्त्व प्राप्त होते त्यास क्षायोपक्षमिक सम्यक्त्व म्हटले जाते. त्यास वेदक सम्यक्त्व पण म्हटले जाते. सम्यक दृष्टी जोपर्यंत व्रत स्वीकार करत नाही तोपर्यंत अव्रत सम्यग्दृष्टी म्हटला जातो. अशा स्थितीत जरी तो भोगात आसक्त राहतो, परंतु त्याला एवढी समज आलेली असते की मी जे हे काही करीत आहे- भोग भोगत आहे ते बरोबर नाही, योग्य नाही. हे मोहनीय कर्माचे चक्र आहे. माझा (आत्म्याचा) हा स्वभाव नाही. हा विपरीत भाव आहे. यापासून अलिप्त रहायला पाहिजे. कर्माच्या वशीभूत असल्यामुळे सम्यक्दृष्टीजीव त्यांचा त्याग करण्यास असमर्थ होतो. आणि त्यामुळे पश्चातापाने दग्ध होतो.

उत्तम व श्रेष्ठ गुणांना जो ग्रहण करतो त्यासाठी सतत प्रयत्नशील राहतो तो खरा उत्तम सम्यक्त्वी. असा गुणग्राहक सम्यक्त्वी जीव- श्रेष्ठ साधुंचा विनय करतो. साधार्मिकांच्या प्रती विनयभाव ठेवतो. साधार्मिक व्यक्तींबद्दल अनुराग, प्रेमभाव ठेवतो. तो सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र, तप इ. अंगिकार करण्यास सतत प्रयत्नशील राहतो. ते प्राप्त करण्यास त्याची आंतरीक रुची जागृत असते. त्याला त्याचे पूर्ण भान आहे की- जीव या देहात रमतो आहे. परंतु तो या देहापासून वेगळा आहे. शरीरापासून कपडे वेगळे असतात त्याचप्रमाणे आत्मा शरीराहून वेगळा आहे. जीव आणि शरीर दूधात पाणी मिसळल्याप्रमाणे एक झाले आहेत. म्हणून अज्ञानी जीव शरीर आणि आत्मा यांना एकच मानतो. परंतु सम्यग्दृष्टी मात्र दोघांचे आस्तित्व भिन्न आहे आहे असेच मानतो. जीवाचा

गुण ज्ञानमय आहे, चेतनामय आहे. शरीरतर पुद्गलांचे बनलेले आहे.

तो वीतरागांना खरे देव मानतो. त्याला पूर्णपणे समजलेले असते की- सर्व प्राणीमात्रावर दया भाव असणे हाच उत्कृष्ट धर्म आहे. तो त्यांनाच आपले गुरू मानतो जे अपरिग्रही आहेत.

ज्याची दृष्टी कुत्सित असते तो मिथ्यादृष्टी राग, मोह, निद्रा विकथा इ. नी युक्त असणाऱ्यांना देव मानतो. यज्ञादिमध्ये होणाऱ्या हिंसेमध्ये धर्म मानतो, जिथे जीवांची हिंसा होते. असत्य, अब्रह्मचर्य, परिग्रहाचे पोषण होते त्यात धर्म मानतो. परंतु सम्यग्दृष्टी निश्चितपणे जाणतो की- कोणी देव देवी आपल्याला धन संपत्ती देऊ शकत नाहीत. सुख किंवा दुःख ही देऊ शकत नाहीत. जीवाचे कर्मच सुख-दुःखाचे कारण आहेत. सांसारीक लोक धनवान बनण्यासाठी देव देवी इ.ची अनेक प्रकारे आळवणी करतात. त्यासाठी योग्य काय अयोग्य काय ? न्याय काय अन्याय काय ? याचे ही त्यांना भान रहात नाही. यालाच मिथ्यादृष्टी म्हणतात. तेही इच्छा करतात की देवांनी त्यांच्या इच्छापूर्तीसाठी मदत करावी.

देवाची पूजा करतात आणि त्याच्यासमोर आपली इच्छा प्रकट करतात. परंतु सम्यक्त्वीला हे चांगल्या प्रकारे माहित आहे की, देव आपल्याला कोणत्याही प्रकारची मदत करू शकत नाही. आणि हे ही तो जाणतो की, धन-संपत्ती, सांसारीक सुख क्षणभुंगर, नश्वर आहेत.

जेव्हा मनुष्य आपला देह त्याग करतो तेव्हा त्याच्या संपत्तीतून काही सुद्धा त्याच्या बरोबर जात नाही. इथेच राहणार आहे. म्हणून तो देव-देवींच्या भ्रमात पडत नाही. तो तर आपल्या आत्म्यात लीन राहून वीतराग प्रभूच्या चरणात शरण घेतो. त्यांनाच देव मानतो. आदर्श मानतो, त्यांनी प्रदर्शित केलेल्या मार्गाचे अनुसरण करून खरी उपासना करतो. संसारातील सुख जे मिळाले आहेत ते संचित पुण्याईमुळे आणि जोपर्यंत पुण्य योग असेल तो पर्यंत ते मिळतात, पुण्य क्षीण झाले की कुठे कसे दूर होतात कळतही नाही. सम्यग्दृष्टी असणाऱ्याचे हे असे चिंतन असते. त्याला माहित आहे की, ज्या जीवाचा, ज्या देशात, ज्यावेळी ज्या विधानानुसार जन्म व मृत्यू जिनेश्वर प्रभू जाणतात त्याचप्रमाणे निश्चित तसेच होणार. यात किंचित मात्र शंका कुशंका नाही. तो हेही जाणतो की- प्रत्येक पर्याय-परिणमनाचा द्रव्य, क्षेत्र, काल तथा भाव निश्चित आहे, ज्या क्षेत्रात ज्या पदार्थाचा परिणाम होणार आहे तसेच होते. त्याला कोणीही परिवर्तित करू शकत

नाही. सर्वज्ञ प्रभू समस्त द्रव्य, क्षेत्र, काल भावयुक्त अवस्थांचे ज्ञाता आहेत. परंतु त्यांचे जाणणे याचा अर्थ असा नाही की प्रत्येक पर्यायाचा द्रव्य, क्षेत्र, काल भाव ते बदलू शकतील. फक्त जसे आहे तसेच ते जाणतात. एवढेच त्यांच्या ज्ञातापणा आहे. सर्वज्ञ प्रभूंनी सांगितले आहे की, प्रत्येक पर्यायात पूर्व पर्यायाचा क्षय होतो. आणि उत्तर पर्यायाचा उत्पाद होतो. पूर्व पर्याय उत्तर पर्यायाचे उपादान-मुख्य कारण आहे. उत्तर पर्याय तत्कारण प्रसूत कार्य आहे.

काही लोक ह्याला नियतीवाद समजतात. म्हणून ते प्रत्येक पर्यायाचा द्रव्य, क्षेत्र, भाव तर निश्चित स्वीकारतात. परंतु काल निश्चित आहे असे मानत नाहीत. कारण नियती (निश्चितपणा)चा स्वीकार केला तर मनुष्याच्या पुरुषार्थ करण्याला काही अर्थच उरणार नाही. परंतु त्यांचे असे हे निरूपण करणे सिद्धांताच्या प्रतिकूल आहे. वास्तविकता अशी आहे की काल अनियत असूच शकत नाही. जर काल अनियत असेल तर काललब्धिचे आस्तित्वच राहणार नाही. अशा प्रकारे जे निश्चितपणे निश्चय नयाच्या आधारे समस्त द्रव्य, समस्त पदार्थांना जाणतात, मानतात ते सम्यक्दृष्टी आहेत. जो यात संदेह करतो तो मिथ्यादृष्यी.

जो ज्ञानावरणीय कर्माच्या प्रबल उदयामुळे सर्वज्ञद्वारा निरूपित जीवादी तत्वांना जाणत नाही. पाहू शकत नाही. परंतु त्यावर विश्वास ठेवतो, श्रद्धा ठेवतो. त्याला हे मान्य आहे की सर्वज्ञ प्रभूंनी वर्णित केलेले जीवादी तत्व अत्यंत सूक्ष्म आहेत, त्याचे कोणत्याही प्रकारे खंडन करणे योग्य नाही. ते जिनेन्द्रप्रभूंची आज्ञारूप आहेत. कारण सर्वज्ञप्रभू अन्यथा, विपरीत कथन करणारच नाहीत. असे जो मानव आज्ञा सम्यक्त्वी आहे. सम्यक्त्वाचा महिमा किती श्रेष्ठ आहे याचे वर्णन करताना ते म्हणतात की सम्यक्त्व समस्त योगात महायोग आहे. सम्यक्त्व समस्त ऋद्धीमध्ये महारिद्धी, उत्तमरिद्धी आहे. समस्त सिद्धी कारक आहे.

सम्यक्त्वाचे पंचवीस गुणांचे विशद रूपात वर्णन केले आहे. त्यात म्हटले आहे की, सर्वज्ञ देव द्वारा भाषित द्वादशांग श्रुत मधील एक अक्षर अथवा पद याबद्दल कोणतीही शंका उत्पन्न करू नये. जिन वचन आणि जैनदर्शनाला सत्य मानणे 'निःशंकित' नामक गुण आहे जो अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

पुढे सांगितले आहे की, सम्यक्त्वी जीव अशा अशुभ कर्माचा बंध करीत नाही ज्यामुळे दुर्गती मध्ये जावे लागेल. परंतु पूर्वीच्या अनेक जन्मातील अशुभ कर्म जे बांधले

आहेत त्यांचा तो क्षय करतो. शास्त्रात वर्णन आहे की, सम्यक्दृष्टी जीव, निकृष्ट सहा नरकात जात नाही- ज्योतिष, व्यंतर व भवनपती देव होत नाही. कोणत्याही गतीत स्त्री रूपात जन्म घेत नाही. तो पाच स्थावर काय मध्ये असन्नि (मनरहित) पंचेन्द्रियात, निगोदच्या जीवात तसेच कुभोग भूमिच्या जीवात नियमतः जन्म घेत नाही.

सम्यक्त्वाच्या वर्णनानंतर ग्रंथकारांनी श्रावकाच्या स्वरूपाचे चित्रण केले आहे. जिनेश्वर देव द्वारा प्ररूपित तत्वांना जो ऐकतो तो श्रावक आहे तो द्वादश रूप (बाराव्रत) स्वीकारतो. उपसर्ग, परिषह आले तरी व्रत खंडित करीत नाही. तो हेय काय उपोदय काय हे जाणतो. पुढे शास्त्रीय उदाहरणाने ग्रंथकारांनी बारा व्रतांचे विस्ताराने वर्णन केले आहे.

करुणा, दया, दान इत्यादींचे फारच सुंदर विश्लेषणा केले आहे. दानासंबंधी लिहिले आहे की, जो पुरुष धन-संपत्ती असूनही साधुंना शिळे, नासके अन्न देतो तो पुढील अनेक-अनेक जन्मापर्यंत दरिद्र होतो. दाताचे वैशिष्टच वर्णन करताना म्हटले आहे. जो दाता, घेणाऱ्याची निंदा करीत नाही, दान देते वेळी उदास, खिन्न होत नाही. पण मनात सद्भाव ठेवतो. दान करण्याची संधी मिळाली याबद्दल स्वतःला धन्य मानतो. दाता मनाच्या शुभ भावाने दान देतो. शिवाय दान देताना कोणत्याही लौकिक, फळाची अपेक्षा न ठेवता दान देतो. असा दाता विशिष्ट कोटीचा असतो.

सम्यक्त्वी श्रावकाच्या आचरणीय कर्मांचे सुद्धा ग्रंथकारांनी वर्णन केले आहे. तसेच भिक्षू, अणगार अथवा साधुंचे वर्णन केले आहे. सम्यक्त्व पूर्वक साधनेत मग्न गृहस्थ तथा मुनी, चरित्र धर्माचे अंशतः अथवा पूर्णतः पालन करतो. उत्तम क्षमा इ. दहा प्रकारचे मुनी धर्म आहेत ज्याचे पालन करताना मुनी आंतरीक सुखाचा अनुभव करतो. मग देव, मनुष्य किंवा तिर्यंच यांच्याकडून उपसर्ग (उपद्रव) सहन करताना किंचितही विचलित होत नाही.

पुढे ग्रंथकार मुनीधर्माच्या प्रत्येक भेदाचे निरूपण करतात. पुण्यबंध, पाप बंध, मंद कषाय, तीव्र कषाय इ. कर्मा संबंधी तात्त्विक विषयांची चर्चा करतात. अशाप्रकारे धर्ममय जीवनाची भावना करणे. पुनःपुनः चिंतन करणे, मोक्ष मार्गाकडे जाण्याची आकांक्षा करणारे साधक यांच्यासाठी हे एक दिव्य प्रेरणास्रोत आहेत.

धर्मभावनेचे लक्ष्य एकच आहे- धर्माचा महिमा, त्याचा आदर, श्रेय आणि स्वरूपाचे चिंतन करून आराधनेत प्रवृत्त व्हावे. विविध ग्रंथात या भावनेचे विविध रूपात

वर्णन आहे. त्याचे कारण हे असावे की प्रत्येक ग्रंथकाराची आपली शैली व अभिरूची, वेगवेगळी असावी.

आचार्य कुंदकुंदांनी बारा अनुवेक्खा (द्वादशानुप्रेक्षा) मध्ये जिनेंद्र देव प्ररूपित, क्षमा इ. धर्माचे अनुचिंतनाचे या धर्म भावनेत विशेष प्रकारे विवेचन केले आहे. दिगंबर परंपरामध्ये दश लक्षणधर्म नावाने प्रसिद्ध आहे. ते पर्युषणाच्या दहा दिवसात एका-एका धर्माची आराधना करण्याचा विशेष प्रयत्न आणि प्रभावनामूलक समारोह आयोजित करतात. ज्यामुळे जनमानसात विशेष उत्साह जागृत व्हावा.

हे दहा धर्म कोणत्याही विशिष्ट परंपरेशी संबंधित नाहीत. सर्व जैन त्यांना मानतात. परंतु सामाजिक दृष्टीने या आधारावर दिगंबर परंपरामध्ये विशेष प्रयत्न केला गेला असावा.

स्वामी कार्तिकेयानुप्रेक्षा मध्ये धर्म भावनेच्या अन्तर्गत मुनी धर्म आणि श्रावक धर्माची विशेष चर्चा आहे. यावरून स्पष्ट होते की, स्वामी कार्तिकेयांनी जीवनाच्या व्यावहारीक पक्षाला विशेष महत्त्व दिले आहे. जेव्हा धर्म मानवजीवनात व्यवहारारूपात आचरणात येतो तेव्हा निरपवाद पालन तथा सापवाद पालन रूप अशा दोन विधा प्रकट होतात. निरपवाद व्रतपालन मुनी धर्म आहे. जिथे धर्मच जीवनसर्वस्व आहे मग ते प्राणपणाने पालन केलेच जाते. त्यात कोणताही अपवाद किंवा सूट नसते. असे धर्माचे पालन करणारे कित्येक लोक आहेत. ज्यांचे आत्मबल जबरदस्त असते.

सापवाद म्हणजे ज्या धर्म-पालनात सूट आहे. हे इतके कठीण नाही तरीपण संसारात लिप्त मनुष्य त्याकडे उत्साहित होत नाही. म्हणून या भावनेत दोन्हीकडून मानसिकता आणि दृढता उत्पन्न करण्याचा प्रयास आहे.

मूलाचारात आचार्य वट्टकेरांनी जिनेश्वर प्रणित-प्रतिपादित धर्माची आराधना करण्याचे सांगितले आहे. त्याप्रमाणे अनुचिंतन करण्याची प्रेरणा दिली आहे.

भगवती आराधनामध्ये धर्मानुप्रेक्षाचे विवेचन करताना लिहिले आहे की, जो धर्म माणसासाठी अनेकानेकरूपाने कल्याणकारक आहे. म्हणजे माणसाला मानवता आणि देवत्व प्राप्त करता येते आणि याच मार्गाने शेवटी मोक्षा प्रत जाता येते. हे सर्व धर्मभावनामुळेच शक्य होते. धर्मभावना सतत मनात केल्यामुळे हृदयात त्याचे बी रूजते, ते वाढते. धर्माच्या महानतेचे वर्णन करताना आचार्य म्हणतात. जे धर्माचे आचरण करतात. ते सर्वांना पूजनीय होतात विश्वसनीय, प्रिय आणि यशस्वी होतात. धर्म मनुष्याला सुख प्रदान करणारा आहे.

खरी शांती देणारा आहे.[४५५] या श्लोकात आचार्यांनी धर्मामुळे पूजा, सन्मान, विश्वासनीयता, प्रियता, आणि यशस्वीता प्राप्त होते असा उल्लेख केला आहे. ते धर्माकडे लोकांनी आकृष्ट व्हावे म्हणून. पण हे काही धर्माची लक्षणे नाहीत. धर्माचे आचरण करणारा तत्वतः कधी अपेक्षाच करीत नाही की कोणी आपली पूजा करावी. सन्मान करावा, प्रतिष्ठा मिळावी.

धर्म तर एकमात्र शुद्धात्मभाव प्राप्त करण्याचा दृष्टीने केली जाणारी सतप्रवृत्ती आहे. परंतु साधारण मनुष्य अतिउच्च भाव समजू शकत नाहीत त्यांच्यासाठी ही भूमिका निर्माण केली जाते. त्यामुळे तरी ते धर्माभिमुख होऊन सद्धर्माला प्राप्त करू शकतील. म्हणून आचार्यांनी या सांसारीक उपलब्धिंना धर्माशी जोडून धर्माचा व्यावहारिक पक्ष प्रतिपादित केला.

या श्लोकात धर्माला सुख साध्य म्हटले आहे. अर्थात् धर्मपालन ही मानवाची सहज सुलभ क्रिया आहे. सहज पालन केले जाऊ शकते, सहजपणे आचरण केले जाऊ शकते. परंतु संसारातील लोक याच्या विपरीत वागतात. अधिकांश लोक असेच म्हणतात की धर्माचे पालन करणे अति कठीण दुष्कर कार्य आहे. ते तर तलवारीच्या धारेवर चालण्याइतके क्लेशकारी आहे. कारण त्याग आणि संयम ह्या धर्माच्या धुरा आहेत. याचे पालन करताना शारीरिक अनुकूलताकडे दुर्लक्ष केले जाते. मग धर्म सुसाध्य आहे असे कसे म्हणता येईल.

इथे आचार्य ज्या भाव भूमिकेवरून सांगत आहेत. त्यांच्या म्हणण्याचा सखोल अर्थ समजायला हवा. अगदी खोलवर जाऊन आपण विचार केला तर समजेल की एकीकडे मनुष्य फारच दुर्बल आहे, दुसरीकडे जर त्याने खरे तत्व व सत्य जाणले व त्या महिमेचा अनुभव घेतला तर या भवसागराची महाभयंकरता आणि भोगांच्या परिणामाची निरसता तो जाणतो त्याच्यासाठी धर्माचे पालन करणे फारच सरळ होऊन जाते. तो धर्माच्या आचरणातच सुख मानतो. जिथे इंद्रियाचे भोग भोगायला न मिळाल्याने लोक ते प्राप्त करण्यासाठी तडफडत असतात. त्याच सुखांना खरे धार्मिक आनंदाने ठोकर मारतात. त्याग आणि तपश्चरणाचा अवलंब करतात. कारण अध्यात्माच्या रसाचा स्वाद त्याने घेतलेला आहे. धर्ममार्गाचा अवलंब केला तरच आपला मनुष्य जन्म घेणे सफल होईल याची त्याला खात्री झालेली असते म्हणूनच आचार्यांनी वर जे सांगितले ते अगदी सत्य आहे. म्हणूनच साधकाला भावनांच्या माध्यमाने आत्मस्वरूपाचा अनुभव घेण्यासाठी दिशा

दर्शन केले आहे. भगवती आराधनाच्या टीकाकाराने १८५२ या श्लोकात महत्त्वपूर्ण ओळ दिली आहे-

४१८. सर्वार्थ सिद्धि ५/२/५४९, पृ. २०६
४१९. जैनेन्द्र सिद्धांत कोश भा. ३, पृ. ५०३
४२०. कार्तिकेयानुप्रेक्षा गा. १२४ ते १३९ पृ. ६२ ते ७०
४२१. कार्तिकेयानुप्रेक्षा गा. १९२, १९३ पृ. १२९, १३०
४२२. कार्तिकेयानुप्रेक्षा गा. १९३ ते २०५ पृ. १३० ते १३९
४२३. का. अ. गा. २०६ पृ. १३८, १३९ टीका
४२४. स्वामिकार्तिकेयानुप्रेक्षा गा. २१०, २११ पृ. १४४, १४५
४२५. समीक्षण ध्यान दर्शन एवं साधना, पृ. ८१ ते ८३

४२६. वैराग्य भावना संग्रह संकलन प्रो. जमनालाल जैन ले. कवि मतंगराय गा. २३ पृ. ४
४२७. बारहभावना एक अनुशीलन ले. हुकमचन्द भारिल्ल पृ. १३८
४२८. वैराग्यभावना संग्रह कवि बुधजनजी गा. १० पृ. १६
४२९. वैराग्यभावना संग्रह भैय्या भगवतिदासजी गा. ११ पृ. ११
४३०. बारहभावना एक अनुशीलन पृ. १३९
४३१. तत्त्वार्थवार्तिक ९/७ पृ. ६०३
४३२. जिनवाणी साधनाकी प्रथम भूमिका सम्यग्दर्शन ले. श्रीप्रसन्नचंद बाफना पृ. ११४ ते ११६
४३३. भगद्गोमंडल कोश, पृ. ६४८७, ले. भगवतसिंहजी भा. ७
४३४. बारसाणुवेक्खा श्लोक ८३ ते ८६ पृ. ८३ ते ८६
४३५. मुलाचार आ. वट्टकेर उत्तरार्ध गा. ७६३ पृ. ३५, ३६
४३६. कार्तिकेयानुप्रेक्षा गा. २८४ ते २९८ पृ. २०४ ते २११
४३७. शीलकी नव वाड परिशिष्ट कथा और दृष्टांत ले. श्रीमद् आचार्य भिषणजी पृ. ८१
४३८. मूलाचार उत्तरार्ध गा. ७६१ पृ. ३४
४३९. प्रशमरति प्रकरण श्लोक १०२ ले. उमास्वाति
४४०. योगशास्त्र चतुर्थ प्रकाश श्लोक १०७, १०८, १०९ पृ. १४१
४४१. अमोलक सूक्ति रत्नाकर भाग १ ले. पू. कल्याणऋषिजी म. पृ. ५८ ते ६५
४४२. पञ्चाध्यायी अध्याय २ श्लोक ५२७ पृ. ४०८
४४३. पञ्चाध्यायी अध्याय २ श्लोक ५२८, पृ. ४०८
४४४. वैराग्य भावनासंग्रह पं. जुगलकिशोर 'युगल' गा. १२, पृ. १९
४४५. बारहभावना एक अनुशीलन हुकमचंद भारिल्ल पृ. १४४
४४६. भावनाशतक गा. ८८, ८९, दृष्टांत पृ. ३५०
४४७. आत्मानुशासन गा. ६३, पृ. ४२
४४८. भागवा योग एक विश्लेषण मराठी पृ. ३७३ ले. आ. आनंदऋषिजी म.
४४९. जिनवाणी, साधना अंक जैन साधना और वर्तमान संदर्भ, ले. डॉ. देवेन्द्रकुमार पृ. १६२
४५०. अर्चना और आलोक, महासती उमरावकंवरजी 'अर्चना' पृ. २७४
४५१. अष्टाचार्य गौरव गंगा, ले. ज्ञानमुनी, भूमिका, पृ. १

४५२. कल्पसूत्र गा. १ ते ६ पृ. ६०-६१

४५३. प्राकृत प्रकाश वररुचि २/४२ नो णः सर्वत्र पृ. ३९

४५४. वैराग्य शतक श्लोक ७, पृ. ४

४५५. भ. आ. १८५१ ते १५५९, पृ. ८२७ ते ८२९

४५६. आगम अनुप्रेक्षा श्लोक १५४, पृ. ३०

४५७. शांतसुधारस भावना, गेयाष्टकाचे ध्रुवपद पृ. २९१

४५८. धर्म के दोहे, सत्य नारायण गोयनका, विपश्यना शोध संस्थान इगतपूरी

४५९. भावनाशतक ले. पं. रत्नचन्द्रजी श्लोक ९७, पृ. ३६६

४६०. संकल्प्य कल्पवृक्षस्य चिन्त्यं चिंतामणिरपि, असंकल्प्यमसंचिन्त्य फलं धर्मादवाप्यते। आत्मानुशासन लेखक - श्री गुणभद्राचार्य गा. २२, पृ. १७

४६१. उत्तराध्ययन सूत्र १४/२४, २५ पृ. २२८

४६२. दशवैकालिक सूत्र ८/३५ पृ. ३११

४६३. पञ्चाध्यायी २/७/६ पृ. ४५१, ४५२

४६४. तत्त्वार्थ सूत्र १/१ पृ. १

४६५. यतोऽभ्यूदयनिः श्रेयससिद्धिः स धर्मःअनुप्रेक्षा ना आजवाळा ले. भद्रंकरविजयजी पृ. ६८

४६६. आनंद घन चोवीसी, धर्मनाथप्रभु स्तवन गा. ५, ६, पृ. ७९, ८०

४६७. आपने आत्मनिरीक्षण करीशु ले. मुनि अमरेन्द्रविजयजी पृ. १३

४६८. उत्तराध्ययन सूत्र १४/४० श्री अमोलकऋषिजी म. पृ. २३९

४६९. तत्त्वभावना गा. १८, १९, पृ. ५७, ६०

४७०. समराइच्च कहा - हरिभद्रसूरि तइयो भवो गा. १० पृ. १७६

४७१. भावना भव नाशिनी ले. अरुणविजयजी पृ. १

४७२. यशस्तिलक चम्पु धर्मभावना श्लोक १४५, १४६, पृ. २७३, २७४

४७३. ज्ञानार्णव धर्मभावना श्लोक ४, सर्ग २

४७४. ज्ञानार्णव धर्मभावना श्लोक ११ सर्ग २

४७५. योगशास्त्र धर्मस्वाख्यातत्वभावना श्लोक. ९६-९९, पृ. १३८, १३९

४७६. आत्मानुशासन गा. २६, पृ. १८

४७७. मावनता के पथ पर ले. मुनि श्री. लाभचंद्रजी पृ. १०२

४७८. मरुधर केशरी मुनि श्री मिश्रीमलजी म. अभिनंदन ग्रन्थ खण्ड २, धर्मतत्त्व का विश्लेषण, ले. पं. चेनसुखदास जैन, पृ. ४

४७९. ज्ञानार्णव धर्मभावना सर्ग २ श्लोक ११
४८०. बारसाणुवेक्खा ८७ ते ९०, पृ. ८७ ते ९०
४८१. मुलाचार गा. ७६५ ते ७६८ पृ. ३६, ३७, ३८ (उत्तरार्ध)
४८२. भावना शतक गा. पृ. ३७०

❊ ❊ ❊

प्रकरण सहावे

वैराग्यातून योग भावनेच्या दिशेने साधकाचा विकास

प्रकरण सहावे

वैराग्यातून योग भावनेच्या दिशेने साधकाचा विकास

संसारात भौतिक साधना अनेक असतात. त्याने लौकिक लाभ प्राप्त होतो. उदा. गायक, वादक जेव्हा अनेक वर्षे स्वरसाधना करतात, वाद्ययंत्रावर कित्येक वर्षे निरंतर अभ्यास करतात. तेव्हा कुठे ते आपल्या विषयात पारंगत होतात. जादुगार, नर्तक, अभिनेता, चित्रकार, साहित्यकार यांना काही एका दिवसात विद्वत्ता अचानक प्राप्त होत नाही. त्यासाठी चिरकाल एकाग्रतातेने साधना करावी लागते. युद्धकलेचा बऱ्याच कालावधीपर्यंत अभ्यास केल्यानंतर सुयोग्य योद्धा तयार होतो. व युद्धात आपले कौशल्य दाखवू शकतो. शेतकरी शेताची, सुतार लाकडाची, लोहार लोखंडाची, स्वर्णकार सोन्याची आणि मूर्तिकार दगडाची साधना करतो. तेव्हा कुठे आपल्या शिल्पकलेत, व्यापार उद्योगात सफलता प्राप्त करतात. ते आपल्या प्रयत्नाने व कौशल्याने त्या अनगढ वस्तूंना बहुमूल्य बनवतो. पहिलवान व्यायाम शाळेत नियमित कठोर परिश्रम करून शरीर कमावतो. विद्यार्थी किशोरावस्थेपासून विद्यासाधना करतो तेव्हा मग विद्वान बनतो. अशाप्रकारे प्रत्येक कार्याच्या, कलेच्या मागे अभ्यास अत्यंत आवश्यक आहे.

अशाप्रकारे आत्म्यासाठी साधना करताना, साधक उर्ध्वगमन करण्यासाठी भावनायोगाच्या साधनेत उत्तरोत्तर विकास करतो. भावनायोगाची साधना निरंतर केल्याने, अभ्यास केल्याने साधक सर्व कलेत जी श्रेष्ठ कला धर्मकला आहे यात पारंगत होतो.

एखाद्या इंजिनियरला बिल्डिंग बांधायची असेल तर तो प्रथम मन-मस्तिष्कात त्याचा आकार प्रकार इ. साऱ्या कल्पना, भावना यांचा विचार करतो, नंतर नकाशा काढतो. खर्चाचा हिशोब लावतो नंतर निर्माण कार्य सुरू करतो. त्याचप्रमाणे जीवन निर्माण करण्यासाठी आध्यात्मिक साधक मनात भावना संग्रहित करतो आणि तसा व्यवहार करण्याचा प्रयत्न करतो. भावना वाढविण्यात प्रगती करतो. व शेवटी एक दिवस शुद्धात्मभावाचे विशाल भवन निर्माण करतो. भावनायोगात अग्रसर होऊन साधक अनित्यादी वैराग्य भावनेने संसाराची विषमता, विविधता इ.चा अभ्यास करता-करता प्रगतीशील होतो.

म्हणजे तो सामान्य साधकातून थोडा पुढे जाण्याच्या दृष्टीने अभ्यास करण्याच्या हेतूने मैत्री इ. चार योग भावनांच्या चिंतनाकडे वळतो.

योग भावनांच्या चिंतनाने मनुष्य मानवतेच्या उच्च शिखरापर्यंत पोहोचतो. या भावनांचा प्रयोग फक्त आध्यात्मिक जीवनासाठीच असे नाही. तर व्यावहारिक जीवनात ही याचा अतिशय उपयोग होतो.

मानवाची वाणी, वर्तन आणि विचार स्व-पर कल्याणरूप व्हावे यासाठी शास्त्रकारांनी या चार भावनांना अतिशय महत्त्व दिले आहे. अरिहंत देवाबद्दल भक्ती आणि जीवमात्राशी मैत्री या विचाराने मानवाचे मन पवित्र, विशुद्ध होते. समर्पण आणि साधना यांच्या समन्वयाने निरंतर चिंतन, मनन करण्यासाठी या चार भावना मनुष्याच्या जीवनातील अमूल्य ठेवा आहे. साधकासाठी या उपकारी आणि कल्याणकारी तर आहेच, केवळ जैन दर्शनाचा नाही तर जगातील सर्व उत्तम दर्शनांचा, आत्मदर्शनांचा सार म्हणजे या चार योगभावना आहेत. या शुभभावनांनी युक्त साधकाला परम पवित्रेतेच्या, विशिष्ट प्रकाशाचा अनुभव येतो.

आचार्य शुभचंद्रजी,[१] हेमचंद्रजी, हरिभद्रसूरी इ. अनेक मनीषींनी, या भावनांना ध्यान-सिद्धीसाठी चिंतन करण्याचा उपदेश दिला आहे.

आचार्य हरिभद्रसूरींनी 'योगबिंदू' ग्रंथात पाच योगांचे निरूपण केले आहे. त्यात योग्य प्रवृत्तीरूप अणुव्रत अथवा महाव्रतांचे पालन, मैत्री इ. भावनांनी ओतप्रोत होऊन शास्त्रानुसार चिंतन करण्याच्या वृत्तीला 'अध्यात्मयोग' असे म्हटले आहे. अर्थात अध्यात्मयोगी होण्यासाठी मैत्री इ. भावनांचे किती महत्त्व आहे, हे स्पष्ट होते.[२] अध्यात्मयोगाचे दोन अधिकारी सांगितले आहे- १) अणुव्रतधारी श्रावक २) महाव्रतधारी साधू.

जे योग्य प्रवृत्ती करतात. जिनेश्वरांच्या वचनानुसार तत्त्वचिंतन करतात. त्यांच्या हृदयात प्राणिमात्राबद्दल मैत्री इ. भावना जागृत होतात.

'योगसार' मध्ये ''धर्म कल्पद्रुमस्यैता मूलं मैत्रादि भावना'' अर्थात मैत्री इ. भावनांना धर्मकल्पवृक्षचे मूळ म्हटले आहे.

अशा चार योग भावनांचे विवेचन या प्रकरणात केले आहे.

मैत्री इत्यादी चार भावना योग

मनाला वैराग्य रसाने परिपूर्ण करणाऱ्या बारा भावनांचे चिंतन मागील प्रकरणात केले गेले आहे. अनित्य, अशरण, संसार एकत्व, अन्यत्व वगैरे बारा भावना शिवाय जैनशास्त्रात मैत्री, प्रमोद, करुणा व माध्यस्थ या भावनांचा समावेश केला आहे. या चार भावना, बारा भावनांच्या पूरक आहेत. बारा भावना तात्त्विक दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्या आत्मोपलब्धीच्या दृष्टीने साधकाला प्रेरणा देणाऱ्या आहेत. मैत्री वगैरे चार भावना साधकाच्या दैनंदिन व्यावहारिक जीवनाला मधुर, पवित्र आणि सौम्य करण्यासाठी फारच उपयोगी आहेत.

आचार्य उमास्वातींनी तत्त्वार्थ सूत्रात सातव्या अध्ययनात व्रताच्या पाच-पाच भावनांचे विवेचन केले आहे. मग त्यांनी काही अशा सार्वजनिक भावनांचे वर्णन केले आहे ज्यामुळे एका धार्मिक व्यक्तीच्या जीवनात निर्मलता आणि सात्विकता येते. त्याच संदर्भात त्यांनी मैत्री, प्रमोद, कारुण्य तथा माध्यस्थ या चार भावनांचा उल्लेख केला आहे.[३]

एकाच सूत्रात त्यांनी त्याचे लक्षण ही सांगितले आहे. मैत्री या शब्दावरोबर त्यांनी सत्य शब्द जोडला आहे, जो प्राणीमात्राचे द्योतक आहे. सर्व सत्त्व किंवा प्राणीमात्राशी एक धार्मिक व्यक्तीने मित्रताची भावना ठेवावी. कोणाही बद्दल शत्रुता, विरोधता आणि अप्रियता नसावी. ही मैत्री भावना आहे.

गुणांमुळे जीवनात विशेषता येते, व्यक्तीचे हेच अलंकार आहेत. गुण म्हणजे सत्य, शील, शौच, सदाचार तथा साधना इ. उत्तम भाव. हे ज्यांच्यात विशेष रूपाने असतात, हे गुण ज्यांच्यात अधिक प्रमाणात असतील त्यांच्याबद्दल मनात प्रमोद, प्रसन्नता, हर्ष व्हायला पाहिजे. हा संसार मोठा विचित्र आहे. अधिकांशातः व्यक्ती अशा असतात ज्या उत्तम गुण युक्त व्यक्तींना पाहून इर्षा करतात, जळतात. ही फार दूषित प्रवृत्ती आहे. याने आत्म्याचे पतन होते. अशा निकृष्ट भावनेपासून आपण स्वतःला सदैव दूर ठेवावे. यासाठी "प्रमोदभावना" फार उपकारक आहे.

हा संसार सुख-दुःखाने भरलेला आहे. यात अनेक सुखी आहेत तर अनेक दुःखी आहेत. दुःखी लोक आपआपल्या कर्माच्या अधीन अनेक प्रकारचे कष्ट भोगत आहेत. त्यांच्याबद्दल धर्मनिष्ठ व्यक्तीच्या मनात दया, करुणा, अनुकंपा असावी अशी अपेक्षा आहे. धर्मात करुणा व दया यांचे फार महत्त्व आहे. दुःखी लोकांवर दया करणे ही करुणा भावना आहे.

संसारात असेही लोक आहेत जे अविनयी, अयोग्य, अपात्र आहेत. निष्कारण वैर विरोध करण्यात, लोकांचे अकारण अहित करण्यात त्यांना काहीच वाटत नाही. कारण हाच त्यांचा स्वभाव असतो. अशा लोकांबद्दल सुद्धा एक धार्मिक व्यक्ती मनात विपरीत भाव येऊ देत नाही. अशा लोकाबद्दल मध्यस्थ किंवा तटस्थ भाव असावा. कारण त्यांच्याबद्दल कोणतेही विपरीत चिंतन केले तर आपलीच हानी होते. माध्यस्थ भाव ठेवल्याने मनात शांती राहते.

आचार्य हरिभद्रसूरी ''योगबिंदू''मध्ये मैत्री इ. चार भावनांचे वर्णन करताना लिहितात की साधकाने सर्व प्राणीमात्रांबद्दल मैत्री भाव ठेवावा. जो पुरुष विद्या चारित्र इ. उत्तम गुणांनी युक्त असेल त्यांना पाहून साधकाच्या मनात आनंद निर्माण व्हायला पाहिजे. जे कष्ट, दुःख भोगत आहेत, त्यांच्याबद्दल मनात कारुण्य भाव असावा व अज्ञानी लोकांबद्दल व त्यांच्या अज्ञानपूर्ण कार्याबद्दल तटस्थ भाव ठेवावा.[४]

भगवती आराधना नावाच्या महान ग्रंथाचे रचयिता श्रीशिवार्य यांनी या चारही भावनांचे वर्णन करताना लिहिले आहे की, जीवाबद्दल मित्रभावाचे चिंतन मैत्री आहे. क्लेशयुक्त जीवांना पाहून मन कंपायमान होणे, त्यांच्यावर दया करणे करुणा आहे. साधकांच्या सद्गुणांचे चिंतन करून मुदित होणे प्रमोद भावना आहे आणि सुखात्मक-दुःखात्मक तसेच सुखाबद्दल अराग व दुःखाबद्दल अद्वेष यास उपेक्षा अथवा मध्यस्थ म्हटले जाते.[५]

भगवती आराधनाच्या संस्कृत टीकाकाराचे आचार्य श्रीअपराजितसूरी यांनी आपल्या 'विजयोदया' नावाच्या टीकेमध्ये या गाथाचे तात्त्विक विश्लेषण करताना लिहिले आहे की- अनंतकालापासून चार गतीमध्ये घटी चक्राप्रमाणे चतुर्गतिमय संसारात परिभ्रमण करीत आहे. प्रत्येक गतीमध्ये. सर्व प्राण्यांचे माझ्यावर अत्याधिक उपकार आहेत. म्हणून त्यांच्याबद्दल मित्रताची भावना ठेवणे मैत्री आहे. असह्य, घोर, शारीरिक, आगन्तुक, अकस्मात येणारी व्याधी, दुर्घटना इ. व मानसिक एवं स्वाभाविक दुःख भोगताना त्या प्राण्यांना पाहून असा विचार करावा की बिचारे हे प्राणी मिथ्यादर्शन, अविरत, कषाय तथा अशुभयोग द्वारा उपर्जित कर्मरूप पुद्गल स्कन्धाच्या उदयामुळे उत्पन्न विपत्ती व कष्टांना विवश होऊन भोगत आहेत. ही करुणा भावना आहे, अनुकंपा भावना आहे.

यति-संयत आत्म्याच्या गुणांचे चिंतन करावे की या संयत आत्मा किती विनयशील, रागरहित, भयवर्जित, अभिमान शून्य रोषरहित व लोभरहित आहेत. ही मुदिता,

प्रमोद भावना आहे. सुखबद्दल राग (आसक्ती) न ठेवणे म्हणजे उपेक्षा भाव आहे. याचा अभिप्राय असा की, सुख सर्वांनाच प्रिय असते. म्हणून त्या परिस्थितीत सर्वांना रस वाटतो. सुखाची स्थिती कधी जाऊच नये याचा प्रयत्न करीत असतात. परंतु दुःख कोणालाच नको असते. दुःख अप्रिय वाटते. पण संयमी साधक या दोन्ही परिस्थितीत समभावाने राहतात. त्यांना सुखात आसक्ती नसते व दुःखाबद्दल खेदही नसतो. दोन्हींच्या पलीकडची त्यांची अवस्था असते.

आचार्य पूज्यपाद यांनी तत्त्वार्थसूत्राच्या सातव्या अध्ययनातील अकराव्या सूत्राची व्याख्या करताना सर्वार्थसिद्धी नामक टीकेमध्ये चार भावनांचा उल्लेख व विवेचन केले आहे. दुसऱ्यांना आपल्याकडून दुःख होऊ नये अशी अभिलाषा असणे म्हणजे मैत्री. सुखामुळे प्रसन्नता इ. द्वारा आंतरिक भक्ती आणि अनुराग प्रकट होणे प्रमोद भावना. दीन-अभावग्रस्त, क्लेशयुक्त प्राणीबद्दल दयाभाव असणे कारुण्य भावना-राग-द्वेष युक्त पक्षपात न करणे, माध्यस्थ भावना. दुष्कर्मांच्या परिणामामुळे जीव भिन्न-भिन्न योनीत जन्म घेतो, मरतो. हे सत्त्व होय. सत्त्व जीव म्हणजे सम्यग्ज्ञान इ. गुणांनी उन्नत आहेत. त्यांना गुणाधिक म्हटले जाते. असातावेदनीय कर्माच्या उदयामुळे जो दुःखी आहे. त्यांना क्लिष्यमान म्हटले जाते. ज्यांच्यात जीवादी पदार्थांना ऐकणे व ग्रहण करणे हा गुण नाही, त्यांना अविनेय म्हटले जाते. अविनेय म्हणजे ज्यांना समजावू शकत नाही असे जीव. या सत्व इ.मध्ये क्रमशः मैत्री इ.ची भावना करायला पाहिजे. जो सर्व जीवांशी मैत्री, गुण विशिष्ट जीवात प्रमोद, कष्ट भोगणाऱ्या जीवाबद्दल कारुण्य आणि अविनयी यांच्याबद्दल माध्यस्थ भावना ठेवतो, त्याचे अहिंसा इ. व्रत पूर्णतेला प्राप्त करतात.[६]

आचार्य अमितगति यांनी मैत्री इ. चार भावनासंबंधी एक फार सुंदर श्लोक लिहिला आहे-

सत्वेषु मैत्री गुणिषु प्रमोदं, क्लिष्टेषु जीवेषु कृपापरत्वम् ।
माध्यस्थभावं विपरीतवृत्तौ, सदा ममात्मा विदधातु देव ॥[७]

ते जिनेन्द्र देवांना उद्देशून म्हणतात- हे प्रभो ! आपल्या प्रेरणेने माझ्या आत्म्यात असे पवित्र, उदात्त भाव जागृत व्हावे की मी संसारातील सर्व प्राणीमात्राशी मैत्री भाव ठेवीन, सर्वांना मी मित्र मानीन व सर्वांबद्दल माझ्या मनात सौहार्द्र भाव ठेवीन, गुणवानांबद्दल प्रमुदित भाव निर्माण होईल. त्यांना पाहून मनात आनंद, प्रसन्नताचे भाव निर्माण होतील. संसारात अनेक जीव अनेक प्रकारच्या दुःखाने ग्रस्त आहेत. कष्टाने पीडित आहेत. त्यांना

पाहून माझ्या मनात दया, करुणा, अनुकम्पा भाव निर्माण होवो. जे माझ्याशी द्वेष भावाने वागतात, माझे अहित चिंततात, त्यांच्याबद्दल सुद्धा माझ्या मनात मध्यस्थता भाव असावा. उदासीनतेचा भाव असावा.

थोड्या शब्दात विद्वान आचार्यांनी चार ही भावनांचे सजीव चित्र अंकित केले आहे. श्लोकाचे उच्चारण केल्याबरोबर हृदयात भाव जागृत होतात. राग-द्वेषाच्या ग्रंथी शिथिल होऊ लागतात.

हा एकमेव असा श्लोक आहे की, लाखो जैन आदराने नित्यप्रती स्मरण करतात. अत्यंत सोप्या शब्दात, मधुरतापूर्वक चार प्रकारच्या उत्कृष्ट भावना रचनाकारांनी यात उपस्थित केल्या आहेत.

हे चिंतन खरोखर एका योग्याचे चिंतन आहे. वैराग्याची पुढची पायरी 'योगी'ची आहे. म्हणून आपण हे ही स्वीकारू शकतो की १२ वैराग्य भावना केल्याने मनाला संस्कारीत करून नंतर योग भावनाच्या पुढच्या पायरीवर चढू शकतो. वैराग्या नंतरची ही पुढची स्थिती आहे.

सांसारिक मनुष्य दैनंदिन व्यवहारमय जीवनात एकाकी नाही. तो मानव समुदाय रूप समाजाचा एक अंश आहे. अनेक मानवांचा समूह मिळून समाज बनतो. समाजात राहणारा मनुष्य कोणत्या ना कोणत्या संबंधाने एकमेकांशी जुडलेले असतात. त्या संबंधाच्या आधारावर पारिवारिकता, सहकर्मिता, सहचारिता इ. आधारित आहेत. एखाद्याच्या मनाच्या अनुकूल व्यवहार नसला तर व्यक्तीच्या मनात त्या व्यक्तीबद्दल दुरावा निर्माण होतो. किंवा संशय निर्माण झाला की अमुक व्यक्ती माझे अहित करू पाहतो, माझी निंदा करतो, वाईट करतो मग मनात द्वेष, वैरभाव निर्माण होतो. हा भावनांचा एक असा व्यतिक्रांत रूप आहे जो जीवनाला दुःखमय करून टाकतो. इतकेच काय, अशाने अंतःकरणाची पवित्रता सुद्धा नष्ट होते. क्रोधादी कषाय उत्पन्न होतात. ज्या आत्म पतनाच्या कारण रूप बनतात.

मानव नेहमी अशा मनोवृत्तीत राहू नये या हेतूने जैनाचार्यांनी मैत्री इ. भावनांचा विशेष निर्देश केला आहे. मैत्री इ. भावना अशा पवित्र चिंतनावर आधारित आहेत. ज्यामुळे राग-द्वेष इ. सारख्या तुच्छ वृत्तीपासून दूर राहतो. मानव मनाने फार दुर्बल आहे, थोडे जरी मनाविरुद्ध घडले तर संतुलन बिघडते. कोपाविष्ट होतो. संघर्ष करण्यास तत्पर होतो. मैत्री इ. भावनांच्या चिंतनाने या सर्वांवर आळा बसतो. त्यामुळे मनाची भूमिका इतकी

उंच वाढते की त्या व्यक्तीला मग सर्वच आपले मित्र वाटू लागतात. परिणामस्वरूप मनाची स्वस्थता होते. विचारांची निर्मलता वाढते. जीवन प्रसन्न व उल्लसित राहते.

आध्यात्मिक साधनेच्या दृष्टीने सुद्धा मैत्री इ. भावना फार उपयोगी आहेत. कारण की, साधकाच्या मनात जोपर्यंत शत्रू, मित्र, उपकारक, अपकारक, इर्षा, विरोध, संघर्ष, विवाद इ. भाव असेल तोपर्यंत मानसिक दृष्टीने तो साधना करण्यास योग्य नाही. कारण की, धर्म-आराधना बाह्य क्रिया कलाप व कर्मकाण्डात नाही. ती तर आत्म्याच्या विशुद्धीवर आधारित आहे.

जैनसिद्धांत दीपिकामध्ये म्हटले आहे की- ''आत्मशुद्धि साधन धर्मः'' अर्थात् धर्म आत्म विशुद्धीचे साधन आहे. म्हणून विद्वान आचार्यांनी या भावनांना धर्माशी विशेष रूपाने जोडले आहे.

जैन दर्शनात चार ध्यानांचे वर्णन आहे. त्यात धर्मध्यान करणारा साधक ज्ञान आणि वैराग्य याने संपन्न असावा, संवृतात्मा असावा, मन व इंद्रियांचा विजेता असावा. आपल्या स्वतःला सावध कर्मापासून संवृत्त करणारा असावा, स्थिर आशय युक्त किंवा दृढ संकल्पयुक्त, धैर्यशाली असावा. ते पुढे लिहितात, धर्मध्यानाची सिद्धी प्राप्त करण्यासाठी महापुरुषांनी मैत्री इ. चार भावनांचा आश्रय घेण्याचे विधान केले आहे.

आचार्य हेमचंद्रांनी या चार भावनांचे वर्णन ध्यानस्वरूपाबरोबर केले आहे आणि यांना खंडित ध्यानाला पुन्हा ध्यानान्तराशी जोडणारी अथवा ध्यानाला परिपुष्ट करणारे रसायन आहे असे म्हटले आहे.[८] यावरून स्पष्ट होते की बारा भावनांचा संबंध मुख्यतः वैराग्य व निर्वेदाच्या जागृतीशी आहे. त्याचप्रमाणे या चार भावनांचा संबंध 'योग'शी जोडला गेला आहे. योगसाधनामध्ये मैत्री, प्रमोद इ. भावनांची विशिष्ट साधना प्रक्रिया चालते.

''अध्यात्मकल्पद्रुम''चे रचनाकार आचार्य श्रीमुनिसुन्दरसूरींनी चार भावनांचे संक्षिप्त स्वरूप वर्णन करताना लिहिले आहे की- आपल्या स्वतः शिवाय जगातील सर्व प्राण्यांचे हित करण्याची बुद्धी-मैत्रीभावना आहे. गुणावद्दल पक्षपात, आदरभाव प्रमोदभावना आहे. जो प्राणी भव जन्म-मरण रूपी व्याधीने परिश्रांत आहे, पीडित आहे, त्यांना उत्तम धार्मिकभावरूपी औषधीने स्वस्थ करण्याची इच्छा करुणाभावना आहे. ज्यांना समजावून सांगितले तरी आपल्या दुर्वृत्तींचा त्याग करीत नाहीत अशा प्राण्यांबद्दल उदासीन भाव ठेवणे किंवा उपेक्षा भाव ठेवणे माध्यस्थ भावना आहे.

ते एके ठिकाणी आपल्या स्वतःला संबोधित करताना म्हणतात, आत्मन ! तू मैत्री, प्रमोद, करुणा आणि मध्यस्थता या भावनांना आपल्या जीवनात आण. प्रयत्नपूर्वक सद्भावनांचे चिंतन कर तथा आत्मलीनतामध्ये अध्यात्म भावनेत थकल्याचा बिल्कुल अनुभव न करता आत्मलय अध्यात्मभावात आनंदानुभूती कर.[९]

जीवनात समत्व, समता याचे फार मोठे स्थान आहे. मानव आपल्या क्षुद्र चिंतन आणि संकीर्ण स्वार्थवृत्तीमुळे समत्वापासून दूर होतात. त्याच्या चित्तात विषमता व्याप्त होते. धन, जाती, वर्ण, वर्ग, सत्ता सामर्थ्य साधन सामग्री इ. अनेक पदार्थ परिस्थिती मनुष्याला समतापासून दूर नेतात. जीवन अवनतेकडे जाऊ लागते. या अवनत अवस्थेपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी आपल्या अंतःकरणात समता सुप्रतिष्ठित करण्यासाठी मुनिसुन्दरसूरीजींनी मैत्री, करुणा, प्रमोद आणि माध्यस्थ भावना फार उपयोगी आहे असे सांगितले आहे. या भावनांनी चित्ताला अनुभावित केल्याने वैषम्य भाव क्षीण होतो तथा साम्यभाव संवर्धित होतो.

शतावधानी पंडितरत्न मुनीश्री रत्नचंद्रजी महाराजांनी मैत्री इ. भावनांचा संस्कृत गीतिकामध्ये सुंदर वर्णन केले आहे.[१०] त्यांनी मैत्री संबंधी म्हटले आहे. मनुष्याच्या हृदयात जर मैत्री भावनेची भावना दृढ झाली तर तो मनुष्य खऱ्या आंतरिक सौंदर्याने भरून जातो. तो सहज मधुर व पवित्र भावनेने ओतप्रोत होतो. ज्याप्रमाणे एक व्यक्ती आपल्या भाऊ, बहीण, पुत्र, पत्नी व अन्य कुटुंबातील लोकांशी मैत्री भाव ठेवते, तसाच भाव तिच्या हृदयात सर्व प्राणीमात्रांबद्दल उत्पन्न होतो. हा आहे मैत्रीभावनेचा आदर्श.

प्रमोद भावनेच्या विवेचनात मुनिश्री आपल्या मनाला संबोधित करताना म्हणतात की, हे मन! तू सद्गुणांचे गुणगान करण्यात, त्याची प्रशस्ती करण्यात, संलग्न बन. असे चिंतन कर की, ज्यांनी उत्तम गुणांचे अर्जन केले आहे, जो सेवाधर्मात रत आहे, न्याय पथावर चालतात, सदाचरणशील आहेत, धर्म आराधनेत तत्पर आहेत, ते खऱ्या अर्थाने धन्य आहेत. अशा प्रकारे उत्तम गुणांनी युक्त पुरुषांना पाहून आपल्या मनात प्रमोद किंवा प्रसन्नचेचा अनुभव करा.

करुणा भावनेच्या विवेचनात करुणेला व संबोधित करताना म्हणतात- हे करुणा ! मी तुला आवास देतो, स्थान देतो, लोकांचे दुःख दूर कर. या संसारात असे कितीतरी लोक आहेत ज्यांना कोणाचाही आधार नाही, सहारा नाही. ज्यांचे पालनपोषण करणारे कोणी नाही. अंध, बधिर, मूक इ. विकलांग आहेत, अशा लोकांच्याबद्दल करुणाशील बनू

शकेन अशीच माझी वृत्ती बनो.

मुनिश्रींनी संस्कृत गीतिकाच्या माध्यमाने करुणा भावनेचे जे भावमय चित्र अंकित केले आहे ते खूपच प्रेरणास्पद आहे.

माध्यस्थ भावनासंबंधी लिहितात - माध्यस्थ भावनेत एक अपूर्व रस आहे. या संसारात राग-द्वेषाने आंदोलित, रागात्मक द्वेषात्मक प्रवृत्तीने भरलेले अनेक व्यक्ती आहेत, अनेक सुखी आहेत. दुःखी आहेत. अस्थिर चेता आहेत. अशा लोकांच्याबद्दल मनात उदासीनतेचा भाव ठेवणेच श्रेयस्कर आहे. कारण की त्यांचे प्रश्न कोण उलगडणार ? त्यातच ते इतके गुरफटलेले असतात. व्यथित दुःखी असतात. म्हणून अनुकूल प्रतिकूलप्रिय अप्रिय इ. विविध भावनेने अप्रभावित राहून साधकाने माध्यस्थ भावना ठेवावी. तरच अंतःकरण सद्भावना तथा सद्प्रवृत्तीमध्ये स्थिर राहू शकेल. बाह्य प्रवृत्तीपासून दूर रहावे. अशा प्रकारे चार योग भावना अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. अनेक लेखकांनी सुद्धा यांचे वर्णन केले आहे.

आता आपण एक-एक भावनेचे विस्तृत समीक्षण करू या.

मैत्री भावना

यापूर्वी आपण चार योग भावनांचे सलग विवेचन केले. आता प्रत्येक भावनेचा स्वतंत्रपणे विचार करू या.

जगात 'मित्र' शब्द फारच प्रिय आहे. मैत्रीचा सामान्य अर्थ आहे, कोणालाच शत्रू मानू नये. तशी ही व्याख्या आपल्याला सामान्य वाटली तरी जैन दर्शनाचा मुख्य सिद्धांत 'अहिंसा' याचा यात समावेश आहे.

प्रश्न असा पडतो की मैत्रीची सुरवात कुठून करावी ? श्री रत्नचंद्रजी महाराजांनी मैत्रीचा क्रम सांगताना लिहिले आहे- मैत्रीचे प्रथम पात्र एका उदरातून जन्मलेले भाऊ व बहीण आहे. कारण की-त्यांचा सहवास सहज घडतो. रक्ताचे नाते असल्यामुळे त्यांची मैत्री स्वयंसिद्ध आहे. त्यानंतर मैत्रीचे पात्र पुत्र आणि पत्नी. तसे पाहिले तर पुत्र प्रथम अवस्थेत पालनीय आहे. त्यास 'मैत्री' नाही म्हणू शकत. तरी पण ''प्राप्ते तु षोडशे वर्षे पुत्रं मित्रवदाचरते'' या प्रसिद्ध नैतिक पद्यानुसार सोळा वर्षाच्या वयानंतर पुत्राला मित्र मानले पाहिजे. पत्नीलासुद्धा आपली गुलाम नाही तर जीवन सहचारिणी, मित्र मानले पाहिजे. तत्पश्चात् कुटुंबीय आणि नातेवाईक यांच्याशी मैत्रीचा नंबर येतो. अर्थात् त्यांच्याशी मैत्रीभावनेने हृदयाची एकता स्थापित करावी.

अशाप्रकारे पुढे आपल्या गावातील लोक, अन्य जातीचे लोक, अन्यधर्मी लोक यांच्याशी मैत्री दृढ करावी. नंतर देशबंधूंशी मैत्रीभाव ठेवावा.

मानवजातीशी मैत्रीसंबंध दृढ झाल्यानंतर गाय, म्हैस इ. तिर्यंच पशु-पक्षींचा क्रम येतो. मनुष्याप्रमाणे पशूंशी सुद्धा मित्रतेचा इतका व्यवहार होऊ शकत नाही, तरी ही इथे मित्रतेचा अर्थ आहे त्यांना पीडित करू नये. दुःख देऊ नये. त्यांचे स्वाभाविक अधिकार हिरावून घेऊ नये. त्यांच्यावर क्रोध करू नये. उपाशी ठेवू नये. त्यांच्या ताकदीपेक्षा जास्त बोजा लादू नये. अशाप्रकारे त्यांच्याशी मैत्री ठेवावी.

पशु-पक्ष्यांनंतर विकलेन्द्रिय अर्थात दोन इंद्रिय असणारे जीवापासून ते चार इंद्रिय असणाऱ्या जीवांचा मैत्री भावात समावेश होतो. नंतर भूत आणि सत्त्व अर्थात् वनस्पती. आणि पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू या पाच स्थावरांबद्दल मैत्री भावना असावी. अर्थात त्यांचे रक्षण करावे. इथपर्यंत मैत्रीची परिपूर्णता होते. घरापासून प्रारंभ झालेली मैत्री, जगत् मैत्री पर्यंत येऊन स्थिरावते.

जसजशी आत्मविशुद्धी होत जाते तसतशी मैत्री भावना वृद्धींगत होत जाते. मैत्री वृद्धी होत राहणे हा आत्म्याचा महान गुण आहे. जेव्हा पूर्णपणे आत्माविशुद्धी होते तेव्हा मानवाची मैत्री त्रिलोक व्यापी होते.

जगातील प्रत्येक प्राणीमात्राशी मैत्री होणे आवश्यक आहे. कारण की जगात असा एक पण प्राणी नाही की ज्याच्याशी आपले पुत्र-पिता, पत्नी, आई, भाऊ-बहिणींचे नाते बांधले गेले नसेल. प्रत्येकाशी कोणत्या ना कोणत्या रूपात आपले संबंध राहिले आहेत. जगातील सर्व जीवांशी अनंत वेळा अनंत जन्मापासून आतापर्यंत व पुढे ही अनंत जन्मापर्यंत नाते जोडलेले असेल राहतील. (मोक्ष प्राप्त होईपर्यंत) मग पूर्व जन्मातील ज्यांच्याशी आपले रक्ताचे नाते होते त्यांच्याशी आज या जन्मात अमैत्री कशी ठेवावी? हे योग्य नव्हे.

दुश्मनांशी सुद्धा अमैत्री नसावी. कारण की त्यांच्या पूर्वकृत अशुभ कर्मामुळे ते सज्जनांशी शत्रुत्व ठेवतात. त्यांच्या कर्मांच्या दोषामुळे जर आपल्या मैत्रीत बाधा येते तर आपली कमजोरी आहे. मैत्री भाव अबाधित ठेवणाऱ्यांना अशी कमजोरी शोभा देत नाही. दुष्टाशी सुद्धा मैत्री ठेवल्याने दुष्टही आपोआप मित्रता करू लागतो.

कोणाबरोबर ही शत्रुभाव ठेवणे, क्लेश करणे, द्वेष करणे, ईर्ष्या करणे हे सर्व पशूंचे गुण आहेत. मनुष्य तर उच्च कोटीचा प्राणी मानला जातो. त्यात पाशवी गुण नसावेत.

सर्व प्राण्यांशी भातृभाव असावा. मनुष्य जर स्वतःला मनुष्य म्हणतो तर त्या उच्चकोटीच्या मानवात मानवीय गुणातील प्रथम गुण 'मैत्री' आहे. त्याला हृदयात स्थान असलेच पाहिजे.११

आज आपण पाहतो एक समाज दुसऱ्या समाजावर, एक पार्टी दुसऱ्या पार्टीवर, एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर हावी होत आहे. अशावेळी शांती, संतोष, त्याग, साधना या गोष्टींचे इतके मूल्य नाही, जितके मैत्रीचे मूल्य आहे.

मैत्रीची आराधना म्हणजे शक्तीची आराधना, सहिष्णुता एक शक्ती आहे. जोपर्यंत शक्तीची उपासना होणार नाही तोपर्यंत मैत्री भाव स्थिर होऊ शकत नाही. निर्बल मनुष्य दिवसातून शंभर वेळा मैत्रीचा निश्चय करतो आणि शत्रुत्वाच्या भावनेला हृदयातून काढून टाकतो. परंतु नंतर अशी परिस्थिती येते की शत्रुत्वाचा भाव मनावर आक्रमण करतो. त्यापासून परावृत होण्यासाठी सहिष्णुताची शक्ती पाहिजे.

मैत्रीतील 'मै' अक्षर आपल्याला सूचना देते की, जो 'मै'ची रक्षा करतो तीच मैत्री. म्हणून 'मै'ला विराट बनवा जिथे 'तू'चा लवलेश ही नसणे ही मैत्री आहे.

मैत्री भावनेशिवाय धर्मध्यान सुद्धा होऊ शकणार नाही. धर्मध्यान करण्याचे माध्यम मन आहे. मनाला मैत्री भावनेने पवित्र करायला पाहिजे. आर्तध्यानातून मनाला मुक्त करून धर्मध्यानात लीन करण्यासाठी मैत्री भावनेची परम आवश्यकता आहे.

जेव्हा मैत्री भावना अंतःकरणपूर्वक होते तेव्हा शरीरसुद्धा स्वस्थ राहते. मोठा आजार समजा जडलाच तर सहन करण्याची शक्ती राहते. असाध्य आजार झाला तरी अशा व्यक्तींचा चेहरा हसतमुख राहतो. इतकेच नव्हे तर मृत्यूचा सुद्धा हसता-हसता स्वागत करतात.

चारीही योग भावनांमध्ये मैत्री भावनाचे अधिक महत्त्व आहे. कारण की मैत्री सर्व प्राणीमात्रांशी असायला हवी. प्रमोद भावना फक्त गुणीजनांसाठी, करुणाभावना दुःखी जीवांसाठी, माध्यस्थ भावना अथवा उपेक्षा अविनित जीवांसाठी केली जाते. ह्याच दृष्टीने तर मैत्री भावनेचे महत्त्व अधिक आहे. मैत्री असेल तरच प्रमोद, करुणा, माध्यस्थ भावना येऊ शकतात. दान देण्यासाठी धन पाहिजे. परंतु जीवमात्राच्या कल्याणाच्या भावनेसाठी फक्त उदार मन पाहिजे.

सुख-दुःख तर प्रत्येकाच्या जीवनात येत जात राहतात. स्वसुख प्राप्ती आणि स्व-दुःख निवारण संबंधी तीव्र संक्लेश जीवात्माच्या मनात होत राहतो. त्या संक्लेशापासून

मुक्त होण्यासाठी एकमात्र अनन्य उपाय 'मी सुखी व्हावे' या ऐवजी सर्वांनी सुखी व्हावे ह्या भावनेच सेवन करावे.

अशाप्रकारची भावना चित्ताचे संक्लेश दूर करण्यासाठी सांगितली आहे. या भावनामध्ये मैत्री भावना मुख्य आहे. या भावनेचे विशेष महत्त्व आहे. वास्तवात ही भावना भवनाशिनी आहे. धर्मबिंदू ग्रंथात हरिभद्रसूरींचे प्रसिद्ध कथन आहे.

'मैत्रादि भाव संयुक्त तद्धर्म इति कीर्त्यते' अर्थात मैत्रादी भावनेने युक्त क्रियानांच धर्म म्हणतात.

भावाद् भाव प्रसुतिः भावनेने भाव उत्पन्न होतात. अहिंसा, संयम तपाचा भावनेचा अटूट संबंध आहे. मैत्री, वैराग्य आणि अनासक्तीचा जीवनात प्रत्यक्ष आचरण आहे. ज्याप्रमाणे आचार शुद्धीसाठी अनशन, उणोदरी इ. बाह्यतप आवश्यक आहेत त्याचप्रमाणे विचार शुद्धीसाठी प्रायश्चित, विनय, वैयावच्च, स्वाध्याय इ. आभ्यंतर तप आवश्यक आहेत.

मैत्रादी भावनामुळे आचरणात अहिंसा, विचारात विश्वमंगलची भावना उत्पन्न होते.

संत कबीर सुद्धा आत्मवत् सर्वभूनेषु भावना व्यक्त करताना म्हणतात-

''ज्यूं जलमे प्रतिबिंब त्युं सकल रामहि जाणिजे''[१२]

जीव जेव्हा असा विचार करतो की कोणताही जीव तो उपकारी असो किंवा अपकारी त्याने पाप करू नये. दुःखी राहू नये. आणि सर्व संक्लोषापासून मुक्त रहावे. तेव्हा त्याच्या चित्तातील संक्लेश शांत होत आहेत असे दिसते.

आपल्या धर्मानुष्ठाच्या सफलतेचा आधार मैत्रीभावनेच्या दृढतेवर अवलंबित आहे. ज्या अनुष्ठानाच्या मागे या भावनेचे बळ नाही त्या अनुष्ठानाला धर्मानुष्ठान म्हणता येणार नाही.[१३]

म्हणून हरिभद्रसूरींचे वरील कथन सत्य आहे की, मैत्री इ. भावनेने युक्त क्रियाच धर्म आहे. उत्तराध्ययन सूत्रात म्हटले आहे-

मित्तीभावमुवगए यावि जीवे भावविसोहिं काऊण निष्भए भवई[१४]

अर्थात ज्या जीवाने मैत्री भाव प्राप्त केला आहे त्याची भाव विशुद्धी होऊन तो निर्भय होऊन जातो. भ. महावीरांनी सांगितले आहे साधकाने स्वतः सत्याची शोध घ्यावा. आणि विश्वातील सर्व प्राणीमात्रावद्दल मैत्रीभावाचा संकल्प करावा.[१५]

जर पूर्वग्रहामुळे अति द्वेषपूर्ण विचारांनी मन दूषित झाले असेल तर ज्या व्यक्तीबद्दल मनात द्वेष भरला असेल त्याच्याबदल मैत्री भावना जागृत करावी. त्या व्यक्तीने पूर्वी कधी थोडासा जरी उपकार केला असेल तर तो आठवावा. यामुळे मनात शुभभावना गतिमान होतील.[१६]

सम्यक्त्वाच्या शुद्धिसाठी देव, गुरू, धर्माची भक्ती आवश्यक आहे. आणि देव, गुरू धर्माच्या भक्तीसाठी मैत्री भावना तर अत्यंत आवश्यक आहे.

मैत्रीसाठी पातंजल योगाचा एक प्रसिद्ध सूत्र आहे -

''अहिंसाप्रतिष्ठायां तत्सन्निधौ वैरत्यागः'' अर्थात एखाद्याच्या मनात अहिंसा सिद्ध झाली तर त्याच्या आजुबाजूच्या वातावरणात वैरभाव फिरकत सुद्धा नाही. महान तपस्वी साधू अथवा सिद्ध योगी यांच्या सान्निध्यात असा अनुभव येतो.

ज्यांच्या मनात मैत्रीभावना असते त्यांचे चिंतनच असे असते- ''श्री श्रमणसंघामध्ये शांती येवो. जनपदांना शांती लाभो, राजा अधिकारी (प्रेसिडेंट वगैरे) यांना शांती मिळो. राजाच्या आसपास वावरणाऱ्या मंत्री, प्रधानमंत्रीमंडळ यांना शांती प्राप्त होवो. नातेवाईकांना शांती मिळो. ग्राम-शहरवासियांना शांती मिळो. मैत्री भावनामध्ये विश्वजीवदया इतकी विशाल होऊन जाते की माझे-तुझे असा भेदभाव करण्याची इच्छाच नाश पावते. तो अंतःकरणपूर्वक म्हणतो-

शिवमस्तु सर्वजगतः परहित निरता भवन्तु भूतगणा ।
दोषां प्रयान्तु नाशं, सर्वत्र सुखी भवतु लोकाः ॥

अर्थात जगाचे कल्याण होवो, सर्वप्राणी परहित करण्यात तत्पर होवो. सर्वांचे दोष दूर होवोत. सर्व जगातील लोक सुखी होवो. यात स्वजन, स्वमतावलंबी स्व-संबंधीचाच फक्त समावेश नाही तर सर्व जगासाठी मैत्री भावना आहे.

मैत्री म्हणजे सौहार्द्र. इतरांना सुखी पाहून कलुषित होणारे लोक ईर्षालू असतात. मैत्री भावना केल्याने हा दोष नष्ट होऊन जातो.

सभाष्य तत्त्वार्थधिगम सूत्रात मैत्रीचे वर्णन करताना श्री उमास्वातीजी लिहितात. ''मी सर्व प्राणीमात्रांना क्षमा करीत आहे. सर्व प्राणी मला क्षमा करोत. सर्व प्राणीमात्राशी माझा मैत्रीभाव आहे. कोणाही बरोबर माझा वैरभाव नाही. अशाप्रकारे अपराध केले असतील अथवा नसतील तरीही सर्वांशी मित्रता भाव ठेवल्याने इहलोक आणि परलोक दोन्ही ठिकाणी दुःखापासून मुक्ती मिळते.[१७]

जीवनात कधी अनुकूलता असते तर कधी प्रतिकूलता, साधक तोच आहे जो दोन्ही परिस्थितीत समभावाने राहतो. ज्याच्यात समभाव आहे, त्याच्या मनात शत्रुत्व कधी उत्पन्न होऊ शकत नाही.

मैत्रीचा व्यापक अर्थ पदार्थ जगत् आणि चैतन्य जगात सन्तुलन स्थापित करणे आहे. आ.आंददऋषीजी म. नी 'भावनायोग' पुस्तकात फार सुंदर उदाहरण दिले आहे. एकेकाळी लिंकनचे शत्रू खूप होते. लिंकन त्यावेळी राष्ट्रपती होते. त्यांचे हितचिंतक त्यांना नेहमी म्हणत, तुमच्या हातात सत्ता आहे. त्याचा उपयोग शत्रूंना नाबूद करण्यासाठी का नाही करत ? राष्ट्रपती लिंकनने उत्तर दिले- मी माझ्या शत्रूंना सद्व्यवहाराने समाप्त करतो. काही काळानंतर ते माझे मित्र बनतील. शत्रूला नष्ट करण्यापेक्षा शत्रुत्व समाप्त करणे हाच विरोधी पक्षाला समाप्त करण्याचा उपाय आहे.

मैत्रीचा विकास करण्यासाठी शक्ती आणि निर्मलतेचा विकास करण्याची आवश्यकता आहे.[१८]

आपल्या एकुलत्या एक मुलावर आई जसे प्रेम करते तसेच संसारातील प्रत्येक प्राण्यावर आपला स्नेह असावा.[१९]

मैत्र्या भूमिरतीव रम्या, भव्य जन रेव गम्या ।
निन्दन्त्यप कुर्वन्ति येवा ध्वन्ति द्वेषात् यष्टिभिरेव ।
मत्वा तेषां कर्म-प्रदोषम्, नैरपि मैत्री न छद्या ॥[२०]

अर्थात मैत्री भावनाची भूमी अत्यंत सुंदर आहे. भवी लोकच तेथपर्यंत पोहोचू शकतात. कोणी निन्दो किंवा वन्दो कोणाहीबद्दल मनात द्वेष येऊ नये. असा प्रसंग आला तर विचार करावा की याचा काय दोष आहे ? हे तर माझ्याच कर्माचे फळ आहे. द्वेष व विरोध करणाऱ्यांवरही द्वेषभाव नसावा. ही खरी मैत्री भावना आहे.

आपल्या मित्राशी जसे आपण वागतो, ज्या प्रेमाने वागतो, व्यवहार करतो त्याचप्रमाणे संसारातील प्रत्येक जीवाबरोबर प्रेमाने वागावे. ही मैत्री भावना आहे. मैत्रीमध्ये दोन आत्म्याचे मिलन होते. देह नष्ट होतो, पण मैत्री कधी नष्ट होत नाही. कारण ती देहातीत आत्म्याबरोबर असते.

प्रेमभाव, मित्रभाव, शुभचिंतन, सख्यता, सद्भावना, सहयोग हितैषिता, इ. मैत्रीचे समानार्थी शब्द आहेत.[२१]

मैत्रीभावना सम्यक्त्वाचा आधार आहे. कारण की अमैत्री भावना असणाऱ्यामध्ये अनंतानुबंधी कषाय भाव असतो. जोपर्यंत एकाही जीवावद्दल वैरभाव असेल तोपर्यंत मुक्ती प्राप्त होणे असंभव आहे.

वैराग्य भावनामुळे विषयांवर काबू प्राप्त होऊ शकतो. परंतु कषायभाव जिंकण्याचा साधा सरळ आणि शक्तिशाली उपाय मैत्री आहे. मैत्रीमुळे जीव तत्त्वाशी संबंध होतो. वैराग्याने जड (अजीव) तत्त्वाचा संबंध तुटतो. वैराग्यभावाने ममता जाते तर मैत्री इ. भावनेने समता प्रकट होते.[२२]

मैत्री भावनेचे आद्यउपदेशक अरिहंत परमात्मा आहेत. ते सिद्ध करणारे सिद्ध भगवन्त आहेत. जीवनात आचरण करणारे आचार्य भगवंत आहेत. मैत्रीभाव सूक्ष्म रूपाने समजणे आणि समजावणारे उपाध्याय भगवंत आहेत व अंतरबाह्य जीवनात त्याची साधना करणारे साधू भगवंत आहेत.[२३]

या पाचांना नमस्कार हे अमैत्री भावरूप पापाचा नाश करणारा आहे. आणि स्नेह भाव विकसित करून सर्व मंगल ओढून आणणारा आहे.

जिथे मैत्री इत्यादी भाव नाहीत तिथे धर्म नाही. ज्याप्रमाणे ज्यात गोडपणा नाही तो गूळ नाही. तसे पाहिले तर मैत्री भावना मनोयोगाचा व्यापाररूप असल्याने शुभाश्रव आहे. परंतु त्याच्या प्रभावामुळे आत्म्यात प्रकट होणार मैत्रीभाव मोहाचा क्षयोपक्षम आहे. म्हणून त्यास संवररूप समजायला पाहिजे. मैत्री इ. भावना धर्मध्यानाचे मूळ आहे. त्यातून जेव्हा त्याचा वृक्ष बनतो तेव्हा मोक्षरूपी फळ प्राप्त होते.[२४] मैत्रीभावनेच्या पुढे जाऊन विशिष्ट बनलेला आत्मोपम्य भाव निश्चितच धर्माचा प्राण आहे.

आत्मवत् सर्व भूतेषु, सुख-दुःखे प्रियाप्रिये ।
चिन्तयन् आत्मनोऽनिष्टा हिंसामन्यस्य मा चरेत् ॥[२५]

जो सर्व प्राणीमध्ये आपल्या आत्म्याप्रमाणे सुख प्रिय, दुःख अप्रिय आहे, हे मानतो, तो स्वतःप्रमाणेच इतरांची अनिष्ट हिंसेपासून दूर राहतो.

जे अज्झत्थ जाणई से बहिया जाणई ।
जे बहिया जाणई से अज्झत्थ जाणई एवं तुल्लामन्नेसिं ।

जो आपल्या आत्म्याच्या सुख-दुःखाला जाणतो, तो तत्त्वाने दुसऱ्यांच्या जीवांच्या सुखदुःखादींनाही जाणतो. हा तुल्यता अर्थात आत्मोपम्य भाव तत्त्व समजायला पाहिजे.[२६]

मैत्री भावयतो नित्यं शुभो भावः प्रजायते ।
ततो भावोदकाजन्तो द्वेषाग्नि रूप शाम्यति ॥[२७]

निरंतर मैत्री भाव जोपासणाऱ्याला शुभभाव उत्पन्न होतो. आणि शुभभावरूपी जलाने आत्म्याचा द्वेषाग्नी शमन होतो.

सर्व जीवांना आपल्या आत्म्यासमान मानणे, पाहणे आणि संयमाचे पालन केले तर पाप कर्माचे बंध होत नाही.[२८]

मैत्री भावना निःस्वार्थ त्याग आणि उदारताचे प्रतीक आहे. बाकी सर्व संबंध कोणत्या ना कोणत्या स्वार्थावर आधारित असतात. परंतु मित्रता विशुद्ध हृदयाची अभिव्यक्त आहे. त्यात छल, कपट, स्वार्थ किंवा मोह यांना कोणतेही स्थान उरत नाही.

आज लोक दयेच्या अभावाला पाप मानतात. पण मैत्रीच्या अभावाला पाप मानत नाही. हे अज्ञान आहे. मैत्रीशिवाय दया मीठा शिवायचे जेवण शिवायच्या जेवणाप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे प्रजेतील कोणतीही व्यक्ती इतर कोणत्याही व्यक्तीचे अहित करतो तर तो गुन्हेगार बनतो. तसेच मैत्रीरहित जीव विश्व आणि जिनशासनचा द्रोही आहे. मैत्री इ. भावना लौकिक आणि लोकोत्तर दोन्ही प्रकारच्या जीवन व्यवहारासाठी परस्पर आवश्यक आहे.

नमस्काराने जीव मैत्री सिद्ध होते. जीवाशी अमैत्री मोठे पाप आहे. महा मिथ्यात्व आहे. परमसत्य अशी जीव तत्त्वाचा विरोध आहे. अनंताअनंत आत्म्याची परम उपेक्षा आहे, अनादर आहे. अवगणना आहे, परम संकुचितता आहे आणि चैतन्यतत्त्वाबद्दलची मूढ भावना आहे. यांचा नाश एका मैत्री भावनानेही संभव आहे.[२९]

वादविवाद करण्याने, अर्थसंबंधी अर्थात धनासंबंधी, याचना करण्याने, स्त्रियांशी अधिक संपर्क ठेवल्याने, घेण्याचीच भावनेला अग्रगण्य स्थान दिल्याने मैत्री भंग पावते. संकुचितता, स्वार्थ, कपट इ. मैत्री भावनेत बाधकतत्त्व आहेत. भावना सहयोग, सहानुभूती, दूरदर्शिता उदारता, निःस्वार्थता, निश्चलता आणि आत्मीयता, बन्धुता इ. आवश्यक साधक तत्त्वे आहेत.[३०] म्हणून विविध लोकांनी मैत्रीभावनेत वृद्धी करण्यासाठी विविध भाव प्रकट केले आहेत.

आचार्य शुभचंद्रजी मैत्री भावना संबंधी लिहितात की सूक्ष्म, स्थूल, त्रस, स्थावर इ. विभिन्न योनीत भिन्न-भिन्न स्थितीत असणाऱ्या जीवांबद्दल एक समान भावना, समीचीन भावना म्हणजे मैत्रीभावना आहे.

सर्व जीव कष्टापासून, दुःखापासून पीडेपासून मुक्त राहोत. पारस्परिक वैर, पाप, दूषित कृत्य, अपमान, पराभव सोडून सुखाने जगोत असे चिंतन मैत्री भावनेचे स्वरूप आहे.[३१]

आचार्य शुभचंद्र फार तत्त्वज्ञानी होते. त्यांनी मैत्री भावनेचे जे वर्णन केले ते फारच महत्त्वपूर्ण आहे. मैत्रीभाव केवळ मानवजातीपर्यंतच परिसीमित नाही. जैनदर्शन तर समस्त जीवांबद्दल मैत्रीभावनेचा व्यापक संदेश प्रदान करते. परिणाम स्वरूप साधकाच्या मनात समस्त प्राणीमात्रांबद्दल अहिंसा भाव उत्पन्न होतो. शत्रुत्व भावनाच संपुष्टात येते. तो कोणालाही, कोणत्याही प्रकारची हानी होऊ देत नाही. जेव्हा आपण कोणाला आपला मित्र मानतो मग त्याचे नुकसान कसे करणार ? करणारच नाही. कुणाला आपण आपला शत्रू किंवा विरोधी, प्रतिद्वंदी मानले तरच कोणी कोणाचे वाईट करेल. हाच बारा भावनांचा महिमा आहे. जो मित्र भाव अंतःकरणात परिव्याप्त होतो तो कोणाचेही नुकसान करूच शकत नाही. कोणाला आपला शत्रू, विरोधी किंवा प्रतिद्वंदी मानले तरच तो त्याचे नुकसान करतो. वाईट करतो. पण मन स्वच्छ झाले तर असे करण्याचा विचार सुद्धा मनात येत नाही. त्याची भावधारा उत्कृष्ट होत जाते "सर्वे भवन्तु सुखिना सर्वे सन्तुनिरामया, सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःख भाग भवते ।"

संसारातील सर्व प्राणी सुखी असावे. सर्व निरोगी, स्वस्थ असावेत. सर्वांचे कल्याण होवो. कोणालाही दुःख नसावे.

आज आपण जगात पाहतो परिवारिक, सामाजिक, राजनैतिक, राष्ट्रीय आणि अन्तर्राष्ट्रीय जीवन अशांत आहे. याचे एकच कारण आहे. त्यांच्यात परस्पर मैत्रीभाव नाही. त्यांच्यात आत्मीयता, निकटता, सहृदयता नाही. म्हणून इतर सर्व काही प्राप्त असूनही मानव मन अशांत आहे.

प्रतिस्पर्धा, वैर, विरोध, असहिष्णुता इ. वृत्ती मानवाच्या सुखी जीवनाला उद्ध्वस्त करून टाकतात. जर मैत्रीभाव असला तर वाईटवृत्ती आपोआप विलोप पावतात. मैत्रीभावना हृदयात जश-जशी वाढत जाते, तसतसे त्याच्या भोवतालचे वातावरण सुद्धा स्नेहपूर्ण, सौहर्दपूर्ण, सौजन्याने भरते.

परस्परातील शत्रुभाव, कलह, कदाग्रह इ. नी अशांत बनलेले जीवन मैत्रीभाव मनात जागृत होताच शांती सुखाने भरून जाते. अशा उच्च भावनेमुळे अन्य अनेक पवित्र भाव उत्पन्न होतात. जेव्हा मनात शांती असते तेव्हाच भगवत् भक्ती, स्वाध्याय, ध्यान

इ. पवित्र कार्यात रुची निर्माण होते. खरी अभिरुची क्रिया किंवा प्रवृत्तीमध्ये सहजपणे बदलते. अशाच प्रकारे सहजमैत्रीभाव जीवनात अनेक प्रकारची 'सात्त्विकता' उत्पन्न करतात.

ज्याप्रमाणे एक दिवा लावला तर त्याने अनेक दिवे लावले जातात, त्याचप्रमाणे एका उदात्त भावनेने उद्दिप्त झाल्याने अनेकानेक उत्कृष्ट भावना चमकायला लागतात.

आचार्य हेमचंद्रांनी योगशास्त्रात मैत्रीभावनेचे वर्णन सुंदर केले आहे. जगातील कोणत्याही प्राण्याने पापपूर्ण कार्य करू नये. दुःखाचे पात्र बनू नये. समस्त प्राणी दुःखमुक्त व्हावेत अशाप्रकारची भावना मैत्री भावना आहे.[३२]

मार्गानुसारीच्या ३५ गुणांत आणि श्रावकाच्या एकवीस गुणांमध्ये परार्थ भावनेला ज्ञानीजनांनी अग्रस्थान दिले आहे. ज्ञानी तत्त्वचिंतनाची गणना अध्यात्मामध्ये तेव्हा करतात जेव्हा त्याच्यात मैत्री इ. भाव असतील.

मैत्रीचे स्वरूप परहित चिंता मैत्री[३३]

म्हणजे इतरांच्या सुखाच्या हिताची चिंता करणे मैत्री होय. याच भावनेला अध्यात्मकल्पद्रुमात काही शब्द बदलून म्हटले आहे. मैत्री परस्मिन् हितधीः समग्रे.[३४]

योगशास्त्राच्या टीकेत म्हटले आहे -

समस्त तत्त्वविषयक स्नेपरिणाम मैत्री[३५]

हृदयात सर्व जीवांच्या बद्दल स्नेह हीच मैत्री आहे.

मैत्रीच्या स्वरूपाबद्दल लिहिले आहे- मैत्री पापी आणि दुःखी जीवांबद्दल करुणारूपाने व्यक्त होते. गुणी आणि सुखी आत्म्यासंबंधी प्रमोद रूपाने आणि धर्म व धर्मीलोकांबद्दल द्वेष करणाऱ्या प्रती करुणापूर्ण उपेक्षा म्हणजे माध्यस्थरूपाने व्यक्त होते. तात्पर्य, करुणा प्रमोद व माध्यस्थ हे ही मैत्रीचेच स्वरूप आहेत.

श्री जिनेश्वर देव निर्दिष्ट दान व सामायिक किंवा सर्वविरतिपर्यंत सर्व व्यवहार मार्गात मैत्री, प्रमोद, करुणा आणि माध्यस्थ या चारही भावना त्यात समाविष्ट आहेत. या भावनांचा विकास आणि आत्मविकास बरोबर होतो.

जीवसृष्टीसंबंधी वरील चार भावनांच्या ऐवजी हृदयात द्वेष, मत्सर, घृणा, तिरस्कार इ. भाव घर करून राहिले असतील तर समजावे की अजून मुक्तीचा मार्ग हाती लागला नाही.[३६]

प्रत्येक मित्राची इच्छा असते की आपल्या मित्राला दुःख नसावे. ज्यामुळे दुःखाचे बीज अंकुरित होते, वाढते, फूलते त्या दुःखाचे मूळच नष्ट होऊन जाते. मग दुःख समाप्त होऊन जाते.

तत्त्वार्थ सूत्राच्या व्याख्यामध्ये जैन शास्त्राचार्य श्री घासीलालजी महाराजांनी मैत्रीची व्युत्पत्ती अशी केली आहे- "मेघति स्नेहति इति मित्रं तस्य भावो मैत्री परहित चिंतारूपा" अर्थात जो स्नेह करतो त्यास मित्र म्हणावे. मित्राची भावना मैत्रीची असते, त्यात दुसऱ्याच्या हिताचे चिंतन असते. समस्त प्राणीमात्रांबद्दल स्नेहात्मक परिणाम असतो. प्रमादामुळे किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणामुळे कधी कोणता अपराध केला असेल तरी त्यांच्या प्रती हाच भाव असतो की हे माझे मित्र आहेत. मी मित्राचा द्वेष कधीच करणार नाही. कारण मित्राचा द्वेष करणे हे दुर्जनाचे काम आहे. मग मी तसे कसे वागू ? मी समस्त प्राणीमात्रांबद्दल क्षमाभाव धारण केला आहे. मनात सतत असा भाव ठेवल्याने वास्तविक मैत्री भावाची प्राप्ती होते. पुढे तो अजून विचार करतो ज्यांनी माझ्यावर अपकार केला आहे ते सुद्धा माझे मित्रच आहेत. त्यांच्याबद्दल ही माझ्या मनात क्षमाभाव आहे.[३७]

उपाध्याय विनयविजयजी यांनी आपल्या आत्म्याला संबोधित करताना फार सुंदर शब्दात म्हटले आहे- हे आत्मन् ! सर्वत्र मैत्रीचा विस्तार कर. जगात माझा कोणीच शत्रू नाही, असे चिंतन कर. या थोड्याशा जीवनात इतरांबद्दल वैरभाव ठेवून संतप्त का होतो ? या संसार सागराच्या यात्रेत सर्वप्राण्यांशी सहस्र वेळा तुझे बंधुत्वाचे संबंध राहिले आहेत. त्यादृष्टीने हे सर्व तुझे बंधूच आहेत, असा विचार कर. समस्त जीव अनेकवेळा तुझ्याशी पिता, बंधू, काका, माता, पुत्र, पुत्री, पत्नी, बहीण, पुत्रवधु इ. संबंधाने बांधले गेले होते. या समस्त प्राण्यांच्या जगात सर्व एकाच कुटुंबाचे आहोत. तुमचा कोणी शत्रू नाही असा विश्वास ठेव. एकेन्द्रिय इ. जीव सुद्धा पंचेन्द्रियत्व प्राप्त करून उत्तम प्रकारे धर्माची आराधना करून भव-भ्रमणापासून केव्हा मुक्त होतील, असा विचार कर. [३८]

या संसारात तुच्छ एषणांमुळे ज्यांच्यात वित्तेषणा, पुत्रेषणा आणि लोकेषणा इ. कामनांची पूर्ती होत नाही ती व्यक्ती आत्मस्वभावपासून च्यूत होते. त्या इच्छा पूर्ण करण्यासाठी तो हिंसा, शत्रुभाव, वैमनस्य इ. विकराल वृत्तीचा स्वीकार करतो. किती आश्चर्याची गोष्ट आहे की ज्या पित्याने पुत्राचे पालन पोषण केले, योग्य बनविले तोच पित्याची निर्मम हत्या करतो, एक भाऊ दुसऱ्या भावाच्या रक्ताने तहान भागवतो. हे सर्व अमैत्रीचा भावनेचा परिणाम आहे. अमैत्रीचा भाव उदयास आल्याने प्रियहून प्रिय, उत्तमाहून

उत्तम व्यक्तीला समाप्त करण्यात जर पण संकोच करीत नाही. या भावनेमुळे मिथ्यादोषारोपण असत्यात सत्यता अशा प्रकारची विपरीत भावना विषाक्त सर्पिणीप्रमाणे मानवाला गिळंकृत करतात. म्हणून जैनाचार्यांनी मैत्री भावनेवर खूप जोर दिला आहे. जर सर्वांबद्दल मित्रत्वाची भावना दृढ होऊ शकली तर कुणाला मारण्यासाठी उचलेला हात आपोआप खाली येईल. मनाची ही कलुषता ज्यामुळे मानव पशू बनतो. ती पशुना नष्ट होते. मैत्री भावनेत मानवीय एकताच काय पण प्राणीमात्रांबद्दल समत्वाचा उदात्त आशय भरलेला आहे.

कोणाच्याही बद्दल वैरभावना ठेवणे विषमता आहे-वैर भावनेमुळे अनेक प्रकारचे अनर्थ ओढवतात. ईर्षा-द्वेष इ.ची उत्पत्ती होते. ने नष्ट करण्यासाठी मैत्रीभावना सक्षम आहे.

मैत्रीभावनामध्ये साधकाने असे चिंतन करावे की सर्व जीव कष्ट व्यसन इ. ने मुक्त होऊन सुखाने जगो. वैर, पाप अपमानापासून मुक्त होऊन आनंदाने जगोत.

अधिकांश लोकांना वाटते की, ज्यांच्याजवळ धन-वैभव-सत्ता-शक्ती आहे, त्यांना मैत्रीची काय आवश्यकता आहे ? पण हा केवळ भ्रम आहे. धन, सत्तेने मैत्री विकत घेता येत नाही. ती तर मनुष्याचे गुण पाहून स्वतः प्राप्त होते.

अमेरिकेच्या कोणी पत्रकाराने धनाचा कुबेर श्री. हेनरी फोर्ड यांना विचारले, तुमच्या जीवनात कोणती एखादी अशी वस्तू आहे की जी तुम्ही पैसे देऊन विकत घेऊ शकला नाही ?'' हेनरी फोर्ड म्हणाले, ''जर मला माझे जीवन पुन्हा सुरू करण्याची संधी मिळाली तर सर्वात प्रथम मी मित्रांचा शोध घेईन.'' धन मिळाले पण दिलदार मित्र मिळाला नाही.

धन, सत्ता, ज्ञान यांच्या अहंकाराने मनुष्य मैत्रीपूर्ण हृदयापासून वंचित राहतो. सत्ता व शक्तीने गुलाम मिळतात पण मित्र मिळत नाही. मित्र मिळण्यासाठी तर नम्रता, सहानुभूतीपूर्ण निष्कपट हृदय पाहिजे. मैत्री भावना निस्वार्थ त्याग आणि उदारतेचे प्रतीक आहे.

मूलाचारात प्रतिक्रमाणाच्या सहा आवश्यकामध्ये प्रथम आवश्यक सामायिकमध्ये वर्णन करताना लिहिले आहे- ''सर्व जीवांशी मैत्री भाव ठेवा. आणि अशुभ परिणामचा त्याग करून ही भाव सामायिक आहे.''[३९]

विश्वातील सर्व प्राण्यांबरोबर मैत्रीपूर्ण व्यवहार करणे ही समतायोगाची साधना आहे. मैत्रीचा महिमा वर्णन करताना एक पाश्चात्य वैज्ञानिक एडिसन (Addison) म्हणतात-

Friendship improves happiness and abates misery, by doubling our joy, and dividing our gried मैत्री आपली प्रसन्नता दुप्पट करते दुःख हरवते. आनंद वाढवते. विपत्ती सुद्धा कमी करते.[४०]

मैत्रीचे व्यापक रूप विश्वमैत्री आहे. ज्याचा आत्मा विश्वमैत्रीच्या भावनेने ओतप्रोत होऊन जातो. त्याचे विचार, संकल्प, व्यक्तित्व व शक्तीचा दूरवर प्रभाव पडतो. कारण की विश्वमैत्रीचा पाया अहिंसेवर आधारित आहे. एकदा अहिंसेचे जीवनात पदार्पण झाले की दुष्ट, क्रूर, जीवसुद्धा सर्व परस्परातील वैरभाव विसरून जातात. मनुष्यप्राणिपासून क्षुद्र प्राण्यांपर्यंत सर्वांमध्ये पारस्परिक मैत्री निर्माण होते.

मनुष्य इतरांपासून निःस्वार्थ शुद्ध प्रेमाची अपेक्षा करतो. परंतु जेव्हा त्याला ते मिळत नाही तेव्हा त्याच्या अंतःकरणात उदासी व्यापते. प्रेम न मिळण्याच्या असफलतेमुळे त्याच्या चिंतनाचा प्रवाह सरळ मार्ग सोडून विरुद्ध मार्गाकडे वळतो. चिंतनाचे स्वरूप बदलून जाते. त्याचे मानसिक संतुलन बिघडते. विक्षिप्त, अर्धविक्षिप्त अवस्था होऊन जाते. पागलपनाचा मानसिक रोग मैत्रीच्या अभावामुळेच लागू होतात. त्याचा उपाय एकमात्र शुद्ध मैत्री, प्रेम भावना विकसित करणे हाच आहे. म्हणून रोज प्रार्थना करावी की,

मैत्री भावनुं पवित्र झरणुं, मुज हैया मां वह्या करे ।
शुभ थाओ आ सकल विश्वनुं, एवी भावना नित्य रहे ॥

मैत्री युक्त मानव क्रूर, विरोधी, शत्रू वाटणाऱ्या जीवांनाही आत्मीय मित्र व बंधू बनवू शकतात. ज्याच्या मनात मैत्रीभावना दृढ झाली तो क्रूर प्राण्यांच्या समोर आला तरी भयभीत, क्षुब्ध, चंचल होत नाही. अशा साधकाची मनस्थितीचे वर्णन करताना श्रीमद् राजचंद्रजी लिहितात-

एकाकी विचरतो वळी स्मशानमां
वळी पर्वतमां वाघ-सिंह संयोग जो,
अडोल आसने मनमां नही क्षोभतो,
परम मित्रनो जाने पाम्यो योग जो ।[४१]

सर्व प्राण्यांबद्दल सुखाचे चिंतन करणे मैत्री आहे. त्याचे चार प्रकार आहेत-

१) उपकार मैत्री २) स्वकीया मैत्री ३) स्वप्रतिपन्नामैत्री ४) अखिलाश्रयामैत्री.

१) उपकार मैत्री - आपले आई-वडील, देव, गुरू, धर्माचार्य इ. बद्दल मैत्री भाव असणे उपकारमैत्री आहे.

२) स्वकीय मैत्री - उपकारी नसले तरी स्वजनसंबंधी आहेत अथवा ज्यांच्याशी रक्ताचे संबंध आहेत अथवा जे आपले धर्म, संप्रदाय, राष्ट्रजाती वर्ण, व्यवसाय इ. शी संबंधित आहेत त्यांच्याबद्दल मैत्री भावना-स्वकीया मैत्री आहे.

३) स्वप्रतिपन्नामैत्री - जे आपल्या पूर्वजांच्या आश्रित राहिले आहेत किंवा वर्तमानात आपल्या आश्रित आहेत, त्यांच्याशी मैत्रीभाव असणे स्वप्रतिपन्ना मैत्री आहे.

४) अखिलाश्रयामैत्री - संसारात जितके प्राणी आहेत, त्या सर्वांशी मैत्री भावना असणे अखिलाश्रया मैत्री आहे.[४२]

संत केवलरामजी एका गाडीवानाबरोबर चालत होते. चालता-चालता त्याला कृष्णचरितामृत ऐकवत होते. अचानक जेव्हा बैल एका ठिकाणी थांबले तेव्हा गाडीवानाने त्याला २-४ चाबकाचे फटके मारले. चाबकाच्या फटक्याने बैल जोरात पळायला लागला. गाडीवानाला जेव्हा संत मागे राहिले हे लक्षात आल्यावर मागे वळून पाहिले तर संत मूर्छित होऊन पडले होते. गाडीवान पळत जाऊन त्यांना उचलले. त्याने पाहिले की बैलांना मारलेल्या चाबकाचे वळ केवलरामजींच्या शरीरावर उमटले होते. जेव्हा प्राणीमात्राबद्दल 'आत्मवत् सर्वभूतेषु' रूपात मैत्रीभावना परिपक्व होते तेव्हा आत्मत्व आणि विश्वत्वमें अभिन्नता निर्माण होते.

मानव-जीवन सुख-शांती आणि प्रसन्नतेने व्यतीत करण्यात मैत्री सहायक आहे. दुर्जनाची मैत्री सुरवातीला सघन वृक्षाच्या छायेप्रमाणे वाटते पण हळूहळू क्षीण होत जाते. परंतु सज्जनाची मैत्री अपरान्ह छायाप्रमाणे सुरवातीला कमी परंतु नंतर क्रमशः वाढत जाते.[४३]

ज्या साधकाचे हृदय मैत्रीभावनेने परिपूरित होऊन जाते, तो प्राणीमात्राच्या भल्यासाठी उत्सुक असतो. तो सर्वांना आपल्याप्रमाणे समजतो. तो चिंतन करतो.

''सव्व पाणा न हीलियव्वा न निंदियव्वा''[४४]

अर्थात कोणत्याही प्राण्याची अवहेलना करू नये व निंदाही करू नये.

घड्याळातील कोणताही छोटासा भाग निरर्थक समजून काढून टाकला तर घड्याळ बंद पडते. जगाचे घड्याळ ही असेच आहे. कारण की, कोणत्याही लहानातल्या लहान समजल्या जाणाऱ्या मजूर, हरिजन इ.ची अवहेलना करू नये. सर्व आपआपल्या परीने जीवन जगताहेत. नथुरामसारख्या सामान्य माणसानेच गांधीची हत्या केली. शक्यता आहे की आपल्याला सुद्धा या जगात कोणीही व्यक्ती समाप्त करू शकते. माणूस तर ठीक पण साप, विचूं, डास सारखे क्षुद्र प्राणीसुद्धा आपल्या जीवनाचा अंत करू शकतात. म्हणून कोणाचीही कधीही अवहेलना करणे म्हणजे स्वत:च्या जीवनाचे अंतिम दर्शन करण्यासारखे आहे. कोणाशीही शत्रुत्व असू नये. शत्रूला नष्ट करण्यापेक्षा शत्रुत्व नष्ट करावे. मैत्रीचा हात पुढे करावा हीच मैत्रीभावना आहे, हेच मैत्री भावनेचे रहस्य आहे.

उत्तम मैत्री भावना सबको सुखी बनाय ।
वैर शोक सबका हरे, अंत मुक्ति ले जाय ॥[४५]

सर्व जीव सिद्धावस्था प्राप्त करू शकतात. परंतु कर्मवश दु:खी दिसतात. वैरभाव, दु:ख, चिंता आणि भयाचे स्थान आहे. तो राग-द्वेष वाढवतो व चित्त विक्षुब्ध करतो. पण मैत्रीभावना चिन्ता एवं भय दूर करून अपूर्व शांती आणि सुख देते. मैत्रीभावनेमुळे मन सदैव आनंदित व स्वस्थ राहते. संच स्व-पर जीवनात अभय निर्माण होते.

जीवनात अवरोध निर्माण करणारे मनुष्य तथा अन्य क्रूर प्राणी यांना हटविण्यासाठी आणि त्यांना सहयोगी व अनुकूल करण्यासाठी सर्वात सुंदर अहिंसक उपाय आहे मैत्री भावना. मैत्रीच्या मधुरसात सद्भावनेने प्रतिकूल व्यक्तींचे हृदय आन्दोलित होते. आणि अनुकूल सहयोगी अधिक घनिष्ट बनतात. कारण मैत्री शरीराशी संबंधित नाही, ते तर आत्म्याचे मिलन आहे. मैत्रीमुळे चैतन्ययात्रा सुखद, सरस, सरल आणि मधुर बनते.

मैत्री मानवजातीचे कोमल नवनीत आहे. मधुर गोरस आहे. तो जाती, संप्रदाय, राष्ट्र, प्राप्त इ.च्या गौरवाला अक्षुण ठेवतो.

मैत्रीने आत्मीयता, स्नेह, प्रेम, सौजन्य, परस्परात वाढते. द्वेष वैर कटुता, द्रोह, पक्षपात, मनोमालिन्य दूर होते.

प्रमोद भावना

संसार एक राजमार्ग आहे आणि जीवन एक यात्रा. ही यात्रा सर्व प्राणीमात्रांना करावी लागते. आपण सगळे यात्री आहोत. आपणा सर्वांचे एक ध्येय, एकच लक्ष्य आहे.

जर सर्वांचे ध्येय, लक्ष्य एकच आहे, मार्ग समान आहे तर प्रत्येकाची एक दुसऱ्याशी मित्रता असणे स्वाभाविक आहे.

"परस्परोपग्रहो जीवानाम् ।"[४६]

एक दुसऱ्याच्या उपयोगी पडणे हा जीवमात्राचा स्वभाव आहे. शारीरिक भिन्नतेमुळे जीवाचे विभिन्न रूप असले तरी एक दुसऱ्यासाठी समर्पित होण्याचा गुण त्याच्यात विद्यमान आहे. या समर्पण भावनेचे दुसरे नाव मैत्री आहे. मैत्रीचा अनुभव तोच करू शकतो ज्याचे हृदय प्रेम, सहानुभूती व सौजन्याने परिपूर्ण असते.

मित्रतेचा निर्वाह तेव्हा होतो जेव्हा हृदयात खरे प्रेम असेल. एक दुसऱ्यांच्या उपयोगी पडावे, गुणांवर दृष्टी असावी. गुणांना पाहून उत्साहित, प्रसन्न व्हावे.

मैत्री भावनेमध्ये समस्त जगाबद्दल मित्रत्वाची भावना करण्याची प्रेरणा मिळते. परंतु ही मैत्री वाढवावी कशी ? त्याचे समाधान प्रमोदभावनेने होते. मैत्रीला साकार रूप देण्याचा उपाय प्रमोद भावना आहे. आपली आंतरिक प्रसन्नता, कृतज्ञता, हित मित, प्रिय, शिष्ट वाणीने अभिव्यक्त करावी. ही अभिव्यक्ती अनेक प्रकाराने करता येते. उदा. आदर दाखवून, गुणांचे वर्णन करून, भोजन इ. देऊन सत्कार करून, एक दुसऱ्यांच्या सुख-दुःखाविषयी विचारपूस करून, दुःख दूर करण्याचा प्रयत्न करून, दुसऱ्या शब्दात सांगायचे तर मित्रता व्यक्त करण्यासाठी, मैत्री इ. करण्यासाठी प्रमोद भावना जरूरी आहे.

सर्वार्थ सिद्धि वृत्तीमध्ये प्रमोद भावनेचा अर्थ असा सांगितला आहे.

वदन- प्रसादादि भिरभिव्यज्यमानान्तर्भावितरागः प्रमोदः[४७]

चेहऱ्यावर प्रसन्नता अंतरंग भक्ती व अनुराग व्यक्त करणे म्हणजे प्रमोदभावना आहे.

प्रमोदभावाचे धनी गौतमगणधर यांनी अतिमुक्तक राजकुमाराची अगदी लहान बालकाप्रमाणे सरलता, सुलभ बोधिता पाहून त्याला बरोबर घेऊन त्याच्या घरी जातात. त्याला महावीरांच्या दर्शनाला घेऊन जातात. त्यामुळे अतिमुक्तकावर इतका परिणाम होतो की ते मुनी दीक्षा अंगिकार करतात.[४८] जो स्वतः गुणी आहे तो दुसऱ्यांच्या गुणांचा आदर करू शकतो.

महापुरुषांच्या गुणांबद्दल सद्भाव ठेवणे त्यांची स्तुती अनुमोदना करणे, गुणांची प्रशंसा करणे प्रमोद भावना आहे. प्रमोदभावनेचा पाया गुणानुराग आहे. गुण आपल्यात

ही असतात व अन्य व्यक्तीतही असतात. त्या गुणांची प्रशंसा करणे ते आपले असो की दुसऱ्याचे. गुणच जीवाला गुणवान बनवतो.

गुणः पूजास्थानं गुणीषु न च लिंग न च वयं ।

गुणपूजा मुख्य आहे त्यात लहान-मोठा असा भेदभाव नाही. ज्यांच्यात गुण असतात त्यांची सर्वत्र पूजा होते. देवपण त्यांची सेवा करतात. हरिकेशीमुनि ज्यांचा जन्म कर्मोदयामुळे चांडाळ कुळात झाला, परंतु त्यांचे भवितव्य उत्तम असल्यामुळे त्यांना संतांचा योग मिळाला आणि स्वतः योग्य पात्र असल्यामुळे संत बनले. त्याग संयम, ज्ञान, ध्यान, सदाचार आणि सद्विचार यांच्या सहयोगामुळे यक्ष त्यांच्या गुणामुळे त्यांच्याकडे आकर्षित झाला आणि त्यांच्या चरणी सेवक म्हणून अहर्निश त्यांच्या सेवेत राहू लागला ''सक्खं खु दीसह तवो विशेषोः''[४९] अर्थात साक्षात तप इ. गुणांची विशेषता आणि प्रधानता आहे.

प्रमोदाची प्रतियोगी ईर्षा आहे. मनुष्याने ठरविले की गुणसंपन्न बनायचे आहे तर एक-एका गुणांचा स्वीकार करून गुणवान बनू शकतो. परंतु ईर्षालू इर्ष्येच्या अग्नीत स्वतः जळतो आणि दुसऱ्यांनाही जाळतो. गुणवान असणे सरळ आहे पण गुणानुरागी असणे फार कठीण आहे.

या जगात तीन प्रकारचे जीव आहेत.

१) गुणी आणि गुणानुरागी २) गुणी आणि गुणद्वेषी ३) अवगुणी आणि गुण द्वेषी

१) गुणी आणि गुणानुरागी - जो स्वतः गुणवान आहे आणि दुसऱ्यात असलेल्या गुणांना पाहून खुश होतो. त्यांच्या गुणांची अनुमोदना आणि प्रशंसा करतात. गुणांना पाहून प्रमोदित होतात. ज्याप्रमाणे श्रीकृष्ण भगवान रस्त्यात सडलेली कुत्री पाहून म्हणतात, ही कुत्री सडलेली आहे पण हिचे दात किती स्वच्छ आणि सुंदर आहेत ! पण रस्त्याने जाणारे-येणारे लोक मात्र नाकावर तोंडावर फडके ठेवून तिची घृणा करत होते. श्रीकृष्ण स्वतः गुणी होते. त्यांच्यात गुणानुराग सुद्धा किती विकसित झाला होता. हेच या उदाहरणाने सिद्ध होते.

गुणानुरागाशिवाय सम्यग्दर्शन पण प्रकट होत नाही. धर्माराधना सुद्धा फलदायी होत नाही. गुणानुरागीच धर्मात्मा बनू शकतो. गुणानुरागाने तीर्थंकर पद पण प्राप्त होऊ शकते. म्हणून गुणानुराग हा गुण जोपासून वाढविणे अत्यंत जरूरीचे आहे.

२) **गुणी आणि गुणद्वेषी** - स्वतः गुणवान असून दुसऱ्यांच्या गुणांना जो पाहू शकत नाही. प्रशंसा ऐकू शकत नाही. आणि प्रसन्नता ही घालवतो तो ईर्षालू बनतो. ईर्षामुळे मनुष्य-चित्तशांती घालवतो. स्वतःच स्वतःचा नाश ओढवतो उदा. सिंह गुफावासी मुनी ।

सिंहगुफावासी मुनी स्थुलिभद्रमुनिचे गुरू बंधू होते. जेव्हा स्थुलिभद्रमुनि रूपकोशा नावाच्या नर्तकीच्या घरी चातुर्मास करून आपल्या संयमभावनेत निश्चल राहून. अखंड संयमी राहून गुरूजवळ आले. तेव्हा सिंहगुफावासी मुनी, सर्पाच्या बिळाजवळ उभे राहून चातुर्मास करणाऱ्या मुनीला आणि विहिरीच्या किनाऱ्यावर उभे राहून चातुर्मास करणाऱ्या मुनींना धन्यवाद देताना गुरू म्हणाले, तुम्ही फार दुष्कर काम केले असे म्हणून त्यांच्या साधनेची खूप प्रशंसा केली. परंतु जेव्हा स्थूलिभद्रजी गुरूच्या चरणी आले तेव्हा गुरुदेव म्हणाले, ''वाह ! वत्स तू तर फार-फार दुष्कर, दुष्कर काम केले, साधना केली धन्य आहे, धन्य आहे. अशी त्यांची सर्वात जास्त प्रशंसा गुरुदेवांनी केली तेव्हा सिंहगुफावासी मुनींच्या मनात ईर्षा आणि द्वेषाची आग भडकली. स्थूलिभद्रजी रूप कोषानर्तकीच्या महालात भरपूर सुखसुविधाने राहून आले आणि आम्ही तर किती कष्टात मृत्यूच्या मुखातून, निर्भयपणे निसंग साधना करून आलो तरी ही आमच्यापेक्षा याची अधिक प्रशंसा ! असे का ? मी सुद्धा पुढचा चातुर्मास त्याच महालात जाऊन करीन असा मनात निर्णय केला. मनात निर्माण झालेल्या ईर्षेने त्यांनी गुरूकडून आज्ञा मिळविण्याचा प्रयत्न केला पण गुरूंची अवज्ञा करून अविचाराने आपली पावले उचलली आणि पुढचा चातुर्मास कोशावेश्याच्या तिथे केला पण परिणामरूप उलट झाला. ते संयमी जीवनापासून विचलित झाले. पण सदभाग्याने रूपकोषा स्थूलिभद्राच्या बोधामुळे श्राविका झाली होती. तिनेच त्या मुनींना बोध दिला आणि अनर्थापासून वाचवले.

संयमापासून पतित होण्याचे एकच कारण होते. ते स्वतः गुणवान होते. परंतु गुणानुरागी नाही बनू शकले. विनय विवेक मर्यादेचा नाश केला. आणि अवनतीचा मार्ग पकडला. म्हणून प्रमोद भावनामध्ये ''पर सुख तुष्टिमुदिता'' गुणी लोकांचे गुण पाहून सुखी जीवांच्या सुखाला पाहून आनंदित होणे प्रमोद भावना आहे.

३) **अवगुणी आणि गुणद्वेषी** - स्वतःत गुण नाही आणि दुसऱ्यांचे गुण पाहू शकत नाहीत. ज्यांच्या दृष्टीला अवगुण पाहण्याची सवय झाली आहे त्यांना जगात कोणी गुणवान दिसतच नाही. गुणग्राहीला मात्र सर्वत्र गुण ही दिसतात. गुणद्वेषीला चांगल्या

व्यक्तीत सुद्धा अवगुणच दिसतात.

उदा. एकदा कृष्णवासुदेवांनी युधिष्ठिर आणि दुर्योधनाला सांगितले नगरीत जा आणि गुणवान लोक किती आहेत आणि अवगुणी किती आहेत ते पाहून या. दोघे नगरीत हिंडले त्यांनी कृष्णाला सांगितले- युधिष्ठिर म्हणाले मला तर साऱ्या नगरीत एकही अवगुणी दिसला नाही. प्रत्येक व्यक्तीत एक ना एक गुण आहेच. जेव्हा दुर्योधन म्हणाला, 'मला तर साऱ्या नगरीत सगळेच अवगुणी दिसले. एकही गुणवान मनुष्य नगरीत भेटला नाही.

गुणदृष्टी हंससारखी आहे आणि दोषदृष्टी कावळ्यासारखी आहे. संपूर्ण शरीर चांगले असेल पण शरीराचा एखादा भाग जर जखमी असेल तर कावळा त्याच्यावरच बसणार. परंतु ज्यांची गुणदृष्टी असते त्याला काट्यातही फूल दिसेल.[५०]

प्रमोद भावना ज्याच्यात आहे त्या मानवाची भावना अशी असते-

''सौ प्राणी आ संसारना सन्मित्र मुज वहाला हजो,
सद्गुणमां आनंद मानू, मित्र के वैरी हजो ॥''

शत्रुमित्रावद्दल समभाव असणे शत्रूमध्येही गुण पाहणे प्रमोदभावना आहे. योगदर्शनात याला मुदिता भावना म्हटले आहे. [५१]

गुण नसतानाही एखाद्या व्यक्तीला पद प्रतिष्ठा मिळते. अशा व्यक्तीला प्रसन्न ठेवण्यासाठी त्याच्या पुढे-पुढे करणे, रुपये मिळवणे अथवा गैरे संबंधी आपले कोणतेही कार्य साधून घेण्यासाठी त्याची खुशामद करणे म्हणजेच चापलूसी करणे यास प्रमोदभावना म्हणता येणार नाही. गुणग्राहकता व चापलुसी यात जमीन आसमानाचे अंतर आहे.

गुणग्राहक व्यक्ती एक ना एक दिवस सद्गुणी बनते. ''यद् ध्यायती तद्भवति जी व्यक्ती जसे चिंतन करते ती तशीच बनून जाते. प्रमोद भावनेचा साधक महान आत्मा तसेच आपल्यापेक्षा आत्मविकासात प्रगती केलेल्या सत्पुरुषांच्या उज्ज्वल आणि पवित्र गुणांचे चिंतन करतो त्यामुळे तसाच बनतो.

गजसुकुमाराची क्षमा, धर्मरुची मुनींची करुणा, भ. महावीरांचे उग्र तप व कष्ट सहिष्णुता, शालीभद्राने पूर्वजन्मी केलेले दान-धन्नाचे वैराग्य, श्रीरामाचा समभाव, श्रीकृष्णाची अनसक्ती, कर्मयोग इ.च्या गुणांचे चिंतन केल्याने साधकाला खूप आत्मबल, अद्भूतप्रेरणा तथा त्यानुसार आचरणाचे प्रोत्साहन मिळते.[५२] ''महानीति भावयन महानभवति'' जो मनुष्य महान बनण्याची भावना करतो ते अवश्य कधी न कधी महान बनू शकतो. म्हणून ''मेरी भावना''त म्हटले आहे-

गुणीजनोंको देख हृदयमें मेरे प्रेम उमड आवे ।
बने जहॉतक उनकी सेवा करके यह मन सुख पावे ॥
होऊ नहीं कृतघ्न कभी मै द्रोह न मेरे उर आवे ।
गुणग्रहण का भाव रहे नित, दृष्टि न दोषोंपर जावे ॥[५३]

हा संसार फूल आणि काटे या दोन्हींचा संग्रहालय आहे. आपण तर भ्रमराप्रमाणे काट्यांची चिंता सोडून गुणरूपी रस ग्रहण करायला पाहिजे.

लोहचुंबकासमोर दगड, लाकुड, मातीचे कण इ. अनेक वस्तू ठेवल्या, परंतु ते सर्व सोडून तो फक्त लोखंडाच्या वस्तू असतील तेवढ्याच आपल्याकडे ओढून घेतो. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीमध्ये क्रोध, मान, माया ईर्ष्या द्वेष इ. कितीही अवगुण असोत, ज्याची गुण ग्रहण करण्याचा वृत्ती असेल तर त्यातून जो गुण असेल तेवढाच ग्रहण करतो.[५३]

एकदा गांधीजी लंडनला चालले होते. स्टीमरमध्ये एका इंग्रजाशी त्यांची ओळख झाली. तो इंग्रज सारखा त्यांना काहीतरी मनाला लागेल असे बोलत होता. गांधीजींना तो आपला शत्रू आहे असेच समजत होता. आणि गांधीजी त्याचे बोलणे ऐकून फक्त हसत होते. त्या इंग्रजाने एक लांबलचक कविता लिहिली ज्यात प्रत्येक शब्दात गांधीजींबद्दल कटुता, घृणा आणि द्वेष प्रकट होत होता. त्याने ती कविता गांधीजींच्या हातात दिली. गांधीजींनी त्या कवितेतील एक दोन ओळी वाचल्या. आणि संपूर्ण कवितेचा मतितार्थ त्यांच्या लक्षात आला. काही एक न बोलता त्यांनी कवितांच्या पानावर असलेली टाचणी काढली ती आपल्या डबीत ठेवून दिली अन् ते सर्व कागद रद्दीच्या टोपलीत टाकून दिले.

इंग्रज लगेच म्हणाला हे काय ! संपूर्ण कविता तर वाचा. तुम्हीतर एकदोन ओळीच वाचल्या असतील. गांधीजी हसत म्हणाले, ''याचा सार ती टाचणी तेवढी मी काढून घेतली.''[५५]

दोषदृष्टी असणाऱ्यांची जगात कमतरता नाही. ज्यांच्यामुळे गुणी लोकांना खूप कष्ट सोसावे लागतात. म्हणून मानवाचे हे परम कर्तव्य आहे की त्याने गुणानुरागी बनून सद्गुणांचा संचय करावा.

गुणाधिक व्यक्तींबद्दल आदरभाव ठेवावा, गुणग्राहकता असावी. अशा गुणीजनांना पाहून मन प्रमोदित व्हावे. हे प्रमोदभावनेचे व्यापक रूप आहे. ज्याप्रमाणे आकाशात काळ्या

ढगांना पाहून पावसाचे आगमन होणार या आनंदाने मोर पिसारा फुलवून नाचायला लागतो, त्याचप्रमाणे गुणीजन धर्मात्मापुरुष, समाजातील निष्ठावान व व्रतबद्ध सेवक तसेच राष्ट्राचे सेवाभावी नायक, सज्जन लोक यांना पाहताच चित्त प्रसन्न झाले तर समजावे की ही प्रमोदभावना आहे.

गुणग्राहक व्यक्तींनी अशी खरी प्रशंसा केली तर प्रोत्साहन मिळते व मरगळलेल्या मनात उत्साह निर्माण होतो. सुकून गेलेल्या रोपट्याला जसे पाणी घातले की ते टवटवीत होते तशी टवटवी येते त्याचप्रमाणे प्रशंसाचे जळकण कोमेजलेल्या अतःकरणाला उत्साहाला टवटवी आणतात. प्रशंसा आणि प्रोत्साहनाने अनेक व्यक्तींना पाठिंबा दिल्याने पुण्य प्राप्त होते.

इतरांना सुधारण्याची योग्य मार्गदर्शन करण्याची इच्छा असेल तर त्यांच्यातील दोषांना हळूवारपणे दूर करण्यासाठी प्रशंसा आणि प्रोत्साहन उत्तम आणि सर्वश्रेष्ठ मार्ग आहे. यामुळे सद्भावना वृद्धींगत होतात आणि दुर्भावना कमी होतात. जेव्हा मनुष्याला एकच गोष्ट वारंवार सांगण्यात येते तेव्हा त्याचे अर्न्तमन हळूहळू तसेच समजायला लागते. त्याची मनोभूमी त्यानुसार व्हायला लागते. म्हणून मानसिक विकासासाठी गुणान्वेषी दृष्टी, सज्जनांकडून प्रशंसा आणि प्रोत्साहनाची फार उपयोगिता आहे. म्हणून प्रमोदभावना विकसित करण्यासाठी गुणदृष्टी असणे आवश्यक आहे.

दोषदृष्टीचे दुष्परिणाम - ज्या व्यक्तींची वृत्ती क्षुद्र असते तो कुढणारा आणि इर्षालू असतो. तो आपल्या शक्तीचा उपयोग दुसऱ्यांचे दोष शोधण्यात करतो. दुसऱ्यांचे दोष पाहून दीन दुःखी होतो. दोषदर्शन करण्याचा कुविचार असल्याने त्याच्या शक्तीचा ऱ्हास होत राहतो. त्याच शक्तीचा सदुपयोग (गुणग्राहकता) केला तर तो आपले आणि दुसऱ्यांच्या हिताचे मोठे काम करू शकतो. इतरांचे दोष ढुंढाळण्याने माणसाला काहीच फायदा होत नाही. उलट नुकसानच होते.

प्रत्येक वस्तूची फक्त वाईट बाजूच पाहिल्याने, दोष, छिद्र शोधत राहिल्याने काही काळानंतर हाच स्वभाव बनून जातो. मग अशी स्थिती होते की अशा माणसाला सतत प्रत्येक वस्तूमध्ये दोष किंवा विकृती शोधण्याशिवाय चैनच पडत नाही. कोणतेही अन्य कारण नसले तरी तो स्वतः दूषित दृष्टिकोन, दुर्भाव, दुर्विचारांनाच विकसित करतो.

दुसऱ्यांचे दुर्गुण शोधणे म्हणजे टी. बी. कॅन्सर इ. रोगापेक्षाही भयंकर मानसिक रोग आहे. या रोगाने व्यक्तीच्या विकासाच्या मूळातच क्षयासारखी कीड लागते. दोषदृष्टीमुळे

व्यक्ती चांगल्या कामात लावल्या जाणाऱ्या वेळेचा दुरुपयोग करून नष्ट करते. दुसऱ्यांचे दोष आणि दुर्गुण पाहण्यामुळे व्यर्थ शत्रूंच्या संख्या वाढवतो. त्यामुळे सतत भयक्रांत राहतो. आणि आशंकित राहतो. सगळ्यात भयानक गोष्ट अशी की अशी व्यक्ती स्वतःची प्रगती उत्कर्ष करूच शकत नाही. आणि नाही दुसऱ्यांच्या उत्कर्षाला सहन करू शकते.

दोषदृष्टी असल्याने व्यक्तीची शांती नष्ट होऊन जाते. मनाची प्रसन्नता आल्हादभाव नष्ट होऊन जातो. अशा व्यक्ती सर्वज्ञ परमात्म्यातही दोष शोधू लागतात.

दोषदृष्टी असणारे लोक गुणांच्या ऐवजी दोषच शोधतात. त्यांना कोणाचेही चांगले झालेले पहावतच नाही. उदा. माशी विष्ठेवरच बसेल. कावळ्यासमोर पंचपक्वान्नाचे ताट ठेवले तरी तो शवावरच चोच मारेल. अशाचप्रकारे दोषदृष्टी मानव चांगुलपणा आणि गुणांनी भरलेल्या ताटाला लाथाडून दोषरूपी शवावर, विष्ठेवर नजर ठेवून आनंद मानतो.

दोषदृष्टीचा जोपर्यंत त्याग केला जात नाही. तोपर्यंत अंतरात्मामध्ये अहिंसा, सत्य, विनय, क्षमा, सेवा इ. कोणतेही गुण, सद्गुण त्याच्यात टिकणारच नाहीत. ज्याला गुणवान बनायचे आहे त्याने सर्वप्रथम गुण आणि गुणींची प्रशंसा करायला पाहिजे. हे त्याचे आद्यकर्तव्य आहे. गुणीजनांची प्रशंसा केल्याने नुकसान तर काहीच नाही उलट गुणीची प्रशंसा केल्याने गुणवानाचे गुण अधिक दृढे होतात. आपल्या गुणात वृद्धी करतात अशा प्रकारे प्रमोद भावनेमुळे स्व-पर उपकार साध्य होतो.

श्रावकाचे २१ गुण आहेत. त्यापैकी एक गुण गुणानुरागी असणे आहे. श्रावकाने तर गुणीजनांबद्दल प्रमोद भावना ठेवलीच पाहिजे. याने कर्म निर्जरा होते. आणि उत्कृष्ट गुणांचे अर्जन होते. तीर्थंकर गोत्र उपार्जन करण्याचे २० बोल आहेत. त्यातील प्रथम काही बोल परमेष्ठी, ज्ञानी ध्यानी, तपस्वीचे गुण कीर्तन करण्याचे आहेत.[५६]

काही व्यक्ती अशा असतात की त्या एखाद्या व्यक्तीत गुण नसले तरी त्यांचे गुणगान गातात. प्रशंसा करतात. परंतु याला प्रमोद भावना म्हणता येणार नाही. वस्तुतः ही गुणग्राहक दृष्टी सुद्धा नाही. यालाच चापलुसी म्हणतात. खुशमस्कऱ्या म्हणतात. आपला स्वार्थ साधण्यासाठी हा कपटपणा म्हणता येईल.

ही प्रवृत्ती सामुहिक जीवनाच्या दृष्टीने घातक आहे. याने अयोग्य व्यक्तीला आदर-सन्मान मिळाल्याने ह्या चांगल्या गुणांची महत्ता कमी करतात. कावळ्याच्या चोचीला सोन्याने मढविले, त्याच्या पायांना माणिक मोती जडविले तरीही कावळाच राहिल, राजहंस नाही होणार. कावळ्याला राजहंस बनविण्याचा प्रयत्न करणारे स्वार्थी असतात. जे खोटी

प्रशंसा करतात, याला गुणानुराग किंवा प्रमोद भावना म्हणता येणार नाही.

ईर्षा इत्यादी दोष दूर करण्यासाठी प्रमोद भावनेचे चिंतन अत्यंत आवश्यक आहे. दोषदृष्टी जर असेल तर तिथे गुणदृष्टी कधीच नसणार. उदा. एका गावात प्राचीन मंदिर होते. लोकांना त्या मंदिरावर अत्यंत श्रद्धा होती. मंदिराची फार पडझड झाली होती. मंदिरात जातांना लोक घाबरत होते की कुठे मंदिर पडून तर जाणार नाही ना ? शेवटी काही दिवसांनी लोकांचे मंदिरात येणे कमी-कमी होत गेले. एक दिवस गावातील सर्व लोक एकत्र जमा झाले आणि मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा विचार केला. जीर्णोद्धारासाठी प्रत्येक व्यक्तीने आपल्या संपत्तीपैकी तीन तृतीयांश हिस्सा घ्यावा असे ठरले. आहे त्या ठिकाणीच मंदिर बांधावे आणि तिथल्याच दगडांचा पुन्हा उपयोग करावा. निर्णय झाला पण एक श्रद्धाळू व्यक्तीने एक प्रस्ताव मांडला की, जोपर्यंत नवीन मंदिर बांधले जात नाही. तोपर्यंत जुन्या मंदिरातील प्रतिमा हलवू नये. आणि मंदिर पाडू नये. परंतु जुने पाडल्याशिवाय नवीन निर्माण असंभव आहे. त्याचप्रमाणे अप्रशस्तापासून दूर हटल्याशिवाय प्रशस्तामध्ये येणे असंभव आहे. दोषदृष्टी घालविल्याशिवाय गुणदृष्टी गुणानुरागिता किंवा प्रमोदभावना येणे शक्यच नाही. जिनहर्षगणि म्हणतात-

उत्तमगुणाणुराओ-निवसई हिय यंमिजस्स पुरिसस्सं ।
अतित्थयरपयाओ, न दुल्लहा तस्स रिद्धिओ ॥[५७]

ज्याच्या हृदयात उत्तम गुणवानांच्याबद्दल उत्कृष्ट अनुराग असतो त्यासाठी तीर्थंकर पदापर्यंतची रिद्धी दुर्लभ नसते. अर्थात त्यांना सर्व रिद्धि-सिद्धि सुलभतेने मिळतात.

जिनहर्षगणि कुलकमध्ये पुढे म्हणतात, किती ही तप केले, शास्त्राभ्यास केला. अनेक कष्ट सहन केले. परंतु जर दुसऱ्यांच्या गुणांची प्रशंसा केली नाही तर सर्व क्रिया निष्फल आहेत. दुसऱ्यांची प्रशंसा ऐकून जो मत्सर करतो, त्याचा निश्चित पराभव होतो. जगात जर मोठेपणा पाहिजे असेल, मोठे व्हायचे असेल, सर्वत्र विजय व्हावा असे वाटत असेल तर दुसऱ्यांचे दोष पाहण्याची वृत्ती सोडली पाहिजे.[५८] आणि चिंतन करायला पाहिजे की, या संसारात अनेक सत्पुरुष आहेत ज्यांच्यात अनेक सद्गुण आहेत. कित्येक महापुरुष ज्ञानाचे भंडार आहेत. अनेक सूत्राचे ज्ञाते आहेत. जैनागमातील रहस्यांना श्रोत्यांच्या हृदयापर्यंत पोहोचणारे, सिद्धान्त समजावून सांगणारे, तर्क-वितर्क द्वारा गंभीर विषय अगदी साध्या सोप्या भाषेत व्यक्त करणारे, कुतर्क करणाऱ्यांना अगदी शांतपणे विलक्षण कवित्व शक्ती व वक्तृत्व शक्तीने समजावणारे प्रभावशाली उपदेशाने धर्माची

उन्नती करणारे, असे गुणधारक आहेत. आत्मज्ञानी, गुणग्राही, अल्पभाषी, स्थिर आसनशील, गुणानुरागी, सदैव धर्मरूप वाटिकामध्ये आपल्या आत्म्याला रममाण करणारे आहेत. कित्येक महान तपस्वी असतात. कित्येक जवळ ज्ञान आणि तपाच्या शक्तीही नसते तरीही स्वधर्मी बन्धूची सेवा भक्ती करीत असतात. आहार, वस्त्र शैय्या, आसन इ. देऊन लाभान्वित होतात. साता देतात-

कित्येक सद्गृहस्थ तन, मन, धनाने साधु, साध्वी, श्रावक, श्राविका या चार तीर्थाची भक्ती करतात. धर्माची उन्नती करतात. आणि प्राप्त पदार्थांचा उपयोग सन्मार्गाकडे नावतात.

अशाचप्रकारे उत्तमोत्तम अनेक गुणज्ञांचे दर्शन होतात, त्यांची प्रशंसा ऐकून प्रसन्न होणे तथा असा विचार करावा की, धन्यभाग्य की आमच्या धर्मात असे असे नररत्न होऊन गेले ज्यांनी धर्माची खूप प्रभावना केली व करीत आहोत. ''अशा महापुरुषांची सदा जय होवो विजय होतो.'' असा विचार करून त्यांचा सत्कार, सन्मान करावा. त्यांना सुख द्यावे. कुणी त्यांची भक्ती केली आदर, सत्कार केला तर आपणास प्रसन्नता व्हावी. अशा अनेक सद्प्रयासाने प्रकट होणारी भावना म्हणजे प्रमोद भावना.[५९]

माणूस जसे चिंतन करतो, तसाच तो होतो. म्हणून प्रमोदभावनेद्वारा प्राचीन काळातील महापुरुषांच्या उज्ज्वल व पवित्र गुणांचे चिंतन सतत करीत रहायला पाहिजे. जी साधकाला विशाल आत्मिक शक्ती प्राप्त होण्यास पर्याप्त आहे.

प्रमोदभावना व्यक्तीसाठी डोळ्यांचे काम करणारी आहे. ज्याप्रमाणे डोळे रस्ता दाखवतात, म्हणजे आपण सुस्पष्टपणे पाहून चालतो. डोळ्याने पाहत चालतो म्हणून भीती नसते. तसेच प्रमोद भावना व्यक्तीच्या जीवनपथाची मार्गदर्शक आहे. त्याचे जीवन गुणगौरवाने संपन्न बनून आदर्श बनते. त्याची दृष्टी सत्यान्वेषी बनते. मग अशा व्यक्तीला संसारात कशाचे भय रहात नाही.

प्रमोदभावनेमध्ये चेहऱ्यावरची प्रसन्नता इ. द्वारा आंतरिक भावभक्ती प्रकट होते. त्या अवस्थेत मनात ईर्षा, द्वेष, घृणा, निन्दा इ.साठी स्थानच रहात नाही. गुणीजनांना पाहताच त्याचे हृदय कमल विकसित होते. मनमयूर नृत्य करायला लागतो. चेहऱ्यावर सात्त्विक हास्य दिसते. आणि सहज ही त्या गुणी व्यक्तीकडे अभिवादनासाठी हात जोडले जातात. अशाप्रकारे गुणग्राहकतेमुळे व्यक्तीचा आत्मिक विकास होतो. तो स्वतः गुणांचे आगार बनतो. आणि शेवटी समाजात, देशामध्ये, सर्वत्रच सर्वांसाठी पूजनीय बनतो.

प्रमोदभावना आत्मविकास व सद्गुणांच्या संचयसाठी श्रेष्ठ व सहज मार्ग असल्याने अनुकरणीय आहे. प्रमोद भावनेमुळे प्रमाददोष नष्ट होतो. गुणानुरागी दृष्टीमुळे गुणीजनांचे आशीर्वाद प्राप्त होतात. आणि लोकप्रियता वाढते. दोषदृष्टी एक उग्र कोटीचे विष आहे, जो भवभवपर्यंत जीवाला मारत राहतो. परंतु गुणदृष्टी अर्थात प्रमोद भावना ते अमृत आहे जो जीवाला अजर अमर बनवतो.

श्रीनमस्कार महामंत्रचे ध्यान म्हणजे प्रमोद भावनेची उपासना करण्याचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. नमस्कार मंत्र चौदापूर्व ज्ञानांचे सार आहे. अर्थात् प्रमोदभावनेला चौदापूर्व ज्ञानाचे सार म्हटले तर ती अतिशोयक्ती होणार नाही. श्री नवकार सर्व शास्त्रात व्याप्त आहे. तसेच प्रमोद भावना सर्व शास्त्रात व्याप्त आहे.

'नमो' हे मोक्षाचे बीज आहे. ज्याप्रमाणे नमस्कार सर्व पापनाशक आहे आणि सर्व मंगलात प्रथम मंल आहे. त्याचप्रमाणे प्रमोदभावनासुद्धा सर्व पापनाशक आणि सर्व मंगलात प्रथम मंगल आहे.

ग्रंथकार ग्रंथाच्या प्रारंभी इष्ट देवतांना नमस्कार रूपं भाव मंगल करतात, त्याचा अर्थच असा की सर्व शास्त्र आणि सर्व मंगल कार्याचा प्रारंभ प्रमोद भावनेनेच होतो.[६०]

अशाप्रकारे प्रमोदभावनेचे कारण शुभ आलम्बनाचा आदर केल्याने विघ्नांचा नाश होतो. तसेच ध्यान इ.मध्ये दृढता प्राप्त होते.

प्रत्येकाच्या आत्म्यात ज्ञान, दर्शन, चारित्राची अपार शक्ती आहे. परंतु जोपर्यंत आत्मा कर्माच्या आवरणाने मुक्त होत नाही तोपर्यंत साऱ्या शक्ती अप्रकटित राहतात. मानवाचे जीवन स्वार्थ इ. भावनेमुळे संकीर्ण बनते. स्वार्थी मनुष्य फक्त आपले तेवढे हित पाहतो. आपलेच गुण पाहतो. इतरांच्याबद्दल त्याच्या मनात तुच्छता आणि हीन भाव असतात. असे चिंतन अत्यंत हलक्या प्रतीचे चिंतन असते. याने आत्म्याचे अधःपतन होते. अशुभप्रवृत्तींचा जोर वाढतो. मानवजीवनच मुळी निरर्थक होऊन जाते. म्हणून आचार्यांनी प्रमोदभावनेच्या रूपाने आपले चिंतन उदारव्यापक आणि श्रेष्ठ करण्याची प्रेरणा दिली आहे. विशेषरूपाने सांगितले आहे की, गुणीलोकांच्यातील उत्तम गुणांना पाहून व्यक्तीच्या मनात प्रसन्नता निर्माण झाली पाहिजे.

आचार्य शुभचन्द्रांनी प्रमोद भावनेचे वर्णन करताना लिहिले आहे की, जो मनुष्य तप, शास्त्राध्ययन, यम-नियम इ. योग आराधनामध्ये संलग्न आहे, ज्ञानही ज्याचे नेत्र आहेत, इंद्रिय मन व कषायांना जिंकणारा आहे. आत्मतत्त्वाच्या अभ्यासात प्रवीण आहे.

जगाला चमत्कृत करणारे चारित्र ज्याचे आहे त्याचा आत्मा त्यातच रममाण आहे. अशा श्रेष्ठ पुरुषांच्या गुणांना पाहून मन आनंदित होणे म्हणजे प्रमोद भावना होय.[६१]

आचार्य हेमचंद्रांनी प्रमोद भावना संबंधी लिहिले आहे की, ज्यांनी हिंसा इ. समस्त दोषांचा परित्याग केला आहे, जो वस्तूच्या यथार्थ स्वरूपाला समजतो. ज्यांना सम्यग्ज्ञान, सम्यग्दर्शन, सम्यग्चारित्र प्राप्त झाले आहे. त्या महापुरुषांच्या गुणांचा आदर करावा ही प्रमोद भावना.[६२]

शांतसुधारसमध्ये उपाध्याय विनयविजयजींनी प्रमोद भावनेचे विश्लेषण करताना लिहिले आहे- पर्वताच्या शिखरावर, एकांत वन-प्रदेशात गुफामध्ये बसून धर्मध्यानात लीन, समता रसाने तृप्त, तपाचरणात मग्न साधू धन्य आहेत. अन्य ज्ञानीजन, श्रुतप्रज्ञा युक्त, धर्मोपदेश करणारे, शांत जितेंद्रिय तथा जगात जिनशासनदेवाची प्रतिष्ठा वाढवाणारे मुनीवृन्द, धन्य आहेत.

जे गृहस्थ दान देतात, शीलव्रत धारण करतात, तपश्चर्या करतात, सुंदर भावना करतात, श्रद्धापूर्वक धर्माची आराधना करतात ते धन्य आहेत. साध्वीवृन्द आणि श्राविकावृन्द जे निर्मल ज्ञानाने युक्त, शीलशोभा युक्त आहेत त्याही धन्य आहेत. भाग्यशाली व्यक्ती रोज या सर्वांची विनयपूर्वक भक्ती करतात. मिथ्यादृष्टी असणाऱ्यामध्ये सुद्धा परोपकार इ. विशिष्ट गुण असतील. संतोष, सत्य, उदारता, विनय इ. त्यांचीही आम्ही अनुमोदना करतो.

दुसऱ्यांचे गुण पाहून आनंदित होऊन, ज्यांची प्रज्ञा समता-सागरात लीन राहते. त्यांच्या मनात अत्यंत प्रसन्नतेचा अनुभव होतो.

उपाध्यायद्वारा केलेले हे प्रमोद भावनेचे फारच सुंदर विवेचन आहे. पुढे गीतिकामध्ये स्वतःला संबोधित करून म्हणतात- हे विनय ! तू गुणामध्ये परितोष अनुभव कर, अर्थात दुसऱ्यांचे गुण पाहून मनात संतोष अनुभव कर. आपल्या शुभकर्माच्या परिणामामुळे दुसऱ्यांनी ज्या विशेषता प्राप्त केल्या आहेत, त्यांच्याबद्दलसुद्धा ईर्षाभाव ठेवू नकोस, आनन्द प्रमोद भावाचा अनुभव कर.

ही किती चांगली गोष्ट आहे. कोणी भाग्यशाली दान देतो आणि जगात सन्मानप्राप्त करतो. त्याला पाहून तू असा विचार का करीत नाही की मी सुद्धा दान देईल ज्यामुळे मीसुद्धा पुण्याचा भागीदार बनू शकेन.[६३]

गुणांचा सन्मान केल्याने तशी अनुभूती केल्याने व्यक्तीमध्ये असलेल्या गुणामध्ये

आणखी भर पडते. कारण त्यात असा उत्साह निर्माण होतो की, ''मी सुद्धा असे ज्ञान, सदाचार, सेवा, नैतिकता इ. गुणांना आपल्या जीवनात यथाशक्ती स्वीकार करू शकेन.'' असा विचार करणाऱ्या व्यक्तीचे मन सदा स्वच्छ आणि निर्मल असते. त्याच्या मनात कधीही कलुषित चिंतन चालत नाही. त्याचे मन नेहमी प्रमुदित, प्रसन्न आणि हर्षित असते.

आश्चर्य आहे की ते कसे लोक आहेत ज्यांना दुसऱ्यांचे गुण पाहून कष्ट होतात, ईर्षा होते. मनात दुश्चिंतन चालते. त्यांच्या गुणामुळे ईर्षालुचे कोणते नुकसान होते ? पण खरं म्हणजे इतरांचे गुण पाहून ज्यांचे अंतःकरण विकृत होते. तेव्हा प्रमोद भावना असेल तर अशी विकृती राहूच शकत नाही. मग तो याच जीवनात उत्तम भाव उत्पन्न करून कल्याणाप्रद पोहोचतो.

संसारात दोषदृष्टी असणाऱ्यांना डुक्कर म्हटले आहे. जे चांगले खाद्य पदार्थ सोडून उकीरड्यावर लोळतात. अशाचप्रकारे दोषदृष्टी असणारा गुणांची उपेक्षा करतो व फक्त वाईट तेवढेच पाहतो. दुसऱ्यांचे छिद्र, दोष व अपराधांचाच विचार करतो तो मरेपर्यंतसुद्धा संवरधर्माची आराधना करू शकणार नाही.

आपण दुसऱ्यांचे कणाइतके गुणसुद्धा पर्वताइतके मानून आपल्या आत्म्याला भावित करावे. ज्या समाजात गुणग्राहकता जितकी अधिक तितकी त्या समाजाची उन्नतीचा आलेख ऊंच.

''नजरें यदि बदली तो नजारे बदल जायेंगे ।
किश्ती ने बदला रूख तो किनारे बदल जायेंगे ।।''

माणसाला जेवढा आनंद स्व-प्रशंसा, स्व-मान आणि स्व-कीर्ती ऐकण्यात येतो तितका आनंद त्याला अन्य लोकांची प्रशंसा ऐकण्याने होत नाही. परंतु द्वेषच वाटतो. दुसऱ्यांचे गुणगान केल्याने मुक्तीच्या मार्गाची योग्यता प्राप्त होते. महर्षी विनयविजयजींनी प्रमोद भावनेच्या प्रारंभी सर्वप्रथम सर्वगुण संपन्न आणि सर्वोकृष्ट पुण्यप्रकृती भोगणारे तीर्थंकर परमात्माच्या गुणांचे कीर्तन करताना लिहिले आहे की-क्षपकश्रेणी चढून कर्मांना क्षय करणारे तीर्थंकर भगवन्ताची जय होवो.

ज्ञानावरणीय, दर्शनावरणीय, मोहनीय आणि अंतराय कर्माच्या क्षय आणि उपशमनसाठी क्रमशः क्षपकश्रेणी आणि उपशमश्रेणी आहे. क्षपक श्रेणी द्वारा आत्मा त्या घाती कर्माचा मूळापासून, क्षय करते. आणि एकदा त्या घातीकर्माचा क्षय झाल्यानंतर आत्म्याचेच पुनः त्या कर्मांशी बंधन होत नाही. परंतु उपशमश्रेणी द्वारा आत्मा कर्माचा

फक्त उपशमन करतो. या उपशमन श्रेणीची वेळ अन्तर्मुहूर्त अर्थात एक मिनिटापासून अडेचाळीस मिनिट काही कमी इतका असतो. त्या अन्तर्मुहूर्त काळाच्या समाप्तीनंतर आत्मा त्या उपशमश्रेणीतून खाली येतो. आणि पुन्हा त्या कर्मांचा बंध सुरू होतो. क्षपक श्रेणीवर आरूढ झाल्यावर आत्मा बाकी राहिलेले मोहनीय इ. कर्मांनाही क्षय करून पूर्ण वीतरागी बनतो. असे अनन्तगुणांचे स्वामी तीर्थंकर परमात्म्याचे गुणगान करण्यात साक्षात् बृहस्पतीसुद्धा असमर्थ आहेत. त्यांचे गुणगान काय करावे ? तरी ही यथाशक्ती त्यांच्या सुकृत्याची अनुमोदना करने प्रमोद भावना आहे.[६४]

पुढे उपाध्यायजी निर्ग्रंथ मुनींचे गुणगान करताना लिहितात- 'पर्वत, जंगल, गुफा तथा निकुंज येथे राहून धर्मध्यानात दत्तचित्त राहणारे प्रशमरसात संतुष्ट पक्ष आणि मास सारखे विशिष्ट दीर्घ तप करणारे, श्रुतज्ञानाने विशाल बुद्धी असणारे, उपदेशक, शान्त, दान्त, आणि जितेन्द्रिय बनून जो प्रभुशासनाची प्रभावना करतात ते निर्ग्रंथ मुनी धन्य आहेत.[६५] अशाप्रकारे वरील गुणांनी युक्त मुनींचे गुणगान करतात. तदनंतर साध्वीगण व श्रावकांचे गुणगान करताना लिहितात-

जो श्रावक दान शील, तपाचे आचरण करतो आणि उत्तम भावना करतो अशाप्रकारे चारही धर्माची ज्ञान आणि श्रद्धेने आराधना करतो, तसेच जे साध्वीगण एवं श्राविका निर्जल बुद्धीने सदाचार पालन करतात ते सुद्धा धन्यवादाचे पात्र आहेत. या सर्वांची सतत अनेक वेळा जो अभिमान रहित भाग्यवानांची स्तुती करतात ते सुद्धा धन्यवादाचे पात्र आहेत.

''शान्तसुधारस''मध्ये उपाध्याय विनयविजयजींनी जे प्रमोद भावनाचे वर्णन केले आहे त्यात साधू, साध्वी, श्रावक, श्राविका रूप चार तीर्थांच्या गुणांचे वर्णन करून प्रमोद भावना प्रकट केली आहे.

'प्र'म्हणजे प्रकृष्ट, 'मोद' अर्थात आनंद, कोणत्याही जीवनात एखादा सुद्धा गुण पाहून अपार आनंदाचा अनुभव करणे प्रमोद भावना आहे.[६९]

संसारात अधिकांश लोग अनंता-अनंत अवगुणां (दोष) नी भरलेले आहेत. त्यांच्यात एखाद्यात एक जरी गुण दिसला तर ज्याप्रमाणे आई आपल्या बालकाला पहिला शब्द बोलायला लागल्यावर किती आनंदित होते, त्यावेळी त्याच्या बोलण्यातले दोष पहात नाही, उच्चार अस्पष्ट बोबडे बोलच तिला अत्यंत आनंदित करतात. बालक बोलायला लागला याचाच तिला अपार आनंद होतो. त्याचप्रमाणे गुणानुरागीला अनंत काळापासून दोषांनी

बेढलेल्या जीवात एक छोटा गुण दिसला तरी तो खुश होतो. एका छोट्याशा गुणात ही ती ताकद असते की, जो अल्पशा भवात आत्म्यातील सर्व दोष नाश करून टाकू शकतो. ज्याप्रमाणे अग्नीची एक ठिणगी हजारो मण कापसाला क्षणात जाळून नष्ट करते.

प्रमोदभावना महान दाता आहे. दुसरे दाते तर धन इ. तुच्छ क्षणिक वस्तूचे दान करतात. पण प्रमोद भावना तर शाश्वत सुख देणारे गुणांचे दान करते.

ज्यांचे मन निर्विकार आहे, ज्यांचा आचार आणि व्यवहार उच्च प्रतीचा आहे. जो जगातील जीवांचे कल्याण करण्यासाठी सतत तत्पर असतो, अशा महात्म्यांचे सतत नामस्मरण करणे ही सुद्धा प्रमोद भावनाच आहे. त्यामुळे अनेक कर्म नष्ट होतात. यात फार मोठे कष्ट ही नाहीत आणि फार मोठा त्यागही नाही. तरीही बदल्यात खूप लाभच लाभ आहे. अशी प्रमोद भावाना आत्मसात करण्याचा पुरुषार्थ करायचा आहे. प्रत्येक व्यक्तीने आपले जीवन सूपासारखे करावे. सूप सार-सार गहि लये थोथा देर उडाय'' म्हणजे गुणग्रहण करायचे अवगुणाकडे दुर्लक्ष करायचे. हंस ज्याप्रमाणे दूध-दूध ग्रहण करतो, पाणी मागे ठेवतो.

माझ्या पत्नीचे अपहरण केले होते. तो किती असदाचारी आहे असा विचार न करता रावणातील गुण लक्षात ठेवले. गुणग्रहणाची भावना ठेवली.

भगवती आराधनामध्ये प्रमोद भावनेला मुदिता भावना म्हटले आहे. मुदिता भावनेचे विश्लेषण करताना १६९१ व्या गाथेमध्ये श्री शीवार्याचार्य लिहितात - मुदिताचा आशय यतिगुण चिंता आहे. अर्थात् यती, श्रमण अथवा मुनींच्या गुणांचे चिंतन करून मनात प्रसन्न व्हावे. टीकाकाराने याचे स्पष्टीकरण असे केले आहे की, साधकाने चिंतन करावे की यती, मुनी, विनित-विनययुक्त, विराग-रागरहित, विभय-भयरहित आहेत. मान, अहंकार किंवा दंभ रहित आहेत, विरोध-रहित या क्रोध शून्य आहे. विलोभ-लोभ रहित आहेत. हे किती चांगले आहे. असा विचार करताना प्रसन्नता अनुभव करावी. गुणांचे संशोधन करणे-प्रमोद भावना आहे. परंतु आजच्या जनजीवनात प्रतिस्पर्धा, ईर्षा इतकी वाढली आहे की, व्यापार, उद्योग, राजनीती, सामाजिक क्षेत्र आणि इतकेच काय धार्मिक क्षेत्रातही ती व्याप्त आहे. जेथे ईर्षा आहे, तेथे व्यक्ती, समाज एक दुसऱ्याची उन्नती, समृद्धी, संपन्नता आणि अभ्युदय सहनच करू शकत नाही. दुसऱ्यांची उन्नत स्थिती पाहून पीडित होतात. याचा परिणाम असा येतो की ज्याची तो ईर्षा करतो त्याच्याबद्दल तसेच भाव होतात. कारण जशी क्रिया तशी प्रतिक्रिया. आज राष्ट्रा-राष्ट्रांत, वर्गा-वर्गात, जाती-

आतींमध्ये कलुषित वृत्ती अतिशय वेगाने समाविष्ट होते. म्हणून अधिक शक्ती परस्परामध्ये कमीपणा दाखवण्यात खर्च होते. ही किती वाईट वृत्ती आहे. जर ही शक्ती समाजाच्या कल्याणासाठी खर्च खाली तर किती चांगले होईल. आज मनुष्याचे हृदय फार संकुचित झाले आहे. तो आपला स्वार्थ, लोभ आणि अर्थ लोलुपता सारख्या हलक्या वृत्तीचा शिकार बनला आहे.

अशाच प्रकारची दूषितवृत्ती, घृणास्पद व्यवहार जगात पसरू नये. मानव आपल्याच कर्मामुळे अजून दुःखी न व्हावा. या हेतूने शास्त्रामध्ये प्रमोद भावनाच्या रूपात जो सार्थक मार्ग प्रतिपादित केला आहे, त्याच्या आधार घेतल्याने विषम स्थिती आपोआप समाप्त होऊ शकेल.

ज्याच्या हृदयात इतरांचे सुख, संपन्नता, समृद्धी पाहून उल्लास आणि आनंद होतो ती व्यक्ती खरच महान असते. त्या व्यक्तीच्या उदारवृत्तीच्या प्रतिक्रिया सुद्धा फार उच्चप्रकारच्या असतात. अनुदारताने अनुदारताच जन्म घेते. दुसऱ्यांची प्रगती पाहून प्रकट होणारी प्रमोद भावनेमुळे वातावरण प्रेमपूर्ण, स्नेहमय बनते. विचारांची संकीर्णता आणि स्वार्थ परायणता टिकूच शकत नाही. प्रमोद भावनाची आजच्या युगात पदा-पदावर आवश्यकता आहे. जर प्रत्येक मनुष्याने या प्रमोदभावनेला आपल्या हृदयात स्थान दिले तर आपआपसातील अनेक विवाद, भांडण-तंटण, क्लेश, ईर्षा, द्वेष शांत होतील.

प्रमोदभावनेमुळे मनात मृदुता, मधुरता, कोमलता निर्माण होते. या भावनेचे चिंतन फार गुणकारी आहे. ईर्षाचे कालुष्य याने धुवून निघते. याने उत्तमोत्तम भाव जागृत होतात. सद्वृत्तींचा विकास होतो.

गुणज्ञ व्यक्तीमध्ये अहंकार नसतो. तो कृतज्ञतेच्या भावनेने नम्र असतो. गुणजनांचे गुणगान करून त्या गुणांचे आस्वादन करण्यासाठी लालायित असतो. तो गुणीजनांची सतत प्रशंसा करतो.

ज्याच्यात गुण नाही आणि गुणांना ग्रहण करण्याची आकांक्षा ही नाही. असा माणूस आकृतीने सुंदर असला तरी सुगंधाशिवायच्या फुलासमान आहे. म्हणून जो आपल्या जीवनात प्रसन्न राहतो अथवा राहू इच्छितो त्यांना गुणार्जन करण्याची वृत्ती ठेवली पाहिजे. गुणार्जनाच्या भावनेचे दुसरे नाव प्रमोद भावना आहे.

स्तोकोपि गुणि संसर्गो श्रेयसे भूयसे भवेत् ।

गुणीजनांचा थोडा जरी आपणाला संपर्क मिळाला तरी तो महान कल्याणकारी सिद्ध होतो.

गुणी होण्यापेक्षाही श्रेष्ठ आहे- गुणज्ञ व्हावे.

ज्या व्यक्तीचे मन गुणानुरागाने आप्लावित आहे तो द्वेष, ईर्षा इ. दुर्गुणांचा त्याग करतो. दुसऱ्याची उन्नती पाहून ते त्यांच्या पुण्याचे फळ मानून आपण ही सुकृत्य करावे अशी प्रेरणा घेतो. तो पापभीरू असतो. स्व-पर भाव नसल्याने स्वार्थावर विजय मिळवतो. जीवन, शरीर, यौवन इ. क्षणिक आहेत. असा विचार करतो की, मी त्या महानपुरुषांच्या मार्गाचे अनुकरण करून, संसाराच्या खऱ्या स्वरूपाला समजून घेऊन, भोग उपभोगांचा त्याग करून जे गुण त्या महापुरुषांनी आपल्या अंगी बाळगले व कर्म समूहांना नष्ट केले, त्याचप्रमाणे मी ही करावे. गुणज्ञ व्यक्ती प्रत्येक गुणी व्यक्तींच्या गुणांचे चिंतन मनन करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करते. आणि त्यांच्या गुणांचे जीवनात अनुसरण करून आत्मसात करण्याची भावना करते. अशा प्रमोद भावनेने भावित होते.

धर्ममार्गात सर्वात प्रबल जर कोणते विघ्न असेल तर ते आहे प्रमोद. प्रमोद भावनेमुळे प्रमाद दोष नष्ट होतो. गुणानुरागी दृष्टीने गुणीजनांचे आशीर्वाद प्राप्त होतात आणि लोकप्रियता वाढते. दोषदृष्टी हे एक उग्र प्रकारचे विष आहे, जो जन्मोजन्मी जीवाला मारत राहतो. गुणदृष्टी असे अमृत आहे जो जीवाला अजर अमर बनवतो.

प्रमोद भावना विनय स्वरूप आहे. विनय धर्माचे मूळ आहे. तसेच प्रमोद भावना भक्ती स्वरूप सुद्धा आहे. भक्तीने सम्यग्दर्शन प्रकट होते म्हणूनच तर प्रमोद भावना धर्म तथा सम्यग्दर्शनाचे मूळ आहे. प्रत्येक गुण गुणवानांचे गुणगान केल्याने आत्मसात होते. प्रमोदभावना हा गुण सन्मान रूप असल्याने सर्व गुणांचे मूळ आहे.

करुणा भावना

करुणेचा सिद्धान्त श्रमण संस्कृतीमध्ये फार विकसित झाला आहे. जैनदर्शनात अनुकंपा, करुणेचे रूप आहे. यास सम्यक्त्वाचे लक्षण म्हटले आहे. सम्यक्त्वीच्या हृदयात सहजपणे करुणाचा स्रोत झळकतो. तो कोणत्याही व्यक्तीला दुःखी कष्टी, पीडित पाहून दुःखी होतो. ''अनुकूल कंपनं अनुकंपा'' ही अनुकंपाची व्युत्पत्ती हाच अर्थ व्यक्त करते. मनात उत्पन्न झालेले कंपन किंवा व्यथा दूर करण्यासाठी तो पीडित व्यक्तीची पीडा दूर करण्यासाठी तत्पर होतो. असे केल्याने त्याला आत्मशांती मिळते. म्हणून अनुकंपा, करुणा करणे कोण्या पीडितावर उपकार नाही. आपलाच उपकार आहे. कुणी व्यक्ती एखाद्या रुग्णाची, पीडिताची सेवा करतो तेव्हा त्यास आंतरिक तृप्ती, समाधान आनंदाची अनुभूती होते. यावरून सिद्ध होते की, धर्माचे फळ केवळ परलोकातच गेल्यावर मिळते असे नव्हे

तर या लोकात इथेच त्याची फळे चाखायला मिळतात.

भगवती आराधनामध्ये आचार्य शीवार्य यांनी करुणेचे वर्णन करताना लिहिले आहे की- प्राणीमात्रांबद्दल अनुकम्पा भाव असणे म्हणजे करुणा. टीकाकारांनी करुणेची व्याख्या करताना लिहिले आहे की शारीरिक, आगन्तुक, स्वाभाविक, मानसिक तथा प्राकृतिक दुःख जे असह्य आहेत त्याने पीडित असणाऱ्या प्राण्यांना पाहून असे चिंतन करावे की, मिथ्यादर्शन, अविरती, कषाय तथा अशुभयोगामुळे उपार्जित (उत्पन्न) अशुभ कर्मपर्याय आहेत. कर्मरूपी पुद्गल स्कन्धाच्या उदयामुळे विपत्तींना विवश होऊन भोगत आहेत. असा मनात जो भाव निर्माण होतो ती अनुकम्पा किंवा करुणा होय.[६८]

ज्याच्या हृदयात करुणेचा स्रोत वाहतो तो स्वतःच्या सर्व दुःखाना सहन करतो. परंतु दुसऱ्यांचे दुःखपाहून द्रवित होतो. फक्त द्रवितच होत नाही तर त्या दुःखांना दूर करण्याचा प्रयत्नही करतो. जे दुसऱ्यांच्या दुःखाला दूर करतात त्याच्यावर कधीच दुःख येत नाहीत. आणि पापोदयामुळे दुःख आले तरी ते दूर करण्यासाठी अचानक कोणी सहायता करणारा भेटून जातो. प्रत्येक परोपकाराच्या मागे करुणा भावनेची भूमिका सक्रीय असते.

संसारात लोक आपआपल्या कर्माच्या परिणामानुसार सातावेदनीय अनुकूल वेदनीय-सुख भोगतात. अनेक व्यक्ती असातावेदनीय-दुःख भोगतात-अनेक प्रकारची पीडा, वेदना तथा व्याधींनी ग्रस्त असतात. अनेक प्रकारच्या संकटांना तोंड देत असतात. अशा प्रकारच्या यातना, दुःख प्राप्त प्राण्यांबद्दल मनात दयाभाव असणे म्हणजेच कारुणभाव आहे. करुणा, अनुकंपा एकाच भावनेचे प्रतीक आहेत.

करुणा हृदयाच्या कोमल, मृदू भावनांचे चिह्न आहे. अशांच्या मनात सात्त्विकता असते. जो दुसऱ्यांचे दुःख, पीडा पाहून द्रवित होत नाही, त्याचे हृदय पाषणाचे जणू असते. भगवान महावीरांनी करुणा आणि अनुकंपावर फार जोर दिला आहे. प्रश्नव्याकरणातील खालील सूत्र हे स्पष्ट करते-

"सव्वजग जीव रक्खन दयट्ठायाये पावयणं भगवया सुकहियं"[६९]

अर्थात संसारातील सर्वजीवांची रक्षा दया करण्यासाठीच महावीरांचा उपदेश आहे.

बौद्धधर्मात तर 'करुणे'ला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. त्यांनी इथपर्यंत म्हटले आहे की, जो करुणा साध्य करू शकत नाही त्याशिवाय त्याला निर्वाण ही प्राप्त होऊ शकत नाही. महाकरुणा, महाशून्यावर फार जोर दिला आहे. महाकरुणा, करुणेचे अत्यंत

उच्च आणि व्यापक रूप आहे. एका पीडित व्यक्तीला पाहून मनात इतकी तीव्र करुणा उत्पन्न होते ज्याप्रमाणे आपल्या पुत्राला संकटात पाहून आईच्या हृदयात करुणा निर्माण होते.

आचार्य शुभचंद्रांनी करुणाभावनेचे वर्णन करताना लिहिले आहे- जे जीव दैन्य, शोक, त्रास, रोग इ. पीडेने दुःखी आहेत, बंध-बंधनाने अवरुद्ध आहेत. जीवनाची याचना करतात, आम्हाला वाचवा असा आक्रोश करतात. क्षुधा, तृष्णा, परिश्रान्ती इ. ने दुःखीत आहेत, शीत, उष्ण इ. ने पीडित आहेत, लोक ज्यांच्याशी निर्दयतापूर्वक वागतात, जे मरणप्राय दुःख भोगत आहेत अशा अनेकानेक प्रकारच्या दुःखांनी ग्रासलेले आहेत त्यांना पाहून त्यांचे दुःख दूर करण्याची बुद्धी होणे म्हणजे करुणा भावना आहे.[७०]

आचार्य हेमचंद्रांनी करुणा भावना संबंधित संक्षेपात असा उल्लेख केला आहे- दीन, आर्त, दुःखित, भयभीत प्राणी जे आपल्या जीविताची भीक मागत आहेत त्यांचे दुःख दूर करण्याची भावना, करुणा भावना आहे.[७१]

दुःखी जीवांना पाहून ज्याच्यात हृदयात स्पंदन होते त्याचे जीवन जगणे सार्थक आहे ज्याच्या हृदयात दया, करुणा, अहिंसेचे भाव आहेत. भागवत पुराणात राजा रंतिदेवाचे आख्यान प्रसिद्ध आहे. ते अत्यंत करुणाशील व प्रजावत्सल होते. एकद रंतिदेवाच्या राज्यात दुष्काळ पडला. राजाने आपला सर्व अन्तभंडार दुष्काळपीडितांसाठी उघडा केला आणि प्रतिष्ठा केली की जोपर्यंत माझ्या राज्यात एक माणूस जरी उपाशी असला तर मी अन्न ग्रहण करणार नाही. ४९ दिवस राजाने अन्न ग्रहण केले नाही. शेवटी मंत्र्याच्या आग्रहामुळे राजा भोजन घेण्यासाठी बसला. एक घास अजून तोंडात घातला न घातला तोच एका स्त्रीचा आवाज आला. राजा जेवायचे थांबला. आपल्यापुढचे अन्न त्या स्त्रीला देऊन टाकले. दुसऱ्यांदा कुत्रा भुंकला. त्याला भाकरी देऊन टाकली, आता राजाच्या समोरील ताट रिकामे झाले. राजाने पाणी पिऊन आपली भूक भागवली. तेवढ्यात देवांनी रंतिदेवाच्या जयजयकाराची घोषणा दिली. राजाची असीम करुणा पाहून देवांनी जलवृष्टी केली. दुष्काळ, सुकाळात परिवर्तित झाला. असा आहे खऱ्या करुणेचा प्रभाव ![७२]

करुणा, दया अनुकम्पा समानार्थी शब्द आहेत. मनुष्यच काय जनावरामध्ये सुद्धा अनुकंपेचा भाव असतो. ज्ञानाधर्म कथामध्ये श्रमण भ. महावीर मेघकुमारांच्या पूर्वभवाचे वर्णन करतात. ज्यावेळी मेघकुमार मेरुप्रभ नावाच्या हत्तीच्या जन्मात होते तेव्हा एकदा ग्रीष्मऋतूमध्ये जंगलात वणवा पेटला. तेव्हा मेरुप्रभ हत्ती आपल्या रक्षणासाठी गवताच्या

मंडलाखाली जाऊन उभा राहिला. तिथे अनेक प्राणी आश्रयासाठी आलेले होते. मेरुप्रभ हत्तीला शरीरावर खाज येऊ लागली म्हणून त्याने आपला एक पाय वर उचलला. तेव्हा तेवढीच रिकामी झालेली जागा पाहून एक ससा तिथे येऊन बसला. हत्तीने पाय खाली ठेवण्याचा विचार केला. पण सश्यावर अनुकम्पा निर्माण झाली, पाय तसाच वर अधांतरी लटकत ठेवला. पेटलेला वणवा अडीच अहोरात्री नंतर पूर्ण शांत झाला. मग आगीच्या भयाने मुक्त झालेले सर्व प्राणी बाहेर आले. परंतु मेरुप्रभ हत्ती अडीच दिवस तीन पायांवर उभा राहिला त्यामुळे चौथा पाय त्याला खाली ठेवताच येईना. थोडा जोरात प्रयत्न केला तर धडाम खाली कोसळला. त्यानंतर तीन दिवस भयंकर यातना भोगून आपले १०० वर्षांचे आयुष्य पूर्ण करून तो श्रेणिक राजाच्या घरी राजकुमार मेघकुमाराने जन्म घेतला.

भ. मेघकुमाराला म्हणतात हे मेघ ! त्यावेळी प्राण्यावर अनुकम्पा करून तू संसार (जन्ममरण) परित (कमी) केला आणि मनुष्य जन्म मिळवला. तात्पर्य असे की, अनुकम्पा एक शुभ भाव आहे, शुभ प्रकृती आहे. एका हत्तीसारख्या प्राण्यातून तो मनुष्य त्यातही राजकुमार रूपात जन्म घेण्याचे सौभाग्य मिळतवो.[७३] अशी उदाहरणे साधकाच्या दृष्टीने अनुकरणीय आहेत.

उपाध्याय विनयविजयजींनी करुणा भावनेचे काव्यात्मक माधुर्यपूर्ण विवेचन केले आहे-

संसारातील प्राण्यांची किती मोहमूढ अवस्था आहे. ते खाण्या-पिण्यात, वस्त्र, आभुषण इ.मध्ये किती व्यग्र असतात. वैवाहिक संबंध संतती तथा अनुकूल सुख भोग घेण्यासाठी व्याकुळ होतात. मग त्यांचे मन स्थिर तरी कसे राहणार ? कोणत्याही मार्गाने का असेना तो धनसंपत्ती, वैभव मिळविण्याच्या प्रयत्नात असतो. आणि आपल्या ज्ञानानुसार त्यालाच शाश्वत समजून त्यास चिटकून राहतो. परंतु क्रूर, शत्रू, रोग, भय अथवा मृत्यू त्याचे हे ज्ञान अज्ञान सिद्ध करते. कित्यकांचे जीवन या स्पर्धेच्या युगात स्पर्धा करण्यातच खर्च होते. कित्येक क्रोध, मत्सर इ. ज्वालेत गधगत असतो. कित्येक धन, स्त्री, भूमी इ. साठी भांडत असतात. काही धन प्राप्तीसाठी देश-विदेशात भटकत राहतात. दुःखी होतात. संपूर्ण विश्व जणू उद्वेग आणि आपत्तीने घेरलेले आहे. अशा स्थितीत ते प्राण्यांचे हित किंवा उपदेश कसे ऐकणार ? धर्माबद्दलचा एक शब्द सुद्धा त्यांच्या डोक्यात शिरत नाही. त्यांना हे धर्म कर्म वगैरे थोतांड वाटते. अशाश्वताला शाश्वत समजून मृगजळासारखे नुसते धावत आहेत. मग त्यांच्या कष्टांचा आणि दुःखांचा वेग कसा थांबणार ?[७४]

जगाच्या उद्वेगपूर्ण स्थितीचे आकलन करताना उपाध्यायजींनी पाठकांना आपल्या जीवनात उत्तम धार्मिक भाव रुजविण्याची आणि मनाला करुणाशील बनवण्याची विशेष प्रेरणा दिली आहे.

ज्या माणसाच्या हृदयात करुणा नाही तो खरं म्हणजे माणूस म्हणवून घेण्याच्या पात्रतेचा नाही. आपले दुःख दूर करण्याचा सर्व प्रयत्न करतातच यात विशेष ते काय ? विशेषता तर त्यात आहे जी व्यक्ती दुसऱ्यांचे दुःख, पीडा, संकट निवारण करण्याचा प्रयत्न करते. त्या माणसाचे, माणूस म्हणून जन्म घेणे सार्थक आहे.

करुणा भावनेमुळे वातावरणात सहानुभूती आणि सहयोगाचे तत्त्व विकीर्ण होतात. ज्या व्यक्तीचे संकट दूर करण्यास प्रयत्न केला जातो त्या व्यक्तीच्या मनात सुद्धा अशी भावना जागते की माझ्यासारख्या अनोळखी माणसाबद्दल यांची किती उच्च भावना आहे. तो सुद्धा मग मनातल्या मनात विचार करतो मी सुद्धा कधी अशाच प्रकारे दुसऱ्यांना संकटातून मुक्त करण्यासाठी प्रयत्न करीन.

जो आज आपल्याला अतिशय सुखी, आनंदी, समर्थ दिसतो तो सदैव तसाच राहिल असे नाही. त्याच्या जीवनातही कधी अशी वेळ येते. कठीण प्रसंग येऊन शकतात तेव्हा त्याला कोणाच्यातरी मदतीची आवश्यकता पडते. त्यावेळी त्याला ही कोणी सहायक मिळू शकतो. ज्याचे त्याने कधी कष्ट दूर केले असतील तर कष्ट दूर करणारा भेटतो. तात्पर्य हे की हिंसेने हिंसा वाढते, अहिंसेने अहिंसा वाढते. करुणेने, करुणा वाढवते. दूषित भावनेने वातावरण अधिक दोषमय बनते. उत्तम भावनेने वातावरणात श्रेष्ठता, पवित्रता यांचा संचार होतो. दया ही असा एक उत्तम भाव आहे, ज्याने मानवता अलंकृत होते.

ज्ञानी जनांनी करुणेचे चार प्रकार सांगितले आहेत -

१) मोहयुक्त करुणा - मोहाचा अर्थ आहे अज्ञानता, करुणा अज्ञानजन्य सुद्धा असू शकते. उदा. एकलुता एक मुलगा आजारी पडला तर आईला डॉक्टरांनी सांगितले की याला गोड पदार्थ खायला देऊ नका. मुलाने जर मिठाई खाण्याचा हट्टच केला तर न राहवून आई त्याला थोडी मिठाई देते ही मोहयुक्त करुणा झाली.

२) असुख करुणा - म्हणजे ज्याच्याकडे सुखसाधनांचा अभाव आहे, ज्याच्या रोजच्या गरजा अन्न, वस्त्र, निवारा इ. देऊन भौतिक दुःख दूर करण्यासाठी भावना, आजाऱ्याला औषध, भुकलेल्याला जेवण इ. देणे, असुख करुणा आहे.

३) **संवेग करुणा** - ज्याच्या हृदयात मोक्षाची अभिलाषा आहे. त्याने विचार करावा की सर्व जीवांना मोक्ष मिळावा. सर्वांना परमशांती मिळावी. अशा संवेगमय जीवांना, मग मौज मजेत मस्तीत, रागरंगात मशगूल, असलेल्या लोकांना पाहून करुणा उत्पन्न होते की, या भौतिक मौजमजेत वेळ दवडणाऱ्या लोकांचे कसे व्हायचे ? मग तो भावना करतो की भौतिक समृद्धीमध्ये डुंबणाऱ्या जीवांनी क्षणिक सुखाचा त्याग करून शाश्वत सुखासाठी प्रयत्नशील व्हावे. ही आहे संवेग भावना.

४) **अन्यहित करुणा** - या करुणेचे क्षेत्र खूप विशाल आहे. सर्वजीवांच्या हिताची भावना, सर्वजीवाबद्दल अनुकंपा भाव, मग तो कोणी का असेना, ज्याच्याकडून कोणतेही स्वार्थ साध्य करण्याचा भावही नाही आणि राग किंवा द्वेष भावनेनेही नाही. फक्त माणुसकीच्या नात्याने स्वाभाविकपणे सर्व जीवमात्राबद्दल करुणाभावना यालाच अन्यहित करुणा म्हणतात. दुःख विनाशिनी म्हटले आहे. या भावनेने हृदय कोमल बनते. दुसऱ्यांचे दुःख पाहू शकत नाही. इतके हळुवार मन होते.

कारुणभावना सर्व धर्मात समाविष्ट आहे. श्री गणेशमुनी 'शास्त्री' लिहितात-

दया नदी के तीरपर, पलते सारे धर्म ।
छिपा हुआ सत्कर्म में, दया धर्म का मर्म ॥[७५]

तुलसीदासांनी पण म्हटले आहे-

''दया धर्म का मूल है, पाप मूल अभिमान ।
तुलसी दया न छोडिए, जब लग घटमें प्राण ॥''

धर्माचे मूळ दया आहे आणि पापाचे मूळ अभिमान आहे. जिथे दया, करुणा, कोमलता, आहे. अशांच्या हृदयातच धर्माचे बीज अंकुरीत होते. आणि जे हृदय कठोर आहे तिथे पापाचा वास असतो. करुणामुळे माणसाच्या मनातील भेद-भाव धुवून जातात. प्राणी मात्राशी आत्मीय संबंध जोडण्याची श्रृंखला करुणा आहे.

करुणा, मैत्रीचा प्रयोग आहे. संपूर्ण जगाशी ज्यांची मैत्री भावना आहे त्याची करुणा सुद्धा वैश्विक होऊन जाते. करुणेचा संबंध बाह्यदृष्टीने नसतो. ती तर आंतरिक हृदयातून प्रस्फुटित होणाऱ्या सरितेचा असा प्रवाह आहे जो सतत प्रवाहित होत राहतो. महावीर, बुद्ध, ख्राइस्ट इ. याचे उत्तमोत्तम उदाहरणे आहेत.

तीर्थंकर महावीरांना जन्मदेणारी त्रिशलामाता तर फक्त जन्मदात्री माता होती.

त्यांची खरी माता करुणामाता होती. ''मी संपूर्ण विश्वाचे मंगल करून जीवसृष्टीला शिव-स्वरूप बनवून दुःख आणि पापापासून मुक्त करीन अशा महाकरुणा भावनाने त्यांना तीर्थंकर भगवान 'महावीर' केले. आजच्या युगात अशी करुणा दिसणे दुरापास्तच आहे. डोळ्यात ईर्षाचा अग्नी, तिरस्कार, क्रोध आणि अभिमानामुळे श्रीमंत गरीबाचा तिरस्कार करतात. समाधीश नागरिकांशी असभ्यपणाने वागतात. कोणी कोणाचे ऐकायलाच तयार नाही.

पूर्वी करुणाशील हृदय असणारे लोक मुंगी पासून ते मोठ्या जनावरांपर्यंत सर्वांचे रक्षक होते. गरीबांसाठी गुप्तदान देत असत. ह्यामुळे प्रत्येकाच्या मनात संतोष होता. लूटालूट करण्याचा विचारसुद्धा कोणाच्या मनात येत नसे. आजच्या भीषण वातावरणात दया, करुणा, याची अत्यंत आवश्यकता आहे.

शरीरात जे स्थान हृदयाला आहे. तसेच स्थान साधनाच्या क्षेत्रात करुणाचे आहे. जर हृदयाचे ठोके थांबले तर हार्टफेल झालेच म्हणून समजायचे. त्याचप्रमाणे साधनेच्या क्षेत्रात करुणाभावाची गती मंद झाली तर साधनेमध्ये समताभावाचे आस्तित्व समाप्त होण्यास विलंब लागणार नाही.

क्लिष्टेषु जीवेषु कृपा परत्वम्[७६]

''माझा आत्मा पीडित जीवांवर सदैव करुणाभावाने भरलेला असो'' करुणाभावना आत्मौपम्य दृष्टी असेल तरच होऊ शकते.

संसारात सर्वांना सर्वत्र सुख, शांती, निरोगता, धनसंपन्नता सुव्यवस्था इ. सर्वप्रकारचे सुख साधन उपलब्ध असतील हे या काळात तरी शक्यच नाही. प्रत्येकाच्या मागे कोणते ना कोणते दुःख, मागे लागलेलेच आहे. मग ज्याचे हृदय करुणेने भरलेले आहे तो या समाजातील संसारातील दुःखी, पीडित, व्यथित लोकांना पाहून निष्क्रिय, निस्पन्द राहील हे अस्वाभाविक आहे. अशांच्यासाठी काहीच न करणे हे पाषाण हृदयाचे लक्षण आहे. अमानवीयता आहे. पीडितांसाठी हमदर्द होऊन सहृदयतापूर्वक करुणार्द्र व्हावे हे आद्य कर्तव्य आहे. पीडितांची उपेक्षा करणे म्हणजे असे हृदय जे बाळबंट आहे, त्यात करुणेचा अंश मात्र सुद्धा नाही, प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे की जर तो स्वःत सशक्त आहे, विचारशील आहे तर त्याने दुःखी जीवांबद्दल सहृदयता पूर्वक विचार करावा आणि करुणार्द्र होऊन यथा शक्ती त्यांची सेवा करावी.

भूकंप, अतिवृष्टी, अनावृष्टी, दुष्काळ, महामारी इ.मुळे आपदग्रस्त झालेल्या लोकांची सहायता करावी. दुःखी लोकांचे दुःख दूर करावे. पण त्याबरोबर हे ही लक्षात

ठेवावे की याचा गर्व, अहंकार करू नये की ''मी मदत करतो.'' उलट असा विचार करावा की त्या दुःखी, पीडित, व्यक्तीचे पुण्य प्रबल म्हणून दुःख निवारण करण्यात मी निमित्त बनलो. असा विचार पुण्य प्रदान करणारा आहे. त्याचे फळ ही मधुर मिळते.

सम्यग्दृष्टी संपन्न साधकाने असा कदापि विचार करू नये की ''हे प्राणी आपआपल्या केलेल्या कर्माचे फळ भोगताहेत. त्यांनी अज्ञान व मोहामुळे दुसऱ्यांना दुःख दिले, या दुष्कर्माचे फळ हे असे त्यांना भोगलेच पाहिजे. आपण तर त्यांना दुःख, त्रास दिला नाही, मग आपण कशाला त्यांचे दुःख निवारण करण्याच्या भानगडीत पडायचे ? त्यांनी केलेल्या कर्माची फळे ते भोगत आहे आपण त्याच्यात बाधक कशाला व्हायचे ? कोणी हृदयहीन व्यक्तीच असा विचार करतील.

आपण काही पूर्ण ज्ञानी (केवलज्ञानी) नाही की हे जीव कोणत्या कर्माची फळे भोगत आहेत? असे ही शक्य आहे की त्यांनी केलेल्या कर्माची फळे त्यांना, आपल्या सहानुभूतीने, सहृदयतेने, करुणेने आणि अनुकम्पाच्या रूपात सांत्वना किंवा आश्वासन त्यात भोगायचे आहे. जर आपल्या कडून करुणा इ.मुळे आश्वस्त होऊन कदाचित ते समभावपूर्वक कर्मफळ भोगतील. त्यांचा प्रसन्नातापूर्वक कर्मफळ भोगण्याचा विचार असेल तर त्यात आपले काय जाते ? म्हणून उदारतापूर्वक पीडितांच्याबद्दल करुणाभावना व्यक्त करायला पाहिजे.

सम्यग्दर्शनाची धडकन जाणण्याचे करुणा हे एक थर्मामीटर आहे. पू. घासीलालजी महाराजांनी करुणेचे विवेचन आध्यात्मिक पद्धतीने केले आहे- ''मिथ्यादर्शन व अनन्तानुबंधी इ. महा मोहाने जे ग्रस्त आहेत, कुमती, कुश्रुती व विभंगज्ञानाने जे युक्त आहेत, जो इष्ट प्राप्ती आणि अनिष्ट परिहार रहित आहेत. अनेक दुःखाने पीडित आहेत. दीन, दरिद्र, अनाथ, बालवृद्ध आहेत. त्यांच्याबद्दल अविच्छिन्न करुणाभावना धारण करावी. करुणाभावना करून त्यांना पाणी, वस्त्र, स्थान, औषध इ. देऊन अनुग्रहित करावे.[७७]

यात पू. घासीलालजी महाराजांनी दोन प्रकारच्या करुणांचे वर्णन केले आहे. मिथ्यादर्शन आणि अनंतानुबंधी महामोह व तीन अज्ञानाने युक्त जीवांवर भावकरुणा आणि अन्य बाह्य वस्तूंच्या अभावी पीडितांवर द्रव्य करुणाचे वर्णन केले आहे.

भगवान महावीरांनी चंडकौशिक सारख्या विषारी सर्पाला भावकरुणेने सद्गतीगामी केले. संगमदेवासारख्या शत्रूला स्नेहमय अश्रुबिंदूंनी सन्मानित केले. गोशालक सारख्या

कुशिष्याला सुद्धा हित शिक्षारूपी गोड शब्दांनी पश्चातापाचा पावन उपाय सांगितला. शांतिनाथ भगवान (१६ वे तीर्थंकर) मेघराजाच्या भवामध्ये (जन्मामध्ये) बाजपक्ष्याच्या तावडीतून कबूतराला वाचवण्यासाठी आपल्या शरीरातील मांस कापून दिले. तीर्थंकरांची करुणा तर पराकाष्ठेच करुणा होती.

पार्श्वकुमाराने (२३ वे तीर्थंकर) अग्नीत जळत असलेल्या लाकडांच्या मधून नाग-नागिणीला पाहिले (अंतरज्ञानाने) आणि पार्श्वकुमाराचे हृदय कासावीस झाले. त्या लाकडातील नाग-नागिणीला लाकडातून अर्धवट जळलेल्या अवस्थेतून बाहेर काढले आणि महामंत्र, नवकार मंत्र ऐकवला आणि ते नाग-नागिणी आत्म्यात शुभ परिणामात गेले. मरून धरणेन्द्र-पद्मावती देव-देवी झाले. नेमकुमार विवाहासाठी वऱ्हाड घेऊन निघाले. राजुलशी त्यांचा विवाह होता. मंडपाजवळ आल्यावर त्यांच्या कानावर पशूंचा दुःखाने आर्त स्वर पडला त्याचक्षणी त्यांचा आत्मा भावकरुणेने व्याकुळ झाला. माझ्या लग्नातील आमोद प्रमोद आणि मजेसाठी या पशूंना सजा ? माझ्या क्षणिक सुखासाठी बिचाऱ्या अबोल, मूक, परस्वाधीन पशूंची आहुती !! नको हा असला संसार, मला लग्नच करायचे नाही. असा निर्णय करून मेघकुमार परत फिरले.

"अयं खु नाणिणो सारं जं न हिंसई कंचणं ।"

कोणत्याही जीवाला कधी ठार मारू नये, दुःख देऊ नये, हेच ज्ञानीयांच्या ज्ञानाचे सार आहे- याच ज्ञानियांनी दाखवलेल्या मार्गावर चालण्याचे साधकांनी आपल्या प्राणापेक्षा त्राणाला (जीवरक्षा) अधिक महत्त्व दिले.

धर्मरुची अणगारांनी मुंग्यांची रक्षा करण्यासाठी कडू भोपळ्याची भाजी खाऊन टाकली. स्वतःला संपवून अभयाची दुंदुंभी वाजवली. आचार्य हेमचंद्रजींच्या उपदेशाने कुमारपाल राजाने अहिंसा धर्म स्वीकारला. आपल्या राज्यात अहिंसेचा प्रचार केला.[७८] अशाप्रकारे करुणेचे अवतार अनेक महापुरुषांची उदाहरणाने आपण आपल्या जीवनाला करुणाशील बनवू शकतो अशी प्रेरणा मिळते. परंतु भारतात मात्र मांसाहाराची प्रवृत्ती अधिकाधिक वाढत आहे. आज करुणा भावनेचा प्रचार-प्रसार करण्याची फार आवश्यकता आहे. जोपर्यंत मनात करुणा भावना ठसवली जात नाही तोपर्यंत मानव जीभेचे चोचले, धनाचा अनावश्यक लोभ यामुळे घोर दूषित, ह्या जघन्य कार्यापासून परावृत्त होऊ शकणार नाही.

मांसाहारात प्राणीघाताच्या दृष्टीनेच फक्त हिंसा होते असे नाही तर त्यावरोबर अन्य जीवांची ही हत्या होत असते. दिगंबर जैन परंपरामध्ये सुप्रसिद्ध आचार्य श्रीअमृतचन्द्राचार्य ''पुरुषार्थ सिद्धी'' ग्रंथात मांसाहाराचे हेयता प्रकट करताना लिहितात- प्राण्यांचा वध केल्याशिवाय मांस मिळत नाही. म्हणून मांसभोजीजीवाला अनिवार्यरूपेण हिंसा करण्याचे पाप लागतेच.[७९]

एकेन्द्रिय वनस्पतीजन्य, या भौमिक प्राण्यांमध्ये मांस नसते. मांस द्विइंद्रियांपासून पंचेंद्रिय प्राण्यांच्या शरीरात असते. अर्थात त्यांच्या शरीरातील तो भाग प्राप्त करण्यासाठी त्यांना मारावे लागते. हिंसा करावी लागते. काही लोक व्यर्थ तर्क करतात-की- जे प्राणी आपल्या मृत्यूने स्वतःच मेले आहेत त्यांचे मांस खाण्यात कशी हिंसा होईल ? हिंसेच पाप कसे लागेल ?

यासंबंधी आचार्य अमृतचंद्र म्हणतात, हे जरी खरे असले की, म्हैस, बैल इ. प्राणी आपल्या मृत्यूने मरतात. त्यांचे मांस विना हिंसा केल्याने ते प्राप्त होते. परंतु ते अखाद्य आहे. कारण स्वाभाविक वृत्तीने मृत्यू पावलेले म्हैस, बैल इ. जीवांच्या मृतशरीरात त्याच जातीचे अनंत सूक्ष्म समुच्छिर्म जीव उत्पन्न होतात. तथा अनंत निगोद जीवांची सतत उत्पत्ती होत असते. म्हणून नैसर्गिक मृत्यू पावलेल्या प्राण्याचे मांस खाल्याने सुद्धा त्यात उत्पन्न अनंत सूक्ष्म जीवांचा घात होतो. ही सुद्धा हिंसाच आहे. निश्चितपणे हिंसा आहे. म्हणून अशा मांसाहाराचा निरोध केला गेला आहे.[८०]

ज्याप्रमाणे स्वतः मृत पशूच्या मांसात अनंत सूक्ष्मजीव सतत उत्पन्न होत असतात, तीच स्थिती त्या मांसासंबंधी आहे. तो कच्चा असो अथवा शिवजलेला. सांगण्याचा उद्देश एवढाच की, मांस कोणत्याही अवस्थेतील असो त्यात अनंत सूक्ष्म निगोदिक जीव उत्पन्न होतच राहतात.

यावरून स्पष्ट होते की, शिजवलेले मांस सुद्धा निर्जीव असूच शकत नाही. त्यात सुद्धा पापच आहे. जो माणूस शिजवलेल्या मांसाचे सेवन करतो तो तर त्यांच्या मृत्यूचा यमतुल्य खराच. पण जो अशा मांसाला स्पर्श करतो त्यावेळी त्यात उत्पन्न होत असलेले अनेक जीव समूहाच्या पिंडाचा घात करण्याच्या पापात पडतो. स्पर्श करणारा सुद्धा तितकाच पापी आहे. म्हणून हिंसाचायपासून वाचण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या मांसाचा सर्वथा त्याग आवश्यक आहे.[८२]

मांसाहाराशी कोण्या जीवाचा प्राणातिपात अथवा वध तर आहेच. किंतु अजून एक महत्त्वपूर्ण तथ्य ज्ञातव्य आहे. मांस सेवनाने क्रोध, उत्तेजना, उद्वेग आणि कामवासनासारख्या कलुषित, कुत्सित, मनोवृत्ती उत्पन्न होतात. ज्यामुळे मानव अनेक प्रकारच्या पाप कार्यात निःसंकोच भाग घेतो. मांसाहारीमध्ये निर्दयता, नृशंसता आणि निष्करुणा तीव्रतम रूपात असते. जशी व्यक्तीला कोणाचेही प्राण घेण्यात जराही संकोच वाटत नाही. मांसाहार हा नितांत तामसिक आहार आहे. त्याच्या सेवनाने सद्-असद् विवेकाचे भानच रहात नाही. मदिरापान, धन प्राप्त करण्यासाठी अदत्तादान (चोरी) इ. वृत्तींचा त्याच्या प्रार्दूभाव होतो. तो विवेक भ्रष्ट होऊन जातो. म्हटले आहे- ''विवेक भ्रष्टाणां भवति विनिपातः शतमुखः- जो विवेकहीन होतो त्याचे पतन शतमुखाने होते. त्याच्यात शेकडो पापपूर्ण दुर्वृत्ती ठाण मांडून राहतात. वर सांगितल्याप्रमाणे ज्या व्यक्तीत करुणाभावना असेल तो आपले पोट भरण्यासाठी, जीभेच्या स्वादासाठी मांसभक्षणसारखे जघन्य कार्य कदापि करणार नाही. कारण की खाणे, स्वाद घेणे ही काही जीवनाचे ध्येय नव्हे. ही तर लोलुपता आहे. आणि हीच आत्मदुर्बलता आहे.

भोजनाचे लक्ष्य विलासिता, स्वाद किंवा दैहिक तुष्टी नाही. ते तर केवळ दैहिक जीवन निर्वाहाचे साधन आहे. म्हणून वास्तविक शरीराला जेवढी गरज आहे, शरीर स्वस्थ रहावे यासाठी जेवढे आवश्यक आहे तेवढे तेही सात्त्विक, अविकारोत्पादक असा आहार सेवन करणे योग्य होय. कारण मनुष्यजीवन बहुमूल्य आहे. महत्प्रयासाने ते मिळाले आहे. जीवनासाठी भोजन आहे. भोजनासाठी जीवन नाही. ज्या भोजनामुळे इहलोक परलोक बिघडणार असतील तर काय उपयोग ! विकार निर्माण करणारे भोजन तर साधकाला सर्वथा त्याज्य आहे.

स्वादच भोजन करण्याचे लक्ष नसावे, तसे पण समजा, स्वादाचाच विचार केला तरी शाकाहारात आंबट, गोड, कडू, तिखट इत्यादी कितीतरी स्वादिष्ट पदार्थ, मनोज्ञ पदार्थ बनवू शकतो. तसे मांसाहारात इतके पदार्थ सुद्धा करता येणार नाहीत.

या संदर्भात शास्त्रात लिहिले आहे -

सव्वे जीवावि इच्छांति जीविउं न मरिज्जिउं ।
तुम्हा पाणिवहं घोरं निग्गंथा वज्जयंति णं ॥[८३]

जगातील सर्व जीव जगू इच्छितात. कोणालाही मरण नको असते. म्हणून कधीही हिंसा करू नये.

यावरून एक प्रश्न उपस्थित होतो की, शाकाहारी लोक एकेन्द्रिय जीवांचा उपयोग करतात. त्यांची तर किती मोठ्या प्रमाणात हत्या होते. त्याला गौण कसे मानावे ? एकेन्द्रियप्राणी लहान (सूक्ष्म) आहेत. त्यांची अविकसित अवस्था आहे, तरीही त्यांना आपला जीव प्रियच आहे. त्यांना आपली भूक भागवण्यासाठी मारणे कितपत योग्य आहे ? एका वेळच्या जेवणासाठी पहा किती मोठ्या संख्येत त्यांना नष्ट केले जाते. शेवटी जीव तो सर्वांचा सारखाच ना ? मग ऐकन्द्रिय असो की पंचेन्द्रिय ? यावर विशेष चिंतन करण्याची आवश्यकता आहे. प्राणाच्या दृष्टीने सर्व प्राणी एक आहेत. किंतु देह, इंद्रिय इ. दृष्टीने त्यांच्यात फरक आहे. त्याला नगण्य समजू नये. मांस खाण्यासाठी जेव्हा माणूस उद्युक्त होतो तेव्हा त्याच्यात हिंसेची तीव्र भावना नसते. भावना फार क्रूर झालेली असते. तेव्हा तो मांस खाण्याच्या हेतूने प्राणिवध करतो. जरी स्वतः हत्या केली नाही तरी तो ते विकत तर घेतोच ती हिंसा त्याला लागणारच. तात्पर्य एवढेच की, पंचेन्द्रिय प्राण्याला मारण्यासाठी प्रथम अति निम्न कोटीचे हिंसक भाव मनात उत्पन्न होतात. या भावनेनेच मुळी आत्म्याचे पतन होते. एक शाकाहारी व्यक्ती जेव्हा शाकाहाराची सामग्री गोळा करतो तेव्हा मी घोर हिंसा करीत आहे, असे मनात दूषित भाव किंवा कुत्सित संकल्प नसतो. म्हणून अन्नहार किंवा शाकाहाराची तयारीमध्ये आरंभजा हिंसा म्हटले आहे. जी गृहस्थाश्रमात अनिवार्य आहे.

परंतु मांसाहार किंवा मांसाहाराची तयारीच अत्यंत घोर दुष्ट, जघन्य परिणामाने व्याप्त आहे. ती संकल्पना हिंसा आहे. म्हणून शास्त्रामध्ये नरकबंधाचे कारण सांगितले आहे. अशी हिंसा तथा हिंसाजनक कार्यापासून अलिप्त निवृत्त राहण्याचा एक मात्र हेतू कारुण्य भावना आहे.

मैत्री भावना कारुण्य भावनेला आधार देणारी आहे. जर मनात सर्व प्राणिमात्रांबद्दल मित्रतेची भावना असेल, निर्वैर वृत्ती असेल तर सहजपणे त्यांच्याबद्दल करुणा, दया, अनुकंपाचे भाव जागृत होतात. मैत्री भावना जीवनात प्रगाढ असेल तर प्रतिस्पर्धा आणि ईर्षा भाव समाप्त होऊन जातात. याने सुद्धा अहिंसक वृत्तियांना खूप बळ मिळते.

करुणा किंवा दया भावनाच्या प्रसाराचे क्रांतीपूर्ण पाऊल

अधिकांश जैन संप्रदायांच्या साधु-साध्वींना जेव्हा गृहस्थ वंदन करतात तेव्हा ते प्रायः त्यांना आशीर्वादरूपात 'धर्मलाभ' या शब्दाचा प्रयोग करतात. याचा अर्थ असा की वंदन करणाऱ्यांना हा धार्मिक शिष्टाचारपूर्ण व्यवहार योग्य आहे. सर्वस्व त्यागी साधूंना

असे वंदन अगदी योग्य आहे. त्यांचे संपूर्ण जीवनच मुळी धर्ममय आहे. धर्म हा त्यांच्या जीवनाचा सर्वोच्च आदर्श आहे. ते 'धर्मलाभ' अशी इच्छा करतात ते सर्वथा योग्यच आहे.

श्वेताम्बर परंपरामध्ये स्थानकवासी आणि तेरापंथी दोन असे संप्रदाय आहेत की त्यांचे साधु-साध्वी 'धर्मलाभ' न म्हणता ''दया पालो'' अशी शुभकामना करतात. तेरापंथी 'जेश्याजी' म्हणतात. आशय असा की त्यांच्यानुसार जिताचार धर्म भावना युक्त शिष्टाचार आहे.

स्थानकवासी परंपरेमध्ये 'दयापालो' हे वचन कशा प्रकारे आले याची चर्चा आजही होते. हा विषय खरोखर विचारणीय व अन्वेषणीय आहे. 'धर्मलाभ' म्हटले जातेतिथे धर्माचे सर्व उत्तमोत्तम तथ्य येऊन जातात. परंतु 'दया पालो' या वचनात दया म्हणजे अनुकंपा रूप धर्माचे एक अंग होते. पण काय दयाच फक्त एकमात्र धर्म आहे ? फक्त दया केल्यानेच जीव आपल्या परम ध्येयाला मोक्षाला प्राप्त होतो अशा अनेक शंका इथे उत्पन्न होऊ शकतात. 'दया पालो' असे म्हणण्यामागे काही विशेष कारण असले पाहिजे. यावर थोडा विचार करू या.

स्थानकवासी परंपरा जेव्हा सुरू झाली तेव्हा धार्मिक जगात दया, अनुकंपा, करुणा ह्याप्रवृत्ती फार कमी प्रमाणात लोकांच्यात होत्या. लोक बाह्य पूजा, अर्चना इ. कर्मकांडात अतिशय मग्न होते. कर्म काण्डात जास्तीत जास्त राहू लागले. धर्माच्या ज्या सत्प्रवृत्ती होत्या त्यांची तर उपेक्षाच करू लागले. त्यांच्यातून दया भाव ओसरू लागला असावा. दया, करुणा म्हणजे सर्वस्व धर्म नाही. तरीही धर्माचा प्रमुख, महत्त्वपूर्ण अंग जरूर आहे.

धर्माचा प्रासाद सम्यक्त्वाच्या पृष्ठभूमीवर म्हणजे मूलाधारवर आधारित आहे. जर सम्यकत्व नसेल तर ज्ञानही सिद्ध होत नाही आणि धर्मही सिद्ध होत नाही. सम्यक्त्वीची पाच लक्षणे सांगितली आहेत. त्यातील एक अनुकंपा आहे. जीवनात जर अनुकंपा किंवा दया नसेल तर सम्यक्त्व सिद्ध होत नाही.

अंतःकरणात दया किंवा करुणा असेल तर सहजपणे धर्मानुराग जागृत होतो. दयाळू माणूस कोणाचीही कधीच हिंसा करणार नाही. कोणाशीही क्रूरतापूर्ण व्यवहार करणार नाही. कोणावर अन्याय करणार नाही. त्याच्या आचरणात कर्कशता, कटुता नसते. तात्पर्य हे की, मनुष्यामध्ये दया, करुणा गुण असेल तर त्या आधाराने अन्य कितीतरी गुण आपोआप येतात, गुणामध्ये भर पडते.

धर्मरूपी कल्पवृक्षाचे बीज 'दया' आहे. ती जगातील सर्व सुख उपलब्ध करुण

देणारी तथा अनंत दुःखाचा नाश करणारी आहे.[८४]

इतकेच नव्हे तर या दया तत्त्वाला अधिक व्यापक स्वरूप आणि गरिमा देण्याच्या हेतूने, गृहस्थ काही काळापर्यंत साधू समान साधना करतात. त्या साधनेला 'दया' म्हटले आहे. अशा प्रकारचे दया साधनाचा अभ्यास करणाऱ्या साधकाला त्या काळापुरते अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह व्रतांचे पालन करायचे असते. स्वाध्याय, सामायिक, ध्यान इ. करतात. हे सर्व धार्मिक कृत 'दया' मध्ये समाविष्ट आहेत.

दया म्हणजे कोणतीही पीडा भोगत असलेल्यांना त्या पासून मुक्त करण्याचा प्रयत्न करणे. हा साधनात्मक अभ्यास अहिंसा आणि दया या शिवाय संवेग, निर्वेद तथा वैराग्य मूलक सद्वृत्ती त्यात समाविष्ट आहेत. त्यांनाही 'दया' म्हटले आहे. म्हणून दया, करुणा यांना सर्वाधिक गौरव, महत्त्व दिले गेले आहे.

जेव्हा कोणतीही एक गोष्ट सदृढ रूपात स्थापित करायची असते, तिला स्थायित्व द्यायचे असते तेव्हा त्याच एका गोष्टीला सर्व तऱ्हेने बळ देणे आवश्यक होऊन जाते. भार देऊन ती सांगावी लागते ज्यामुळे तेच तत्त्व स्मृतीमध्ये ठसून राहते. प्राचीन ज्ञानीजनांच्या मनात 'दया' बाबतीत असेच विचार आले असावेत. त्याकाळी 'दये'ला इतके महत्त्व दिले जात नसावे- हे शक्य आहे- म्हणून कदाचित परंपरापासून प्रचलित धर्माचा शिष्टाचार रूप सुआशिर्वाद रूप वचन 'दया पालो' रूपात परिवर्तित केला गेला असावा.

वृत्ती बदलण्यासाठी भावनेला फार महत्त्व आहे. क्रूरता, निर्दयता, निशंसता व परदुःखकातरता यासारखी आंतरिक दूषित वृत्ती दया भावनेने सतत अणुभावित, अनुप्रेरित राहण्याने क्रूरता, निर्दयता, नृशंसता, दया भावना जनतेच्या रगा-रगात पोहोचण्यासाठी धार्मिक आशीर्वचनामध्ये असे परिवर्तन केले जाणे वास्तविक त्या महापुरुषांचे एक प्रशंसनीय क्रांतिपूर्ण पाऊल होते.

साधू सर्वांच्या दयाचे चिंतन करतात. साधूमध्ये उपाध्याय, उपाध्यायातून आचार्य बनतात. तेव्हा 'दये'ची वृद्धी होते. आणि आचार्य पद आणि पदवी मिळाल्याने दया अनेक पटीने वाढली तर आचार्यातून अरिहंत झाल्यावर अनन्त पटीत दया वाढते. अरिहंत वीतराग परमात्मा करुणासिन्धू, दीनबंधू, जगत्दयाळ इ. अनेक विशेषणांनी विभूषित केले जातात. म्हणून 'शांतसुधारसत' उपाध्याय विनयविजयजी म्हणतात- हे सज्जनांनो ! परमेश्वराला प्रेमाने भजा ! ते परमात्मा शरणी आलेल्यांना कोणत्याही प्रकारची अपेक्षा न

देवता दया, करुणा दाखवतात. शरणी आलेल्यांचे रक्षण करतात.[८५] सूर्याचा स्वभाव प्रकाश देणे आहे. तो परत त्याचे फळ काहीच मागत नाही. त्याचप्रमाणे परोपकार करणे तीर्थंकर परमात्म्याचा स्वभाव आहे. ते भव्य जीवांना सर्व प्रकारच्या दुःखातून मुक्त करण्याचा सर्वश्रेष्ठ मोक्ष मार्ग दाखवतात.

कर्माच्या अधीन असल्यामुळे संसारातील सर्व प्राणी कष्ट भोगतात. कित्येकांचे अंतरायकर्म प्रबळ असल्यामुळे दीन-हीन होऊन दुःखी बनतात. कित्येकांचे वेदनीय कर्म बलवत्तर असल्यामुळे कुष्ट इ. अनेक रोगांनी ग्रस्त होऊन भयंकर दुःख वेदना भोगतात. कित्येकांना बेड्यांनी बंदिस्त केले जाते. अधिकांश तर अंध, अपंग, मुक, तहान इ. ने कष्ट भोगत आहेत. विकलांग अवस्थेत पीडित आहेत. कित्येक पशू, पक्षी, जलचर, वनचर इ. प्राणी पराधीन होऊन जगत आहेत. अशाप्रकारे अनंत प्राणी विविध आपत्तींमुळे हैरान आहेत. ते मग आपल्या सुखासाठी प्रार्थना करतात- ''कोणी दयाळूने आम्हाला सुखी करावे, जीवनदान द्यावे, दुःख, संकटातून वाचवावे.'' अशा दुःखी जीवांना सहानुभूती प्रकट करणे, करुणा भावना आहे.[८६] ज्याचे हृदय अशा दुःखी, पीडित, असहाय लोकांना पाहून सुद्धा किंचितही पाझरत नाही, त्याला पाषाण हृदयी म्हणावे.[८७]

कधी-कधी पशूमध्ये करुणाभावना दिसते. उदा. एका परदेशी व्यक्तीजवळ एक कुत्रा होता. तो रोज पिशवी घेऊन बाजारात जात असे आणि मालकाने जे दुकान दाखवले त्याच दुकानातून बारा पाव आणून मालकाला देत असे. काही दिवसांनी मालकाने पाहिले बारा ऐवजी अकराच पाव हा आणतो. तपास केल्यावर कळले की रस्त्यात एक आजारी कुत्रा ह्या कुत्र्याला दिसला तो कुत्रा चालू फिरू शकत नव्हता. तो रोज त्याला एक पाव देत असे म्हणून अकराच पाव (ब्रेड) पिशवीत असत.[८८]

करुणाभावना अहिंसेचे विधायक रूप आहे. दुःखी व्यक्तीला पाहून आपले हृदय कळवळायला पाहिजे, करुणेने भरले पाहिजे हाच जीवनातील खरा चमत्कार आहे. उपदेश केल्याने, ऐकल्याने करुणा येत नसते. ती आचरणात असायला हवी. करुणाशील जीवन खरा जीवंतपणा आहे. अनुकंपा असलेल्या हृदयात अस्तिकता असते. अनुकंपा, करुणा ही बीजे हृदयात पेरल्याशिवाय धर्मक्रियांचे फळ मिळूच शकणार नाही. मला स्वतःला लवकरात लवकर मोक्षाचे सुख मिळू देत अशा भावनेन सतत राहणारा मुमुक्षू तत्त्वाच्या दृष्टीने तो ''मोक्ष मिळू देत'' हे सतत घोकत राहिल्याने तो आर्तध्यानात फसतो. ही फार सूक्ष्म विचारसरणी आहे. प्रत्येक धार्मिक म्हणवणाऱ्या व्यक्तीने याचे सखोल, सूक्ष्मतेने

चिंतन करायला पाहिजे. 'मोक्ष पाहिजे' म्हणण्याने काही मोक्ष मिळत नसतो. दुसऱ्याच्या दुःखात सहभागी झाल्याशिवाय स्वतःचे दुःख टळावे या इच्छेने अहिंसा, क्षमा, तप, जप संयम प्रवृत्ती केली जात असेल. परंतु या स्वार्थाने उत्पन्न प्रवृत्ती मोहजन्य झाल्या. मोहाचीच पुष्टी केली. मैत्री, करुणा यांचा जितका विकास तितक्या प्रमाणात मोक्षपंथाचा मार्ग पार केला म्हणायचा आणि मैत्री करुणा भावना जितक्या कमी प्रमाणात तितका मोक्षमार्ग दूर.

करुणा, सर्व संसारी जीवांचे कल्याण चिंतणारी भावना आहे. संसारात करुणाचे इतके प्रसंग येतात की त्याचा पार नाही. संसारात आधिव्याधी आणि उपाधींनी त्रस्त जीव करुणा करण्यास पात्र आहेत. करुणा जीवाश्रित आहे, जडाश्रित नाही. करुणा सुख-दुःखाच्या निमित्ताने आत्मशुद्धी आणि सिद्धी पण देते. करुणा भावना शांती आणि साता (सुख) देते. या भावनेमुळे स्व आणि पर उभयमुखी शांती मिळते. करुणा कषायांना मंद करून आत्म्याला भावुक नम्र तसेच शांतही करते. जगात केवळ देहाने पीडित किंवा रोगी यांच्याबद्दलच करुणा करावी असे नाही तर दीर्घदृष्टी योगी तर या जगात कषाय (क्रोध, मान, माया, लोभ) करणारे, पापकर्म बांधणारे जीव ज्यांना कषाय इत्यादींच्या परिणामांचे फळ भोगावे लागणार आहेत त्यांच्यावर सुद्धा करुणा भावना करतात. ज्ञानी लोकांची करुणा इतक्या विस्तृत स्वरूपात असते. ज्ञानी जीवमात्रावद्दल करुणाचे चिंतन करतात. यास भावकरुणा म्हणतात.

बाहेर कुठे मारामारी करून आपला मुलगा जख्मी होऊन आला तर कर्तव्यशील माता-पिता लगेच त्याची मलमपट्टी करून, औषध देऊन, त्याला बरे करण्याचे प्रयत्न करतात. त्याची खूप काळजी घेतात. यापेक्षा जास्त काय करणार ? परंतु एका ज्ञानी महात्म्याच्या दृष्टीने, करुणा भावनेने त्यांना विचार येतो की, या प्रवृत्तीमुळे त्याने किती कर्म गोळा केले असतील ? हा पुढे किती दुःखी होईल (कर्मामुळे) किती जन्ममरण याला करावे लागतील ? या कर्मापासून तो कधी मुक्त होईल. असे आत्म्यासंबंधी अपार करुणभाव त्यांना येतात. हीच ती खरी भाव दया, हेच खरे भावकरुणा चिंतन.[८९]

मैत्री आणि करुणा दोन्ही भावना काही अंशी समान वाटतात. परंतु मैत्री भावनेमध्ये प्रेमाने रागा (मोह) वर विजय मिळवता येतो. आणि करुणा भावनेमध्ये दयेद्वारा द्वेषावर विजय मिळवता येतो. ह्या दोन्ही भावना कषाय जिंकण्यासाठी उपकारक आहेत. मैत्री भावनेबरोबर करुणा भावनेचा घनिष्ठ संबंध आहे. ह्या दोन्ही भावना म्हणजे आपला उजव्या व डाव्या डोळ्यासारख्या आहेत. मैत्री भावनेमुळे प्रेम विश्वव्यापी होते. राग दूर

होतो. ज्यामुळे ईर्षा वगैरे दोष नष्ट होण्यास मदत होते. करुणा भावनेमुळे जीवमात्र "आत्मवत्" आपल्या स्वतः समान समजण्याची भावना झाल्यामुळे द्वेष रहातच नाही. परिणामतः कोधादी कषाय कमी होतात.

करुणा आणि दया यांमुळे समाज आणि राष्ट्रा-राष्ट्रांत सुरक्षाही राहते. ज्या समाजातील लोक एक दुसऱ्याबद्दल करुणा भाव ठेवतात तेथे कलहाचे कारणच उरत नाही. करुणेमुळे समाजात स्नेह, एकता, आत्मीयतासारख्या कोमल भावनांचा बिकास होतो. वर्तमान जीवनात करुणा असती तर मनस्वास्थ्य सहज प्राप्त होते. आणि परलोकात श्रेष्ठ, सुंदर, उत्तम सुख प्राप्त होते.

करुणा अहिंसेची माता आहे, ज्याने जीवांना रक्षण मिळते. करुणाभावनेमध्ये गुणहीन, बलहीन, साधनाहीन जीवांना पाहून, संसाराची करुणाजनक स्थिती पाहून त्या स्थितीचे चिंतन केले जाते. सहानुभूती करुणाचे मुख्य अंग आहे. जी कोमलता, सरळता आणि आत्मानुभूमीच्या आध्यात्मिक ध्येयापर्यंत सहजगत्या पोहोचवते.

सहानुभूती करुणेची बहीण आहे. सहानुभूतीचा आपल्यात बिकास झाला तर दया, भद्रता (सरळता) उदारता, अन्तदृष्टी इ. सद्गुणांचा बिकास होतो.

माध्यस्थ भावना

मैत्री, प्रमोद, करुणा भावनांनंतर आपल्या स्वतःला सुखी करण्यासाठी या तीन भावनांशिवाय एक अशी भावना अजून आहे जी मनुष्याच्या व्यक्तिमत्वात गरिमा, गंभीरता आणि महत्ता प्रदान करते. शास्त्रकारांनी त्या भावनेस माध्यस्थ भावना म्हटले आहे.

हा संसार मोठा विचित्र आहे. यात अनेक प्रकारचे लोक आहेत. चांगले आणि वाईटसुद्धा. चांगल्या प्रवृत्तीचे लोक सत्कार्यात लागतात. वाईट लोक वाईट कृत्यात मस्त असतात. "मी सर्वांना उत्तम आणि भद्र करीन" असा विचार केला तरी ते संभव नाही. काही लोकांना चांगल्या, हिताच्या चार गोष्टी सांगावे तर भांडायला उठतात. साधकाने अशा स्थितीत आपल्या स्वतःला तटस्थ ठेवले पाहिजे. विवादास्पद स्थितीपासून दूर रहायला पाहिजे. उदासीन रहायला पाहिजे. यालाच माध्यस्थ भावना म्हणतात. आचार्य शुभचन्द्रांनी माध्यस्थ भावनेचे वर्णन करताना लिहिले आहे की, जो प्राणी क्रोधी असेल, निर्दय तथा क्रूर कर्म करीत असेल, अत्यंत पापी असेल, देव, शास्त्र गुरुजनांची निंदा करणारा असेल, स्वप्रशंसा करणारा, धर्मावद्दल जराही श्रद्धा नसलेला अशा जीवांच्यावद्दल राग-द्वेष सोडून उपेक्षाभाव किंवा औदासिन्य भाव असणे माध्यस्थ भावना आहे.[९०]

माध्यस्थ शब्द खूप सार्थक आहे. ''मध्ये तिष्ठति इति माध्यस्थः, मध्यस्थस्य भावः माध्यस्त्यं'' जो मध्ये असतो. त्यास माध्यस्थ म्हणतात. तात्पर्य हे की जर दोन व्यक्ती आपसात भांडत असतील तिथे तिसरी व्यक्ती आली आणि त्याने पाहिले की हे दोघे अत्यंत उग्र रूपात भांडत आहेत. मी समजून सांगितले तरी त्यांचे भांडण संपणार नाही. मग तो त्या दोघांपैकी कोणाचीही बाजू न घेता त्या दोघांच्या मधून बाजूला होतो म्हणजे अप्रभावित राहतो. त्यांची उपेक्षा करतो. असे करण्याने त्याच्या आत्म्यात कोणत्याही प्रकारचा क्रोध, मान, माया इ. भाव उत्पन्न होत नाहीत.

आचार्य हेमचंद्रांनी माध्यस्थ भावनेची चर्चा करताना लिहिले आहे की निःशंकपणे जो थोडा सुद्धा संकोच न करता क्रूरता अथवा निर्दयतापूर्ण कार्य करतो, त्यांच्याकडे बिल्कूल लक्ष द्यायचे नाही. आपण आपल्या शुभ विचारात स्थिर रहावे. ही माध्यस्थ भावना आहे.[९१] त्यांच्याबद्दल उपेक्षा अशासाठी की अशा लोकांना सुधारणे संभव नाही. म्हणून हेच योग्य की त्यांच्यापासून दूर रहावे. तटस्थ रहावे. याने आपली शांती भंग होत नाही.

उपाध्याय विनयविजयजींनी माध्यस्थ भावनेचे विवेचन असे केले आहे- जिथे परिश्रांत प्राणी विश्राम घेतात. जे प्राप्त करून व्याधीग्रस्त प्राणी अथवा दैहिक अशांतीयुक्त प्राणी प्रेमरसाचा आस्वाद घेतात. प्रसन्न होतात. ज्याने राग-द्वेष शत्रूंचा अवरोध होतो. अशी औदासिन्य भावना माध्यस्थभावना आम्हाला फार प्रिय आहे. या संसारात मर्मस्थान भेदन करणारे, भिन्न-भिन्न प्रकारच्या कर्माप्रमाणे भिन्न भिन्न स्वभाव असणारे लोक आपण पाहतो. काही चांगले तर काहिंचे न आवडणारे वागणे असते. माणसाने कोणावर रोष करावा ?

पुढे गीतिकामध्ये माध्यस्थ किंवा औदासिन्य भावाचे विवेचन करताना आपल्या स्वतःला संबोधित करून म्हणतात- हे आत्मन ! तू अत्यंत उदार सुखप्रद औदासीन्य भावनेचा अनुभव कर. औदासिन्य भाव अत्यंत कल्याणकारी आहे. समस्त आगमशास्त्रांचे सार आहे. तसेच इष्टप्रद फलप्रद कल्पवृक्ष आहे. तुम्ही दुसऱ्यांची चिंता व विकल्पांना सोडून द्या. आपले विकारशून्य शुद्ध स्वरूपाचे चिंतन करा. जो बाभुळाचे झाड लावील त्याला आंबे कसे येणार ?[९२]

तुम्ही केलेल्या उपदेशाने किंवा हितप्रद उपदेशाला जो जुमानत नाही, तरी त्याच्यावर क्रोध करू नका. इतरांची निरर्थक, निष्फळ चिंता करून तुम्ही आपले सुख का नष्ट करत आहात ? ज्या व्यक्तीच्या बाबतीत जे घटित होणार ते तुम्ही मिटवू शकणार

नाही. म्हणून तुम्ही समतापूर्वक रहा. अनुकूल, प्रतिकूल, मनोज्ञ, अमनोज्ञ सर्वांच्याबद्दल समानभाव ठेवा. व्यर्थ मायाजालापासून दूर रहा. निरर्थक प्रपंचात पडू नका. [९३]

उपाध्यायजींनी काव्यात्मक शैलीत जे वर्णन केले आहे त्याचा सारांश असा आहे- संसारातील लोक, ज्यांनी विविध प्रकारची कर्मे केली त्याच्या फलानुसार भिन्न-भिन्न प्रवृत्तीत व्यग्र असतात. जसे कर्म केले असतील तशीच वृत्ती बनते. त्याला तो कर्म करणाराच जबाबदार आहे. दुसरा कोणी काही करीत नाही. असा विचार केला नाही तर व्यर्थ त्यांच्या प्रंपचात्मक कार्यात पडून आपण विनाकारण दुःखी होतो. म्हणून साधकाने अशावेळी उदासीन मध्यस्थता किंवा तटस्थता भाव आपल्या मनात जोपासावा. आपले कर्मबंध होणार नाहीत याचीच चिंता करावी. आपल्या आत्मकल्याणात रत रहावे. अशी व्यक्ती सदा सुखी राहते. इतरांच्या झंझटात निष्कारण अडकू नये व दुःखी होऊ नये.

कोणी आपल्याशी विपरीत वागत असेल, बोलत असेल किंवा खोटेपणाने वागत असेल तर समजपूर्वक त्याचा आपल्या मनावर परिणाम होऊ देऊ नये. अप्रभावित रहावे. खरं म्हणजे असे अविचलित राहणे फारच कठीण आहे. कारण प्रत्येकात व्यक्त किंवा अव्यक्त रूपात अहंकार भरलेला असतो. थोडाजरी प्रतिकूल व्यवहार कोणी केला लगेच अहं उद्दिप्त होतो. परिणाम असा होतो की- परस्पर संघर्ष किंवा कलहाची स्थिती उभी राहते. म्हणून शास्त्रात अशा स्थितीमध्ये मध्यस्थ, तटस्थ किंवा उदासीन राहण्याचा निर्देश करण्यात आला आहे. तटस्थ राहिल्याने वातावरण कधीच विकृत होत नाही. आपली शांतीही भंग होत नाही. मन उच्च चिंतन, मननात राहते. असे करणे इतके सोपे नाही. तरीही मनात दृढ आणि स्थिर केल्यास असंभव नाही. प्रयत्नाने असंभव काम सुद्धा संभव होऊ शकते.

आपल्या मनातील राग-द्वेषात्मक भावनाच आपल्या सुख-दुःखाचे कारण बनतात. हा राग (मोह) सुद्धा तात्कालिक रूपात क्षणिक सुखाचा आभास मात्र आहे. राग-द्वेषच मुळी दुःखाला कारणीभूत आहेत. यांच्यावर विजय मिळवणे म्हणजे दुःखावर विजय मिळवणे आहे. विषयांचा राग-द्वेष न करता तटस्थ रहाणे हाच उपाय आहे.

इंद्रियांचा स्वभाव आहे की आपआपल्या स्वभावात व्यस्त राहण्याचा कान ऐकतात, डोळे पाहतात, जीभ स्वाद घेते वगैरे. इंद्रियांच्या या विषयात अशुभ आणि शुभ, सुंदर आणि असुंदर सर्वप्रकारच्या स्थिती असतात. कानाला एखादा स्वर आवडतो तर एखादा न आवडणारा असतो. स्वर किंवा शब्द तर स्वतः प्रिय किंवा अप्रिय नाहीत.

ते शब्द आपल्याला सुख देऊ शकत नाहीत दुःखही देऊ शकत नाही. ते तर आपल्या मनामुळे आपण राग द्वेषामुळे त्या विषयांना प्रिय किंवा अप्रिय मानतो. चांगले-वाईट, प्रिय-अप्रिय सर्वांबद्दल उपेक्षा भाव ठेवणे, कोणालाच मुख्य स्थान न देणे माध्यस्थ भावना आहे.

अज्ञानामुळे कोणी कुमार्गाने जात असेल त्याला योग्य मार्गावर आणण्यासाठी आपण उपदेश देतो. अन् तो आपल्या उपदेशाकडे चक्क दुर्लक्ष करतो आणि त्याच दुष्कर्मात सतत प्रवृत्तीशील राहतो. तेव्हा स्वाभाविक आहे की आपल्या मनात त्याच्याबद्दल क्रोध, रोष, आक्रोश भाव येतात, पण असे न करता माध्यस्थ भावना इथे विशेष अपेक्षित आहे. त्याच्यावर रोष करणं व्यर्थ त्यापेक्षा उपेक्षाच अधिक योग्य होईल.

घोड्याला पाणी पाजण्यासाठी नदीच्या पात्रात मध्यभागी नेण्याचे काम करण्याचे तेवढे आपले कर्तव्य आहे. शेवटी पाणी तर तो आपल्या इच्छेनेच पिणार. त्याने पाणी नाही प्यायले तर त्याच्यावर जबरदस्ती तर करता येणार नाही. आणि जबरदस्ती करूनही उपयोग नाहीच. पिण्याची क्रिया त्याला स्वतःलाच करावी लागणार. अगदी तसेच उपदेशाची जो उपेक्षा करतो त्याचीच उपेक्षा आपण करणे अधिक योग्य आहे.

भ. महावीरांनी स्वतः एक अनुकरणीय आदर्श आपल्या समोर प्रस्तुत केला होता. भ. महावीरांचा शिष्य जमाली-जो त्यांचा जावई होता, भगवानांच्या समोर मिथ्या उपदेश करू लागला. पण भ. नी. त्याला प्रताडित नाही केले, त्याचा द्वेषही नाही केला. जबरदस्तीने त्याला सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्न सुद्धा नाही केला. पण त्याची उपेक्षा केली.[९४] म्हणजे तिरस्कार नाही, तर त्याच्या आचरणाचा किंचितही परिणाम स्वतःवर होऊ दिला नाही. ही उपेक्षा, तटस्थता, मध्यस्थता, माध्यस्थ भावना, उदासीनता. आपल्याच कर्मबंधनाचे कारण होईल. समोरचा सुधारणार तर नाहीच त्यापेक्षा समभाव ठेवणे उत्तम. माध्यस्थ भावनेचा साधक दुःखाला आमंत्रण देतो आणि मग त्या दुःखात समभाव ठेवून आपल्याला पवित्र करतो. उदा. एकदा कोणी उनाडाने दगड फेकला तो निग्रोनेता डॉ. मार्टिन लूथर किंग यांच्या डोक्याला लागला. डोळे फुटले. रक्त वाहू लागले. जखम धुवून औषध लावले. आणि लूथर ऑफिसमध्ये जाऊन काम करू लागले. कोणाला काहीही बोलले नाही. कोणाबद्दल रोष नाही. एका पत्रकाराने त्यांना विचारले, महोदय, तुम्हाला माहित होते की उपद्रवी हिंसक रूप धारण करू शकतात, मग आपण तिकडे गेलाच कशाला ? काय संकट तुम्हाला इतके प्रिय आहेत ? निग्रो नेता म्हणाले- ''माझा विचार होता की

लोकांचा सगळा रोष माझ्यावरच निघावा आणि माझे मन समता अमृतात डुंबावे, मी माध्यस्थ भावनेत टिकून रहावे. सर्वसंसार निर्मल होऊन जावा. म्हणून संकटांचा सामना करण्यात मला कोणतेही रंज दुःख वाटत नाही.

अशी आहे माध्यस्थ भावनाची भूमिका !

माध्यस्थ भावनेचा आराधक जरी दुसऱ्यांच्या भावनांचा आदर करू शकला नाही, तरी कमीत कमी सहन करावे. सहिष्णू बनावे. मार्टिन लूथर सहिष्णू होते. भगवान महावीर इ. महापुरुषांची समता माध्यस्थ भावनाचे प्रतीक आहेत.

माध्यस्थ भावनेच्या चिंतनाने आपल्यात तटस्थ राहण्याची प्रवृत्ती होते. ही भावना विरोधियांच्यामध्ये अविरोध भावनेने जगण्याची कला शिकवते. मनातील क्लेश आणि अशान्तीपासून वाचविण्याचे कौशल्य शिकवते. आग्रह दुराग्रहाच्या चक्रातून वाचवते. आणि वैचारिक, धार्मिक, सामाजिक इ. क्षेत्रात उदारताचा व्यवहार शिकवते.[९५]

जेव्हा कोणाला सन्मार्गावर आणण्याचा प्रयत्नात असफलता मिळते तेव्हा कधीही त्याचा खेद करू नये. आपण सद्भावनेने केलेले प्रयत्न यातच संतोष मानावे. जेव्हा निष्फलता मिळते तेव्हा मौन रहावे. मौन राहण्याने फार मोठी शक्ती असते. ''मौनम् सर्वार्थ साधनम्'' मौन राहिल्याने वाणीमुळे होणाऱ्या पापापासून वाचू शकतो. निष्फलतेच्या अन्य कारणांचा सुद्धा विचार केला पाहिजे. जसे की ''आपली काही चूक झाली आहे का ? स्वतःच्या मोठेपणाचा अभिमान तर नाही ना ? किंवा असा ही विचार करावा की, माझे पुण्य कमी पडले असेल किंवा यशनामकर्म कमी असेल म्हणून चांगली हित शिक्षा दिली तरी कोणताच परिणाम झाला नाही. उलट आपलेच नुकसान झाले. अशाप्रकारे आपले समाधान करून घ्यावे. काही समभाव धारण करून स्वतःची पात्रता वाढवावी. आणि दुसऱ्यांना सल्ला देताना त्याच्या पात्रतेचाही विचार करावा. जर त्याने ऐकले नाही तर त्याची पात्रता नाही असे समजावे. प्रत्येक जीवाची गती त्याच्या कर्माच्या अधीन आहे. जोपर्यंत त्याचे अशुभ संस्कार क्षीण होऊन शुभ संस्कार जागृत होत नाही. तोपर्यंत त्याची ऐकून घेण्याची मनःस्थिती तयार होत नाही अपात्राला दिलेला उपदेश म्हणजे दगडावर पाणी ओतण्यासारखे आहे. अगदी निष्फळ. माणसाची पात्रता नसेल तर त्याला समजावणे अगदी कठीण आहे. परंतु उन्मार्गावर चालणारे जीव सुद्धा एकाद्या शुभक्षणी धर्माभिमुख होऊ शकतात. धर्माचरण करण्यात पुरुषार्थ करू लागतो. परिणामतः त्यांचे अशुभ कर्म क्षीण होऊ लागते. सत्यधर्म पालन करण्याची पात्रता प्राप्त करतो. अशी आश्चर्यजनक

घटना कधीकधी घटते सुद्धा, की अतिशय दुर्गुणी व्यक्तीमध्ये अचानक परिवर्तन होऊन जाते. कारण त्याच्यात सुषुप्त धर्मसंस्कार जागृत होतात.

चंडकौशिक सर्पाचा दृष्टांत सुप्रसिद्ध आहे. तो अत्यंत विषारी, दृष्टिविष असलेला सर्प होता. बारा कोसापर्यंत त्याच्या दृष्टीचे विष पसरत असे. त्यावेळी समोर असणारे जीव त्याच्या दृष्टीविषाने मरून जात. त्याच्या फुत्काराने जळून जात असत. अशा भयंकर सर्पाला बोध देण्यासाठी भगवान महावीर त्याच्यापाशी गेले. चंडकौशिकाने अत्यंत कुपित होऊन भगवान महावीरांच्या अंगठ्यावर दंश केला. परंतु जराही विचलित न होता भगवानांनी अत्यंत सद्भावनेने मधुर आवाजात त्याला म्हणाले "बुज्झ बुज्झ चंडकौशिक ! असा आपुलकीचा मातृतुल्य वात्सल्यपूर्ण स्वर, त्यांच्या मुखमंडलावर पसरलेली अपार शांती आणि समताभाव आणि अंगठ्यातून मातृत्वाचे प्रतीक श्वेत दूधाची धार याने चंडकौशिक जागृत झाला. त्याचे विषच समाप्त झाले. पूर्वभवातील त्याचे साधुत्व जागृत झाले. पश्चाताप आणि प्रायश्चितरूपी अमृताने त्याचे हृदय स्वच्छ झाले. एका बाजूला समतामूर्ती भ. महावीर होते, दुसऱ्या बाजूला चंडकौशिक. तो या जन्मी दृष्टी विषधारी सर्प झाला पण पूर्व भवामध्ये साधू, तापस होता. त्याच्या पूर्वभवाच्या संस्कारात साधुत्व, त्याग, तपाच्या भावनेचा पाया होता. परंतु अत्यंत क्रोधामुळे त्याची अशी भयंकर अवनती झाली की तो, दृष्टी विष झाला. पण शुभ संयोगामुळे त्याला महान आत्मा भ. महावीरांच्या उपदेशाचा योग मिळाला. त्याचे हृदय परिवर्तन झाले. भ. महावीरांच्या माध्यस्थ भावनेचा विजय झाला. चंडकौशिक सर्पाच्या हृदयात इतके उत्कृष्ट परिवर्तन झाले की आता आपल्या विषामुळे कुणालाही दुःख होऊ नये. हानी होऊ नये. कोणाची हिंसा होऊ नये म्हणून त्याने मुख बिळात लपवले. त्याच्या शरीरावर लागलेल्या मुंग्या मरू नये म्हणून त्याने किंचितही शरीराची हालचाल केली नाही.

चंडकौशिकाच्या ह्या प्रसंगात मैत्री इ. चार योग-भावनाचा समावेश आहे. महावीरांची सर्पाबद्दल असलेली मैत्री भावना, त्याला निम्नस्तरावरून उच्चस्थानी पोहोचवण्यासाठीची करुणा भावना, सर्पाचे झालेले हृदय परिवर्तन पाहून आनंद आणि संतोषाची भावना अर्थात प्रमोदभावना, त्याच्या डोळ्यातून निघणाऱ्या विषाबद्दल समताभावाने स्थिर राहण्याची भ. महावीरांची वात्सल्यपूर्ण मूर्ती ही आहे माध्यस्थ भावना. ह्या उदाहरणाने चारही भावनांचे उत्कृष्ट दर्शन होते.

माध्यस्थ भावना कायरता किंवा निर्बलताची निशानी नव्हे. हितोपदेशाची उपेक्षा

करणाऱ्याबद्दलही क्रोध न करता मौन राहणे, समताभाव ठेवणे, समोरच्या व्यक्तीने केलेला विरोध, आक्रोश शांततेने सहन करणे, याची खरी समज धैर्य आणि विचार शक्ती असेल तरच हे शक्य आहे. माध्यस्थ भावनासाठी दृढ आत्मशक्तीची आवश्यकता असते. अशी विराट शक्ती प्राप्त करण्यासाठी धर्मध्यान आणि आत्मजागृती असणे जरूरीचे असते.[९६]

''माध्यस्थः समः य आत्मानमिव परं पश्यति''

मध्यस्थाचा अर्थ आहे सम. राग आणि द्वेषरहित, आपल्या आत्म्याप्रमाणेच इतरांचा आत्मा मानणे.

'कोणाच्याही बद्दल राग-द्वेष पूर्वक पक्षपात न करणे माध्यस्थ भाव आहे.' संसारात विरोधी तत्त्व आहेत उदा. रात्र आणि दिवस, अंधःकार आणि प्रकाश, थंड आणि उष्ण, कापड उभ्या, आडव्या धाग्यांनी बनते. त्यांची दिशा परस्पर विरोधी असते. इथे उष्णताही खूप आहे तशी बर्फाळ प्रदेशही खूप आहेत. तसेच जगात संतसज्जनांची कमतरता नाही आणि दुष्ट दुर्जनांची ही कमी नाही. अशाप्रकारे संसारात परस्पर विरोधी सत् आणि असत्, शुभ आणि अशुभ दोन्ही प्रकारची तत्त्वे विद्यमान आहेत. साधकाने राजहंसाप्रमाणे आपल्या माध्यस्थ भावनारूपी चोचीने या तत्त्वांचे पृथक्करण करायला पाहिजे. अनुकूल परिस्थिती वर राग (मोह असक्ती) ही नाही आणि प्रतिकूल म्हणजे विरोधी तत्त्वाबद्दल द्रोह, घृणा, ईर्षा, वैर ही नाही.[९७] या जगात मनाला अस्थिर करणारे राग-द्वेष निर्माण करणारे अनेक तत्त्व आहेत. मोहक पदार्थाने मनुष्य त्वरित मोहित होतो. आणि त्याच तत्त्वाने तो दुःखी ही तितक्याच त्वरेने होतो. कारण पदार्थांचा धर्मच आहे- संयोग-आणि वियोग होणे. संयोग सुखद वाटतो, वियोग दुःखद वाटतो. म्हणून सुख-दुःखाच्या संकल्प-विकल्पात अस्थिरता आल्याने शांती-मनःस्वास्थ्य लाभत नाही. माध्यस्थ भावात राहण्यानेच शांती मिळू शकते.

मुमुक्षू आत्म्याच्या हृदयात सर्व दुःखी प्राण्यांबद्दल करुणाभाव असतो. तो सर्वांना मोक्षानुरागी पाहू इच्छितो. परंतु जगात असे प्राणी आहेत जे आपल्याच पापोदयामुळे मोक्षमार्गापासून दूर राहतात. अशांना धर्मोपदेश दिला तरी क्रोध इ. कषायांची तीव्रतामुळे त्यांच्या कषायांचीच वृद्धी करतात. सापाला दूध पाजले तरी त्याचे विषातच रूपांतर होते. त्याचप्रमाणे अत्यंत पापी, क्रूर आणि निष्ठुर आत्म्यांना दिलेला उपदेश हित करण्याच्या ऐवजी अनर्थाची परंपराच सर्जन करतात.

जगात असे क्रूर वृत्तीचे पुष्कळ लोक आहेत. निस्वार्थ भावनेने उपकार करणारे फार कमी लोक आहेत. उपकाराबद्दल प्रतिउपकार करणारे थोडे आहेत. जगात काही लोक असेही असतात ज्यांना दुसऱ्यांचे अहित करण्यातच आनंद वाटतो. असे क्रूर, दुष्ट प्रवृत्तीच्या जीवांना पाहून आपल्या हृदयात त्यांच्याबद्दल द्वेष किंवा दुर्भावना होऊ नये म्हणून माध्यस्थ भावना श्री. तीर्थंकर भगवानांनी सांगितली आहे.[९८]

आचारांग सूत्रात भ. महावीरांनी कथन केले आहे की,

उवेहिणं वहिया य लोगं से सव्व लोगंमि जे केई विण्णु ।
अणुवीर पास निक्खित्त दंडा जे के सत्त पलियं चयंति ॥[९९]

आपल्या धर्मापासून विमुख असणाऱ्या लोकांबद्दलसुद्धा उपेक्षा भाव ठेवावा. उपेक्षामुळे विरोधिबद्दल सुद्धा उद्विग्नता होत नाही. अशा तटस्थ व्यक्ती जगातील समस्त विद्वानांत अग्रणी असतात. त्यांच्या तटस्थ राहण्यातच त्यांच्या विद्वत्तेचा निवास आहे. ते आग्रह ठेवीत नाही की माझेच विचार श्रेष्ठ आहेत. ते आग्रहाला सुद्धा परिग्रह मानतात. आपल्यावर विरोधकांनी केलेल्या मिथ्य आरोप किंवा लांछनाचा सुद्धा प्रतिकार करीत नाही. ही उपेक्षेची चरम सीमा आहे.

गोशालक जेव्हा भगवानांच्या समोर म्हणाला की, ''तुम्ही जिन (जितेंद्रिय) नाही, मी आहे. मी सर्वज्ञ आहे'' तेव्हा भगवनांनी त्याच्या मूर्खपणाची उपेक्षा केली. माध्यस्थ भावनेचे हे रूप तितिक्षा आहे. आपल्याजवळ सोने (सुवर्ण) असेल तर ते सुवर्णच राहणार. त्याला कोणीही पितळ म्हटले, तरी त्यात बदल होणार नाही. आणि माझ्याजवळील सोने सोनेच आहे हे सिद्ध करण्यासाठी प्रयत्न करण्याची बिल्कुल आवश्यकता नाही. ते तर आहेच. सिद्ध करण्याची जरूरीच काय ? त्यासाठी विरोधाची उपेक्षा करण्याने विरोध आपोआप नष्ट होऊन जाईल.[१००]

कित्येक लोक इतके धूर्त, क्रूर आणि प्रपंची असतात की त्यांना समजावण्याच्या मानगडीत पडण्याने काहीच फायदा होत नाही. ते अत्याग्रही, कदाग्रही आणि दुराग्रही, असतात. अशा परिस्थितीत काही लोक उग्र स्वरूप घेतात. क्रोध, कलह आणि वाक्‌युद्ध सुद्धा करू लागतात. शिवीगाळ, मारामारीपर्यंत मजल जाते. जे केवळ हिंसेचेच कारण आहे. माध्यस्थ भावना अशा परिस्थितीत व्यक्तीला संतुलित राहण्याची प्रेरणा देते. ज्या व्यक्तीला वारंवार समजावले तरी तो ती सवय सोडत नाही, आपल्या हिताची गोष्ट तो

समजू शकत नाही, त्याच्यावर क्रोध करण्यात तरी काय अर्थ ? उगाच आपली शक्ती नष्ट होते.

आपल्या स्वतःला मनाला व्यग्र, कषायांनी कलुषित आणि हिंसक करून, दुसऱ्यांचा उद्धार करण्याचा प्रयोग म्हणजे आपल्या समतावृत्तीला आगीत फेकण्यासारखे आहे. याचे निराकरण करण्यासाठी सर्वोत्तम अहिंसक उपाय आहे- माध्यस्थ भावना.

माध्यस्थ भावना एकांत तटस्थ भावना नाही. तटस्थभावना निरपेक्ष असते. ज्याप्रमाणे नदीकिनारी बसलेली व्यक्ती, नदीच्या प्रवाहात वाहत जाणाऱ्या तृणाला पाहते. पण निरपेक्ष भावाने. परंतु नदीच्या मध्यभागी वाहत जाणाऱ्या माणसाला पाहिले तर तो निरपेक्ष राहू शकत नाही. कोणीही प्राणी असो त्याला वाहताना पाहून माणसाचे मन करुणेने भरणारच. त्याला वाचवायचा प्रयत्न निश्चित करणार. अशावेळी निरपेक्ष राहणे कठीण.

साधक अजून संसारात स्थिर आहे. तो संसारातून अजून मुक्त झाला नाही. म्हणून माध्यस्थ भावनेद्वारे तो विपरीत वृत्तीच्या पापी आणि कुकर्मी यांच्या हिताची कामना करतो. परंतु स्वतःची शांती आणि समता खंडित होऊ देत नाही. हीच माध्यस्थ भावना व तिचे सारतत्व आहे.[१०१]

राग आणि द्वेष यांच्यामध्ये जे स्थित आहेत, त्यांना मध्यस्थ म्हणतात. कोणत्याही प्रसंगात राग-द्वेष निर्माण होऊ नये यासाठी वारंवार चिंतन करणे माध्यस्थ्य भावना आहे.[१०२]

''चिन्तनकी चिनगारी'' या पुस्तकात लेखकाने माध्यस्थ्य भाव कोणाबद्दल ठेवावेत, त्याचे अनेक प्रकार सांगितले आहेत. उदा.

१) पापीबद्दल माध्यस्थ्य - पापी जीवांना पापापासून परावृत्त करण्यासाठी प्रयत्न केल्यानंतरही जेव्हा ते पापापासून दूर होत नाही तेव्हा अशांच्या बाबतीत माध्यस्थ भाव ठेवला पाहिजे. परंतु मनाला क्रोध इ. कषायांनी कलुषित करू नये. अशा प्रकारे मध्यस्थता ठेवल्याने पापी जीव कदाचित पापात अती आग्रही होण्यापासून परावृत्त होऊ शकतो आणि पुढे भविष्यात सुधारण्याची संभावना निर्माण होऊ शकते.

पाप्याचा तिरस्कार केल्याने तो अधिक द्वेषी बनतो. अशाने वैरभावाची परंपरा वाढत जाते. माध्यस्थ भाव ठेवल्याने आपल्याबद्दल त्याचा सद्भाव तरी टिकून राहतो.

ज्याप्रमाणे अपथ्य सेवनाने रोगीचा अयोग्य वेळी बचाव करू शकत नाही.

अशावेळी माध्यस्थ भाव ठेवणेच हितकर असते. त्याचप्रमाणे अहिताच्या भावनेला न सोडणारे जीव आहेत त्यांच्या बद्दलही माध्यस्थ ठेवणे उभयपक्षी हितकारक असते. या भावनेने वैरभाव रूप चित्तातील मळ दूर होतो.

२) वैराग्य विषयक माध्यस्थ्य - वैराग्य अर्थात् वैषयिक सुखाबद्दल अरूचि अथवा द्वेष. असा द्वेष प्रशस्त असल्याने पुण्यानुबंधी पुण्याचा हेतू आहे. परिणामस्वरूप सांसारिक सुखाबद्दल माध्यस्थ्य अर्थात रागरहित द्वेषाचा अभाव निर्माण होतो.

सुखाबद्दल द्वेष तथा दुःखाबद्दल राग हे सुद्धा प्रशस्त मनोभाव असल्याने पुण्यानुबंधी पुण्याचा हेतू बनून परिणाम स्वरूप माध्यस्थ्य भाव उत्पन्न करतो. वैषयिक सुखाच्या मागे जन्ममरणाच्या परंपरेचा विचार केल्याने सुखाबद्दल अरती आणि दुर्गतीच्या दुःखांना दूर करण्यात कारणीभूत आहे. अशाप्रकारे विचार केल्याने दुःखाबद्दल अरतीभाव उत्पन्न होत नाही.

३) सुख विषयक माध्यस्थ्य - तीर्थंकरांचा शेवटचा जन्म, अणुत्तरवासी देव, धन्ना, शालिभद्र, तथा गुणसागर इ. पुण्यानुबंधी पुण्याचा उपभोग करणारे महापुरुष सुखाचा उपभोग इच्छारहित होऊन करत होते. त्यांना समजत होते की, माझ्या पूर्वकृत शुभ कर्माचा उदय आहे. अशाप्रकारे सुखाबद्दल माध्यस्थ्यता महायोगी पुरुषांमध्येच असते.

४) दुःख विषयक माध्यस्थ्य - या माध्यस्थ्य भावनाचे आराधक आदर्श आहेत. भगवान महावीर, श्री गजसुकुमाल मुनी, खंदकमुनी इ. ज्यांनी मरणास उपसर्गात (दुःख)ही माध्यस्थ्य भाव धारणा केला आणि न दुःख देण्याऱ्याबद्दल द्वेष केला आणि सुख देणाऱ्याबद्दल ही राग भाव ठेवला नाही.

५) गुणविषयक माध्यस्थ्य - हा माध्यस्थ्य लब्धिप्रात असलेल्या मुनींना होतो. ते विचार करतात की, 'क्षयोपक्षमभाव' ही आत्म्याची अपूर्णता आहे. यात आनंद कसा मानायचा ? लब्धी, सिद्धी इत्यादी तर क्षयोपक्षम भावनाची आहे, असा विचार करावा की, ते आपल्या लब्धिप्रती माध्यस्थ्य राहतात.

६) मोक्ष विषयक माध्यस्थ्य - हा भाव अप्रमत्तादी गुणस्थानात प्रकट होतो. यास असंग अनुष्ठान सुद्धा म्हणतात. त्यावेळी आत्मा समतारूपी अमृत-महासागरात मस्त असते.

७) सर्वविषयक माध्यस्थ्य - हा माध्यस्थ्य भाव केवली भगवंतांना असतो तथा केवली भगवंतांनी निर्दिष्ट केलेल्या तत्त्वांचा अनेकांत दृष्टीने चिंतन करणाऱ्या महात्मांना

होतो. या माध्यस्थ्य भावनेला धारण करणारे महामुनी सर्वप्रकारच्या विचारात, वचनात मध्यस्थ भाव ठेवतात. त्यांच्या मनाची परिणती अनेकांत दृष्टीयुक्त असते. परिणतीशिवाय वस्तुतत्त्वाचा यथार्थ निर्णय संभव नाही. उत्सर्ग अपवाद, निश्चय-व्यवहार, ज्ञान-क्रिया, तथा विधि-निषेध इ. सर्वदृष्टिकोनांना ते महापुरुष सापेक्षरूपाने ग्रहण करतात. ते आगमिक पदार्थांना आगमातून आणि युक्तीयुक्त पदार्थांना युक्तीने ग्रहण करतात.

ज्याप्रमाणे हजारोंच्या संख्येत शंभराच्या संख्येचा समावेश आहेच, त्याचप्रमाणे अन्य दर्शनातील सद्विचारांना ते महामुनी आपल्या दर्शनात समाविष्ट करून घेतात. त्याचे चिंतन हे अनेकांतचे असते. आणि शुभभावनेने त्यांचा प्रत्येक विचार पवित्र असल्याने कोणत्या वेळी कोणता विचार पुढे ठेवल्याने स्व-पर हित होते याचा सर्वंकष विचार करूनच ते बोलतात.

माध्यस्थ्यतामुळे त्यांचे वचन सागरापेक्षाही अधिक गंभीर आणि चंद्रापेक्षाही अधिक सौम्य असते. केवळ सत्याचेच पक्षपाती असल्यामुळे त्यांच्यात स्वदर्शनाबद्दल राग अथवा पर दर्शनाबद्दल द्वेष नसतोच.[१०३] जेव्हा साधक उपेक्षाभावात निष्णात होऊन जातो तेव्हा हर्ष आणि विषाद, सुख व दुःख, सम्मान व अपमान इ. द्वंद्व सहजपणे क्षीण होऊन जातात.

कोणत्याही जीवाचा कधी द्वेष केला असेल तर तो महाभयंकर दोष आहे. द्वेष केल्याने आत्मा समभावात कधीच राहू शकत नाही. आणि समभावाशिवाय तर सर्व क्रिया निष्फल होऊन जातात. अशा कुणाला उपदेश दिला तरी त्याचा परिणाम चांगला होत नाही. अशा वेळी माध्यस्थ्य राहणेच योग्य आहे.

जो साधक माध्यस्थ्य भावनेत राहू इच्छितो त्याने आपल्या विचारांशी ताळमेळ नसत नसलेल्यांना सहन करण्याची, ते पचवण्याची शक्ती वाढवली पाहिजे. माझे म्हणणेच खरे आहे, इतरांचे नाही, अशा एकान्तिक विचारांच्या मोहात पडणे माध्यस्थ्य भावनेसाठी घातक आहे. पुष्कळवेळा मनुष्य अमुक जाती, धर्मसमुदाय, प्रान्त इ. कारणाने पूर्वग्रहामुळे दुसऱ्या व्यक्तींना हीन, निकृष्ट, पापी समजतो हा विचार सुद्धा माध्यस्थ्य भावनेतील अडथळा आहे.

पापी व दुष्टांचे पाप आणि दोष नष्ट करावे. त्या व्यक्तीला नष्ट करण्याची आवश्यकता नाही. माध्यस्थ्य भावनाशील असण्याऱ्यांचे कार्य एका चिकित्सकासारखे असावे. चिकित्सक भयंकराहून भयंकर रोग्याने ग्रस्त रोगीला पाहून त्याची घृणा किंवा

द्वेष करीत नाही. किंवा त्या रोग्याला मारीत नाही. परंतु रोगालाच दूर करण्यासाठी औषध किंवा शस्त्रांचा प्रयोग करतो. त्याबरोबर चिकित्सक सदैव जागृत राहतो की रोगी मरू नये. अशा प्रकारे माध्यस्थ्यदृष्टीवालेसुद्धा पापी, अत्याचारी व दुष्टांचा घृणा किंवा द्वेष करीत नाही. परंतु आत्मीयतापूर्वक त्यांच्या पापरूपी रोगाचा नाश करण्याचा प्रयत्न करतात.

घृणा किंवा द्वेष केल्याने वैर, विरोध वाढतो. परंतु जर माध्यस्थ्यभाव ठेवला तर शक्य आहे की, आजचा दुष्ट, बाईट, पतित पापी उद्या चांगला होऊ शकतो. अशी अनेक उदाहरण इतिहासाच्या पृष्ठावर अंकित आहेत. बंकचूल, अर्जुनमाली, चिलातीपुत्र, रोहिणेयचोर अंगुलिमाल, अम्बपाली, वाल्मिकी इ.

जी व्यक्ती माध्यस्थ्य भावनाने भावित असते. ती अजातशत्रू होऊन जाते. कारण की, माध्यस्थ्य व्यक्तीचा कोणी शत्रू असूच शकत नाही. ती व्यक्ती सर्वांना समभावाने पाहाते.

अतिदुष्टांबद्दल माध्यस्थ्य भावनेचा प्रयोग

पुष्कळवेळा असे होते की, अतिदुष्ट, दुःसाहसी आणि भौतिक शक्तीने बलशाही व्यक्ती आपले पद, प्रतिष्ठा आणि पैशाच्या जोरावर माध्यस्थ्यशील साधकाचा आत्मीयभाव, प्रेम, वात्सल्य व गुणाग्राही व्यवहाराला बिल्कूल समजत नाही. आणि सतत द्वेष आणि दुर्भावनावरा माध्यस्थ्य भावना समोर टिकू शकत नाही. अशा लोकांशी वागण्याचा एकच मार्ग मौन, उपेक्षा उदासीनता आणि तटस्थता धारण करणे. पण त्यांच्याबद्दल राग-द्वेष वैर विरोध, बदला घेण्याची भावना रतीभर सुद्धा ठेवू नये.

जर प्रतिहिंसा, बदला घेण्याची भावना उत्पन्न झाली तर त्यामुळे प्रतिपक्ष्याची जेवढी हानी होणार नाही त्यापेक्षा कितीतरी पटीने हानी साधकाची होते. माध्यस्थ्य साधक जर द्वेष, रोष करेल तर त्याची आग त्याच्या मनात जळत राहील, त्याचे मन असंतुलित, अस्तव्यस्त आणि विचारशक्ती रहित होऊन जाईल, जी वेडाची किंवा विक्षिप्त स्थिती असू शकते. त्याचे मन अनन्तानुबंधी कषायाने कषायाने ग्रस्त होऊन जाईल, ज्यामुळे तो निन्दनीय कार्य करण्यास तत्पर होतो. त्याचे अधःपतन होते. म्हणून माध्यस्थ्य साधकाने राग-द्वेष, वैरभाव इ. पासून दुरच रहावे.

पर पदार्थाबद्दल सुद्धा माध्यस्थ्य भाव असणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे व्यक्तीबद्दल माध्यस्थ्य भाव ठेवणे श्रेष्ठ आहे, ह्याचप्रमाणे पदार्थाबद्दल ही ठेवणे आवश्यक

आहे. या जगात कोणतीही वस्तू स्थिर नाही. केव्हांतरी तिचा वियोग होतोच. अशा वस्तूबद्दल आसक्ती ठेवणे म्हणजे दुःखाचे कारण आहे. सुखेच्छू मानव अशा क्षणिक वस्तूमध्ये राग-द्वेष करणे योग्य समजत नाही. ज्याचा द्वेष केला जातो ते पदार्थही क्षणिक आहेत. कारण पुद्गल मात्र परिणती स्वभावाचे आहेत. जो पदार्थ आता रूचिकर वाटतो तोच पदार्थ काही काळानंतर अरुचिकर वाटतो. म्हणून कोणाच्याही बद्दल द्वेष करू नये. तसेच पदार्थाच्या लाभ-अलाभ यात शोक करू नये. दोन्ही स्थितीत मध्यस्थ रहावे.

माध्यस्थ भावनाचे विवेचन करताना तत्त्वार्थसूत्राच्या दीपिका निर्युक्तीमध्ये पू. घासीलालजी महाराज लिहितात- अविनित शठ अशा लोकांबद्दल उदासीनता भाव ठेवायला पाहिजे. ज्यांना ज्ञान दिले जाऊ शकते, जे त्याच्या योग्य आहेत, ते विनित आहेत, जे ज्ञान घेण्यास अपात्र आहेत, ते चेतन असूनही जड आहेत. सम्यग्ज्ञानविरहित आहेत. अज्ञानींच्या प्रभावाखाली आहेत अशा लोकांचा सुद्धा द्वेष न करता त्यांच्याविषयी उदासीन भाव ठेवायला पाहिजे. कारण नापिक जमिनीत रुजवलेले शुद्ध बी सुद्धा फलित होत नाही. त्याचप्रमाणे अशा लोकांना दिलेला सद्उपदेश फलित होत नाही.[१०५]

मध्यस्थ राहिल्याने भविष्यात लाभ होण्याची संभावना असते. जर क्रोध करून आलतु फालतू बोलू लागलो तर शब्द पकडले जातील आणि ते शब्द आपल्यालाच अपराधी सिद्ध करतील. परिणामतः आपले शब्द खरे असून खोटे साबित होईल. जर मौन राहिलो तर समोरच्या व्यक्तीला आपल्या अपराधाबद्दल विचार करण्याचा अवधी मिळेल. आणि कदाचित ती व्यक्ती आपल्या अपराधाची क्षमा मागायला येईल सुद्धा. म्हणून क्रोध करून वातावरण बिघडवण्यापेक्षा उदासीन राहून बिघडलेले वातावरण सुधारण्याची संधी द्यायला पाहिजे. उदासीन भाव ठेवल्याचे अपार शांती अनुभवायला मिळते. माध्यस्थ्य, उदासीन, उपेक्षा हे शब्द पर्यायवाची आहेत.[१०६]

युवाचार्य मधुकरमुनिजी महाराजांनी श्रावकांना पवित्र जीवनाची प्रेरणा देताना म्हटले 'श्रावक सद्गुण' अशा शीर्षकाखाली काही श्लोक लिहिले आहेत. त्यात श्रावकात माध्यस्थ्य भावनाची किती आवश्यकता आहे त्यावर एक सुंदर श्लोक लिहिला-

''मध्यस्थो गुणवान् विज्ञो धीरो वीरोऽस्ति यः प्रियः।
औदासिन्य समापन्नः श्रावकः स प्रकिर्तित ॥''

यापुढे जाऊन ते लिहितात - माध्यस्थ्य वृत्ती जागृत झाल्याने व्यावहारिक जीवनातील हजारो प्रश्न आपोआप सुटू लागतात. जीवनात कलह, विग्रह एवं विवाद होणेच

बंद होऊन जातात. आणि मग चेतनायुक्त आनंदमय, शांतीमय जीवनाचा आनंद प्राप्त होतो.[१०७]

माध्यस्थ्य भावना गीतामध्ये ज्याला ''स्थितप्रज्ञता'' म्हटले आहे. त्याने राग-द्वेषावर विजय मिळविला जातो.

उदासीन भावात जेव्हा हर्ष शोकासारखे प्रसंग येतात तेव्हा त्या प्रसंगात हुरळून न जाता, हर्ष आणि विषादापासून चित्त अलिप्त ठेवून निस्पृह स्थिर रहावे लागते. डोळे, कान उघडे ठेवून सुद्धा मनावर त्याचा परिणाम होता कामा नये. श्रीमद्राजचंद्रजींनी या भावनेचे यथोचित वर्णन केले आहे.

''शत्रु मित्र प्रत्ये वर्ते समदर्शिता, मान अमाने वर्ते ते ज स्वभावजो,
जीवित के मरणे नहि न्यूनाधिकता, भाव मोक्षे पण शुद्धवर्ते समभावजो
अपूर्व अवसर एवो क्यारे आवशे ।''

शत्रू असो अगर मित्र सर्वांवर समभाव असावा. कोणी वन्दो किंवा निन्दो आपल्या आत्म्याचा जो स्वभाव-शांत, दांत, क्षमा इ. त्यात बदल होता कामा नये.

मन फार संवेदनशील आहे. त्याच्यावर चांगल्या, वाईटाचा लवकर परिणाम होतो. तरीही अशा चंचल मनाला अभ्यासाने पुरुषार्थाने काबूत ठेवता येते.

चार योगभावनांचे सार

आज जन-जीवनात आपण जी ईर्षा, संघर्ष आणि कलह होताना पाहतो त्याचे एकच कारण म्हणजे या भावनांचा अभाव. जर आपण मित्रता, गुणाग्राहकता, करुणा आणि तटस्थता भावना आत्मसात केल्या तर संसारातील अधिकांश दुःख व समस्या स्वयमेव दूर होऊन जातील.

जगात सगळ्यात मोठी समस्या 'रोटी, कपडा, मकान''च फक्त नाही. ही तर सामान्य समस्या आहे. अधिकांश समस्या मानवनिर्मित आहेत. माणसातील राग-द्वेष-अहंकार आणि स्वार्थ यांनी जास्त समस्या निर्माण केल्या आहेत. ज्या आपण रोज वाचतो, ऐकतो, पाहतो आहोत. ही मूळ कारणे जर नष्ट केली तर जगातील ९०% समस्या राहणारच नाहीत. या मानवीय समस्यांना दूर करण्यासाठी या योगभावना फार महत्त्वाच्या आहेत.

आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिले तर आत्म्याचे पतन करणारे चार कषाय आहेत- (क्रोध, मान, माया लोभ) जे जन्ममरणाच्या बीजावर सिंचन करतात. अर्थात

जन्म-मरणाच्या परंपरेला वाढवणारे आहेत. मैत्री इ. योग भावना चार आहेत. चार भावनांच्या चिंतनाने चार कषायांवर विजय मिळवता येतो उदा.

मैत्री भावनेने क्रोधावर विजय

ज्याच्या जीवनात मैत्री आहे, जो प्राणिमात्रांवर मित्रता भाव ठेवतो, त्याला क्रोध येतच नाही. मित्राचा क्रोध येतच नाही. ''मित्तिमे सव्व भूएसु'' जगातील सर्व जीवांबद्दल माझ्या मनात मैत्री भाव आहे. या भावनेला भावित केले तर जगात आपला कोणी शत्रूच राहणार नाही. ज्याच्यावर आपण क्रोध करावा.

प्रमोद भावनेने मानावर विजय

प्रमोदभावना जीवाला गुणग्राही बनवते. दुसऱ्यातील गुणांना पाहण्यासाठी विनय, विवेक, नम्रता इ. गुण स्वतःत असणे आवश्यक आहे. अभिमानी आपल्या स्वतःलाच मोठा समजतो, परंतु प्रमोदभावना जीवाला विनम्र करते. नम्र होऊन दुसऱ्याचे गुणानुमोदन केल्याने मान कषाय स्वतः शांत होतो.

करुणा भावनेने मायावर विजय

ज्याच्या हृदयात करुणा आहे. तो दुसऱ्यांबरोबर मायाचार, कपटबाजी, धोका देणे असे निम्न श्रेणीचे आचरण करू शकणार नाही. करुणा, अनुकंपा तर समकितचे लक्षण आहे. सम्यक्त्वी जीव मायावी कसा असू शकेल ? अशा प्रकारे करुणा भावनाने माया स्वतःच नष्ट होते.

माध्यस्थ्य भावनाने लोभावर विजय

माध्यस्थ्य भावनांचे भेद आपण पाहिले. त्यात सुख-दुःख, प्रिय अप्रिय, जीव-जड कोणाहीबद्दल न राग, न द्वेष. सुखात लीन व्हायचे न, दुःखात दीन लाचार व्हायचे. याचेच नाव माध्यस्थ्य भावना. ज्याच्या जीवनात माध्यस्थ्यभावना आहे, तो लोभ करूच शकत नाही. म्हणूनच माध्यस्थ्यभावनाने लोभावर विजय प्राप्त होतो.

अशाप्रकारे या चारभावना, चार कषायांना जिंकण्यासाठी आधाररूप आहेत. कषाय सतत आत्मिगुणांचे शोषण करतात. चार योगभावना चार कषायांना नष्ट करण्यासाठी अग्नीचे काम करतात.

जीवनात धर्मप्राप्तीच्या अगोदर जीवात्मा केवळ स्व-सुखाची चिंता, स्व-गुणांचाच प्रमोदभाव, स्व-दुःखाबद्दल करुणा. परंतु पापाबद्दल मात्र उपेक्षा. परंतु जीवनात

धर्माचे, सम्यक्त्वाच्या आगमनाने 'स्व'च्या जागी 'सर्व' येतात. सर्वांच्या सुखाची चिंता, सर्व गुणीजनांच्याबद्दल प्रमोदभाव, सर्वदुःखी प्राण्यांबद्दल करुणा आणि सर्व पापी प्राण्यांबद्दल उपेक्षाभाव येतो.

या चार भावनांना जो आपल्या आत्म्यात स्थान देतो. भक्ती करतो तो महापुरुष विस्कळित झालेल्या विशुद्ध ध्यानाची कडी पुन्हा जोडतो.[१०८]

या चार भावना मुनीजनांसाठी आनंदरूप अमृत झरणाऱ्या चंद्राच्या चांदण्यांसमान आहेत. जो या भावनांनी युक्त आहे त्याचे कषाय मंद असतात. या भावना शेवटी मोक्षमार्गाकडे नेणाऱ्या असतात.

या भावनेत रमणारा योगी अत्यंत सअतिशय आत्मातून उत्पन्न झालेले अतिन्द्रिय सुखाला याच लोकात निश्चितपणेप्राप्त करतो. अर्थात अरिहंत भगवान जो आत्मिक आनंद प्राप्त करतात तसा आत्मिक आनंद याच भवात प्राप्त करतात. ते जगाच्या स्वरूपाला पाहून आत्मध्यानाकडे पुढे वाटचाल करतात. इंद्रिय विषयांचा मोह करीत नाहीत. स्व-स्वरूपात रमण करू लागतात. मोहनिद्रा सोडून योगनिद्रे (ध्यान)मध्ये स्थित होऊन जातात.

या चार भावनांनी साधक भावित होतो. या भावनेच्या वश होतो. तो समस्त जगाकडे भाव दृष्टीने पाहाता पाहाता उदासीनतेला प्राप्त होतो. जगात जितेन्द्रिय जीव मुक्त आत्म्याप्रमाणे विचरण करतात. अर्थात् मुक्तीच्या सुखाचा अनुभव याच भवात करतात.

अशा प्रकारे शुभध्यानाची सामग्री स्वरूप या भावनांच्या चिंतनाने ध्यानाची सिद्धी प्राप्त होते.[१०९]

आत्म्याच्या सूक्ष्म व स्थूल अथवा आंतरिक तथा बाह्य प्रयत्नांना वृत्ती म्हणतात. ते आत्म्याचा विजातीय, वैभाविक बाह्य पदार्थांच्या संयोग झाल्यामुळे त्यांना मिटवण्यासाठी भावनांची महत् युक्तता आहे.[११०]

या च्यार भावनांचे वर्णन योगदर्शनातही आहे. त्यांनी या भावनांना चित्ताच्या प्रसन्नतेचे आणि मनाच्या निर्मलतेचे कारण मानले आहे.[१११] ते लिहितात-

मैत्री करुणा मुदितोप्रेक्षाणां सुखदुःख पुण्यापुण्य विषयाणां भावनात्श्चित्त प्रसाधनम् ॥

या चार भावना प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात उपयोगी आहेत. आपल्या जीवनात

आचरण्यासाठी आहेत. म्हणून यास ''व्यवहार भावना'' ही म्हणतात. योगाची आवश्यक भावना आहे. म्हणून योग भावनेच्या नावाने यांचे विवेचन केले आहे.

जगात या चार भावनांचा व्यापक, विस्तीर्ण प्रसार करण्याची फार आवश्यकता आहे. विश्वशांती, समता आणि समन्वयासाठी या भावना अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

पंडित आशाधरांनी अणगार धर्मामृतमध्ये पाच महाव्रतांच्या पंचवीस भावनांचे वर्णन केल्यानंतर सर्वात प्रथम या चार भावनांचे वर्णन केले आहे. त्यावरून स्पष्ट होते की पंडित आशाधरांनी यांना फार महत्त्वपूर्ण मानले आहे. ज्याप्रमाणे आज प्रेक्षा, विपश्यना इ. विविध प्रकारे ध्यानाचा अभ्यास केला जातो, त्याबरोबरच भावनांचा जीवनात आत्मसात करण्याची वैज्ञानिक विधीद्वारा प्रयत्न करायला पाहिजे. भावनांच्या आधारावरच ध्यान आधारित आहे. असा अंदाज केला जातो की कधी जैन साधना पद्धतीमध्ये भावनांच्या अभ्यासाच्या काही प्रक्रिया होत्या. ज्याचे विवेचन काही अंशी आमच्या आचार्यांनी, लेखकांनी वरीलप्रमाणे प्रस्तुत केले आहे.

मुनी श्री अरुणविजयजीं भावनांना क्रियात्मक रूपात समजावण्यासाठी शिबिराचे आयोजन करीत आहेत. भावनांना क्रियात्मक रूपात जीवनात आचरण्याचा अभ्यास व्हायला पाहिजे. तो अभ्यास वैज्ञानिक विधीनुसार कशाप्रकारे असावा यावर जैन मनीषी, ध्यानयोग आणि चिंतकांनी अवश्य विचार करावा. कारण की, केवळ व्याख्या किंवा विवेचन केल्याने तत्त्वाचा साक्षात्कार होत नाही. तत्त्वाचा साक्षात्कार होण्यासाठी स्वतःला अनुभूती होण्याची आवश्यकता आहे. जी क्रियात्मकतावर आधारित आहे.

मैत्री, प्रमोद, कारुण्य, माध्यस्थ्य इ. या चार भावना मानव जीवनाला स्पर्श करतात. जो मोह, ममता, क्रोध, राग, द्वेष इ. द्वारा त्यास अधःपतित करतात. या भावनांच्या चिंतनाने साधक या दुर्गुणापासून आपल्याला दूर ठेवतो. साधनेच्या मार्गावर अविकृत, अस्खालित रूपात गतिशील राहू शकतो. कारण की, अगोदरच्या प्रसंगाने सूचित केले आहे, ही कर्माच्या विस्ताराचे बी भावनांच्या रूपात प्राप्त होते.

अशाप्रकारे भावनेने भावित होणारा जीव अग्नीप्रमाणे मूळापासून कर्मसमूहाला जाळून टाकतो. मग तो अनुकूल संयोगात हर्ष आणि प्रतिकूल संयोगात शोक करीत नाही. या भावना भवरूपी समुद्राला पार करवणाऱ्या नावे प्रमाणे आहे. अज्ञानाच्या गाढ अंधकारातून ज्ञानाची परमज्योती आणि दिव्य ज्योती दिव्य तेज प्रकट करण्यात सक्षम आहे. या भावनांमुळे दोष निवारण होतात. आणि गुणांवर पडलेल्या आवरणाला दूर करून

शुद्ध, बुद्ध, निरंजन, निराकार आत्मतत्त्वाचा आविष्कार होतो.

या भावना "मोक्षेण योजना योगः"[११२] योग आत्म्याच्या संबंध मोक्षावरोबर जोडतो. अर्थात् या चार योग भावनांचं जो साधक चिंतन करतो, त्याचा मोक्षाशी संबंध जुळतो.

भावनांच्या चिंतनाचे ज्ञान झाल्यानंतर साधकाने क्रियात्मक रूपात भावनांचा अभ्यास करण्यासाठी सर्वात प्रथम मनात एक सरळ सोपी विधिचा प्रयोग करावा जो इष्ट प्राप्तीमध्ये अधिक मदनरूप होऊ शकेल. साधकाने एका आसनावर स्थिर बसावे. मनाला एकाग्र करावे. श्वासाचे निरिक्षण करावे. मग एक-एक भावनाचे चिंतन करावे. असे केल्याने अशुभ विचार लय पावतात आणि शुभ संस्कार निर्माण होतात.

भावना चिंतनाच्या प्रयोग केल्याने माणसात निश्चित परिवर्तन होते. भावना बदलली की माणूस बदललाय म्हणून समजावे. कारण भावना बरोबर आपले रसायन बदलून जातात. यात विश्वास आणि आस्थाची महत्त्वाची भूमिका असते. आपण जगात पाहतोच की लोक संतांची चरणधूळ घेऊन भयंकर आजारापासून मुक्त होतात. तर मग काय चरणाच्या धूलीमध्ये इतकी शक्ती आहे ? की हा चमत्कार आहे ? नाही, हा चमत्कार नाही. हा भावनांचा प्रभाव आहे. भावनेच्या प्रयोगाने आस्था, विश्वासाच्या शक्तीचा उपयोग केला आणि रासायनिक परिवर्तनाद्वारे विविध पाप, ताप धुवून गेले. एवढेच काय पण अनेक प्रकारचे आजारही नष्ट होऊन जाऊ शकतात. आंतरिक रसायन बनवण्याची आणि बदलण्याची प्रक्रिया ही आध्यात्मिक चिकित्सेची प्रक्रिया आहे.

यात मैत्री इ. भावनांचा जो उल्लेख केला आहे तो पाच महाव्रतांना दृढ करण्याची पूर्ण भूमिका आहे.

याच्या पुढील प्रकरणात हिंसा इत्यादी अशुभ कर्मबन्धाच्या निवृत्तीत पाच महाव्रतधारी साधूंचे क्रियाविशेषाचे हेतू आहेत. त्यासाठी अन्य भावनांचे निरूपण केले जाईल.

संदर्भ

१. ज्ञानवर्णव सर्ग २७ श्लोक ४ पृ. ३५८

२. योगाबिन्दु ले. हरिभद्रसूरि गा. ३५८ ते ३६७ पृ. १७४ ते १७८

३. तत्त्वार्थ सूत्र ३/६

४. जैन योग चतुष्टय योगबिन्दु गा. ४०२, पृ. १९३

५. भगवती आराधना गा. १६९१ पृ. ७४९

६. सर्वार्थसिद्धि, आचार्य पूज्यापाद, पृ. २६३

७. तत्त्वभावना, आचार्य अमितगति, सामायिकपाठ श्लोक १

८. योगशास्त्र ४/११७ पृ. १४४, १४५

९. अध्यात्मकल्पद्रुम अधिकार, श्लोक ११, पृ. १९

१०. भावनाशतक पंडित मुनिश्री रत्नचंद्रजी मैत्रीभावना श्लोक १ पृ. ३७५

११. भावनाशतक पं. रत्नचंद्रजी परिशिष्ट मैत्रीभावना श्लोक २ ते ७ पृ. ३७४

१२. कबीर ग्रंथावली भाष्यकार - भागवत्स्वरूप मिश्र सा. १० पृ. १४५

१३. चिंतनकी चिनगारी ले. भद्रंकर विजयजी गणिवर पृ. १०७

१४. उत्तराध्ययन सूत्र. पू. मिश्रीलालजी म. अध्ययन २९, सूत्र १७, पृ. ४९७

१५. उत्तराध्ययन सूत्र. पू. मिश्रीलालजी म. अध्ययन ६, गा. २ पृ. १०१

१६. ध्यानः एक दिव्य साधना - ले. डॉ. शिवमुनिजी पृ. १८

१७. क्षमेऽहं सर्वसत्वानाम्, क्षमयेऽहं र्ससत्वान् मैत्री में सर्व सत्वेषु वैरं मम न केनचित् ॥ सभाष्य तत्वार्थाधिगम् सूत्र- अध्याय ७ सूत्र ६ का भाष्य पृ. ३२७

१८. 'मन का काया कल्प' ले. युवाचार्य महाप्रज्ञ पृ. २०१

१९. ''माया जहा नियपुत्तं, एकमत्तणु रक्खे । भावय अपरिमाणं''
श्रमणसंस्कृति सिद्धान्त और साधना सं. कलाकुमार, पृ. २४

२०. योग अने ध्यान ले. विजयमुनिशास्त्री, पृ. ८५

२१. समांतर कोश हिन्दी थिसारस, संदर्भखंड, पृ. ३७५, ३७६

२२. मंत्र भलो नवकार ले. भद्रंकर विजयजी, पृ. ११०

२३. चिन्तक की चिनगारी, पृ. २६

२४. नमस्कार मीमांसा ले. भद्रंकर विजयजी, पृ. २०६-२०७

२५. नमस्कार मीमांसा ले. भद्रंकर विजयजी, पृ. २०७-२०८

२६. नमस्कार मीमांसा, पृ. २०७-२०८

२७. धर्मश्रद्धा श्री भद्रंकरविजयजी गा. ६, पृ. १३०

२८. दशवैकालिक सूत्र अ. ४ गा. ९

२९. नमस्कार मीमांसा, पृ. १०६-१०७

३०. समतायोग ले. रतनमुनि, पृ. ३५

३१. ज्ञानार्णव सर्ग २७, श्लोक ५, ६

३२. योगशास्त्र प्रकाश ४, श्लोक ११८ पृ. १४५

३३. षोडषक प्रकरण षोडषक ४, श्लोक १५

३४. अध्यात्मकल्पद्रुम अध्याय ११, श्लोक ११, १२

३५. योगशास्त्रप्रकाश ४ श्लोक. १७ टीका

३६. आपणे आत्मनिरिक्षण करीशु ? पृ. ४२

३७. तत्त्वार्थसूत्र व्याख्याकार - पू. घासीलालजी म. अ. ४. सू. १४. पृ. ४७९

३८. शांतसुधारस १३ मैत्री भावना, श्लोक १ ते ४ पृ.

३९. मूलाचार ले. वट्टकेर गा. ५१८ टीका पृ. ३९४

४०. समतायोग पू. रतनमुनिजी पृ. २७

४१. मंगलवाणी सिद्धिके सोपान पृ. गा. ११ पृ. ९५

४२. सुखचिन्ता मता मैत्री, सा क्रमेण चतुर्विधा। उपकारी, स्वकीया, स्वप्रतिपन्नाऽखिलाश्रया (द्वात्रिंशत द्वात्रिंशिकाद्वार - १८ श्लोक ३ समतायोग ले. रतनमुनी पृ. ३७

४३. आरम्भ गुर्वी क्षयिणी क्रमेण, लघ्वी पुरा वृद्धि मतीच् पश्चात् दिनस्य पूर्वार्ध्व-परर्द्धभिन्ना, छायेव मैत्री खल सज्जनानाम् पुष्पपुराण ले. महासती पुष्पावती-संपादक - देवेंद्र मुनीजी पृ. ६७-६८

४४. प्रश्नव्याकरण सूत्र २/१/११३ पृ. १७७ व्यावर मधुकरमुनी

४५. स्वाध्याय संदेश पत्रिका - ले. जशकरणजी डागा. अगस्त १९९७ पृ. ३१
४६. तत्त्वार्थसूत्र ५/२१
४७. सर्वार्थसिद्धि ७/११/६८३ पृ. २६३
४८. अंतकृत दशांगसूत्र वर्ग ६
४९. उत्तराध्ययन सूत्र अध्ययन १२ गा. ३७
५०. शासन प्रगति वर्षे ७ अंक १० पृ. १९ ते २१
५१. योगदर्शन साधनपाद २
५२. सामायिक सूत्र ले. अमरमुनिजी पृ. ७५
५३. आगम स्वाध्याय पाठमाला - मेरी भावना पृ. ३४७
५४. अर्चना और आलोक - ले. उमरावकवरजी अर्चना पृ. ७७
५५. अर्चना और आलोक - ले. उमरावकवरजी अर्चना पृ. ७७
५६. ज्ञाताधर्मकथा श्रु। अध्ययन ४ सूत्र १४, पृ. २१७
५७. श्री कुलकसंग्रह गुणानुरागकुलकम् गा. २ पृ. १
५८. श्रीकुलकसंग्रह विषय गुणानुरागकुलकम् गा. ५ पृ. २
५९. ध्यान कल्पतरू ले. अमोलकऋषीजी म. सा. पृ. ३०
६०. चिन्तनकी चिनगारी ले. भद्रंकर विजयजी पृ. ८२, ८३
६१. ज्ञानार्णव सर्ग २७, श्लोक ११-१२ पृ. २५९
६२. योगशास्त्रप्रकाश ४, श्लोक ११९, पृ. १४५
६३. शांतसुधारस १४ प्रमोदभा श्लोक ३ते ५ गीतिका श्लोक १-२
६४. शांतसुधारस १४ वी प्रमोदभावना गा. १ पृ. ६०
६५. शांतसुधारस १४ वी प्रमोदभावना गा. १ पृ. ६१
६६. शांतसुधारस १४ वी प्रमोदभावना गा. ४ पृ. ६२
६७. भावभानुउद्यान ले. विजय जयघोष सूरीश्वरजी म. पृ. ९४
६८. भगवती आराधना आ. शिवार्य गा. १६९१ पृ. ७४९
६९. प्रश्नव्याकरण सूत्र श्रुतस्कन्ध २, संवरस्थान अध्ययन १, सूत्र ११२, पृ. १७६
७०. ज्ञानार्णव सर्ग २७, श्लोक ४ ते १० पृ. २५९

७१. योगशास्त्र चतुर्थ प्रकाश, श्लोक १२० पृ. १४५
७२. पुष्पपराग ले. साध्वी पुष्पावतीजी सं. देवेन्द्रमुनि 'शास्त्री' पृ. ६५-६६
७३. ज्ञाताधर्मकथा अ. १/१८१ते १८६ पृ. ८६ ते ८८
७४. शांत सुधारस १५, कारुण्यभावना श्लोक १ ते ३
७५. सरल भावना बोध ले. गणेशमुनी 'शास्त्री' १५ कारुण्य भावना पृ. १५७
७६. तत्त्वभावना, ले. अमितगति आचार्य सामायिक पाठ श्लोक १
७७. तत्त्वार्थ सूत्र दीपिका निर्युक्ति अ. ४. सू १४, पृ. ४८१
७८. शासनप्रगति पत्रिका वर्ष ७, अंक ११-२५-१-९५ पृ. ६,७
७९. पुरुषार्थसिद्धि - ४/२९/६५ पृ. ८३
८०. पुरुषार्थसिद्धि - ४/३०/६६ पृ. ८४
८१. पुरुषार्थसिद्धि - ४/३१/६७ पृ. ८५
८२. पुरुषार्थसिद्धि ४/२९-६३ ते ४/३२-६८, पृ. ८३ ते ८५
८३. दशवैकालिक सूत्र - अ. ६ गा. १०
८४. आगम अनुप्रेक्षा श्लोक. १५३ पृ. ३०
''धर्मकल्पतरोर्बीजं विश्वाविश्वसुखावहा, अनंतदुःखविच्छेद कारिणी विद्यतेया''
८५. शांतसुधारस उ. विनयविजयजी भावना १५- श्लोक १ गीत
८६. ध्यानकल्पतरू ले. अमोलकऋषीजी म. पृ. ३१
८७. जो उ परं कंपंतं दट्ठुण न कंपए कठीण भावो''
एसो निरणुकंपो अणु पच्छा भाव जोएणं ॥ बृह. कल्प भाष्य गा. १३२०
८८. कैसे सोचे - ले. आ महाप्रज्ञ पृ. १९७, १९८
८९. भावना भवनाशिनी ले. अरुणविजयजी म. करुणाभावना पृ. ३१
९०. ज्ञानर्णव सर्ग २७ श्लोक. १३.१४, पृ. २६०
९१. योगशास्त्र चतुर्थ प्रकाश श्लोक १२१, पृ. १४६
९२. शांतसुधारस १६, माध्यस्थ भावना श्लोक १-२
९३. शांतसुधारस १६ माध्यस्थ गेयाष्टक श्लोक १,२,३,५
९४. शांतसुधारस उ. विनयविजयजी १६/३ पृ. ७१

९५. भावना भव नशिनी ले. राजेंद्रमुनिशास्त्री पृ. १५५ ते १५७
९६. प्रबुद्ध जीवन लेख माध्यस्थभावना लेखिका - ताराबेन र. शाह ता. ७-९५ पृ. १०,११
९७. समता योग ले. रतनमुनि पृ. ७५
९८. शांतसुधारस विवेचन भा. २ पृ. २१८ ले. मुनश्री रत्नसेन विजयजी.
९९. आचारांग सूत्र २.४.३.२७
१००. भावना भव नाशिनी ले. राजेंद्रमुनि शास्त्री पृ. १५७
१०१. पुष्पपराग ले. पुष्पावतीजी सं. आ. देवेन्द्रमुनीशास्त्री पृ. ६९-७०
१०२. चिन्तनकी चिनगारी पृ. ९१
१०३. चिंतनाची चिनगारी ले. भद्रंकर विजयजी पृ. ९२ ते ९५
१०४. समतायोग ले. रतनमुनीजी पृ. ८२, ८३
१०५. तत्त्वार्थसूत्र दीपिका निर्युक्ति - अ. ४. सू. १४. पृ. ४८२
१०६. सभाष्यतत्वार्थाधिगम् अ-७ सू-७. पृ. ३२८
१०७. युवाचार्य श्री. मधुकरमुनी स्मृतिग्रंथ तृतीय खंड कृतिदर्शन पृ. ८
१०८. योगशास्त्र आ. हेमचंद्रजी श्लोक १२२ पृ. १४६
१०९. ज्ञानार्णवसर्ग २७ श्लोक १५ से १९ पृ. २६०, २६१
११०. जैनयोगग्रंथ चतुष्टय योगबिन्दु गा. ४०२ से ४०६ पृ. १९३ ते १९४
१११. पातंजलयोगसूत्र १/३३
११२. ज्ञानसार गा. २०९ पृ. ३९७

❊ ❊ ❊

प्रकरण सातवे

अशुभाकडून शुभ आणि शुद्धाकडे जाण्याचा राजमार्ग

प्रकरण सातवे

अशुभाकडून शुभ आणि शुद्धाकडे जाण्याचा राजमार्ग

भारतीय दार्शनिकांच्या चिंतनाचा मुख्य व अंतिम विषय आत्मा आहे. परंतु जेव्हा जीवात्मा अशुभ भावनेचा परित्याग करून शुभभावनेमध्ये येतो तेव्हाच शुद्ध भावनेकडे अग्रेसर होतो. कारण की परिणाम उत्तरोत्तर निर्मलतेकडे जातात. म्हणून ती क्रमशःच होत जाते. ज्याने पहिल्या पायरीवर पाय ठेवला तो दुसऱ्या पायरीवर पाय ठेवून पायऱ्या चढतच जाणार. परंतु ज्याने पहिल्याच पायरीवर पाय ठेवलाच नाही तर तो दुसरी पायरी चढूच शकणार नाही. जो पायऱ्या चढतो त्याची शुभभावना परिपूर्ण झाली. मुमुक्षू असणाराच शुद्ध भावनेत पुढे जातो. म्हणून पूर्व प्रकरणात शुभाशुभ भावनांचा विचार प्रकट केल्यानंतर अशुभाकडून शुभ आणि शुभाकडून शुद्धाची अंतरयात्रा याचे या प्रकरणात विवेचन केले आहे.

अशुभ विकृती आहे; शुभ संस्कृती आहे आणि शुद्ध प्रकृती आहे. आत्म्याचा नैसर्गिक स्वभाव अनन्तज्ञान, अनन्तदर्शन, अनन्तसुख आणि अनन्त शक्ती आहे. परंतु त्याच्यावर कर्मांचे आवरण आलेले आहे. विचार आणि ज्ञान-विज्ञानाची ज्योती धुमिल झाली आहे. ती धूळ झटकायची आहे. हेच मानवाचे प्रथम कर्तव्य आहे.

आत्म्याच्या मूलगुणांवर विकारांचा मळ साचला आहे. त्याला दूर करून मूळ स्वरूपात आत्म्याला आणायचे ही संस्कृती आहे.

आत्म्याच्या स्वभावाचे चिंतन केल्याने, आत्मस्वरूपाचे ध्यान केल्याने आत्मसिद्धी प्राप्त होते. सर्व ज्ञानीजनांनी हाच मार्ग स्वीकारला आहे. आत्मज्ञानाशिवाय आत्मभावना जागृत होत नाही. जो आत्म्याच्या शुद्ध ज्ञाता, द्रष्टा स्वरूपाची उपासना करतो तो स्वतः ज्ञाता-द्रष्टा बनून जातो. जशी कापसाची वात पेटवल्यावर ती वात आणि अग्नी स्वयं दीप बनून जाते, त्याप्रमाणे आत्मस्वरूपाच्या लाभासाठी आत्मस्वरूपाचे ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे.

आपले जीवन घड्याळाच्या लोलकाप्रमाणे आहे. कधी अशुभ विचाराकडे तर कधी शुभ भावात तर कधी शुद्ध भावाची अनुभूती घेण्याकडे वळसे घेत असते. सुखी

अनुभूती झाली की मग ती चिरस्थायी होऊन जाते. आपला जीवनव्यवहारच त्यामुळे बदलून जाईल. अज्ञानाच्या अंधारात ठेचाळणे संपून जाईल. परंतु त्यासाठी आत्मलक्षी बनणे अत्यंत आवश्यक आहे.

संसारातील प्रत्येक प्राणी आत्मविकास करू शकतो. आत्मचिंतन व आत्मविकास यांवर कोणाही देश, जाती, वर्ण, वर्ग, धर्मविशेषाचा एकाधिकार नाही. कारण भारतीय चिंतकांनी आध्यात्मिक साहित्य व समस्त धर्मग्रंथात आत्म्याच्या चरम विकासाचे ध्येय मोक्षच मानले आहे.

आत्मचिंतक कितीही कष्ट, दुःख आले तरी त्याचा सामना करून ह्यावर विजय मिळवू शकतो.

आत्मचिंतन करण्याअगोदर सर्वप्रथम क्षेत्रविशुद्धी करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे शेतकरी शेतात बी पेरण्याच्या अगोदर शेतातील तृण, दगड-गोटे नांगरून मग पेरतो त्याचप्रमाणे आत्मभावनेचे चिंतन करण्याअगोदर आपल्या आत्म्यावर राग-द्वेष, विकारांचे जे तृण साचलेले आहे त्यांना काढून टाकायला हवे. आत्मभूमीवर दुर्गुणांचे दगड-धोंडे विखुरलेले आहेत ते दूर करून सद्गुणांचे बी पेरायला पाहिजे. अशुभ-प्रवृत्तींपूर्णपणे त्याग केल्याने शुभ प्रवृत्तींद्वारा संसाराची असारता, अनित्यता, अशरणता इ. वैराग्य भावाने ओतप्रोत होते.

चित्तशुद्धीसाठी शुभप्रवृत्ती असणे आवश्यक आहे. कारण अशुभ वृत्तींचा नाश स्वतः नाही होत. त्यासाठी चित्तातील अशुभवृत्तींना शुभवृत्तींत रूपांतरित करणे आवश्यक आहे. शुभप्रवृत्तीमुळे शुद्धोपयोग किंवा शुद्धात्मभावाचा विकास होणे संभव आहे.

ज्याप्रमाणे फुग्यात हवा जसजशी भरली जाते तसतसा तो फुगत जातो तसाच तो पातळ होत जातो आणि जर जास्त हवा भरली गेली तर तो फुटून जातो. हेच उदाहरण शुभभावांना लागू होते. जसजशी शुभ भावांची वृद्धी होत जाते तसतसे आत्म्यातील कषाय पातळ होत जातात आणि शुभ भाव किंवा शुभप्रवृत्ती आपल्या चरम सीमेवर पोहोचतात, तेव्हा ते कषायरहित होऊन शुद्ध भावात लीन होऊन जातात.[२] शुभ भाव अशुभ-भावांना नष्ट करतात आणि शुद्ध भावा निर्माण करण्यात साहाय्यक होतात.

आगमामध्ये आत्मभावना

आत्म्यासंबंधी किंवा शुद्धोपयोगमय भावनाच्या संदर्भात आगमामध्ये वेगवेगळ्या प्रकारे विवेचन केले गेले आहे.

असणे शुभयोगाचे फळ आहे. दुःखी होणे अशुभाचा भोग आहे. या सुख-दुःखाच्या पलिकडे शुद्ध आत्मभावभोगाने योगात प्रवेश करायचा. मानवाचा श्रेष्ठ पुरुषार्थ आहे खरी शाश्वत सुख-शांती प्राप्त करणे. अशुभ भावाचे मंथन, शोधन व विरेचन करून त्यांना शुभ-भावनेत स्थित करण्याची प्रक्रिया आत्मा, महात्मा आणि परमात्माची विकसित श्रेणी आहे.

सिद्धांताच्या दृष्टीने जीवाचे असंख्य परिणामांचे मध्यम वर्णन चौदा गुणस्थानांच्या रूपाने केले आहे. त्या गुणस्थानांचे संक्षेप रूपाने वर्णन करताना असे घटित होऊ शकते की प्रथम तीन गुणस्थानांचे तारतम्यपूर्वक कमी झाले तर अशुभयोग घटित होतो. चवथ्यापासून सहाव्या गुणस्थानापर्यंत तारतम्यपूर्वक वाढत जाऊन शुभोपयोग, सातव्या पासून बाराव्या गुणस्थानांपर्यंत तारतम्यपूर्वक शुभ आणि शुद्धोपयोग आणि शेवटचे दोन गुणस्थान यात मात्र शुद्धोपयोग फलित होतो, असे वर्णन काही अंशी करू शकतो. आत्म्याचे ज्ञान, दर्शन चारित्र इ. गुणांची शुद्धी-अशुद्धी आणि उत्कर्ष-अपकर्षाचे वर्गीकरण गुणस्थानात होतो.[१]

आपले वर्तन आपल्या जीवनातील बागणुकीतून प्रकट होत असते. आत जे भाव असतात तसेच ते बाहेर अनायास प्रकट होत असतात. यालाच जीवन व्यवहाराची अभिव्यक्ती म्हणता येईल. जर एखाद्या नदीचा मूळस्रोत विषाने माखलेला असेल तर त्याच्या लाटा, त्याचे उडणाऱ्या तुषारात विष असणारच आणि जर तो मूळ स्रोत अमृताने युक्त असेल तर त्याच्या लाटेत, तुषारात अमृतच असणार. सर्व पाणी अमृतमय असेल.

एका खोलीत अंधार असेल तर आपण त्या खोलीत कधी भिंतीला ठेचकाळू तर कधी दाराशी टक्कर होईल. कधी भिंतीतून बाहेर येण्याचा प्रयत्न करीत राहू. बाहेर कदाचित निघू पण सर्वांशी टक्कर घेतल्यावरच. समजा त्या रूममध्ये कोणी दीपक आणला तर अडथळे आपोआप दूर होतील. ही बाहेरून लावलेली ज्योती मार्गदर्शक बनते, पण ती बाह्य ज्योती आहे. ती विझूपण शकते. परंतु आंतरिक आत्मज्योती अशी विझणारी नसते. ती पेटवायला अतिशय परिश्रम घ्यावे लागतात. पण एकदा ती प्रज्वलित झाली की मग मात्र कधीच विझणार नाही. कारण ती आंतरिक आत्म्याची ज्ञानरूपी ज्योत आहे कधीच न विझणारी.

आजही आपली आंतरिक ज्योत तेवत आहे. विझली तर ती कधीच नाही. कारण तीच आपली चेतना आहे. आंतरिक चेतनेचा एक भाग आहे. ती चेतना तेवतच आहे. फक्त तिच्याप्रती आपण जागरूक नाही. एकदा त्या चेतनाच्या आस्तित्वाची आपल्याला

उत्तराध्ययन सूत्रात म्हटले आहे की, आत्माच सुख-दुःख उत्पन्न करतोही आणि करतही नाही. अर्थात सुख व दुःख आपल्या कर्माच्या परिणामाप्रमाणे मिळतात. दुसरा कोणीही सुख दुःख देऊ शकत नाही. सुप्रस्थित आत्मा उत्तम श्रेष्ठ कर्मात संलग्न आत्मा आपला मित्र आहे. तथा दुःप्रस्थित दुष्कर्मात संलग्न आत्मा आपला शत्रू आहे.[३]

आगमकार जिज्ञासूंना सुबोधित करून म्हणतात की आपल्या आत्म्याशी युद्ध करा. आपल्या आत्म्याच्या दूषित व पापपूर्ण वृत्तींशी संग्राम करा, त्यांना नष्ट करा. बाह्ययुद्ध - ज्यांना आपण शत्रू मानतो अशा माणसांशी युद्ध - करण्यात काय अर्थ ? त्यामुळे तर शत्रुत्व वाढेल. दोषयुक्त किंवा सावध-पापाचरण युक्त आत्म्याशी लढणे जरूरीचे आहे.[४]

मोठ्या मुश्किलीने जिंकण्यायोग्य संग्रामात हजारो-हजारो शत्रूंना जिंकण्यापेक्षा आपल्या आत्म्याला जिंकणे फार मोठा विजय आहे. जो आत्मविजय करू शकतो तो एक फार मोठी लढाई जिंकतो.

जो आत्म्याच्या स्वरूपाला चांगल्याप्रकारे जाणून घेतो तो समस्त जगाला जाणू शकतो. जो एकाला जाणतो तो सर्वांना जाणतो.[५]

आत्म्याला जो जाणतो, समजतो, अनुभूती प्राप्त करतो, तो आत्मेतर पदार्थांना सहजपणे जाणतो. कारण त्यांना समजल्याशिवाय त्यांच्यापासून भिन्न असलेल्या आत्म्याचा बोध प्राप्त होऊ शकत नाही.

एक आत्म्याच्या स्वरूपाला जाणण्याचा अभिप्राय सर्वांना जाणून घेतले पाहिजे. आत्म्याशिवाय अन्य कोणते द्रव्य आहेत हे समजल्यानंतरच आत्म्याला समजून घेणे सार्थक होते. कारण संसारावस्थेमध्ये आत्मा अन्य पदार्थांशी संलग्न आहे. वास्तविक आत्मा आपल्या शुद्ध स्वरूपात सर्वथा एकाकी आहे. परंतु कर्मबद्ध अवस्था असल्यामुळे त्याचे आस्तित्व शुद्ध स्वरूपात समजत नाही. म्हणूनच तर आत्मज्ञान सर्वसापेक्ष आहे. सर्वसापेक्षतापूर्वकच आत्मज्ञान साध्य होते.

जो आत्मा ऋजू आहे. ऋजुता म्हणजे सरलता. सरलता ज्याच्यात आहे त्यालाच सिद्धअवस्था प्राप्त होते. कुटिलता ज्याच्यात आहे त्याची आत्मशुद्धी कशी होणार ? शुद्ध आत्म्यामध्येच धर्म टिकतो. अर्थात आंतरिक शुद्धतेशी धर्माचा संबंध आहे. धूररहित ज्योत जसा प्रकाश देते त्याचप्रमाणे शुद्ध आत्मा स्वतःच्या तेजाने उद्दीप्त होते. आणि ते परमनिर्वाणपद समस्त कर्मांपासून मुक्तता प्राप्त करून घेते.[७]

पाणी जसजसे निर्मळ होते, त्यातील घाण दूर झाल्यामुळे ते शुद्ध बनते तेव्हाच त्यात प्रतिबिंब स्पष्ट दिसते. जर पाणी गढूळ असेल तर प्रतिबिंब स्पष्ट दिसत नाही. याप्रमाणे आत्मस्वरूपाला समजावे. आत्म्यामध्ये जसजशा सत्-तत्त्वांची अभिरुची जागृत होते तसतसे तत्त्वगम्य होतात. सत्य तत्त्वांचा बोध प्राप्त होतो.[८]

हे विवेचन आत्माचे शुद्ध स्वरूप, शुद्ध भाव व शुद्धोपयोग दृष्टीने केले आहे. तत्त्व-अभिरुची जागृत होणे आणि त्यानुसार तत्त्वज्ञानाचा साक्षात्कार होणे ही आत्म्याच्या शुद्ध अवस्थेशी संबंधित आहे. तत्त्वज्ञानाचे फळच हे आहे की जिज्ञासू जीवाला आत्म्याचे शुद्ध स्वरूप अनुभूत व्हावे.

कषायांनी आत्म्याला जखडून ठेवले आहे. त्या अवस्थेमुळे आत्मा आपल्या शुद्ध स्वरूपाला विसरून गेला आहे. म्हणून आगमकार सांगतात की आत्म्याला कसा, तपाच्या माध्यमाने, आत्म्याला चिकटलेले विकार दुर्बल करा, क्षीण करा, आपल्या स्वतःला जीर्ण करा. वासना, तृष्णा या वृत्तींना नष्ट करून टाका.[९]

कषाय व भोग या वृत्तींना क्षीण केले तर परिणामतः आत्मशुद्धी होते. आत्मशुद्धी हेच साधकाचे खरे साध्य आहे.

पाच इंद्रिय, क्रोध, मान माया, लोभ आणि आपला आत्मा जे जिंकणे अतिशय कठिण आहे. वास्तविक साधकाचे हे दहा शत्रू आहेत. कारण हेच तर आत्म्याला त्याच्या शुद्ध दशेपासून दूर ठेवतात व अशुद्ध अवस्थेत नेतात. या दहा शत्रूंच्या केंद्रस्थानी आत्मा आहे. कारण इंद्रिय इ. शत्रू आत्म्याच्याच केंद्रात ठाण मांडून आहे. आत्म्याला त्यापासून जिंकून घेतल्यावर, वरा करून घेतल्यावर इंद्रिये व त्यांच्या दूषित वृत्ती म्हणजे कषाय स्वयमेव समाप्त होऊन जातात.[१०] कारण ''छिन्ने मूले नैव शाखा न पत्रम्'' मूळ नष्ट झाल्यावर झाडावर शाखा, प्रतिशाखा उगवतच नाही. पानफुलं तर नाहीच नाही. म्हणून एका शुद्धोपयोगात संलग्न आत्मा शुद्धोपयोगात आणण्याचा पराक्रम जागृत करायला पाहिजे.

जो आपल्या आत्म्यात रममाण आहे, जो त्याच्या शुद्ध स्वरूपात सन्निहित आहे वास्तविक तोच सम्यग्दृष्टी आहे. हे सम्यक्दृष्टीचे निश्चयात्मक लक्षण आहे. ही प्रक्रिया आंतरिक आहे.[११]

वास्तविक ज्ञान ते आहे ज्यामुळे तत्त्वांचा बोध होतो. चित्ताची अन्यत्र भटकणारी वृत्ती संयमित होते. मग आत्मा विशुद्धावस्था प्राप्त करतो.

जो चरण विप्रहीन-चरित्र-आचार रहित आहे त्याने कितीही शास्त्रार्थ केला तरी

काय उपयोग ! जो आंधळा आहे त्याच्या समोर करोडो दीपकांच्या माळा लावल्या तर तो काय प्रकाश पाहू शकतो ?

जीवनात चारित्र्याला अतिशय महत्त्व आहे. चारित्र्यशून्य ज्ञानाला काडीइतकेही महत्त्व नाही. वास्तविक सार्थकता आहे चारित्र्य क्रियान्वित होण्यात. शास्त्राचे ज्ञान जरी अल्प असेल तरीही चारित्र्यवान साधक त्या ज्ञानप्रकाशाला उद्युक्त करणारा ठरेल. एक दीपक त्याला प्रकाश-किरण देऊ शकेल. ज्ञानच त्याचे चक्षू आहेत.

चक्षूचा अर्थ आहे आत्म्याची शुद्धी अनुभवित होण्याचा दृष्टिकोन. तीच खरी नेत्र-ज्योती. जी आत्मज्योती बनू शकते.

भगवान महावीरांच्या उपदेशात आत्म्याचा जो आवाज आहे तो आपल्या आत्मस्वरूपाला ओळखण्यास व आत्मस्वरूपात लीन होण्यात सहायक आहे.

आगमोत्तरकाळात आत्म-भावना

आगम ग्रंथांमध्ये आत्म्याच्या शुद्ध स्वरूपासंबंधी जे विवेचन केले आहे, आगमोत्तर काळात त्याच भावनेचे विस्तृत रूपात विवेचन आहे. अशुभाकडून शुभ आणि शुभाकडून शुद्ध बनण्याचा आत्मपराक्रम प्रत्येक मुमुक्षू आत्मा क्रमशः करतो. अशुभ वगैरेची व्याख्या करताना अष्टप्राभृतमध्ये दिगम्बर आचार्य श्री कुन्दकुन्द लिहितात- भावनेचे अशुभ, शुभ आणि शुद्ध असे तीन भेद आहेत. अशुभोपयोग पापजनक आहेत. शुभ पुण्योत्पादक आहेत. शुद्धोपयोग अतीत आहे.[१३]

एका मुमुक्षू व्यक्तीच्या आराधनेचा क्रम असा असतो - प्रथम तो अशुभपयोगापासून शुभोपयोगात येतो. हिंसा, असत्य, चोरी, मैथुन व परिग्रह इत्यादींशी संबंधित पापोत्पादक वृत्तींना सोडून तो पुण्यजनक दया, करुणा, सेवा, स्वाध्याय, भक्ती इत्यादी पुण्य कार्यात मग्न होतो. जरी शुभ अशुभापेक्षा उत्तम आहे, तरीही शुभसुद्धा बंधनकारक आहे. मुक्तावस्थाप्राप्त करण्यासाठी अशुभबंधन तर नकोच पण शुभबंधन पण त्यागावे लागतात. तेव्हाच मुक्तावस्था प्राप्त होते. म्हणूनच आचार्यांनी शुभाकडून शुद्धाकडे जाण्याची प्रेरणा दिली आहे.

अशुभ, शुभ आणि शुद्ध स्वरूपाचे चिंतन करून क्रमशः अशुभ आणि शुभ याचे चिंतन करता-करता शुद्धावस्थेत प्रवेश करण्याचे चिंतन, अनुशीलन करणे शुद्धभावना आहे. बारा भावनांमध्ये यांचा नामोल्लेख नाही झाला. परंतु एकत्व, अन्यत्व, संवर, निर्जरा इत्यादी भावना अशा आहेत ज्यांना शुद्धाबरोबर जोडल्या जाऊ शकतात. आत्मा एक

आहे अन्यांबरोबर निश्चयदृष्टीने त्याचा काही एक संबंध नाही. अन्य-अन्य आहे ते आत्म्यापासून सर्वथा भिन्न आहे. आत्मा शुद्ध, निर्मल आणि निरंजन आहे. त्याला पराश्रित मानणे म्हणजे आत्मस्वरूपापासून दूर जाणे आहे. हे पण शुद्ध भावनेचे एक रूप आहे.

आत्म्याचे शुद्ध स्वरूप कर्माच्या आवरणामुळे आच्छादित होत जाते. कर्मप्रवाहाचा अवरोध करणे म्हणजे संवर आहे. कर्म आत्म्याशी संश्लिष्ट नाही झाले तर आत्म्याचे शुद्ध स्वरूप आवृत्त होत नाही. निर्जरा कर्मांने आवृत्त आत्म्याला शुद्ध स्वरूपाला जाणण्याचा उपक्रम आहे. आत्म्याचे परिणाम शुद्ध असतील तर आत्माशुद्धाकडे जातो.

आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाचे साधक चिंतन करतो, तसे चिंतन करण्याकडे आकर्षित होतो. तशा शुद्धतोन्मुखी भावनांचे अध्यात्म-प्रवन आचार्यांनी आपल्या ग्रंथात वर्णन केले आहे.

आचार्य कुन्दकुन्द जगतात अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जातात. त्यांनी निश्चयदृष्टीने आत्मभाव, परमात्मभाव, स्वभाव, परभाव इत्यादींचे समयसार, प्रवचनसार, पंचास्तिकाय इ. आपल्या ग्रंथांत जे विवेचन केले आहे ते वास्तविक मुमुक्षूंना शुद्धभावाच्या दिशेने अग्रसर होण्याची प्रेरणा देतात. ते शुद्धोपयोग मूलक चिंतन, भावनावर प्रकाश टाकताना साधकाला सांगतात. ते चिंतन अशाप्रकारचे-

''मी एक आहे, शुद्ध आहे, सदा अरूपी आहे, ज्ञानदर्शनमय आहे, कोणताही अन्य परमाणु मात्र माझा नाही.[१४]

सर्वज्ञ प्रभूने म्हटले आहे- हे सर्व सांसारिक भाव पुद्गल द्रव्याच्या परिणामामुळे आहेत. त्यांना जीव किंवा आत्मा कसे म्हणता येईल ? अर्थात् जीवपासून ते सर्वथा भिन्न आहेत. या सांसारिक भावाशी निश्चयात्मक दृष्टीने कोणताही संबंध नाही.[१५]

शुद्ध भावोन्मुखी चिंतन पुढे वाढवित ते लिहितात - जीवाचा कोणताही वर्ण कोणताही गंध नाही, रस नाही, स्पर्श नाही, रूप नाही, शरीर नाही, संस्थान नाही, संघनन नाही.[१६] न राग, न द्वेष, न मोह, न कर्म, न नोकर्म हे सर्व तर पुद्गलद्रव्याचे परिणाम आहेत.[१७]

आत्मभावावर विशेष भर देताना लिहितात- मी एक आहे. शुद्ध आहे. ममत्वरहित आहे. ज्ञानदर्शनात निमग्न आहे, त्यातच स्थित आहे, त्यातच लीन आहे. या सर्व बहिर्भावांचा मी क्षय करतो.[१८]

अशा भावनेने युक्त असलेल्या व्यक्तीला मृत्यूची चिंता होत नाही. त्याला चिंता असते ती आत्म्याच्या हिताची. मृत्यूनंतर पुढे कुठे जाऊ त्याची, आणि त्यासाठीच भाव विशुद्धी करण्याचे लक्ष्य असणारा साधक आपली जीवनयात्रा सार्थक करण्याचा प्रयत्न करतो.

आचार्य कुन्दकुन्दांनी 'प्रवचनसार' ग्रंथामध्येसुद्धा शुद्ध भावाचे अनेक प्रकाराने विवेचन केले आहे. ते लिहितात- आत्मा परिणाम स्वभावमय आहे. म्हणून जेव्हा तो शुभ किंवा अशुभ भावात परिणत असतो तेव्हा तो शुभ किंवा अशुभ होऊन जातो आणि जेव्हा शुद्ध भावात परिणत होतो तेव्हा तो शुद्ध होतो.

जेव्हा हा आत्मा शुभ किंवा अशुभ रागभावात परिणमित होतो तेव्हा जवाकुसुम किंवा तमाल पुष्पासारखे लाल किंवा काळ्या रंगरूपात परिणमित स्फटिकाप्रमाणे परिणमन स्वभावयुक्त असल्यामुळे शुभ किंवा अशुभ होतो आणि जेव्हा तो शुद्ध अराग भावाने परिणमित होतो तेव्हा शुद्ध अराग परिणत-रंगरहित स्फटिकाप्रमाणे शुद्ध होतो. अशाप्रकारे शुभत्व, अशुभत्व आणि शुद्धत्व सिद्ध होते.

अभिप्राय असा की आत्मा सर्वथा कूटस्थ नाही. परंतु स्थिर राहून परिणमन करणे हा त्याचा स्वभाव आहे. म्हणून तो ज्या-ज्या भावनेत परिणमित होतो तो तसाच स्वतःही होऊन जातो. परंतु आत्मा स्वभावाने स्फटिक मण्याप्रमाणे निर्मल आहे, जेव्हा दान, पूजा, मूलगुण, उत्तरगुण इ. शुभ अनुष्ठानरूप शुभोपयोगात परिणत होतात, तेव्हा तो स्वतः सुद्धा शुभ होऊन जातो. जेव्हा मिथ्यात्व इ. अशुभोपयोगात परिणमित होतो तेव्हा स्वतः सुद्धा अशुभ होतो आणि आपल्या स्वभावरूप रत्नत्रयात्मक शुद्धोपयोगात परिणत होतो तेव्हा स्वतः शुद्ध होतो.

परा(अन्य)बद्दल शुभ परिणाम पुण्य आहे. आणि अशुभ परिणाम पाप आहे जो दुसऱ्याबद्दल प्रवर्तमान नाही असे परिणाम वेळेवर दुःख क्षयाचे कारण आहे.[२०]

इथे आचार्य कुन्दकुन्दांच्या म्हणण्याचा मतितार्थ असा आहे की, परिणाम दोन प्रकारचे आहेत. १) परद्रव्य प्रवृत्त २) स्वद्रव्यप्रवृत्त.

परद्रव्य प्रवृत्त विशिष्ट परिणामाचे दोन प्रकार (भेद) आहेत. १) शुभपरिणाम आणि २) अशुभ परिणाम. यात पुण्यरूप पुद्गल बंधाचे कारण असल्यामुळे अशुभपरिणाम पाप आहे.

स्वद्रव्य प्रवृत्त अविशिष्ट परिणाम तर शुद्ध असल्यामुळे एक आहे. ते यथाकाळ

संसार दुःखाचे हेतुभूत कर्म पुद्गलाच्या क्षयाचे कारण असल्यामुळे संसारदुःखाचा हेतू भूतकर्म पुद्गलाचे क्षयस्वरूप मोक्षच आहे.

आचार्य पूज्यपाद म्हणतात- जो शरीर, वाणीमध्ये आत्म्याचे संधान करतो त्यांना आत्म्याची अनुभूती होते ती भ्रांत किंवा अज्ञानाने युक्त असते. जो आत्म्याच्या अमूर्तत्व ज्ञानानंदमय स्वभावाला जाणत नाही तोच अनेक विकल्पामध्ये गुरफुटून राहतो. परंतु जो शरीर आणि वचन यांना आत्मा समजतो तो भ्रान्त आहे. सद्ज्ञान युक्त तो आहे, जो आत्म्याच्या वास्तविक स्वरूपाला जाणतो.[२१]

जोपर्यंत व्यक्ती आत्म्याला शरीराहून वेगळा मानत नाही, आत्म्याच्या सत्य स्वरूपाला जाणण्याची भावना करीत नाही, त्याच्या शुद्ध स्वरूपाला समजून घेत नाही, तोपर्यंत गुरू इत्यादींच्याकडून बरेच काही ऐकतो. व्याख्यान श्रवण करतो तरी तो मोक्षाचा अधिकारी होऊ शकत नाही. कारण श्रवण वरवरचे असते. ते आत्म्याला स्पर्श करीत नाही. आत्म्याला तेव्हा स्पर्श होईल जेव्हा खरे आत्मस्वरूपाची अनुभूती होईल. पुष्कळ ऐकले व कथन केले म्हणजे खरा धर्मात्मा आहे असे नाही. हे बाह्य स्वरूपाचे ज्ञान आहे. बाह्य क्रियाकांड मात्र आहे. आत्मिक ज्ञान जोपर्यंत होत नाही तोपर्यंत सर्व व्यर्थ आहे. साधकानेही भावना करावी की, आत्मा आपल्या स्वरूपात स्थित आहे. तो स्वप्नातही शरीराला आत्मा समजत नाही.[२२]

जो परमार्थापासून दूर आहे, अशुद्ध आहे, ज्ञानस्वरूप आत्मामध्ये ज्यांना श्रद्धा नाही ते कितीही व्रत, नियम, तप व शील पालन करीत असले तरी निर्वाण (मोक्ष) प्राप्त करू शकत नाही. ते अज्ञानाने पुण्याची इच्छा करतात. जे संसार भ्रमण वाढविणारे आहे ते मोक्षाचा हेतूच मुळी समजत नाही. पुण्य शुभ आहे. परंतु शुभामुळे मोक्ष मिळत नाही. मोक्ष तर शुद्ध भावामुळे मिळतो.

जीवादी पदार्थांच्या शुद्ध स्वरूपात ज्यांना अतूट श्रद्धा आहे ते सम्यक्त्वी आहेत. त्यांनाच आत्मज्ञान होते. रागादींचा त्याग चारित्र्य आहे. ती शुद्धोपयोगी अवस्था मुक्तीचा मार्ग आहे. तथाकथित विद्वान निश्चयार्थाला सोडून व्यवहारात प्रवृत्त होतात. परंतु परमार्थात आत्म्याच्या शुद्ध स्वरूपात आश्रित यतिमुनी कर्माचा क्षय करतात असे म्हटले आहे. पण केवळ व्यवहारात प्रवृत्त झाल्यामुळे कर्माचा क्षय होत नाही.[२३]

या गाथामध्ये आचार्य कुन्दकुन्दांनी शुद्धोपयोगाची महत्त्व उपादेयताचे वर्णन केले आहे. अशाप्रकारचे चिंतन साधकाला शुद्धोपयोगाकडे नेतो. आचार्य कुन्दकुन्द

पुन्हापुन्हा याच गोष्टीवर भर देतात की, शुभोपयोगामुळे जीवनाचे परम साध्य सिद्ध होत नाही. अष्टप्राभृतच्या भावप्राभृतमध्ये ते म्हणतात-

''जो आत्मा आपल्या शुद्ध स्वरूपात मग्न राहतो, आपल्या स्वरूपाचा अनुभव करून त्यात एकाग्र होऊन त्या अनुभव केलेल्या निर्मळ सहजात्म स्वरूपात श्रद्धा ठेवतो तो सम्यग्दृष्टी आहे, त्या आत्म्याला जो जाणतो ते सम्यग्ज्ञान आहे आणि आत्म्यात स्थिर होणे, चारित्र्यमय बनणे आचरण आणि स्वरूप रमणता हे चारित्र्य आहे.[२४]

आचार्य उमास्वातींनी सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान आणि सम्यकचारित्ररूप रत्नत्रयांना मोक्षमार्ग म्हटले आहे.[२५]

जो जीव शुद्ध आत्म्याला जाणतो तो आत्म्याला प्राप्त करतो. अर्थात आत्मस्वरूपाचा साक्षात्कार करतो. आत्म्याला पुण्यपापरूपी शुभभाव आणि अशुभ भावापासून दूर ठेवून दर्शन आणि ज्ञानात स्थित करतो. तसेच अन्य वस्तूंच्या इच्छांपासून विमुक्त होतो. जो आत्मा आसक्तीरहित असतो तो आपल्या आत्म्याचा आत्माद्वारा ध्यान करतो. तो कर्म आणि जो कर्माचे ध्यान, चिंतन करीत नाही, तो एकत्व-एकमात्र आत्माचे चिंतन करतो, अनुभव करतो. असे ध्यान करताना तो दर्शन ज्ञानमय तथा अनन्यमय स्वतंत्र होऊन अगदी अल्पकाळात कर्मापासून मुक्त होऊन जातो.[२६]

सम्यग्दृष्टी-युद्धभावापन्न जीव इंदियांद्वारे अचेतन तसेच चेतन द्रव्यांचा उपभोग करतो ते त्याचे कर्मनिर्जराचे कारण आहे.[२७]

या श्लोकामध्ये चेतन-अचेतन द्रव्यभोगामुळे निर्जरा होते असे म्हटले आहे. इथे प्रश्न उपस्थित होतो की, उपभोगामुळे तर कर्मबंधन होतात याने निर्जरा कशी होणार ?

त्याचे समाधान असे की, सम्यग्दृष्टीला जे ज्ञान असते असा ज्ञानी राग-द्वेषापासून दूर असतो. म्हणून तो सम्यग्दृष्टी भोग सामग्रीला परद्रव्य मानतो. योगासक्ती मुळीच नसते. त्यांच्याशी आपला मन, वचन, काया ते काहीही संबंध नाही अशाप्रकारे राहतो. त्याला हेही ज्ञान आहे की कर्मउदयाच्या निमित्ताने त्यांचा संयोग होतो तसा वियोगही होतो. चारित्र मोहाच्या उदयामुळे व्यक्ती पिडित होतो आणि स्वतः निर्बल असल्यामुळे रोग वगैरे पीडा सहन करू शकत नाही, तेव्हा चिकित्सा करतो, औषध घेतो. त्याचप्रमाणे भोगोपभोग सामग्रीने विषयरूपी रोगाची चिकित्सा होते. परंतु रोग्याला रोग चांगला वाटत नाही आणि औषधही चांगले वाटत नाही. त्याचप्रमाणे सम्यग्दृष्टी चारित्रमोहाच्या उदयाला तसेच भोगोपभोगाच्या सामग्रीला चांगले मानीत नाही. निश्चयदृष्टीने

तो ज्ञातृभावाने युक्त असतो. सम्यग्दृष्टी रागरहित असतो आणि हे उदयाला आलेले कर्म आहेत हे त्याला समजते. म्हणून त्याबद्दल राग-द्वेष त्याच्या मनात उत्पन्न होत नाही. राग-द्वेष व मोहाशिवाय भोगोपभोगाची सामग्री भोगतो त्याला कर्माचे आश्रव होत नाही. असे झाले म्हणजे पुढे कर्मबंध होत नाहीत. उदयास आलेले कर्म आपला प्रभाव पाडून निर्जीर्ण होतात. कारण उदयास आल्यानंतर कर्मफल दिल्यानंतर कर्माची सत्ता उरतच नाही.

तात्पर्य हे की नव्या कर्माचे बंध होत नाहीत आणि उदयास आलेले कर्म निर्जीर्ण होऊन जातात. अशाप्रकारे निर्जराच होते. म्हणून रागरहित सम्यग्दृष्टी असणाऱ्याला भोगोपभोग केले तरी कर्मनिर्जराचे ते निमित्त असते. कारण पूर्वसंचित कर्म उदयास येऊन झडून जाते, क्षीण होते ही द्रव्य निर्जरा आहे.

द्रव्यांचा उपभोग करण्याने निश्चितपणे सुख किंवा दुःख होतेच. उदयास आलेले सुख-दुःख तो अनुभव करतो. ते सुख-दुःखरूप भाव भोगल्यानंतर निर्जीर्ण होतात.[२८]

परद्रव्य जेव्हा भोगले जाते तेव्हा त्यांच्या निमित्ताने सुखात्मक किंवा भावात्मक भाव नियमतः उदित होतात. कारण की, साता आणि असातामूलक संवेदन या दोन प्रकारांचे तिथे अतिक्रमण होत नाही. ते अनुभवाला येतात. मिथ्यादृष्टी असलेल्यासाठी रागादी भावामुळे ते बंधाचेच कारण असतात. म्हणून निर्जीर्ण होऊनही वास्तवात तेथे निर्जरा होत नाही. बंधच होतो. सम्यग्दृष्टी असलेल्यासाठी रागादींच्या अभावामुळे ते बंधाचे निमित्त होत नाही. निर्जीर्ण झाल्यामुळे ते निर्जरारूपच रहातात.

हा श्लोक ह्यापूर्वीच्या श्लोकाला पूरकच आहे. सुख-दुःखाचा भोग असूनही निर्जरा न होणे हे पूर्वी कथन केले गेले आहे. ह्या श्लोकात एका विशेष गोष्टीचा उल्लेख आहे की उदयास आलेले शुभाशुभात्मक, सुखदुःखात्मक कर्म भोगल्यावर नष्ट होतात. परंतु मिथ्यात्वीचे कर्म नष्ट झाले तरी त्याला निर्जरा म्हणता येणार नाही.

शुभभाव आणि शुद्धभावाचा भेद ह्या वर्णनात समजू शकतो. जेथे शुद्ध भाव असतो तेथे दर्शन सम्यकत्व असते. परंतु शुभ भाव सम्यक आणि असम्यक दोन्हीत असू शकतो. म्हणून संक्षेपात असे सांगू शकू की शुभ ऐहिक, लौकिक सुखात्मक बंध आहे आणि शुद्ध अलौकिक निर्बंध मुक्त अवस्था आहे.

ज्याचे अनुमात्र पण रागादीचा सद्भाव आहे, ज्याचे परमाणू इतकेच स्वल्प पण राग भाव विद्यमान आहे, त्याने आत्म्याला जाणलेच नाही हे सिद्ध होते. जरी समस्त आगमाचे ज्ञान त्याला असले पण आत्मा नाही जाणला आणि जो आत्मा समजू शकला

नाही. त्याने अनात्माला पण जाणलेच नाही. अशा प्रकारे जीव आणि अजीव ज्याने जाणले नाही तो सम्यक्दृष्टी कसा असू शकेल ?[२९]

ज्याप्रमाणे शंख वेगवेगळ्या प्रकारचे सचित-अचित मिश्रित द्रव्यांना भोगतो तरीही शंखाचा श्वेतभाव पांढरेपणा काळा होऊ शकत नाही. त्याचप्रमाणे सचित-अचित मिश्रित द्रव्यांचा भोग करूनही ज्ञानीचे ज्ञान, अज्ञान होऊ शकत नाही. जेव्हा तो शंख सफेदपणा सोडून कृष्ण (काळा) पणा स्वीकारतो तेव्हा त्याचे शुक्लत्व तर जातेच. त्याचप्रमाणे ज्ञानी जेव्हा आपल्या ज्ञानस्वरूप स्वभावाला सोडून देतो तेव्हा तो अज्ञानात परिणत होतो. म्हणजे अज्ञानी होऊन जातो.[३०]

ही चर्चा आत्म्याच्या शुद्धभावनेशी संबंधित आहे. जेव्हा आत्माशुद्ध भावात संप्रतिष्ठ असतो तेव्हा तो सांसारिक पदार्थांचा भोग भोगत असतानासुद्धा अज्ञानावृत्त होत नाही. जेव्हा तो शुद्ध भावापासून परावृत्त होतो तेव्हा तो शुभाशुभ भावात गुंततो. ज्ञानीयांच्या बाबतीतसुद्धा हे तत्त्व लागू आहे, जेव्हा तो ज्ञानमय स्वभावाला सोडून देतो व अज्ञानात परिणमित होतो अर्थात् अशुद्ध अवस्थेत जातो.

शुभ आणि अशुभ दोन्हींची अशुद्धच अवस्था आहे. कारण की दोन्हीमध्ये पुण्यपापात्मक बंध गतिशील असतात.

आचार-आचारांग इ. सूत्र ज्ञान आहे. जीवादी तत्त्वदर्शन आहे आणि सहा जीवनीकाय चारित्र आहे. चारित्र्याचा आश्रय आहे. हा व्यवहार झाला. निश्चयनयाच्या दृष्टीने आपला आत्माच ज्ञान आहे. तोच दर्शन आणि चारित्र आहे. आत्माच प्रत्याख्यान, त्याग आहे. आणि आत्माच संवर व योग समाधी हे ध्यान आहे.[३१]

हे विवेचन सुद्धा निश्चयनय या शुद्धोपयोगाशी संबंधित आहे.

स्फटिक मणी स्वतः शुद्ध आहे. तो अन्य रंगात कधीच समाविष्ट होत नाही. परंतु जेव्हा तो अन्य रंगामुळे त्यात मिसळतो तेव्हा तो त्या रंगाचा दिसतो. त्याचप्रमाणे ज्ञानी स्वतः शुद्ध आहे. तो स्वतः रागादी रूपात कधी परिणत होत नाही. परंतु तो अन्य रागादी दोषांमुळे रंजित होतो तेव्हा तो तसा प्रतीत होतो. ज्ञानी-राग-द्वेष मोह आणि कषाय भावांमध्ये कधी रममाण होत नाही. तो आपल्याकडून त्या भावनेचा कर्ता बनत नाही.[३२]

शुद्धोपयगात रागद्वेष, कषाय इ. नसतात. राग-द्वेष आणि कषायादींची जिथे परिणती होते तेथे शुद्धोपयोग नष्ट होतो.

जो बंध आणि आत्म्याच्या स्वभावाला जाणतो व भेद विज्ञानद्वारा बंधापासून विरक्त होतो तो कर्मांना नष्ट करतो. त्याचे कर्म गळून पडतात.[३३]

सर्व भाव परके आहेत हे समजल्यावरसुद्धा कोण ज्ञानी आपल्या आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाला अशुद्ध भावात गुंतवेल ? त्या पर भावानेला आपले म्हणेल ?[३४]

जेव्हा आत्मा अनंत कर्म फळांचा त्याग करतो तेव्हा कोठे तो विमुक्त ज्ञाता व दृष्टा बनू शकतो.[३५]

कर्माबद्दलची फलासक्ती सोडल्यानंतर फक्त ज्ञानी भाव राहतो. कर्ताभाव राहतच नाही. ही शुद्धोपयोगाची स्थिती आहे.

शुद्धोपयोगाचे विशेष वर्णन करताना आचार्य कुन्दकुन्द लिहितात- पूर्वकृत खूप अधिक प्रमाणात शुभाशुभ कर्मापासून जो आत्मा स्वतःला निवृत्त करतो- ते आहे प्रतिक्रमण.

भविष्यकाळात जे अनेक प्रकाराने शुभाशुभ कर्मानि जो आत्मा भावात्मक रूपाने बद्ध आहे त्या भावात्मक बंधनापासून निवृत्त होणे, ते आहे प्रत्याख्यान.

वर्तमानकाळात उदयास आलेले अनेकप्रकारचे शुभाशुभ कर्मांच्या दोषांना आत्मा अनुभव करतो, ज्ञानी भावनेने जाणतो अर्थात् त्याचे कर्तृत्व किंवा स्वामीत्व आपल्याकडे घेत नाही ती आहे आलोचना.

जो आत्मा अशाप्रकारे नित्य प्रत्याख्यान घेतो, प्रतिक्रमण करतो तथा आलोचना करतो तो आत्मा वास्तविक चारित्रयुक्त आहे.[३६]

प्रतिक्रमणा, प्रत्याख्यान आणि आलोचना जैनदर्शनातील अतिशय महत्त्वपूर्ण शब्द आहेत. हे आचार विधीच्या अंतर्गत आहेत. साधक त्यांचे दिलेल्या पाठाप्रमाणे अनुवर्तन करतो. हा त्याच्या दैनंदिन क्रियाचाच एक महत्त्वपूर्ण भाग आहे. आचार्य कुन्दकुन्दाच्या म्हणण्यानुसार हा व्यवहार नय आहे. निश्चयनय किंवा शुद्धोपयोगाची भूमिका पृथक आहे. त्यानुसार आत्मभावात परिणित झाल्याने म्हणजेच विभावापासून परावृत्त होऊन स्वभावात आले तरच त्या क्रियांचा उपयोग होतो. जोपर्यंत अतीत, भविष्य आणि वर्तमानाशी संबंधित शुभाशुभ भावामुळे जे विविधरूपात निष्पन्न होतात, आंतरिक दृष्टीने आत्मा आपल्या स्वतःला पृथक करीत नाही, तोपर्यंत या क्रिया निश्चय रूपात सिद्ध होत नाही.

प्रतिक्रमण म्हणजे आपल्याकडे परत येणे. आपल्या स्वतःकडे परत येणे म्हणजे

आत्म्याचा शुद्ध भाव किंवा शुद्धोपयोगात येणे. अर्थात जो आत्मा अतीतमध्ये परभावापन्न होता त्याचा परत आपल्या स्वभावात येणे. हीच गोष्ट प्रत्याख्यानासंबंधी लागू होते. ते ही तेव्हाच सिद्ध होतात जेव्हा भविष्यात शुभाशुभ कर्माशी बद्ध आत्मा भावात्मक रूपाने त्यापासून परावृत्त होते.

आलोचना सुद्धा शुभाशुभ उदीर्ण कर्माच्या दोषांना समजून आत्मानुभूती केल्यानेच सिद्ध होते. म्हणून प्रत्याख्यान, प्रतिक्रमण, आलोचना हे तर नित्य प्रतिक्षण करण्याच्या अवस्था आहेत. ह्या तर जीवनभर करण्याच्या क्रिया आहेत. हे शुद्धोपयोगाचे यथार्थ स्वरूप आहे.

क्रिया व्यवहाररूप आहेत. त्या सर्व शुभोपयोगाच्या अंतर्गत येतात. बाह्यवेष-द्रव्यलिंग वास्तविक ते शरीराश्रित आहेत. म्हणून पर-द्रव्य आहे. मोक्षाचा मार्ग नव्हे. दर्शन, ज्ञान आणि चारित्र हे आत्माश्रित आहेत. म्हणून ते स्व-द्रव्य आहेत. जिनेंद्रदेव यांनाच मोक्षाचा मार्ग म्हणतात. म्हणून सागार-गृहस्थ अनगार-मुनी यांचे बाह्य लिंग किंवा क्रिया-कलापात आसक्त न होता आत्म्याला दर्शन, ज्ञान, चारित्र रूप साक्षात सत्य अशा मोक्ष मार्गाकडे जोडावे.[३७]

श्लोकात द्रव्यलिंगाला सोडण्याबद्दल जे सांगितले आहे त्याचा अभिप्राय असा नाही की मुनींचा बाह्य वेष सर्वथा त्याज्य आहे. श्रावकाचे व्रतात्मक बाह्य क्रिया-कलापांचा त्याग करावा. या कथनाचा अभिप्राय हा आहे की बाह्य वेषातच आणि क्रिया-कलापातच आत्मसाधनेची सिद्धी मानू नये. असे मानले तर ज्ञान, दर्शन आणि चारित्र जो भावात्मक आत्मशुद्धीचा वास्तविक मार्ग आहे याची समज कशी येणार ?

तत्त्वसारमध्ये कर्म, नो कर्म वगैरे आत्म्याचे विभाव भाव आहेत असे प्रतिपादन केले आहे. आत्म्याशी त्यांचा कसा संबंध आहे याचे विवेचन करताना लिहितात ज्याप्रमाणे दुधात पाणी मिसळल्यावर त्यांचा जो संबंध होतो, त्यांना परत वेगवेगळे करणे कठिण त्याचप्रमाणे जे आपआपल्या स्वरूपात विद्यमान आहेत त्या आत्मा व कर्माचा संसारावस्थामध्ये एकरूप झालेत असे प्रतीत होते.[३८] परंतु दोन्ही वास्तविक रूपात एक नाहीत.

कोणी जर तर्कयुक्तीने पाणी व दूध वेगळे करतो. त्याचप्रमाणे ज्ञानीपुरुष सुद्धा उत्तम ध्यानयोगाने उत्कृष्ट चिंतनात्मक ज्ञानाने चेतन स्वरूप आत्मा आणि अचेतन स्वरूप परपदार्थाचे भेद करतात. आणि त्यांना वेगवेगळे समजतात.

ध्यानाच्या उत्कृष्ट चिंतनात्मक ज्ञानाने पुद्गल आणि जीव तथा कर्म आणि आत्मा यात भेद आहे हे समजले पाहिजे, नंतर त्यांना भिन्न आहेत हे समजले पाहिजे. सिद्ध स्वरूप परमात्म स्वरूप आत्मा ग्रहण करायला पाहिजे, जाणले पाहिजे किंवा अनुभव करायला पाहिजे.

ज्याप्रमाणे कर्म विरहित आत्मा, ज्ञानस्वरूप आत्मा सिद्ध स्थानात निवास करते त्याचप्रमाणे परब्रह्म स्वरूप-परमात्मस्वरूप आत्मा देहात स्थित आहे असे समजावे.

तात्पर्य हे की, देहवर्ती संसारी आत्मा सुद्धा निश्चयनयाच्या दृष्टीने तितकीच शुद्ध आहे जितकी सिद्ध किंवा मुक्त आत्मा आहे.

जीवाने असे चिंतन करावे - नो कर्म-कर्मरहित तथा केवलज्ञानादी गुणांनी सुशोभित सिद्ध आत्मा आहे तसाच मी शुद्ध, नित्य, निरालंब आत्मा आहे.

मी सिद्ध आहे, शुद्ध आहे, अनंतज्ञानादींनी समृद्ध आहे, देहप्रमाण आहे. नित्य आहे, असंख्यात प्रदेशात्मक आहे व अमूर्त आहे.

संसारी आत्मा आपल्या कर्माच्या आवरणामुळे शरीरात बद्ध आहे. त्याचे आत्मप्रदेश त्या शरीरात व्याप्त असतात. आत्मप्रदेशांची विशेषता आहे की, आत्म्याला आपल्या कर्माच्या परिणाम स्वरूपात लहान किंवा मोठे शरीर प्राप्त होते. शरीराप्रमाणे आत्मप्रदेश संकुचित किंवा विस्तृत होतात.

जो शरीराची रुग्णता, पीडा, कष्ट, वार्धक्य व मृत्यू पाहून आत्म्याचे ध्यान करतो तो पंचविध शरीरापासून मुक्त होतो. अर्थात जो हे समजू शकतो पाहतो तो अनुभव करतो की ह्या शरीराची रुग्णता, पीडा, मृत्यू इ. जे दोष आहेत आत्म्यात त्यातील कोणताच दोष नाही. ह्या बाह्य शरीराशीच संबंधित आहेत. आत्म्याशी नाही. असे जो चिंतन करतो, शुद्ध भावनेने अनुभावित होतो तो आपल्या शुद्ध स्वरूपाला प्राप्त करतो.[४०]

कर्मफळाला भोगणारा जीव अज्ञानी आहे. मोहामुळे शुभावद्दल राग (आसक्ती) करतो व अशुभावद्दल द्वेष करतो.[४१]

याचे तात्पर्य असे की जीव जेव्हा अज्ञानदशेत अशुभ भाव किंवा शुभ भाव करतो, आपल्याला शुभ भावाशी अथवा अशुभ भावाशी जोडतो तेव्हा कर्माश्रवाची परंपरा गतिशील राहते. शुद्ध भाव किंवा शुद्धोपयोगच आत्म्याची ती स्थिती आहे जिथे कर्माश्रव रुद्ध होतात. कर्म येण्याचा रस्ता बंद होतो. म्हणून आत्म्याने ही भावना भावित करीत रहावे.

योगीवर्य श्री आनंदघनजींनी श्रेयांसप्रभूचे स्तवन लिहिले त्यात लिहिले आहे - जो आपल्या स्वरूपाची क्रिया साधतो, अर्थात आपल्या स्वरूपाचा साक्षात्कार करतो, तोच आध्यात्माला प्राप्त करू शकतो. जो तशी बाह्य क्रिया करतो, त्यामुळे चार गतीमध्ये भ्रमण करावे लागते ह्याला अध्यात्म म्हणताच येणार नाही. ती अध्यात्माची साधना नव्हेच. नाम अध्यात्म, स्थापना अध्यात्म द्रव्य अध्यात्म यांचा त्याग करून जो भाव अध्यात्माद्वारे आपल्या गुणांना साधतो. निजस्वरूपाचा साक्षातकार करतो तो अशा अध्यात्मात एकरूप होऊन जातो.[४२]

योगीवर्य आनंदघनजींनी शुद्धी सन्मार्जन किंवा परिष्काराच्या दृष्टीने आत्म्याचे विवेचन करताना लिहिले आहे की, संसारात जितके प्राणी आहेत त्या सर्वांचा आत्मा तीन भागात विभाजित आहे. १) बहिरात्मा २) अंतरात्मा ३) परमात्मा.

परमात्मा आत्म्याची अविच्छेद किंवा अविनश्वर अवस्था आहे. शरीर वगैरे पौद्गलिक पदार्थांना आत्मस्वरूप समजणे ही आत्मस्थिती बहिरात्मभाव किंवा बहिरात्मदशा आहे. शरीर वगैरे नश्वर वस्तूतून आत्मबुद्धीला निवृत्त करून दैहिक प्रवृत्तीमध्ये फक्त साक्षी भाव ठेवणे अर्थात् शरीर व आत्मा भिन्न आहेत असा बोध घेणेही अंतरात्मभाव म्हणजेच अंतरात्मदशा आहे. परमात्मभाव, परमात्म अवस्था ज्ञानात्मक आनंदाने परिपूर्ण, परमपवित्र तथा समस्त कार्मिक उपाधीपासून परावृत्त आहे. अतिन्द्रिय-इन्द्रियातीत, इन्द्रियाने अगोचर आपल्या शुद्ध स्वरूपात्म मूलक गुणरूपी रत्नांची खाण आहे.[४३]

आनंदधनजींनी अशुभ आणि शुभाच्या पलीकडे जाऊन शुद्ध स्वरूपाकडे जाणारी आत्मा आहे. तिच्या कर्मोन्नत पथाचा त्रिविध आत्मस्वरूपाच्या दृष्टीने विवेचन केले आहे. बहिरात्मभाव शुभाशुभ अवस्था आहे. अंतरात्मभाव शुद्धत्वात संप्रतिष्ठित होण्याची स्थिती आहे. परमात्मभाव सर्वथा शुद्धोपयोगमय आहे. ते अध्यात्मसाधनेचे लक्ष्य आहे.

आनन्दघनजी भगवान पद्मप्रभूच्या स्तवनात प्रभूला संबोधित करून म्हणतात. हे नाथ, माझ्या आत्म्याला कर्माचा योग झाला आहे. त्यामुळे तुमच्या व माझ्या आत्म्यात फरक झाला आहे. माझा आत्मा कर्माने गुरफुटून गेला आहे. आपला आत्मा कर्मापासून मुक्त आहे. गुण करण म्हणजे आत्मगुणांच्या विकासाने आत्म्यावर आच्छादित कर्माचा झालेला योग विनष्ट होईल. विद्वान मंडळींनी शास्त्रांच्या आधारावर सांगितले आहे की, आत्मगुणांचा विकास झाल्यामुळेच जे अंतर माझ्यात व तुझ्यात निर्माण झाले आहे ते अंतर संपून जाईल. मी सुद्धा परमात्म स्वरूप बनून जाईन.

भगवन् ! जेव्हा माझ्या आत्मिक गुणांचा विकास होईल अर्थात कर्माचे आवरण दूर होईल तेव्हा माझ्या व आपल्या आत्म्यात असलेला दुरावा दूर होईल. मंगलवाद्य बाजू लागेल. सर्वत्र मंगलच मंगल होऊन जाईल. माझा आत्मा परमानंद सागरात डुंबून जाईल. हा आनंद असा असेल जो कधीही परत जाणार नाही. शाश्वत असा हा एक मात्र आनंद आहे. एकदा आला की परत जात नाही. जन्ममरणाच्या चक्रव्यूहातून सोडविणारा असा हा आनंद आहे. ह्याचे वर्णन शब्दातीत आहे.[४४]

आचार्य कुन्दकुन्दांचा हाच उपदेश आहे की, हे आत्मन ! तू या ज्ञानानंद स्वभावी आत्म्यातच नित्य रमून रहा, यातच नित्यसंतोषाला प्राप्त हो आणि यातच तृप्तीचा अनुभव कर. तर तुला खरे उत्तम सुख प्राप्त होईल.

संपूर्ण जगाकडे असलेली दृष्टी हटवून एकमात्र आपल्या आत्म्याची साधना करा. आराधना करा. फक्त आत्म्याला जाणा. ओळखा, आत्म्यातच रममाण व्हा. यामुळे अतिन्द्रियानन्दाची प्राप्ती होईल. परमसुख प्राप्त करण्याचा हाच एकमात्र उपाय आहे.

आचार्य हरिभद्रसूरी जैनजगताचे महान विद्वान आणि अध्यात्मयोगी होते. त्यांनी जैनधर्माचा जो प्रचार प्रसार केला, खरोखरच ते गौरवास्पद आहेत. त्यांनी कितीतरी ग्रंथ लिहिले आहेत. जैनयोग-अध्यात्मयोगावर त्यांनी 'योगदृष्टी समुच्चय' तथा 'योगबिंदू' नावाचे दोन ग्रंथ संस्कृतमध्ये व 'योगशतक' आणि 'योगविंशिका' नावाची दोन पुस्तके प्राकृतमध्ये लिहिली आहेत. या चारही ग्रंथात अध्यात्मयोग-आत्मा कशाप्रकारे परमात्म भावाचा साक्षात्कार करू शकतो याचे यौगिक पद्धतीने वैज्ञानिक युक्तियुक्त विवेचन केले आहे.

योगविन्दुमध्ये एके ठिकाणी योगाचे सहकारी हेतूंचे वर्णन करताना लिहिले आहे- त्रिविध शुद्ध अनुष्ठान, सत्शास्त्राच्या आज्ञेप्रमाणेच आचरण, सम्यक्त्वात दृढ विश्वास याने आध्यात्मिक योग साधनामध्ये साधक प्रगतीशील राहतो. तीन प्रकारचे शुद्ध अनुष्ठानाचे वर्णन करताना ग्रंथकार लिहितात-

१) शुद्ध विषय म्हणजे शुद्ध लक्ष्य,

२) शुद्ध उपक्रम,

३) शुद्ध अनुबंध हे तीन प्रकारचे अनुष्ठान शुद्ध असले तर अनुष्ठान किंवा आचरणाची शुद्धता येते.[४६]

ग्रंथकाराचा इथे हा भाव आहे की साधना करण्याऱ्या व्यक्तीने सर्वात प्रथम आपल्या ध्येयरूपात शुद्धआत्मभाव ग्रहण करायला पाहिजे. शुद्धभावाचा साक्षात्कार

करण्यासाठी त्याचा उपक्रम, उद्यम किंवा पराक्रम शुद्ध असायला हवा. त्याचा अनुबंध निरंतर त्यात पुढे प्रगती करीत राहण्याची शृंखला शुद्ध असायला हवी असे झाले तरच साधना सिद्ध होते.

साधनेचा मार्ग म्हणायला अगदी सोपा आहे, परंतु प्रत्यक्ष आचरणात आणणे फारच कठीण आहे, तो शुद्ध भाव आणि शुद्ध योगावर आधारित आहे. भावनामध्ये आत्म्याचे शुद्ध स्वरूप प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. शुद्धात्मभावाच्या प्रतिबिंबामुळे क्रिया-प्रक्रियात शुद्धत्वचा समावेश होतो. कारण की तेथे संगमोह किंवा आसक्ती नसते. मात्र शुद्ध भावनेची निरंतरता म्हणजे श्रृंखला चालू राहिली पाहिजे. तसे झाले नाहीतर ती भावना भग्न होऊन सातत्य तुटते. हे त्रिविध शुद्ध अनुष्ठान आहे.

शुद्धात्म भावनेचे या श्लोकात चित्रण झाले आहे. अध्यात्म योगाची सिद्धी शुद्धात्म भावना असली तरच संपन्न होते. तत्त्व दृष्टीने विचार केला तर आपला आत्मा पाच ज्ञानांचा स्वामी आहे. परंतु कर्मसंयोगाने विपरित भावात, अज्ञान भावात स्वतःच्या सत्तेत असलेल्या स्थितीला तो विसरला आहे. परंतु शुद्धात्म भावनेच्या चिंतनाने आणि शुद्ध आत्मभावाच्या अनुभावनेने आत्म-परिणामात किती उज्ज्वलता येते ! ज्ञानावरण इ. कर्म किती क्षय होऊन जातात. हे सूचित करताना महान अध्यात्मयोगी आचार्य कुन्दकुन्दांनी एक उदाहरण दिले आहे-

शिवभूति नावाचे एक मुनी होते. ते परम वैराग्यवान निकटभवी होते. गुरूकडून दीक्षा घेतली व तप करू लागले. गुरूकडे शास्त्राध्ययन करीत होते. परंतु ज्ञानावरणीय कर्माचा क्षयोपक्षम न झाल्याने त्यांनी पाठ केलेले ज्ञान विसरून जात होते. लक्षात रहात नसे. म्हणून गुरूंनी त्यांना फक्त ''मा रूष'' एवढेचे शब्द पाठ करायला दिले. त्याचा अर्थ होतो. कुणावरही रोष करू नका. कोणावर नाराज होऊ नका. तसेच 'मा तुष' हे शब्द ही पाठ करायला दिले त्याचा अर्थ कुणावर तोष करू नका. तुष्ट बनू नका- थोडक्यात कुणावरही राग नाही लोभही नाही. अशी 'मा तुष मा रूष' असे दोन वाक्य शिकवले. वास्तविक या शब्दाचा सत्यार्थ असा की तुम्ही आपल्या आत्मस्वरूपात लीन रहा. या दोन वाक्यांचा उच्चार करता-करता ती ही वाक्ये त्यांना विसरायला झाली. त्यांना फक्त 'तुषमाष' एवढेच लक्षात राहिले. पुढे एक असा प्रसंग आला की एक स्त्री सूपामध्ये उडीद टाकून ते पाखडीत होती. मुनींनी तिला विचारले, 'बाई, तुम्ही हे काय करीत आहात ?' ती म्हणाली 'मी तुषमाष वेगळे करत आहे म्हणजे मी उडादाची डाळ पाखडीत आहे

त्यामुळे त्याची सालपट पुढे येतील व उडीददाळ मागे राहील. उडीददाळ व सालपट वेगवेगळी करत आहे. प्राकृतमध्ये उडीदला 'मास' आणि सालपटाला 'तुस' म्हणतात. हे ऐकताच त्या मुनींच्या चित्तात असा अर्थ स्फुरला की उडीद-मास आणि सालपट म्हणजे तुस. हे दोन्ही जसे वेगळे आहेत त्याचप्रमाणे हे असार शरीर आणि आत्मा दोन्ही भिन्न आहेत. मग मुनी तुषमास भिन्न असे उच्चारण करू लागले. असे बोलता-बोलता त्यांना आत्म्याचा अनुभव येऊ लागला. आणि त्यात इतके लीन-मग्न-एकरूप झाले. एकाग्रता पराकोटीची वाढली. इतके अन्तर्मुख झाले की ज्ञानमय आत्म्यात अगदी डुंबून गेले. त्याच क्षणी चार घातीकर्मांचा नाश होऊन त्यांना केवलज्ञान प्राप्त झाले.[४७]

भावनेची अशी ही विशुद्धी त्यामुळे त्यांना अपूर्व सिद्धी प्राप्त झाली. म्हणूनच अध्यात्माचा मूळ पाया प्रथम भावशुद्धी केली पाहिजे. यावरून असे सिद्ध होते की भाव शुद्धीची आत्मकल्याणाच्या दृष्टीने किती महत्त्वाची गोष्ट आहे. भावना शुद्ध नसली तर सर्व क्रिया व्यर्थच आहेत.

शुद्ध आत्मभावाची विशेषता सांगताना आचार्य कुन्दकुन्दपुढे लिहितात. भाव शुद्धीमुळे नग्न या निर्ग्रंथ होतो. बाहरी नग्नता मूलक लिंगाने कसे कार्य साध्य होऊ शकेल ? कारण भाव युक्त द्रव्यलिंग द्वारा सुद्धा कर्मप्रकृतींचा नाश होतो.[४८]

भाव रहित शुद्धात्मभाव शिवाय केवळ नग्नत्वाने काहीच कार्य सिद्ध होत नाही. असे जिनेश्वर भगवंतांनी प्रतिपादित केले आहे. हे जाणून घेऊन हे धीर पुरुषा ! नित्य शाश्वत, शुद्ध, बुद्ध आत्मा आहे त्या आत्मभावाचेच निरंतर चिंतन करावे. देह इ.ची आसक्ती न करता तसेच मान वगैरे कषायापासून विमुक्त होऊन जेव्हा आत्मा, आत्मामध्येच मग्न राहतो तो साधू भावलिंगी-भाव साधू असतो. भावलिंगी साधू अशी भावना करतो, की चिंतन अनुभावन करतो की, मी ममत्वाचा परित्याग करून निर्ममत्वाचा स्वीकार करतो. आत्माच माझे आलंबन आहे, आश्रयस्थान आहे. आत्म्याशिवाय अन्य सर्व परभावांचा त्याग करतो. माझा आत्माच माझ्या ज्ञानात, दर्शनात आणि चारित्र्यात आहे. तेच माझे प्रत्याख्यान, संवर व ध्यान योग आहे. ज्ञान-दर्शन स्वरूप एकमात्र आत्माच शाश्वत आहे. या व्यतिरिक्त अन्य सर्व बाह्य भाव त्यापासून वेगळे आहेत. भिन्न आहेत. बाह्यभाव संयोगजनित आहेत. जर चार ही गतींचा शीघ्र त्याग करून शाश्वत आध्यात्मिक सुख किंवा मोक्ष सुख हवे असेल तर अत्यंत शुद्ध भाव ठेवूनच हे शक्य आहे. तेव्हा हे भवि ! शुद्ध कर्म मलरहित आत्मस्वरूपाची भावना करा, चिंतन करा. जो

जीव अत्यंत शुद्ध भावपूर्वक जीवस्वभाव किंवा आत्मस्वभावाची भावना करतो, असा मुनी वृद्धावस्था आणि मृत्यूचा नाश करतो. म्हणजे जन्ममरणाच्या चक्रव्यूहातून मुक्त होतो. आणि लवकरच निर्वाण प्राप्त करतो. जिनेश्वर प्रभूंनी जीवात्म्याला ज्ञानस्वभाव आणि चैतन्य स्वरूप प्रतिपादित केले आहे. माझा हा आत्मा तसाच आहे. आत्माच सर्व कर्मांचा क्षय करून मोक्ष प्राप्त करण्यास समर्थ आहे, असे समजावे.[४९]

जो जीव आत्म्याच्या आस्तित्वाला मानतो त्या आत्म्याचा सर्वथा अभाव आहे असे कधीच मानत नाही. तो वचनातीत आहे. त्याचे शब्दात वर्णन करणे अत्यंत कठीण आहे. असा देहाहून भिन्न परमात्मा बनून जातो. असे अतिन्द्रिय, आत्मदशा आत्मानुभव प्राप्त करून परमात्मदशा हस्तगत करतात. हे जीवा, तू सुद्धा आत्म्याच्या ह्या स्वभावाला समजून घे, अर्थात देहाहून वेगळा शुद्ध स्वभावी आत्म्याला ओळख आत्मा पाच प्रकारच्या रसाने रहित आहे. शब्द, रूप, गंध, स्पर्शरहित आहे, चेतना गुणसंपन्न आहे. त्याचे स्वरूप इंद्रिय-ग्राह्य नाही. म्हणून तो अलिंग अर्थात स्त्री, पुरुष, नपुंसक तिन्ही लिंगाने रहित आहे. आत्म्याचा कोणताही आकार (संस्थान) नाही. तो शुद्ध चैतन्य गुणमय आहे.

हे आत्मन् ! अज्ञानाचा नाश करणारे मती, श्रुत, अवधी, मनःपर्याय आणि केवल या पाच प्रकारच्या ज्ञानांची भावना मनात वाढवून अनुभावित बना. ज्यांचे भाव या ज्ञानात्मक भावनेने भावित आहेत ते देवलोक, विषयसुख आणि मोक्ष सुखाचा अधिकारी बनतो.[५०]

शुभभाव म्हणजे मंद कषायरूप विशुद्धभावद्वारा जीव चक्रवर्ती इ. चे विपुल राज्यवैभव प्राप्त करतो. विशुद्ध भावद्वारे तो विद्याधर, देव आणि मनुष्य इ. द्वारा वंदनीय होतो. अर्थात हे सर्व त्याची पूजा करतात. नंतर त्यास बोधी-रत्नत्रयात्मक मोक्ष मार्ग प्राप्त होतो.

जिनेश्वर देवाने अशुभ-शुभ आणि शुद्ध तीन प्रकारचे भाव सांगितले आहेत. अशुभ भाव तर आर्त, रौद्र ध्यान आहे. शुभभाव धर्मध्यान आहे. जो शुद्ध ध्यान आहे ते आत्म्याचा आपला स्वभाव आहे. आत्म्याला आत्मामध्ये जाणणे- आत्मस्वरूपात राहणे किंवा आत्मस्वरूपाला आत्मा रूपात जाणणे शुद्ध स्वभाव आहे.

या तिन्ही भावनेला जाणणे श्रेयस्कर होईल.[५१]

आत्मभावनेच्या चिंतनाच्या पूर्वी जो साधक अनित्यादी बारा भावना, पाच महाव्रतांची पंचवीस भावनांच्या भावाचे जो चिंतन करतो, त्यास परिषह आणि उपसर्ग

सहन करण्याची शक्ती जागृत राहते. भाव शुद्ध राहतात. भावाशिवाय केवळ बाह्य लिंग वेष इ. नी काय सिद्ध होणार ?[५२]

ज्याप्रमाणे सोन्याला शुद्ध आणि निर्मल करण्यासाठी विशेष प्रक्रिया करावी लागते तेव्हा ते पाषणातून शुद्ध बनते. त्याचप्रमाणे कालादी लब्धी अर्थात द्रव्य, क्षेत्र, काल, भावरूप सामग्री प्राप्त करून अनादी कर्म संयोगामुळे अशुद्ध बनलेला आत्मा परमात्म भाव प्राप्त करतो.[५३]

जो संसाररूपी भयानक महासागरातून बाहेर पडू इच्छितो, त्याने शुद्ध आत्म स्वरूपाचे ध्यान करावे ज्यामुळे कर्मरूपी इंधन जळून जाईल. ध्यानात स्थित साधक सर्व प्रकारचे कषाय गर्व अहंकार मद, राग-द्वेष, मोह इ. सर्वांचा त्याग करून लोकव्यवहारापासून विरक्त होऊन शुद्ध आत्म्याचे ध्यान करतो.

पर द्रव्यात, आत्मेतर पदार्थात राग (रुची) ठेवतो. ते संसारात जन्ममरण आवागमनाचे हेतू रूप आहे. म्हणून योगीवृन्द निरंतर आत्म्याचीच भावना करतात.[५५]

भरतक्षेत्रात या पंचमकाळात ज्ञानीमुनींना धर्मध्यान आहे. आत्मस्वभावात स्थित जो ज्ञानीमुनी असतो त्याला धर्मध्यानाने उच्च गती मिळते. परंतु ज्यांचा यावर विश्वास नाही ते अज्ञानी आहेत. या पंचमकाळात रत्नत्रयाची (ज्ञान, दर्शन, चारित्र) साधना करून शुद्ध, पवित्र झालेले, आत्म्याचे ध्यान करूनच इन्द्रादी देव पद प्राप्त करतात व मग तेथून च्यूत (मृत्यू) होऊन आयुष्य पूर्ण करून मनुष्य जन्म धारण करतात आणि मोक्ष प्राप्त करतात.[५६]

जे लोकमध्ये नमस्कार करण्यास योग्य चक्रवर्ती इ. राजा द्वारा तथा सुरेंद्रद्वारा निरंतर नमन करण्यास योग्य ध्यान करण्यास योग्य, आहेत तथा स्तुती करण्यास योग्य आहेत ते तीर्थंकर इ. सुद्धा शुक्लध्यान द्वारा ज्यांचे ध्यान व स्तवन करतात असा आत्मा शरीरात स्थित आहे. तो अपूर्व अचिन्त्य महात्म्य युक्त आहे. ह्या आत्म्याला जाणा, अनुभव करा. त्यात श्रद्धा ठेवा, रुची ठेवा आणि आपल्या आत्म्यात रमण करा.

अरिहंत, सिद्ध, आचार्य, उपाध्याय आणि साधू परमपद शुद्ध आत्म्याच्या शुद्ध सहज स्वरूपात स्थित असल्यामुळे परश्रेष्ठी आहेत. जो आत्म्यात आत्म्याच्या शुद्ध सहज अवस्थेत स्थित आहे, असा आत्माच माझ्यासाठी शरण रूप आहे.

सम्यग् दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यग्चारित्र, सम्यग्तप- ह्या चारही आत्म्याच्या अवस्था आहेत. म्हणून आत्माच शरणरूप आहे. साधकाने असे चिंतन करावे.[५७]

या श्लोकात आचार्य कुन्दकुन्दांनी प्रतिपादन केलेल्या पंचपरमेष्ठी आणि सम्यग्दर्शन आदी आराधना इतरत्र कुठेही नाही. परंतु आत्म्यातच स्थित आहे. अर्थात ह्या सर्व आत्म्याच्या अवस्था आहेत असा उल्लेख केला आहे.

यांच्या आराधना साधना द्वारा समाधीमरण आणि सर्वोत्तम सुख शांतीचे परमधाम मोक्ष प्राप्त होऊ शकतो. म्हणन मुमुक्षूंनी निरंतर आत्मभावनेत रत राहिले पाहिजे.

आत्मभावनेचे विवेचन करताना श्री अमितगति आचार्य लिहितात-जो आत्मार्थी साधक चिंतन करतो की मी कोणाचाही नाही, कोणताही पर-भाव, अन्यभाव माझा नाही, आत्मतत्ववेत्ता साधक ज्ञान व दर्शनाने अलंकृत आत्मा, परम ज्ञान दर्शन युक्त द्रव्य कर्म आणि भाव कर्माने रहित आत्म्याला सोडून मी कोणाचाच नाही. कोणताही परकीय भाव माझा नाही. आत्मतत्त्ववेत्ता साधकाच्या चित्ताची अशी अवस्था होते तेव्हा त्या महापुरुषाला कोणताही बंध (कर्म) होत नाही. ज्याच्यामुळे तीनही लोक जकडलेले आहेत.[५८]

ज्या शरीराचे अनेक प्रकाराने स्वस्थ, सुंदर, सुदृढ करण्यासाठी पालन-पोषण केले जाते, ते शरीर आपले नाही. ज्याप्रमाणे ज्याच्याशी कर्म बांधले आहेत त्या कर्मांच्या वशीभूत पुत्र, स्त्री, मित्र, पुत्री, जावई, आई, वडील इ. लौकिक संबंध बांधले ते आत्म्यापासून सर्वथा भिन्न आहेत. आत्म्याला कोणतेही नातंगोतं नाही. आत्म्याला बंध नाहीत (निश्चयदृष्टीने) म्हणून ज्ञानीपुरुषाने आपली बुद्धी आपल्या आत्म्यातच स्थिर करावी.[५९]

आत्माज्ञानी आहे. जर त्याची सेवा केली तर तो परमनिर्मल ज्ञान देतो. अर्थात आत्मस्वरूपानुभूतीने परम निर्मल ज्ञान प्राप्त होते. शरीर अज्ञानी आहे. ते तर घोर अज्ञानच देते. संसारात सर्वत्र हे प्रसिद्ध आहे की ज्याच्याजवळ जे असते तेच तो दुसऱ्यांना देतो. कोणी मोठा दानवीर असला तरी कुणाला आकाशकुसुमदान नाही करू शकत. कारण आकाशात पुष्प असणे असंभवच आहे.[६०]

प्रस्तुत श्लोकात आत्मा आणि देह यांच्या भिन्नतेवर प्रकाश टाकला आहे व दोघांचे स्वरूपाचे चिंतन केले आहे. आत्मा चिन्मय, ज्ञानस्वरूप आहे तथा शरीर ज्ञान रहित जड (अजीव) आहे. आत्मकल्याण करण्याचे साधन तर एकमात्र ज्ञानच आहे जे आत्माच देऊ शकते. शरीर ज्ञान देण्यास सर्वथा असमर्थ आहे. परंतु हे ज्ञान कसे प्राप्त होईल तर जेव्हा शरीर आणि आत्मा भिन्न आहेत हे भेदज्ञान प्रतीत होईल. आत्मभावनाचे

अत्यंत सूक्ष्म, सुन्दर भाव चित्र यात अंतिक केले आहे.

ज्याप्रमाणे सोन्याला अग्नीत तापवले की त्याचा कडकपणा दूर होऊन ते पातळ होते ह्याचप्रमाणे काम, क्रोध, विषाद, मत्सर, मद, द्वेष, प्रमाद इ.ने मनाची स्थिरता टिकत नाही. शुद्ध ध्यानात हे विकार आडवे येतात. म्हणून ध्यानाचा अभ्यास करणाऱ्या योगीने या विषय-विकारापासून सतत सावधानतेने राहिले पाहिजे.[६१]

ध्यानात मानसिक स्थिरता परमावश्यक आहे. ध्यान करतेवेळी जर मनात काम, क्रोध, विषाद इ. युक्त अशुद्ध भावना असली तर ध्यानातील स्थिरता नष्ट होते. मानसिक एकाग्रता नष्ट होते. मनाची एकाग्रता झाली तरच ध्यान होऊ शकते. एकाग्रता नसेल तर ते ध्यानच नव्हे.[६२]

ज्या साधकाने भोगस्पृहाचा, विषयवासनाचा त्याग केला आहे तोच या दुर्वाह, दुरुह-मोठ्या मुश्किलीने वश होणाऱ्या माकडासारख्या चंचल मनाला, जो इंद्रियांच्या भोगरूपी वनात विचरण करतो त्यास हृदयात स्थिर करून लोक प्रवाहापासून विमुक्त होण्यासाठी ध्यानाचा अभ्यास करतो. कारण निश्चितपणे उपाय केल्याशिवाय विधिक्रम केले जातात त्याच्याने सफलता प्राप्त होत नाही.[६३]

मानसिक चंचलता ध्यानाची स्थिरता टिकू देत नाही. मन अतिचंचल आहे. ते तेव्हाच नियंत्रित होऊ शकेल जेव्हा मनातील भोगाभिलाषा नष्ट होतील. कारण त्यामुळेच तर संसाराचा प्रवाह-कर्माश्रव गतिशील आहे. त्याचा निरोध केल्याशिवाय ध्यान सिद्ध होणार नाही. कोणतेही कार्य करायचे म्हटले म्हणजे त्यात कार्यानुरूप शिस्तबद्ध क्रिया व साधन असायलाच पाहिजे. इथे संवराने अर्थात आश्रव निरोधपूर्वक शुद्ध भावनेचे चित्रण केले आहे.

मी शौर्यवान आहे, प्रशस्त बुद्धिवादी आहे. निपुण, कुशल, प्रवीण आहे. सर्वात ज्यास्त वैभवशाली आहे, सन्माननीय आहे. गुणवान आहे, लोकांमध्ये अग्रगण्य आहे. अशाप्रकारच्या अप्रशस्त कल्पनेचा परित्याग करून निर्मल, शाश्वत आत्मतत्वाचे तुम्ही ध्यान करा ज्यामुळे मोक्षरूपी लक्ष्मी प्राप्त होते.[६४]

आत्माकर्मोदयामुळे विविधप्रकारचा स्थूल, सूक्ष्म, दीर्घ इ. देहद्वारा प्रकट रूपात संबद्ध असूनही कधी विकारी बनत नाही. अर्थात शुद्ध स्वरूपात कोणतीही विकृती येत नाही. या शरीराला लाल, पिवळे, पांढरे इ. विविध रंगाच्या वस्त्रांनी सुशोभित केले तरी त्या आत्म्याला रंगाने काही प्राप्त होत नाही.[६५]

ज्याप्रमाणे शरीर आणि वस्त्र भिन्न आहेत शरीर वस्त्र नाही, त्याचप्रमाणे आत्मा शरीर स्वरूप नाही.

आत्मा हा नित्य ज्ञानस्वरूप, निर्मल सर्व दुःख विनिभृक्त आहे असे जाणत असूनही मनुष्य किती मिथ्या कल्पना करतो की मी गोरा, सुंदर, सुदृढ, परिपुष्ट, स्थूल, कृश, कर्कश, देव, मनुष्य, पशू, नारक, नपुंसक, पुरुष, स्त्री आहे.[६६]

हे तर सर्व कर्मोदयामुळे प्राप्त दैहिक पर्याय आहेत. जो सर्व आरंभ, कषाय व संग रहित आहे, जो शुद्ध ज्ञानदर्शनमय उपयोगाने पूर्ण आहे, जो सर्व कर्ममलाने रहित आहे, ज्याला कोणत्याही बाह्य पदार्थाची अपेक्षा नाही, हाच तो आत्म्याचा उत्कृष्ट स्वभाव आहे. मोक्ष प्राप्तीसाठी सतत मनात निर्पेक्ष भावाचे ध्यान करतो. स्वात्मानुभवच आत्म्याला परमात्मा पदापर्यंत घेऊन जाणारा आहे. बुद्धिमान जो भेदविज्ञानी पुरुष रागवर्धक चिंतनाचा त्याग करून आत्मचिंतन करतो, पर चिंतनाने बंधन वाढतात. आत्म्याच्या मुक्तीमार्गात तो अडथळा आहे. विघ्नकारक आहे. व्यवहारात सुद्धा पहा- समयानुकूल कार्य केले तर ते शोभते. त्याचप्रमाणे आत्मभावनेच्या विरुद्ध भावनेपासून आपला बचाव करायला पाहिजे. जो मनुष्य आपल्या शरीराविषयक कार्यात जागृत आहे, ते हेय अर्थात त्याज्य आहे. आदेय म्हणजे ग्रहण करण्यायोग्य नाही. आत्म्याच्या उन्नतीसाठी शरीरधर्म हा अडथळा आहे. अशी व्यक्ती खरी साधना करण्यास अयोग्य आहे. ज्याचे शरीराकडेच लक्ष केंद्रित आहे. शरीराचीच सेवा करण्यात वेळ घालवतो तो आत्मसाधक असूच शकत नाही. ज्याला आत्मकल्याण साधायचे आहे त्याने शरीराचा मोह सोडलाच पाहिजे. ज्याला खरोखर आत्मसिद्धी प्राप्त करायची तळमळ आहे तो आत्मसंपन्नता वाढविणारी कृती करेल. त्याच्या विरुद्ध कृती त्याच्याकडून होणारच नाही.[६७]

स्वस्थ आपल्या आत्म्यात विद्यमान कर्मोदयाने अप्राप्त शाश्वत-अविनाशी मनरहित, निर्मल, विद्वत् जन प्रार्थीत्-ज्ञानीजनांद्वारे अभिप्सित स्थिर बुद्धिपूर्वक आत्माद्वारे सहज प्राप्त होण्यास योग्य सुख आपल्याजवळ असताना तू बाह्य इंद्रियजनित सुख प्राप्त करण्यासाठी कष्ट का करतोस की ज्याचा परिणाम दुःखद आहे तथा जे नश्वर आहे. अरे, मूर्ख ! शिवमंदिर मुक्तीरूपी मंदिरात आध्यात्मिक संपत्तीचे निधान आहे, तू भिक्षेसाठी का भटकतो आहेस.

आचार्य अमितगतिंनी इथे सत्तत्त्व अर्थात् शुद्ध आत्मत्त्वांचा, स्वभावाचा विभावात्मक जगातिक पदार्थांनी भोग-सुख आणि साधना यापासून सर्वथा भेद दाखवताना

शुद्ध भाव अथवा शुद्धोपयोगाच्या दृष्टीने प्रयत्नशील होण्यासाठी साधकाला फार सुंदर काव्यात्मक शैलीत उद्‌बोधन दिले आहे. आध्यात्मिक सुख याची तुलना कोणत्याही सांपत्तिक सुखाशी होणार नाही. तरी ही साधक त्याला गौण मानून संसाराच्या मोहात गूढ होते आहे. ही त्याची किती मोठी चूक आहे. हे सांसारिक सुखोपभोग मोक्षरूपी महानलक्ष्य प्राप्तीत बाधक आहे. हे त्याने समजायला हवे. शुद्धात्मभाव किंवा शुद्धोपयोगाचा आश्रय घेतल्यानेच परम लक्ष्य सिद्ध होऊ शकतो. आचार्य अमितगती यावरच विशेष महत्त्व देऊ इच्छितात.

जो धन-भृत्य-सेवक, लक्ष्मी-संपत्ती सुरक्षित ठेवून दृढतेने ग्रहण करून त्यात अत्यंत आसक्ती ठेवून, पवित्र, निर्मल, स्थावर-अविनश्वर आत्मसुख प्राप्त करण्याची इच्छा ठेवतो तो अज्ञानी होय. मी असे मानतो की, असा मूर्ख प्रलथ काळात उठणाऱ्या लाटांना पकडून अपार समुद्राला पार करू इच्छितो. अर्थात सांसारिक धन, संपत्ती, वैभव इत्यादीमुळे आध्यात्मिक सुख प्राप्त होणे केवळ दुर्लभ आहे. या नश्वर वस्तूमध्ये शाश्वत सुखाची इच्छा करणे हे अज्ञानाचे लक्षण आहे.[६९]

जो प्राणी स्वच्छ, निर्मल मनात भाव परिणाम ठेवतो तो स्वर्ग व मोक्ष रूपी लक्ष्मीला अवश्य प्राप्त करतो. आणि जो म्लान, दोष युक्त भाव परिणाम ठेवतो तो घोर दुःख उत्पन्न करणाऱ्या नरकादी गतीमध्ये जातो. म्हणून सत्पुरुष प्रथम स्वच्छ परिणाम ग्रहण करतो आणि अशुभ परिणामांचा विवेकबुद्धीने त्याग करतो.[७०]

ग्रंथकाराच्या कथनाचा उद्देश्य असा आहे की, शुद्धभाव किंवा परिणामाने स्वर्ग व अपवर्ग प्राप्त होतात. परंतु दुष्परिणामाने, अशुभ परिणामाने नरक वगैरेचे घोर दुःख प्राप्त होते.

अशुद्ध परिणामामुळे जीव नरकगती, शुभपरिणामुळे स्वर्ग तथा चेतन-आत्म्यात दृढ श्रद्धा ठेवणारे जीव कर्मरहित होऊन अनवद्य-निर्दोष शिवपद-मोक्षपद-प्राप्त करतो. असे जे मोक्षपद प्राप्त करण्याची इच्छा ठेवतात, त्यांनी तर मन सतत शुद्ध परिणामातच ठेवायला हवे. सतत शुद्धभावनेचेच चिंतन करायला हवे. शुद्ध परिणाम सतत वृद्धिंगत ठेवायला पाहिजे.

नरकात नारकीय जीव सतत एकमेकांना असह्य वेदना देतात. ज्याचे वर्णन आपण वाणीद्वारा करणे सुद्धा अशक्य आहे. तिथे अनंत, घोर दुःखच, दुःख आहे. तिर्यंच योनीत जे पशु-पक्षी-प्राणी आहेत त्यांना पर छेदन-भेदन, भूक-तहान ताप, परिताप यामुळे

होणाऱ्या वेदना सहन कराव्या लागतात. मनुष्यालासुद्धा व्याधी, वियोग, जन्म-मृत्यू इ. दुःख भोगावे लागतात. देवगतीमध्ये सुद्धा मानसिक पीडा तर आहेच. अशाप्रकारे या विश्वात अनंत दुःखच भरलेले आहे. जगातील शोक, पीडा, वेदना दुःख पाहून तरी माणसाने यातून मुक्त होण्याचा जो मार्ग आहे त्याचे अवलंबन करून आपली बुद्धी मोक्ष-मुक्ती मिळवण्याकडे लावली पाहिजे. संसारात राहून पण त्यात लिप्त न होता. संसारात न गुरफटता मोक्ष प्राप्तीचा ध्यास घ्यायला पाहिजे त्यालाच ज्ञानी म्हणता येईल. शाश्वत सुख मोक्षानच आहे.[७१]

ज्याप्रमाणे पाण्यात मातीचा गोळा विरघळून जातो. त्याचप्रमाणे दुष्कर कठिण श्रम, प्रयत्नपूर्वक केलेले संसारी कार्य क्षणभरात नष्ट होऊन जातात. वस्तुस्थिती अशी आहे तरीही हे अज्ञानी जीव सांसारिक कार्यात प्रवृत्त राहतात याचा खेद वाटतो. बुद्धिमान व्यक्ती फक्त श्रमजनक, परिश्रांत करणारे निरर्थक कार्यात कधीच सलग्न रहात नाहीत.[७२]

नानाप्रकारचे उपद्रव-आपत्तींनी युक्त अत्यंत मलीन अस्वस्थ आत्मशांती रहित अशा या संसाराला तथा आपत्ती विरहित, नित्य निरंतर उच्च सुखमय मुक्तीला, कषायाने मोहित बुद्धियुक्त प्राणी तत्त्वतः समजत नाही अर्थात् त्याचे यथार्थतः भेदज्ञान करू शकत नाही. त्याला हे भेदज्ञान समजले पाहिजे की अत्युत्तम सर्वोत्कृष्ट युक्तीला सोडून अशा संसारात का अनुरक्त होत आहे.[७३]

अती खेदाची गोष्ट आहे की, सांसारिक प्राणी विषयभोगांची आकांक्षाच्या वशीभूत होऊन भिन्न-भिन्न प्रकारची हिंसा वाढवणारी असि-तलवार, मसि-लेखनी, कृषी-शेती, वाणिज्य व्यापार, शिल्प-कारागरी, विद्या-कळा या सहा प्रकारच्या आजिविकांच्या साधना विषयक क्रिया करतो आणि दुःखाची उत्पत्ती होते मग भारी कर्म बंधनात जातो. निरोगत्व, स्वस्थता प्राप्त करण्याची इच्छा ठेवून हे प्राणी अपयश, स्वाध्याच्या दृष्टीने हानीकारक, विकारोत्पदक भोज्य पदार्थाचे सेवक करतो. मग समस्त अंगोपांगात व्यथा उत्पन्न करणारे रोग त्याने पीडित होतो तसे कष्ट त्यांना प्राप्त होते.[७४]

आचार्य उमास्वाती लिहितात 'ज्याने अहंकार आणि वासनावर विजय मिळवला, मन, वाणी आणि शरीराच्या विकाराला धुवून टाकले ज्यांच्या आशा निवृत्त झाली त्या सुविहित आत्मासाठी मोक्ष आहे.[७५]

आत्म्याच्या सिद्धांत निश्चित झाला मग त्याच्या विकासाची दृष्टीपण प्राप्त झाली. विकासाच्या साधनांचे अन्वेषण केले गेले. मोक्षमार्ग काही पारलौकिक नाही व वर्तमान

जीवनात ही जितकी शांती, जितका आनंद आणि जितके चैतन्य स्फुरित होतो ती सर्व अवस्था मोक्षाची आहे.

तत्त्वज्ञानरहित प्राण्यांना आत्माचे ज्ञान आणि श्रद्धा नसते. तो ज्या शरीरात आहे त्या स्वरूपात त्याला आपले मानतो. आपल्या आत्मस्वरूपाकडे त्याचे लक्षच जात नाही. म्हणून तर राग, द्वेष, मोहात पडून तीव्र पापकर्म बांधतो. परंतु ज्याने सम्यक्त्व प्राप्त केले त्याने संसारवृक्षाच्या मूळातच घाव घातला. त्याला मग कर्मबंध झाले तरी शीघ्र दूर ही होतात. त्याचे कारण असे की, त्याची बुद्धी संसारात लिप्त होत नाही. कारण त्याच्या अंतरंगात भेदविज्ञान जागृत झालेला आहे की, माझ्या आत्म्याचा स्वभाव ज्ञानमय, दर्शनमय, सुख, वीर्यमय, अमूर्तिक, अविनाशी आहे. या जगात परमाणुमात्र सुद्धा माझा नाही. या भेदज्ञानामुळे तो साधक आत्मसुखाच्या स्वाद घेण्यास उत्सुक राहतो. न आपल्या आत्म्याचे ध्यान करीत राहतो. शरीर आणि आत्मा हे वेगळे आहेत. आत्मा स्वतंत्र आहे. शरीर स्वतंत्र आहे. आत्मा म्हणजे शरीर नव्हे शरीर म्हणजे आत्मा नव्हे. हे आहे ते भेदज्ञान, तो आत्मसुखाच्या स्वोदसाठी उत्सुक राहून आपल्या आत्म्याचा ध्यान करतो. भेद ज्ञानावर एकदा पूर्ण श्रद्धा बसली की मग स्वात्मानुभव निश्चितपणे होतो. जो धीराचित्तएकाग्र करून शुद्ध भावनेचा अभ्यास करतो तो शुद्ध क्षमा भावनेने क्रोध रूपी जल प्रवाहाला थांबवतो. शुद्ध मार्दव भावनेने मानरूपी स्तंभ निश्चितपणे दूर कराते. आर्जवतेने वञ्चकता धूर्तता इत्यादी विषाचे हनन करतो. जो ह्या सुंदर शरीरात आसक्त नाही तो निश्चितपणे लोभरूपी सिंहाला पण जिंकून टाकतो, जो शुद्ध मनाने धर्माचे आचरण करतो ते मनरूपी मर्कटाला वश करतो. जो शुद्धभावनेने वीतरागीची भक्ती करतो, तो मोह रूपी दुष्टराग तत्क्षण नष्ट करतो. जो सर्व प्रकारे धर्माचरण करतो भावनेत शुद्धी ठेवतो आणि ध्यानयोग करतो ता केवलज्ञान पण प्राप्त करू शकतो.[७६]

ज्यांची प्राण, इंद्रिये मन आणि बुद्धी विषयक सर्वप्रवृत्ती संकल्परहित असते ते पुरुष शरीरात विद्यमान असून पण त्याच्या गुणाने विमुक्त राहातात.

'देह छता जेणी दशा वरते देहातीत ।
ते ज्ञानी ना चरणमां वंदन हो अगणिता ॥'

असेच ज्ञानी पुरुष जगात वंदनीय ठरतात जे देह असताना पण देहातीत दशेत राहातात.

आत्मज्ञानी पुरुषांच्या शरीरावर हिंसक प्राण्याने घात केला तरी त्यांच्या आत्म्यात

द्वेष भाव उत्पन्न होत नाही आणि कुणी पूजा अर्चना केली तरी त्याच्या प्रती अहोभाव होत नाही. ह्या दोनी परिस्थितीत ते समभावात रहातात. घात केला गेला तरी ते दुःखी होत नाही व पूजा केली तरी सुखी होत नाही. सन्मान केले अथवा अपमान केले तरी त्यांना त्याचा काहीच परिणाम होत नाही. ते गुणात्मक, दोषात्मक, निंदात्मक वृत्तीने सर्वथा रहित असतात. मात्र आत्मभावान स्थित राहातात.

आत्मविकासासाठी सत्याचा स्वीकार तर परमावश्यक आहे. आणि त्याचबरोबर ज्ञान-अज्ञान रूपाने काही चुका झाल्या असतील तर प्रायश्चित किंवा आत्मग्लानी होणे पण आवश्यक आहे. ही आंतरिक शुद्धी पवित्रताचे अनन्य साधन आहे.[७७]

आत्मतत्त्वाचा बोध होण्यात गुरू दीपकाप्रमाणे पथप्रदर्शक असतात. आत्मसाक्षात्कार करतात. अज्ञजन किती श्रम करतात वाचतात, बोलतात घशाला कोरड पडेस्तोवर बोलतात. तरीही आत्म्याच्या शुद्धभावाचे यथार्थ ज्ञान त्यांना प्राप्त होत नाही. जो आत्मस्वरूपाचे त्या संबंधीचे एकच अक्षर वाचून चिंतनात उतरवतो तो मोक्ष प्राप्त करून जातो. सर्व बंधनातून त्याची मुक्ती होते.[७८]

कबीर आत्म्याच्या शुद्धभावाच्या साक्षात्काराकडे प्रेरित करताना म्हणतात- पुस्तके वाचून लोक मरत आहेत. वाचण्यात सारे जीवन घालवतात. पण कोणी ज्ञानी होत नाहीत. ज्याने परमात्म्याचा आत्म्याच्या शुद्धभावाचे एक अक्षर जरी वाचले थोडा जरी साक्षात्कार झाला तर तो आत्मज्ञानी बनतो.[७९]

कबीराचा आशय असा आहे की, पुस्तकी ज्ञान कितीही प्राप्त केले. परंतु आत्म्याच्या शुद्ध भावात जोपर्यंत परिणमन होत नाही तोपर्यंत त्या अध्ययनाची काहीच सार्थकता नाही. कबीराच्या सांगण्यानुसार अनेक-अनेक ग्रंथ वाचणे म्हणजे पांडित्य नव्हे. पांडित्य तर तेव्हा सिद्ध होते जेव्हा आत्म्याची शुद्धानुभूती होते.

रागाने (आसक्तीने) रंगलेल्या हृदयात प्रशांत आत्मदेव दृष्टिगोचर होत नाही. ज्याप्रमाणे धुळीने माखलेल्या आरशात प्रतिबिंब दृष्टिगोचर होत नाही, त्याचप्रमाणे रागाने रंगलेल्या हृदयात शांत शुद्ध आत्मारूपी देवाचे दर्शन होत नाही. अर्थात शुद्ध आत्मानुभूती किंवा साक्षात्कार तेव्हाच होतो जेव्हा हृदयात राग इ. वैभाविक मालिन्य नसेल.[८०]

शुद्धोपयोगमय आत्मस्थिती तेव्हा सिद्ध होते, जेव्हा रागादी भावनांचा सर्वथा उन्मूलन होईल.

योगेन्दु देव यांनी एक छोटे रूपक देऊन आत्म्याच्या शुद्धोपयोगाचे मोठ्या सरस शब्दात वर्णन केले आहे.

एक मैत्रीण दुसऱ्या मैत्रिणीला म्हणते, अग, मी त्या आरशाचं काय करू ? ज्यात माझे प्रतिबिंब दिसत नाही. हा संसार म्हणजे गोरख धंद्यासारखा आहे असे वाटते. घरात राहूनही मला घरमालकाचे दर्शन होत नाही.[८१]

या मायामय रागादीने रंजित जगात विभ्रांत मानवाला शुद्धात्म भावाची प्रेरणा देताना म्हणतात की, ज्याप्रमाणे त्या आरशाचा काही उपयोग नाही. त्यात आपले प्रतिबिंब दिसत नाही. त्याचप्रमाणे या जीवनाचे काय महत्त्व आहे ? हा तर अती विचित्र आणि गोरखधंद्यासारखा आहे. जिथे आत्म्याच्या शुद्ध भावाची प्रतिती होत नाही, आणि खरं तर तो आपल्यामध्येच विराजमान आहे.

माणसाच्या हृदयात आरसा आहे. पण त्याला आपला चेहरा त्यात दिसत नाही. चेहरा तर तेव्हाच दिसेल जेव्हा मनाची दुविधा नष्ट होईल. अर्थात अंतःकरणाच्या आत जर राग, द्वेष, काम, क्रोध इ.ची दुविधा नसेल तर शुद्ध परमात्म भावाची अनुभूती होऊ शकते. परंतु असे होत नाही याचे कारण तो आरसा (हृदय) दुविधांनी सांसारिक मोह मायात्मक काळीमामुळे घूमिल झाला आहे.[८२]

कबीराने शुद्ध भावानुभूतीचा मार्ग दाखवताना म्हटले आहे- जर तुम्ही शुद्ध आत्मभावाचे दर्शन करू इच्छिता तर हृदयरूपी आरसा स्वच्छ करा. जोपर्यंत आरसा धुळीने माखलेला असेल तोपर्यंत आत्मभावाचा साक्षात्कार होणार नाही.[८३]

परमतत्वोपलब्धी तेव्हाच साध्य होऊ शकते, जेव्हा त्यासाठी साधनाच्या रूपात बलिदान केले जाईल. हीच गोष्ट कबीर आपल्या सधुक्कडी भाषेत सांगतात- जो आपल्या मस्तकाची रक्षा करतो, सांसारिक राग आणि ममत्वामध्ये लिप्त राहतो. त्याचे मस्तक जाते अर्थात् त्याला त्याचे वास्तविक लक्ष (ध्येय) त्याला मिळत नाही. जो सांसारिक ममत्वापासून दूर राहतो, तो वास्तवात शुद्धात्म भावानुरूप मस्तकाला प्राप्त करू शकतो. दिव्यातील ज्योत पुढे-पुढे जळत जाते आणि प्रकाश देत जाते.[८४] प्रकाश पसरविण्यासाठी त्याला जळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आध्यात्मिक उपलब्धिहेतू भौतिक उपलब्धी बलिदान करावी लागेल.

चैतन्य स्वरूपाचा स्वभाव शांत आणि वीतराग भाव आहे. अशा स्वरूपाचे ध्यान केल्याने आत्मशुद्धी आणि आत्मसिद्धी प्राप्त होते. सर्व ज्ञानीजनांनी हाच मार्ग स्वीकारला होता.

एका काडीचे दोन तुकडे करण्याची शक्ती ज्यांच्यात नाही, अशा शुद्ध चैतन्य स्वरूप आत्मा अनंत शक्तीचा मालक आहे. एकदा का तो जागृत झाला, आपल्या स्वरूपात तन्मय झाला तर दोन घडीत (४८ मिनिटात) मोक्ष प्राप्त करतो.[८५]

अशा आत्मतत्वाला प्राप्त करण्यासाठी मुमुक्षू विचार करतो की, या संसाररूपी चक्रात पडून अगोदर सम्यग्दर्शन इ. भावनांचे चिंतन केले नाही. आता त्याचे चिंतन करतो. आणि मिथ्यादर्शन इ. भावनांचा तर पुन्हा पुन्हा चिंतन केले त्याचे आता चिंतन करीत नाही. अशा प्रकारे मी आता पूर्वभावित भावनांचा त्याग करून त्या अपूर्व भावना करतो आहे. कारण की अशी भावना भवभ्रमणाच्या विनाशाचे कारण आहे.[८६]

अतःकरण शुद्धता आणि भावांची पवित्रतासाठी वाणीत, ध्वनित, शब्दात, विचार विमर्शात सदा सत्य असले पाहिजे.

आत्मभावमूलक वरील विवेचनावरून असे प्रतीत होते की, त्रिकालाबाधित सत्य हे सर्व ठिकाणी सत्यच असते. केवळ त्याच्या मूळापर्यंत जायला पाहिजे. जैनदर्शनाचा दृष्टिकोन खूप उदार राहिला आहे. जैनधर्मात बहुश्रूत तो असतो जो आपल्या सिद्धांताच्या गाढा अभ्यासक असतो व दुसऱ्यांच्या सिद्धांताचासुद्धा बारकाईने अभ्यासू असतो. मग धर्माधर्मातील संकीर्णता आपोआप दूर होते.

आत्मभावनेचे अध्ययन केल्याने सत्यताचे क्षेत्र व्यापक होते. सत्य तर विराट आहे. सत्याच्या अनेक मार्गांचा व्यापक बोध हा सत्याची खरी ओळख होण्याचा प्रशस्त मार्ग आहे.

ज्याची जशी भावना असते त्याला तशी फळ मिळतात. आत्म्याच्या शुद्धोपयोगाने प्राप्त होणारे फळ मुक्ती आहे. आत्मभावनेने भावित भव्य जीवांना मोक्ष प्राप्त होतो. आत्मभावनेच्या बळानेच भरत चक्रवर्ती इत्यादींना मोक्ष प्राप्त झाले. शुभभावनेने शुद्धभावना उत्पन्न होते.

महान अध्यात्मयोगी आचार्य कुन्दकुन्द, पूज्यपाद हरिभद्रसूरी इत्यादी आचार्यांनी साधकाला मोक्षानुगामी मार्गावर आरूढ होण्याची प्रेरणा देण्याच्या हेतूने शुद्धोपयोग किंवा शुद्ध भावनाचा आपआपल्या ग्रंथात मार्मिक विश्लेषण केले आहे. जर सूक्ष्म दृष्टीने पाहिले तर अनित्य इ. बारा भावना आणि मैत्री इ. चार भावनांचा अंतिम निष्कर्ष आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाला स्वायत्त करणे हाच आहे. ही ती स्थिती आहे जिथे कर्मबद्धता होत नाही. जोपर्यंत आत्मा कर्माने बद्ध राहिला तोपर्यंत त्याला आपल्या सत्य स्वरूपाचा साक्षात्कार

होणार नाही. कर्मशृंखला दोन प्रकारच्या आहेत. एक अशुभ अध्यवसाय व दुसरी शुभ अध्यवसाय. अशुभ अध्यवसायाने पापाचे बंध होतात आणि शुभ अध्यवसायाने पुण्य बंध होतात. पापाच्या परिणामस्वरूप जीव अनेक प्रकारच्या दुःखात पडतो. सहन करतो.

नरक पापाचे फळ आहे. विभिन्न पशुपक्ष्यांचे दुःखमय जीवन त्यांच्या पूर्वजन्माच्या अशुभ कर्माचा परिणाम आहे. मानव जीवनात दरिद्रता, दुःख, रोग तथा अनेक प्रकारच्या विपत्ती सुद्धा आपआपल्या आचरित कर्मामुळे निष्पन्न आहेत. हे सर्व अशुभोपयोगचे परिणाम आहेत. असंख्य, अनेक प्रकाराच्या क्लेशाच्यारूपात त्याची परिणती होते. अशुभोपयोग सर्वथा त्याज्य आहे. त्यात ग्रस्त होण्याचे मुख्य कारण अज्ञान आहे. जीव आत्मा आणि जड निर्जीव) यांचा यथार्थ भेद समजत नाही. शरीराच्या भोगांना व सांसारिक संपत्तीला तो सर्वोपरी मानतो. ही विभ्रांती आहे. अनित्य भावना या विभ्रांतीला दूर करण्याचा अनन्य उपाय आहे.

अनित्य भावनेला अधिक श्रेष्ठ करण्याचा भाव अशुची भावनामध्ये सन्निहित आहे. वरून सुंदर, सुमधुर, सुरभित, प्रिय आणि आकर्षक करणारा दैहिक कलेवराचे वास्तविक स्वरूप उपस्थित होते. जे शरीर इतके घृणास्पद आहे की क्षणभर सुद्धा आपण वाहू शकणार नाही. देह तथा भौतिक पदार्थांची नश्वरता याचे भान होताच मनात स्व आणि पर यातील भेदाची जाणीव होते.

आत्मा अजीवापासून सर्वथा भिन्न आहे. जड शरीर इत्यादी बरोबर जे साहचर्य आहे ते कर्मसंयोगामुळे आहे. हे साहचर्य तोपर्यंत असेल जोपर्यंत कर्म बंधन संपुष्टात येत नाही. कर्म तोडण्यासाठी प्रथम दृष्टी अशुभावर जाते. व्यक्ती पाप सोडते. कारण सर्वांची हीच इच्छा असते की, त्यांना व्याधी, धनाभाव, पारिवारिक दुःख नसावे. म्हणून पापकर्माबद्दल अरुची उत्पन्न होते. परिणामस्वरूप सुखमय मार्गाकडे तो अग्रसर होतो. तशी त्याला प्रेरणा मिळते. संसाराचा एक पक्ष घोर दुःखमय आहे. आणि एक पक्ष भौतिक दृष्टीने विपुल सुखमय सुद्धा आहे.

देवगतीमध्ये तर अपरिमित सुखच सुख आहे. या संसारात सुद्धा संपन्न, धनवान, सत्ताधीश, उच्चअधिकारी युक्त व्यक्ती अत्यंत सुविधापूर्ण जीवन व्यतीत करतात. खाणेपिणे, रहन-सहन, सत्ता, प्रतिष्ठा इ. सर्व त्यांना मिळते. हे सर्व शुभ कर्माच्या परिणामाचे फळ आहे. पण याबरोबर एक विडम्बना आहे. एकेकाळी सुखी असणारी व्यक्ती अचानक दुःखाच्या खाईत सुद्धा पडते. स्वस्थ असणारे शरीर अचानक व्याधिग्रस्त होऊन

जाते. तरुणावस्थेतील सुंदर शरीर वृद्धावस्थेकडे झुकू लागले. विलास आणि उल्हास विषादात बदलते. म्हणूनच संसारभावनेत उपाध्याय विनयविजयजी अतिशय हृदयस्पर्शी शब्दात लिहितात. ''कलय संसार मतिदारुणं'' हा संसार अत्यंत दारुण, भयंकर दुःखाने व्याप्त आहे. स्पष्टपणे जे दिसते शारीरिक, मानसिक, आर्थिक, पारिवारिक, सामाजिक इ. स्थितीतील दुःखतर आहेतच. परंतु मानव ज्यांना सुख समजतो वास्तविक ते सुख नाही. त्याचा परिणाम दुःख रूपातच प्रस्फुटित होते. म्हणून संसारातील भौतिक दुःखमय अवस्था आणि सुखमय अवस्था दोन्हीही कल्याणकारक नाही. अशुभ लोखंडाची बेडी आहे तर शुभ सोन्याची बेडी आहे. दोन्ही ही शेवटी आहेत तर बेड्याच. म्हणजे बंधनच बंध. कधीच सुख किंवा शांती मिळू शकत नाही.

का आहेत ही बंधने ? भावना मूळ उद्देश्याकडे वळवते.

संसारअवस्था भव-भ्रमण, जन्ममरण किंवा आवागमनचे कारण कर्म आहे. सांसारिक आत्मा अनादीकाळापासून कर्मबद्ध आहेत. हे बंधन आत्मा स्वतःच तोडण्यास समर्थ आहे. अन्य कोणतीही शक्ती कर्म तोडण्यास समर्थ नाही. आत्मा स्वतःच हे कार्य करू शकतो. कोणतेही कार्य नष्ट करण्यासाठी अगोदर त्याचे कारण शोधावे लागते. तेव्हाच ते नष्ट करू शकतो. कारण नष्ट झाले तर कार्य आपोआप नष्ट होते. जेव्हा आत्मा याकडे वळतो तेव्हा त्यास अनुभव होतो की कर्माचा हेतू आश्रव आहे. ''आसमंतात श्रवति इति आश्रवः' जो सतत प्रवाहित राहतो त्यास आश्रव म्हणतात. पाण्याचा प्रवाह ज्याप्रमाणे सतत वाहत असतो आणि सरोवरात, सागरात जाऊन मिळतो. त्याचप्रमाणे आश्रवद्वारा आत्म्यामध्ये कर्म येतच असतात. आत्मप्रदेशांशी एकरूप होऊन जातात. आत्म्याचे चिन्मय, आनंदमय तथा शक्तिमय स्वरूप आहे त्यास आवृत्त करतात. असे मनात चिंतन चालते. भावानुप्रणित होते. असा अनुभव करतो की शुभाशुभ योगाश्रव इ. द्वारा पुण्यपापात्मक जे कर्म परमाणुबद्ध होतात ते आत्मासाठी हितकारी नाहीत. ते आत्म्याचे हनन करणारे आहेत. शुभ किंवा पुण्यात्मक बंध, बाह्य सुविधा-अनुकूलता देतात. धन, वैभव आणि स्वर्गाचे सुखही देतात. परंतु शेवटी ते सर्व बाह्यरूपाने आकर्षक वाटणारे सुख दुःखकारकच आहेत. असे चिंतन वारंवार केल्याने ते प्रबल प्रबलतर होत जाते.

खऱ्या अर्थाने हे उदात्त भाव मनात येतात. मग पापमय प्रवाहाला असे थांबवावे, अशी साहजिकच मनाची उत्सुकता जागृत होते. ज्याचे समाधान संवर-'सम् वृनोति इति संवर' जो संवर अवरोध किंवा निरोध करतो त्यास संवर म्हणतात. आचार्य उमास्वातीने

आश्रवनिरोधः संवर[८८] ही जी परिभाषा केली आहे ती याच भावनेची द्योतक आहे. आश्रवाने येणारे कार्मिक प्रवाह थांबविणे म्हणजेच संवर आहे. सांगायला तर ही गोष्ट फार साधारण वाटते पण कर्मप्रवाहाला रोकण्यासाठी आत्म्याला आपला आंतरिक पराक्रम अत्यधिक सशक्त आणि सुदृढ रूपात उद्‌घाटित करावा लागतो. तेव्हा तशी स्थिती उत्पन्न होते की त्या प्रवाहाला थांबवले जाऊ शकते. आत्म्यामध्ये असे बळ उद्‌भवित करण्यासाठी भावनेचे फार मोठे कृतित्व सिद्ध होते. जलसिंचनाने लहानसा अंकुर उत्तरोत्तर वाढता वाढता एका विशाल वृक्षाचे रूप धारण करता त्याचप्रमाणे भावनेने अनुप्रणित पुरुषार्थ एक नवीन ऊर्जा आणि शक्ती प्राप्त करविते. जेव्हा जीवनात संवराची आराधना साध्य होते तेव्हा असे समजले पाहिजे की साधकाचे मोठे काम झाले आहे. पण साधनेचा मार्ग फार विकट आहे, इतकीच साधना साध्य प्राप्तीसाठी पुरे नव्हे साध्य प्राप्तीसाठी अजून साधना आवश्यक आहे.

जसे पूर्वी सूचित केले गेले आहे- आत्म्याबरोबर कर्माचे बंधन केव्हा झाले ? त्याचे उत्तर कुणी देऊ शकत नाही, कारण ज्याचा आदीच नाही, त्याच्यासाठी कालावधी निश्चित केला जाऊ शकत नाही. म्हणूनच संवराद्वारा अभिनव कर्म अवरुद्ध झाले तरी आत्म्यात संश्लिष्ट कर्माचा सर्वथा क्षय होत नाही. ते अवशिष्ट कर्म आपले काम करतच राहातात. आपल्या शुभाशुभ प्रकृतीच्या अनुरूप उदित होऊन आत्म्याला स्वभावाने पृथक करत राहातात. कधी दुःखात्मक स्थितीद्वारा आत्म्याला संक्लिष्ट अथवा व्यथित करत राहातात आणि कधी भौतिक विषय वासनात्मक स्वर्गादिक सुखात विमोहित करतात. अंतरात्मभाव मूलक चिंतनात जेव्हा जीव संलग्न राहातो तेव्हा त्याच्या अंतःकरणात एक नवीन परिणाम उद्‌भवित होतो. तो विचार करतो की- ''मी माझ्या संचित कर्माला निर्जीर्ण करतो, म्हणजे माझ्या विशुद्ध, मळ रहित, उज्ज्वल चिन्मय भावाला अभिव्यक्ती मिळेल.'' निर्जरा भावनेत तेच तत्त्व आहे ज्याला ज्ञानी महापुरुषांनी ग्रंथकारांनी आपल्या आपल्या शब्दात विविध प्रकारे प्रकट केले आहे. कारण सत्यचे पुन्हा पुन्हा वर्णन व्हायला पाहिजे त्याची पुनरावृत्ती दोष नाही, गुण आहे. एक असत्य गोष्ट शंभर लोकांना सांगितली तर त्यातल्या अनेक लोकांना ती सत्य वाटू लागते तर मग सत्य आणि तथ्य ज्याच्यात आहे त्याचे तर सांगायचेच काय ? जर त्याचे पुन्हा पुन्हा आवर्तन केले गेले तर निश्चित त्याचा प्रभाव पडतो.

तपश्चरणाचा मुख्य हेतू निर्जरा आहे. ''तपस्य निर्जराच''[८९]व्या तत्त्वार्थसूत्रात

प्रतिपादित निर्जरेचा हा सूत्र ह्याचा सूचक आहे. तप त्यालाच म्हणतात जो तापवतो, परितप्त करतो. जो आत्म्याला परितत्प करतो तो कर्मबंधनाने उद्वेलित होतो. असे उद्वेलन कल्याणकारी अथवा श्रेयस्कर कसे होऊ शकते हा प्रश्न आहे. ह्या प्रश्नाला घेऊन सुप्रसिद्ध दार्शनिक आणि नैयायिक धर्मकीर्तीनी जैनांद्वारा स्वीकृत तपसाधनेवर कठोर शब्दात आघात केला आहे. त्यांचा एक श्लोक फार प्रसिद्ध आहे. ज्यास सुप्रसिद्ध लेखक राहुल सांकृत्यायन यांनी आपल्या ''दर्शन दिग्दर्शन'' पुस्तकात उद्धृत केला आहे.

वेद प्रामाण्यं कस्यापित् कर्तृत्वादः स्नाने धर्मेच्छा जातिवादावलेपः ।
सन्तापारंभः पापहानाय चेति, ध्वस्त प्रज्ञाणां पंच चिह्नानि जाड्ये ॥

१) वेदच प्रमाण आहेत. २) या जगाचा कोणी कर्ता नाही. ३) स्नानादी बाह्य शुद्धीने धर्म होतो. ४) जन्माश्रित जातिवाद तथ्य आहे. ५) जे गर्वपूर्वक असे मानतात की, पाप मिटविण्यासाठी तन्हेतन्हेचे तपाचरणाने संताप सहन करावेत-त्यांची बुद्धी ध्वस्त झालेली आहे. त्यांच्या जडतेचे ही पाच चिन्हे आहेत. अर्थात या पाच गोष्टी मानणारे अत्यंत जड आणि मूर्ख आहेत.

वरील पाच गोष्टींपैकी चार गोष्टी वैदिक धर्माला लागू होतात. पाचवी गोष्ट धर्मकीर्तीनी जैन धर्माला उद्देश्यून म्हटली आहे. त्याचे विश्लेषण करणे इथे आवश्यक आहे.

या संदर्भात नाथपरंपरेतील सुप्रसिद्ध योगी भर्तृहरी जे अगोदर उज्जैनचे सम्राट होते, त्यांचा श्लोक मननीय आहे.

भोगान् भुक्ता वयमेव भुक्ता, तपो न तप्ता वयमेव तपताः ।
कालो न यातो वयमेव याताः तृष्णा न जीर्णा वयमेव जीर्णा ॥

अर्थात- आपण भोगांना भोगत नाही तर भोगांनी आपल्याला भोगले आहे. आपण तप नाही तपलो, तपाने आपल्याला तापविले. वेळ (काळ) नाही व्यतीत झाला. आपणच व्यतीत होत आहोत.

तृष्णा जीर्ण, वृद्ध, जुनी नाही झाली. आपण जीर्ण शीर्ण झालोत. धर्मकीर्तीनी तपाला संताप म्हटले आहे. इथे आता त्याची चर्चा योग्य होणार नाही. जैन दर्शनात तपाचे शुद्ध मार्मिक विश्लेषण आहे. कदाचित त्याकडे त्यांचे लक्ष गेले नसेल. तेव्हा साधकास भेदज्ञानाचे विशेष ज्ञान प्राप्त होते. आत्मा भिन्न आणि शरीर भिन्न आहे. शरीराला होणारे कष्ट किंवा यातना ह्या आत्म्याला होत नाहीत. हे वरून शब्दाने बोलण्याने नव्हे तर आंतरिक दृष्टीने तसे वाटले पाहिजे. तेव्हाच त्याचे आत्मपरिणाम इतके उच्च

होतात की, त्याला मग दैहिक कष्ट दुःख किंवा पीडा ज्याला धर्मकीर्तींनी संताप म्हटले आहे. संताप होत नाही. तो त्यास कर्म निर्जराचे हेतू मानून आपल्या स्वतःत आध्यात्मिक आनंदात मग्न होऊन जातो. जर एखाद्या तपस्वीला तप केल्याने कष्टाची अनुभूती होत असेल, दुःखी, उद्विग्न होत असेल तर त्या तपाला तप म्हणता येणार नाही. ते फक्त कायाक्लेश मात्र आहे. कायाक्लेशचा तपात समावेश करता येणार नाही. खरा तपस्वी आत्म्याला क्लेश होतात असे मुळी मानतच नाही. कारण तो आत्मा आणि देह यात पूर्णपणे भेद मानतो. आत्मा म्हणजे शरीर नव्हे. व्रत, नियम, तप इत्यादीने शारीरिक पीडा झाली तरी तो त्यात प्रसन्नतेचा अनुभव करतो.

एक प्रश्न असाही आहे की व्रत नियम या सर्व गोष्टींना अनावश्यक मानले तर मग साधू-साध्वी, श्रावक, श्राविका हा चतुर्विध संघ याच्या अस्तित्वाचे काय ? कारण संघाचे चारही स्तंभ व्रत, आचार-संहिता व नियमोपनियम यावर आधारित आहेत.

व्रत, नियमोपनियम यांना शुभबंध रूपात मानतात. परंतु शुभ भाव असल्याशिवाय जीव शुद्ध दशेत पोहोचू शकत नाही. पुण्य एक अशी स्थिती आहे त्यामुळे मनुष्य पाप प्रवृत्तीकडे झुकतो. आणि धर्मप्रवृत्तीमध्ये सुद्धा जाऊ शकतो. पुण्य तत्त्वाला नीटपणे न समजल्यामुळे मनुष्याच्या मनात द्वंद्व निर्माण होतो. परंतु लौकिक दृष्टीने काही सीमेपर्यंत पुण्य उपादेय आहे.

पापामुळे जीव नरक व तिर्यंच गतीमध्ये जातो. पुण्यामुळे जीव देवगतीत जातो. पुण्य व पापाच्या समानतेमुळे मनुष्य जन्म मिळतो. जेव्हा पाप पुण्य दोहोंचा क्षय होऊन जातो तेव्हाच मोक्ष प्राप्त होतो.

'पुण्य' शब्दाची व्युत्पत्ती 'पुनातीति पुण्यम्' ज्यामुळे आत्म्यात उपशमभाव प्रकट होतो आणि जो आत्मशुद्धीत सहायक आहे त्यास पुण्य म्हणतात.

जे लोक पुण्याला विष्ठेसमान त्याज्य म्हणतात त्यांनी समजावे की पुण्य इतके तुच्छ नाही. जेव्हा लोक पुण्याची उपेक्षा करू लागतात तेव्हा शुद्धोपयोगात रहात नाहीत आणि शुभोपयोगाची वृत्तीसुद्धा रहात नाही. अशा स्थितीत केवळ वाणी आणि चर्चा करण्यातच शुद्धउपयोगाच्या गोष्टी करतात. परंतु व्यवहारात मात्र जास्तीत जास्त वेळ अशुभ कार्यात व्यतीत करतात. आजच्या आत्मवादी लोकांचे जीवन अशाच प्रकारचे आहे जे पुण्याला सर्वथा हेय व विष्ठासमान समजतात. परंतु पूर्वजन्माच्या पुण्योदयामुळे जे वैभव त्यांना प्राप्त होते, त्याचा अगदी पूर्ण उपभोग घेतात. याचा अर्थ असा झाला

की, पुण्याचे फळ तर पाहिजे त्याचा उपयोगही करायचा. प्रश्न असा पडतो की पुण्य तर भोगायचे आणि त्यापासून विरक्तही रहायचे हे कसे ?

स्वानुभूतीचे गाणं गायल्याने काही स्वानुभूती होऊ शकत नाही. स्वानुभूती तर आत्म्याची निराकुल कषायविहीन व चारित्र गुणाची शुद्ध अवस्था असली तर होते.

धर्मात रममाण झालेला आत्मा जर शुद्धोपयोग युक्त असेल तर मोक्ष प्राप्त करतो म्हणून दया, दान, पुण्य व्रत, इत्यादि आचरणाचे ही महत्त्वपूर्ण स्थान आहे.

अनेकांना दृष्टीने व्रत इ. संबंधी चिंतन करताना सर्वात प्रथम साधकाच्या भूमिकेचे विचार करायला हवी. संसारात सर्व लोक एक सारखे नसतात. धार्मिकलोक किंवा साधकवृन्द सुद्धा आत्म-शक्ती, पुरुषार्थ, पराक्रम इत्यादी दृष्टीने भिन्न-भिन्न असतात. आ. कुन्दकुन्द इत्यादींनी साधकांना उद्देशून नैश्चयिक दृष्टीने जे विवेचन केले आहे ते यथार्थ आहे, सर्वमान्य आहे, अशा भूमिकेत पोहोचलेले साधकांसाठी हेच करणीय आहे. आ. कुन्दकुन्द म्हणतात, ही शुद्धोपयोममय भूमिका दुष्प्राप्य तर नाही. परंतु दुर्लभ अवश्य आहे. त्यासाठी साधकाला अतिशय आंतरिक युद्ध करावे लागते. तेव्हा कुठे तो मोहादी विभावांना जिंकून आत्मस्थितीमध्ये शुद्धोपयोगात स्थित होऊ शकतो. मोहराजपराजय व उपमितिभव प्रपंच कथासारखे अनेक ग्रंथ लिहून जैनाचार्यांनी आंतरिक संग्रामाचे वर्णन केले आहे. आगमामध्ये सुद्धा असे महत्त्वपूर्ण सूत्र प्राप्त होतात, ज्याचा पूर्वी उल्लेख केला गेला आहे. जो स्वतः आपल्याला जिंकतो तोच खरे सुख प्राप्त करू शकतो.

साधकाच्या भूमिकेनुसार साधनेचे उपक्रम गतिशील होतात. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर ते साधकाच्या योग्यतेवर आधारित असतात. म्हणून अनेकांत दृष्टिकोनातून व्रत, नियम, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान, आलोचना, प्रायश्चित इत्यादी आवश्यक आहे.

या क्रियामुळे शुभोपयोगाकडून शुद्धोपयोगाकडे गती करण्यात आधार मिळतो. कारण की, या क्रियेमुळे शुभयोगाची प्रवृत्ती होते. उदा. एखादी व्यक्ती श्रमण दीक्षा अंगीकार करू इच्छिते याचा जरा खोलवर विचार करा-श्रमण दीक्षेचे बाह्यरूप मुण्डन, केस लोचन, लिंग धारण वेष परिवर्तन इ. आहे. एक दीक्षार्थी ज्या भावनेने ते धारण करण्यास उद्युत होतो, ती भावना मुमुक्षूशी (मोक्षार्थीशी) जुडलेली आहे. आत्म्यात कर्मबंधापासून मुक्त होऊन आध्यात्मिक परमानंद प्राप्त करण्याची तीव्र भावना आहे. म्हणूनच तो दीक्षा घेण्यास तत्पर होतो. जरी बाह्यरूपाने श्रमण लिंगादी धारण करतो.

परंतु या व्यवहाराच्या मुळाशी परमसत्य-मोक्ष हेच खरे कारण आहे. बाह्य वेश वगैरे अनावश्यक नाहीत. कारण तो प्रशस्त पथ आहे. जो आपल्या ध्येयाप्रत पोहोचवतो. प्रत्यक्षपणे हे व्यावहारिक असेल तरी सफल विधिक्रम आहे.

आचार्य पूज्यपाद समाधी शतकामध्ये आत्मभावना संबंधी लिहितात-

अव्रतानि परित्यज्य व्रतेषु परिनिष्ठितः ।
त्यजेन्तान्यपि सम्प्राप्य परमंपदमात्मनः ॥८४॥

अव्रतांचा परित्याग करून व्रतामध्ये परिनिष्ठ होऊन साधक आत्म्याच्या परमपदाला प्राप्त करण्यासाठी शुद्ध स्वरूपाची अनुभूती प्राप्त करून, शुद्धोपयोगात स्थिर होऊन मग व्यावहारिक व्रतांचा त्याग करू शकतो.

आचार्य पूज्यपादांनी इथे अव्रत-व्रत तथा आत्माचे परमपद या शुद्धस्वरूप या तीन मुद्दयांची व्याख्या केली आहे. त्यांनी प्रथम अव्रतांना सोडण्याचे विधान केले आहे. म्हणजेच साधकाचे व्रतरहित जीवन नसावे. व्रतांचे पालन करायलाच हवे. साधनामार्गावर पुढे-पुढे जाऊन त्या साधनेत इतक्या उच्चस्थानी जावे की स्वयमेव त्याला आत्मस्वरूपाची अनुभूती व्हावी. त्याला शुद्धोपयोगावस्थाचा साक्षात्कार व्हावा. तेव्हा कुठे व्यावहारिक दृष्टीने व्रत गौण होऊन जातात. कारण त्याचे समग्र जीवनच व्रतमय होऊन जाते. व्रतांचे प्रयत्नपूर्वक पालन करावे लागत होते ते आता त्याचे स्वाभाविकपणे पालन होते. किंचित मात्र सुद्धा अव्रत रहातच नाहीत. मूलतः व्रतांचा अर्थच हा आहे की स्वभावात राहणे. परंतु अव्रत परभावावस्था आहे. म्हणून शुद्धोपयोगात्मक स्थितीत व्रत नसतात असे म्हणू शकत नाही. व्रताद्वारे ज्यांच्या त्याग केला जातो ते परित्यक्त भाव स्वभावतः त्यापासून दूर होऊन जातात. म्हणून व्रतांना सोडण्यासंबंधी जे सांगितले जाते ते सुद्धा व्यावहारिक आहे. निश्चयात पोहोचल्यावर व्यवहार तर आपोआप सुटतो, सोडावा लागत नाही. मग तेथे व्रत घेणे, पाळणे, सोडणे हे विकल्प असूच शकत नाहीत. त्या अवस्थेत व्रतामुळे लाभान्वित आत्मा आत्मिक उज्ज्वलता आणि शुद्धता सदा सर्वदा साठी झालेली असते.

अव्रती व्रतमादाय व्रती ज्ञानपरायणः ।
परातज्ञानसम्पनः स्वमेव परो भवेत् ॥८६॥

व्रतरहित व्यक्ती अर्थात ती व्यक्ती जिने लौकिक दृष्टीने व्रत नाही घेतले. सावध अव्रताचे प्रत्याख्यान केले नाही. त्याने व्रत स्वीकारावे. पुनश्च ज्ञानाची आराधना करावी, जेव्हा त्याला आत्म्याचे परमज्ञान होते तेव्हा तो परमात्म अवस्था प्राप्त करतो. या

श्लोकातही आचार्य त्याच तत्त्वाचे आख्यान करतात. अव्रत, व्रत आणि ज्ञान-तीन मुद्दयांना घेतले आहे. मानसिक, वांचिक, व कायिक दृष्टीने सावद्य कर्मांचे अप्रत्याख्यान या अपरित्याग अव्रत आहे. अव्रतीचे जीवन धार्मिक कार्यापासून नेहमी दूर राहते. म्हणून नंतर धार्मिक उन्नतीच्या मार्गातील प्रथम चरण आहे. व्रताचा स्वीकार करणे जे अत्यंत आवश्यक आहे. याच गोष्टीबद्दल आचार्य पूज्यपाद व्रतांना ग्रहण करण्यासंबंधी या श्लोकात प्रथम चरणात विधान करतात. जेव्हा माणूस व्रतांचा स्वीकार करतो तेव्हापासून लगेच त्याच्या पापयुक्त प्रवृत्तींना आळा बसायला लागतो. तो मन, वचन, शरीराचे संवर साधू लागतो. शास्त्रीय भाषेत हेच व्रतीचे स्वरूप आहे. व्रत घेतल्यानंतर साधकाची आध्यात्मिक यात्रा सुव्यवस्थितपणे सुरू होते. मोक्ष प्राप्त करण्याचा अगदी योग्य मार्ग त्याच्यासाठी प्रशस्त होतो. आणि तो आत्मज्ञानाच्या दिशेने अधिकाधिक प्रगतीशील व प्रयत्नशील बनतो. बहिरात्म भावनेकडून अंतरात्म भावनेकडे आणि अंतरात्म भावनेकडून परमात्म भावनेला संस्पर्श करतो. तो परमात्म ज्ञान संपन्न होतो. स्वतः परमात्मस्वरूप बनतो. आचार्य पूज्यपाद सुंदर वर्णन करतात. यात व्यावहारिक नैश्चयिक दोन्ही भूमिकांचे समाधान होते. व्यवहार नयानुसार व्रत, प्रतिज्ञा स्वीकार करण्याची, प्रतिलेखन प्रतिक्रमण प्रायश्चित, आलोचना, प्रत्यालोचना इ. क्रिया करण्याची सार्थकता सिद्ध होते. जेव्हा ज्ञानशुद्ध भूमिकेत प्रविष्ट होते तेव्हा अगोदर सांगितल्याप्रमाणे सर्व क्रिया भावनेत बदलतात. जीवनाच्या सहजतेत समाविष्ट होतात.

व्यवहार आणि निश्चयाची कसोटी

निश्चय आणि व्यवहाराच्या मर्माला समजणे सोपे नाही. या दोहोंच्या दार्शनिक गाभ्यापर्यंत पोहोचल्याशिवाय त्याचे रहस्य समजणार नाही. साधकाच्या जीवनाचे हे दोन पक्ष आहेत. या दोन्हींची आपली विशेषता आहे. उपादेयता आहे. परंतु जी व्यक्ती या गाभ्यापर्यंत जात नाहीत ती व्यवहार आणि निश्चयातील मर्म जाणू शकत नाही. ते सरळ शुद्धोपयोग अथवा शुद्धात्म भाव यांची चर्चा करू लागतात. चर्चाच फक्त करीत नाहीत तर ते जीवनातही तसेच आचरण करू लागतात. त्यांचे असे म्हणणे आहे की शुद्धात्म तत्त्वाच्या परिणमनातच धर्माची आराधना आहे. बाह्य सर्वक्रिया म्हणजे केवळ विधि-विधान इ. व्यावहारिक आहे. या क्रिया व विधिक्रमानुकरणाने आत्म्याचे कल्याण होणार नाही. हे तर केवळ कर्मकांड आहेत. या कर्मकांडात तथाकथित धार्मिक लोक गुरफटले आहेत. आत्माच्या संबंधी अधिकांश ते विचारच करीत नाहीत. बाह्य क्रियात त्याग,

प्रत्याख्यानात, उपवास इ. तप करण्यात लागलेले असतात. आत्मज्ञानाशिवाय, शुद्धात्मभाव याचा साक्षात्कार झाल्याशिवाय यांच्या मोक्ष आराधनेला काय महत्त्व आहे ? हे तर सर्व शुभोपयोग मूलक कर्म व्यापार आहेत. ज्याच्यामुळे फार तर स्वर्ग मिळेल. या पलीकडे काही नाही. स्वर्ग प्राप्ती हे काय जीवनाचे ध्येय आहे ? लौकिक ऋद्धी, समृद्धी, वैभव, संपत्ती आणि सुख एवढेच पुरे आहे ? अशाप्रकारची चर्चा करीत असतात.

काही लोकांची अशी मान्यता आहे की, तत्त्वचर्चा केल्याने ज्ञान उत्पन्न होते. आणि जर अशाने आत्मज्ञान होते तर मग बाह्य क्रिया करण्याची काय आवश्यकता आहे? चिंतन करणारे असा विचार करीत नाहीत की ते जे बोलत आहेत ती भूमिका केव्हाची आहे ? साधनेचा एक वैज्ञानिक क्रम आहे. प्रथम जीवनातून अशुभाचे निष्कासन करायला हवे. जीवनात शुद्ध भाव अनायास कसा निर्माण होईल ? जोपर्यंत गृहस्थावस्थेत आहोत तोपर्यंत जीवनात शुभाशुभात्मक योग प्रवृत्त होतच असतात. म्हणून गृहस्थावस्थेतील साधकाला सर्वात प्रथम आपल्या जीवनातील अशुभयोगात्मक प्रवृत्तींना दूर करण्याची साधना करायला हवी. त्याचे जीवन सर्वथा निष्पाप, निर्मल, निर्बध्य आणि निर्दोष व्हायला पाहिजे. जीवनाचा असा परिष्कार संस्कार त्याला सद्प्रवृत्तींशी जोडेल. सत्प्रवृत्तींमध्ये सुद्धा तो आसक्त होणार नाही. पुढे प्रगती करता-करता तो इतका अनासक्त होऊन जाईल की ''व्यवहार, व्यवहारासाठीच आहे. माझ्या आत्म्यासाठी नाही.'' अशा परिणामाची धारा इतकी उच्च कोटीपर्यंत पोहोचेल तेव्हा परमावस्था प्राप्त होईल. मग गृहस्थावस्थेतही उत्कृष्ट साधना मार्गावर आरूढ होईल. ही इतकी परमकोटीची अवस्था जेव्हा जीवनात प्राप्त होते ते मुखता तेव्हा स्वभावोन्मुखता व्याप्त होते, स्वभाव व विभावाचे भेदज्ञान प्राप्त होते मग असा विचार, चिंतन, मनन करण्याचा तथा बोलण्याचा त्यास अधिकार आहे.

वरील रूपात तत्त्वचर्चाशील पुरुषाने थोडे आत्मावलोकन करावे की, काय त्यांनी अशाप्रकारच्या उच्चकोटीच्या भूमिकेला स्पर्श केला आहे ? त्यांनी घर परिवार, लौकिकदृष्टा याचा त्याग केला आहे ? जेव्हा या सर्व गोष्टी आत्मसात केल्या जातात, त्या आकांक्षाचा त्याग केला जातो तेव्हा जीवनाला वेगळेच वळण लागते. जीवनधाराच बदलून जाते. मग आनंदघनजी, देवचंद्रजी सारख्या अध्यात्मयोगीसारखी अवस्था प्राप्त होते. त्यांच्याप्रमाणे सहज भावापन्न, शुद्धभावात स्थित महापुरुष असे बोलू शकतात. आणि ते जे बोलले आहेत ते आपल्या सर्वांसाठी प्रेरणा देणारे आहे. परंतु फक्त उच्चकोटीच्या आत्मज्ञानाची चर्चा केल्याने आणि व्यावहारिक जीवनात विरक्त अवस्था नसेल तर त्या फक्त बोलण्याने

काय मोक्ष मिळणार आहे ? हे तर असे झाले की ''बोलाचीची कढी आणि बोलाचाच भात.'' विचारात आणि आचरणात साम्य असेल तरच तो आध्यात्मिक म्हणावा. म्हणून असं म्हणणंही बरोबर नाही की, त्यांनी प्रत्याख्यान प्रतिक्रमण आणि संयमाला आपल्या स्वभावात उतरवले आहे म्हणून बाह्य काहीच आवश्यकता नाही.

जर त्यांनी जीवनात ते सिद्ध करून घेतले असते तर आता वर्तमानात जसे जगत आहेत तसे कधीच जगले नसते. त्यांच्या वागण्यात निश्चितच बदल दिसला असता. आत्मिकजागृतीचा प्रभाव कधीच लपून रहात नाही.

हे कटुसत्य आहे की, आंतरिक दुर्बलता असल्यामुळे असे बोलले गेले आहे. जर तत्त्वज्ञानाच्या गप्पा मारून, चिंतन करून जीवनाचे ध्येय साध्य होते तर व्रत वगैरे कशाला करायचे ? सांसारिक जीवनपण जगावे. संसाराचा, उपभोग घ्यावा, खान-पान, रहन-सहन इ. मध्ये व्रत, नियमांचे बंधन ही नको. धर्म साधला जावा आणि आत्मआराधना पण गतिशील ठेवावी. आध्यात्मिक जीवन जगण्याचा हा स्वच्छंद विचार झाला. विचारमात्र केल्याने फक्त चिंतनात रममाण झाल्याने सिद्धी प्राप्त होत नसते. त्यासाठी चारित्र म्हणजे आचरणही शुद्ध असायलाच हवे. ते होते व्रत नियमाने. याचा खोलवर विचार करण्याची आवश्यकता आहे. फक्त तत्त्वचर्चा मूलक धर्माराधनाचा प्रसार केल्याने त्याचा विपरीत परिणाम येऊ शकतो. जैनसमाजाची संस्कारशीलता, खान-पान, रहन-सहन, व्यापार-व्यवसाय, यात्रा-प्रवास इ. विविध कार्यांशी संबंधित व्रतमूलक अनुशासन बद्धता, नियमानुवर्तिता, कुव्यसन परित्याग इ.चा क्रमशः लोप होऊन जाईल. त्याचा परिणाम असा येईल की, हजारो वर्षांपासून महानज्ञानी, संत, चिंतक साधक यांच्याद्वारे परिपोषित, संवर्धित संस्कृती एक दिवस नष्ट होऊन जाईल. मात्र तत्त्वचर्चा मूलक धार्मिक उपक्रम एक प्रतिबंधरहित, अनुशासनवर्जित, जीवनसारिणीचा विस्तार करण्यात बल मिळेल. वास्तविक निश्चय, शुद्धनय वा शुद्धोपयोगाच्या दृष्टीने चिंतन करणारे वीतराग देव द्वारा प्ररूपित-उप्पन्नेइ वा विगमेंइ वा धुवेइ वा[९०] या त्रिपदीच्या पृष्ठभूमीवर आधारित अनेकांतिक दृष्टीने गहन चिंतन करावे, मनन करावे, जगाच्या वास्तविक स्वरूपाचे आकलन करावे, आपल्या व्यक्तित्व वा कृतित्वाचे परिक्षण करावे तथा समन्वयाचा मार्ग स्वीकारावा. जोपर्यंत ते शुद्धोपयोगाच्या अतिउच्च भूमिकाला अधिकृतपणे प्राप्त करीत नाही तोपर्यंत व्रत, नियम इ.चा आदर करायला पाहिजे. आचरण करायला पाहिजे. त्याची अनुभूती करायला पाहिजे. अनुभूतीने सत्यतत्त्वाचा साक्षात्कार होतो.

''अनुभूती ज्ञानविभूति'' असे महापुरुषांचे वक्तव्यांनी हेच प्रतिफलित होते. फक्त प्रलंबित चर्चा करण्याने नाही.

'वादे वादे जायते तत्त्वबोधः' वाद, चर्चा, वार्ता, विचार-विमर्श इ.ने तत्त्वबोध होतो. विद्वज्जगतात हे सूत्र फार प्रसिद्ध आहे. हे खरे आहे की विचार-विमर्शाने तत्त्वबोध होतो. परंतु तत्त्वबोधाचा पुढचा क्रम आहे. जीवनात त्या तत्त्वांना क्रियान्वित करणे. अर्थात त्याप्रमाणे सुसंस्कारमय जीवन असायला हवे. तदनुरूप क्रियाशीलतामध्ये संलग्न रहायला हवे तेव्हाच ते तत्त्वज्ञान आध्यात्मिक रसानुभूती देऊ शकेल. हाच अनुभवरस आहे. आध्यात्मिक आनंद आहे. परंतु ते साधनेच्या पथावर चालण्यानेच प्राप्त होऊ शकतो. आध्यात्मिक ज्ञानात तर किती पुरुषार्थ करायला हवा. जप, तप, ध्यान, संयम, व्रत, नियम, प्रत्याख्यान इ.चे महत्त्व समजून आकलन करायला पाहिजे.

ज्या महान आचार्य आणि ज्ञानी लोकांनी या संबंधी जे प्रबोधन केले. साधनेचे वेगवेगळे मार्गदर्शविले. त्याचा सांगोपांग सम्यक् अध्ययन न करता केवळ चर्चाच करीत राहिलो तर काय त्यांच्या ऋणातून मुक्त होऊ शकू ? आपल्याला त्याचे अध्ययन करायला पाहिजे. मनन, चिंतन करायला पाहिजे.

आपल्या जीवनात विचार, अनुभवाचे महत्त्व अवश्य आहे. परंतु चिकालीन साधनेच्या परिणामस्वरूप महापुरुषांनी गहन-गंभीर सर्वग्राही चिंतनाद्वारा जे अनुभवअमृत संचय केले आहे, त्यांचा उपयोग होऊन आपले चिंतन वाढवून त्याप्रमाणे अनुसरण केले तर श्रेयस्कर होईल. एकांगी विचाराने आग्रहाची वृत्ती वाढीस लागते. आग्रह वाढला की सत्य बाधित होते. अनाग्रहाने जिज्ञासा बलवत्तर बनते. जिज्ञासामध्ये उत्तरोत्तर अनुसंधान आणि शोध यांना वाव असतो. सत्य तर आपल्या रूपात अवस्थित असतेच. त्याला स्वायत्त करण्याचा आपला विधिक्रम आहे. म्हणून शास्त्रांद्वारे निर्देशित मार्गाला महत्त्व द्यायला पाहिजे. त्याचे अनुकरण करायला पाहिजे. सत्याला जीवनात क्रियान्वित करणे म्हणजे चारित्राराधना आहे. क्रियान्वयाच्या विधिनिषेध ग्रहण-त्याग, आदान-प्रत्याख्यान इ.ची सर्वथा अपरिहार्यता आहे.

वरील विवेचनाचा निष्कर्ष असा आहे की साधकाने आपल्या साधनेची भूमिकेच्या अनुरूप धर्ममूलक आचार आणि क्रिया-प्रक्रिया इ. चा स्वीकार करणे आवश्यकच नाही तर अत्यावश्यक आहे. कारण की, परमलक्ष्य शुद्धात्म भावाची सिद्धी किंवा परमात्म भावाची प्राप्तीमध्ये यांची अनन्य उपयोगिता आहे.

शुद्धात्मभावनेला धारण करणारा स्वतः शुभाशुभ उपयोगाने मुक्त होतो. आत्म्याचे विशुद्ध रूप वर्णातीत, निराकार, निर्विकार, निरामय आहे. त्यात तल्लीन होतो. समत्व भावनेने जगाला पाहता पाहता स्वतःच्याच शुद्धात्म स्वरूपात लीन हा आत्मा शुद्ध होतो, आणि जेव्हा शुद्ध होतो तेव्हा साधक जीवनमुक्त दशेला प्राप्त होतो. शुभाशुभ भाव रहात नाही तेव्हा जीवात्मा सिद्धात्म्याच्या सुखाचा इथेच वर्तमानात चांगल्याप्रकारे अनुभव घेतो.

अशुद्ध भावनेने संसार आणि शुद्धभावनेने मुक्ती आहे. ह्याच्यावरून हे स्पष्ट होते की आत्म्याद्वाराचा आत्म्याचा उद्धार होतो.

जो आत्मभावनेत तल्लीन असतो त्याला निंदेत शोक होत नाही आणि स्तुतीत गर्व येत नाही. नावारूपात मोह होत नाही. त्याला सर्वत्र समाधीच असते.

शुद्धआत्मभावना कोटी कोटी तप, यज्ञ, तीर्थयात्रा इत्यादी क्रियेपेक्षा पण श्रेष्ठ आहे. शुद्धभावनेवाला प्रत्येक धर्मकार्य भावसहित करतो आणि दया, दान इत्यादीने पण कर्माची निर्जरा करतो.

म्हणून अशुभ भावनेला समजून शुभ भावनेच्या मार्गाने शुद्धात्म भावनेचे चिंतन मनन केले तर आत्मा शुद्ध होतो आणि सिद्ध गतीला प्राप्त करतो. मनुष्याचे जे अंतिम ध्येय मोक्ष आहे त्या ध्येयाला प्राप्त होतो.

संदर्भ

१. जैन सिद्धान्त थोक संग्रह भा. २ जोधपूर पृ. ३१६

२. जिनवाणी श्री कन्हैयालाल लोढा ले. जैन साधना एक मनोवैज्ञानिक विश्लेषण पृ. १०२

३. अप्पा कत्ता विकत्ता य दुहाण य सुहाणय अप्पा मित्तममित्तंच दुप्पट्ठिय सुपट्ठिओ ॥३७॥ उत्तराध्ययन सू. २०/३७ पृ. ३४२

४. इमेण चेव जुज्झाहि, किं ते जुज्झेण बज्झतो आचारांग सूत्र श्रु ५ अ. १५९ सू. पृ. १६३

५. जो सहस्से सहस्साणं, संगामे दुज्जए जिए।
एगं जिणेज्ज अप्पाणं एस सेपरमो जओ ॥३४॥ उत्तराध्ययन सू. ९/३४ पृ. १४८

६. जे एगं जाणति ते सव्वं जाणति।
जे सव्वं जाणति से एगं जाणति - आचारांग सू श्रृ. १. अ. ४. उ. ३ /२९ सू. पृ. ११२

७. सोही उज्जुयभूयस्स, धम्मो सुद्धस्स चिट्ठई।
निव्वांणं परमं जाइ, घयसित्ते व्व पावए ॥२॥ उत्तराध्ययन सूत्र ३/१२ पृ. ६७

८. आचारांग निर्युक्ति गा. १६३

९. कसेहि अप्पाणं जरेहि अप्पाणं - आचारांग सूत्र श्रु. १, अ, ४, उ. ३ सू. १४१ पृ. १३२

१०. पंचिन्द्रियाणि कोहं, माणं मायं तहेव लोहंच।
दुज्जयं चेव अप्पाणं, सव्वं अप्पे जिए जियं ॥३६॥ उत्तराध्ययन सू ९/३६ पृ. १४८

११. अप्पा अप्पम्मि रओ सम्माइट्ठी हवेर फुडु जीवो
जाणइ तं सण्णाणं चरदिह चारित्तमग्गुत्ति ॥३१॥ अष्टपाहुड भाव पाहुड गा. ३१ पृ. ७८

१२. जेण तत्त्वं विबुज्झेज्ज जेण चित्तं णिरुज्झदि।

जेण अत्ता विसुज्झेज्जतं णाणं जिणसासणे ॥२६८॥ मूलाचार पूर्वार्ध ५/२६७. पृ. २२२

१३. अष्ट प्राभृत-भाव प्राभृत गा. ७६, पृ. १००

भावं तिविहपयारं सुहासुहं सुद्धमेव णायव्वं ॥

१४. अहमेक्को खलु सुद्धो दंसणणाणमइओ सदारुवी ।

ण वि अत्थि मज्झ किंचि वि अण्ण परमाणुमेत्तं पि ॥३८॥ समयसार गा. ३८ पृ. ८१

१५. एदे सव्वे भावा पोग्गलदव्व परिणामणिप्पण्णा ।

केवलिजिणेहिं भणिया कह ते जीवोत्ति वुच्चंति ॥४४॥

१६. जीवस्स णात्थि वण्णो ण वि गंधो ण विरसो ण वि य फासो ।

समयसार गा. ४४, पृ. ९१

ण वि रुवं ण सरीरं ण वि संठाणं ण संहणण ॥५०॥ समयसार गा. ५० पृ. १०३

१७. जीवस्स णत्थि रागो ण वि दोसो णेव विज्जदे मोहो ।

णो पच्चयाण कम्मं चावि से णत्थि ॥५१॥ समयसार गा. ज. पृ. १०३

१८. अहमेक्को खलु सुद्धो णिम्ममओ णाणदंसणसमग्गो ।

तम्हि ठिदो तचित्तो सव्वे एदे खयं णेमि ॥७३॥ समयसार गा. ७३. पृ. १३७

१९. जीवो परिणमदि जदा सुहेण असुहेण वा सुहो असुहो ।

सुद्धेण तदा हवादि हि, परिणाम सब्भावो ॥ प्रवचनसार १/९ पृ. १३

२०. प्रवचन सार गा. १८१, पृ. ३५५

२१. शरीरे वाचि चात्मानं सन्धत्ते वाक् शरीरयोः ।

भ्रान्तोऽभ्रान्तः पुनस्तत्वं पृथगेषां विषुध्यते ॥

समाधिशतक गा. ५४, पुस्तक आत्मभावना पृ. २१४

२२. शृण्वन्नप्यन्यतः कामं वदन्नपि कलेवरात् ।

नात्मानं भावयेद्भिन्नं यावत्तावन्न मोक्षभाक् ॥

तथैव भावयेद्देहाद् व्यावृप्तात्मानमात्मनि ।

यथा न पुरात्मानं देहेस्वप्नेऽपियोजयेत् ॥

- समाधि शतक गा. ८१-८२. पुस्तक आत्मभावना पृ. ३००-३०२

२३. जीवादी सद्दहणं सम्मत्तं तेसिमाधिगमो णाणं ।
रागादीपरिहरणं चरणं एसो दु मोक्खपहो ॥
मोत्तूण णिच्छयटठं, ववहारेण विदुसा पवट्टंति ।
परमट्ठमस्सिदाण दु जदीण कम्मक्खओ विहिओ
- समयसार पुण्यपाप अधिकार गा. १५५-१५६ पृ. २४९-२५०

२४. अप्पा अप्पमि रओ समाइट्ठी हवंइ फुडु जीवो ।
जाणइ तं सण्णाणं चरदिह चारित्तमग्गुत्ति ।३१॥ अष्टप्राभृत-भावप्रभृत गा. ३१ पृ. ७९

२५. सम्यग्दर्शनज्ञान चारित्राणिमोक्ष मार्गः - तत्त्वार्थ सूत्र अ. १ सूत्र १

२६. सुद्धं तु वियाणंतो सुद्ध चेवप्पयं लहदि जीवो ।
जाणंतो दु असुद्धं असुद्धमेवप्पयं लहदि ॥८६॥ पृ. २९
अप्पाणमप्पणा रुंधिअण दोपुण्णपावजोगेसु ।
दंसणणाणम्हि ठिदो इच्छाविरदो य अण्णम्हि ॥८७॥ पृ. २९४
जो सव्वसंगमुक्को झायादि अप्पाणमपाणो अप्पा ।
ण वि कम्मं णोकम्मं चेदाचिंतेदि एयत्त ॥८८॥ २९४

२७. समयसार - उपभोगमिंदियेहि दव्वाणमचेदणामिदराणंचे दणग्णमिरदाणं ।
जं कुणादि सम्मदिट्ठी तं सव्वं णिज्जरणिमित्त ॥९३॥ निर्जराअधिकार पृ. ३०३

२८. दव्वे उवभुंजते णियमा जा यदि सुहं व दुक्खं वा ।
तं सुहदुक्खमुदिण्णं वेददि अध णिज्जरं जादि ॥ समयसार निर्जरा अधिकार गा. १९४. पृ. ३०४

२९. परमाणुनित्तयं पि हु रागादीणं हु. विज्जदे जस्स ।
ण वि सो जाणादि अप्पाणयं तु सव्वागमधरो वि ॥२०१॥
अप्पाणमयाणंतो अणप्पयं चावि सो अयाणंतो ।
कह होदि सम्मदिट्ठी जीवाजीवे जयाणंतो ॥२०२॥ समयसार गा. २०१, २०२, पृ. ३१५

३०. भुंजंतस्स वि विविहे सच्चित्ताचित्तमिस्सिए दव्वे ।
संखस्स सेदभावो ण दि सवकदि किण्हगो कादुं ॥२२०॥

तह णाणिस्य वि विविहे सचित्ताचित्तामिस्सिए दव्व ।
भुंजंतस्स विणाणं ण सक्कमण्णाणदंणेदुं ॥२२१॥
जयइ स एव संखो सेदसहावं तयं पजहिदूण ।
गच्छेज्ज किण्हभावं तइया सुक्कत्तणं पजहे ॥२२२॥
तहणाणि विऽजइया णाणसहाणं तयं पजहिजूण ।
अण्णाणेण परिणदो तइया अण्णाणदं गच्छे ॥२२३॥ समयसार गा. २२० ते २२३ पृ. २४३

३१. आयायादि णाणंजीवादी दंसणंच विण्णेयं ।
छज्जीवणिकं च तहा मणदि चरित्तत्तु ववहारो ॥२७६॥
आदा खु मज्झ णाणं जादा मे दंसणं चरित्तंच ।
आदा पच्चक्खाणं आदा में संवरो जोगो ॥२७७॥ समयसार गा. २७६, २७७ पृ. ४०९

३२. जह फलिहमणी सुद्धो ण सयं परिणमदि रागमादीहिं ।
रंगिज्जदि अण्णेहिं दुसो रत्तादीहि दव्वेहिं ॥२७८॥
एवं णाणी सुद्धो ण सयं परिणमदि रागमादीहिं ।
सइज्जदि अण्णेहिं दु सो रागादीहिं दोसेहिं ॥२७९॥
ण य रागदोसमोहं कुव्वदि णाणी कसायभावं वा ।
सयमप्पणो ण सो तेण कारगो ते सिं भावाणं ॥२८०॥ समयसार गा. २७८-२८०, पृ. ४०९ से ४१२

३३. बंधाणं च सहावं वियाणिदु अप्पणो सहावंच ।
बंधेसु जो विरज्जदि सो कम्मविमोक्खणं कुणदि ॥२९३॥ समयसार गा. २९३, पृ. ४२८

३४. को णाम भणिज्ज बुहो णादुं सव्वे पराइए भावे ।
मज्झमिणं ति य वयणं जाणतो अप्पयं सुद्धं ॥३००॥ समयसार गा. ३००, पृ. ४४२

३५. जदा विमुंचार चेदा कम्मफलमणंतयं ।
तदा विमुत्तो हवादि जाणओ पासओ मुणी ॥३१५॥ समयसार गा. ३१५, पृ. ४६१

३६. एयं तु जाणिऊणं उवसमं णेव गच्छदे मूढो।
णिग्गटमण परस्स य सयं च बुद्धिं सिवमपत्तो ॥३८२॥
कम्मं जं पुव्वकयं सुहासुहमणेयवित्थरविसेसं।
तत्तो णियत्तदे अप्पयं तु जो सो पडिक्कमणं ॥३४३॥
कम्मं जं सुहमसुहं जम्हि य भावम्हि बज्झदि भविस्सं।
तत्तो णियत्तदे जो सो पच्चक्खाणं हवदि चेदा ॥३८४॥
जं सुहमसुहमुदिण्णं संपडि य अणेयवित्थरविसेसं।
तं दोसं जो चेददि सो खलु आलोयणं चेदा ॥३८५॥
णिच्चं पच्चक्खाणं कुव्वदि णिच्चं पडिक्कमदि जो य।
णिच्चं आलोचेयदि सो हु चरित्तं हवदि चेदा ॥३८६॥ समयसार गा. ३८२-३८६ पृ. ५२७, ५३३, ५३४

३७. ण वि एस मोक्खमग्गो पासंडीगिहिमयावि लिंगाणि।
दंसणणाणचरित्ताणि मोक्खमग्गं जिणा बेंति ॥४१०॥

३८. तम्हा जहित्तु लिंगे सागारणगारएहिं वा गहिदे।
दंसणणाणचरित्ते अप्पाणं जुंज मोक्खपहे ॥४११॥ समयसार गा. ४१०-११ पृ. ५८०, ५८१
२- संबंधो एदेसिं णायव्वो खीर- णीरणाएण।
एकत्तो मिलियाणां णिय-णियसऽभावजुत्ताणं ॥ तत्त्वसार गा. २३, पृ. ६५

३९. जहकुणइ को वि भेयं पाणिय-बुद्धाण तक्कजोएणं।
णाणी वि तहा भेयं करेइ वरझाणजोएणं ॥२४॥
झाणेण कुणइ मेयं जीवाण तह य कम्माणं।
घेत्तव्वो णिय अप्पा सिद्धसरुवो परो बंभो ॥२५॥
मलरहिओ णाणमजो णिवसइ सिद्धिए आरिसो सिद्धो।
तारिसओ देहत्थो परमो बभो मुणेयव्वो ॥२६॥
णोकम्म-कम्मरहिओ केवल णाणाइगुणसमिद्धो जो।
सो हं सिद्धो णिच्चो एक्को णिरालंबो ॥२७॥
सिद्धोंह सुद्धोहं अणंतणाणाइगुणसमिद्धो हं।

अणंतणाणाइसमिद्धोइ देहपमाणो णिच्चो असंखदेसो अमुत्तो य ॥२८॥ तत्वसार गा. २४ ते २८ पृ. ६५ ते ७२

४०. रोयंसडणं पडणं देहस्स य पिविक्खअणजरभरणं ।
जो अप्पाणं झायदि मुच्चइ पंचदेहेहिं ॥४९॥

४१. भुंजंतो कम्मफल भावं मोहेण कुणइ सुहमसुह ।
जइ तो पुण्णो वि बंधइ णाणावरणादि अट्ठविहं ॥५२॥ तत्त्वसार गा. ५२ पृ. १९५

४२. आनंद घनचौबीसी - श्रेयांसनाथ स्तवन पद ३-४ पृ. १४२

४३. आनंद घनचौबीसी - सुमतिनाथ प्रभू स्तवन - गा. २ ते ५, पृ. ६०

४४. आनंद घनचौबीसी - पद्मप्रभू स्तवन गा. ५,६ पृ. ७९, ८०

४५. एदम्हि रदो णिच्चं संतुट्ठो होहि णिच्चमेदम्हि ।
एदेण होहि तित्तो होहदि तुह उत्तमं सोक्खं ॥२०६॥ पृ. ३२५ समयसार ।

४६. त्रिधा शुद्धमनुष्ठानं सच्छास्त्र परतन्त्रता,
सम्यक्प्रत्यवृत्तिश्च तथा त्रेव प्रचक्षते ॥२१०॥
विषयात्मानु बन्धैस्तु त्रिधाशुद्धमुदाहृतम् ।
अनुष्ठानं प्रधानत्वं ज्ञेयमस्य यथोत्तरम् ॥२११॥
जैनयोग ग्रंथ चतुष्टय - योगबिंदु श्लोक २१०, २११ पृ. १३७

४७. तुस मासं घोसतो, भावविसुद्धो महाणभावो य ।
णामेण य सिवभूई केवलणाणी फुडं जाओ ॥

४८. भावेण होई णग्गो बाहिर लिंगेण किंच णग्गेण ।
अष्टप्राभृत भावप्राभृत गा. ५३, पृ. ८९
कम्मपयडीण णियरं णासइ भावेण दव्वेण ॥
अष्टाप्राभृत भावप्राभृत गा. ५४, पृ. ८९

४९. पाग्गत्तणं अकज्जं भावणरहियं जिणेहिं पण्णत्तं ।
इय णाऊण य णिच्चं भाविज्जहि अप्पयं धीर ॥५५॥
देहादिसंगरहिओ माणकसाएहिं सयलपरिचत्तो ।
अप्पा अप्पाम्मि रओ स भावलिंगी हवे साहू ॥५६॥

ममत्तिं परिवज्जामि णिम्ममतिमुवहिन्दो ।
आलंबणं च मे आदा अवसेसाइं वोसरे ॥५७॥
आदा खु मज्झ णाणे आदा मे दंसणे चरित्ते य ।
आदा पच्चक्खाणे आदा मे संवरे जोगे ॥५८॥
एगो मे सासओ अप्पा णाणदंसण लक्खणो ।
सेसा मे बाहिरा भावा सव्वे संजोगलक्खणा ॥५९॥
भावेह भावसुद्धं अप्पा सुविसुद्धणिममलं चेव ।
लहु चउगइ चइऊणं जइ इच्छासे सासयं सुक्खं ॥६०॥
जो जीवो भावंतो जीवसहावं सुभावसंजुत्तो ।
सो जरमरणविणासं कुडइ फुडं लहइ णिव्वाणं ॥६१॥
जीवो जिणपण्णत्तो णाणसहाओ य चेयणासहिओ ।
सो जीवो णायव्वो कम्मक्खयकारणाणिमित्ते ॥६२॥ भावप्राभृत गा. ५५ ते ६५ पृ. ९० ते ९४

५०. जेसिं जीवसहावो णत्थि अभावो य सव्वहा तत्था ।
ते होंति भिण्णदेहा सिद्धा वचिगोयरमतीदा ॥६३॥
अरसमरुवमंगधं अव्वतं चेयणागुणमसद्दं ।
जाणमलिंगग्गहणं जीवमणिदिद्दठसंठाणं ॥६४॥
भावहि पंचपयारं णाणं अण्णाणणासणं सिग्धम् ।
भावणभाविवियसहिओ दिवसिवसुहभायणो होइ ॥६५॥ भावप्राभृत गा. ६३ ते ६५ पृ. ९३ ते ९५

५१. खयरामरमणुकरंजलिमालाहिं च संभुया विउला ।
चक्कहररायलच्छी लब्भई बोही मुभावेणं ॥७५॥
भावं तिविहपयारं सुहासुहं सुद्धमेव णायत्वें ।
असुहंच अट्टरुद्दं सुह धम्मं जिणवरिदेहि ॥७६॥
सुद्धं सुद्ध सहावं अप्प अप्पमिं तं य णायव्वं
इदि जिणवरेहिं भणियं जं सेयं तं समायरह ॥७७॥ भावप्राभृत गा. ७५ ते ७७, पृ. १००

५२. भावहि अणुवेक्खाओ अदरे पणवीसभावणा भावि ।
भावरहिएण किं पुण बाहिरलिंगेण का यव्वं ॥९६॥ भावप्राभृत गा. ९६. पृ. ११६

५३. अइसोहणजोएणं सुद्धं हेमं हवइ जह तह य ।
कालाइलद्धीए अप्पा परमप्पओ हवदि ॥२४॥ मोक्ष प्राभृत गा. २४, पृ. १५४

५४. सव्वे कसाय मुत्तं गारवभयरायदोवामोहं ।
लो यववहारविरदो अप्पा झाएइ झाणत्थो ॥२७॥ अष्टप्राभृत गा. २७ पृ. १५५

५५. जेण रागो परे दव्वे संसारस्स हिं कारणं ।
तेणावि जोइणो णिच्चं कुज्जा अप्पे सभावणा ॥७१॥
भरहे दुस्समकाले धम्मज्झाणं हवेइ साहुस्स ।
तं अप्पसभावठिदे ण हु भण्णइ सो वि अभणाणी ॥७६॥ मोक्षप्राभृत गा. ७१-७६ पृ. १७५-७६

५६. अज्जवि तिरयणसुद्धा अप्पा साएवि लहइ इंदत्तं ।
लोयंतियदेवत्तं तत्थ चुआ णिव्वुदिं जंति ॥७७॥ मोक्षप्राभृत गा. ७७, पृ. १७७

५७. मोक्ष प्राभृत - णविएहिं जं णविज्जइ झाइज्जइ अणवरयं ।
भुव्वंतेहिं युणिज्जइ देहत्थं किं पि तं मुणह ॥१०३॥ पृ. १८६
अरुहा सिद्धायरिया उज्झाया साहु पंच परमेट्ठी ।
ते वि हु पिट्ठहि आदे तम्हा आदा हुमे सरणं ॥१०४॥ पृ. १८६
सम्मत्त सण्णाणं सच्चरितंहि सत्तवं चेव ।
चउरो चिट्ठहि आदे तम्हा आदा हुमे सरणं ॥१०५॥ पृ. १८६

५८. नाहं कस्यचिदस्मि कश्चन न मे भावः परो विद्यते ।
मुक्त्वात्मानमपास्तकर्मसमितिं ज्ञानेक्षणालं कृतिम् ॥
येस्येषा मतिरस्ति चेतासि सदा ज्ञातात्मतत्वस्थितेः ।
बंधस्तस्य न यंत्रितं त्रिभुवनं सांसारिकैर्बन्धनैः । तत्त्वभावना गा. ११, पृ. ३७

५९. चित्रोपायवितर्धितोपि न निजो देहापि यत्रात्मनो ।
भावाः पुत्रकलत्रमित्रतनया जामातृतातादयः ।
तत्र स्वं निजकर्मपूर्ववशगाः केषां भवन्ति स्फुट ।

विज्ञायेति मनीषिणा निजमतिः कार्या सदात्मास्थिता ॥११२॥ तत्त्वभावना गा. १२, पृ. ४०

६०. आत्मा ज्ञानी परममलं ज्ञानमासेव्यमानः ।
कायोऽज्ञानी वितरति पुनर्घोरमज्ञानमेव ॥
सर्वत्रेदं जगति विदितं दीयो विद्यमानं ।
कश्चित्यागी न हि खकुसुमं क्वापि कस्यापिदत्ते ॥४५॥ तत्त्वभावना गा. ४५, पृ. १२६-२७

६१. काम क्रोध विषाद मत्सरभदद्वेष प्रमादादिभिः
शुद्धध्यानविवृद्धिकारिमनसः स्थैर्यं यतः क्षिप्यते ॥
काठिन्यं परितापदानचतुरैर्हेयो हुताशैखि ॥
त्याज्याध्यानविधायिभिस्तत इमे कामोदयो दूरतः ॥५३॥ तत्त्वभावना गा. ५३. पृ. १४५

६२. मनोनुशासनम्-आचार्य तुलसी प्रकरण ३, सूत्र १, पृ. ३२

६३. व्यावृत्तदेन्द्रियगोचरोरूगहन लोलं चरिष्णु चिरं ।
दुर्वार हृदयोदरे स्थिरतरं कृत्वा मनोर्मकटम् ॥
ध्यानं ध्यायति मुक्तये भवततेर्निर्मुक्त भोगस्पृहो ।
नोपायेन बिना कृता हि विधय सिद्धिं लभंते ध्रुवम् ॥ तत्त्वभावना गा. ५४, पृ. १४७

६४. शूरोऽहं शुभधीरहं पटुरहं सर्वाधिकश्रीरहं ।
मान्योहं गुणवानहं विभुरहं पुंसामहं चाग्रणीः ॥
इत्यात्मन्नपहाय दुष्कृतकरी त्वं सर्वथा कल्पनाम ।
शाश्वद्ध्याय तदात्मतत्वममलं नैश्रेयसी श्रीर्यतः ॥ तत्त्वभावना गा. ६२, पृ. १६५

६५. कायैः कर्मविनिर्मितैबहुविधैः स्थुलाणुदीर्घादिभिः ।
नात्मा याति कदाचनापि विकृति संबध्यमानः स्फुटं ॥
रक्तारक्तसितासिता दिवस नैरावेष्टयमानोऽपिकिं ।
रक्तरक्तसितासितादिगुणितामपद्यते विग्रहः ॥ तत्त्वभावना गा. ६९, पृ. १८१

६६. गौरो रुपधरो दृढः परिवृढः स्थूलः कृशः, कर्कशः ।
गीर्वाणो मनुजः, पशुर्नरकभूः षंढः पुमानंवाना ॥
मिथ्यात्वं विदधासि कल्पनमिदं मूढो विबुध्यात्मनो ।
नित्य ज्ञानमयस्वभावममलं सर्वव्यापायच्युतम् ॥७०॥ तत्त्वभावना गा. ७०, पृ. १८३

६७. सर्वारंभ कषाय संगरहितं शुद्धोपयोगोद्यतम् ।
तद्रूपं परमात्मनो विकलिलं बाह्ययव्यपेक्षातिगं ॥
तन्निः श्रेयसकारणाय हृदये कार्यं सदा वापरम् ।
कृत्यं क्वापि चिकीर्षवो न सुधियः कुर्वन्ति तद्ध्वंसकं ॥७१॥
जो जागर्ति शरीरकार्यकरणे वृत्तिं विधत्ते यतो ।
हेयादेयविचारशून्यहृदयो नात्मक्रियायामसौ ॥
स्वार्थं लब्धुमना विमुंचतु ततः शश्वच्छरीरादम् ।
कार्यस्य प्रतिबंधके न यतते निष्पत्तिकामः सुधी ॥७२॥ तत्त्वभावना गा. ७१, ७२ पृ. १८५, १८८

६८. स्वस्थेऽकर्मणि शाश्वते विकलिले विद्वज्जनप्रार्थित ।
संप्राप्ये रहसात्मना स्थिरधिया त्वं विद्यमाने सति ॥
बाह्यं सौख्यमवाप्तुमंत विरसं किं खिद्यसे नश्वरम् ।
रे सिद्धे शिवमंदिरे सति चरौ मा मूढ भिक्षां भ्रमः ॥७४॥ तत्त्वभावना गा. ७४, पृ. १९२

६९. कर्वाणः परिणाममेति विमलं स्वर्गापवर्गश्रियं ।
प्राणी करमलमुग्रदुःखजनिकां श्वभ्रादिरीतं यतः॥
गृहानाः परिणाममाद्यमपरं मुचंति संतस्ततः ।
कुर्वन्तिह कुतः कदाचिदहितं हित्वा हितं धीधना ॥७७॥ तत्त्वभावना गा. ७७. पृ. १९९

७०. नरकगतिमशुद्धैः सुंदरैः स्वर्गवासं ।
शिवपदमनवद्यं याति शुद्धैरकर्मा ॥
स्फुटमिह परिणामैश्चेतनः पोष्यमाणै ।

रिति शिवपदकामैस्ते विधेया विशुद्धः ॥७८॥ तत्त्वभावना गा. ७८, पृ. २०१

७१. श्वभ्राणां अविसहयमंतरहितं दुर्जल्पमन्योन्यजम् ।
दाहच्छेदविभेदनादिजनितं दुःखं तिरश्चवा परम् ॥
नृणां रोगवियोगजन्ममरणं स्वर्गेकरसां मानसम् ।
विश्वं वीक्ष्य सदेति कष्टकलिंत कार्या मतिर्मुक्तये ॥७९॥ तत्त्वभावना गा. ७९, पृ. २०३

७२. सर्वनश्यति यत्नतोऽपि रचिंत कृत्वा श्रमं दुष्करं ।
कार्यं रुपमिव क्षणेन सलिले सांसारिक सर्वथा ।
यत्तत्रापि विधीयते वत कुतो मूढ प्रवृत्तिस्त्वया ॥
कृत्ये कापि हि केवलश्रमकरे न व्याप्रियंत बुधा ॥ तत्त्वभावना ८०, पृ. २०८

७३. चित्रोपदवसंकुलामुरुमला निः स्वस्थतां संस्सृतिं ।
मुक्तिं नित्यं निरंतरोन्न त सुखामत्तिभिर्वर्जिताम् ॥
प्राणी कोपि कषायमोहितमतिर्नो तत्त्वतो बुध्यते ।
मुक्त्वा मुक्तिमनुत्तमामपरथा किं संस्टतौ रज्यते ॥८१॥ तत्त्वभावना गा. ८१, पृ. २१०

७४. रे दुःखोदयकारणं गुरुतरंषध्नंति पापं जनाः ।
कुर्वाणा बहुकांक्षया बहुविधा हिंसा पराः षट्क्रियाः ॥
निरोगत्वाचिक्रर्षिया विद्धतो नापथ्यभुक्तिरंगी ।
सर्वांगीणमहों व्यथो दयकरं किं याति रोगोह्ययम् तत्त्वभावना गा. ८२ पृ. २१२

७५. निर्जितमदमदनानां वाक्कायमनो विकार रहिताम् ।
विनिवृत्त पराशानामि हैव मोक्षः सुविहितानाम् ॥२३८॥ प्रशमरति प्रकरण १५/२३८ पृ. १६६

७६. करकंड चरिअ ले. कनकामर विरचित ९/१३ पृ. १२९

७७. पातंजलयोगसूत्र साधनपादं २, सूत्र ३५

७८. बहुयइं पढियइं मूढपर तालमुक्कई जेण ।
एक्कु जि आक्खरुतं पढहु सिवपुरि गम्मइ जेण ॥ पाहुडदोहा ९७

७९. पोथी पढिपढि जगमुवा पंडितभया न कोई ।

एकै अरवर पीवका पढे सु पंडित होई - कबीरग्रंथावली सा. ९, पृ. १०४

८०. राएं रंगिए हियवडए देउ ण दीसइ संतु।
दप्पणि मइलए बिंबु जिम एइउ जाणिणिभंतु ॥ परमात्मप्रकाश १/१२०, पृ. ११०

८१. हलिसहि काइ करइ सो दप्पणु। जहि पडिबिंब ण दीसइ अप्पणु ॥
धंधवालु मो जग पडितासइ। धरि अच्छंतु ण घरपइ दीसई ॥ पाहुड दोहा १२२

८२. हिरदा अतिर आरसों मुख देख्या न जाइ ।
मुख तौ तौ परि देखिए, जे मनकी दुविद्या जाइ ॥ कबीर ग्रंथावली सा. ८, पृ. ७८

८३. जो दरसन देख्या चहिये तो दरपन मंजत रहिये ॥
जब दरपन लागे काई, तब दरसन किया न जाइ ॥ कबीर ग्रंथावली पद २६१, पृ. ४११

८४. सिर राखे सिर जात है, सिर काटे सिर सोय।
जैसे बाती दीपकी कटि उजियार होय - कबीर दोहा सा. २७७, पृ. ९५

८५. भक्तिमार्गनु रहस्य पृ. १८३, १८४

८६. भावयामि भवावर्ते भावनाः प्रागभाविताः भावये भाविता नेमि भव भावाय भावनः ॥२३८॥ आत्मानुशासन, श्रीगुणभद्राचार्य गा. २३८, पृ. १४८

८७. आत्मशुद्धोपयोग ले. श्री. बुद्धिसागरसूरीश्वरजी गाथा ५२४, ५२५, ५२८, पृ. १०५

८८. तत्त्वार्थ सूत्र ९/१, पृ. २०६

८९. तत्त्वार्थ सूत्र ९/४, पृ. २०६

९०. आवश्यक निर्युक्ति दीपिका पृ. २०४

❊ ❊ ❊

प्रकरण आठवे

उपसंहार

प्रकरण आठवे

उपसंहार

विस्तृत रूपात विवेचन तसेच व्याख्यान विचार आणि भाव यांचा सार संक्षेप किंवा नवनीत रूपात प्रस्तुतिकरण तसेच तद्विषयक आवश्यक संसूचनांचे संयोजन उपसंहार आहे.

व्यापक रूपात प्रतिपादित तत्त्व स्वायत्त केले जाऊ शकतात. जैन शास्त्रात सूचित विस्तार रूची आणि संक्षेप रूचिसंज्ञक व्याख्या क्रमात उपसंहार संक्षेप रूचित समाहित आहे.

प्रस्तुत शोधग्रंथाचा विषय **''जैनदर्शनात 'भावना योग' याचे समीक्षात्मक विश्लेषण''** आहे. ज्यात जैन दर्शनाच्या माध्यमाने भावनेशी संबंधित समीक्षात्मक अध्ययन प्रस्तुत केले आहे. उपसंहारात्मक दृष्टीने पर्यावलोकन या प्रकरणात केले आहे.

हे जग वैविध्यपूर्ण आहे. केवळ शरीर आकृती, राहाणीकरनी तथा रंग, रूप, वेश, भाषा इत्यादी रूपातच नाही, भावनात्मक दृष्टीने सुद्धा जनजीवनात विभिन्नता आहे. त्या भिन्नतेमध्ये शुभ भावनेचे जसे विविध भेद अथवा अवस्था असतात, त्याचप्रमाणे अशुभभावनेची पण भिन्न भिन्न स्थिती असते. कित्येक प्रकारच्या व्यक्ती अशा आहेत की कोणाच्यामध्ये शुभभावनेची प्रधानता आहे. त्याच्या तारतम्यानुसार क्रमशः उच्च, उच्चतर व उच्चतम गुणयुक्त पुरुष दृष्टिगोचर होतात. जिथे अशुभभावनेची प्रधानता असते तिथे हिंसा, असत्य, क्रोध, मान, इर्षा, द्वेष, इत्यादी असतात. विविध प्रकारच्या लोकांमध्ये राहून पण अशुभापासून शुभ आणि शुभामधून पण शुद्धत्वाच्या दिशेने साधकाची वाटचाल भावनेद्वारा कशाप्रकारे होऊ शकते त्याचे विवेचन करण्याचा प्रस्तुत शोधप्रबंधात अल्पसा प्रयत्न केला आहे.

अशुभभावना अथवा अशुभ कार्यासाठी कोणत्याही प्रकारच्या शिक्षणाची गरज नसते. त्याच्यासाठी कोणतीही शाळा अथवा विद्यापीठे नाहीत. वाईट भावधारा अथवा वाईट काम लोक समाजातील विखुरलेल्या वाईट लोकांच्या अनुकरणाने आणि तशा सवयींमुळे स्वतःच शिकतात.

शुभ किंवा शुद्ध भावनेच्या विकासासाठी अभ्यासाची आवश्यकता आहे. आपल्या आजूबाजूचे वातावरण, असे असले पाहिजे की ज्याच्यामुळे पवित्र भावनांचा विकास होईल. पवित्र भावनेने मनुष्याचे मानसिक स्वास्थ्य स्वस्थ राहाते. पारिवारिक, सामाजिक, राष्ट्रीय व व्यावहारीक जीवनाच्या उन्नतीसाठी आणि भाव विशुद्धीद्वारा आत्मविशुद्धी करून चरम व परम लक्ष्याप्रत पोहोचण्यासाठी भावनेच्या शुद्धीची नितांत आवश्यकता आहे म्हणूनच प्रस्तुत शोधप्रबंधात भावनेच्या विविध प्रकारांवर विचार विस्तात केला आहे.

प्रकरण १ : 'जैन संस्कृति धर्म आणि वाङ्मय'

भारताची भूमी परम पवित्र भूमी आहे. ह्या पृथ्वीच्या कणाकणांमध्ये धर्म आणि मानवतेची भावना भरलेली आहे. अनेक धर्माची जन्मभूमी भारत आहे. हिंदू, जैन आणि बौद्ध इ. धर्म ह्या पुण्यपवित्र भूमीतूनच उत्पन्न झालेले महत्त्वाचे धर्म आहेत. जैन धर्माने विश्वाला अत्यंत विशिष्ट असाधारण भेट दिली आहे आणि जगाच्या जीवमात्राच्या सुखाची तसेच कल्याणाची मंगलभावना ह्या धर्मात निरूपित झाली आहे.

जैन धर्म ज्ञाती, जाती, देश, काळ, इत्यादी बंधनाने बद्ध नाही. हा गुणप्रधान धर्म आहे. व्यक्ती जन्माने श्रेष्ठ नाही कर्माने श्रेष्ठ आहे. भगवान महावीरांनी आत्मतत्त्वाच्या दृष्टीने जगातले सर्व जीव समान आहेत अशी मंगल विचारणा प्रस्तुत केली आहे. मोक्षप्राप्तीचा अधिकार जसा पुरुषांना आहे तसाच स्त्रियांना देखील आहे. विश्वाच्या नारी जातीसाठी आध्यात्मिक उन्नतीचे मंगलद्वार भगवान महावीरांनी खोलून दिले आणि नारीचा सुंदर गौरव केला. षट्काय जीवांच्या रक्षणाद्वारा जगाच्या लहानात लहान जीवालापण न मारण्याची आणि दुःख न देण्याची उत्तम भावना व्यक्त केली आहे.

प्रस्तुत प्रकरणात जैन धर्माने मानवाचे जे परम कल्याण केले आहे त्याचे प्रारंभी वर्णन केले आहे. अन्य धर्माप्रमाणे जैन धर्मात पण मानवाला विश्वाच्या जीवसृष्टीत सर्वोत्तम म्हटले आहे. आणि ह्या धरतीवरचे त्याचे आगमन व्यर्थ न व्हावे तसेच भवभ्रमण न करण्यासाठी व परम पदाच्या प्राप्तीसाठी उत्तम साधनापद्धती जैन धर्माने प्रस्तुत केली आहे. भारतीय संस्कृतीच्या दोन धारांमध्ये जैन संस्कृतीचे अलौकिक समर्पण आहे. वर्णित प्रकरणामध्ये जैन धर्माची प्राचीनता, जैन धर्मात काळचक्राची मान्यता, श्रमण संस्कृतीची विशेषता इत्यादी विषयांचे वर्णन केले गेले आहे.

जैन मान्यतेप्रमाणे अनंत चोविशी झाली आहे. त्यातल्या वर्तमान अवसर्पिणी काळच्या चोवीस तीर्थंकर आणि चरम तीर्थंकर भगवान महावीर विषयी विवेचन ह्या

प्रकरणात दर्शविले आहे. भगवान महावीरांचा उपदेश आणि श्रुत परंपरा ह्या विषयावरपण आलेखन प्रस्तुत केले आहे. जैनधर्म ग्रंथ, आगम, आगम साहित्याच्या तीन वाचना, त्याचे विभाजन, वर्गीकरण आणि बत्तीस आगमांचे वर्णन यात केले आहे.

जैन धर्माचे मुख्य सिद्धांत आणि भगवान महावीरांच्या वाणीचे आगम ग्रंथात गणधर भगवंतांनी जे उत्तम प्रकारे संकलन केले आहे ते जैन धर्माला समजण्यासाठी अनिवार्य आहे. भगवान महावीरांचा उपदेश आगमाच्या पानापानातच नाहीत शब्दाशब्दात गुंफलेला आहे. त्यामुळे आगम ग्रंथाचे जैन समाजावर महान उपकार आहेच. विश्वाच्या आध्यात्मिक क्षेत्रात पण याचे अद्‌भूत अर्पण आहे. जैन धर्माला समग्रपणे समजण्यासाठी आगम ग्रंथांच्या अभ्यासाची नितांत आवश्यकता आहे. म्हणूनच प्रस्तुत प्रकरणात श्रमण संस्कृती त्याची विशेषता आणि आगमग्रंथाचा परिचयात्मक विवरण देण्याचा मी विनम्र प्रयत्न केला आहे.

प्रकरण २ : 'भावनेचा आशय महत्त्व आणि थोडक्यात परिचय'

या पृथ्वी वरच्या मानवाला प्राप्त झालेल्या काही विशिष्ट संपत्तीमध्ये 'मन' एक महान संपत्ती आहे. शास्त्रकारांनी आणि ज्ञानी महापुरुषांनी सांगितले आहे की मन हेच मानवाच्या बंध आणि मोक्षाचे कारण आहे. मानवाच्या मनात विचाराचे सनातन चक्र फिरतच राहाते. आधुनिक मनोवैज्ञानिक पण मानवाच्या कित्येक मनोवृत्तींचा स्वीकार केला आहे आणि त्याचे शुभ व अशुभ अशा दोन मुख्य विभागात वर्गीकरण केले आहे.

भाव किंवा भावनेचा कार्याच्या निष्पत्तीमध्ये फार महत्त्वाचा वाटा आहे. धर्मरूप मंगल, उत्कृष्ट, उज्ज्वल, उत्तम कार्य म्हणजे धार्मिक व्रत, आत्मउपासनेचे उपक्रम शम, संवेद, निर्वेद आणि संयम. ह्या सर्वांची निष्पत्ती भावनेच्या अभ्यासाशिवाय होणे शक्य नाही. ज्याप्रमाणे कृषिउद्योगात जल-सिंचन परमावश्यक आहे त्याची पाऊसाच्या पाण्याने, कालव्याच्या पाण्याने, विहिरीच्या पाण्याने परिपूर्तता केली जाते त्याचप्रमाणे धर्माच्या पिकासाठी भावात्मक जल-सिंचन अपेक्षित आहे. भावनेने अनुप्राणीत होऊनच व्यक्ती धर्माच्या मार्गावर अग्रेसर होऊ शकतो.

धर्माचा मार्ग कंटकाकीर्ण आहे असे म्हटले जाते. अशा मार्गावर चालणे कठीण आहे. तसेच धर्ममार्गावर चालणाऱ्या व्यक्तीला पावलोपावली येणाऱ्या विघ्नांना, संकटांना, उपसर्गांना सहन करावे लागते. हा विषय अंतरद्वंदात्मक आहे, आंतरिक युद्ध आहे. अशा स्थितीत धर्ममार्गावर आरूढ पथिकाला 'भावना' आधार देते. त्याच्या आधारे साधक

अनवरत चालत राहून ध्येयाप्रद पोहोचतो. हा महिमा भावनेचा आहे. त्याच्यामुळे साधक हिंमत हारत नाही. धर्मआराधनेत भावना जीवन जगण्याची, उन्नत्ती करण्याची शक्ती देण्याचे कार्य करते.

प्रत्येक मानवात शुभ आणि अशुभ भावनेचा संघर्ष सतत चालतच असतो. व्यक्तीचा पुरुषार्थ उणा पडता कामा नये. पुरुषार्थ उत्तम असला पाहिजे. म्हणजे त्याने उत्तरोत्तर अशुभ भावनेने मुक्त होऊन शुभ भावनेकडे आणि शुभ भावनेपासून शुद्ध भावनेकडे प्रगती केली पाहिजे. भावनेच्या क्षेत्रात सम्यक् पुरुषार्थ महान उपकारक ठरेल.

ह्या दुसऱ्या प्रकरणात जैन धर्माच्या अनेक आचार्य, विद्वानांनी भाव आणि भावनेची भिन्नता, भावनेची व्याख्या आणि मानवीय जागृतीद्वारा उत्तम भावनेचे कसे चिंतन केले पाहिजे, भावनेचे लक्षण, स्वरूप, विस्तार, विवेचन इत्यादी कसे केले आहे याचा संक्षिप्त परिचय दिला आहे. त्याचे पुढच्या प्रकरणात विश्लेषणात्मक परिशीलनाच्या रूपात आहे.

जैनाचार्यांच्या मते ''भावना भवनाशिनी'' आहे ह्या भावनेची मूळ संख्या बारा आणि चार योगभावना मिळून एकूण सोळा भावना प्रसिद्ध आहेत. त्यांचा थोडक्यात परिचय देण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला आहे.

जैन धर्मात भावनेचे खूपच महत्त्व आहे. अनेक ज्ञानी पुरुषांनी भावनेला अजर-अमर रूपात स्थिर होण्याचे अनन्यतम साधन सांगितले आहे. भावनेमध्ये जीवला शिव, आत्म्याला परमात्मा बनविण्याची महानशक्ती आहे. स्वाध्याय हे जीवाचे भोजन आहे तर भावना त्या भोजनाचा स्वाद आहे. इतके भावनेचे महत्त्व आहे.

प्रकरण ३ : 'अर्धमागधि आगमात भावनेचे विवेचन'-

तिसऱ्या प्रकरणात जैन आगम ग्रंथातात भावनेचे जे विवेचन झाले आहे त्याचे थोडक्यात वर्णन केले आहे. विद्वानांनी शास्त्रांना दिव्य चक्षू म्हटले आहे. चर्मचक्षुंद्वारा आपण जगातील त्या पदार्थांना पाहू शकतो, जे स्थूल आहेत. ज्यांना आपल्या नेत्रांनी पाहू शकत नाही. पण त्यांचे अस्तित्व मात्र निश्चित आहेच. त्याचा आपण शास्त्राच्या माध्यमाने अनुभव करू शकतो. 'शास्तीति इति शास्त्रम्' जो शासित करतो, विवेकपूर्वक पदार्थ आणि भाव प्राप्त करण्याचा मार्ग दाखवतो ते शास्त्र. शास्त्रातही त्या रचनेचे सर्वाधिक महत्त्व त्यांना आहे, जे आप्तपुरुषांद्वारा प्रतिपादित आहेत. आप्तपुरुष राग, द्वेष, मोह,

माया, इत्यादींपासून दूर राहातात. ज्ञानाची समग्र ज्योती त्यांना उपलब्ध असते. ते निरपेक्ष रूपात तत्त्वदर्शी असतात, त्यांची वचने त्रिकालबाधित सत्य असतात. ते भूत, वर्तमान आणि भविष्यवर्ती समस्त पदार्थांचे तसेच भावांचे सम्यक् व्याख्यान करतात. ते आगम शब्दांद्वारा वाच्य आहेत. आगम त्या ज्ञान-विज्ञानाचा अजस्र स्रोत आहे, ज्याचे मूलक अनादी काळापासून प्रवाहित आहेत. त्याचा प्रत्येक युगात महापुरुष आख्यान करतात.

जैन धर्म आणि दर्शन यांचा मूळ आधार आगम आहेत. आगमाच्या रूपात आपल्याला एक अत्यंत महत्त्वपूर्ण वाङ्मयनिधी प्राप्त आहे. भगवान महावीराद्वारा प्रतिपादित हे उच्चतर, उत्कृष्टतम साहित्य आहे, ज्यात सर्वांचे हित समाविष्ट आहे. हिताची दोन रूपे आहेत- प्रेयस आणि श्रेयस. लौकिक हितास प्रेयस म्हटले जाते आणि अलौकिक हितास श्रेयस म्हटले जाते. आगमाच्या महासागरात यथाशक्ती अवगाहन निमज्जन करून भावनेचे विविध तत्त्वात्मक, वैविध्यपूर्ण तत्त्वांचे समीकरण करण्याचा या प्रकरणात मी प्रयत्न केला आहे.

आगमांचा सागर तर अथांग आहे, त्यात असलेले ज्ञानरत्नेसुद्धा असीम आहेत. आपली ससीम शक्ती आणि सामर्थ्याद्वारा जितके आणि जे जे प्राप्त केले त्याचे यथास्थान वर्णन करण्याचा मी विनम्र प्रयत्न केला आहे.

जैन आगमग्रंथात सर्वाधिक श्रद्धेय आणि भाषेच्या दृष्टीने सर्वाधिक प्राचीन आगम आचारांग आहे. आचारांग शब्दानेच विदित होते की प्रस्तुत ग्रंथात आचारसंहितेचे वर्णन असेल. त्या अनुसार ह्या ग्रंथात साधूच्या आचाराचे अत्यंत वैज्ञानिक सूक्ष्म आणि विस्तृत आलेखन प्राप्त होते. साधू-साध्वींना आचरण करण्याच्या पाच महाव्रतांची सूक्ष्म चर्चा आचारांग सूत्राच्या 'भावना' नामक अध्ययनात प्राप्त होते. आगमाच्या ह्या प्रथम अंग सूत्रातच 'भावना' शब्द उपलब्ध होतो. प्रत्येक महाव्रताच्या पाच-पाच भावना, अशा एकंदर पंचवीस (२५) भावनांचे अत्यंत सरळ निरूपण आचारांग सूत्रात प्राप्त होते.

आचारांग सूत्रानंतर समवायांग सूत्र, प्रश्नव्याकरण सूत्र इ. आगमात पण ह्या भावनेचे कोठे संक्षिप्त तर कोठे विस्तृत विवेचन प्राप्त होते. ह्या भावना साधूच्या महाव्रताला दृढ बनवण्यासाठी अती उत्कृष्ट आहेत.

अन्य आगम ग्रंथांत पण अनित्यादी बारा भावना तसेच मैत्री इत्यादी चार योग भावनांचा उल्लेख व कोठे कोठे विस्तृत विवेचनपण प्राप्त होते. उत्तराध्ययन सूत्रात प्रशस्त अथवा शुभ भावनेचे थोडक्यात वर्णन प्राप्त होते आणि अप्रशस्त भावनेचे आलेखन

पहिल्यांदाच ह्या आगमाच्या ३६व्या अध्ययनाच्या अंतिम गाथेत दिसून येतात.

अशाप्रकारे आगमात भावनेविषयी जे वर्णन प्राप्त होते त्याचा उल्लेख तिसऱ्या प्रकरणात गवेषनात्मक दृष्टीने केला आहे.

प्रकरण ४ : 'आगमोत्तर काळच्या लेखकांचा परिचय आणि अशुभभावना'

आगमोत्तर काळात ज्या ज्या लेखकांनी भावनेसंबधी आलेखन केले आहे त्यांचा ह्या प्रकरणात थोडक्यात परिचय दिला आहे. जैन दर्शनामध्ये मानवाच्या मनोभावनेचे आणि आंतरिक मनोवृत्तीचे विस्तृत विश्लेषण केले गेले आहे. प्रत्येक मानवाच्या मनात शुभ किंवा अशुभ भावना सतत मिश्रित होतच असतात. या शुभाशुभतेचा संघर्ष मनुष्याला नेहमी दुःखी, कष्टी करत असतो. म्हणूनच अकल्याणकारी अशुभ भावनेचा परिचय करणे आणि त्यापासून मुक्ती मिळविणे अनिवार्यच आहे. जैन धर्माच्या मान्यतेनुसार प्रत्येक साधकाने क्रमवार पापप्रवृत्तीने मुक्त होऊन शुभ कल्याणकारी पुण्यप्रवृत्तीच्या दिशेने प्रगती केली पाहिजे. दुसऱ्या शब्दात म्हटले तर दोषाचा परिहार आणि गुणांचा स्वीकार हे मानवाचे खरे कर्तव्य आहे. ही प्रवृत्तीच त्याला परमशांती आणि परमसुख देईल.

अशुभ भावनेने मुक्त होऊन शुभ भावनेत आणि शेवटी शुद्ध भावनेच्या दिशेने विवेकपूर्वक प्रवृत्ती करण्याचे मार्गदर्शन वीतराग परमात्मा भगवान महावीरांनी त्यांच्या साधकाला वारंवार केले आहे. कारण मानवाच्या मनाच्या गतीचे आणि चंचलतेचे मोजमाप काढणे फारच कठीण आहे. शुभमधून अशुभतेकडे खेचून नेण्याचे काम मनाची चंचलताच करते. म्हणूनच शास्त्रकारांनी प्रत्येक मानवाला आणि साधकाला मनावर विजय मिळविण्यासाठी अथवा मनाच्या अशुभ प्रवाहावर अंकुश ठेवण्यासाठी पुन्हा पुन्हा निर्देश केला आहे.

जैन दर्शनामध्ये अशुभ भावनांचे आणि त्यांच्या भेदांचे अनेक ठिकाणी वर्णन प्राप्त होते आणि प्रत्येक मोक्षार्थी साधकाने अशुभ भावनांवर विजय मिळवण्याचा पुरुषार्थ केला पाहिजे असे पण भारपूर्वक दर्शविले आहे. कारण अशुभ भावनेने ग्रासलेल्या व्यक्ती समाजामध्ये घातक सिद्ध होतात.

अशुभ भावना असलेल्या व्यक्तीमध्ये पाखंड, घमंड, क्रोध, कटुता आणि अज्ञान इत्यादी दुर्गुण असल्याने ते बंधनाने बांधले जातात.

अभिधान राजेन्द्र कोषामध्ये अकल्याणकारी अशुभ भावनेची चर्चा करताना अशुभ भावनेला अप्रशस्तभावना नावाने संबोधिले आहे. त्यात हिंसा, असत्य, चोरी, मैथुन

परिग्रह, क्रोध, मान, माया, लोभ ह्या नऊ अप्रशस्त भावनांचा उल्लेख केल्यानंतर बृहत्कल्पभाष्यामध्ये वर्णित कांदर्पि इत्यादी पाच अशुभ भावनांच्या पंचवीस प्रभेदांचे वर्णन प्राप्त होते. तसेच उत्तराध्ययन सूत्राच्या छत्तिसाव्या अध्ययनातपण ह्या भावनेचे वर्णन प्राप्त होते. उत्तराध्ययन आणि बृहत्कल्पभाष्यात वर्णित भावनांच्या निरूपणात खूपच साम्य आहे.

अकल्याणकारी अशुभ भावनेचे वर्णन ज्या ज्या ग्रंथात प्राप्त होते त्याचे विवेचन प्रस्तुत प्रकरणात वर्णित केले आहे.

प्रकरण ५ : 'आगमोत्तर काळच्या जैन साहित्यातील भावनेचे निरूपण'

जैन दर्शनात 'भावना' ह्या विषयावर विस्तृत विवेचन झाले आहे. जैन आगमची अर्धमागधी प्राकृत भाषा व आगमावर निर्युक्ती, भाष्य टीका इत्यादी प्राकृत व संस्कृत भाषेत झालेल्या रचनांच्या शिवाय स्वतंत्र रूपात विविध सैद्धांतिक विषयावर प्राकृत, संस्कृत रचना होत राहिल्या. ज्ञान व आचारसंबंधी विविध अंग, उपांगांचे या साहित्यात सारगर्भित विवेचन झाले आहे. 'भावना', 'ज्ञान' आणि 'चर्या' यांची शृंखलाबद्ध रचना आहे. 'भावना' ज्ञानाला क्रियान्वित करण्याचे अनन्य साधन आहे. म्हणून जैन तत्त्व सिद्धांतामध्ये ह्या विषयाची विस्तृत चर्चा दिगंबर, श्वेतांबर-मूर्तिपूजक, स्थानकवासी, तेरापंथी ह्या चारी फिरक्याचे आचार्य, मुनिराज, तसेच वर्तमान काळच्या काही श्रावक यांनी भावनेच्या विविध चिंतनबिंदूंना स्वतंत्र ग्रंथरूपात, लेखरूपात, प्रकरणरूपात आणि दृष्टांत, कथांद्वारा गद्य, पद्य अथवा गद्य-पद्य शैलीत साधकाला समजवण्याचा ज्ञान देण्याचा जो श्रेष्ठ पुरुषार्थ केला आहे. त्याचे ह्या पाचव्या प्रकरणात वर्णन केले आहे.

भावनेचे अनेक प्रकार आहेत. जसे तिसऱ्या प्रकरणात वर्णित पाच महाव्रताच्या पंचवीस भावना. चौथ्या प्रकरणात वर्णित पाच अव्रत चार कषायाच्या मिळून नऊ आणि कांदर्पीक इत्यादी, पाच अशुभ भावनेचे पंचवीस भेद अर्थात २५+९=३४ अशुभ भावना. अनित्यादी बारा वैराग्य भावना, मैत्री इत्यादी चार योग भावना. जिनकल्पी भावना ज्याचे वर्णन आगमातील भावनेच्या तिसऱ्या प्रकरणात झाले आहे, षोडशकारण भावना अश्या प्रकारे अशुभ, शुभ आणि शुद्ध भावनांचे अनेक प्रकार आहेत. भावनेच्या संख्येला स्पष्टपणे सांगता येणार नाही. कारण जितके मनाचे भाव, विचारतरंग तितक्या भावनेचे रूप घेऊ शकतात. परंतु जैन दर्शनात सर्वाधिक प्रसिद्ध अनित्यादि बारा भावना आहेत, त्याचे वर्णन प्रस्तुत प्रकरणात केले आहे.

ह्या बारा भावना धर्माचे अनुसंधान करणाऱ्या आहेत. धर्मध्यानाच्या हेतूभूत ह्या भावनांचे चिंतन केल्याने आत्मा आदर्श प्रदेशात विचारण्याचे वातावरण जमवू शकतो. चैतन्यस्वरूप आत्म्याची गुणशक्ती जी झाकली गेली आहे, त्याचे जे कंचनत्व कोमेजले आहे, त्याच्या शुद्धज्ञान प्रकाशावर जे आवरण आले आहे, ते दूर करून आत्म्याच्या शुद्ध स्वरूपाला प्रकट करण्यासाठी त्यायोग्य वातावरण बनवणे आवश्यक आहे आणि ते बनवण्याचे सुंदर काम बारा भावनांद्वारा होते.

धर्मध्यानात प्रवेश करण्यासाठी ह्या भावना हेतुभूत आहेत. ह्याच्यातील एकेका भावनेचे जिच्या मूळ स्वरूपाचे दीर्घ काळापर्यंत चिंतन केले आणि सर्व क्रियाकर्म सोडून दिले तर संपूर्ण भवचक्राचा फेरा नेहमीसाठी सुटतो. ह्या बारा भावनांच्या प्रकरणाचा उपसंहार बारा भावनांच्या चिंतनाची पद्धती, त्याचा आशय व निष्कर्ष इथे वर्णन केला जात आहे.

१) अनित्यभावना - योग आणि वियोग हे मानव जीवनात येणारे स्वाभाविक अनुभव आहेत. जे प्राप्त होते त्याला योग म्हणतात. आणि प्राप्त झालेली वस्तू नष्ट होते त्याला वियोग म्हणतात. आपण स्वतः जमा केलेल्या वस्तूंचा वियोग झाला की दुःख होते. परंतु आपल्या शरीरासकट जितक्या पण वस्तू दृश्यमान आहेत त्या नाशवान आहेत. त्यांचा वियोग निश्चित आहे. अशावेळी दुःख करू नये असा उपदेश महान संत आत्मज्ञानीयांनी दिला आहे. अशा योग आणि वियोगावर सूक्ष्मपणे खोलवर विचार करणे म्हणजे अनित्य भावना आहे.

मनुष्याच्या मनात काळ, परिस्थिती आणि संयोगाच्या आधाराने अनेक इच्छा उत्पन्न होतात आणि नष्ट होतात, ज्याप्रमाणे महासागरात लाटा येतात व विलिन होतात. परंतु एक महा इच्छा अशी आहे की ती नेहमी राहाते. कोणत्याही काळात, परिस्थितीत किंवा संयोगात त्यात परिवर्तन होत नाही. ही महा इच्छा आहे- 'दुःख रहित शाश्वत सुख प्राप्त करण्याची.' पण ते सुख अधिकांश मनुष्यांना प्राप्त होत नाही. त्याचे कारण असे आहे की सुख कसे प्राप्त करावे ह्याचे ज्ञान नाही. अज्ञानी जीव सुख मिळविण्यासाठी भौतिक वस्तू प्राप्त करतो. त्यांना सुरक्षित ठेवतो. त्यांचा उपयोग करतो. परंतु तत्त्वज्ञ महापुरुष म्हणतात की भौतिक वस्तूने दुःखरहित शाश्वत सुख मिळणे शक्य नाही. कारण भौतिक वस्तू अनित्य आहेत. अनित्य वस्तूंनी नित्य सुख कसे मिळणार ?

नित्य सुख नित्य वस्तूनेच मिळते आणि ती नित्य वस्तू आहे आत्मा. आत्मा नित्य आहे आणि दुःखरहित शाश्वत सुखाने युक्त आहे. म्हणून जो आत्म्यात लीन होतो

त्यांना दुःखरहित शाश्वत सुख प्राप्त होते. या क्षणभंगुर संसारात निर्वाणाला सोडून सर्व वस्तू विनाशशील आहेत.

वस्तूच्या अनित्यतेचा विचार करून, भौतिक वस्तूमध्ये मोह ठेवून सुख प्राप्त करण्याची इच्छा दूर करण्यासाठी अनित्य भावनेचे चिंतन केले जाते. ज्या वस्तूंच्या प्रती ममत्व आहे त्या वस्तूंचा वियोग होतो तेव्हा दुःख होते आणि ज्या वस्तूंच्या प्रती ममत्व नसते त्यांच्या वियोगाने मात्र दुःख होत नाही.

कन्या जन्म घेते तेव्हापासून मोठी होईपर्यंत कष्ट करून का होईना तिचे पालनपोषण केले जाते. तरी देखील योग्य वयात कन्येला दुसऱ्या घरी पाठवताना बॅण्डबाजे वाजवून तिला निरोप दिला जातो. कारण तिच्या जन्मापासूनच नक्की झालेले असते की ही कन्या आपल्याकडे राहणार नाही. एक दिवस तिला परक्या घरी पाठवावे लागेल. अशीच बुद्धी पर पदार्थांच्या प्रती झाली तर दुःख होणार नाही. हे सर्व भौतिक पदार्थ माझे नाहीत अशी बुद्धी होताच त्यांनापण वाजे वाजवून निरोप देण्याची इच्छा होईल.

पदार्थ आपण जर सोडले नाही तरी ते आपल्याला सोडणारच आहे. रडता रडता पण त्या पदार्थांना सोडावे लागेल. त्याच्यापेक्षा हसता हसता आपण स्वतःच त्यांचा त्याग का करू नये ? रडतारडता जो सोडतो तो बिचारा, आणि हसताहसता जो सोडतो तो बहादूर. जो हसता हसता स्वतः सोडतो तो बुद्धिमान आणि रडता रडता सोडतो तो बुद्धू.

अनित्य भावना आपल्याला बोधपाठ देते की सर्व प्रथम भौतिक वस्तूंच्या ममत्वाला सोडा. जो भौतिक वस्तूंच्या ममत्वाचा त्याग करतो तो आत्मसाधना बरोबर करू शकतो.

मनुष्यभवाचा सदुपयोग त्याग वैराग्याने होतो 'देहस्य सारं व्रतधारणं च.' बुद्धीचा उपयोग तत्त्वविचारणेने होतो. 'बुद्धे फलं तत्त्व विचारणं च वाचः फलं प्रीतकरं नराणाम्' मधुर आणि हितकारक वचन बोलणे, अन्याना प्रियप्राप्त होणे हे वाणीचे फळ आहे. 'अर्थस्य सारं किल पात्रदानं' धनाचा फळ सुपात्रदान आहे. म्हणजे सुपात्रदान देणे धनाचा सदुपयोग आहे.

अनित्य भावनेच्या चिंतनाने दोन बोधपाठ मिळतात. एक बोध हा मिळतो की भौतिक वस्तू नाशवंत असल्याने त्यांच्या प्रती रागभाव, ममत्वभाव ठेऊ नये. आणि दुसरा बोध हा मिळतो की मिळालेल्या शक्तीचा नष्ट होण्यापूर्वीच सदुपयोग करणे हितावह आहे.

२) अशरणभावना – दुःखात भौतिक वस्तू अथवा स्वजन इत्यादी कोणी

कोणाचे रक्षण करू शकत नाही. ज्याप्रमाणे भौतिक वस्तू अनित्य असल्याने शाश्वत सुख देऊ शकत नाही. त्याचप्रमाणे दुःख दूर पण करू शकत नाही. शरणरूप पण होऊ शकत नाही.

लहानबाळ आईच्या शरणात राहतो, विद्यार्थी शिक्षकांच्या शरणी जातो, रोगी डॉक्टरांच्या शरणी जातो अशाप्रकारे वेगवेगळ्या दृष्टीने अनेक जीव एक दुसऱ्याच्या शरणी जातात. पण त्या सर्वांचे रक्षण होतेच असा नियम नाही. रोग्याच्या पापकर्माचा उदय असला तर वैद्य आणि डॉक्टर पण हात झटकून टाकतात. पुण्योदय असेल तरच रक्षण मिळू शकते.

धन, स्वजन, स्नेही आणि बळ इत्यादी कोणीच जीवाला आपत्तीने अथवा मृत्यूने वाचवू शकत नाही. संसार दुःखाच्या अग्नीत होरपळत आहे. कोठेही सुख नाही. झोपडीत राहणारे अभावाने ग्रस्त, कष्टाने व्याकूळ आहेत; तर सोन्याच्या महलात राहणारे आपल्या वेगळ्याच दुःखाने प्रकंपित आहेत.

संसारात कोणताही पदार्थ माणसाला शरण देण्यास समर्थ नाही. तरीही अज्ञानी मनुष्य जगातील वस्तू आणि व्यक्तींच्या मागे भ्रांत आहे. त्यातच सुख आणि आधार शोधत आहे. पण शेवटी मृत्यू तर येणारच. लाचार जीवतम्याला ओढून नेणारच.

आपल्या आत्म्याशिवाय कोणीही शरणरूप नाही म्हणून साधकाने सांसारिक आश्रयस्थानापासून पराङ्मुख होऊन आत्म्याची शरण घ्यावी. आत्मा सर्वतः स्वतंत्र आहे. आत्म्याशिवाय जितका अनात्म भाव आहे त्याला शरण किंवा सहारा मानणे अज्ञान आहे.

ज्ञानाच्या आधाराने मनुष्याला संसाराच्या पदार्थांचा तथा आत्म्याचा यथार्थ बोध प्राप्त होतो. मग तो समजतो की जगात सर्वात श्रेष्ठ आश्रय किंवा शरण फक्त परमात्माच आहे. आणि तो प्राप्त करण्याचा मार्ग सद्धर्माचरण आहे. त्यानेच परम शांती प्राप्त होते.

जैन धर्मानुयायी भगवान महावीरांचे भक्त म्हणतात- ''अरिहंते शरणं पवज्जामि सिद्धे शरणं पवज्जामि'' मी अरिहंताचे शरण स्वीकार करतो, मी सिद्धांचे शरण ग्रहण करतो. महावीरांचे युग तर्काचे युग होते. भगवान जर म्हणाले असते की 'माझ्या शरणी या तुमचे कल्याण होईल' तर उलट-सुलट तर्काच्या बाणाने भगवानांवर अहंकाराचा आरोप केला असता, म्हणून महावीर ह्या बाबतीत मौन राहिले. आजचे युग वक्र आणि जड बुद्धीचे आहे. 'माझ्या शरणी या' असे म्हटल्यावर तर मोठी समस्या झाली असती. इतकेच काय

पण 'मी शरणागतांचा स्वीकार करतो' इतके जरी म्हटले असते किंवा स्वीकृती सूचक होकारार्थी मान जरी डोलावली असती तर इतरांचा अहंकार डिवचला गेला असता.

साधकाची जेव्हा स्वतःची आपली तयारी होईल तेव्हा तो स्वतः अंतःकरणापासून बोलू लागेल- ''अरिहंते सरणं पवज्जामि, सिद्धे सरणं पवज्जामि''- शरण स्वीकार करतो. यात साधकाने खूप विचारपूर्वक निर्णय घेऊन पाय उचलला आहे असे सूचित होते.

शरण तो स्वीकारतो ज्याने अहंकाराचा पूर्णपणे त्याग केला आहे आणि जो अहंकाराचा त्याग करतो त्याला दुःख, द्वंद्व, भय चिंता रहात नाही.

साधकाला हा अनुभव आला पाहिजे की -

मेरा मुझमें कुछ नहीं जो कुछ है सो तोर ।
तेरा तुझको सौंपते क्या लगता है मोर ॥

समर्थ गुरू रामदासस्वामींच्या शरणी समर्पित झाल्यानंतर शिवाजी, शिवाजी होऊ शकले. स्वामी विवेकानंदांनी स्वतःला स्वामी रामकृष्ण परमहंसांच्या चरणी समर्पित केले नसते तर ते इतक्या उच्च स्थानी पोहोचले नसते. भक्त शिरोमणी मीराने स्वतःला श्री कृष्णांच्या चरणी समर्पित केले त्यामुळे ती श्रीकृष्णात इतकी तन्मय झाली की खाणे-पिणे शरीराची चिंता सर्व-सर्व काही विसरून गेली.

प्रस्तुत भावनेचे तथ्य हेच आहे की साधकाने आपल्यामध्ये ऋजुता (सरलता) मृदुता आणि विनय आणण्यासाठी अहंकाराचा पूर्णपणे त्याग करावा व अहंकार तेव्हाच नष्ट होईल जेव्हा तो असा अनुभव करेल की, आपण सांसारिक पदार्थ, वैभव, पद इत्यादींना शरणरूप मानतो ते वास्तविक आध्यात्मिक दृष्टीने आत्मोत्थानाच्या दृष्टीने शरणरूप नाहीत. कारण ते सर्व नश्वर आहेत. आत्मा व परमात्माच फक्त शाश्वत, नित्य आणि परमशक्तीमय, आनन्दमय आहे. त्यांचे शरण घेणेच हितावह आहे.

ह्या भावनेत हे लक्ष्यात ठेवायला हवे की अशरणतेचा विचार करणे म्हणजे आपल्याबद्दलची हीन भावना आहे असे समजू नये. हा तर सात्त्विकता पूर्ण विनितभाव आहे. जेव्हा आपण अवास्तविक, कल्पित शरणभूत पदार्थांचे शरण सोडू तेव्हाच ती भावना विकसित होते. अशरणभावना आत्म्याचा उत्थान करणारी आहे.

संसार भावना - ज्या संसाराला मनुष्य नित्य, स्थिर, स्थायी मानतो आणि त्यात विभ्रांत राहतो. सत्यमार्गापासून भ्रमित होतो, तो संसार नित्य नाही. संसार

जलप्रवाहाप्रमाणे सतत वहात आहे. या संसाराच्या स्वरूपाला समजण्यासाठी संसार भावनेच्या चिंतनाची आवश्यकता आहे. त्याच्याशिवाय जन्ममरणाच्या आवागमनाच्या फेऱ्यातून सुटू शकणार नाही.

जो संसाराची वास्तविकता समजत नाही तो संसारात अडकतो. संसार एक रंगभूमी आहे, जीवरूपी नट त्यात अनेक रूपधारण करतो.

नरक, तिर्यंच, मनुष्य आणि देवता ह्या चार गतीत परिभ्रमण करणाऱ्या जीवाचे सगळेच जीवस्वजन आहेत. कारण एकच जीव कधी माता तर कधी बहीण तर कधी भाऊ होतो. संसारात परिभ्रमण करणाऱ्या एक जीवाचे अन्य जीवांबरोबर सर्व प्रकारचे संबंध झाले आहेत, आणि ते पण एकचवेळी नाही तर अनंत वेळा. म्हणून सगळे जीव स्वजन आहे. आणि जर सर्व जीवांना परजन समजायच असेल तर वर्तमानमध्ये ज्यांना जीव स्वजन म्हणतो ते देखील परजनच आहे. सगळे संबंध कर्मामुळे उत्पन्न झालेले आहेत.

ज्याप्रमाणे गृहस्थ एखादे घर भाड्याने घेतो आणि जेव्हा त्याची आवश्यकता नसते. तेव्हा त्याला सोडून देतो आणि दुसऱ्या घरात प्रवेश करतो, त्याचप्रमाणे जीव बांधलेल्या आयुष्य कर्माच्या उपभोगासाठी एका योनीत प्रवेश करतो आणि तेथील कर्म भोगून दुसऱ्या योनीत जातो.

संसारी जीव सरकारी नोकराप्रमाणे आहे. ज्याप्रमाणे कित्येक सरकारी नोकरांना अमुक मुदत पूर्ण झाल्यावर स्थान बदलावे लागते त्याचप्रमाणे जीवाचे तसे कर्म भोगले गेल्यावर योनी बदलावी लागते.

अशा या संसाराची विचित्रता, परिवर्तनशीलता पाहून संसारभोग भोगण्याची इच्छा होत नाही, मनात तीव्र वैराग्य उत्पन्न होते.

सर्व भारतीय दर्शनांचा मुख्य हेतू संसारापासून मुक्ती मिळवणे आहे. म्हणून संसाराच्या स्वरूपाचे वर्णन आणि त्यापासून मुक्त होण्याचे विवेचन प्रस्तुत भावनेत केले आहे.

एकत्व भावना – आपले हे वर्तमान जीवन अनेक प्रकारच्या संबंधाने बद्ध आहे. पारिवारिक, सामाजिक, नागरिक, राष्ट्रीय आणि अन्तर्राष्ट्रीय अनेक प्रकारचे संबंध ह्या जीवनाशी जुडलेले आहेत. परंतु हे सर्व संबंध व्यावहारिक आणि औपचारिक आहेत. निश्चय दृष्टीने आत्मा असंग एकटाच आहे. एकाकी आहे. या संसारातील कोणत्याही वस्तूशी किंवा व्यक्तीशी त्याचा कोणताही संबंध नाही. जे पण संबंध आहेत ते

अनादिकाळच्या कर्मांमुळे आहेत. जीवाचा परम एकत्वभाव नष्ट करणारे कर्मच आहेत. जर कर्म नष्ट झाले तर अनेकता राहणारच नाही. त्याची एकता नेहमीच अविच्छिन्न राहील.

मी एकटाच आहे असे चिंतन करणेही एकत्व भावना आहे. मोहामुळे जीव दुसऱ्यासाठी पाप करतो, पण तरी त्याचे फळ त्याला एकट्यालाचे भोगावे लागतात. मोहान्ध होऊन ह्या जीवाने अनंत भवात धन, शरीर स्वजन इत्यादींची चिंता केली. पण स्वतःची थोडीपण चिंता केली नाही. तो स्वतःलाच विसरला. त्याला एकत्व भावनेच्या चिंतनाने- मी एकटा आहे असे चिंतन केले पाहिजे आणि जेव्हा एकत्वाची बुद्धी प्राप्त होते तेव्हाच जीव स्वतःचे हित साध्य करण्यासाठी तत्पर बनतो.

अन्यत्व भावना - शरीर इत्यादी वस्तू माझ्याहून अन्य आहेत. माझ्या नाहीत असे चिंतन करणे अन्यत्व भावना आहे. जी वस्तू स्वतःची नाही, तिला स्वतःची मानणे म्हणजे ममत्व आहे. कोणती वस्तू माझी नाही हे जाणण्यासाठी प्रथम स्वतःचे काय आहे हे जाणले पाहिजे. स्वतःचे काय आहे हे जाणण्यासाठी स्वतः कोण आहे हे जाणले पाहिजे.

निश्चय दृष्टीने 'मी शुद्ध आत्मा आहे, शुद्धज्ञानाशिवाय माझे काहीच नाही' असे चिंतन मोह नष्ट करण्याचे मोठे साधन आहे.

शरीर आणि आत्मा भिन्न आहेत. शरीर क्षणिक आहे तर आत्मा शाश्वत आहे. कर्मामुळे आत्म्याचा शरीराबरोबर संयोग झाला. परंतु हे शरीर माझे नाही तर त्याच्यावर ममत्व का करावे ? असे चिंतन अन्यत्वभावनेत केले आहे.

संसारच्या संबंधाचे भवन स्वार्थाच्या पायावरच उभे आहेत स्वार्थ पूर्ण होताच संबंध पूर्ण होतात.

अन्यत्वभावना आपल्याला बोध देते की स्वजन, धन तर जीवापासून भिन्न आहेच आहे, पण ज्याच्याबरोबर सर्वात घनिष्ट संबंध आहे असा शरीरपण जीवाहून अन्य आहे. कारण जीव चैतन्यमय आहे आणि शरीर जड आहे. जीव अरूपी, नित्य आहे, शरीर रूपी, अनित्य आहे.

अन्यत्व भावनेच्या चिंतनाने मी शरीरहून भिन्न आहे अशी प्रतीती झाली तर जीव दुःखाच्या प्रसंगी दुःखित होत नाही. मृत्यूने घाबरत नाही. कारण जीव अमर आहे. तो कधी मरत नाही. शरीराचा नाश होतो, तेव्हा अज्ञानी जीवाला मी पण मेलो असा भ्रम होतो. पण ज्ञानी व विवेकीजीव आत्म्याला शरीराहून भिन्न समजतात. हे शरीर जीवाला राहाण्याचा, आधार आहे. वेळ झाली की जीव एक शरीर सोडून दुसऱ्या शरीरात अथवा

एकस्थान सोडून दुसऱ्या स्थानाला जातो.

म्हणजे आत्मा आत्माचे ज्ञान इत्यादी गुण आपले आहेत त्याशिवाय आपले काहीच नाही.

आत्मा ज्ञानमय आहे. त्याच्या ज्ञान गुणाला प्रकट करण्यासाठी ज्ञानावरणीय कर्माचा नाश केला पाहिजे आणि ज्ञानावरणीय कर्माचा नाश करण्यासाठी मोहनीय कर्म नष्ट केले पाहिजे. मोहनीय कर्म नष्ट करण्यासाठी संयमाची आराधना केली पाहिजे. असे केले तर मनुष्य भव सार्थक होतो.

अन्यत्वभावनेचे सतत चिंतन केले तर हा दुःखमय पंचम काळ पण जीवाला दुःखी करू शकत नाही. जो शरीर आणि आत्म्याला भिन्न समजतो त्याला परमात्म स्वरूपाची प्राप्ती होते.

अशुची भावना - एकत्व व अन्यत्व भावनेमध्ये आत्मा आणि आनात्मा यांना पृथक समजण्याचा बोध दिला आहे. आत्मा ज्या शरीरात राहतो त्याचा त्याला मोह होतो. कारण दीर्घकाळापासून आत्मा ह्या शरीरात निवास करतो. म्हणून त्याचा मोह सुटत नाही. शरीर व आत्मा भिन्न आहे हे समजल्यावर सुद्धा शरीराबद्दलची प्रिती, स्नेह, आकर्षण कमी होत नाही. शरीराबद्दल आकर्षण असण्याचे कारण केवळ त्याचे बाह्य स्वरूप आहे. विशेष चिंतन केल्यावर त्याचे आंतरिक खरे स्वरूप किती घृणास्पद आहे हे समजते.

ज्या सौंदर्याचा गर्व करून प्राणी आपल्या आत्म्याला विसरून जातो त्या सौंदर्या-खाली काय लपलेले आहे ? हे पाहाण्यास त्याला वेळ नाही. त्याच्या बुद्धीवर पडदा पडला आहे. तो दूर करण्यासाठी तसेच शरीराचे वास्तविक स्वरूप समजण्यासाठी अशुचि भावनेचे चिंतन करण्याचे प्रस्तुत भावनेत विवेचन केले आहे. निश्चयात्मक दृष्टीने शुचि-अशुचीचे वर्णन असे होते की ज्यांचे अंतरंग शुद्ध नाही त्याची बाह्य शुचिता केवल फसवणुक आहे. जसे गाढवाला तीर्थस्नान, कडू फळाला गुळाचा लेप, उजाड घराला तोरण, उपाशी माणसाच्या शरीरावर अन्नाचा लेप, मातीच्या फळाला रंगरंगोटी करणे ह्यासाठी बाह्य क्रिया आहेत. चांगले कर्म केल्यामुळे बाह्यजीवन शुद्ध व निर्मळ होते त्याचेच आंतरिक जीवन निष्कलंक होते. हृदय शुद्ध असेल तर संकल्पविकल्प मनात येतच नाहीत आणि ज्याच्या मनात विकल्पभाव येत नाही त्याचे मन दूषित होत नाही. ह्यालाच वास्तविक शुचिता म्हणतात.

शरीराच्या अशुचीचे चिंतन केल्याने ममत्व दूर होते आणि म्हणूनच ह्या भावनेत

शरीराच्या अशुचीतेचे वर्णन वर्णन केले आहे. म्हणूनच म्हटले आहे - 'जगत्कायस्वभावौ च संवेग वैराग्यार्थम:'[१] संवेग आणि वैराग्यासाठी संसार आणि शरीराच्या स्वभावाचा विचार केला पाहिजे.

आस्रव भावना - हा संसार कर्म प्रवाहाच्या परिणामांचा विस्तार आहे. कर्म आपल्या प्रकृती व स्वरूपानुसार विविध फळे देतात जोपर्यंत त्यांचा प्रवाह गतिशील राहातो. संसारातील जन्म मरणाचेचक्र चालूच राहाते. जैन दर्शनात यालाच आस्रव म्हणतात. आस्रवामुळे आत्म्यात कर्म अणू प्रवेश करतात. नंतर ते कर्माणू आत्म्याबरोबर दूधपाण्याप्रमाणे एकरूप होतात त्याला कर्मबंध म्हणतात. कर्मबंध झाल्यानंतर अमुक काळ पसार झाल्यावर त्या कर्माचा उदय होतो. कर्मोदय होतो तेव्हा कर्म स्वतःचे फळ देऊन आत्म्यापासून वेगळे होतात. कर्माच्या उदयामुळे जीव संसारात परिभ्रम करतात. अशाप्रकारे जीवाच्या संसार परिभ्रमणाचे कारण आस्रव आहे असे चिंतन करून आस्रव अर्थात पाप कर्म येण्याचे जे कारण आहे त्याचा त्याग करण्याचे विवेचन ह्या आस्रव भावनेत केले आहे.

संवर भावना - आस्रवभावना संसारदु:खाचे मूळ आहे. त्या संसाराच्या दु:खाचा अंत आस्रवाच्या निरोधाशिवाय होणार नाही. म्हणून मोक्षसुखाचे इच्छुक आस्रव निरोध करण्याचा प्रयत्न करतात. आस्रव निरोध म्हणजे संवर. आस्रव निरोध केल्याने कर्मरूपी कचरा आत्म्यात प्रवेश करत नाही. संवरभावनेत आस्रव निरोध करण्यासाठी काय केले पाहिजे ह्याचे विवेचन केले आहे.

निर्जरा भावना - सर्व कर्मांचा क्षय करण्यासाठी आस्रव निरोधरूप संवर आवश्यक आहे, त्याचप्रमाणे निर्जरापण अत्यंत जरूरी आहे. निर्जरा म्हणजे कर्माचा क्षय, संवराने नव्या कर्माचा बंध होत नाही आणि निर्जराने पूर्व बद्ध कर्माचा क्षय होतो. म्हणून आध्यात्मिक विकासासाठी संवर आणि निर्जरा दोन्ही आवश्यक आहेत. ह्या भावनेत बारा प्रकारच्या तपांचे वर्णन केले गेले आहे. कारण तप हे आत्मधर्म आहे. आत्म्याच्या विकासासाठी अत्यंत उपयोगी तत्त्व आहे. तप बाह्य आणि अंतरंग शत्रूच्या श्रेणिला पराजित करण्यासाठी समर्थ शस्त्ररूप आहे. त्याच्यामुळे वैभव, लब्धी आणि सिद्धी प्राप्त होते. तसेच स्वर्ग आणि मोक्षापर्यंत पोहोचवण्यात सक्षम असल्याने तप संपूर्ण जगाला पूज्य आहे. लब्धी म्हणजे जीव आपले रूप लहान-मोठे करू शकतो, अदृश्य होऊ शकतो. अश्या अनेक प्रकारच्या शक्तीला लब्धी म्हणतात. तसेच रोग, उपद्रव इत्यादींचा विनाश करण्याच्या शक्तीला सिद्धी म्हणतात. तपाच्या अचिन्त्य प्रभावाने अनंत शक्ती प्राप्त

होते. आत्म्यात अनंत शक्ती आहे. त्यांना प्रकट करणारे तप आहे.

लब्धी आणि सिद्धींचा उपयोग योगी अथवा तपस्वी असाधारण कारणाशिवाय करत नाही. कारण त्याचा उपयोग करणे प्रमादजन्य आहे. महत्त्वाचा विषय कर्म निर्जरा करण्याचा आहे. कर्म निर्जरा तपाद्वारा होते व अचिंत्य आत्मशक्ती पण प्राप्त होते.

ही भावना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कारण सर्व दर्शनांचा अंतिम ध्येय मोक्ष आहे. मोक्ष ह्या भावनेच्या चिंतनाने आचरणाने प्राप्त होतो. मन, वचन, काया यांची एकाग्रता साधून जर तप केले तर देहध्यास सुटतो आणि ज्याचा देहध्यास सुटतो तो आपल्या ध्येयापर्यंत शीघ्रतेने पोहोचतो.

लोकभावना - जीव कर्माच्या उदयाने अनादी काळापासून ह्या संसारात परिभ्रमण करत आहे. भ्रमण करणारे जीव कोणत्या कोणत्या स्थानात उत्पन्न होतात हे जागण्यासाठी लोक भावनेचे चिंतन केले जाते. लोक म्हणजे विश्व, जगत, इत्यादी. शब्दांचा एकच अर्थ आहे.

ह्या विशाल लोकामध्ये हा जीव वेगवेगळ्या जातीमध्ये अर्थात एकेन्द्रिय द्विइंद्रिय इत्यादी जातींमध्ये (इथे जातीचा अर्थ समूह होतो.) भ्रमण करून आला. ह्या जन्मात जे काही प्राप्त झाले आहे ते नवीन काहीच नाही, भूतकाळात अनंत वेळा अनंत स्वजन मिळाले, वैभव इत्यादी एकत्र केले. परंतु मृत्यू होताच ते सर्व काही सोडून जीव तेथून निघून गेला. त्यामुळे हे सर्व निरर्थक आहे, असे ज्ञान ह्या लोक भावनेच्या चिंतनाने प्राप्त होते.

ज्या जीवावर लोकभावनेच्या ह्या बोधाचा प्रभाव पडतो तो जीव विरागी झाल्याशिवाय रहात नाही. अशाप्रकारे ह्या भावनेचे विवेचन केले आहे.

बोधिदुर्लभ भावना - लोकभावनेत विचारानंतर बोधिदुर्लभ भावनेत असे विचार आहेत की ह्या विशाल विश्वात अनंत काळापासून भ्रमण करणाऱ्या ह्या जीवाला सर्व भाव अनंतवेळा मिळाले आहेत. पण एक भाव त्याला मिळाला नाही. तो म्हणजे बोधी बोधी म्हणजे सम्यग्दर्शन सम्यक्त्व समकित, श्रद्धा हे सर्व एकार्थवाचक शब्द आहेत. बोधी प्राप्त होणे दुर्लभ आहे. त्याचा विचार करणे, बोधी दुर्भल भावना आहे.

दुर्लभ बोधी सुलभ कशी होऊ शकते त्याचे विवेचन ह्या भावनेत केले आहे.

लोककल्याण आणि लोक मांगल्याच्या उत्तम ध्येयाने भावनेसंबधी तसेच भावनेच्या बारा प्रकारांविषयी सरळ, मधुर, प्रवाही शैलीत जे वर्णन केलेले आहे ते परम

उपकारी आहे. अनेक साधक आत्म्याच्या जीवनामध्ये वैराग्याचा विकास होण्यासाठी, आणि ते संसाराने विरक्त होऊन मोक्षमार्गाचे साधक आणि आराधक बनावे, पाप प्रवृत्तीने निवृत्त होऊन पुण्य प्रवृत्तीमध्ये प्रगती करावी, असे सुंदर परम अध्यात्मरसाने युक्त लेखन अनेक महान चिंतकाच्या चिंतनाचा प्रसाद आहे. त्या चिंतनाच्या चांदणीचा प्रकाश संसारी जीवाच्या अज्ञान अंधकाराला दूर करून ज्ञानाचा प्रकाश करणारा आहे.

धर्मभावना - ह्या भावनेत साधक धर्मचिंतन करतो. साधकाची पूर्ण निष्ठा ही असते की धर्मच जीवनात सर्वोपरी आहे आणि जेव्हा धर्माच्या श्रेष्ठतेची त्याला समज येते तेव्हा धर्माचरण करण्याची भावना उत्पन्न होते. धर्म प्राणिमात्राच्या कल्याणासाठी आहे, हित आणि आत्मशांतीसाठी आहे, त्याचे प्रकार इत्यादींचे ह्या भावनेत वर्णन केले आहे.

धर्म भावनेच्या चिंतनाने ज्ञान होते की मानव जीवन तेजस्वी व उन्नत करण्यासाठी, संस्कार दृढ करण्यासाठी धर्मच सर्व श्रेष्ठ आहे. धर्माने मानवाचा, मानवतेचा, मानव आत्म्याचा विकास होतो.

ज्याला धर्माची रुची असते, त्याचे जीवन सार्थक असते. आंबा पिकल्यावर त्याचा रस आंब्यातच असतो. परंतु बाहेरून केशरी रंग दिसल्याशिवाय रहात नाही, त्याचप्रमाणे ज्याच्या हृदयात धर्म आहे तो बाहेर त्याच्या व्यवहारात, आचरणात दिसल्या शिवाय रहात नाही. धर्मभावना जीवनाला सद्गुणांनी सुगंधित बनवते.

धर्म हृदयात घुसलेली दानवीय वृत्ती, स्वार्थ-लिप्सा काढून टाकतो आणि त्यात मानवतेची प्राणप्रतिष्ठा करतो. हृदयात धर्मरूपी सूर्याचा प्रकाश होताच अज्ञान, मोह, मद मत्सर इत्यादींचा अंधकार दूर होतो.

धर्ममंगल लक्ष्मीचे क्रीडास्थान आहे. धर्म जगाचे सार तत्व आहे, सर्व जीवनावर दयाभाव अभयभावना धर्म आहे. संपूर्ण भय दूर करणारा धर्म आहे. धर्म सिद्ध गतीची शिडी आहे. ज्याप्रमाणे शिडी चढण्यासाठी पायऱ्या असतात त्याप्रमाणे मोक्षात पोहोचण्यासाठी गुणस्थानक्रम आरोह आहे. अशाप्रकारे ह्या भावनेत विवेचन केले आहे. जे साधकाला उन्नत स्थानी पोहचविण्यासाठी सक्षम आहे.

आपल्या समोर धर्माचे दोन रूपे दिसून येतात. एक आचरणात्मक व दुसरे उपासनात्मक. आचरण म्हणजे जीवनचर्या आणि उपासना म्हणजे कर्मकाण्ड. आचरण प्रधान धर्माने अनैतिकता, अपराध, असमाजिकता कमी होते. परंतु आचरणाचे प्राधान्य

कमी झाले आहे व उपासना वाढली आहे. परिणामस्वरूपी धार्मिक दिसणाऱ्या व्यक्तींचा व्यवहार पण अपराधपूर्ण होऊ लागला आहे. मात्र उपासनेने परमात्म्याचा साक्षात्कार होत नाही कारण आचरण रहित क्रियाकर्म कित्येकदा मात्र अभिनयच असते. म्हणूनच आचरण शुद्धीसाठी ह्या धर्मभावनेत सागार आणि अणगार धर्माचे विवेचन केले आहे. अकरा प्रतिमांचे वर्णन पण केले आहे. अशा प्रकारे ह्या बारा भावनांच्या चिंतनात मानव मात्राच्याच काय पण जीवमात्राच्या कल्याणाची भावना आहे. सर्व जनहिताय, सर्वजनसुखाय अशी प्रवृत्ती करण्याची प्रेरणा ह्या भावनेच्या चिंतनाने प्राप्त होते.

संस्कृत, प्राकृत, प्राच्य भाषांशिवाय हिन्दी, मराठी, गुजराती, राजस्थानी, इंग्रजी इ. भाषेतही या भावनेचे विवेचन केले गेले आहे. आगमापासून चालत आलेला हा दिव्यभव्य, पावन, बैचारिक स्रोत वर्तमान युगीन मनिषींच्या सुंदर गेय काव्याच्या रूपात अतिशय प्रेरक स्वरूपात उपलब्ध आहेत. हा मुमुक्षूच्या दृष्टीने फार भाग्याचा विषय आहे.

बारा भावनांचा क्रमिक विकास - सर्वसामान्य क्रमाच्या दृष्टीने विचार केला तर प्रारंभिक सहा भावना वैराग्य उत्पादक आहेत आणि शेवटच्या सहा भावना तत्त्वपरक आहेत. प्रत्येक क्रमात पण स्वाभाविक विकास दिसून येतो जसे -

जेव्हा प्राणी पदार्थांची अनित्यता, क्षणभंगुरता इत्यादींचे अनित्य भावनेत चिंतन करतो, तेव्हा त्यांना सुरक्षित ठेवण्याचे अनेक उपाय शोधतो. नंतर मृत्यू, वृद्धत्व इत्यादी टाळण्यासाठी विचार करतो तेव्हा अशरण भावना सांगते, वियोग होणे हा संयोगाचा सहज स्वभाव आहे. त्याच्यासाठी कोणतेच औषध नाही, मणी, मंत्र, तंत्र नाहीत, जे स्वतःला अथवा स्वजनांना वाचवू शकतील अथवा शरण रूप होतील. तेव्हा मनुष्य विचार करतो की जरी काही संयोगांचा वियोग झाला तरी अन्य संयोग तर मिळतीलचना. तेव्हा संसार भावनेच्या माध्यमाने हा भ्रमपण दूर केला जातो की संयोगात सुख नाही. संयोग दुःखरूपच आहेत तरी मोहग्रस्त प्राणी विचार करतो की दुःख सगळे मिळून भोगवून घेऊ. त्याच्या उत्तरात एकत्वभावना सांगते, अरे भोळ्या प्राण्या दुःख सगळे मिळून अथवा वाटून भोगले जात नाही. ते एकट्यालाच भोगावे लागते. ह्या गोष्टीला अन्यत्व भावना आणखी जास्त दृढ करते की तुझे स्वतःचे शरीर देखील तुला साथ देत नाही तर मग पुत्र, मित्र, स्वजन ह्यांच्यात का मोहीत होतो ? ते सगळे अन्य आहेत. पुढे अशुचिभावना मानवाला मोहनिद्रेतून जागृत करते की ज्या शरीराच्या प्रती तुला इतकी आसक्ती आहे ते शरीर किती घृणित, मलीन आहे त्याचा तर तू विचार कर ! अशाप्रकारे प्रथम सहा भावनांचे

चिंतन केले तर संसार, शरीर आणि भोगांच्या प्रती विरक्ती आल्याशिवाय रहात नाही.

जेव्हा हा आत्मा शरीर आणि पदार्थांपासून विरक्त होतो तेव्हा आत्मशुद्धीच्या दिशेने पुढे वाटचाल करण्यासाठी आस्रवभावनेत, आत्म्यात उत्पन्न होणाऱ्या मिथ्यात्व, कषाय इत्यादींच्या स्वरूपाला समजावून त्याची दुःखरूपता, आणि आत्म्याच्या सुख स्वरूपाचे आस्रवांपासून दृष्टी दूर करून संवर निर्जरा भावनेत अतीन्द्रिय आनंदरूप संवर निर्जरा तत्त्वांचे ज्ञान प्राप्त करतो. आस्रव, संवर व निर्जरातर स्पष्टपणे तत्त्वांची नावे आहेत, ह्याचे चिंतन पण तत्त्वपरकच आहे.

लोक भावनेत लोकाचे स्वरूप दाखवून ह्या लोकांमध्ये जीवात्म्याचे झालेले जन्ममरण इत्यादींचे वर्णन करून पुढे बोधिदुर्लभ भावनेत सांगितले आहे की ह्या लोकामध्ये सर्वकाही प्राप्त होणे सुलभ आहे. परंतु एक रत्नत्रयी प्राप्त करणे अत्यंत दुर्लभ आहे. जर रत्नत्रयी प्राप्त झाली तर संसारात परिभ्रमण करावे लागणार नाही. शेवटच्या धर्म भावनेत रत्नत्रय आरधनेची आवश्कयता इत्यादींचे वर्णन करून धर्माचे प्रकार आदींचे विवेचन केले आहे. धर्माची आराधना करणे हीच मनुष्यजन्माची सार्थकता आहे. अशा प्रकारे बारा भावनांची चिंतन प्रक्रिया अत्यंत अद्‌भूत आहे. कारण ह्याच्यात संसार, शरीर आणि भोगात गुरफटलेल्या जगाला अनन्तसुखाच्या मार्गात स्थापित करण्याचे सफल प्रयोग आहेत. बारा भावनेचे चिंतन आत्मार्थी साधकाचे सर्वाधिक प्रिय मानसिक, दैनिक भोजन आहे.

जैन साहित्यात भावनेचा विकास - जैन आगम साहित्याचे अवलोकन करताना हे स्पष्टपणे दिसून आले की भावनेसंबंधी जसे आगमोत्तर काळच्या साहित्यात क्रमिक वर्णन आहे तसे आगमात नाही. परंतु ठिकठिकाणी भावनेचे वर्णन अवश्य प्राप्त होते. कुठे धर्मध्यानात स्थिर होण्यासाठी तर कुठे महाव्रतांच्या रक्षणाच्या रूपात भावनेचे वर्णन प्राप्त होते. उत्तराध्ययन, बृहत्कल्पभाष्य इत्यादीं भावनेविषयी कोणतेच स्वतंत्र आगम ग्रंथ नाही.

आगमोत्तर काळात अनेक महान दर्शन शास्त्रांच्या चिंतकांनी आपले भावनेविषयी चिंतन कोणी संपूर्ण ग्रंथरूपात तर कोणी प्रकरण, सर्ग अथवा सूत्ररूपात व्यक्त केले आहे. अशाप्रकारे भावनेचा जसा क्रमिक विकास दिसून येतो तसा साहित्यात पण उत्तरोत्तर विकास झालेला आहे.

आगमग्रंथात विखुरलेल्या भावनेच्या पुष्पांना आगमोत्तर काळच्या लेखकांनी मालिकेचे स्वरूप दिले. विखुरलेल्या पुष्पांना गोळा करण्यासाठी कष्ट पडतात. परंतु माळ ग्रहण करणे सहज व सरळ आहे.

